केस[illegible] त्रिमूर्ति

ચિ. સુહાસ
ચોસ
સપ્રેમ આશીર્વાદ
કાકા
૨૫-૯-૭૪

# केसरीची त्रिमूर्ति

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

© डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे

प्रकाशक व मुद्रक
जयंत श्रीधर टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणें ३०

■

प्रथमावृत्ति
ऑगस्ट १९७४

■

**मूल्य २५ रुपये**

■

मुखपृष्ठ : जोशी आर्ट्स

चि. वसंत गणेश

आणि

चि. सौ. काशी वसंत

यांस —

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| विष्णुशास्त्री चिपळूणकर | | १–१२० |
| १. चित्कळेचा स्पर्श | ... | ५ |
| २. आत्मप्रत्यय | ... | १२ |
| ३. स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश | ... | २० |
| ४. एक पाय तुरुंगांत | ... | २७ |
| ५. तेजोवलयाचा भेद | ... | ३३ |
| ६. इंग्रजी विद्येचें वज्र | ... | ४० |
| ७. मनावरचे दोन ताण | ... | ४७ |
| ८. अवनतीची मीमांसा | ... | ५५ |
| ९. क्ष-किरणें | ... | ६२ |
| १०. इहवादी दृष्टिकोन | ... | ६९ |
| ११. टीकाकार विष्णुशास्त्री | ... | ७६ |
| १२. चरित्रकार विष्णुशास्त्री | ... | ८८ |
| १३. निबंधकार विष्णुशास्त्री | ... | ९५ |
| १४. वाग्वैभव | ... | १०३ |
| १५. व्यक्तिमत्त्व | ... | ११० |

## प्रिं. गोपाळ गणेश आगरकर १२१–२०८


१. आगरकरांना हिंदुस्थान कसा दिसला ? १२७
२. व्यक्तिस्वातंत्र्य ... १४४
३. मनुष्यसुधारणेची मूलतत्त्वें ... १४९
४. सुधारणा – अग्रक्रम व मार्ग ... १५९
५. भिन्न क्षेत्रांतील अपेक्षित सुधारणा १७०
६. प्राचीन परंपरेचा अनुभव ... १९६
७. व्यक्तिमत्त्व ... २०१


□

## लो. बाळ गंगाधर टिळक २०९–३४१


१. स्वराज्यांतील 'स्व'चा व्याप ... २१५
२. पाश्चात्त्य विद्या ... २२३
३. प्राचीन परंपरा ... २३३
४. धर्माचें पुनरुज्जीवन ... २४५
५. स्वराज्याचें राजनीति शास्त्र ... २५६
६. संघशक्तीची उपासना ... २७३
७. टिळकांचें राष्ट्रीय अर्थशास्त्र ... २८२
८. लो. टिळक व सामाजिक सुधारणा २९४
९. हिंदु-मुस्लिम वाद ... ३०५
१०. महाभूतसमाधि ... ३१५
११. सिंहावलोकन ... ३३२

# प्रस्तावना

१९५७ सालीं डिसेंबर महिन्यांत नागपूरला 'साहित्यांतून नवी सृष्टि' या विषयावर मीं तीन व्याख्यानें दिलीं होतीं. विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रिन्सिपॉल गोपाळ गणेश आगरकर व लो. बाळ गंगाधर टिळक यांनी आपल्या साहित्याच्या साह्याने भारतांत नवी सृष्टि कशी निर्माण केली हें त्या व्याख्यानांत मीं विशद केलें होतें. त्या वेळीं या तीन थोर पुरुषांचा 'त्रिमूर्ति' असाच मीं उल्लेख केला होता.

तेव्हापासून या त्रिमूर्तीच्या कार्याचें विवेचन व मूल्यमापन करणारा ग्रंथ लिहावा असें मनांत होतें. अनेक कारणांनी या मधल्या काळांत तें जमलें नाही. 'इहवादी शासन' हा माझा ग्रंथ 'केसरी प्रकाशना'ने प्रसिद्ध केल्यानंतर हा विचार मनांत पुन्हा वळावला. निबंधमालेची जन्मशताब्दीहि पुढे दिसूं लागली, आणि नव्या स्वरूपांत उभविलेल्या टिळक-स्मारक मंदिराचें उद्‌घाटन होण्याचा योगहि याच वेळीं येत आहे हें दिसलें. म्हणून दीर्घकाळ मागे पडलेला हा ग्रंथ हातीं घ्यावा व तो पूर्ण करावा असें मीं ठरविलें व केसरी प्रकाशनासाठी तो स्वीकारण्याची श्री. जयंतराव टिळक यांना विनंती केली. त्यांनी ती तत्काळ मान्य केली. मीं लगेच लेखनास प्रारंभ केला, आणि आता वर्ष-सव्वा वर्षांत ग्रंथ पूर्ण होऊन प्रसिद्धहि होत आहे.

या ग्रंथांत 'केसरी'च्या या तीन संस्थापकांच्या कार्याचें विवेचन व मूल्यमापन केलें आहे. तेंच त्याचें उद्दिष्ट आहे. त्यांचें चरित्र द्यावें हें नाही. दर विभागांत प्रारंभीं अगदी त्रोटक पद्धतीने त्यांच्या चरित्राची रूपरेषा दिली आहे; पण कालाचा संदर्भ ध्यानांत यावा एवढाच त्यांत हेतु आहे. त्यांच्या चरित्राची माहिती द्यावी हा नाही, आणि त्याची जरुरीहि नाही. त्यांचीं चरित्रें अनेकांनी लिहिलेलीं आहेत. अजूनहि कोणी लिहीत आहेत; आणि महाराष्ट्रांत आबालवृद्धांना तीं आता पाठ झालेलीं आहेत. या तीन थोर पुरुषांनी हिंदी राष्ट्राची जडणघडण कशी केली तें नव्याने विशद करणें मात्र अवश्य होतें. आणि म्हणून तें उद्दिष्ट मनापुढे ठेवूनच हा ग्रंथ लिहिला आहे.

ग्रंथांत जागोजागीं, पावलोपावलीं त्रिमूर्तीच्या ग्रंथांतून, लेखांतून अवतरणें दिलीं आहेत. शक्यतोंवर त्यांचे शब्दच द्यावे, असें धोरण ठेवलें आहे. पण विस्तार-भयामुळे अनेक ठिकाणीं त्यांच्या लेखनाचा भावार्थ दिला आहे. त्यांचे शब्द जसेच्या तसे दिलेले नाहीत. अभ्यासकांनी संदर्भ पाहतांना एवढें ध्यानांत ठेवावें अशी विनंती आहे.

असल्या महागाईच्या व कागदटंचाईच्या दिवसांत श्री. जयंतरावांनी माझा ग्रंथ प्रकाशनार्थ स्वीकारला याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. लेखन चालू असतांना अनेक मित्रांशीं मी नित्य चर्चा करीत असे. त्या चर्चेचा मला अतिशय उपयोग झाला. या मित्रांचा मी फार आभारी आहे. माझें लेखन आज जवळ जवळ चाळीस वर्षे चालू आहे. एवढ्या अवधींत पुण्याच्या ग्रंथालयांनी मला ग्रंथांची कधीहि वाण पडूं दिली नाही. स. प. महाविद्यालयाचें ग्रंथालय, केसरी-मराठा ग्रंथालय, भारतीय संस्कृति कोशाचें ग्रंथालय, पुणें विद्यापीठ, गोखले इन्स्टिटयूट यांचीं ग्रंथालयें या सर्वांनी मला नेहमी मुक्तद्वार ठेविलें आहे. त्यांच्या या सहकार्यावांचून मला इतकें लेखन करतां आलें नसतें. या सर्व संस्थांतल्या ग्रंथपालांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

ग्रंथाची छपाई शुद्ध व सुंदर व्हावी यासाठी केसरी-छापखाना विभागांतील श्री. भास्करराव कुलकर्णी स्वतः अतिशय काळजी घेतात. ग्रंथ सर्वांगसुंदर झाला याचें श्रेय सर्वस्वीं त्यांना आहे.

१८७० ते १९२० हें अर्धशतक म्हणजे केसरीच्या त्रिमूर्तीच्या कर्तृत्वाचें अर्धशतक होय. लोकशाही व राष्ट्रनिष्ठा या देशांत रुजविण्याचें कार्य त्या अवधींत या थोर पुरुषांनी कसें केलें याचा तरुण पिढीने बारकाईने अभ्यास केला तर सध्याच्या आपत्काळीं तरुणांना निश्चित मार्ग सापडेल. त्या अभ्यासासाठी या ग्रंथाचें त्यांना साह्य होईल अशी आशा वाटते

—पु. ग. सहस्रबुद्धे

**विषयप्रवेश**

# नवभारताची निर्मिति

## पाश्चात्त्य विद्या

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी पेशवाईचा अस्त झाला व भारतावर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. इंग्रजांनी या देशांत पाश्चात्त्य विद्यांचा प्रसार केल्यामुळे गेल्या शतकांत येथे एक अभूतपूर्व क्रांति घडून आली व नवभारताचा जन्म झाला. त्या-पूर्वीच्या हजार वर्षांत भारतांत असें परिवर्तन कधीच झालें नव्हतें. त्या कालखंडांत शब्दप्रामाण्य, विषमता, निवृत्ति, दैववाद अशीं समाजघातक तत्त्वें धर्मशास्त्रज्ञांनी उपदेशिलीं, आणि समाजाने तीं अंगीकारिलीं होतीं. त्यामुळे हिंदु समाज विघटित झाला व स्वसंरक्षणाला असमर्थ होऊन बसला. मुसलमानी सत्तेचा निःपात करून हिंदूंनी शेवटीं हिंदुपदपातशाहि स्थापिली हें खरें; पण पाश्चात्त्य लोकांच्या आक्र-मणाला ते तोंड देऊं शकले नाहीत. भौतिक ज्ञानाची अवहेलना, कूपमंडूक वृत्ति, समुद्रगमननिषेध यांमुळे हिंदु समाज लुळापांगळा होऊन गेला होता; त्याच्यांत चैतन्य असें राहिलेंच नव्हतें. त्यामुळे तो इंग्रजांच्यापुढे पराभूत झाला आणि भार-ताच्या कपाळीं पारतंत्र्य आलें. पण त्यानंतर जी पाश्चात्त्य विद्या या देशांत प्रसृत होऊं लागली तिच्या प्रभावाने येथल्या समाजधुरीणांना नवी दृष्टि प्राप्त झाली आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे हा समाज पुन्हा जिवंत होऊं लागला. एका शतकाच्या आंतच त्याचा विलक्षण कायाकल्प झाला, आणि नवभारताचा जन्म झाला.

## शिल्पकार

नवभारताच्या निर्मितीचें हें महत्कार्य करणारे जे थोर पुरुष गेल्या शतकांत महाराष्ट्रांत होऊन गेले त्यांत विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रिन्सिपॉल गोपाळ गणेश आगरकर व लो. बाळ गंगाधर टिळक यांचें स्थान फार मोठें आहे. केसरीची त्रिमूर्ति ती हीच होय. ही त्रिमूर्तीच नवमहाराष्ट्राची व नवभारताची शिल्पकार होय. मात्र

या तीन थोर पुरुषांनी जें कार्य केलें, जी क्रांति भारतांत घडवून आणली तिची पूर्व-तयारी राममोहन राय, दादाभाई, लोकहितवादी, म. फुले, न्या. रानडे यांनी आधी करून ठेवली होती. कोणत्याहि क्रांतींत नव्या तत्त्वज्ञानाची, समाजरचनेच्या नव्या मूलतत्त्वांची, आवश्यकता असते. त्या तत्त्वांचा मनाशीं निश्चय करून समाजांत त्यांचा प्रसार धैर्याने व दृढनिश्चयाने सतत करावा लागतो. हाच क्रांतीचा पाया होय; त्यावरच नवसमाजाचें शिल्प उभारलें जातें. भारतीय समाजांत सर्वांगीण क्रांतीची अशी पायाभरणी करणारे पहिले थोर पुरुष म्हणजे राजा राममोहन राय हे होत. पाश्चात्त्य विद्येचा प्रसार प्रथम बंगालमध्ये झाल्यामुळे नवविचारांचा उदय प्रथम त्याच प्रदेशांत झाला. राममोहन राय यांनी प्रथम रूढ हिंदु धर्मावर अत्यंत प्रखर टीका करण्यास प्रारंभ केला; कारण धर्मक्रांति झाल्यावांचून, विकृत धर्म-कल्पनांपासून समाज मुक्त झाल्यावांचून, येथे दुसरी कसलीहि क्रांति होणें शक्य नव्हतें. त्या वेळीं समाजावर सर्वंकष अशी धर्माची सत्ता होती. व्रतेंवैकल्यें, उद्यापनें हें सर्व कर्मकांड, मायावाद शिकविणारी निवृत्ति, बुद्धिनाश करणारें ग्रंथप्रामाण्य, समष्टि-भावना मुळांतच खुडून टाकणारा जातिभेद, स्त्रीचें दास्य व त्यांतून निर्माण झालेली सतीची दुष्ट, रानटी चाल, हीं सर्व हिंदु धर्माच्या विकृतीचीं लक्षणें होत, असें राम-मोहन याचें मत होतें; म्हणून धर्मसुधारणेसाठी त्यांनी ब्राह्म-समाजाची स्थापना करून आपल्या लेखांतून, पत्रांतून व व्याख्यानांतून धर्माच्या या विकृतीवर सतत भडिमार चालू ठेवला होता; आणि त्याच वेळीं भौतिक विद्यांची उपासना या देशांत व्हावी, असे प्रयत्न त्यांनी चालविले होते. लॉर्ड बेकन याच्या काळापासून ज्या भौतिक दृष्टि-कोनाचा अवलंब युरोपने केला त्याच दृष्टिकोनाचा अवलंब करून भारताने आधुनिक भौतिक व सामाजिक शास्त्रांचें अध्ययन केलें पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. तो मानून भारतीय समाजधुरीणांनी अनन्यभक्तीने या पाश्चात्त्य विद्यांची उपासना केली, म्हणूनच त्यांना भारतांत सर्वांगीण क्रांति घडविणें शक्य झालें.

ही क्रांति घडविण्यासाठी केसरीच्या त्रिमूर्तीने जें कार्य केलें त्याचें विवेचन आपल्याला पुढील प्रबंधांत करावयाचें आहे; पण त्यापूर्वी पेशवाईच्या अंतापर्यंत भारतीय समाजाची स्थिति कशी अवनत झाली होती आणि ती सुधारण्यासाठी त्यांच्या आधीच्या समाजधुरीणांनी कसे प्रयत्न केले होते, त्याचें धोडक्यांत समालोचन करणें अवश्य आहे.

## मानवत्वाची प्रतिष्ठा

गेल्या शतकाच्या पूर्वार्धांत या देशांत पाश्चात्त्य संस्कृतीच्या आगमनामुळे जें तात्त्विक विचारमंथन सुरू झालें त्यांतून जीं अनेक तत्त्वरूप रत्नें निघालीं त्या रत्नांतील अत्यंत श्रेष्ठ रत्न म्हणजे 'मानवत्वाची प्रतिष्ठा' हें होय. १८५० च्या पूर्वी अनेक शतकें आपल्या देशांत जीं समाजबंधनें रूढ होतीं त्यांचें परीक्षण केलें तर असें दिसून येतें की, त्या बंधनांच्या प्रणेत्यांना मानवी जीवनाची प्रतिष्ठा मान्य

तर नव्हतीच, पण ती त्यांना ज्ञातहि नव्हती. त्या काळीं भारतीय समाजांतील सर्व जातींमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या सर्व क्षेत्रांतील व्यवहारावर जीं अनंत बंधनें होतीं, त्यांचा नुसता विचार सुद्धा आज आपल्याला दु:सह वाटतो. स्नानाविषयी नियम, भोजनाविषयी नियम, शौचाविषयी नियम, मुखशुद्धीविषयी नियम, झोपण्यासंबंधी निर्बंध, उठण्यासंबंधी निर्बंध, कपडयांसंबंधी निर्बंध; जन्माच्या आधीचीं बंधनें, मरणानंतरचीं बंधनें, तिथि, वार, नक्षत्रें, मास यांविषयीचीं नियंत्रणें, विवाहविषयक आज्ञा, जातिभेदविषयक आज्ञा, परस्परव्यवहाराविषयी आज्ञा; प्रवास, परदेशगमन, भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, स्पर्श यांचे विधिनिषेध – हे सर्व निर्बंध आणि त्यांचा अल्पसा भंग झाला असतां घ्यावयास सांगितलीं शेकडो प्रायश्चित्तें, हीं मानवी प्रतिष्ठेला उपमर्दकारक आहेत; मानवाच्या व्यक्तित्वाचा त्यामुळे अवमान होतो आणि त्या बंधनांच्या प्रणेत्यांची मानवाबद्दलची तुच्छता-बुद्धि स्पष्ट होते. असल्या समाजांत कोणत्याहि प्रकारचें कर्तृत्व निर्माण होणें कालत्रयी शक्य नाही. समाजाचे व्यवहार सुरळीत चालण्यासाठी कांही बंधनें आवश्यक आहेत; पण त्या बंधनांना कांही तर्काचा, उपयुक्ततेचा, सद्हेतूचा पाठिंबा असला पाहिजे. तो पाठिंबा जेव्हा नसतो आणि धर्मसिंधु, निर्णयसिंधु ह्या ग्रंथांतल्याप्रमाणे ही बंधनें जेव्हा हेतुशून्य, अर्थशून्य, तर्कशून्य व केवळ धर्माज्ञेवर आधारित अशीं असतात, तेव्हा तीं मानवी प्रतिष्ठेला अत्यंत घातक ठरतात. या बंधनांनी मानवाचें मानवत्व संपुष्टात येतें. एखाद्या सुतावर पाय पडला, एखादा पाण्याचा थेंब अंगावर पडला, कोणाची सावली अंगावर पडली, कसल्या तरी धान्याचा कण पोटांत गेला किंवा नुसता कोणाचा शब्द कानावर आला तरी तेवढयामुळे मनुष्य पतित ठरावा, अमंगळ ठरावा आणि त्याबद्दल त्याला प्रायश्चित्त घेणें भाग पडावें, अशा प्रकारच्या धर्माज्ञा प्रचलित करणाऱ्यांच्या मनांत मानवी जीवनाच्या मूलभूत महत्त्वाची किती जाणीव असेल, तें सहज कळून येईल. मानव म्हणजे त्याची बुद्धि, त्याचें मन, त्याचा आत्मा, त्याच्या निष्ठा, त्याची श्रद्धा, त्याची विचारसरणी, त्याच्या आशाआकांक्षा हा सर्व जगांतल्या तत्त्ववेत्त्यांना मान्य असलेला सिद्धान्त भारतांतल्या जुन्या शास्त्री-पंडितांनी पायदळीं तुडविला होता. त्यांच्या मतें मानव म्हणजे त्याचा देह, त्याचें जड शरीर. " मनुष्य म्हणजे मनुष्याचा आत्मा; देह नव्हे; देह म्हणजे मी, अशी भावना ठेवल्यामुळे मनुष्य मोक्षाला अपात्र ठरतो. " अशा प्रकारचें आध्यात्मिक तत्त्वज्ञान एका तोंडाने सांगणाऱ्या धर्मवेत्त्यांनी दुसऱ्या तोंडाने मानवाला जो धर्म सांगितला तो केवळ त्याचा जड देहच विचारांत घेऊन सांगावा, आणि नुसत्या स्पर्शाने किंवा सावलीने त्याला पतित मानण्यास प्रवृत्त व्हावें, यापरता दुसरा अध:पात तो काय !

## जुनीं घातक तत्त्वें

ब्रिटिशांच्या पूर्वीच्या हजार वर्षांच्या काळांत येथे समाजरचनेचीं जीं तत्त्वें मान्य व रूढ झालीं होतीं त्यांतील जवळ जवळ प्रत्येक तत्त्व मानवी प्रतिष्ठेला घातक

असेंच होतें. कलियुगाची कल्पना, नियतिवाद, संसाराची उपेक्षा, तर्काची अवहेलना, जन्मनिष्ठ उच्चनीचता, शब्दप्रामाण्य हीं तत्त्वें व्यक्तीच्या स्वत्वाची पायमल्ली करणारीं आहेत; आणि हिंदूंचा आचारधर्म, त्यांचें सर्व कर्मकांड त्यांच्याच आधाराने उभारलेलें आहे. असल्या हीन धर्माचे जे अनुयायी त्यांच्यांत मानवी कर्तृत्वाचा निदर्शक असा कोणताच गुण निर्माण होणें शक्य नव्हतें. पाश्चात्त्य विद्येमुळे ज्यांना नवी दृष्टि प्राप्त झाली त्या सर्व पंडितांना हीच भयावह गोष्ट प्रथम जाणवली; आणि त्यांनी पहिला घण त्या कर्मकांडप्रधान, विवेकहीन, जडधर्मावरच घातला. मानवाला देहप्रधान मानून सांगितलेला हीन व अपवित्र असा आचार-धर्म नष्ट करून, त्याच्या जागीं मनाची, बुद्धीची, आत्म्याची प्रतिष्ठा वाढविणारा तात्त्विक धर्म प्रस्थापित करणें हें त्यांचें उद्दिष्ट होतें. धर्म म्हणजे मनोजय, आत्मसंयमन; धर्म म्हणजे भूतदया, परोपकार, प्रेम, भक्ति होय, हा महनीय विचार त्यांना प्रसृत करावयाचा होता. त्यासाठीं त्यांनी वेद, उपनिषदें, गीता ह्या आपल्या धर्म-ग्रंथांचा आधार घेतला. मध्ययुगांत रूढ झालेलें धार्मिक कर्मकांड म्हणजे मूळ धर्म-वृक्षावर माजलेलें बांडगूळ आहे; धर्म ही मुख्यतः मानसिक उन्नति आहे; आणि तिच्यासाठी विवेक, बुद्धि, तर्क, यांचाहि उपयोग श्रद्धा व भक्ति यांच्याबरोबर झाला पाहिजे हा विचार राममोहन, लोकहितवादी, दयानंद इत्यादि धर्मसुधारकांनी लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला.

राजा राममोहन राय यांचा मूर्तिपूजेला विरोध होता; कारण मूर्तिपूजेमुळे समाजाला बौद्धिक दास्य येतें, त्याला परमात्म्याच्या शुद्ध स्वरूपाचा विसर पडतो आणि तो अनेक वेडगळ आचारांना व रूढींनाच धर्म मानूं लागतो असें त्यांचें म्हणणें होतें. म्हणूनच त्यांनी ब्राह्म-समाजाच्या स्थापनेच्या वेळीं मूर्तिपूजेचा त्याग करून निर्गुण परमेश्वराची उपासना करण्याचा उपदेश केला. त्यांना समाजांतील बाह्य विधिविधानांचें मूळच उपटून काढावयाचें होतें, म्हणून त्यांनी मूर्तिपूजेचा निषेध केला. त्याचप्रमाणे त्यांनी वेदान्ताला प्रवृत्तिपर स्वरूप देऊन निवृत्तिपर समाजाला कर्मप्रवण बनविण्याचाहि प्रयत्न केला.

## खरा धर्म

अमूर्त परमात्म्याचें ध्यान व मनन करणें हाच ईश्वरपूजेचा प्रशस्त मार्ग होय, असें मत लोकहितवादी यांनीहि प्रतिपादिलें आहे. नीतीवरहि त्यांनी भर दिला आहे. नीति, सदाचार, परोपकार, भूतदया, मनोनिग्रह, क्षमा, शांति, ज्ञानदान याला ते खरा धर्म मानतात. व्रतवैकल्यें, उपासतापास, मंत्रतंत्र हीं निरर्थक कर्में व दांभिक आचार यांमुळे नीति नष्ट झाली आहे, याचें त्यांना फार दुःख होत असें. त्यांनी आपल्या शतपत्रांत रूढ धार्मिक कर्मकांडावर प्रखर टीका केली असून, खरा धर्म कोणता त्याचें स्पष्ट विवेचन केलें आहे.

**प्रार्थनासमाज**

डॉ. भांडारकर व न्या. रानडे हे प्रार्थनासमाजाचे थोर आचार्य होते. ते अव्यक्त परमात्म्याची उपासना करीत असले व मूर्तिपूजेच्या विरुद्ध असले तरी, ते परमेश्वराला सगुण मानीत. मात्र त्यांनी देवपूजेबरोबर रूढ झालेल्या अनिष्ट आचारांचा निषेधच केला आहे. कारण त्यामुळे देवाची केवळ विटंवना होते, आणि लोक प्रपंचकदमांत रुतून पडतात, असें त्यांचें मत होतें.

**समता**

मानवाची प्रतिष्ठा जागृत करण्यासाठी गेल्या शतकांतील सुधारकांनी त्या प्रतिष्ठेचा पहिला शत्रु जो अंध आचारधर्म त्यावर प्रथम टीकास्त्र सोडलें, हें आपण पाहिलें. त्या आचारधर्माइतकीच आपल्या समाजरचनेच्या बुडाशीं असलेली जन्मनिष्ठ उच्चनीचता मानवी प्रतिष्ठेला विघातक आहे, ती विषमता नष्ट करून समतेच्या पायावर समाजाची पुनर्घटना केली पाहिजे, हा विचार राजा राममोहन राय यांनीच प्रथम सांगितला. मात्र त्या क्षेत्रांत त्यांनी जोराची चळवळ केली नाही. ती पुढे केशवचंद्र सेन यांच्या प्रयत्नाने सुरू झाली. त्यांनी ब्राह्मसमाजामार्फत अनेक भिन्नजातीय विवाह घडवून आणले व त्यांना मान्यता मिळावी म्हणून १८७२ सालीं सरकारकडून तसा कायदाहि करवून घेतला.

जातिभेदाचा नाश करण्याचा पहिला प्रयत्न महाराष्ट्रांत दादोबा पांडुरंग यांनी केला. १८५० सालीं त्यांनी स्थापन केलेल्या परमहंस सभेंत सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांना प्रवेश असे. सभासद होतांना प्रत्येकाला प्रथम 'मी जातिभेद मानणार नाही' अशी प्रतिज्ञा करावी लागे. पण त्या सभेचें काम गुप्तपणें चाले. त्यामुळे दादोबांच्या प्रयत्नाला व्यापक स्वरूप आलें नाही.

जन्मनिष्ठ विषमतेवर लोकहितवादींनी केलेला भडिमार त्या काळांत अपूर्वच मानला पाहिजे. त्यांतहि त्यांनी एकंदर ब्राह्मण जातीवर हत्यार धरल्यामळें, त्या समाजाची दृष्टि अंतर्मुख होऊन त्याला आत्मनिरीक्षणाचें बाळकडूच मिळालें. गेल्या शंभर-दीडशे वर्षांत इतर जातींनी ब्राह्मणांना जितक्या शिव्या दिल्या, त्यांपेक्षा किती तरी जास्त शिव्या ब्राह्मणांनीच स्वजातीला दिल्या आहेत. समाजांत जागृति कायम राहण्यासाठी अशा तऱ्हेचें कठोर आत्मपरीक्षण अवश्यच असतें व त्याचें श्रेय लोकहितवादींना दिलें पाहिजे. "जे ब्राह्मण ज्ञानशून्य आहेत, ते कैकाड्यासारखे असून, कैकाडी सुधारले तर ब्राह्मणांसारखेच मानावे" म्हणजेच ज्याच्या त्याच्या गुणकर्मांवरून वर्ण ठरवावा, असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे. "ब्राह्मणांनी आपल्या मूर्ख समजुती सोडून देऊन लोकांस सारखें मानून विद्या शिकण्याचा हक्क सर्वांना आहे, हें त्यांनी कबूल करावें, –", असा उपदेश त्यांनी केला आहे.

लोकहितवादींच्याइतकेंच समतेचें आग्रहाने प्रतिपादन करणारे दुसरे गृहस्थ म्हणजे विष्णुबुवा ब्रह्मचारी हे होत. साम्यवादाचा पुरस्कार करून त्यांनी समतेची

पराकोटी गाठली. " प्रजा हें एक कुटुंब आहे, असें मानून सर्वांनी कष्ट करावे व त्या कष्टांनी निर्माण झालेलें धन राज्याच्या कोठारांत भरून ठेवावें व सर्व गावकऱ्यांच्या पोटास लागेल तसें द्यावें ", अशी व्यवस्था त्यांनी सांगितली आहे. " जातिभेद, मूर्ति-पूजा व धर्माचीं ढोंगें यांचा नाश केला पाहिजे. गुणांवरून वर्ण व जाति ठरविल्या पाहिजेत ", असें त्यांचें मत होतें.

## सत्यशोधक समाज

विषमता नष्ट करून समतेची प्रस्थापना करण्याचे गेल्या शतकांत जे प्रयत्न झाले, त्यांत म. ज्योतिराव फुले यांच्या उद्योगाचें महत्त्व विशेष आहे, कारण ते बहुजन समाजांतले होते. दलित समाजाचा आत्मप्रत्यय शेकडो वर्षांच्या संस्कारांमुळे नाहीसा झालेला असतो; आपण खरोखरच हीन आहों, अशी त्याच्या मनाची भावना झालेली असते. अशा वेळीं त्या समाजांतला व त्याचा अभिमान बाळगणारा कार्यकर्ता पुढे सरसावताच त्या समाजाच्या मनाचें मालिन्य नष्ट होतें व अन्यायाचा प्रतिकार करण्यास तो सिद्ध होतो. स्वजनांचा विरोध सोसूनहि ज्योतिबांनी अस्पृश्यांची शाळा चालविली व त्यांच्यासाठी स्वतःच्या घरापुढचा पाण्याचा हौद खुला केला. सत्यशोधक समाजाची स्थापना हें त्यांचें खरें सामाजिक कार्य होय. विषमतेवर आधारलेल्या वर्णजातिव्यवस्थेविरुद्ध खेड्यापाड्यांतील खालच्या वर्गांत असंतोष निर्माण करण्याचें मोठें कार्य त्या समाजाने केलें.

## आर्यसमाज

स्वामी दयानंदांनी स्थापन केलेल्या आर्यसमाजाने पंजाबांत समतेच्या दृष्टीने जें कार्य केलें, त्यालाहि फार महत्त्वाचें स्थान आहे. वेदपठणाचा अधिकार सर्व हिंदूंना आहे, हें तत्त्व प्रसृत करून, या समाजाने त्या अन्वये मागसलेल्या व अस्पृष्ट जातींनाहि समाजांत सामील करून घेतलें, आणि सर्व जातींत शिक्षणाचा प्रसार करून, त्यांच्यांत रोटीबेटी व्यवहार सुरू केला.

कोणत्याहि प्रकारची विषमता ही समाजाला घातकच ठरते; पण त्यांतल्या त्यांत जातिभेदामुळे आलेली विषमता ही समाजाचें सर्व कर्तृत्वच नष्ट करून टाकते; कारण अशा समाजांत हीन जातीच्या लोकांना पराक्रम करण्यास स्फूर्ति येणेंच शक्य नसतें. आपण जें कर्तृत्व दाखवूं, त्याचें पुरेपूर फल आपल्याला मिळेल, ही खात्री असेल तरच मनुष्य श्रम करण्यास उद्युक्त होतो. गुणांप्रमाणे समाजांत स्थान निश्चित मिळेल ही भावना कर्तृत्वाची प्रेरणा देते. हीन गणलेल्या जातींना विषम समाजव्यवस्थेंत वरचें स्थान मिळण्याची कधीच शक्यता नसते, उत्कर्षाची संधि त्यांना मिळत नाही, म्हणून त्यांचें कर्तृत्व कुजत पडतें. म्हणूनच जातिभेद नष्ट करण्याच्या प्रयत्नाचें महत्त्व अनन्यसाधारण असें आहे.

## स्त्री-जीवन

अंध आचारधर्म आणि विषम समाजारचना यांचे हीन जातींवर जसे अनिष्ट परिणाम होतात, तसेच स्त्रीजीवनावरहि अनिष्ट व घातक परिणाम होतात. स्त्रियांना अशा समाजांत जवळ जवळ शून्य प्रतिष्ठा असते. जुन्या धर्मानें व रूढींनी स्त्रियांवर जीं असंख्य जाचक बंधनें लादलीं होतीं, त्यांवरून सनातन धर्मशास्त्रकार स्त्रीला एक मानवी व्यक्ति मुळीच मानीत नव्हते, असें स्पष्ट दिसतें. पति मरण पावतांच पत्नीने सती गेलें पाहिजे, त्याच्या चितेंत स्वतःला जिवंत जाळून घेतलें पाहिजे, असें सांगणारा धर्म आणि स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्ध सक्तीने चितेंत लोटण्याची रूढि यांच्या अधमपणाला व दुष्टपणाला सीमाच नाही. एखादी स्त्री पूर्णपणें स्वेच्छेने व केवळ पतिप्रेमामुळे जरी सती जात असली तरी, तिची ही कर्तव्यबुद्धि तामसच मानावी लागेल. स्त्रीस्वातंत्र्याच्या दृष्टीने 'सती' हा कोणत्याहि स्वरूपांत अधर्मच ठरतो. सतीच्या चालीप्रमाणेच पडदा-पद्धति, बालविवाह, विधवाविवाहबंदी केशवपन, स्त्रीशिक्षणाला विरोध ह्या सर्व नियमनांच्या मागे स्त्रीविषयीची तुच्छताच दिसून येते. या विकृत बुद्धीमुळेच त्या काळीं स्त्रीच्या जीवनाला स्वतंत्र अर्थच राहिला नव्हता. स्त्री ही केवळ पुरुषाची पडछाया होती, संसाराचें एक साधन होती, भोगदासी होती. तिच्या मनाचा विचार न करतां, तिच्या जड देहावर अनेक बंधनें घालण्यांत आलीं होतीं. पुरुषांवर मात्र तशीं बंधनें नव्हतीं.

गेल्या शतकांतील समाजसुधारकांनी जातीय विषमतेविरुद्ध जशी मोहीम सुरू केली तशीच स्त्री-पुरुषविषमतेविरुद्धहि तितक्याच निकराने चळवळ केली. राजा राममोहन राय यांनी सतीची चाल बंद करावी म्हणून लॉर्ड बेंटिककडे जो अर्ज केला होता त्यांत, शास्त्राच्या दृष्टीने किंवा सारासार विचाराने, कसेंहि पाहिलें तरी, सती म्हणजे स्त्रीचा खूनच होय, असें मत दिलें होतें. त्यांनी स्त्रीला दास्यांत ठेवणाऱ्या सर्वच रूढींविरुद्ध चळवळ सुरू केली होती; पण त्यांत त्यांना फारसें यश आलें नाही. सतीची चाल कायद्याने बंद झालेली पाहण्याचें भाग्य मात्र त्यांना लाभलें.

स्त्रीदास्य नाहीसें करण्यासाठी पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी जे प्रयत्न केले त्यांना फार महत्त्व आहे. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी चाळीस शाळा काढल्या; आणि सर्व बंगालभर स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार केला. त्याचप्रमाणे त्यांनी विधवा-विवाहाची चळवळ करून १८५६ सालीं विधवा-विवाहाचा कायदा सरकारकडून करून घेतला. ब्राह्म-समाजाचे पुढारी केशवचंद्र सेन यांनीहि स्त्री-स्वातंत्र्यासाठी सर्वांगीण प्रयत्न करून, त्यांत बरेंच यश मिळविलें.

महाराष्ट्रांत १८५१ सालीं फुलें यांनी पुण्याला मुलींची शाळा सुरू केली. विष्णुशास्त्री पंडित यांनी जुन्या शास्त्राचें मंथन करून त्यांतून विधवा-विवाहाला शास्त्राधार काढला व त्यासाठी महाराष्ट्रांत मोठी चळवळ केली व स्वतः पुनर्विवाहहि केला.

लोकहितवादींनी स्त्रीजीवनाविषयी अनेक क्रांतिकारक विचार सांगितले आहेत. स्त्रियांना पुरुषासारखेच सर्व क्षेत्रांत अधिकार असावेत, स्त्रीचा विवाह प्रौढपणीं व्हावा, एवढेंच नव्हे तर खरें म्हणजे तिचें स्वयंवर व्हावें हेंच प्रशस्त होय, असें त्यांनी प्रतिपादिलें आहे; आणि या सुधारणांच्या आड धर्मशास्त्र येत असेल तर त्यास बाजूस सारून सुधारणा केली पाहिजे, असा स्पष्ट उपदेशहि त्यांनी अनेक ठिकाणीं केला आहे.

भांडारकर, रानडे, स्वामी दयानंद, त्यांचे शिष्य लाला हंसराज, गुरुदत्त विद्यार्थी, लाला लजपतराय ह्या थोर नेत्यांनीहि स्त्री-शिक्षण, प्रौढ विवाह, व स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य यांसाठी अखंड परिश्रम करून लोकमताला नवीन वळण लावलें. दयानंदांच्या 'सत्यार्थप्रकाशांत' बाल-विवाहाचा निषेध केलेला असून विधवा-विवाहास अनुमति दिलेली आहे.

## भौतिक ज्ञान

ह्या सर्व सुधारणांचा पाया म्हणजे भौतिकज्ञान हा होय. समाजांतली विषमता नष्ट करण्यासाठी, घातक रूढींच्या बंधनांतून त्याला मुक्त करण्यासाठी समाजांत भौतिक ज्ञानाचा प्रसार केला पाहिजे, त्या ज्ञानावांचून समाजाची उन्नति होणें शक्य नाही, याविषयी या भारतीय समाजसुधारकांच्या मनांत मुळीच संदेह नव्हता. म्हणूनच त्या ज्ञानासाठी त्यांनी अट्टाहास चालविला होता. १८२३ सालीं सरकारने शिक्षण-प्रसारासाठी कांही रक्कम मंजूर केली; पण तिचा विनियोग व्याकरण, वेदान्त, न्याय वगैरे जुनीं शास्त्रें शिकविणाऱ्या संस्कृत पाठशाळेसाठी करण्याचें ठरविलें. त्या योजनेला राममोहन राय यांनी विरोध केला व "ती रक्कम पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारासाठीच खर्च केली जावी", असा अर्ज केला. त्या अर्जांत, "गणित, रसायन, शरीरशास्त्र इत्यादि ज्या शास्त्रांना पूर्णत्वास नेल्यामुळे युरोपियन राष्ट्रें जगाच्या पुढे गेलीं तीं शास्त्रें आम्हांस शिकवावीं; जुनें व्याकरण किंवा तत्त्वज्ञान यांचा समाजाला कांही उपयोग नाही, येथे उणीव आहे ती भौतिक विद्येची आहे", असे विचार त्यांनी सांगितले आहेत. यावरून ग्रंथप्रामाण्याचें युग संपून अनुभवगम्य व बुद्धिगम्य ज्ञानाचें युग सुरू व्हावें याविषयी राममोहन यांना किती तळमळ लागून राहिली होती, तें दिसून येतें.

लोकहितवादींना समाजांतील अज्ञानाबद्दल फारच संताप येत असे; कारण येथल्या पढिक विद्वानांना, शास्त्री-पंडितांना नवीन जगाची मुळीच माहिती नव्हती. तें ज्ञान मिळविण्याचा प्रयत्नच त्यांनी केला नाही. उलट अज्ञानांत त्यांना भूषण वाटे. आपले जुने ग्रंथ हेच त्यांना सर्वश्रेष्ठ वाटत होते. आणि त्यांचें पाठांतर हीच त्यांची विद्या होती. त्यासाठीच लोकहितवादींनी त्यांना बैल, टोणपे अशा शिव्या दिल्या आहेत. पुराणांनी भारताला दैववाद, शब्दप्रामाण्य व जगाविषयी भ्रांत कल्पना शिकविल्या, असें त्यांचें मत होतें. या शब्दप्रामाण्यावर व अंधश्रद्धेवर त्यांनी प्रखर

टीका केली आहे. हिंदु लोकांची सुधारणा व्हायची तर त्यांना मुख्य म्हणजे विद्या हव्या; पण त्या विद्या पुराणांतल्या नव्हे, तर पाश्चात्त्य भौतिक विद्या. समाजाच्या पायांतल्या सप्तशृंखला तोडल्या पाहिजेत, हा विचार लोकहितवादींनी शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी सांगितला, यांतच त्यांचें असामान्य मनोधैर्य दिसून येतें.

दादोबा पांडुरंग यांनीहि महाराष्ट्रांत याच तऱ्हेचे विचार प्रसृत केले. भौतिक ज्ञानाच्या प्रसारासाठी त्यांनी 'स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक् सोसायटी' ही संस्था दादाभाईंच्या सहकार्याने १८४८ सालीं काढली. या संस्थेच्या मराठी शाखेचे ते अध्यक्ष होते व दादाभाई नौरोजी हे गुजराती शाखेचे अध्यक्ष होते. इंग्रजी राज्यांत हिंदी लोकांचा व्यापार बुडाला व प्रजा निर्धन झाली याचें कारण, दादोबांच्या मतें, लोकांचें अज्ञान व विद्यारहितपणा हें होतें. भौतिक शास्त्रांचा अभ्यास करणें, विद्या व कला यांचें ज्ञान संपादन करणें, हाच उत्कर्षाचा उपाय म्हणून त्यांनी सांगितला आहे.

न्या. मू. रानडे हे गेल्या शतकांतील या समाजधुरीणांचे अग्रणी होत. अलौकिक प्रज्ञा, बुद्धिमत्ता, राष्ट्रनिष्ठा, चारित्र्य अशा अनेक गुणांनी ते संपन्न होते. मानवी प्रतिष्ठेचें पुनरुज्जीवन हें त्यांच्या सर्व सुधारणेचें आदि-सूत्र होतें. "आपल्या अधः-पाताचें मूळ कारण म्हणजे आपणावरचीं सर्व बंधनें हीं विवेकबंधनें नसून तीं बाह्य व जड बंधनें आहेत, हें होय. त्यामुळें आपलीं मनें बाल्यावस्थेंतच राहिलीं. स्वयंशासन व आत्मसंयमन यांमुळे येणारी मानवी प्रतिष्ठा आपल्याला आलीच नाही." हे त्यांचे उद्गार प्रसिद्धच आहेत. समाजजीवनाचें असें एकहि क्षेत्र नाही, की ज्याचें पुनरुज्जीवन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. लो. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे, मृतवत् झालेल्या, थंड गोळा झालेल्या महाराष्ट्राला त्यांनीच प्रथम सचेतन केलें, आणि त्याला उत्कर्षाचा मार्ग आखून दिला. यामुळेच नवभारताच्या निर्मितींत त्यांचें श्रेय फार मोठें आहे.

अशा रीतीने केसरीच्या त्रिमूर्तीने आपल्या कार्याला प्रारंभ करण्यापूर्वीच या देशांत क्रांतीचें तत्त्वज्ञान सांगितलें गेलें होतें. त्यांना ज्या राष्ट्र-मंदिराची उभारणी करावयाची होती त्याची पायाभरणी ही अशी आधीच झाली होती. त्या पायावर या त्रिमूर्तीने मंदिराची उभारणी कशी केली तें आता पाहवयाचें आहे.

■ ■ ■

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

## चरित्र-रूपरेषा

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म २० मे १८५० रोजीं पुणें येथे झाला. त्यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर हे प्रापंचिक व्यवहारांत फारसें लक्ष घालीत नसत. त्यामुळे विष्णुशास्त्री यांचें प्राथमिक शिक्षण आजोबा हरिपंत यांच्या-जवळच झालें. १८६६ सालीं मॅट्रिक होऊन ते पूना कॉलेजांत गेले. त्याच्या आधीच्या वर्षींच त्यांचा विवाह झाला होता. पूना कॉलेज हें १८६८ सालीं येरवड्या-जवळच्या नव्या इमारतींत गेलें, व त्याला डेक्कन कॉलेज हें नांव मिळालें. १८७२ सालीं तेथून ते बी. ए. झाले व १८७३ च्या प्रारंभींच पूना हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करूं लागले.

१८७४ च्या जानेवारींत निबंधमालेचा पहिला अंक निघाला. १८६८ साला-पासूनच विष्णुशास्त्री शालापत्रकांत लिहूं लागले होते. ते बी. ए. झाल्यावर कृष्णशास्त्री यांनी त्याच्या संपादनाची सर्वच जबाबदारी चिरंजीवांवर टाकली. ' संस्कृत कविपंचक ' ही लेखमाला यांनी शालापत्रकांतूनच लिहिली. शालापत्रकांत मिशनरी व सरकार यांवर विष्णुशास्त्री यांनी फार जहाल टीका केली. शिवाय त्याचे अंक वेळेवर निघेनात; म्हणून १८७५ सालीं सरकारने तें पत्र बंद केलें. पण त्याआधीच निबंधमालेला प्रारंभ झाला होता. त्यामुळे शास्त्रीबुवांची लेखणी थांबण्याचा प्रश्नच नव्हता. ती थांबली नाही तसाच तिचा स्वभावहि बदलला नाही. उलट सरकार व मिशनरी यांच्यावर ती जास्तच कठोर प्रहार करूं लागली. त्यामुळे पहिली समज म्हणून सरकारने १८७७ सालच्या अखेरीस विष्णुशास्त्री यांची रत्नागिरीस बदली केली. तेथे ते दीड वर्ष राहिले. दरम्यान १८७८ सालच्या मे महिन्यांत त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे मृत्यु पावले. या वेळेपासूनच नोकरी सोडून देण्याचा विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला होता. १८७७ सालीं 'चित्रशाळा'

स्थापून त्यांनी निर्वाहाचा प्रश्न सोडविला होता. १८७८ च्या जानेवारीपासून 'काव्येतिहाससंग्रह' हें मासिकहि निघूं लागलें होतें. निबंधमालेचा खपहि बरा होता. वडिलांच्या नाराजीचा संभवहि आता नाहीसा झाला होता. त्यामुळे तो निश्चय पक्का करून १८७९ सालीं विष्णुशास्त्री मे महिन्यांत सहा महिन्यांची रजा घेऊन पुण्यास आले व तेथूनच सप्टेंबर महिन्यांत त्यांनी नोकरीचा राजीनामा पाठवून दिला.

नोकरीची बेडी तोडल्यावर निबंधमाला, चित्रशाळा व काव्येतिहाससंग्रह या त्रिविध उद्योगाच्या भरीला त्यांनी नवे दोन कार्यारंभ केले. १ जानेवारी १८८० रोजीं त्यांनी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली; आणि पुढच्या वर्षी आर्यभूषण छापखाना स्थापून त्यांनी 'केसरी' व 'मराठा' हीं पत्रें सुरू केलीं. या कामीं त्यांना आगरकर, टिळक, नामजोशी, आपटे, यांसारखे खंदे सहकारी मिळाले होते. त्यामुळे त्यांचा हुरूपहि वाढला होता. तेव्हा 'निबंधमाला' परिसमाप्त करून आता 'ग्रंथमाला' सुरू करावयाची असें त्यांनी ठरविलें. मालेच्या ८४ व्या अंकांत त्यांनी लिहून टाकलें की, "हें महासत्र संपवून आम्ही आता अवभृथ स्नानास मोकळे होणार." त्याप्रमाणे त्यांनी अवभृथ स्नान आचरिलेंहि होतें. त्यानंतर दुसऱ्या महासत्राच्या तयारीला त्यांनी प्रारंभहि केला होता; पण नियतीची इच्छा निराळी होती. १६ जानेवारी १८८२ या दिवशीं फोटोला बसले असतांना ऊन्ह लागल्याचें निमित्त होऊन ते घेरी येऊन खाली पडले. तेव्हापासून त्यांना ताप येऊं लागला व तेंच दुखणें बळावून १७ मार्च १८८२ रोजीं ग्रंथयज्ञ तसाच सोडून ते परलोकीं गेले.

१८७२ ते १८८२ हीं दहाच वर्षे विष्णुशास्त्री यांना त्यांच्या जीवित कार्यासाठी लाभलीं; पण तेवढ्या अवधींत 'विष्णुशास्त्रीयुग' अशी महाराष्ट्राच्या इतिहासांतील त्या कालखंडावर मुद्रा उठवून ते गेले. या त्यांच्या अलौकिक यशाचें रहस्य काय ?

पुढील प्रबंधांत तेंच विशद करावयाचें आहे.

- १ -

# चित्कळेचा स्पर्श

१८७४ ते १८८२ हा निबंधमालेचा कालखंड होय. याच्या आधीचा साधारण वीस वर्षांचा काळ आणि नंतरचा वीस वर्षांचा काळ यांचा महाराष्ट्रांतील मानवी कर्तृत्वाच्या दृष्टीने विचार केला तर काय दिसेल ?

**चित्कळा**

१८८२ नंतरच्या वीस वर्षांत महाराष्ट्रियांच्या कर्तृत्वाला प्रत्येक क्षेत्रांत विलक्षण बहर आलेला दिसतो. प्रत्येक क्षेत्रांत नवें तेज निर्माण झालें, नवी चित्कळा रूपास आली, नव्या सौंदर्याचीं झगमगीत किरणें फाकूं लागलीं असा प्रत्यय येतो. लो. टिळक, आगरकर, न. चिं. केळकर, काकासाहेब खाडिलकर, शिवरामपंत परांजपे, महाराज सयाजीराव गायकवाड, ना. गोखले, चाफेकर बंधु, राजवाडे, खरे, गो. स. सरदेसाई, पारसनीस, पांगारकर, अण्णासाहेब कर्वे, अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल, श्री. कृ. कोल्हटकर, पं. पलुसकर, पं. भातखंडे, पं. बखले, भाऊराव कोल्हटकर, हरिभाऊ आपटे, केशवसुत, शं. बा. दीक्षित, चिंतामणराव वैद्य हीं नांवें पाहा. वृत्तपत्र, ग्रंथ, निबंध, इतिहास-संशोधन, शास्त्र-संशोधन, काव्य, कादंबरी, नाटक, लघुकथा, विनोद, चरित्र, राजकीय जागृति, समाजसुधारणा, धर्मजागृति, अर्थकारण, कला, शिक्षण, इत्यादि मानवी संस्कृतीच्या सर्व क्षेत्रांत कार्य करणाऱ्या थोर पुरुषांचीं हीं नांवें आहेत. त्यांतील कांही नांवें हीं दोन-दोन, तीन-तीन क्षेत्रांत ख्याति पावलेलीं असून कांहींना अखिल भारतीय कीर्ति मिळालेली आहे.

हें अभिनव तेज, नवनिर्मितिक्षम अशी ही चित्कळा महाराष्ट्राला कोठून प्राप्त झाली ? नवजीवनरसांनी दुथडी भरून वाहणारी ही जी वाग्गंगा, तिचा उगम कोठे होता ? महाराष्ट्राच्या चिदाकाशांत नव्या सृष्टीचे हे हुंकार कोठून आले ?

विष्णुशास्त्री चिपळूणकर व त्यांची निबंधमाला हें या सर्व प्रश्नांचें उत्तर आहे. महाराष्ट्रवाणीचा पति म्हणून ज्यांचा पंडितांनी गौरव केला आहे तें विष्णुशास्त्री हेच या नव्या सृष्टीचे जनक आहेत.

**नवयुग**

वरील सर्व थोर पंडित, कवि, कलाकार, संशोधक यांच्या कार्याचें ज्यांनी विवेचन केलें आहे त्या सर्वांनी एकमुखाने, " त्यांनी क्रांति केली, नवयुग निर्माण केलें, मन्वंतर घडविलें " असे उद्गार काढले आहेत. आणि या क्रांतीमागची प्रेरकशक्ति म्हणजे निबंधमाला होय, असेंच मत नमूद करून ठेविलें आहे. त्या काळांतील ऐतिहासिक वाङमयाचा आढावा घेतांना म. म. दत्तो वामन पोतदार लिहितात, " शास्त्रीबुवांनी साने, मोडक व शाळिग्राम यांच्या साहाय्याने 'काव्येतिहाससंग्रह' मासिक चालवून एका नव्या युगाची स्थापना केली. राजवाडे, पारसनीस वगैरे जे तरुण पुढे इतिहास-कार्याला लागले त्या सर्वांना प्रेरणा शास्त्रीबुवांच्या लिखाणामुळे मिळाली, असें त्यांच्या लेखांवरूनच शाबीत होतें. " 'मराठींतील निबंधवाङमय' या आपल्या लेखांत प्रा. वि. ह. कुलकर्णी म्हणतात, " मालेची कामगिरी विध्वंसक आणि विधायक अशा दुहेरी स्वरूपाची आहे. चिपळूणकरांच्या विधायक कामगिरीकडे डोळेझाक करून त्यांच्या विध्वंसक कामगिरीचें भडक चित्र रेखाटणें, हें केव्हाहि अनुदारपणाचें व अन्यायाचेंच निदर्शक ठरेल. टिळक, आगरकर, वि. का. राजवाडे, ह. ना. आपटे, शि. म. परांजपे, न. चिं. केळकर इत्यादि श्रेष्ठ ग्रंथकारांची परंपरा ज्या मालेने निर्माण केली तिची योग्यता मराठी भाषेच्या इतिहासांत अगदी अनन्यसाधारण आहे हें मान्य केलेंच पाहिजे. "

" प्रथम १८८० सालींच आपण एका महान् क्रांतीच्या उंबरठ्यांत येऊन पोचतों. इ. स. १८८० सालच्या दिवाळींत अण्णा किर्लोस्करांनी पुणें येथे आपल्या 'संगीत शाकुंतला'चा पहिला प्रयोग केला. इ. स. १८८० ते १९०० हा यापुढील वीस वर्षांचा टप्पा. या काळांत नाट्याची कल्पनातीत भरभराट झाली. हा वीस वर्षांचा कालखंड महाराष्ट्राच्या इतिहासांत सर्वच दृष्टींनी विशेष महत्त्वाचा गणला जाईल. राजकीय, सामाजिक व धार्मिक ध्येयवाद या काळांत उदय पावत होता. पाश्चात्त्यांच्या जीवनाचे आदर्श जसेच्या तसे आपणांस घेतां येत नाहीत व घेणें इष्टहि नाही, हें दिसून येऊं लागलें होतें. आपल्या जुन्या परंपरागत आदर्शांच्या संशोधनाला व निरीक्षणाला त्यामुळे या काळांत अधिक जोर चढला होता. " 'नाट्यवाङमय व त्याचा विकास' यांचें विवेचन करतांना प्रा. बनहट्टी यांनी हा

अभिप्राय दिलेला आहे. 'मराठी कादंबरी 'चा इतिहास सांगतांना प्रा. वि. बा. आंबेकर यांनी जो अभिप्राय दिला आहे त्याचा आशय असाच आहे. "हरिभाऊंच्या लेखनाच्या प्रारंभकाली (१८८०), महाराष्ट्रांत जें विचारमंथन होऊं लागलें होतें, त्याचा हरिभाऊंच्या तरल आणि संवेदनाक्षम अशा कलाप्रेमी अंतःकरणावर फार परिणाम झाला. "तीस कोटि लोक ब्रिटिशांचे जोडे पुसण्याची लाचारी करतात व तींतच आनंद मनातात" हें मॅक्स ओरलचें एका ग्रंथांतील वाक्य विद्यार्थिदशेच्या शेवटीं शेवटीं हरिभाऊंच्या वाचनांत आलें. असल्या वाक्याचा परिणाम संवदेनाक्षम मनावर व्हावा, अशी त्या वेळीं भोवतालची परिस्थिति होती. चिपळूणकर, टिळक, रानडे, आगरकर, गोखले यांच्या विविध मत-प्रदर्शनांनी आणि कार्यपद्धतींनी हा कालखंड तेजस्वी बनलेला आहे. या गोष्टीला उद्देशूनच म. गांधींनी म्हटलें आहे की, पुण्यांतील लोकांनी जीवनाचें एक नवें अध्यात्म उत्पन्न केलें आहे."

"काव्येतिहास संग्रहामुळेच महाराष्ट्रांत इतिहासाबद्दलची नवी जाणीव निर्माण झाली व तींतूनच वासुदेवशास्त्री खरे, रा. ब. पारनीस यांची नाना फडणीस, झाशीची राणी, ब्रह्मेंद्रस्वामी यांचीं चरित्रें निर्माण झालीं. आपल्या इतिहासाचा इंग्रज लेखक विपर्यास करतात हें पाहून स्वाभिमानी विद्वान् अस्वस्थ झाले आणि त्यांनी आपल्या देशाचा कैपक्ष घेऊन असल्या इतिहासकारांवर टीकेचा आसूड उगारला," (आणि त्यामुळेच ही नवी जाणीव निर्माण झाली), असें गोपीनाथ तळवलकरांनी म्हटलें आहे. केशवसुत आणि हरिभाऊ आपटे यांनी काव्य व लघुकथा या क्षेत्रांत या जाणिवेमुळेच नवनिर्मिति केली असाच त्यांच्या चरित्रकारांचा अभिप्राय आहे. ('प्रदक्षिणा' – पहिलीं १० प्रकरणें पाहा).

**स्फूर्तिस्थान**

वरील थोर कर्त्या पुरुषांच्या चरित्रकारांनीच त्यांच्या स्फूर्तिबद्दल असें मत मांडलें आहे असें नाही. यांपैकी हरिभाऊ आपटे, पांगारकर, खरेशास्त्री, राजवाडे, यांनी स्वतःच विष्णुशास्त्री आपलें स्फूर्तिस्थान होय, असें लिहून ठेविलें आहे. टिळक, आगरकर यांचा आदर्श तोच होता हें प्रसिद्धच आहे. त्यांना परिस्थितीमुळे स्वतंत्रपणें प्रेरणा मिळाली असणें, हें पूर्ण शक्य आहे; पण ती मिळाल्यावर त्यांचीं मनें धावलीं तीं विष्णुशास्त्री यांच्याकडे, अन्यत्र नव्हे. याचा भावार्थ तोच आहे. तेव्हा गेल्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांतील महाराष्ट्रीय कर्तृत्वाच्या मागे प्रेरक शक्ति म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर हीच होती, यांत शंकेला जागा नाही.

प्रा. गं. बा. सरदार यांनी हाच भावार्थ साकल्याने 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' या पुस्तकांत मांडला आहे. ते म्हणतात, "इ. स. १८७४ सालीं निबंधमाला निघाली आणि मराठी वाङमयाच्या इतिहासांत एका नवीन युगाचा प्रारंभ झाला. त्या पूर्वी निबंध-वाङमय हें अगदी प्राथमिक स्वरूपाचें होतें. कोणत्याहि प्रश्नाची स्वतंत्र रीतीने सांगोपांग चर्चा करण्याची धमक त्या काळच्या

लेखकांत क्वचितच आढळते. निबंधमालेंतील विस्तृत, विद्वत्तापूर्ण चित्ताकर्षक आणि प्रभावी लेखांच्या योगाने हा मनु पालटला. महाराष्ट्रांत स्वदेशाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली. प्रत्येक विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. उदयोन्मुख लेखकांना नवी दृष्टि मिळाली, त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न झाला आणि मराठी गद्य-वाङ्मयवैभव वाढीला लागलें. "

'स्वदेशाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली' याला महत्त्व आहे. ती प्रज्वलित झाली की सर्वच क्षेत्रांत – केवळ वाङ्मयांतच नव्हे – मानवी कर्तृत्व फुलारून येतें. प्रारंभीं यांचीं जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं मानवी कर्तृत्वाच्या सर्व क्षेत्रांतलीं आहेत. त्यांचें श्रेय सर्व त्या स्वदेशाभिमानाकडे आणि प्रत्यक्षपणें वा अप्रत्यक्षपणें तो प्रज्वलित करणाऱ्याकडे जातें.

यावर प्रश्न असा येतो की, शास्त्रीबुवांच्या लेखणींत असें काय अलौकिक होतें, की ज्यामुळे ही प्रेरक शक्ति तिच्या ठायीं निर्माण झाली ? त्या आधीच्या कालखंडांत महाराष्ट्रांतील कर्तृत्वाला अडसर बसेल असें काय घडलें होतें ? येथल्या जनांची गुणसंपदा आंतल्या आंत थिजून जावी, गोठून जावी असें काय वातावरण येथे निर्माण झालें होतें ? आणि तो अडसर दूर व्हावा, तें वातावरण नष्ट होऊन त्या गुणसंपदेला फुलोरा यावा अशी कोणती किमया निबंधमालेने केली ?

## तेजोभंग

स्वत्व-जागृति, स्वाभिमान-चेतना, अहंप्रबोधन ही ती किमया होय. पेशवाई नष्ट होऊन इंग्रजांचें राज्य येथे प्रस्थापित झाल्यापासून इंग्रज राज्यकर्ते, इंग्रज व इतर पाश्चात्त्य पंडित आणि इंग्रज मिशनरी यांनी येथल्या जनतेचा तेजोभंग करून तिचें स्वत्व नष्ट करावें, तिचा स्वाभिमान शून्यवत् करून तिच्या ठायीं असलेली स्वातंत्र्याची ऊर्मि जीवहीन, बलहीन, करून टाकावी असे जाणूनबुजून प्रयत्न चालविले होते. इंग्रज हा चतुर राजकारणी होता, प्रज्ञासंपन्न मुत्सद्दी होता, आणि मानवी मनांतील अंत:प्रेरणांचा जाणकार अभ्यासी होता. रणामध्ये जिंकलेले हे मराठे केवळ देहाने जिंकले गेले आहेत, त्यांचीं मनेंहि गुलाम करून टाकल्यावांचून आपलें राज्य येथे दीर्घकाळ चालणार नाही, हें तो जाणून होता. म्हणून राज्य स्थिर होताच, किंवा त्याच्या आधीपासूनच मराठ्यांच्या व भारतीयांच्या मन:-शक्ति क्षीणजीव करून टाकण्याच्या उद्योगास तो लागला.

## मूळ प्रेरणा

आपली प्राचीन परंपरा, आपली संस्कृति, आपला पूर्व दिव्य इतिहास, आपल्या पूर्वजांचे पराक्रम, आपल्या पूर्वसूरींची प्रज्ञा, बुद्धिमत्ता, आपला धर्म, आपली भाषा यांचा अभिमान ही मानवी कर्तृत्वाची मूळ प्रेरणा आहे, त्याच्या पराक्रमाची ती गंगोत्री आहे, त्याच्या जीवशक्तीचा तो मूलस्रोत आहे हें इंग्रजांनी व पाश्चात्त्य पंडितांनी जाणलें होतें. त्यामुळे या मुळावरच घाव घालावा, या गंगोत्रींतच विषार

कालवावा, हा स्रोतच खंडून टाकावा म्हणजे भारतीय जन मरगळून जातील, त्यांच्या शक्ति वठून जातील आणि मग आपसया ते शरीराने व तसेच मनाने, प्रज्ञेने व भावनेनेहि आपले गुलाम होतील, आपल्यापुढे लाचारपणें नमतील, अशी राज्यकर्त्यांच्या मनाची निश्चिति झाली होती; आणि म्हणूनच त्या धोरणाने पावलें टाकण्यास त्यांनी प्रारंभ केला होता.

## अस्मिता कोमेजली

हिंदी जनांना ते सांगूं लागले की, तुमच्या इतिहासांत, तुमच्या प्राचीन परंपरेंत, तुमच्या संस्कृतींत उज्ज्वल, अभिमानास्पद, दिव्य, असें कांही नाही. रामायण, गीता, वेद, उपनिषदें, महाभारत यांचा तुम्ही अभिमान धरता, पण हे सर्व ग्रंथ म्हणजे प्राधान्याने होमरचें इलियड महाकाव्य, ख्रिश्चनांचें बायबल इत्यादि पाश्चात्त्य ग्रंथांचीं भाषांतरें किंवा रूपांतरें आहेत. हीं आपलीं मतें सिद्ध करण्यासाठी इतिहास, भाषाशास्त्र, प्राचीन प्रवाशांचे ग्रंथ, यांचे असे कांही भरभक्कम आधार पाश्चात्त्य पंडितांनी उभे केले की, क्षणभर भारतीय जन मूढ होऊन गेले. विद्वत्तेच्या क्षेत्रांतील असल्या शस्त्रास्त्रांचा त्यांना गंध सुद्धा नव्हता. भाषाशास्त्रीय पुराव्यांनी, व्युत्पत्तीच्या साह्याने एखाद्या ग्रंथाचा काळ ठरवावयाचा असतो, त्याचें पौर्वापर्य निश्चित करावयाचें असतें, तो अस्सल की नक्कल हें त्यावरून निर्णित करतां येतें याची भारतीयांना स्वप्नांत सुद्धा कल्पना नव्हती. भाषाशास्त्राप्रमाणे इतिहास ही विद्याहि हिंदी लोकांना अगम्यच होती. भाषाशास्त्राचा अभ्यास येथे निदान प्राचीन काळीं तरी झाला होता; पण इतिहास-विद्या पहिल्यापासूनच येथे शून्य होती. त्यामुळे रणांगणांतील आक्रमणाच्या वेळीं पाश्चात्त्यांच्या नव्या, भारी शस्त्रास्त्रांमुळे व युद्धविद्येमुळे जसे हिंदी लोक पराभूत झाले तसेच या विद्वत्तेच्या क्षेत्रांतहि या सर्वस्वीं नव्या शस्त्रास्त्रांपुढे ते प्रारंभीं निष्प्रभ झाले, आणि त्यांची अस्मिता कोमेजून गेली.

## पाश्चात्त्यांचे प्रलाप

डॉ. लारिन्सर या पंडिताने श्रीमद्‌भगवद्‌गीतेवर एक प्रबंध लिहून गीता ही बायबलच्या आधारें लिहिलेली असून, ती ख्रिस्ती शकाच्या आठव्या शतकाच्या सुमारास लिहिली गेली आहे, असें मत मांडलें. गीतेचा बारावा अध्याय व जॉनचें शुभवर्तमान यांतील बऱ्याच कल्पना सारख्या आहेत, हा त्याला पुरावा. प्रो. विल्सन यांनी याच मताचा अनुवाद करून गीतेंतील सोळाव्या अध्यायांत बौद्धांचा स्पष्ट उल्लेख आहे, असा पुरावा दिला आहे. डॉ. वेबर यांनी असा सिद्धान्त मांडला की, वाल्मीकीने आपलें रामायण बौद्धांच्या दशरथ-जातकाच्या आधारें लिहिलें असून, त्यांत ग्रीक महाकवि होमर याच्या इलियडची मदत घेतली आहे. याशिवाय त्याने असेंहि विधान केलें की, रामायण हें ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकांत रचलें गेलें आहे. हें ग्रंथांविषयी झालें. वेरूळच्या लेण्यांविषयी काय ? तीं तर बाहेरून चोरून

आणतां येत नाहीत ! पण तीं हिंदूनी कोरलीं असें मान्य केलें तर त्यांच्या अंगीं कर्तृत्व होतें असें सिद्ध होईल ही भिति आहे. म्हणून मग जेम्स मिल्ल या साहेवाने सांगून टाकलें की, तीं स्वयंभूच असलीं पाहिजेत ! मेकॉलेने तर जाहीर करून टाकलें की, हिंदूंचे प्राचीन ग्रंथ ज्या कागदांवर लिहिले आहेत त्या कागदाच्या रद्दीइतक्याहि ते योग्यतेचे नाहीत !

**पूर्वग्रह**

भारतीयांचे प्राचीन ग्रंथ भाषांतरित आहेत असें सिद्ध करणें हा पाश्चात्त्य विद्वानांचा पहिला मनसुबा. तें नच जमलें तर ते फार प्राचीन नाहीत, ख्रिस्ती शकाच्या फार मागे ते नेतां येत नाहीत, असें तरी निदान दाखवून द्यावयाचें, हा त्यांचा दुसरा डाव. मॅक्समुल्लर हा भारताचा अभिमानी होता. सर्व जन्म त्याने भारताच्या प्राचीन ग्रंथांच्या अभ्यासांत घालविला; पण त्याच्याहि मनांत पूर्वग्रह किती जबर होता तें पाहा. तो म्हणतो, "वालखिल्यसूक्त हें प्रातिशाख्यापेक्षा अलीकडचें आहे असें सिद्ध करतां आलें, तर मला वरें वाटेल, तसेंच प्रातिशाख्यादि ग्रंथ सध्यापेक्षा अलीकडचे आहेत, असें सिद्ध झाल्यास मला समाधान वाटेल. पण तें समाधान मला लाभणार नाही, अशी भीति वाटते." प्राच्यविद्येच्या सर्वश्रेष्ठ पंडिताचे हे उद्गार आहेत. त्यांवरून भारतीयांच्या प्राचीन वैभवावर, त्यांच्या उज्ज्वल परंपरेवर आघात करून त्यांचा तेजोभंग करण्याचा पाश्चात्त्य पंडितांनी केवढा अट्टाहास चालविला होता हें ध्यानांत येईल.

**न्यूनगंड**

अगोदरच रणांगणांत पराभूत झाल्यामुळे भारतीय जन मनाने खचून गेले होते. त्यांच्या ठायीं न्यूनगंड निर्माण झाला होता. त्यांतच इंग्रजांची आगगाडी, वाफेचीं जहाजें, तारायंत्रें, नाना प्रकारचीं इतर कळीचीं इंजिनें हीं डोळ्यासमोर चमत्कारांसारखीं दिसूं लागलीं. त्यांच्या मागच्या विज्ञानाची कांही कल्पना नसल्यामुळे हे लोक दैवी शक्तीने संपन्न आहेत अशी भारतीयांची दृढ भावना झाली. त्यामुळे हे लोक जातितः, वंशतःच आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत, असें त्यांना वाटूं लागलें व त्यांच्या ठायीं, कालिदासाच्या दिलीप राजाप्रमाणे, आत्मनि अवज्ञा निर्माण झाली. आपण हीनदीन आहोंत, प्रज्ञा, बुद्धिमत्ता, ज्ञान, विद्वत्ता या बाबतींत त्यांची आपली तुलनाच होणार नाही, असें त्यांच्या मनाने पक्कें घेतलें. त्यांत प्राचीन परंपरा, संस्कृति, इतिहास यांवर जो इंग्रजांनी हल्ला चढविला त्याचाहि प्रतिकार आपल्याला करतां येत नाही, हें ध्यानांत आल्यामुळे हिंदी लोक सर्वस्वीं प्रज्ञाहत झाले. त्यांच्या स्वत्वाचा लोप होण्याचा समय आला.

**मिशनरी**

भारताचा व भारतीयांचा तेजोभंग करण्याचें व्रत घेणारा दुसरा एक वर्ग म्हणजे पाश्चात्त्य मिशनरी हा होय. पाश्चात्त्य पंडितांनी भारताच्या प्राचीन

वैभवावर आघात केला तर यांनी भारतीयांचा सनातन असा जो हिंदु धर्म त्याच्यावर भडिमार केला. प्रत्येक मनुष्याला स्वतःचा धर्म प्राणाहून प्रिय असतो; आणि तो धर्मच हीन आहे, निंद्य आहे, त्यांतील मूलतत्त्वें हास्यास्पद आहेत असें ठरलें, तर त्याच्या आत्म्याचाच लोप होण्याची वेळ येते. त्यामुळे मनुष्याला ठार करणारा त्याचा शत्रु जसा नेमका काळजाचा वेध घेतो त्याचप्रमाणे त्याची अस्मिता नष्ट करणारा शत्रु त्याच्या धर्माचा वेध घेतो. पाश्चात्त्य मिशनऱ्यांनी हेंच केलें.

भारतांत सोळाव्या शतकापासून ख्रिश्चन मिशनरी येत आहेत. सेंट झेवियर या जेसुइटपंथीय मिशनऱ्याने गोमंतक प्रदेशांत धर्मांतरासाठी केवढे भयानक अत्याचार केले हें प्रसिद्धच आहे. एकोणिसाव्या शतकांत इंग्रजांचें राज्यच येथे प्रस्थापित झालें. तेव्हा मिशनऱ्यांना सर्व रान मोकळेंच झालें. प्रारंभीं इंग्रज सत्ताधाऱ्यांचा मिशनऱ्यांना विरोध होता; पण तो आपल्या सत्तेला धक्का पोचेल या भीतीपोटीं. मनांतून त्यांना भारताचें ख्रिश्चनीकरण इष्टच होतें. "सक्तीने धर्मांतर केल्यामुळे ज्याचें कल्याण होईल असा एखादा समाज असेल तर तो हिंदु समाज होय" असें ते म्हणत. मिशनऱ्यांच्या मोहिमेमुळे लवकरच सर्व हिंदु लोक ख्रिश्चन होतील, आणि मग आपलें साम्राज्य चिरंतन टिकेल अशी इंग्रज राज्यकर्त्यांना फार आशा होती. म्हणून त्यांनी हळूहळू मिशनऱ्यांना पाठिंबा दिला, प्रोत्साहन दिलें व सर्वतोपरी साहाय्य केलें.

ख्रिश्चन मिशनरी शाळा, दवाखाने, वसतिगृहें स्थापीत व त्या मार्गांनी जनतेची सेवा करीत, पण धर्मांतर हाच त्यांचा अंतिम हेतु असे. त्यामुळे या संस्थांतून ते हिंदु धर्म, हिंदु संस्कृति व हिंदु परंपरा यांची निरर्गल निंदा करीत. 'हिंदु धर्म प्रसिद्धीकरण' हें मिशनरी जॉन विल्सन यांचें पुस्तक व 'भगवद्गीतेचें सार' हें रॉबर्ट निज्बिट यांचें पुस्तक म्हणजे मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराचे नमुने आहेत. वस्तुमात्रांत परमेश्वर व्यापून राहिला आहे, असें हिंदु तत्त्वज्ञान सांगतें. त्यावर विल्सनसाहेब म्हणतात की, "असें असेल तर वस्तु फुटली की ईश्वर फुटतो, असें होईल." सर्व जग म्हणजे माया आहे, असें हिंदू म्हणतात. त्यावर साहेब म्हणतात की, "मग देव फसविलेला आहे आणि फसविणारा आहे" असें या हिंदु मतांवरून दिसतें. वाहवा जी वाहवा." जीव हा देवाचा अंश आहे, असें वेदान्त सांगतो. त्यावर निज्बिट साहेब म्हणतात की, "देवाच्या ठायी अज्ञान नाही, तसे जीवाच्या ठायीहि नाही, असें म्हणावें लागेल; पण तें आहे. तेव्हा जीव हा देवाचा तुकडा नाही, असें सिद्ध होतें."

यावरून हें दिसून येईल की, हिंदूंचा तेजोभंग करून त्यांचें स्वत्व नष्ट करण्याचा जो प्रयत्न इंग्रज पंडितांनी चालविला होता तोच प्रयत्न मिशनऱ्यांनी धर्म-प्रसाराच्या मार्गाने चालविला होता. इंग्रज राज्यकर्ते तर यांत अग्रेसर होते. कसें तें आता पाहूं.

- २ -

# आत्मप्रत्यय

इंग्रज सत्ताधाऱ्यांना तर काय, हिंदी लोक जितके भग्नतेज, हतप्रभ, स्वत्व-हीन होतील तितके हवेच होते. त्यामुळे त्यांचा मिशनऱ्यांना सर्वस्वीं पाठिंबा होता. प्रारंभीं त्यांनी मिशनऱ्यांवर कांही बंधनें घातलीं होतीं, पण तीं केवळ भीतीमुळे होतीं, हें वर सांगितलेंच आहे. मिशनऱ्यांच्या हिंदुधर्मनिंदेमुळे कदाचित् दंगली माजतील या भीतीनेच ते विरोध करीत, पण मनांतून हिंदुस्थान सर्व ख्रिस्ती झाला तर तें त्यांना हवेंच होतें. कारण त्यामुळे आपलें साम्राज्य निर्वेध चालेल असें त्यांना वाटत असे.

ईस्ट इंडिया कंपनीचा प्रमुख डायरेक्टर मँगल्स हा १८५७ सालीं हाऊस ऑफ कॉमन्समध्ये म्हणाला की, "हिंदुस्थानच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत ख्रिस्ताचा ध्वज डौलाने फडकविण्याकरिताच हें हिंदुस्थानचें अफाट साम्राज्य ईश्वराने आपल्या हातीं सोपविलें आहे. म्हणून सबंध हिंदुस्थान ख्रिस्तमय करण्याच्या या महत्कार्यांत कोणत्याहि प्रकारची ढिलाई न करतां प्रत्येकाने आटोकाट प्रयत्न करणें अवश्य आहे." हिंदुस्थानांतलें धर्म, आणि विशेषतः हिंदु धर्म नष्ट झाला की येथील राष्ट्रीय भावनाहि मरून जाईल, आणि मग अशा स्वत्व मेलेल्या राष्ट्रावर राज्य करणें सोपें होईल, अशी इंग्रजांची कल्पना असल्यामुळे, ईस्ट इंडिया कंपनीचा हा अट्टाहास चालला होता.

रेव्हरंड केनेडी हा कंपनीच्या अधिकाऱ्यांना सारखे बजावीत होता की, "हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारतवर्ष ख्रिस्ती धर्माला कवटाळीपर्यंत, आणि तो हिंदूंच्या व मुसलमानांच्या धर्माची निर्भर्त्सना करूं लागेपर्यंत, आपलें

कार्य अतिशय जोमाने चाललें पाहिजे; आणि त्यासाठी आपल्या हातीं असलेली सर्व सत्ता व अधिकार आपण वापरले पाहिजेत."

## सक्तीचा धर्मोपदेश

रेव्हरेंडसाहेबांचा हा आदेश तंतोतंत पाळण्याचें कंपनीच्या अधिकाऱ्यांनी ठरविलें होतें. कंपनीचा प्रत्येक अधिकारी हाताखालच्या काळ्या नोकरांना ख्रिस्ती होण्याकरिता गळ घालीत असे. लष्कर हें तर त्यांच्या हातचें क्षेत्र. तेथे कर्नल, कॅप्टन, लेफ्टेनंट इत्यादि सर्व अधिकारी काळ्या सैनिकांच्या पुढे ख्रिश्चन धर्मावर व्याख्यानें झोडीत आणि तीं ऐकण्याची शिपायांना सक्ती असे. हीं व्याख्यानें सभ्य भाषेंत असत काय ? लष्करांत सभ्य भाषा वापरणें हेंच असभ्यपणाचें ठरतें. हे अधिकारी श्रीरामचंद्र व महंमद पैगंबर यांना अगदी गाळीव शिव्यांची लाखोली वाहत. बंगाल पायदळाचा कमांडर स्वतःच सांगतो की, " मी सतत अठ्ठावीस वर्षें सैन्यांतील शिपायांना ख्रिस्ती करण्याचा उद्योग करीत असून, या मूर्तिपूजक रानटी शिपायांचे आत्मे सैतानापासून सुरक्षित राहतील, अशी व्यवस्था करणें हें आपलें लष्करांतलें कर्तव्यच आहे, असें मला वाटतें." अशा कर्तव्यभावनेमुळेच लष्करांत कोणी शिपाई बाटला तर त्याला इतरांचे हक्क डावलून बढती देण्यांत येत असे; आणि या बीभत्स धर्मप्रसाराबद्दल कोणी नापसंती दाखविली तर त्या शिपायाची 'तूप-रोटी' तोडण्यांत येई.

सैन्यांतल्याप्रमाणे शाळांतहि ख्रिश्चन धर्माचा प्रसार हाच उद्योग चालविला पाहिजे, असा साहेबाचा आग्रह होता. १८३६ सालीं बंगालमध्ये इंग्रजी शिक्षणाच्या शाळा पहिल्यानेच उघडल्या गेल्या तेव्हा मेकॉलेने असा निर्धाराचा आशावाद प्रगट केला की, पुढील तीस वर्षांत बंगालमध्ये एकहि मूर्तिपूजक नांवालाहि राहणार नाही ! ( 'सत्तावन्नचें स्वातंत्र्यसमर ' – सावरकर, प्रकरण ५ वें ).

## डलहौसीची प्रतिज्ञा

पण सत्ताधाऱ्यांना हिंदी लोकांची मानखंडना करण्याचा धर्मांतर हा एकच मार्ग उपलब्ध नव्हता. त्यांना सर्वच मार्ग मोकळे होते. १८४६ सालीं डलहौसी भारतांत आला तो, ' सर्व हिंदुस्थान मी सपाट करून टाकीन ' अशी प्रतिज्ञा करीतच आला. आल्याबरोबर प्रथम त्याने पंजाबचा बळी घेतला. नंतर क्रमाने नागपूर, सातारा, अयोध्या हे प्रदेश त्याने सपाट केले. हें करीत असतांना त्याने तेथल्या राजांना केवळ पदच्युत केलें असें नाही. त्याने त्यांचे राजवाडे खणून काढले, वाड्यांतून लष्कर घालून राजस्त्रियांना बाहेर काढले व त्यांच्या अंगावरचे दागिनेहि ओरबडून घेऊन त्यांची शक्य ती बेअब्रू केली. आम्ही जेते आहों व तुम्ही आमचे गुलाम आहां, बूटपुसे आहां, हें दर वेळीं हिंदी लोकांच्या प्रत्ययास आणून देणें हाच यामागचा हेतु होता. इंग्रजांनी रणांगरणांत भारताचा उच्छेद केलाच होता. आता

त्यांच्या मनाचा, स्वत्वाचा, स्वाभिमानाचाहि उच्छेद त्यांना करावयाचा होता. ( 'कित्ता' – प्रकरण २ रें ).

## आम्ही जेते

इ. स. १८७७ च्या जानेवारींत 'कैसर-इ-हिंद' ही पदवी व्हिक्टोरिया राणीने धारण केल्याचा समारंभ दिल्ली येथे दरबार भरवून करण्यांत आला, त्यांतील हेतु हाच होता. आम्ही जेते, तुम्ही जित, आम्ही शास्ते, तुम्ही आमचे गुलाम, आम्ही गोरे साम्राज्यकर्ते, तुम्ही काळे प्रजाजन, हा दिमाख इंग्रजांना दाखवावयाचा होता. हिंदी लोकांची अस्मिता पराभूत करण्याचेंच उद्दिष्ट त्याच्या मागे होतें. विष्णुशास्त्री यांनी अगदी जळफळून त्याविषयी लिहिलें आहे की, " हिंदी प्रजा दुष्काळामुळे मरणाच्या दारीं असतांना बीकन्स फील्डसाहेब दिल्लीस दिवा लावीत आहेत. आम्ही राजाधिराज, संस्थानिक हे आमच्या खाली एक पायरी, आणि हिंदी प्रजा ही त्याहूनहि खालची पायरी, हाच काय तो इत्यर्थ. त्या दिवशीं जागजागीं कैसर-इ-हिंदच्या नांवाने खंडोगणती दारू जाळून जे हजारो रुपये खराब केले, त्यांत होता. यापूर्वी सारे लोक मोगलाईस व पेशवाईस नांवें ठेवून इंग्रजी राशियतीची जी तारीफ करीत असत ती स्थिति आता गेली. "

विष्णुशास्त्री यांनी इतकें जळफळून कां लिहिलें ? भारताच्या स्वाभिमानाला झालेला हा डंख त्यांना सहन झाला नाही. देशाची अस्मिता अशी पराभूत झाली तर स्वातंत्र्याची आशा कायमची दुरावेल अशी त्यांना भीति होती. म्हणून त्या मदांध सत्तेवर प्रत्याघात करण्याचें साहस करण्यास ते सिद्ध झाले. हिंदी जनतेच्या स्वत्वाची जपणूक हें त्यांचें एकमेव उद्दिष्ट व कार्य होतें.

## आधीचे नेते

पण यावर प्रश्न असा निर्माण होतो की, विष्णुशास्त्री यांच्या आधीच्या पंचवीस-तीस वर्षांत महाराष्ट्रांत जे थोर पुढारी होऊन गेले त्यांच्या कार्याचें काय ? त्यांनी अशा तऱ्हेचा प्रयत्न केला नव्हता काय? त्यांना काय स्वाभिमान नव्हता ? या देशाच्या स्वत्वाची त्यांना चिंता नव्हती ? आणि ती जर असेल, तर शास्त्री-बुवांच्या कार्यात्रें कांही वैशिष्ट्य राहतें काय ?

या प्रश्नाचा विचार आता करावयाचा आहे.

शास्त्रीबुवांच्या आधीच्या पंचवीस-तीस वर्षांच्या काळांत महाराष्ट्रांत व भारतांतहि अनेक थोर पुढारी होऊन गेले होते; आणि त्यांनी स्वदेशाची चिंता वाहून त्याच्या उद्धारार्थ सर्वांगीण प्रयत्नहि केले होते. महाराष्ट्रांतच दादाभाई नौरोजी, न्या. मू. रानडे, लोकहितवादी व महात्मा फुले यांसारखे कर्ते पुरुष झाले होते; विष्णुशास्त्री यांच्या आधीपासूनच त्यांनी आपल्या कार्याला प्रारंभ केला होता. आणि त्यांच्या निधनानंतरहि त्यांचें कार्य चालूच होतें. या थोर नेत्यांनी भारतांत लोकजागृतीचें जें कार्य केलें तें निस्तुळ असेंच आहे. त्यासाठी हिंदुस्थान

आणि विशेषतः महाराष्ट्र त्यांचा कायमचा ऋणी राहील. पण असें असलें तरी विष्णुशास्त्री आणि त्यांची निबंधमाला यांचें अनन्यत्व शिल्लक राहतेंच. गेल्या शतकांतील महाराष्ट्राच्या इतिहासांत त्यांचें स्वतंत्र असें स्थान निश्चितच आहे. तें कोणतें ?

## ब्रिटिशांवर विश्वास

या दृष्टीने पितामह दादाभाई नौरोजी यांचा विचार करूं. १८४८ पासून अनेकविध मार्गांनी ते समाजसेवा करीत होते. 'ज्ञानप्रसारक सभा', 'बाँबे असोसिएशन' अशा अनेक संस्था आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने स्थापून दादाभाई त्यांमध्ये अविरत कार्यमग्न असत; पण त्यांचें खरें महत्कार्य म्हणजे त्यांनी इ. स. १८७१ सालीं विलायतेंतील 'ईस्ट इंडिया फिनॅन्स कमिटी' पुढे साक्ष देऊन इंग्रजी राज्याचें खरें स्वरूप हिंदी जनतेला दाखवून दिलें; त्या परकीय सत्तेचें कृष्ण अंतरंग लोकांच्या लक्षांत आणून दिलें, हें होय. पगाराच्या रूपाने, व्यापारी नफ्याच्या रूपाने, अघोरी करांच्या रूपाने ब्रिटिशांनी भारताचा रक्तशोष चालविला होता. महंमद गझनीने अठरा स्वाऱ्या करून जितकी संपत्ति लुटली तितकी इंग्रज एका वर्षांत भारतांतून लुटून नेतात, त्यांचें साम्राज्य हिंदी लोकांच्या पैशावर व रक्तावर उभारलेलें आहे, त्या रक्तशोषणामुळे हिंदुस्थान मृत्युपंथास लागला आहे, असें अत्यंत स्पष्ट व परखड भाषेंत, दादाभाईंनी आपल्या साक्षींत प्रतिपादन केलें आणि तेंहि इंग्लंडमध्ये व इंग्रज सभासदांच्या तोंडावर ! दादाभाईंचें हें कार्य अपूर्व असेंच आहे; पण अशा तऱ्हेने ब्रिटिश साम्राज्यशाहीचें राक्षसी रूप लोकांना दाखवून दिल्यानंतरहि, आपला ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवरचा विश्वास ढळला नाही, असें ते त्यानंतर सतत सांगतच राहिले !

१९०६ सालच्या काँग्रेसच्या अधिवेशनांत त्यांनी 'स्वराज्य' मंत्राचा संदेश दिला आणि त्या स्वराज्याच्या प्राप्तीसाठी हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांत, 'चळवळ करा, सतत चळवळ करा', असा लोकांना उपदेश केला. पण ती चळवळ म्हणजे काय ? ब्रिटिशांच्या पुढे आपलीं गाऱ्हाणीं मांडणें ! ( ॲजिटेट मीन्स इन्फॉर्म ). "भारतीयांना आपल्या हक्कांची जाणीव करून द्या व ब्रिटिशांना त्यांनी ते हक्क कां दिले पाहिजेत, तें समजावून द्या. आपण जर गप्प बसलों तर त्यांना वाटेल की, हे लोक संतुष्ट आहेत. म्हणून ब्रिटिशांना आपल्या तळमळीची जाणीव करून द्या." १९०६ सालच्या काँग्रेसमधील भाषणांत त्यांनी पुनः पुन्हा सांगितलें की, "ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवरील माझा विश्वास उडालेला नाही." ते म्हणाले, "प्रयत्नांना आरंभ केल्यापासून मी इतक्या वेळा निराश झालों आहें की, दुसऱ्या एखाद्याचें काळीज फुटून गेलें असतें व त्याने बंड उभारलें असतें; पण चिकाटी हा माझ्या जीवनाचा धर्म असल्यामुळे मी हताश झालों नाही." ( 'आधुनिक भारत,' — जावडेकर, पृ. ११४ ). ज्याने ब्रिटिशांचें काळेकुट्ट राक्षसी रूप स्पष्ट करून दाखविलें

त्याच थोर पुरुषाची, पन्नास वर्षांनंतरहि ब्रिटिश हेच हिंदुस्थानचें कल्याण करतील, ही श्रद्धा कायम होती.

या पार्श्वभूमीवरून विष्णुशास्त्री यांच्या निबंधमालेचा विचार आपण केला पाहिजे. पण त्याआधी वर उल्लेखिलेल्या इतर थोर नेत्यांच्या कार्याचा विचार करूं.

## ईश्वरी वरदान

न्या. मू. रानडे हे गेल्या शतकांतील नेत्यांचे अग्रणी होत, हें आता सर्वमान्य झालें आहे. लोकमान्यांनी त्यांच्या मृत्यंनूतर त्यांच्या कार्याचें मूल्यमापन केलें तें अगदी यथार्थ आहे. " थंड गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्राला त्यांनीच प्रथम ऊब दिली; आणि त्याला सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड मेहनत केली. आमच्या मतें हेंच त्यांच्या थोरवीचें व असामान्य मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय, " असें टिळकांनी म्हटलें आहे व ' सर्वज्ञः स हि माधवः ' या वचनाने विजयनगरच्या माधवाचार्यांशीं त्यांची तुलना करून त्यांचा गौरव केला आहे. हा गौरव यथायोग्य म्हणावा इतकें न्यायमूर्तींचें कार्य असामान्य होतें यांत शंकाच नाही; पण ब्रिटिश राज्यकर्त्यांविषयी बोलतांना मात्र माधवराव दादाभाईंच्या इतकी सुद्धा टीका करण्यास तयार नसत. इंग्रजी राज्य म्हणजे ईश्वरी वरदानच होय, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. हिंदुस्थानांतून इंग्लंडला जाणारी प्रत्येक पै ही लूटच आहे, असें दादाभाई म्हणत. माधवरावांना हें मान्य नव्हतें. ब्रिटिश लोक भारताला भांडवल पुरवितात व तें हलक्या व्याजाने देतात, यासाठी हिंदी जनतेने त्यांचे आभार मानले पाहिजेत, असें ते म्हणत. दादाभाई-पक्षाचें म्हणणें असें की, हिंदुस्थानची लूट करून ब्रिटिशांनी हा पैसा मिळविलेला असतो व तोच भांडवल म्हणून ते आम्हांला परत देतात, यांत उपकार कसले ?

ब्रिटिश भांडवलदार व ब्रिटिश राज्यकर्ते यांची न्यायमूर्ति जी तरफदारी करीत तिची राष्ट्रीय पक्षांतल्या लोकांना अत्यंत चीड येई. ती इतकी की, ज्या टिळकांनी पुढे त्यांचा मोठा गौरव केला त्यांनीच या वेळीं " परदेशी भांडवलाचे गोडवे गाणारे माधवराव देशद्रोही आहेत " अशी त्यांच्यावर ध्वन्यार्थाने टीका केली. ( ' रानडे चरित्र ' – फाटक, पृ. ४६९ ) आगरकरांनीहि न्यायमूर्तींच्यावर याच प्रकारे, पण सौम्य भाषेंत टीका केली आहे; आणि पुढे म्हटलें आहे की, " इंग्लिश लोकांच्या मनोधर्मांत एकाएकी प्रचंड क्रान्ति झाल्याशिवाय त्यांच्या अंतःकरणांत आमच्या व्यापारवृद्धीविषयी कळकळ उत्पन्न होईल, अशी आशा करणें व्यर्थ आहे. " ( ' आधुनिक भारत ', पृ. १२८ ).

येथेच मूळ मेख आहे. रानडे, लोकहितवादी, तेलंग यांची अशी दृढ श्रद्धा होती की, ब्रिटिश राज्यकर्ते भारताचे हितच चिंतितात. त्यांच्या मनांत भारताच्या उद्धाराची तळमळ आहे. त्यांची सत्ता भारताला कल्याणकारक आहे. म्हणून त्यांच्या आश्रयानेच आपण सर्व उद्योग केले पाहिजेत. उलट या राज्यामुळे भारताची

सर्व प्रकारची हानि झाली असून, तें नष्ट झाल्यावांचून आमची उन्नति होणार नाही, अशी विष्णुशास्त्री, आगरकर व टिळक यांच्या मनाची निश्चिति झाली होती. निबंधमालेने हा संदेश प्रथम दिला, म्हणून तिच्यामुळे नवयुग निर्माण झालें.

### यथान्याय

लोकहितवादींच्या कार्याचा व्याप अथवा त्याची महत्ता दादाभाई किंवा रानडे यांच्याइतकी नाही, हें खरें आहे. तरीहि गेल्या शतकांतील प्रबोधनच्य' कार्यांत त्यांचें स्थान महत्त्वाचें आहे याबद्दल दुमत होईल असें वाटत नाही. धर्मा समाजरचना, अर्थव्यवस्था, राजकारण या प्रत्येक क्षेत्रांत त्यांनी, आजहि पुरोगामी वाटतील, असे विचार सव्वाशे वर्षांपूर्वी सांगितले, यांतच त्यांची थोरवी आहे. राममोहन रॉय यांनाहि नव्या अर्थकारणाचें स्वरूप आकळलें नव्हतें; तें लोकहितवादींनी पुरेपूर जाणलें होतें व आपला व्यापार वाढला पाहिजे, कारखाने स्वतःचे उभारले पाहिजेत, असा उपदेशहि केला होता.

पण ब्रिटिश राज्य व ब्रिटिश राज्यकर्ते हा विषय आला की त्यांची सर्व आकलनशक्ति मरगळून जाई. इंग्रजी राज्य हें ईश्वरी वरदान आहे, असेंच ते म्हणत. एवढेंच नव्हे तर, 'इतिहासाच्या संबंधाने समुद्रच' असा ज्यांचा लौकिक होता ते लोकहितवादी 'इंग्रजांनी हिंदुस्थानचें राज्य न्यायाने घेतलें' असेंहि सांगत. "त्या राज्यस्थापनेचा इतिहास पाहूनच, इंग्रजांनी यथान्याय राज्य घेतलें आणि ईश्वराने हें राज्य त्यांस अशा प्रकाराने दिलें की, त्यांस कोणी दोष देणार नाही, असें माझें मत झालें आहे," असें एका पत्रांत ते लिहितात तेव्हा विस्मय वाटतो. क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्ज यांचीं चरित्रें अप्रामाणिकपणा, वचनभंग, पिसाट लोभ यांनी बरबटलेलीं आहेत हें लोकहितवादींना माहीत नव्हतें काय ?

पण हा प्रश्न दादाभाई, रानडे यांच्याबद्दलहि निर्माण होतो. विष्णुशास्त्री यांच्या आधीच्या सर्वच थोर पुरुषांबद्दल तो विचारावा लागतो. ब्रिटिश हेच आपले उद्धारकर्ते आहेत, असें कोणत्या इतिहासाच्या अधारे आपण म्हणतां ? याला उत्तर नाही. त्यांची तशी श्रद्धा होती, एवढेंच उत्तर देतां येईल. या श्रद्धेला सुरुंग लावून 'आपणच आपले उद्धारकर्ते' हा स्फूर्तिदायक विचार प्रथम विष्णुशास्त्री यांनी मांडला.

### म. फुले – अनन्यकोटी

यानंतर महात्मा जोतिबा फुले यांचा विचार करावयाचा. वरील तिघांच्या तुलनेने पाहतां फुले अनन्यकोटींतलें होते. लोकहितवादी, रानडे हे समाजसुधारकच होते; पण स्वतः प्रतिपादिलेलीं तत्त्वें आचरण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांनी माघार घेतली; पण फुले यांनी अनन्यसामान्य धैर्य दाखवून आपल्या तत्त्वांप्रमाणे जन्मभर आचरण केलें. प्रथम त्यांनी महार-मांग-चांभार या जातींच्या मुलींसाठी शाळा स्थापिली. त्यापाठोपाठ कनिष्ठ जातींसाठी इतर अनेक शाळा स्थापन केल्या. विधवा-

विवाहाला उत्तेजन देऊन ते घडवून आणले. बालहत्याप्रतिबंधक गृह काढलें, आणि अस्पृश्यांसाठी घरांतला पाण्याचा हौद खुला केला; आणि हें सर्व करीत असतांना, चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता यांचा आधार असलेलें जें हिंदु धर्मशास्त्र त्याच्यावर अत्यंत प्रखर असा हल्ला चढविला. या ब्राह्मणी शास्त्रांतील विषमता, अन्याय, जुलूम, पक्षपात यांवर एवढी विदारक, प्रखर टीका दोन हजार वर्षांत कोणीं केली नसेल इतकी जोतिबांनी केली. या काळांत यामुळेच त्यांच्यावर अनेक संकटें आलीं. प्राणसंकटहि आलें. पण जोतिबा डगमगले नाहीत. ते अत्यंत धाडसी, साहसी होते. त्यांनी या सर्व संकटांना तोंड देऊन सामान्य, दलित जनतेच्या उद्धाराचें कार्य अव्याहत चालविलें.

## इंग्रज त्राते

पण असें असूनहि लोकहितवादी, रानडे यांची इंग्रज राज्यकर्त्यांवर एकपट श्रद्धा असली, तर म. फुले यांची दसपट, शतपट होती. ब्राह्मणी सत्तेपासून दलितांचें संरक्षण व्हावें म्हणून, "यापुढे तरी सरकारने शुद्धीवर येऊन प्रत्येक खेड्यांत एका तरी इंग्लिश अथवा स्कॉच गृहस्थाला गतकुळी शेतें इनाम देऊन त्याला गावच्या कच्च्या हकीगतीविषयी रिपोर्ट करण्यास सांगावें," अशी सूचना केली आहे; आणि इंग्रज हेच आपले त्राते अशी त्यांची शेवटपर्यंत श्रद्धा होती. आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या खंडांत इंग्रजांनी तेथील आदिवासींच्या अमानुष कत्तली केल्या होत्या, आणि भयानक अस्पृश्यता निर्माण करून, त्यांच्या वेगळ्या वस्त्याहि शक्य तेथे निर्माण केल्या होत्या. हा इतिहास जोतिबांनी दृष्टिआड केला. पण एवढेंच नाही. हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांचें स्वरूप कांही प्रमाणांत तरी तसेंच आहे असें स्वतः जोतिबांनीच, 'शेतकऱ्याचा आसूड' या आपल्या प्रबंधांत दाखवून दिलें आहे. दादाभाईंनी इंग्रजांवर केलेले आरोप थोड्या सौम्य भाषेंत जोतिबांनीहि केले आहेत. असें असतांना इंग्रजांखेरीज आपला त्राता कोणी नाही या मताला ते चिकटून बसले आणि ती भावना शूद्रांच्या व सर्व ब्राह्मणेतरांच्या मनांत त्यांनी दृढमूल करून टाकली.

जोतिबांचा लढा ब्राह्मण्याविरुद्ध होता, सनातन हिंदु धर्मशास्त्राविरुद्ध होता. त्यांच्या मतें ब्राह्मण हेच फक्त आर्य व त्या शास्त्राचे पुरस्कर्ते असून, शूद्र, अस्पृश्य यांसकट सर्व ब्राह्मणेतर समाज हा शूद्र होता. असें असतांना त्या सर्वांना संघटित करून, त्यांना स्वतःच्या बळावर, स्वावलंबनाने, ब्राह्मण्याविरुद्ध लढा करण्यास त्यांनी उद्युक्त केलें असतें तर सर्व ब्राह्मणेतर समाजाचें आत्मतेज जागृत झालें असतें; पण तसें झालें नाही. जोतिबांनी लढा सुरू केला; पण ब्राह्मणांखेरीज आपण सर्व शूद्र आहों, समान आहों, हें तत्त्वज्ञान ब्राह्मणेत्तरांनी क्षणभरहि स्वीकारलें नाही. सत्यशोधक चळवळींतून त्यांनी ब्राह्मणद्वेष फक्त घेतला. चातुर्वर्ण्य, जातिभेद या सर्व संस्था, त्यांतील ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व वगळून, ब्राह्मणेतरांना जशाच्या तशा हव्या

होत्या. म्हणजे त्यांचा लढा, जोतिबांप्रमाणे तात्त्विक नव्हता. त्याला नैतिक अधिष्ठान नव्हतें. इंग्रज राज्यकर्त्यांच्या बाबतींत तर, 'पंचम जॉर्ज पिता व मेरी आमची माता' असें म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली. स्वातंत्र्यानंतर पंचवीस वर्षें ब्राह्मणेतरांच्या हातीं सत्ता आहे. या काळांत शूद्र-अस्पृश्य यांवरचे अत्याचार, जोतिबांच्या काळाप्रमाणेंच चालू आहेत. नव्हे, त्यांचें प्रमाण फार वाढलें आहे. ज्या शेतकऱ्यांसाठी जोतिबांनी कणाकणाने देह झिजविला तो शेतकरी, ते शूद्र, ते अस्पृश्य, ते आदिवासी, ते दलित यांची स्थिति पूर्वीपेक्षाहि जास्त दयनीय झाली आहे. आणि भाई माधवराव बागल, डॉ. बाबा आढाव, केशवराव मोरे रा. ना. चव्हाण हे ब्राह्मणेतर कार्यकर्तेच हे सांगत आहेत. सत्यशोधक समाज म. फुले यांचें तत्त्वज्ञान मुळीच मानीत नाही, हें अनेक उदाहरणें देऊन त्यांनी स्पष्ट केलें आहे. ('साधना', पुणें – अंक १५–५–७१, ९–१०–७१, ११–३–७२ व २४–६–७२). म. फुले यांचा खरा अनुयायी एकच – महर्षि वि. रा. शिंदे. पण ते अंत्यज सेवा करतात म्हणून बहुजनांनी त्यांना बहिष्कृत केलें. याचा अर्थ हा की, ब्राह्मणेतर समाजाने म. फुले यांच्यापासून स्फूर्ति घेतली नाही. आपले उद्धारकर्ते आपण आहोंत, ही भावना प्रारंभापासून त्यांच्यांत चेतली असती तर त्या सामाजिक, धार्मिक लढ्यांतूनहि स्वत्वजागृति बहुजनांच्या ठायीं झाली असती, व त्यांच्यांतूनहि अपार कर्तृत्व निर्माण झालें असतें. १९३० सालानंतर तो समाज स्वातंत्र्यलढ्यांत उतरल्यानंतरच तो शुभारंभ झाला.

पण पितामह दादाभाई, न्या. मू. रानडे व लोकहितवादी यांच्यासारखे जे 'माहितीचे समुद्र' त्यांनी सुद्धा इंग्रज राज्यकर्ते हेच आपले उद्धारकर्ते ही भूमिका स्वीकारली तेथे महात्मा फुले यांना कसा दोष द्यावयाचा?

याचा अर्थ एकच. इंग्रज गेले तरी हिंदुस्थानचें भवितव्य आपण आपल्या खांद्यावर सहज पेलूं शकूं, असा आत्मप्रत्यय या थोर पुरुषांच्या ठायीं नव्हता. विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक यांचें वैशिष्ट्य हें की, त्यांचें मन या आत्मप्रत्ययाने ओतप्रोत भरलें होतें, दुथडी वाहत होतें. यामुळेच विष्णुशास्त्री यांनी बेधडक सांगून टाकलें की, इंग्रज इकडे आले नसते तर आपलें कांही अहित झालें असतें असें नाही. इतकेंच नव्हे, तर या जगांत इंग्रज मुळीच नसते तरी त्यांच्यावांचून आम्ही रसातळास जाऊन पोचलों असतों, असें नाहो. ('आमच्या देशाची स्थिति' – य. गो. जोशी प्रकाशन, पृ. २९, २४).

- ३ -

# स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश

### अहं-स्फुरण

स्वत्वाची ओळख, अस्मितेची – पृथक्‌पणाची – जाणीव, अहंकार-जागृति ही संजीवनी आहे. सर्व नवी सृष्टि या अहंकारांतूनच निर्माण होते. भारतांतील प्राचीन तत्त्वज्ञानामध्ये कपिलमहामुनींचें सांख्यदर्शन फार महत्त्वाचें मानलें जातें. सांख्य-मतानें मूलप्रकृतींत बुद्धि निर्माण होते व तींतून प्रथम अहंकाराचें स्फुरण होतें; आणि या स्फुरणांतूनच सर्व चराचर सृष्टि निर्माण होते. मानवी जीवनाचें असेंच आहे. कोणत्याहि राष्ट्राला स्वत्वाची, आपल्या अस्मितेची जाणीव होत नाही तोंपर्यंत त्यांत कर्तृत्व निपजत नाही. मूलप्रकृतीच्या ठायीं सुप्तावस्थेंत सर्व गुणसंपदा असते; पण अहंकार-स्फुरणावांचून नवी सृष्टि नाही, त्याचप्रमाणे समाजाच्या ठायीं सर्व प्रकारची गुणसंपदा असूनहि त्याचा पृथगहंकार जागृत झाला नाही, तर तो वैभवास चढत नाही. विष्णुशास्त्री यांच्या आधी बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, दादाभाई, रानडे, फुले यांच्या प्रयत्नाने येथे गुणसंपदा निर्माण होऊं लागली होती, पण अस्मितेंतून जो चित्कळेचा स्पर्श तिला व्हावा लागतो तो अजून झाला नव्हता. त्यामुळे नवनिर्मिति होत नव्हती, कर्तृत्व फुलत नव्हतें, समाजांतून नवे उन्मेष येत नव्हते. विष्णुशास्त्री यांनी तो जीवनदायी स्पर्श घडविला आणि आरंभीं म्हटल्याप्रमाणे येथे नवयुग निर्माण झालें.

### आत्मविश्वास

इंग्रज हिंदुस्थानांत आले नसते तर आमचें कांही अहित झालें असतें असें नाही, किंबहुना ते या जगांतच नसते तरी कांही बिघडलें नसतें, असें विष्णुशास्त्री कां म्हणाले? एक तर त्यांना हें माहीत होतें की, असा एक देश दुसऱ्या देशाचें कधीहि

कल्याण करीत नाही. तो दुसऱ्याला पादाक्रांत करतो तें स्वतःच्या स्वार्थासाठी, जितांच्या रक्तशोषणासाठी; आणि दुसरें म्हणजे आपल्या देशाच्या लोकांमध्ये स्वत्व-जागृति झाली, त्यांना आपल्या अस्मितेची ओळख पटली की आपल्या देशाची सर्वांगीण उन्नति करण्यास, त्याचा उत्कर्ष साधण्यास ते स्वतःच पूर्णपणें समर्थ होतील, अशी शास्त्रीबुवांना निश्चिति होती. त्यांच्या लेखनांतून त्यांच्या सुप्त मनाचा ठाव घेतला तर असें दिसेल की, तें मन असेंहि म्हणत होतें – आमच्या पूर्ववैभवाचें आम्हीं स्मरण केलें तर कदाचित् आम्ही इंग्लंडहि पादाक्रांत करूं. 'आमच्या देशाची स्थिति' या प्रबंधांत महादजी शिंदे यांच्या पराक्रमाचा गौरव करतांना त्यांनी लिहिलें आहे – "वृद्धकथेवरून असें ऐकण्यांत आलें आहे की, पाटीलबोवांचा इरादा खुद्द लंडनवर भगवा झेंडा रोवण्याचा होता." इंग्रजांचें वागणें ख्रिस्ती धर्मास सोडून आहे, असें सांगतांना अन्यत्र त्यांनी विचारलें आहे की, "आम्ही उद्या उठून इंग्लंडवर गेलों आणि सारी दौलत हिंदुस्थानांत भरली तर चालेल काय? नाना तऱ्हेचे चरक लावून तेथील प्रजा सारी पिळून काढली असतां तें आमच्या पाश्चात्त्य आर्य बंधूंस कितीसें मानवेल बरें?"

असला दुर्धर्ष आत्मविश्वास विष्णुशास्त्री यांच्या ठायीं होता; आणि तोच आत्मविश्वास आपल्या हिंदी लोकांच्या ठायीं जागृत करावा, यासाठी त्यांनी शेवट-पर्यंत लेखणी झिजविली, व त्यांना सत्वाची ओळख करून दिली.

## स्वत्व म्हणजे काय?

शास्त्रीबुवांनी स्वत्वाची ओळख करून दिली म्हणजे काय केलें? अस्मितेची जाणीव म्हणजे काय? स्वभाषा, स्वधर्म, आणि स्वदेश यांचा अभिमान हें स्वत्व· स्वदेश या शब्दांत स्वतःची संस्कृति, प्राचीन परंपरा, पूर्वजांचें बहुविध कर्तृत्व त्यांच्या ठायीची गुणसंपदा यांचा अंतर्भाव होतो. आचार्य जावडेकर यांनी म्हटलें आहे की, "१८७५ पासून १८८५ पर्यंतच्या काळांत जें एक नवचैतन्य राष्ट्रांत निर्माण होत होतें त्याला एक सांस्कृतिक अंगहि होतें. हें सांस्कृतिक अंग म्हणजे भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा अभिमान हेंच होय." या अभिमानानेच चैतन्य निर्माण होत असतें. विष्णुशास्त्री यांनी हा अभिमान कसा जागृत केला तें आता पाहूं.

## मातृभाषा

समाजाच्या अस्मितेचें पहिलें अंग म्हणजे भाषा. स्वत्वाच्या दृष्टीने भाषेचें महत्त्व काय तें बांगला देशाने दाखवून दिलें आहे. बांगला हा मुस्लिमांचा देश. त्यांच्या धर्म-ग्रंथाची भाषा आरबी आहे. त्यांचें राष्ट्र म्हणजे पाकिस्तान, त्याची भाषा उर्दू होती; पण बांगला-जनांना त्या भाषा परकीय वाटत होत्या. बंगाली ही त्यांची स्वभाषा. त्यांचें स्वत्व त्या भाषेंत होतें. त्यामुळे तिच्यावर आक्रमण होतांच तेथले अवघे लोक-जात खवळून उठले आणि पाकिस्तानांतून फुटून निघून आपल्या अस्मितेचें त्याने रक्षण केलें. ही गोष्ट कांही नवीन नाही. सनातन काळापासून

प्रत्येक समाज आपल्या भाषेचा असा अभिमान बाळगीत आला आहे, हें जाणूनच विष्णुशास्त्री यांनी स्वभाषाभिमान चेतविण्यापासून आपल्या लेखनास प्रारंभ केला.

'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' हा निबंधमालेंतील पहिला निबंध. त्याच्या प्रारंभींच त्यांनी म्हटलें आहे की, भाषेची अभिवृद्धि ही देशाच्या उत्कर्षाचें एक मोठेंच साधन आहे. कारण देश व भाषा यांची एकच अवस्था मानली तरी चिंता नाही. म्हणजे अस्मितेचीं हीं दोन अंगें अविभाज्य आहेत. अशा या महत्त्वाच्या अंगाची – स्वभाषेची – इंग्रजीच्या वर्चस्वामुळे अवहेलना होत आहे हें पाहून विष्णुशास्त्री अस्वस्थ झाले आणि त्या भाषेचें वैभव महाराष्ट्रियांच्या निदर्शनास आणून देण्याचें कार्य त्यांनी आरंभलें. सर्व प्रकारचे विकार, विचार, भावना, कल्पना, नाना आंतरिक संवेदना, अभिप्राय हे व्यक्त करण्यास मराठी भाषा असमर्थ आहे, तींत तसे समर्पक, अर्थव्यंजक शब्दच नाहीत असा एक आक्षेप त्या वेळीं घेतला जात असे; आणि हा आक्षेप नव्या पदवीधरांकडून, सुशिक्षितांकडून येत असे. ( आश्चर्य असें की, आज शंभर वर्षांनंतरहि महाराष्ट्रांतले अनेक लेखक मराठी लिहितांना बिनदिक्कत मधेच अनेक इंग्रजी शब्द वापरतांना दिसतात. सर्व भावार्थ व्यक्त करण्यास मराठी समर्थ आहे हें आजहि त्यांना मान्य नाही. ) त्याला उत्तर देतांना शास्त्रीबुवा म्हणतात, "जी भाषा बोलणाऱ्यांनी दिल्ली-अटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जींत तुकाराम-रामदासांसारख्या भगवत्परायण साधूंनी आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रथित केले, जीस मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि कवींनी आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीने संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरिता कोणत्याहि अन्य भाषेच्या तोंडाकडे पाहण्याची खास गरज नाही, अशी आमची खात्री आहे."

स्वभाषा व स्वदेश हीं अस्मितेचीं अंगें अविभाज्य आहेत म्हणजे काय, हें यावरून स्पष्ट होईल. ज्या लोकांच्या ठायीं कर्तृत्व आहे, पराक्रम आहे त्यांची भाषा समृद्ध असणारच; आणि भाषेच्या विकासामुळे कर्तृत्वाचा विकास साधणारच, असा हा अन्योन्य संबंध आहे. हा दुसरा विचार मनांत असल्यामुळेच विष्णुशास्त्री यांनी म्हटलें आहे की, "इंग्लिश भाषेचा आम्ही द्वेष करीत नाही. हें तर काय, पण आपल्या मराठीच्या उत्कर्षास तीमोठेंच साधन होईल अशी आमची खात्री आहे. सर्व जगांतील ज्ञानभांडार तींत साठविलें असल्यामुळे तिचें साहाय्य मराठीसारख्या पक्व होऊं पाहणाऱ्या भाषेस होईल तितकें थोडें आहे. इतकेंच मात्र की, तें ज्ञानभांडार खुद्द आपलेंसें करून घेण्यास आपल्या भाषेचें स्वत्व म्हणजे निराळेंपण कायम राखलें पाहिजे. तर मराठी भाषेच्या हितकर्त्या विद्वानांनी हें पक्कें लक्षांत वागवावें की, इंग्रजींतील केवळ अर्थ मात्र घेऊन त्यास शुद्ध मराठीच्या साच्यांत त्यांनी ओतलें पाहिजे. अशा तऱ्हेचे ग्रंथ बनले असतां ते भाषेस फारच हितावह होऊन भूषणप्रद होतील."

## ग्रंथ-निर्मिति

भाषेच्या अभिवृद्धीचा मार्ग येथे शास्त्रीबुवांनी स्पष्ट केला आहे. भाषेची अभिवृद्धि म्हणजे काय ? विकास म्हणाजे काय ? सर्व जगाचें ज्ञानभांडार तिच्यांत आणून सोडणारे ग्रंथ तयार होणें ! हीच अभिवृद्धि, हाच विकास; आणि हा विकास झाला म्हणजे सहजगत्याच देशाचा विकास होईल. कारण मराठींत ग्रंथ झाल्याने आज ज्ञानाचा मार्ग ज्यांस खुला नाही त्यांस तो खुला होईल आणि त्यांतूनच देशाचा उत्कर्ष साधेल. या सर्व निबंधांत भाषेचा उत्कर्ष म्हणजेच देशाचा उत्कर्ष हें सूत्र विष्णुशास्त्री यांनी अखंड राखलें आहे. शेवटीं समारोप करतांनाहि त्यांनी म्हटलें आहे की, " आपल्या भाषेच्या अंगीं अर्थव्यंजकता, वर्णसौंदर्य फार कमी आहे हा अलीकडील विद्वानांचा ग्रह कांही अंशीं तरी मोडून टाकण्यास जर आमचें निबंध कारण झाले तर आमच्या हातून देशहिताचें एक मोठेंच कृत्य घडलेसें आम्ही मानूं."

तेव्हा स्वत्व याचा पहिला अर्थ म्हणजे स्वभाषेचा अभिमान, आणि त्याची जागृति म्हणजे स्वत्वाची ओळख होय, याविषयी विष्णुशास्त्री यांच्या मनांत तिळप्राय संदेह नव्हता, हें यावरून स्पष्ट होईल. तसें असल्यामुळेच त्यांनी स्वत्वा-जागृतीला तेथूनच प्रारंभ केला.

## मर्मघातक हल्ला

स्वधर्म हा स्वत्वाचा दुसरा महत्त्वाचा घटक होय. एका अर्थी स्वभाषेच्या तुलनेने स्वधर्म हा दसपटीने, शतपटीने महत्त्वाचा घटक आहे. म्हणून मिशनऱ्यांनी मराठीचा किंवा इतर देशभाषांचा आश्रय करण्यांत मुळीच खंत मानली नाही आणि धर्मावर मात्र अत्यंत मर्मघातक हल्ला चढविला. इंग्रज पंडितांचें धोरण असेंच होतें. सरकारने प्रजेवर धर्माच्या बाबतींत सक्ती करावी की नाही असा विषय चालला असतां, मेकॉलेसाहेब हिंदुस्थानाविषयी लिहितात, " परधर्म जबरीने लोकांवर बसविला असतां, जेथे त्यांचें अपरिमित कल्याण होईल, असा देश हिंदुस्थानाखेरीज कदाचित् दुसरा कोठेंहि सापडणार नाही. तेथील धर्मासारखा नीचतेस पोचलेला धर्म साऱ्या पृथ्वीवर कोठेंहि नाही. त्याचा समूळ उच्छेद करून ख्रिस्ती धर्माचें अत्यंत हीन काळीं अत्यंत हीन जें स्वरूप कधी कोठे चालू असेल, तें त्याच्या जागीं आणून बसविलें असतांहि, त्या देशांतील लोकांचें हित होणार आहे."

## प्रत्याघात

अशा तऱ्हेने अत्यंत दुष्ट व विकृत बुद्धीने केलेले धर्मावरचे हल्ले हिंदूंना सहन होणें कसें शक्य होतें ? १८५७ चें स्वातंत्र्यसमर हा त्या संतापाचाच उद्रेक होता. इतरहि मार्गांनी हिंदूंनी या आघाताला प्रत्याघात चालविला होता. कृष्ण-शास्त्री चिपळूणकर यांनी 'विचारलहरी' हें नियतकालिक चालविलें होतें. त्यामुळे कांही काळ त्यांच्या नोकरीवरहि गदा आली होती. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी मिशनऱ्यांच्या अस्सल भाषेंतच त्यांना प्रत्युतर देऊन अनेक ठिकाणीं त्यांना नामोहरम

केलें होतें; पण पैसा, सत्ता, विद्वत्ता या सर्व दृष्टींनी मिशनऱ्यांचें बळ फार मोठें होतें, त्यामुळे त्यांचें हिंदु धर्म-निंदेचें व धर्मांतराचें कार्य अविरतपणें तसेंच चालू होतें. म्हणूनच विष्णुशास्त्री यांनी मिशनऱ्यांविरुद्ध सतत शस्त्रसंधान चालविलें होतें. त्यांतील ख्रिस्ती धर्माचें जें विदारण त्यांनी पाश्चात्त्य पंडितांच्या – ख्रिस्ती पंडितांच्याच – आधारें केलें त्याचा विचार पुढे करावयाचा आहे. येथे भाषेचें महत्त्व सांगतांना त्यांनी जो मुद्दा मांडला तसा धर्मचर्चेच्या सदर्भांत मांडलेला मुद्दा पाहूं. विष्णुशास्त्री म्हणतात की, "प्राचीन काळीं याच धर्माच्या आश्रयाने येथल्या लोकांनी अलौकिक व दिव्य असें कर्तृत्व प्रगट केलें होतें. वाल्मीकि, पाणिनि, कालिदास, आर्यभट्ट हे सर्व हिंदु धर्माचे पुरुष होते. विक्रमादित्य, पोरस, शिवाजी, बाजीराव यांनी हिंदु राहूनच दिग्विजय केला. तुकाराम, रामदास, यांसारखे थोर धर्मवेत्ते याच धर्मांत निपजले ! तेव्हा यापुढे प्रगति करण्यासाठी ख्रिस्ती धर्माचा अवलंब करणें अवश्य आहे हा विचार कमालीच्या मूर्खपणाचा आहे. त्यांतून हिंदु धर्मांत कांही हीण मिसळलें असेल तर तें काढून टाकून धर्मसुधारणा करण्यास कसलाच प्रत्यवाय नाही." मराठी भाषेंत सुधारणा करण्यास ज्याप्रमाणे शास्त्रीबुवांचा विरोध नव्हता तसाच धर्मसुधारणेसहि नव्हता. परदेशगमनास पूर्वी बंदी होती. पण १८५७ चे वीर अफगाणिस्तान, इराण, माल्टा येथे गेलेच होते. राघोबादादांचा वकील इंग्लंडला गेला होता. पेशव्यांनी सर्व हिंदुस्थानभर संचार केला तेव्हा 'न नीचो यवनात् परः ।' हें वचन उराशीं बाळगलें नव्हतें. हीं उदाहरणें देऊन शास्त्रीबुवांनी म्हटलें आहे की, सुधारणा होण्यास हिंदु धर्म बाधक आहे ही समजूत अगदी चुकीची आहे.

**ख्रिश्चन वळण**

हिंदु धर्मांत सुधारणा करण्यास कसलीच हरकत नव्हती, तर विष्णुशास्त्री यांनी ब्राह्मोसमाज व प्रार्थनासमाज या पंथांवर टीका कां केली, असा प्रश्न येतो. ते पंथ तर हिंदु धर्मांत राहूनच सुधारणा करण्याचे प्रयत्न करीत होते. याचें उत्तर असें की, त्या पंथांनी व विशेषतः प्रार्थनासमाजाने ख्रिस्ती धर्माच्या वळणावर कांही आचार सुरू केले होते. समाजाच्या उपासना रविवारीं होत आणि कांही प्रार्थना इंग्रजींतून होत. उपासनेला कधी कधी बायबलचा आधार घेतला जात असे; आणि एकंदर उपासनेचें स्वरूप चर्चमधील उपासनेसारखें दिसत असे. आज हे आक्षेप अगदी बालिश व पोकळ असे वाटतील हें खरें आहे; पण मिशनरी व इंग्रज पंडित यांचे रानटी हल्ले ज्या वेळीं चालू होते, सरकारचा त्यांना ज्या वेळीं पूर्ण पाठिंबा होता, आपल्यांतलेच कांही लोक धर्मांतर करून ख्रिस्ती कळपांत जाऊन हिंदु धर्माच्या निंदेस उद्युक्त झाले होते, त्या वेळीं या नव्या पंथामुळे ख्रिस्ती धर्माकडे लोकांची ओढ होईल अशी भीति वाटणें साहजिक होतें. ब्राह्मोसमाजाचे प्रसिद्ध अनुयायी केशवचंद्र सेन यांनी पुढे त्याच वळणावर आपल्या समाजाला नेलें. त्यांनी आपल्या नवविधान

समाजांत ख्रिस्ती धर्मांतील अनेक विधींचा अंतर्भाव केला आणि ख्रिस्ती लोकांचा त्रिमूर्तिवाद समाजाच्या मूलतत्त्वांत प्रविष्ट केला. ख्रिस्ती मिशनरी या सर्वांचा फार विचित्र अर्थ करीत असत. हे नव्या पंथाचे लोक स्वधर्माला विटले असून ते लवकरच ख्रिश्चन होतील, असा प्रचार ते करीत. ( 'प्रार्थनासमाजाचा इतिहास', पृ. ४६ ). स्वत्वरक्षणास उद्युक्त झालेले विष्णुशास्त्री चिपळूणकर यांना हीच भीति होती. अशी भीति केवळ चिपळूणकरांनाच वाटत होती असें नव्हे. राजारामशास्त्री भागवत हे सुधारकच होते. त्यांनीहि, ख्रिस्ती धर्माच्या नमुन्यावर हा नवा नंदादीप पाजळला, अशी समाजाच्या संस्थापकांवर उघडपणें टीका केली होती. 'ज्ञानप्रकाश' हें पत्र सुधारकी वळणाचें असूनहि त्याने प्रार्थनासमाज स्थापन झाला तेव्हा लगेच त्यावर अशाच प्रकारचा आरोप केला होता. आज आपण शंभर वर्षांनी शांतपणें त्या काळचा विचार करीत आहोंत. पण आक्रमक असे मिशनरी व इंग्रज राज्यकर्ते आणि हिंदु धर्म व हिंदु संस्कृति यांच्यांत त्या वेळीं मोठा संग्राम सुरू झाला होता. तो युद्ध-काळ होता. युद्धकाळांत शत्रूच्या गौरवाचा व स्वकीयांच्या अधिक्षेपाचा नुसता वास जरी कोठे आला तरी त्याच्यावर लोक खवळून उठतात; आणि तसें खवळणें अवश्यच असतें. तीच भावना विष्णुशास्त्री यांची होती. म्हणून ख्रिश्चन वळणावर जाणाऱ्या पंथांवर ते तुडून पडत होते.

## परंपराभिमान

स्वत्वाचा तिसरा घटक म्हणजे स्वदेश. स्वदेशाचा अभिमान म्हणजे आपल्या प्राचीन संस्कृतीचा, प्राचीन परंपरेचा अभिमान, आपल्या पूर्वजांच्या बहुविध कर्तृत्वा-चा अभिमान होय. मागे सांगितलेंच आहे जितांचा हा अभिमान नष्ट करावा असा जेत्यांचा नेहमीच प्रयत्न असतो; आणि त्याप्रमाणे इंग्रज पंडितांनी गेल्या शतकांत तसे पराकाष्ठेचे प्रयत्न चालविले होते. या पंडितांच्या आघातांचें निवारण करून त्यांच्यावर तसाच जबर प्रत्याघात करणें हें निबंधमालेचें एक प्रधान उद्दिष्ट होतें. आम्हांला इंग्रजांचें गुरुत्व पतकरण्याचें मुळीच कारण नाही हें सांगतांना व्यास, वाल्मीकि, कालिदास, कपिल, पाणिनि, आर्यभट्ट, भास्कराचार्य, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, चंद्रगुप्त, पोरस, शिवाजी, बाजीराव, माधवराव, महादजी, यशवंतराव होळकर, रणजितसिंग, रमाबाई, अहल्याबाई, लक्ष्मीबाई, नाना, तात्या टोपे अशा अनेक स्त्री-पुरुषरत्नांचीं नांवें सांगून कर्तृत्वाच्या सर्व क्षेत्रांतील गुणसंपदा जोपासण्याची ऐपत आम्हां हिंदुधर्मीयांत आहे, असें विष्णुशास्त्री यांनी वारंवार आवर्जून सांगितलें आहे.

## डाव उलटविला

शिवाय हा आपला सिद्धान्त जास्त दृढ व विवादातीत करून टाकण्यासाठी अनेक युरोपीय पंडितांचे आधार देऊन भारतीय संस्कृतीचे निंदक जे पाश्चात्त्य पंडित त्यांना त्यांच्याच जातभाईंकडून त्यांनी प्रत्युत्तर देवविलें आहे. बॅसेट नांवाच्य

एका फ्रेंच ग्रंथकाराने 'जगाचा इतिहास' या नांवाने एक इतिहास लिहिला आहे. त्यांत ज्यू लोक यांचाच प्रामुख्याने इतिहास देऊन इतरांना अगदी गौण लेखिलें आहे. त्यावर टीका करतांना एक नामांकित इंग्लिश इतिहासकार लिहितो, "या जगाच्या इतिहासांत लेखकाने हिब्रू लोकांनी ज्यांच्यापासून संकृतीची शिकवण घेतली त्या पर्शियन व इजिप्शियन लोकांना तर वगळलेंच आहे. पण त्यांच्याहि-पेक्षा अतिशय श्रेष्ठ असे सिंधु व गंगा यांच्या काठचे लोक त्यांनाहि वगळलें आहे. त्यांचें तत्त्वज्ञान इतकें उदात्त होतें की, युरोपियांचें सर्व अध्यात्मज्ञान त्यांत पूर्वीच येऊन गेलें आहे. आणि ज्यू जेव्हा भटक्या जंगली अवस्थेंत होते तेव्हा अत्यंत उदात्त ज्ञानविद्या जोपासून त्यांनी ती आपल्या अमृतमधुर भाषेंत ग्रथितहि करून ठेविली होती."

प्रसिद्ध संस्कृत पंडित कोलब्रुक, इतिहासकार ओक्ले, सर जॉन मालकम, सर जेम्स मॅकिंटाश, यांसारखे इंग्लिश अधिकारी अशा अनेक पंडितांचीं अशींच अवतरणें देऊन विष्णुशास्त्री यांनी इंग्लिश मिनशरी, इंग्रज पंडित व इंग्रज राज्यकर्ते या तीन धूर्तांनी हिंदी जनांना भग्नतेज करण्याचा जो डाव रचला होता तो उलटवून त्यांच्या मनाला येणारी मरगळ झाडून टाकली व या भूमींत नवें चैतन्य निर्माण केलें.

## - ४ -

# एक पाय तुरुंगांत

### राजद्रोहाचा आरोप

विष्णुशास्त्री यांनी स्वभाषा, स्वधर्म आणि स्वदेश यांचा अभिमान जागृत करून या भूमींत नवें चैतन्य निर्माण केलें; पण आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे की, स्वत्वाचें केवळ तात्त्विक विवेचन करून असें चैतन्य कधीच निर्माण झालें नसतें. ज्यांना ही स्वत्व-जागृति होऊं नये असें वाटत असतें, ज्यांची त्यामुळे मोठी हानि होण्याचा संभव असतो ते असले प्रयत्न ठेचून टाकण्यास सदैव सिद्ध असतात. तेव्हा ज्याला स्व-समाजाची अस्मिता जागृत करावयाची आहे त्याने हें भविष्य जाणूनच पावलें टाकणें अवश्य असतें. विष्णुशास्त्री यांना या भविष्याची पुरेपूर जाणीव होती आणि मनाची तशी तयारी करूनच त्यांनी लेखणी उचलली होती. "तुम्ही इतके प्रखर, इतके कडक कसे लिहितां, सरकारवर, मिशनऱ्यांवर ही टीका कशी करतां," असें कोणी त्यांना विचारलें तेव्हा, 'एक पाय तुरुंगांत ठेवूनच मी लिहितों,' असें त्यांनी उत्तर दिलें होतें; आणि तुरुंगाची ही भीति केवळ काल्पनिक नव्हती. 'इंग्रजी भाषा' या विषयावरील तिसरा आणि मालेंतील तिसावा निबंध प्रसिद्ध झाला त्या वेळीं शास्त्रीबुवांच्यावर राजद्रोहाचा आरोप आलाच होता. त्या अंकांत भारताचा इतिहास लिहिणारे पाश्चात्त्य व विशेषत: इंग्रज इतिहासकार यांची बुद्धि कशी दुष्ट, पूर्वग्रहदूषित व पक्षपाती असते, त्यांचें लिखाण अयथार्थ व विपर्यस्त कसें असतें तें सांगून, त्यांच्यावर आणि अनुषंगाने येथील इंग्रज अधिकारी व मिशनरी यांच्यावर शास्त्रीबुवांनी झोंबरी टीका केली होती. ती सहन न होऊन मेजर जेकब यांनी 'एलिफास' या सहीने 'बॉम्बे गॅझेट'मध्ये पत्र लिहून, विष्णुशास्त्री व एकंदर पुण्याचे सर्व ब्राह्मण हे राजद्रोही आहेत, असा आरोप केला होता; आणि त्या तिसाव्या अंकाचें संपूर्ण भाषांतर करून तें सरकारकडे पाठवून दिलें होतें. पुण्याच्या

ब्राह्मणांवर तेव्हापासूनच सरकारची वक्रदृष्टि झाली होती. विष्णुशास्त्री यांना या वेळीं प्रत्यक्ष शिक्षा झाली नाही; पण डायरेक्टर चॅटफील्डसाहेबांनी त्या वेळीं त्यांची रत्नागिरीस बदली करून, तुमच्या राजद्रोहाची सरकारने दखल घेतली आहे, याची जाणीव करून दिली होती. आणि ही जाणीव प्रथमपासूनच असल्यामुळे विष्णुशास्त्री यांनी नोकरीची रुपेरी बेडी तोडून टाकण्याचें तेव्हाच ठरवून टाकलें, आणि तेवढ्यावर भागलें नाही तर तुरुंगांत जाण्याचीहि मनाची सिद्धता करून ठेवली. फ्रेंच राज्यक्रांतीचा त्यांनी चांगला अभ्यास केला होता. रूसो, व्हाल्टेअर यांच्या ग्रंथांचें मनन केलें होतें. त्यामुळे प्रस्थापित सत्तेविरुद्ध लोकांना चेतवणी द्यावयाची तर लेखकाला त्यासाठी कोणती किंमत द्यावी लागते, कोणते अनर्थ त्याच्यावर आदळतात, त्याच्या आयुष्यांत सुखाला अनवसर कसा असतो याची त्यांना पुरेपूर जाण होती. मनाची अशी सिद्धता करून जो लिहितो त्यालाच लोकांत चैतन्य निर्माण करतां येतें. नवयुगाचें प्रवर्तन तोच करूं शकतो. लोकजीवनाला चित्कळेचा स्पर्श तोच घडवूं शकतों. हें आणिकांचें काम नाही.

हें आणिकांचें काम नाही हें कॉंग्रेसच्या स्थापनेच्या आधी सात-आठ वर्षें आणि नंतर आठ-दहा वर्षें या काळांत ज्या घडामोडी झाल्या त्यांवरून स्पष्ट होईल.

### धैर्य नाही

१८७७ सालापासून दादाभाई, रानडे, तेलंग, मंडलीक, फेरोजशहा मेथा, सुब्रह्मण्य अय्यर, सुरेंद्रनाथ बॅनर्जी या नेमस्त प्रागतिक पक्षाच्या नेत्यांच्या मनांत कॉंग्रेससारखी एखादी अखिल भारतीय सभा स्थापावी, असें येत होतें; पण त्यांच्या हातून तें घडलें नाही. तें घडलें केव्हा, तर ह्यूम, वेडरबर्न, कॉटन यांसारखे इंग्रज अधिकारी यांनी पुढाकार घेतला तेव्हा ! वरील नेत्यांच्या मनांत, या कार्याला अवश्य तो आत्मविश्वास नव्हता, धैर्य नव्हतें, त्यांच्या हातून राष्ट्रसभेची स्थापना होणें अशक्य होतें, असें खुद्द ना. गोखले यांनीच म्हटलें आहे. कारण अत्यंत सौम्य असें का होईना, पण तिला राजकीय संघटनेचें रूप होतें. तेव्हा अशी संघटना निर्माण करून सरकारची नाराजी ओढवून घेण्याचें धैर्य त्यांपैकी कोणाच्याहि अंगीं नव्हतें. ह्यूम, वेडरबर्न, कॉटन यांना सरकारच्या नाराजीची भीति नव्हती. म्हणूनच पुढाकार घेऊन ते अशी सभा स्थापूं शकले. राष्ट्रसभेचीं चार-पांच अधिवेशनें झाल्याबरोबर सरकारची तिच्यावर वक्रदृष्टि झालीच. १८९० सालीं सरकारी अधिकाऱ्यांनी राष्ट्रसभेच्या अधिवेशनास उपस्थित राहूं नये असा हुकूम काढण्यांत आला आणि खेदाची गोष्ट अशी की, न्या. मू. रानडे व न्या. मू. तेलंग यांच्यासारख्यांनी तो मानला ! (आधुनिक भारत प्रकरण ६ वें ).

### क्षात्रधर्म

'आधुनिक भारत' या आपल्या ग्रंथांत आचार्य जावडेकर यांनी विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक यांनी सर्वस्व वाहून देशसेवा करणारा असा नवा पंथच स्थापिला,

असें वारंवार म्हटलें आहे. वरील नेमस्त नेते आणि या नव्या पंथांचे नेते यांच्यांतील फरक ध्यानांत घेतल्यावर त्याचा अर्थ स्पष्ट होईल. ' जयासि जिवाचें वाटे भय त्याने क्षात्रधर्म करूं नये । ' असें समर्थांनी म्हटलें आहे. राष्ट्रसभेचें कार्य हा त्याहि काळांत क्षात्रधर्मच होता. विष्णुशास्त्री आपल्या निबंधमालेंतून त्याचीच शिकवण देत होते. पहिल्या अंकापासून त्यांनी हिंदी जनतेचा तेजोभंग करणाऱ्या इंग्रजांवर हत्यार धरलें होतें; आणि मालेच्या शेवटच्या प्रबंधांत इंग्रज या जगांतच नसते तरी कांही बिघडलें नसतें, असें बेधडक सांगण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती ! त्यावांचून स्वत्व-जागृति झाली नसती.

राष्ट्रसभेच्या स्थापनेपासून रानडे व तेलंग या दोघा थोर नेत्यांनी तिच्या संवर्धनासाठी अविरत कष्ट केले होते. १८९० च्या सुमारास या दोघांची सांपत्तिक-दष्टचा अगदी सुस्थिति होती. तरीहि सरकारी नोकरी की राष्ट्रसभेचें राजकारण, असा प्रश्न येतांच, त्यांनी राष्ट्रसभा सोडून दिली, अनेक वर्षांचें अंगीकृत कार्य सोडून दिलें; आणि सरकारी नाराजी ओढवून घेण्याची आपत्ति टाळली.

## सर्वस्वाचा होम

राष्ट्रीय अस्मितेचें पोषण अशाने कसें होणार ? मानवी चित्तांतील अहंचा पोष, त्यासाठी सर्वस्वाचा होम करण्यासाठी जेव्हा मनुष्य सिद्ध होतो, तेव्हाच होतो. विष्णुशास्त्री यांनी स्वत्वाची जागृति केली असें म्हटलें म्हणजे कोणी विचारतात की, त्या आधीच्या नेत्यांना स्वत्वाचा, या देशाचा, त्याच्या प्राचीन परंपरेचा अभि-मान नव्हता काय ? निश्चित होता. त्याच अभिमानाने प्रेरित होऊन तेलंगांनी वेबर, लॉरिन्सर यांना उत्तर देणारे प्रबंध लिहिले. रानडे यांचा अभिमानहि जागजागीं प्रगट झालेला आहे; पण तो अभिमान दुबळा आहे. सरकारी वक्रदृष्टि होताच तो निस्तेज होतो. सर्वस्व अर्पणास तो सिद्ध होत नाही. त्यासाठी सिद्ध होणारे आगरकर टिळकांसारखे पुरुष शास्त्रीबुवांच्या परंपरेंत निर्माण झाले. विष्णुशास्त्री यांनी या भूमींत तेज निर्माण केलें, तिला चित्कळेचा स्पर्श घडविला, याचा अर्थ असा आहे.

## काँग्रेस इंग्लंडमध्ये !

राष्ट्रसभेचे संस्थापक ॲलन ह्यूम निवृत्त होण्याची वेळ आली तेव्हाहि हेंच दिसून आलें. १८९१–९२ च्या सुमारास ह्यूमसाहेबांची प्रकृति नीट राहीना. त्यामुळे त्यांनी इंग्लंडला कायम जावयाचें ठरविलें; पण त्यांना एक चिंता होती. राष्ट्रसभेचें – काँग्रेसचें – काय करावयाचें ? पांच-सहा वर्षे त्या तिघा इंग्लिश अधिकाऱ्यांनी गाडीचा मार्ग आखून ती नीट चालवून दाखविल्यानंतरहि, येथले नेमस्त प्रागतिक नेते हा भार पेलण्यास समर्थ आहेत, असें त्यांना वाटेना. त्यामुळे काँग्रेस यापुढे इंग्लंडमध्ये भरवावी असा विचार त्यांनी मांडला. आणि अत्यंत लज्जेची गोष्ट अशी की, १८९२ सालच्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत नेमस्त नेत्यांनी तसा ठरावहि

केला. आपण गेलात तरी चालेल, आम्ही हीं सूत्रें हातीं घेतों, असें म्हणण्याची धमक कोणीं दाखविली नाही. रानडे, तेलंग यांसारखे सरकारी अधिकारी, त्यांनी राष्ट्र-सभा वर्ज्यच केली. आणि इतर जे पुढारी होते ते सरकारी नोकर नसले तरी सरकारी नाराजी ओढवून घेण्याची हिंमत त्यांना नव्हती. काँग्रेसच्या पहिल्या तीन अधिवेशनां-पर्यंत सरकार तिचें कौतुक करीत होतें; पण अलाहाबादच्या चौथ्या अधिवेशनानंतर सर्व चक्र उलटलें. ठिकठिकाणांहून येणाऱ्या प्रतिनिधींना प्रतिबंध करण्याचें धोरण सरकारने स्वीकारलें. राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांकडून चांगल्या वर्तनाबद्दल हमी म्हणून जामीन मागण्यांत येऊं लागले, आणि राष्ट्रसभेला हजर राहणें हें दुर्वर्तन ठरविण्यांत येऊं लागलें. पंजाबमध्ये त्या वर्षीं पांच-सहा हजार लोकांकडून जामीन घेण्यांत आले होते. तेव्हा अशा आगींत, इंग्रज सरकार हेंच आपले त्राते, उद्धारकर्ते, सद्‌गुरु असे मानणारे, त्यांचें राज्य म्हणजे परमेश्वरी कृपा समजणारे, आपलें संरक्षण केलें तर तेच करतील अशी श्रद्धा बाळगणारे नेते, कसें पाऊल टाकणार ?

## ह्यूमसाहेबांचें पत्रक

पण हें एवढ्यांवर भागलें नाही. १८९२ सालीं ह्यूमसाहेबांनी यापुढे लोकांत चळवळ करण्याची कां व कशी आवश्यकता आहे, यासंबंधी चर्चा करणारें एक गुप्त परिपत्रक काढलें व तें राष्ट्रसभेच्या सभासदांकडे पाठविलें. आणि तें ठिकठिका-णच्या कार्यकर्त्यांना पोचविण्याची विनंती त्यांनी केली. पण तेवढीहि हिंमत काँग्रेस-कमिटचांची होईना. या परिपत्रकाची भाषा कडक होती. " देशांत दरिद्र्यामुळे लोक पिचून निघाले आहेत, त्यामुळे तुम्ही निष्काळजी राहिलांत तर त्यांतूनच भडका उडण्याचा संभव आहे, तेव्हा काँग्रेसने यापुढे लोकांत चळवळ केली पाहिजे ", असें ह्यूमसाहेबांनी प्रतिपादन केलें होतें. असलें परिपत्रक प्रसिद्ध करण्यास तर राहोच, पण सभासदांना वांटण्यास सुद्धा राष्ट्रसभेच्या चालकांनी नकार दिला; आणि कांही लोक तर " ह्यूमसाहेब अतिशयोक्ति करीत आहेत, ते पराचा कावळा करीत आहेत, वार्धक्यामुळे त्यांना वेड लागल्यासारखें झालें आहे, " असे म्हणूं लागले. ( ' आधुनिक भारत ' प्रकरण ६ वें ).

मग या पत्रकाचें काय झालें ? आगरकर आणि टिळक यांनी तें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें आणि ह्यूमसाहेबांविषयी तसे निरर्गल प्रलाप काढणाऱ्या लोकांवर कडक टीका केली. आगरकरांनी त्याआधीच लिहून टाकलें होतें की, " राष्ट्रसभा इंग्लंडमध्ये भरवावी असें ह्यूमसाहेबांनी म्हटलें याचें कारण हेंच की, आमच्या कर्तृत्वा-विषयी, देशाभिमानाविषयी व उद्योगपरायणतेविषयी ते अत्यंत निराश झाले होते." हें लिहून त्यांनी पुढे म्हटलें होतें, " अशा स्थितींत आम्हीं हातपाय हलविले नाहीत तर उत्तरोत्तर आमची स्थिति शोचनीय होत जाऊन अखेरीस पर्शियन, ग्रीक व रोमन लोकांप्रमाणे भारतीयांस नामशेष व्हावें लागेल. " आणि ह्यूमसाहेबांनी काढलेल्या परिपत्रकाची राष्ट्रसभेच्या नेत्यांनी वर सांगितल्याप्रमाणे जेव्हा संभावना केली

तेव्हा तर ते फारच संतापले. ते म्हणाले की, "हिंदुस्थानच्या व इंग्लंडच्या खऱ्या हितचिंतकांवर अशा रीतीने उलटून पडणें हें आम्हा भेकड, लोभी, अविचारी व स्वार्थी हिंदु लोकांशिवाय कोणाच्यानेहि होण्यासारखें कर्म नाही. ह्यूमसाहेबांसारखी आमची आम्हांस काळजी असती, तर राजद्रोहाचा किंवा दुसरा कसलाहि आरोप आपणांवर आणून घेण्यास व त्याचे परिणाम साहण्यास आम्ही तयार झालों असतों. पण इतकें धैर्य आमच्या अंगीं असतें तर आमची सांप्रतची दास्यावस्था आम्हांस कोठून प्राप्त झाली असती !"

## श्रमविभाग

लो. टिळकांनी त्या पुढाऱ्यांवर अशीच टीका केली आहे. ते म्हणतात, "काँग्रेस-च्या कार्यास धक्का येऊं नये एवढ्यासाठी तरी हें सर्क्युलर प्रसिद्ध होणें इष्ट नाही," असा कित्येक शाहण्या लोकांनी तर्क काढला आहे. आपला भित्रेपणा कसा झाकावा हें आम्ही फार चांगलें शिकलों आहों. राष्ट्रहितासाठी झटून कळकळीने व स्वार्थाकडे लक्ष न देतां मेहनत करण्याचा मक्ता आम्ही ह्यूमसाहेबांवर सोपविला आहे. त्याने खुशाल मेहनत करावी व एखाद्या वेळीं कडक सर्क्युलर काढलें तर आम्ही त्याचा भिऊन निषेध करावा, असा त्याचा आमचा श्रमविभाग झाला आहे ! अशाने काँग्रेस ह्यूमसाहेबांच्या मागे कशी चालेल, याची आम्हांलाहि मोठी काळजी वाटतें."

## पुढाऱ्यांची माघार

यासंबंधी विवेचन करतांना पुढे लाला लजपतराय यांनी नेमस्त प्रागतिक नेत्यांविषयी हेंच मत दिलें आहे. ते म्हणतात, "इंग्लंडांतील चळवळ पैशाच्या अभावीं फसली आणि हिंदुस्थानांतील चळवळ चिकाटी, जोम, आणि कळकळ यांच्या अभावीं ढासळली. या बाबतींत आमचें असें मत आहे की, ह्यूमसाहेबांनी पुढे जें धोरण स्वीकारलें तें स्वतःच्या बुद्धीच्या निर्णयानुसार स्वीकारलें नसून तें स्वीकारण्यास हिंदी पुढाऱ्यांची भीति व अंगचुकारपणा यांचा त्यांच्या मनावर झालेला परिणाम हाच त्यास कारण झाला असावा. हिंदी पुढाऱ्यांनी आपलीं हत्यारें खाली ठेवलीं नसतीं तर देशाने त्यांना पैशाचा पुरवठा केला असता, आणि त्यांच्या निशाणाखाली राष्ट्र गोळा झालें असतें. सरकारने ही चळवळ कदाचित् दडपून टाकली असती, पण तोच मोठा विजय ठरला असता. आणि १९०९ सालीं जें मिळालें तें कदाचित् दहा-वीस वर्षें आधी मिळालें असतें. पण हिंदी पुढाऱ्यांना वाटलें की, आपल्या अंगीं पुरेसें सामर्थ्य नाही, म्हणून त्यांनी माघार घेतली व हें नवें राजकीय हत्यार फेकून दिलें."(कित्ता).

## सर्वस्वत्यागाची परंपरा

विष्णुशास्त्री यांनी एक निराळी पीठिका, निराळी परंपरा निर्माण केली म्हणजे काय तें यावरून ध्यानांत येईल. क्रांतीच्या आधी क्रांतीचें एक तत्त्वज्ञान सिद्ध होत असतें. दलित, पीडित जनतेंत त्यामुळे प्रतिकारशक्ति निर्माण होते. अस्मितेची जाणीव याचा हाच अर्थ आहे. माझा आत्मा व परमात्मा एकच आहेत, मी परब्रह्मच

आहे ही जाणीव जशी केवळ बौद्धिक असून चालत नाही, ती अनुभूति असावी लागते त्याचप्रमाणे राष्ट्रीय अस्मितेची जाणीव केवळ बौद्धिक असून चालत नाही. ती रक्तांत भिनून मनुष्य जेव्हा अन्याय, जुलूम, पारतंत्र्य, गुलामगिरी यांच्या प्रतिकारासाठी, आणि त्याला अवश्य असणाऱ्या सर्वस्वत्यागासाठी सिद्ध होतो तेव्हाच त्याचें स्वत्व जागृत आहे, त्याला 'स्व'चा अभिमान आहे. असें म्हणतां येईल. हा अभिमान कोण निर्माण करूं शकेल ? सर्वस्वाचा होम करण्यास जो स्वतः सिद्ध झाला आहे त्यालाच हें सामर्थ्य आहे. हें सामर्थ्य विष्णुशास्त्र्यांच्या ठायीं होतें. म्हणून त्या परंपरेंतले लोकनेते जे लो. टिळक त्यांच्या वर्चस्वाखाली जेव्हा कॉंग्रेस आली तेव्हाच ती जिवंत झाली. तोंपर्यंत म्हणजे १८९० नंतरचीं दहा-पंधरा वर्षें तिला एखाद्या वार्षिक संमेलनाचें रूप आलें होतें. कारण तिच्या नेत्यांची संघर्षाची तयारी नव्हती. त्यांचें तत्त्वज्ञानच त्याच्या विरुद्ध होतें. इंग्रजी राज्य ईश्वरी प्रसाद आहे, असें त्यांना वाटत होतें. म्हणून त्यांच्यालेखीं चळवळ याचा अर्थ येथलीं गाऱ्हाणीं इंग्रजांच्या कानावर घालणें, त्यांना समजावून देणें, पटवून देणें एवढाच होता. यालाच टिळक अर्ज-विनंत्यांचें राजकारण असें म्हणत असत. त्या राजकारणांत अस्मितेचा प्रश्न येतच नाही. स्वत्व आणि अस्मिता यांचा लोपच तेथे अभिप्रेत असतो. अर्ज, विनंती यांत हा लोप गृहीतच धरलेला असतो. रानडे, दादाभाई, गोखले 'इंग्रजी राज्य म्हणजे ईश्वरी कृपा' मानीत होते; पण इंग्रज अधिकारी, ते व त्यांच्या मागची स्वत्वहीन जनता यांच्याबद्दल, काय म्हणत असत ? मॅक्स ओरलचें वाक्य मागे दिलेंच आहे. "तीस कोटि लोक इग्रजांचे जोडे पुसण्यांत धन्यता मानतात !" याला विष्णुशास्त्री यांनी उत्तर दिलें, "आम्ही जोडे पुशीत नाही. त्या पादत्राणांचा आम्ही निराळा उपयोग करतों !"

- ५ -

# तेजोवलयाचा भेद

### तेजोवलय

स्वत्वजागृतीसाठी ज्याप्रमाणे भारताची प्राचीन परंपरा व संकृति यांचें उज्ज्वल रूप लोकांना दाखविणें आवश्यक होतें, त्याचप्रमाणे ब्रिटिशांचें राज्य, ब्रिटिश राज्यकर्ते, त्यांचा धर्म, त्यांची नीति, यांच्याभोवतीं जें एक दैवी तेजोवलय येथील जनतेच्या भाबडेपणामुळे, अज्ञानामुळे, पुराणकल्पनांमुळे निर्माण झालें होतें तें फाडून काढून त्यांचें वास्तव रूप लोकांना दाखविणें हेंहि आवश्यक होतें. स्पॅनिश वीर कोर्टीझ याने सोळाव्या शतकांत मेक्सिको देश जिंकला तेव्हा तेथील मेक्सिकन भोळेभाबडे व अज्ञानग्रस्त होते. त्यांनी घोडा हा प्राणी पूर्वी पाहिलाच नव्हता. त्यामुळे घोड्यावर बसलेला माणूस हा पुराणांत वर्णिलेला कोणी दैवी पुरुषच आहे, असें त्यांना वाटलें. कोर्टीझनेहि तशा वदंता मुद्दाम पसरून देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे ते नरमांसभक्षक क्रूर अझटेक जमातीचे लोक एकदम लुळे पडले. त्यांचा प्रतिकार संपला; आणि स्पॅनिश लोकांच्या पायाशीं ते शरण आले. हिंदुस्थानांतील लोकांनी इतक्या हीन पातळीवरची शरणागति पतकरली नाही हें खरें; पण इंग्रजांना परमेश्वराने धाडलें आहे, आमच्या उद्धारासाठी धाडलें आहे, असें येथले बुद्धिमंतांचे, पंडितांचे अग्रणीहि म्हणूं लागले होते. १८५७ च्या बंडाच्या वेळीं 'संवाद-भास्कर' या कलकत्त्याच्या पत्राने, "ब्रिटिश राज्य हें रामराज्य आहे, रामाला सेतु बांधण्यासाठी खारींनी सुद्धा मदत केली होती, तशी आपण ब्रिटिशांना केली पाहिजे," असा उपदेश लोकांना केला होता. इंग्रज म्हणजे रामाच्या काळचीं वानरें असून, कलियुगांत तुमचें राज्य होईल, असा सीतेने त्यांना वर दिला होता, अशी पुराण कथा आम्हीं आमच्या लहानपणीं ऐकलेली आहे. तेव्हा इंग्रजी राज्यकर्त्यांच्या मुखा-भोवतीचें हें दैवी प्रभामंडल वितळवून टाकणें फ़ारच अवश्य होतें. कारण त्याच्या

प्रभावाखाली हिंदी लोक दडपून गेले होते. आपण दासच होण्याच्या लायकीचे आहों, सुज्ञांनी इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करूं नये, अशी त्यांची भावना झाली होती. अशी ही आत्मनि अवज्ञा असतांना, हा हीनगंड रुतून बसलेला असतांना त्या राज-सत्तेला प्रतिकार करण्याची कल्पना त्यांच्या स्वप्नांत सुद्धा येण्याची शक्यता नव्हती. म्हणून अगदी परखड शब्दांत विष्णुशास्त्री यांनी ब्रिटिशांची स्वार्थी राजनीति, लुटारू कारभार, ढोंगी, आपमतलबी धर्म, त्यांचें मायिक बोलणें यांचें रूप स्पष्ट करून त्यांच्यावरची भोळ्या जनतेची श्रद्धा छेदून टाकली.

## वास्तव रूप

'आमच्या देशाची स्थिति' हा प्रबंध लिहिण्यामागे हाच प्रधान हेतु होता असें दिसतें. आमच्या राज्यकर्त्यांची स्थिति, एतद्देशीय राजेरजवाड्यांची स्थिति आणि सामान्य लोकांची स्थिति असे याचे तीन भाग आहेत. या तीनहि भागांत उद्दिष्ट एकच आहे – इंग्रज राज्यकर्त्यांचें वास्तव रूप हिंदी लोकांना दाखविणें !

इंग्रज राज्यकर्त्यांचा विचार करतांना, ते ख्रिश्चनधर्मी आहेत, तेव्हा ते त्या धर्मांतील तत्त्वांप्रमाणे कितपत वागतात, नीतीचीं जीं सर्वमान्य तत्त्वें आहेत त्यांचें ते पालन करतात की नाही, आणि राज्यकर्त्यांची जी अगदी प्राथमिक व्यवहारदृष्टि, ती तरी त्यांना आहे की नाही, असे प्रश्न विष्णुशास्त्री यांनी उपस्थित केले आहेत. यांचीं उत्तरें काय असतील तें निबंध न वाचतांच समजण्याजोगें आहे. या सर्व प्रबंधाची रचनाच शास्त्रीबुवांनी अशी केली आहे की, प्रत्येक विभागाच्या प्रारंभींच त्याचा भावार्थ स्पष्ट व्हावा. इंग्रज राज्यकर्त्यांचें विष्णुशास्त्री यांनी दाखविलेलें रूप पाहा.

## येशूचे अनुयायी

इंग्रज सत्ताधारी हे ख्रिश्चन आहेत. आमच्याच खजिन्यांतून दरसाल लाखो रुपये उठवून मिशनऱ्यांकरवीं ते गांवोगावीं, रस्तोरस्तीं, सद्धर्माचा प्रकाश पाडीत आहेत. तेव्हा ते येशूमहाराजांचे परम भक्त आहेत हें कोणालाहि दिसणार आहे. आता ही ख्रिस्तभक्ति आणि गेल्या शभर वर्षांतला कारभार यांत कितपत मेळ आहे हें कोणाला सांगायला नकोच. जो कोणी पवित्र शास्त्रांतील येशूचें चरित्र आणि क्लाइव्ह, हेस्टिंग्ज, टेंपल, डलहौसी या चतुष्टयाची चरित्रावलि वाचील त्यास वरील मंडळींची ख्रिस्तलोकीं काय संभावना होण्यासारखी आहे, हें समजण्यास फार आयास पडतील असें नाही. दया, क्षमा, सत्त्वभाव हीं ख्रिस्ती धर्माचीं तत्त्वें आहेत, असें शुभवर्तमानांत सांगितलें आहे. इंग्रजांचें वर्तन त्यांस अनुसरून आहे काय ? परमुलखावर जाऊन धाड घाला, ज्यांनी सालसपणें तुम्हांला आश्रय दिला त्यांच्यावर उलटून अरेरावी करा, खोट्या सह्या करा, दुसऱ्यांच्या बायका उपटा, दिवसाढवळ्या दरवडे घाला, वाटेल त्यास उचलून फाशी द्या, असा उपदेश शुभवर्तमानांत आढळत नाही ! तेव्हा लिटन, टेंपल ( एक त्या वेळचे व्हाइसरॉय, एक गव्हर्नर )

यांना ख्रिस्ताच्या शिष्यांत सामील करणें म्हणजे 'वेषधारी लांडग्या'स मेंढ्यांत सामील करणें किंवा डंकनरोडवासी अखंड सुवासिनींचे 'सीता-मंदोदरी-तारा' या वर्गांत परिगणन करण्यासारखेंच आहे.

## भामटे

या ठिकाणीं सिडने स्मिथ याचें एक अवतरण शास्त्रीबुवांनी दिलें आहे. आपला युक्तिवाद मांडतांना विष्णुशास्त्री यांनी हें मुद्दामच धोरण ठेवलें होतें, असें दिसतें. भारताची प्राचीन परंपरा, त्याचें तत्त्वज्ञान, त्याची संस्कृत विद्या यांचें गुणगान करणाऱ्या पाश्चात्त्य पंडितांचे उतारे द्यावयाचे; आणि ख्रिश्चन धर्म, इंग्रजी राजनीति, यांचें रूप स्पष्ट करण्यासाठीहि पाश्चात्त्य व विशेषतः इंग्रज पंडितांचेच उतारे द्यावयाचे. यामुळे इंग्रज राज्यकर्ते व मिशनरी यांचे दात त्यांच्याच घशांत घातल्यासारखे होऊन येथल्या जनतेचे डोळे उघडणें सुलभ झालें. सिडने स्मिथ म्हणतो, "तुम्ही वन्य जमातींना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देऊं पाहत असाल तर प्रथम तुमचें बायबल जाळून टाकणें अवश्य आहे. कारण त्यावरून पाहतां तुम्ही ख्रिश्चन नसून भामटे आहांत, हें त्यांना कळून येईल." एडमंड बर्कहि एकदा म्हणाला होता की, "आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून इंग्रज पुढे आले की ख्रिश्चन धर्माला तिलांजलि देतात." इंग्रज ख्रिस्ती धर्माचें आचरण करतात तें असे!

## प्रजाभक्षक

नीतीच्या दृष्टीने तरी काय आहे? राजा हा प्रजेचा रक्षणकर्ता असावा, त्याने तिला सुमार्गाला लावावें, देश समृद्ध करावा, हीं सामान्यपणें सर्व जगांत नीतितत्त्वें आहेत. ही जबाबदारी न घेतां जो केवळ सुखोपभोगाची अपेक्षा करील तो राजा प्रजारक्षक नसून प्रजाभक्षक होय. आम्हांस लिहिण्यास दिलगिरी वाटते की, प्रभुत्वाचीं खरीं लक्षणें आमच्या राज्यकर्त्यांच्या ठायीं विरलतेनेच आढळतात. प्रारंभीचे राज्यकर्ते अल्फिष्टन, बेंटिक यांची नीति श्रेष्ठ होती. ती मंडळी कोणीकडे आणि खुद्द कलेक्टरास, दुष्काळांत लोक मरत आहेत, असा नुसता अहवाल दिल्याबद्दल तावडतोब अर्धचंद्र देणारे व लक्षावधि प्रजा मरणाच्या दारीं बसली असतां दिल्लीस दिवा लावणारे बीकन्सफील्डप्रमुख महापंचायतन कोणीकडे! आमच्या राज्यकर्त्यांचें एकच सूत्र आहे. जेणेंकरून गोऱ्या लोकांच्या पोतड्या भरतील तो कायदा. त्यामुळे पूर्वीची तिस्मारखानी व पेंढारशाही पुरवली, पण इंग्रजी चरक फार भयंकर असें सर्वांस वाटूं लागलें आहे. के. सी. एस्. आय्. या किताबाचें विष्णुशास्त्री यांनी (क. स. ई.) असें मराठी रूप केलें आहे.

व्यावहारिक राजनीतीच्या दृष्टीने पाहिलें तरी इंग्रज राज्यकर्ता नालायकच दिसतो. हिंदुस्थान ही सोन्याचीं अंडीं घालणारी हंसी त्याला मिळाली खरी; पण तिच्या पोटांतलीं सर्व अंडीं एकदम मिळवावीं अशी हाव त्याला सुटली असून, तो तिच्या गळ्यावर सुरी फिरवीत आहे. मागे पेंढाऱ्यांच्या राज्यांत लुटालुटीचें वादळ

शांत झाल्यावर गावांतून पळून गेलेले लोक परत येऊन सुखाने कांही काळ तरी राहत असत; पण आमच्या टेंपलसाहेबांनी आपल्या हिंदी प्रजेला परलोकचे दरवाजे खुले करून दिले आहेत ! अशा रीतीने सर्व प्रजा उत्सन्न झाल्यावर सर्व जमीन जरी सरकारने घशांत घातली तरी त्याला काय किफायत आहे ! अशा धोरणाने होईल काय ? जें राष्ट्र इंग्लिश लोकांचे पाय येथे लागण्यापूर्वी लक्ष्मी, सरस्वती, अन्नपूर्णा, वीरश्री इत्यादिकांनी युक्त होतें तेथे सारी नासाडी करून साहाराचें वाळवंट करून सोडलें, ही परम देदीप्यमान कीर्ति आमच्या श्वेतद्वीपीय बंधूंच्या वांटचास येऊन तिचा ध्वज यावच्चंद्र दिवाकरौ फडकत राहील.

### ख्रिश्चन नीतितत्त्वें ?

प्रत्यक्षांत आचरण असें पेंढाऱ्यांचें, लुटारूंचें, दरोडेखोरांचें असतांना स्वतः-च्या धर्मांतील नीतितत्त्वांचा अभिमान मात्र आमच्या राज्यकर्त्यांना मोठा जाज्वल्य आहे. तो इतका की, हीं उदात्त नीतितत्त्वें जगांत ख्रिश्चन धर्मानेच प्रथम सांगितलीं अशी शेखी ते मिरवितात. पण हें तरी खरें आहे काय ? इंग्रज पंडितच काय म्हणतात तें पाहा. सुप्रसिद्ध इतिहासकार बकल म्हणतो, "नव्या करारांत एकहि नीतितत्त्व असें नाही, की जें पूर्वीच्या धर्महीन (पेगन-अख्रिश्चन) लोकांनी सांगि-तलें नव्हतें. बायबलमधील अनेक सुंदर वचनें म्हणजे पूर्वीच्या पेगन ग्रंथ-लेखकांचीं अवतरणें आहेत. यांत ख्रिश्चन धर्माला दूषण नसून भूषणच आहे. भिन्न युगांतील मानवांचीं नीतितत्त्वेंच आपण सांगतों हा गौरवच आहे, पण पूर्वी अज्ञात असलेलीं नीतितत्त्वें ख्रिश्चन धर्म सांगतो, असें जर कोणी म्हणत असेल, तर तो एक तर अज्ञ आहे किंवा लुच्चा तरी आहे." बकलच्या या उताऱ्याच्या जोडीला विष्णुशास्त्री यांनी प्रसिद्ध फ्रेंच तत्त्ववेत्ता व्हाल्टेअर याचा उतारा दिला आहे. तो म्हणतो, "अरे इतिहासपंडिता, तूं हें काय सांगत आहेस ? ख्रिश्चनच फक्त नीतिमान होते आणि पेगनांना नीति माहीतच नव्हती ? मग सॉक्रेटीस, चारोंडस, सिसेरो, एपिक्टेटस् आणि मार्कस् ऑलियस यांचें काय ?"

### कृतघ्नता

इंग्रज राज्यकर्ते व मिशनरी यांचें असें वस्त्रहरण केल्यानंतर विष्णुशास्त्री यांनी आपल्या काळच्या राजेरजवाडचांचें, संस्थानिकांचें वर्णन केलें आहे. त्यांचें सध्याचें दैन्य, लाचारी, हांजीखोर वृत्ति, नादानी, नालायकी यांचें त्यांनी वर्णन केलेंच आहे; पण त्याच्या आधी मराठ्यांच्या काळांत महादजी शिंदे, यशवंतराव होळकर हे राजे, सरदार कसे पराक्रमी होते आणि इंग्रजच त्यांच्यापुढे दर वेळीं कसे नामोहरम होत असत, हें प्रथम सविस्तर सांगितलें आहे. कारण तोच त्यांचा प्रतिपाद्य विषय आहे. इंग्रज हा अजिंक्य नाही, दुर्जय नाही. त्याच्या ठायीं दैवी सामर्थ्य मुळीच नाही. त्याचा धर्म म्हणजे कांही अलौकिक आहे असें नाही. तो तुमच्या-आमच्या-सारखा सामान्य माणूस आहे. राग, लोभ, मोह, स्वार्थ, अनीति, असत्य यांना तो

इतर माणसासारखाच बळी पडतो. हें शास्त्रीबुवांना नाना प्रकारे स्पष्ट करावयाचें होतें. त्यामुळे या निबंधांत आणि अन्यत्रहि हे इंग्रज पूर्वी रुमालाने हात बांधून शिवाजी, पेशवे, शिंदे, होळकर यांच्यापुढे उभे असत, याचा ते वारंवार निर्देश करतात; आणि या आपल्या पूर्वीच्या आश्रयदात्यांवरच आता ते कृतघ्नपणाने उलटले आहेत, हें पुनः पुन्हा नजरेस आणतात.

**खराटा**

सामान्य जनांची स्थिति वर्णितांनाहि त्यांनी याच हेतूने रचना केली आहे. हिंदुस्थानांतील सामान्यजनांची स्थिति वर्णितांना त्यांनी इंग्लंडमधील सामान्य जन व हिंदी सामान्य जन यांची तुलना केली आहे; आणि आम्हांला लुटून, आमचा रक्तशोष करून पुष्ट झालेले ते लोक पाहा व आमचे मरण-पंथाला लागलेले, त्यांनी त्या पंथाला लावलेले लोक पाहा, असें ते सांगत आहेत. तेव्हा तात्पर्य काय की, या गोऱ्या बादशाहीची जिकडे जिकडे स्वारी फिरली तेथे तेथे तिजबरोबर खराटा फिरत चालला आहे. 'आमच्या देशाची स्थिति' ही अशी आहे.

**पाश्चात्त्यांच्याच आधाराने**

'इंग्रजी भाषा' या निबंधांत विष्णुशास्त्री यांनी असाच पाश्चात्त्य पंडितांच्या आधारे, पाश्चात्त्यांचें सत्य स्वरूप उघड करण्याच्या प्रयत्न केला आहे. या निबंधाचा मूळ विषय तो नव्हे, पण विष्णुशास्त्री यांच्या लेखणीचा कायमचाच तो विषय आहे. ते कोणत्याहि विषयावर लिहीत असले तरी हिंदी लोकांचें स्वत्व जागृत करणें, त्यांची अस्मिता प्रबळ करणें, त्यांचा स्वाभिमान चेतविणें आणि त्याचबरोबर त्यांचा तेजोभंग करण्याचा अहर्निश प्रयत्न करणारे जे मिशनरी, राज्यकर्ते आणि पाश्चात्त्य पंडित त्यांचा मुखभंग करणें, हेंच त्यांचें उद्दिष्ट असे. इंग्रजी भाषेच्या वृत्तान्तांत इंग्रज इतिहासकार सहजच येतात. तेव्हा ती संधि साधून त्यांनी त्या पंडितांपैकी कांहींनी आपल्याच बांधवांवर जी प्रखर टीका केली होती, तीच वरील तीन धूर्तांच्या तोंडावर फेकली नसती तरच नवल झालें असतें.

पाश्चात्त्यांच्या मनांत इकडील लोकांविषयी ज्या वृत्ति वागत असतात त्यांचें दूषण तिकडीलच एका नामांकित ग्रंथकाराने किती तीव्रतेने केलें आहे पाहा — अशी प्रस्तावना करून त्यांनी ऑकले नांवाच्या इतिहासकाराचा उतारा दिला आहे. तो म्हणतो, पूर्वेकडच्या देशांना ज्ञानकिरण परमेश्वर देतो तसे तो आपल्याला देत नाही: पण 'जगापेक्षा आपण जास्त शहाणे आहों' असा भ्रांत अहंभाव आपल्या ठायीं निर्मून त्याने त्या उणिवेची भरपाई केलेली आहे. ही भ्रांति मोठी सुखद असते; आणि ती नष्ट करून अशा लोकांचे डोळे उघडणें म्हणजे मोठें क्रूर कृत्यच आहे; पण केव्हा केव्हा त्यांना त्यांचें सत्य स्वरूप दाखवावें लागतें. पौर्वात्यांना रानटी, वन्य, समजून त्यांना तुच्छ लेखणें हा केवळ मूर्खपणा होय. क्वचित् एखादे वेळीं आपल्याला चांगला शोध लागला की आपण मोठा आत्मगौरव करतो. पण पूर्वेकडे तीन हजार

वर्षांपूर्वीच तो ज्ञात असतो. वास्तविक आपलें जें थोडें तुटपुंजें ज्ञान आहे तें सर्व आपण पूर्वेकडून घेतलें आहे. प्रथम पूर्वेकडून तें ग्रीकांनी मिळविलें, नंतर रोमनांनी आणि त्यापुढील शतकांत हीं दोन्ही राष्ट्रें तमोयुगांत गेल्यावर आरबांनी तेंच ज्ञान युरोपला परत दिलें. तेव्हा आपण जास्त बुद्धिमान् आहों, जास्त उद्योगी आहों, असें मानणें हा कमालीचा उद्दामपणा आहे. अगदी उद्दाम असा गर्व आहे.

अशा या गर्वाला प्रथम तसल्याच गर्वाने उत्तर देणें हें अवश्य होतें. गर्व या निबंधांत सविस्तर विवेचन करून विष्णुशास्त्री यांनी हा विचार फार चांगल्या रीतीने मांडला आहे. ते म्हणतात, आपली खरी योग्यता लोकांत कमी करण्याचा जो यत्न करील त्याशीं गर्वाची वागणूकहि समजदार मनुष्यास करावी लागते. तसें तो न करील तर आपल्या अंगच्या खऱ्या योग्यतेचाहि नाश व्हावयाचा. याचा उत्कृष्ट प्रत्यय सध्या आमच्या देशांतच येत आहे. असें म्हणून शास्त्रीबुवांनी इंग्रज मिशनरी, इंग्रज ग्रंथकार व इंग्रज शिक्षक यांनी आम्हांस मतिमंद, कर्तृत्वशून्य व अत्यंत नीच असे क्षुद्र प्राणी ठरविण्याचा जो प्रयत्न चालविला होता त्याचें वर्णन केलें आहे.

## विसाव्या शतकांतहि

फेब्रुवारी १९६८ च्या 'रीडर्स डायजेस्ट'मध्ये अमेरिकेंतील 'टाइम'मधील एक लेख संक्षिप्त करून दिला आहे. तो लेखक म्हणतो, " भ्रष्टाचार, लाचलुचपत, अप्रामाणिकपणा, ही पौर्वात्य देशांची परंपराच आहे. करप्शन हा शब्द फक्त पाश्चात्त्य आहे; पण त्याचा आशय सगळा पूर्वेंतच आहे. आता सिसिलींतील 'माफिया' आणि फ्रान्समधील वसुली अधिकारी, असलीं उदाहरणें पश्चिमेंत आहेत; पण ते अपवाद होत. पूर्वेकडे तो नियम आहे. त्यांची परंपराच ती आहे. ख्रिश्चन धर्मांत ज्याप्रमाणे भ्रष्टाचार, पाप यांचा अधिक्षेप, निषेध केलेला आढळतो त्याप्रमाणे एकाहि पौर्वात्य धर्मांत आढळत नाही. "

आज अमेरिका, फ्रान्स, इटली येथील भ्रष्टाचाराचीं, स्वैराचाराचीं, गुन्हेगारीचीं, मादक व्यसनांचीं, अनाचाराचीं जीं वर्णनें 'रीडर्स डायजेस्ट'मध्येच येतात आणि जीं तिकडील लेखकांनीच केलेलीं असतात, तीं वाचलीं की अंगावर काटा उभा राहतो आणि मानवाच्या एकंदर संस्कृतीविषीयीच चिंता वाटूं लागते. असें असतांना अमेरिकेंतलाच एक लेखक पौर्वात्य देश नियमाने अनाचारी असून पश्चिमेंत तो अपवाद आहे, असें सांगण्याचें धाडस करतो, आणि पौर्वात्य धर्म-ग्रंथांचा गेलीं शंभर वर्षें पश्चिमेंत सतत अभ्यास चालू असतांना त्या धर्मांत अनाचाराचा निषेधच केलेला नाही, असें लिहितो तेव्हा, अज्ञानभ्रांती मनुष्याला किती किळसवाणा मद चढविते, तें दिसून येतें. ही आजची, विसाव्या शतकाच्या आठव्या दशकांतली स्थिति; मग शंभर वर्षांपूर्वी शस्त्रबलाने रणांत पाश्चात्त्यांनी बहुतेक सर्व पूर्व-देश जिंकले असतांना ते किती मदोन्मत्त झाले असतील याची सहज कल्पना येईल.

त्यांच्या त्या उन्मत्ततेचा, पाश्चात्त्य पंडितांच्या ग्रंथांच्याच आधारेच रेच उतरविणें अत्यंत अवश्य आहे असें विष्णुशास्त्री यांनी जाणलें यांतच त्यांची दृष्टि कशी काल भेदी होती याचें प्रमाण मिळतें.

## इंग्रज माणूसच

हा सर्व उद्योग विष्णुशास्त्री यांनी केला यांत त्यांचा हेतु हा होता की, "मनुष्यमात्रांत जे दोष सापडतात त्यांपासून युरोपीय लोक झाले म्हणून ते तरी तिळमात्रहि मुक्त झाले आहेत असें नाही," हें हिंदी जनतेच्या ध्यानांत आणून द्यावें. आणि इंग्रजांनी आपल्याभोवती नखशिखान्त जें गूढ दैवी तेजाचें वलय निर्माण केलें होतें तें भेदून टाकून त्या झगझगाटाने हिंदी लोकांच्या दृष्टीला आलेला दीप नाहीसा करावा. तसें केल्यावांचून त्यांच्या चित्ताला आत्मप्रत्यय आला नसता; आणि आक्रमक ब्रिटिश सत्तेशीं झुंज देण्याचें मनोधैर्य त्यांना लाभलें नसतें.

मात्र असें करतांना पौर्वात्य जनांच्या खऱ्या गुणांविषयी जी अज्ञानभ्रांति पाश्चात्त्य मनावर होती तशीच त्यांच्या गुणांविषयी हिंदी जनांच्या मनावर येऊं नये, याविषयी विष्णुशास्त्री दक्ष होते. ज्या शत्रूशीं आपल्याला मुकाबला करावयाचा आहे त्याच्या गुणसंपदेविषयी आपल्या ठायीं अज्ञान असूं नये, तसें असण्यांत धोका आहे, हा विवेक शास्त्रीबुवांनी केव्हाच सोडला नव्हता. याविषयी ते फार सावध होते. म्हणूनच त्यांनी साक्षेपाने पाश्चात्त्यांचे व विशेषतः इंग्रज राज्यकर्त्यांचे गुणहि अभ्यासले आणि स्वकीयांना त्याचें उत्तम दर्शन घडविलें.

## गुरु कोणत्या अर्थाने ?

लोकहितवादी, रानडे इंग्रजांना आपले गुरु मानीत. विष्णुशास्त्रीहि त्यांना गुरु मानीत. पण या दोन मानण्यांमध्ये जमीन-अस्मानाचें अंतर होतें. इंग्रज हिंदी जनांचें हित चिंतितात, कल्याण करतात, अशी लोकहितवादींची, रानड्यांची श्रद्धा होती. तर विद्येच्या, ज्ञानाच्या दृष्टीने त्यांना गुरु मानावें, पण ती विद्या हस्तगत करून शेवटीं त्यांच्यावर मात करावयाची आहे, हें विसरू नये असें विष्णुशास्त्री सांगत. 'संस्कृत कविता' या लेखांत "इंग्रजी शिक्षणाने आमच्या बुद्धीस जी तीव्रता आली आहे ती आमच्या गुरूंच्याच गर्व-खंडनास अगोदर कारण होईल," असें त्यांनी म्हटलें आहे.

- ६ -

# इंग्रजी विद्येचें वज्र

## आत्मनिरीक्षण

इंग्रज राज्यकर्ते, इंग्रज पंडित, पाश्चात्त्य मिशनरी, यांच्यावर विष्णुशास्त्री यांनी अत्यंत प्रखर व जहरी टीका केलेली असल्यामुळे हे राज्यकर्ते, त्यांची विद्या, त्यांची संस्कृति, यांत त्यांना कसलाहि ग्राह्यांश दिसत नाही, त्या संस्कृतींत भारताला हितकर व म्हणूनच अनुकरणीय असें त्यांना कांहीच आढळत नाही, असा एक गैरसमज त्यांच्याबद्दल झालेला आढळतो. त्यांत आणखी "आमच्या देशाला कांहीहि झालेलें नाही, त्याची नाडी अगदी साफ आहे, त्याला आलेली विपन्नावस्था चक्रनेमिक्रमाने आलेली आहे" असें दोन-तीन ठिकाणीं त्यांनी लिहून ठेविलें असल्यामुळे हा गैरसमज जास्त बळावलेला आहे; पण हा समज अगदी निराधार आहे. 'आमच्या देशाला काहीहि झालेलें नाही' ह्या त्यांच्या विधानाचा आपल्याला पुढे विचार करावयाचा आहे. या त्यांच्या विधानाचा अर्थ, भारताच्या प्राचीन इतिहासांत, परंपरेंत, आक्षेपार्ह, दूषणास्पद, असें त्यांना कांहीच दिसत नाही, असा होतो. यामुळे विष्णुशास्त्री प्राचीन भारतीय संस्कृतीचे अंध अभिमानी आहेत, अंतर्मुख होऊन ते आत्मपरीक्षण करूं शकत नाहीत, असा त्यांच्यावर आरोप येतो. हा आरोप सर्वस्वीं खरा नाही. अंतर्मुख होऊन अनेक वेळा ते कठोरपणें आत्मपरीक्षण करतात, असें दिसतें. तरीहि त्या आक्षेपांत बरेंच तथ्य आहे, हें नाकारतां येणार नाही. इंग्रज पंडित, मिशनरी व राज्यकर्ते यांनी या देशाची अस्मिताच नष्ट करण्याचा जो डाव रचलेला त्यांना दिसत होता त्यामुळे त्यांचा भयंकर संताप होत असे; आणि स्वकीयांचा तेजोभंग होऊं द्यावयाचा नाही अशी प्रतिज्ञा करून ते लेखणी उचलीत असत. अशा वेळीं अनेक ठिकाणीं मिशनरी एका टोकाला ले, तर ते दुसऱ्या टोकाला जात. त्यामुळे त्यांचें आत्मनिरीक्षणाचें सामर्थ्य लुप्त

होत असे. पण असें असलें तरी पाश्चात्त्य संस्कृति, पाश्चात्त्य विद्या यांच्या बाबतींत मात्र त्यांनी आपला विवेक केव्हाहि ढळूं दिलेला नाही; आणि ज्या गुणांमुळे व संस्थांमुळे इंग्रज व युरोपीय लोक वैभवास चढले ते गुण व त्या संस्था यांचा त्यांनी मुक्तकंठाने गौरव केला आहे. त्यांचें अनुकरण केल्यानेच आपली प्रगति शक्य होईल हें त्यांनी अगदी स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. तेव्हा या त्यांच्या मतांचा प्रथम परिचय करून घेऊं; आणि नंतर त्यांच्या आत्मनिरीक्षणशक्तीचा परामर्श घेऊं.

## इंग्रजांचें ऋण

लोकसत्ताक राज्यपद्धति ही पाश्चात्त्य संस्कृतीकडून भारताला मिळालेली सर्वांत मोठी देणगी होय. विष्णुशास्त्री यांना हें पूर्णपणें मान्य असून, विचारस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, लोकमतांविरुद्ध आपलें मत निर्भयपणें मांडण्याचा प्रत्येक व्यक्तीचा हक्क, दुसऱ्याच्या मतांचा आपल्याइतकाच आदर करण्याची पद्धत हीं जीं लोकशाहीचीं मूलभूत तत्त्वें त्यांवर त्यांची दृढ श्रद्धा होती; आणि अशा तऱ्हेचें मानसिक स्वातंत्र्य इंग्रज राज्यकर्त्यांनी हिंदी प्रजेला दिलें याबद्दल त्यांनी अनेक ठिकाणीं कृतज्ञता व्यक्त केली आहे. 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' हा निबंधमालेंतला पहिला निबंध. त्यांतच ते म्हणतात, "वरच्या लिहिण्याने हल्लीच्या राज्यांचा आम्ही द्वेष करतों किंवा त्यांनी आपल्या देशावर जे अपरिमित उपकार केले आहेत किंवा अजूनहि करीत आहेत ते आम्ही जाणीत नाही, असें नाही. आम्हांस तर वाटतें की, असे विचार करण्याची आमच्या अंगीं शक्ति आणून, त्यांचा उल्लेख उघडपणें करण्याची जी मोकळीक आमचें सरकार आम्हांस देत आहे, त्यापरतें औदार्य कोणतेंहि नाही. ते मनांत येऊन वरच्यासारखे लेख लिहितांना कृतघ्नत्वशंकेने लेखणी वरचेवर अडखळते." 'आमच्या देशाची स्थिति' या शेवटच्या निबंधांत हीच कृतज्ञता त्यांनी प्रारंभीं व्यक्त केली आहे. "त्याप्रमाणेच मानसिक स्वातंत्र्य हाहि या काळांत झालेला एक मोठाच लाभ आहे. मानसिक स्वातंत्र्य म्हणजे हवा तसा विचार करण्याची व ते विचार वाग्द्वारा किंवा लेखनद्वारा प्रसिद्ध करण्याची मोकळीक. हल्लीच्या राज्यांत आम्हांस जितकें स्वातंत्र्य आहे तितकें यापूर्वी स्वदेशीय राजांच्या उत्कृष्ट कारकीर्दींतहि कधी नव्हतें." असे धन्यवाद त्यांनी इंग्रज राज्यकर्त्यांना दिले आहेत.

कायद्याने इंग्रज सरकारने विचारस्वातंत्र्य दिलें असलें तरीं प्रत्यक्ष व्यवहारांत दंडेलीने असें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचे प्रकार त्या वेळीं अनेक घडत. त्यांवर टीका करतांना शारीरस्वातंत्र्य म्हणजे हवें तें करण्याची मोकळीक व मनाचें स्वातंत्र्य म्हणजे हवा तसा विचार करण्याची मोकळीक हे दोन्ही मनुष्याचे जन्मसिद्ध हक्क आहेत, असा सिद्धान्त 'गर्व' या निबंधांत विष्णुशास्त्री यांनी मांडला आहे.

## विचारकलह

प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य दिलें की कोणताहि विषय असला तरी त्यावर भिन्न मतें होणारच आणि त्यांतून विचारकलह निर्माण होणारच. या विचारकलहा-

विषयी पुढे आगरकरांनी जीं मतें मांडलीं तींच विष्णुशास्त्री यांनी निबंधमालेंत मांडलीं आहेत; आणि तीं मांडतांना "या जगांत पूर्णावस्थेस पावलेलें असें कांहीच नाही" हा लोकशाहीने गृहीत धरलेला सिद्धान्त स्पष्टपणें मांडला आहे. जे लोक आपले धर्म-ग्रंथ ईश्वरप्रणीत आहेत, अपौरुषेय आहेत, असें मानतात ते हा सिद्धान्त मान्य करीत नाहीत. कारण ते धर्म-ग्रंथ व ते धर्माचार्य प्रमादरहित असतात अशी त्यांची दृढ श्रद्धा असते. अशी श्रद्धा वरील सिद्धान्त कधीच मान्य करणार नाही. विष्णुशास्त्री यांनी तो आवर्जून मांडला आहे. यावरून अंध धर्मश्रद्धेपासून त्यांचें मन मुक्त होतें हेंच दिसून येतें.

## निकोप दृष्टि

'जगांत पूर्ण असें कांहीच नाही' हाच भावार्थ 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत त्यांनी जास्त स्पष्टपणें मांडला आहे. ते म्हणतात, "सत्य हें एकाच राष्ट्राला, एकाच धर्माला, किंवा एकाच पक्षाला अनुसरून असतें असें नाही, तर अशोधित धातूंत जसे सुवर्णरज यदृच्छेने मिसळलेले असतात त्याप्रमाणेच सत्याचीहि गोष्ट होय. त्याचे अंश ज्यांत मिश्रित झाले नाहीत असा प्रायः कोणताहि पक्ष नाही. यास्तव एकाच पक्षाचा दृढ अभिमान धरणें हा दुरभिमान होय."

सत्याविषयी हीच निकोप दृष्टि लोकशाहीला अवश्य असते. विष्णुशास्त्री यांनी हें चांगलें जाणलें असल्यामुळे अगदी प्रारंभापासून "आमच्या विरोधकांनाहि आमच्यावर वाटेल ती टीका करण्याचा पूर्ण अधिकार आहे," असें त्यांनी पुनः पुन्हा सांगितल्याचें आढळतें. निबंधमालेच्या उद्देशाविषयी स्पष्टीकरण करतांना त्यांनी लिहिलें आहे की, "एखाद्या गोष्टीविषयी आम्ही जे अभिप्राय लिहूं ते केवळ सत्य-निरूपणाच्याच उद्देशाने लिहूं, अशी आमची खात्री आहे व आम्ही दुसऱ्यास वाजवी रीतीने नांवें ठेवण्यास ज्याप्रमाणे मागेपुढे पाहणार नाही त्याचप्रमाणे दुसऱ्यांनी आमच्या लेखांविरुद्ध मतें प्रदर्शित केल्यास त्यांत आम्हांस अगदी वाईट वाटणार नाही. अशा रीतीने प्रदर्शित केलेलें मत कदाचित् खोटें ठरेल, पण तरीहि तो मनुष्य प्रशस्तच होय; कारण तसें न केल्यास सत्याचा निवाडा होणार नाही. मिल्टन कवीने म्हटलें आहे की, "चुकलेल्या मतांतूनच खरें मत पुढे निघतें" यास्तव आम्ही पुन्हा एकदा सर्वांस सांगतों की, "आमच्या विरुद्ध जर कोणाचे अभिप्राय असतील तर ते आम्ही मोठ्या प्रेमाने वाचूं व ते लिहिणाराचे आभार मानून आम्हांस सुचेल तें प्रत्युत्तरहि देऊं."

## लोकमताविरुद्ध

विचारस्वातंत्र्याचें तत्त्व मान्य केल्यावर तें स्वातंत्र्य आपल्याइतकेंच दुसऱ्यालाहि असलें पाहिजे, हें मान्य करणें, नव्हे त्याचा आग्रह धरणें हें जसें ओघानेच येतें त्याचप्रमाणे एकंदर लोकमत कितीहि विरुद्ध असलें तरी, त्याची तमा न बाळगतां, आपल्याला जें सत्य वाटेल तें प्रत्येकाने निर्भयपणें सांगितलें पाहिजे, हा उपसिद्धान्तहि

अपरिहार्य होतो. आगरकरांनी हा विचार फार जोरदारपणें मांडला आहे. ते म्हणतात, "जो तो लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल; तर कोणत्याहि समाजाला उन्नतावस्था येणार नाही. इतकेंच नव्हे, तर त्यास उतरती कळा लागून अखेर त्याचा ऱ्हास होईल." शास्त्रीबुवांची लोकमताविषयी हीच वृत्ति होती. मालेच्या पहिल्या वर्षाच्या समारोपाच्या अंकांत त्यांनी म्हटलें आहे की, "आमच्या बुद्धीने जें जें आम्हांस खरें भासलें व ज्याच्या सत्यत्वाविषयी आम्हांस स्वतः संशय उरला नाही तें तें, कितीहि लोकमताविरुद्ध असलें तरी, आम्ही प्रमाणांसहित सादर केलें आणि पुढेंहि निष्पक्षपातीपणाने जो मजकूर आम्हांस खरा वाटेल तो आम्ही अवश्य लिहिणार; मग तो कोणास आवडो, कोणास न आवडो. 'खऱ्यास मरण नाही' ही आमच्या भाषेंतील उत्कृष्ट म्हण आम्हांस सर्वथैव मान्य होय!"

## इंग्रजांचा इतिहास

मुद्रणस्वातंत्र्य हा विचारस्वातंत्र्याचाच एक प्रकार होय; आणि लोकशाहीला प्राणभूत असणारें जें वृत्तपत्र त्याचें अस्तित्व सर्वथा या मुद्रणस्वातंत्र्यावरच अवलंबून असतें. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याइतकाच, विष्णुशास्त्री यांनी मुद्रणस्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे; आणि या बाबतींत देशी वृत्तपत्रांनी, युरोपीय वृत्तपत्रांचे आदर्श पुढे ठेवून, सरकारच्या कृत्यांवर पहारा ठेवण्याचें कार्य निर्भयपणें केलें पाहिजे, असा त्यांना उपदेश केला आहे. या विषयासंबंधीचे लेख केसरीच्या अंकांत आलेले आहेत. (जानेवारी, फेब्रुवारी १८८२) मुद्रणस्वातंत्र्याचें महत्त्व सांगतांना विष्णुशास्त्री म्हणतात, "राजकीय प्रकरणीं जो स्वातंत्र्याचा झेंडा साऱ्या पाश्चात्त्य राष्ट्रांतून आजला उभारलेला आढळतो तो कसा उभारला गेला ही हकीगत समजण्याची ज्यास इच्छा असेल व जयप्राप्ति तरी केवढ्या दारुण व दीर्घकालिक युद्धप्रसंगानंतर झालेली आहे हें ज्यास पुरतेपणीं ध्यानांत आणावयाचें असेल, त्याने युरोपीय राष्ट्रांचा व विशेषतः आमच्या राज्यकर्त्यांचा इतिहास साग्र ऐकून घेणें जरूर आहे. कां की, वरील स्वातंत्र्याबद्दल युरोपांत जशा खटपटी व झटापटी झाल्या तशा इकडे झाल्या नाहीत."

## प्रजासत्ताक

आगरकरांनी विष्णुशास्त्री यांच्यावर लिहिलेल्या मृत्युलेखांत म्हटलें आहे की, "एखाद्या वेळीं त्यांचा कल्पनाविहंग पूर्ण पंख उभारून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखाली सुखाने नांदत आहे असें दिसे." विष्णुशास्त्री यांनी भाषण-मुद्रणस्वातंत्र्याविषयी, वृत्तपत्रांच्या व ग्रंथकारांच्या स्वातंत्र्याविषयी लिहितांना पाश्चात्त्य देशांत यासंबंधी जो संग्राम झाला त्याचें व विशेषतः व्हॉल्टेअरच्या निर्भय लेखनाचें जें अत्यंत आत्मीयतेने वर्णन केलें आहे त्यावरून आगरकरांचे ते उद्‌गार यथार्थ आहेत असें वाटतें. आणि ध्यानांत येतें की, इंग्रज राज्यकर्ते व मिशनरी यांचा जरी ते कडवा द्वेष करीत असले तरी पाश्चात्त्य संस्कृतीचा ते तिळमात्र द्वेष करीत नसत. उलट तेथील व्हॉल्टेअर, गिबन,

बकल यांसारखे जे थोर ग्रंथकार त्यांचा आदर्श पुढे ठेवून त्यांच्यासारखेंच कार्य येथे भारतांत आपण करावयाचें, अशी प्रतिज्ञा करूनच त्यांनी लेखणी उचलली होती.

## पाश्चात्त्य विद्या

पण यापेक्षाहि विष्णुशास्त्री यांचें पाश्चात्त्य संस्कृतीवरचें खरें प्रेम दिसून येतें तें त्यांची लेखणी जेव्हा पाश्चात्य विद्या, पाश्चात्त्य ज्ञान यांचा गौरव करते तेव्हा. भारताचा खरा उद्धार हा पाश्चात्त्य विद्येमुळे, पाश्यात्त्य ज्ञानामुळे होणार आहे याविषयी त्यांच्या मनाची दृढ निश्चिति झाली होती. त्यामुळे निबंधमाला वाचतांना त्यांनी या ज्ञानाचा जणू ध्यास घेतला होता असें पदोपदीं वाटूं लागतें.

शास्त्रीबुवांनी निबंधमाला हें मासिक-पुस्तक काढलें त्याचा हेतु काय ? " ज्या लोकांस विद्यालयांतील. शिक्षणाचा वगैरे लाभ न घडल्याने ज्ञानाचा मार्ग खुला नाही त्यांस अनेक गोष्टींचें ज्ञान व्हावें, हा एक हे निबंध लिहिण्याचा उद्देश आहे. संस्कृत व विशेषतः इंग्रजी भाषेंत जें अगाध ज्ञान भरलें आहे त्याचा पाट फोडून जर आपल्या भाषेकडे वळवितां येईल तर केवढी मजा होईल ! " ' प्रस्तुत मालेचा उद्देश ' या दुसऱ्या निबंधांत विष्णुशास्त्री यांनी आपला हा उद्देश लोकांस कळविला आहे; आणि याच निबंधांत एकंदर मासिक-पुस्तकांचें महत्त्व वर्णितांना त्यांनी इंग्रज लोकांच्या विद्याभिलाषाचें फार कौतुक केलें आहे. " इंग्रजांनी आमची लक्ष्मी जशी लुटून नेली तशी संस्कृत भाषेचा त्यांना शोध लागतांच त्या लक्ष्मीहून अमूल्य अशी विद्याहि लुटून नेली. आणि यापुढे तिचें महापीठ तिकडेच स्थापन होणार, असा अदमास दिसतो. " " मराठी भाषेविषयीहि त्यांनी असाच अचाट उद्योग केला आहे. तो म्हणजे मोल्सवर्थ व कँडी यांनी रचलेला कोश हा होय. हा कोश रचून त्यांनी महाराष्ट्र-भाषेवर जे उपकार करून ठेविले आहेत त्यास पार नाही. " 'वक्तृत्व' या निबंधांतहि त्यांनी हेच उद्‌गार काढले आहेत. " इंग्रज सरकारचा या देशावर सर्वांत मोठा उपकार हाच होय की, ज्ञानाची अमोलिक देणगी त्याने एतद्देशियांस दिली व अद्याप देत आहे. चाळीस वर्षांपूर्वी मेकॉलेने जी नवी पद्धति सुरू केली तिच्यामुळे ही नवी (पाश्चात्त्य) विद्या प्रसार पावून त्यामुळे देशाची स्थिति आजला एकंदर बदलून गेली आहे, असें म्हटलें असतां चालेल. "

' आमच्या देशाची स्थिति ' या निबंधांत आरंभीं आणि शेवटीं मिळून विष्णुशास्त्री यांनी पाश्चात्त्य विद्येचें व ज्ञानाचें स्तोत्रच रचलें आहे असें दिसेल. ते म्हणतात –

## इंग्रजी विद्येचें वज्र

इंग्रजी राज्यापासून आपला मोठा लाभ कोणता झाला ? " मानसिक उन्नति. मानसिक उन्नति म्हणजे देशाभिमान, जात्यभिमान, स्वाभिमान, अनुचित कर्मापासून निवृत्ति, स्वातंत्र्याभिलाषा, दैन्यवर्जन इत्यादिकांविषयी ज्या मानसिक स्थितीपासून स्फूर्ति येते ती." हा लाभ इंग्रेजी राज्यापासून कसा होणार? " या राज्यामुळे पाश्चा-

त्यांची अपूर्व विद्या आपल्या पायांनी चालत आली आहे. आणि विद्येचा संस्कार सामान्यतः वरील उन्नतीस कारणीभूत होतोच. त्यांतून ग्रीक, रोमन, इंग्लिश या विद्यांचा तर वरील प्रभाव स्पष्टच आहे." या प्रकारे त्या विद्येचा गौरव करून युरोप खंडांत ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे युरोपीय लोकांनी केवढी धार्मिक व राजकीय क्रांति केली त्याचें वर्णन मोठ्या तन्मयतेने विष्णुशास्त्री यांनी केलें आहे. आणि शेवटीं तीच क्रांति त्याच शस्त्राने येथे आपण केली पाहिजे हें निःसंदिग्धपणें सांगितलें आहे. ते म्हणतात, "एकंदरींत हें सांगावयाचें की, सज्ञान दशेचें फळ देशोन्नति हें होय. यास्तव आमच्या देशांत जों जों इंग्रेजी विद्येचा प्रसार होत जाईल तों तों सुधारणा, स्वातंत्र्य, सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार. एक इंग्रजी विद्येचें वज्र आमच्या हातांत असलें, म्हणजे मग लिटनशाही, टेंपलशाही, चाटफील्डशाही, मूरशाही वगैरे शंभर शाह्यांस सुद्धा आम्ही दाद देणार नाही."

'आमच्या देशाची स्थिति' या निबंधाच्या अखेरीस पुन्हा असाच ज्ञानाच्या प्रसाराचा महिमा त्यांनी गायिला आहे. हिंदुस्थानचें नष्टचर्य संपविण्यास उत्तम उपाय, त्यांच्या मतें, एकचः लोकांना आत्मस्थितीचें पूर्ण ज्ञान करून देणें. आणि याचें स्पष्टीकरण देतांना आत्मस्थितीचें ज्ञान म्हणजे साऱ्या जगाच्या स्थितीचें ज्ञान, असा खुलासा केला आहे; आणि छापखाने, तारायंत्रें, आगगाड्या या दिव्य अस्त्रांच्या साहाय्याने, कुंभकर्णाप्रमाणे सुस्त होऊन पडलेल्या या देशाला हालहालवून जागे करण्याची तजवीज केली पाहिजे, असें सांगून रसना आणि लेखणी या दोन साधनांचा अवलंब करून हें कार्य साधावें, असा देशबांधवांना त्यांनी उपदेश केला आहे. पाश्चात्त्य विद्या, पाश्चात्त्य ज्ञान यांचा प्रसार हाच देशोन्नतीचा सर्वश्रेष्ठ उपाय होय, असा विष्णुशास्त्री यांचा अभंग विश्वास असल्यामुळेच, ग्रंथकार होणें, नाना विषयांवर ग्रंथ लिहिणें हें त्यांनी आपलें ध्येय ठरविलें होतें; आणि निबंधमालेंतून व 'केसरीं'तून नव्या विद्वानांपुढे तुम्ही ग्रंथ लिहा, ग्रंथ लिहा, असा सारखा घोष चालविला होता.

## ग्रंथ लिहा

अगदी पहिल्याच निबंधांत मराठी भाषेची उपेक्षा केल्याबद्दल नव्या विद्वानांवर टीका करतांना शास्त्रीबुवा म्हणतात, "सध्या इंग्रजी विद्येचा व भाषेचा जो फैलावा लोकांत होत आहे तो आम्हांस अनिष्ट तर वाटत नाहीच, उलट आपल्या मराठीच्या उत्कर्षालाच तो कारण होईल अशी आमची खात्री आहे; पण तसें व्हावयाचें तर इंग्रजींतील केवळ अर्थ मात्र घेऊन त्यास शुद्ध मराठीच्या साच्यांत ओतलें पाहिजे. मात्र इंग्रेजींतील ज्ञानभांडार मराठींत आणतांना आपल्या भाषेचें स्वत्व म्हणजे निराळेंपण कायम राखलें पाहिजे. अशा तऱ्हेचे ग्रंथ बनले असतांना ते भाषेस हितावह होऊन भूषणप्रद होतील." 'प्रस्तुत मालेचा उद्देश' या दुसऱ्या निबंधांतहि ज्ञानाचा प्रसार, पाश्चात्त्य विद्येचा फैलावा आणि त्यासाठी मासिक-

पुस्तकें व ग्रंथ यांची आवश्यकता यासंबंधीच चर्चा आहे; आणि "मराठींत ग्रंथ लिहून आपल्या इंग्रेजी विद्वत्तेस बट्टा आणणें हें तर त्यांस अगदी आवडत नाही" अशी नव्या विद्वानांवर टीका केली आहे. 'इंग्रेजी भाषा' या निबंधांत, इंग्रजी ग्रंथांचें माहात्म्य सांगून, नाना प्रकारच्या विषयांवर हजारो ग्रंथ होऊन ते तिकडे सर्वांस समजूं लागल्याने एकंदर राष्ट्राचे ठायीं अभिज्ञता व ज्ञानाविषयी उत्कंठा आधिकच प्रबळ झाली, असा अभिप्राय मांडला आहे; व प्रसिद्ध इंग्रज लेखक मेकॉले याच्या ग्रंथकर्तृत्वाचा गौरव करून त्याच्या गुणदोषांची चिकित्सा केली आहे. डॉक्टर जॉनसन याच्या चरित्राचा समारोप करतांना, त्याच्या चरित्रावरून एतद्देशियांनी कोणता बोध घ्यावा हें सांगतांना, विष्णुशास्त्री यांनी मराठींत विविध विषयांवर ग्रंथरचना करावी, हाच उपदेश केला आहे; आणि या उद्योगापासून सध्याच्या काळीं धनलाभ होण्याचा संभव नसला तरी केवळ देशहितबुद्धीने हा उद्योग त्यांनी केला पाहिजे, असा आग्रह धरला आहे.

**ग्रंथमाला**

यावरून पाश्चात्त्य संस्कृतींतील मूलभूत तत्त्वांच्या बाबतींत तरी विष्णुशास्त्री दुराग्रही वा अंध नव्हते हें निश्चित म्हणतां येतें. लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, विचार-स्वातंत्र्य, आणि या सर्वाला पायाभूत असणारें ज्ञान, भौतिकविद्या, त्या विषयावरील ग्रंथरचना या पाश्चात्त्य संस्कृतीच्या महत्त्वाच्या घटकांचा आपण स्वीकार केला पाहिजे, असें त्यांनी आग्रहाने सांगितलें आहे. त्या संस्कृतीचे त्यांच्यापुढे उभे असलेले प्रवक्ते म्हणजे जे इंग्रज राज्यकर्ते, इंग्रज पंडित व मिशनरी यांच्याबद्दल त्यांना वाटणारा द्वेष त्यांनी विवेकी रसग्रहणाच्या आड येऊं दिला नाही. निबंधमाला बंद करण्याचें त्यांनी ठरविलें त्या वेळीं ग्रंथमाला सुरू करण्याचा त्यांचा संकल्प होता. या ग्रंथांत त्यांनी ग्रीस, रोम, फ्रान्स, अमेरिका, इंग्लंड यांच्या इतिहासाचेंच विवेचन केलें असतें असें वाटतें. कारण ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे युरोपांत जें महान् परिवर्तन घडून आलें तें त्यांच्या डोळ्यासमोर नित्य असे, असें निबंधमालेवरून वाटतें. तें कसेंहि असो. पाश्चात्त्य संस्कृतीबरोबर जीं मूल्यें भारतांत आलीं त्यांचें त्यांनी मुक्त मनाने स्वागत केलें होतें यांत शंका नाही.

हें निश्चित केल्यानंतर आता प्राचीन भारतीय संस्कृति, येथला धर्म, येथली समाजरचना, येथल्या जुन्या परंपरा यांविषयी विष्णुशास्त्री यांचा दृष्टिकोन काय होता तें पाहावयाचें आहे.

- ७ -

# मनावरचे दोन ताण

## लोकनिर्मिति

ज्यांना आपल्या देशांत लोकसत्ता प्रस्थापित करावयाची आहे त्यांनी प्रथम देशांत लोक निर्माण करणें अवश्य असतें. लोक याचा अर्थ नागरिक असा आहे. जुन्या काळचे प्रजाजन आणि लोकसत्ताकांतले नागरिक यांत फार फरक आहे. प्रजाजनांना व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य यांपैकी कोणतेंच स्वातंत्र्य नसतें. राजा त्यांना जाबबदार नसतो. त्याच्यावर प्रजाजनांचें कसलेंहि नियंत्रण नसतें. सर्वस्वीं अनियंत्रित असा त्याचा कारभार असतो. कायद्याचेंहि नियंत्रण त्याच्यावर नसतें; आणि लोकांनी केलेल्या कायद्यांचें राज्य हें तर लोकशाहीचें प्रधान लक्षण होय. राजांची अनियंत्रित सत्ता ज्यांच्यावर चालते व राजसत्तेचीं अनेक बंधनें ज्यांच्यावर असतात त्यांना नागरिक म्हणतां येणार नाही. शिवाय असें की, अनियंत्रित राजसत्ता जेथे असते तेथे बहुधा अनियंत्रित अशी धर्मसत्ताहि असते; आणि यामुळे अशा समाजांत फार विषमता असते; आणि ही विषमता बहुधा जन्मनिष्ठ असते. सरदार, जहागीरदार, इनामदार, खोत हे आपल्याला उच्च कुळांतले मानतात व सामान्य जनांना हीन लेखतात. असली उच्च-नीचता जेथे असते तेथे लोकसत्तेला अवश्य ते लोक म्हणजे नागरिक निर्माण होऊं शकत नाहीत. विचारस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, मानवत्वाची प्रतिष्ठा हें नागरिकाचें प्रधान लक्षण होय. त्यावांचून तो राजसत्तेवर नियंत्रण ठेवूं शकत नाही. कायद्याने सर्वांना समान हक्क असल्यावांचून नागरिक अन्यायाचा प्रतिकार करूं शकणार नाही. समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, कायद्याचें राज्य हीं तत्त्वें समाजांत सुप्रतिष्ठित असल्यावांचून नागरिक निर्भय होऊं शकत नाही. यामुळेच पाश्चात्त्य देशांत लोकशाहीचा लढा जेथे जेथे झाला तेथे तो प्रथम या तत्त्वांच्या प्रतिष्ठापनेसाठी झाला.

## सर्वांगीण क्रांति

भारतांत ब्रिटिश सत्ता स्थापन होण्यापूर्वी अनेक शतकें सर्वत्र राजसत्ताच होती तिच्या खालच्या पायरीवर सरदार-जहागीरदार, इनामदार, खोत, सरंजामदार यांची सत्ता असे. शिवाय धर्मपीठांची व जात-पंचायतींची अत्यंत अनियंत्रित आणि बेजबाबदार अशी सत्ताहि सर्वत्र होती. या सत्तांमुळे व त्यांनी घातलेल्या आचार-विचारांवरील असंख्य बंधनांमुळे येथल्या सामान्य जनांना कसलीहि प्रतिष्ठा नव्हती. त्यांचें मानवत्वच शून्य झालें होतें. ज्यांचा स्पर्शहि इतरांना चालत नाही त्यांच्या जीवनाला प्रतिष्ठा ती कसली असणार ? असा मनुष्य निर्भय कसा होणार ? तो अन्यायाचा प्रतिकार कसा करणार ? राजसत्तेवर नियंत्रण कसें घालणार ? म्हणजेच त्याला नागरिक ही पदवी कशी प्राप्त होणार ? ही पदवी त्याला प्राप्त व्हावयाची तर धार्मिक, सामाजिक, आर्थिक सर्व प्रकारची क्रांति भारतांत होणें अवश्य होतें. त्यावांचून येथे लोक निर्माण होणें अशक्य होतें.

भारतांत लोकसत्ता यावी अशी आकांक्षा असलेले विष्णुशास्त्री यांची या बाबतींत काय मतें होतीं ? कोणता दृष्टिकोन होता ?

## भूमिका

'वक्तृत्व-पत्रास उत्तर' या लेखांत त्यांनी म्हटलें आहे की, "विद्यमान धर्म अत्यंत दुष्ट असून त्यास अनुसरल्याने आपल्या देशबांधवांचें फार अकल्याण होत आहे असें मनापासून वाटून, तो नष्ट करून टाकून नवा धर्म प्रसृत करण्याचें जर कोणी मनांत आणील व त्याकरिता बुद्धिपुरस्सर, निर्मळ अंतःकरणाने तो झटेल, तर त्याचा अत्यंत द्वेष करणाऱ्या शत्रूसहि त्याची योग्यता वाखाणावी लागेल." पण अशी वृत्ति असूनहि 'चालू हिंदु धर्म नव्या पंथांच्या प्रवर्तकांना जसा केवळ उपहास्य व उच्छेद्य वाटतो. . .तसें आम्हांस बिलकुल वाटत नाही." असेंहि त्याच लेखांत त्यांनी सांगून ठेविलें आहे.

'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत 'हिंदु धर्म हा सुधारणेस बाधक नाही,' असें सांगून अटकेपार जाणारे लष्करांतले शिपाई, इंग्लंडला जाणारा राघोबाचा वकील, जपजाप्य कमी करणारे माधवराव पेशवे, यांचीं उदाहरणें विष्णुशास्त्री यांनी दिलीं आहेत; पण असें असूनहि रूढ, विद्यमान, हिंदु धर्म हिंदुस्थानच्या अवनतीस कारण झाला, हें विष्णुशास्त्री यांना मुळीच मान्य नव्हतें. प्राचीन काळीं आमची सुधारणा झाली त्या वेळीं येथे हाच धर्म होता, तेव्हा तो प्रगतीच्या आड आला नाही, मग आताच कां यावा, असें तें विचारतात.

## विरोध नाही

हिंदु धर्म हा सुधारणेस बाधक नाही, त्या संबंधांत कोणी कोणतेंहि मत मांडलें तरी चालेल, असें विष्णुशास्त्री यांनी म्हटलें असलें तरी प्रार्थनासमाज, ब्राह्मोसमाज, आर्यसमाज यांच्या प्रवर्तकांवर त्यांनी अतिशय उपहासाने टीका केली आहे. याविषयी

कोणीं कांही आक्षेप घेतल्यास या लोकांच्या विसंगत आचरणावर ती टीका आहे, असें ते म्हणत. मूर्तिपूजेचा सभेंत निषेध करून घरीं मूर्तिपूजा करणारे, सभेंत प्रायश्चित्त, व्रतें-वैकल्यें यांचा निषेध करून घरीं तीं आचरणारे, धर्मसुधारणावादी पत्रकावर सह्या घेऊन मागून शरणागति पतकरणारे, समुद्रप्रवासबंदीचा निषेध करून स्वत: ती पाळणारे यांचा ते उपहास करीत असत.

स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, प्रौढविवाह, शूद्र-अतिशूद्र यांची उन्नति, अस्पृश्यता-निवारण, जातिभेदविनाश या सर्वांविषयी शास्त्रीबुवांची अशीच भूमिका आहे. या क्षेत्रांत सुधारणा करूं पाहणारांवर त्यांनी सतत धार धरली आहे. यासंबंधी 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत त्यांनी खुलासा केला आहे. ते म्हणतात, "वरील कोटचांचें आम्हीं जें खंडन केलें आहे त्यावरून कित्येक समंजस मंडळींचें असें अनुमान होईल की, वरील बालविवाहादि प्रकार आम्हांस सर्व प्रकारे मान्य होत व आजपर्यंत जें चालत आलें आहे तें सर्व जसेंच्या तसें ठेवण्याविषयी आमचा आग्रह आहे. वस्तुत: पाहतां वरील मतें काढण्यास बिलकुल आधार नाही. आमचें म्हणणें इतकेंच की आज जी आमची अवस्था झाली आहे तिला ते कारणीभूत आहेत या म्हणण्यांत कांही अर्थ नाही."

## सत्याचा विसर

विष्णुशास्त्री यांचें हें निरनिराळ्या निबंधांतलें प्रतिपादन पाहिलें म्हणजे सामाजिक व धार्मिक क्रांति ही लोकशाहीसाठी अवश्य आहे, याकडे त्यांनी दुर्लक्ष केलें होतें असें दिसतें. ते लोकसत्तावादी होते, प्रजासत्ताक हें त्यांचें स्वप्न होतें, असें आगरकर म्हणतात; आणि विचारस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य यांचा त्यांनीं हिरिरीनें पुरस्कार केला आहे आणि लोकप्रभुत्व व स्वातंत्र्य यांविषयीच्या आकांक्षा प्रकट केल्या आहेत, यांवरून त्याविषयी शंका राहत नाही; पण लोकशाहीला लोकनिर्मिति अवश्य असते. धार्मिक, सामाजिक, जातीय इत्यादि सर्व बंधनांपासून मुक्त असे नागरिक उदयास आल्यावांचून लोकसत्ता सिद्ध होऊं शकत नाही या सत्याचा त्यांना विसर पडला होता, असें म्हणावें लागतें. धार्मिक, सामाजिक रूढि व इतर पीठिका तशाच चालू ठेवाव्या, असा आमचा आग्रह नाही, असें ते म्हणतात. पण लोकशाहीला, प्रगतीला त्यांच्या निर्मूलनाची आवश्यकता नाही असें त्यांना वाटतें. तसें त्यांना वाटत नसतें तर त्यांनी भाषाभिमान, ग्रंथरचना, इतिहाससंशोधन, यांचा जसा हिरिरीने पुरस्कार केला तसा सामाजिक व धार्मिक क्रांतीचाहि केला असता.

## मानव अपूर्ण

लोकशाही, विचारस्वातंत्र्य, लोकमतांविरुद्ध जाण्याचा व्यक्तीचा अधिकार पाश्चात्त्य विद्येची उपासना यांचा पुरस्कार करणाऱ्या पुरुषाने धार्मिक व सामाजिक क्रांतींचें महत्त्व जाणलें नव्हतें, हें जरा विस्मयजनक आहे. पण कोणताहि मानव पूर्ण नाही, हें ध्यानांत घेतलें म्हणजे मनाचा त्रास जरा कमी होतो. गांधीजी लोकशाहीचे

भोक्ते, पुरस्कर्ते होते. व्यक्ति हें अंतिम मूल्य ते मानीत. समता, बंधुता यांचा तर ते पावलोपावलीं उपदेश करीत. तरीहि चातुर्वर्ण्य ही श्रेष्ठ समाजरचना आहे, असें ते म्हणत. "आणि आत्म्याच्या विकासासाठी सहभोजन व मिश्रविवाह यांवर बंदी घालणें अवश्य आहे," असें सांगत. ('यंग इंडिया', ६, १०, २१). या विसंगतीचा अर्थ कसा लावायचा? पंडितजीहि लोकशाहीचे उपासक होते; पण दंडायत्त कम्युनिस्ट देशांवर त्यांचें फार प्रेम. आणि रशिया व चीन आपल्या जवळच्या राष्ट्रांवर प्रत्यहीं आक्रमण करून साम्राज्य-विस्तार करीत आहेत हें डोळ्यांनी ते पाहत असतांनाहि, कम्युनिस्ट राष्ट्रें आक्रमक असणें शक्य नाही, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. यामुळे चीनविषयी ते गाफील राहिले इतकेंच नव्हे, तर त्याने आक्रमण केल्यावरहि ते त्याला आक्रमण म्हणेनात. विष्णुशास्त्री यांचें, किंवा कोणत्याहि थोर पुरुषाचें मूल्यमापन करतांना, मानवाची ही अपूर्णता आपण सतत ध्यानांत ठेविली पाहिजे.

## सहानुभूतिशून्य

त्या वेळीं हिंदु धर्माला अत्यंत विकृत रूप आलें होतें. विषमता, जुलूम, अन्याय, पक्षपात यांचा तो पुरस्कार करीत असे. अनंत जाति-उपजाति तशाच राहिल्या पाहिजेत असें त्याचें शास्त्र होतें. 'धारणात् धर्मइत्याहुः।' 'अभ्युदय व निःश्रेयस प्राप्त करून देईल तो धर्म' या व्याख्यांशीं त्याचा कसलाहि संबंध राहिलेला नव्हता. असें असूनहि लोकशाहीच्या यशासाठी या धर्मांत फार मोठें परिवर्तन घडविलें पाहिजे, असें विष्णुशास्त्री यांना वाटलें नाही. या परिवर्तनाला किंवा सुधारणेला आमचा विरोध नाही, इतकेंच ते म्हणत. पण त्या धर्मामुळे भारताची अवनति झाली आणि उन्नतीसाठी, लोकायत्त शासनासाठी, जातीय विषमता, अस्पृश्यता, शूद्र-अंत्यज यांची विपन्नावस्था, स्त्रियांची परवशता, वर्णांना गुरु जे ब्राह्मण त्यांची चारित्र्यहीनता, हें सर्व नाहीसें होणें अवश्य आहे, हें त्यांना बिलकुल मान्य नव्हतें. लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या पुरस्कर्त्यानें हें मान्य करावयास हवें होतें, आणि त्यासाठी इतर विषयांचा जसा त्यांनी प्रपंच केला तसा यांचाहि करावयास हवा होता, पण तसें त्यांनी केलें नाही. उलट या दुष्ट रूढिविरुद्ध ज्यांनी मोहीम सुरू केली होती त्यांच्यावर ते सहानुभूतिशून्य टीका करीत राहिले. विष्णुशास्त्री यांनी त्यांच्या दोषांवर, त्यांच्या विसंगत वर्तनावर टीका करूनहि त्यांच्या कार्याचा गौरव करण्यास वास्तविक हरकत नव्हती.

## विचारसाम्य

एक गमतीची गोष्ट पाहा. लोकहितवादींचीं 'शतपत्रें' व विष्णुशास्त्री यांची 'निबंधमाला' हे दोन ग्रंथ जरा न्याहाळून पाहिले तर या दोन थोर विचार-वंतांमध्ये किती तरी वैचारिक साम्य असल्याचें आढळतें. विष्णुशास्त्री यांना अत्यंत प्रिय असलेले विचार, तत्त्वें, सिद्धान्त लोकहितवादी यांनी किती तरी पत्रांत सांगि-तले आहेत. असें असूनहि त्यांची दखल विष्णुशास्त्री यांनी घेतली नाही, यामुळे मन

अस्वस्थ होतें. इंग्रजी विद्या शास्त्रीबुवांना किती महत्त्वाची वाटत असे, तें मागे सांगितलेंच आहे. लोकहितवादी यांनी तिचें तसेंच गुणगान केलें आहे. ते म्हणतात, "इंग्रजांच्या विद्या हिंदूंस अश्रुत आहेत. याजकरितां सर्वांनी त्यांतील ज्ञान घ्यावें. सांप्रत इंग्रजींत ज्या विद्या, भूगोल, खगोल, राज्यनिति इत्यादि आहेत त्यांचा विचार करावा, त्यावांचून लोकांस कोणतेंहि कार्य नीट करतां येणार नाही." ('पत्र', ६९). पत्र क्र. ९५ यांत लोकहितवादींनी आपले शास्त्री-पंडित, रसायनशास्त्र, यंत्रज्ञान, शिल्पज्ञान यांवरील ग्रंथ पाहत नाहीत म्हणून त्यांना दोष दिला आहे. याच अनुषंगाने ग्रंथरचनेचें माहात्म्यहि लोकहितवादींनी विष्णुशास्त्री यांच्याइतकेंच पोटतिडिकीने सांगितलें आहे.

विचारस्वातंत्र्यहि लोकहितवादींना विष्णुशास्त्री यांच्याइतकेंच महत्त्वाचें वाटतें. "मनूचें वचन असो, याज्ञवल्क्याचें असो, कोणाचेंहि असो. ब्रह्मदेवाचें का असेना, 'बुद्धिरेव बलीयसी' असें आहे. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धि चालवा. प्राचीन काळीं ऋषि विचारशील होते. त्यांनी नक्षत्रें पाहून, औषधें शोधून ग्रंथ बुद्धिबळाने लिहिले; पण त्यानंतर लोकांस समजूत पडली की, ते ऋषि देवावतार होते. तेव्हा आपला धर्म इतकाच की, त्यांनी जें करून ठेविलें तितकें मात्र शिकावें. त्याजवर नवीन कल्पना काढू नये. काढली तर देवांचा अपमान होतो. अशी समजूत पडून लोक अगदी मूर्ख झाले." – असे विचार त्यांनी ठायीं ठायीं मांडले आहेत. 'ग्रंथावर टीका' या निबंधांत विष्णुशास्त्री यांनी हीच वृत्ति प्रगट केली आहे. "आपणांहून जे थोर आहेत त्यांचे दोष काढण्यास आपणांस अधिकार नाही, अशी भाविक लोकांची समजूत आहे. पण सूर्यावरचे डाग पाहूं नयेत, किंवा चंद्रास कलंकी म्हणूं नये असें म्हणण्यासारखेंच हें असमंजस होय. थोरांचे दोष दाखविले तर त्यांचा उपमर्द होतो ही अगदी खोटी समजूत आहे." – असें त्यांनी स्वच्छ सांगितलें आहे.

## भटभिक्षुक

जुने शास्त्री-पंडित यांना विद्याभिरुचि मुळीच नाही हा जो विष्णुशास्त्री यांचा अभिप्राय तोच लोकहितवादींनी निरनिराळ्या पत्रांत प्रगट केला आहे. भट, भिक्षुक, यांच्याविषयी तर ते फारच भरड व थोड्या असंस्कृत भाषेंत लिहितात. विष्णुशास्त्री यांना त्याचा फार राग येतो. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, संपत्तीचा योग्य उपभोग कोणता तें सांगतांना त्यांनी भावार्थाने तसेंच लिहिलें आहे. ते म्हणतात, "यापूर्वी ब्राह्मणांची, विशेषत: भटांची सर्वथा भर करण्यांत लोक पुण्य मानीत; पण आता समदृष्टीने पाहतां सर्व विपन्न मनुष्यें धर्मास सारखींच सत्पात्र आहेत, अशी उत्तम समजूत पहिलीच्या जागीं आली." खरा धर्म कोणता तें सांगतांना लोकहितवादी म्हणतात, "आंधळ्यास जेवावयास घातलें काय? दीन-गरिबांस (ब्राह्मणांस नव्हे) वस्त्रें दिलीं काय? अज्ञानास ज्ञानी केलें काय? – हें पाहवें. धर्म त्यावरून ठरतो." ('पत्र', ३५).

आपले लोक उद्योग करीत नाहीत, आळशी आहेत, बसून खाण्यांत, पोटांतले पाणी हलूं न देण्यांत त्यांना भूषण वाटतें, श्रीमंतीचें हेंच लक्षण, असें त्यांस वाटतें; अशी टीका लोकहितवादींनी केली आहे. आणि ती केवळ ब्राह्मणांवरच नाही, तर राजेरजवाडे, सरदार यांवरहि केली आहे. 'संपत्तीचा उपभोग' या निबंधांत विष्णुशास्त्री यांनी अशीच टीका केली आहे. आणि शेवटीं आमचे राजेरजवाडे आणि इतर श्रीमान् गृहस्थ यांनी, ऐश्वर्य आम्हीच भोगावें, हा मूर्खपणाचा अभिमान सोडून देऊन युरोपियन लोकांचा कित्ता उचलावा आणि प्रवास करणें, विद्या जोडणें या कामीं संपत्तीचा उपयोग करावा, असा उपदेश केला आहे.

जातिभेद, परदेशगमन, आणि विशेषतः स्वदेशप्रीति यांविषयी या दोन नेत्यांचीं मतें अशींच मिळतींजुळतीं आहेत. धर्मसुधारणेविषयी लोकहितवादी यांचा एक उतारा देतो. त्यावरून सर्व भावार्थ घ्यानीं येईल. " प्रत्येकास आपले विचाराप्रमाणे आचार करण्याची व बोलण्याची लिहिण्याची मोकळीक असावी. आचारापेक्षा नीति प्रमुख मानावी, स्त्री-पुरुषांचे अधिकार धर्मसंबंधी कामांत व संसारांत एकसारखे असावेत. जाति-अभिमान नसावा. स्वदेशाची प्रीति व त्याचें कल्याण विशेषेकरून मनांत असावें, गुणेकरून व योग्यतेवरून जातिभेद मानावा, कुलेकरून मानूं नये. सरकारकडून प्रजेचे अधिकार थोर असावे. म्हणजे जे रयतेच्या हिताचे कायदे आहेत, ते सरकारशीं भांडून घेत जावे. विद्यावृद्धीकरिता सर्वांनी मेहनत करावी, शेवटचें कलम असें की, सर्वांनी सत्याने चालावें. "

लोकहितवादींची धर्माची ही व्याख्या आहे. यांतले बहुतेक विचार विष्णुशास्त्री यांना जसेच्या तसे मान्य आहेत, हें आतापर्यंतच्या विवरणावरून दिसून येईल.

## नीरक्षीर विवेक !

मनांत असें येतें की, विष्णुशास्त्री यांनी त्यांची दखल घेऊन त्यांचा गौरव केला असता, तर देशांतल्या या भिन्न शक्ति एक होऊन समाजाची प्रगति वेगाने झाली असती. लोकहितवादी यांची इंग्रजांविषयीची अंधभक्ति, विचार-आचार यांतील विसंगति, त्यांची अतिरेकी स्वजननिंदा, त्यांची असंस्कृत भाषा यांवर टीका करूनहि विष्णुशास्त्री यांना त्यांच्या वरील विचारधनाचा गौरव करतां आला असता. इंग्रजांच्या, राज्यकर्त्यांच्या व एकंदर पाश्चात्त्य पंडितांच्या बाबतींत त्यांनी अशीच नीरक्षीरविवेकी दृष्टि ठेविलेली दृष्टीस पडते. त्यांच्यावर त्यांनी जितकी प्रखर टीका केली तितकीच त्यांच्या गुणांची स्तुतीहि केली. त्यांचा कित्ता घ्यावा, त्यांना गुरु मानावें, म्हणजे लोह-परिस-न्यायाने आपल्याला त्यांचे गुण लाभतील, असा उपदेशहि केला आहे. मग हाच विवेक लोकहितवादी, न्या. मू. रानडे व जोतिबा फुले यांच्याविषयी त्यांनी कां केला नाही ?

## क्रांतीचा उपहास

माधवराव रानडे यांच्या तत्त्वज्ञानांतील अनेक सिद्धान्त विष्णुशास्त्री यांना वरीलप्रमाणेच मान्य होण्यासारखे होते. मानवत्वाची प्रतिष्ठा हें त्यांचें पहिलें महा तत्त्व होतें. संपत्तीच्या उपभोगाविषयीचीं त्यांचीं मतें, त्यांचा मराठी भाषेचा अभिमान, इंग्रजी विद्येविषयीची त्यांची भक्ति, भारताच्या प्राचीन संस्कृतिविषयीचा त्यांचा अभिमान, मराठ्यांच्या इतिहासासंबंधीचें त्यांचें प्रेम, त्यांचें शुद्ध, निष्कलंक चारित्र्य, अखंड उद्योग-तत्परता, त्यांचा स्वदेशाभिमान आणि त्यांची अत्यंत थोर, अत्यंत सुसंस्कृत अभिरुचि यांविषयी त्यांच्या शत्रूंनाहि शंका घेण्यास जागा नव्हती. विष्णुशास्त्री यांनी, या युगाचे अग्रणी, असा त्यांचा गौरवहि केला होता. असें असतांना त्यांच्या कार्यांतील अधू जागा तेवढ्या निवडून त्यांवर विष्णुशास्त्री सतत प्रहार करीत राहिले आणि सामाजिक व धार्मिक क्रांतीची ते जी पायाभरणी करीत होते तिची त्यांनी पूर्ण उपेक्षा केली. एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणें तिचा उपहास केला. त्यामुळेच मनांत येतें की, लोकशाही, राष्ट्रनिष्ठा, विचारस्वातंत्र्य, ज्ञाननिष्ठा, हीं जीं नवसमाज-निर्मितीचीं तत्त्वें त्यांनी मनाशीं निश्चित केलीं होतीं त्यांचा संपूर्ण व्याप, संपूर्ण आशय, त्यांचे सर्व घटकोपघटक त्यांच्या ध्यानीं आले नव्हते.

म. जोतिबा फुले यांनी तत्कालीं चालू असलेल्या सर्व धार्मिक, सामाजिक व आर्थिक चळवळींचा मोहरा सामान्य जनांकडे, शूद्र, अस्पृश्य, दलित यांच्याकडे वळविण्याचा अखंड प्रयत्न चालविला होता; आणि लोकशाहीचा तोच खरा आशय होता. लो. टिळकांनी केसरीच्या पहिल्या अंकापासून सामान्य जनतेच्या जागृतींतून निर्माण होणाऱ्या लोकशाहीवर आपलें सर्व लक्ष केंद्रित केलें होतें. आता जनता जागृत व्हावयाची तर सामान्य जनांच्या ठायीं व्यक्तित्वाची जागृति होणें अवश्य असतें; आणि हिंदुसमाजांतील धर्मबंधनें व जातिबंधनें कायम असतांना शूद्र, अस्पृश्य, दलित यांच्या व्यक्तित्वाला अवसर मिळणें अशक्य होतें. यासाठीच जोतिबांनी आपल्या सर्व सामर्थ्यानिशी या अविवेकी, घातक बंधनांवर घणाघात चालविले होते. लोकशाहीचे उपासक विष्णुशास्त्री यांनी या त्यांच्या कार्याचें स्वागत करावयास हवें होतें; पण तें न करतां त्यांनी जोतिबांवर भयंकर जहरी टीका केली. 'गुलामगिरी' या जोतिबांच्या पुस्तकांत अनेक अपसिद्धान्त आहेत. त्याची भाषा असंस्कृत आहे, म्हणून त्यांवर विष्णुशास्त्री यांनी टीका केली असती तरी कांहीच बिघडलें नसतें. पण ती करूनहि जनजागृतीचा जो प्रयत्न जोतिबांनी चालविला होता त्याचें, इंग्रज राज्यकर्त्यांच्या कांही कृत्यांचें नीर-क्षीर-विवेकाने त्यांनी जसें स्वागत केलें तसें करावयास हवें होतें असें वाटतें. पण तें त्यांनी केलें नाही.

याचें कारण असें दिसतें की, लोकशाहीच्या स्थापनेसाठी, आपलें प्रभुत्व प्रस्थापित करण्याचें सामर्थ्य लोकांच्या अंगीं निर्माण होण्यासाठी, या देशांत आमू-

लाग्र सामाजिक व धार्मिक परिवर्तन होणें अवश्य आहे हें सत्य विष्णुशास्त्री यांनी जाणलें नाही.

## दोन ताण

यावरून असें दिसतें की, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, विरुद्ध मताविषयीचा आदर, समता, बंधुता हीं जीं नवसमाजरचनेचीं तत्त्वें, त्याचप्रमाणें देशाभिमान व त्यासाठी अवश्य असे त्याग, संघटना, एकोपा यांसारखे गुण हे एका बाजूला आणि सनातन परंपरेंतील जातीय उच्चनीचता, ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व, धर्माची अपरिवर्तनीयता हीं तत्त्वें दुसऱ्या बाजूला यांचे दोन्ही बाजूंनी दोन ताण विष्णुशास्त्री यांच्या मनाला लागले होते; आणि त्यामुळे अनेक जुन्या पीठिका, परंपरा यांवर निक्षून प्रहार करीत असतांना सुद्धा त्यांच्या अभ्यंतरांत इतर कांही निषिद्ध अशा जुन्या तत्त्वांविषयीचा आग्रह कायम असे.

खं. भि. बेलसरे या नांवाचे विष्णुशास्त्री यांचे एक अनन्यभक्त होते. त्यांनी १८९१ सालीं 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप' या नांवाचें एक लहानसें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत विष्णुशास्त्री यांच्या धर्ममतांविषयी चर्चा केली आहे. तिचा भावार्थ असा – शास्त्रीबुवांच्या कित्येक लेखांवरून ते पक्के हिंदुधर्मी होते, त्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता, व डोळे मिटून ते त्यास अनुसरत असत, असा सकृद्दर्शनीं कोणाचाहि सिद्धान्त होऊन जाईल; पण आम्हांस तसें वाटत नाही. त्यांनी हिंदु धर्माचा अभिमान धरला होता ही गोष्ट खोटी नव्हे. तरी तो अभिमान विश्वासजन्य होता, असें मात्र म्हणवत नाही. तर देशभक्तिजन्य होता, असें आमचें मत आहे. म्हणजे त्यांस स्वदेशाविषयी जें अत्यंत प्रेम होतें त्यामुळे विस्कळीत होत चाललेल्या हिंदु समाजास बंधनरूप जो हिंदु धर्म त्याचा अभिमान त्यांस वाटूं लागला इतकेंच (पृ. ७३).

हें विवेचन करून, मनुष्य कितीहि ज्ञानी झाला तरी त्याचे पूर्वग्रह सर्वस्वीं सुटत नाहीत, याचीं अनेक उदाहरणें बेलसरे यांनी दिलीं आहेत. आणि शास्त्रीबुवांच्या विचारांतील विसंगतीचें स्पष्टीकरण केलें आहे (पृ. ७६). याचा अर्थ असा की, उत्कट स्वदेशाभिमानामुळे या देशाचा सतानत असा जो हिंदु धर्म त्याचा त्यांना तसाच अभिमान वाटे, व त्यांतील दोषांकडे ते पाश्चात्त्य विद्येने प्राप्त झालेल्या विवेकी दृष्टीने पाहूं शकत नसत. मात्र ही स्थिति नेहमीच असे असें नाही. तो विवेक जागृत झाला की ते स्वकीयांचे दोषहि कठोरपणें दाखवून त्यांवर निःस्पृह अशी टीका करीत असत. त्यासंबंधी चर्चा पुढे येणारच आहे; पण त्याआधी देशाभिमानामुळे दृष्टि झाकोळलेली असतांना त्यांनी हिंदुस्थानच्या अवनतीची जी मीमांसा केली आहे, तिची चिकित्सा करावयाची आहे. ती मीमांसा विष्णुशास्त्री यांच्या नेहमीच्या भेदक बुद्धिवादी दृष्टिकोनाशीं विसंगत अशी झालेली आहे. तिचा परामर्श घेऊन मग स्वकीयांच्या दोषांवरहि ते किती प्रखर क्ष-किरणें टाकूं शकतात तें आपण पाहूं.

- ८ -

# अवनतीची मीमांसा

## अवनतीची मीमांसा

उत्कट अशा स्वदेशप्रीतीमुळे विष्णुशास्त्री यांची विवेकी दृष्टि केव्हां केव्हां झाकोळून जात असे, असें वर म्हटलें आहे. तशा झाकोळलेल्या दृष्टीतूनच त्यांनी भारताच्या अवनतीची मीमांसा केली आहे. तिचें समीक्षण आता करावयाचें आहे. लोकहितवादी यांच्या ग्रंथांवर टीका करण्यासाठी त्यांनी जे दहा-बारा निबंध लिहिले त्यांतील आरंभीच्या तीन-चार निबंधांत हीं मीमांसा आलेली आहे. आणि सारांशानें तीच पुढे 'आमच्या देशाची स्थिति' या शेवटच्या प्रबंधाच्या समारोपांत त्यांनी दिली आहे.

विष्णुशास्त्री यांचा निश्चित सिद्धान्त असा की, "आमच्या देशास कांही एक झालेलें नाही. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांही एक विकार झालेला नाही." मात्र देशाला कांही झालेलें नाही, असें म्हणत असतांनाच सध्या त्याला विपन्नावस्था आलेली आहे, सांप्रत तो ऱ्हास पावला आहे, हें त्यांना मान्य आहे. या दोन विधानांत विसंगति आहे, असें दिसेल; पण लोकहितवादींवरील निबंधांत त्यांनीं त्यासंबंधीं खुलासा केला आहे.

## नैमित्तिक निकृष्टावस्था

ते म्हणतात, "एकंदरींत हल्लीच्या काळाला या देशाची स्थिति मोठी भयंकर झाली आहे, त्याला निकृष्ट दशा आली आहे, यांत बिलकुल संदेह नाही; पण निकृष्ट स्थितीचीं दोन स्वरूपें असतात. एक नित्य, शाश्वत निकृष्ट स्थिति व दुसरी आगंतुक, नैमित्तिक अशी निकृष्ट स्थिति. दुसऱ्या निकृष्ट स्थितींत कांही तात्कालिक भयंकर अनर्थापात होऊन राष्ट्र क्षीण झाल्यासारखें दिसतें पण त्याच्या अंगचा मूळचा जोस

कायम असतो. एखाद्या वृक्षाच्या मुळालाच कीड लागली की तो वठत जातो. मग कितीहि उपचार केले तरी त्याला पुन्हा टवटवी येण्याची आशा नसते. ही शाश्वत निकृष्ट अवस्था. पण त्याचा फुलौरा, त्याच्या फांद्या, पल्लव कांही वेळा छाटले जातात, किंवा वणव्यांत सापडल्याने जळून जातात, तरी त्या वेळीं त्याच्या अंतरीचें सत्त्व कायम असतें. ही नैमित्तिक निकृष्टावस्था होय. ही फार काळ टिकत नाही. थोड्याच वेळांत तो वृक्ष पुन्हा पहिल्यासारखा किंवा आणखी भराने वाढून फळाफुलांनी बहरून जातो. हिंदुस्थानची सध्याची निकृष्ट अवस्था या दुसऱ्या प्रकारची आहे. छत्रपति संभाजी यांच्या मृत्युसमयीं आणि पानपतच्या पराभवाच्या वेळीं महाराष्ट्राला अशी स्थिति आली होती; पण थोड्याच वेळांत अपूर्व पराक्रम करून हें राष्ट्र उन्नत स्थितीला आलें." हिंदुस्थानाविषयी हेंच निदान विष्णुशास्त्री यांनी केलें होतें; साधारण पौष्टिकाचे उपचार त्याजवर सुरू केले असतां तो पुन्हा पहिल्यासारखा सशक्त व तेजस्वी होईल. त्यासाठी शस्त्रक्रियेसारख्या जालीम उपायांची मळीच गरज नाही, असें त्यांनी म्हटलें आहे.

## आम्हीच जबाबदार

विष्णुशास्त्री यांच्या अगोदरचे पंडित, आणि विशेषत: लोकहितवादी व रानडे यांच्या मतें प्राचीन काळीं, ऋषींच्या कारकीर्दीत हा देश उन्नत अवस्थेला पोचला होता, ऐश्वर्यसंपन्न होता; पण पुढे आमच्या धर्माला विकृतरूप आलें. आमचें बुद्धिप्रामाण्य जाऊन तेथे शब्दप्रामाण्य आलें. आम्ही विद्याविमुख झालों. वर्ण-जाति यांतील विषमता फार वाढली. स्त्री-जीवनाला पराकाष्ठेची अवकळा आली. अन्याय, जुलूम, पक्षपात, अनीति, भ्रष्टता फार वाढली, आणि यामुळे हिंदु समाजाला हीन दशा प्राप्त झाली. याचा अर्थ असा की, आमच्या अवनतीला आमचे आम्हीच जबाबदार आहों. आमच्या मूर्खपणामुळेच आमचें वैभव, आमचें स्वातंत्र्य यांचा लोप झाला.

विष्णुशास्त्री यांना हें मत बिलकुल मान्य नाही. आमचा धर्म बिघडला आहे, नीति सुटली आहे, मूळचे चांगले आचार जाऊन वेडगळ रीतिभाति आम्हांस लागल्या आहेत, या विधानांना ते कोटचा म्हणतात. त्या बड्या बड्या मंडळींनी ही उपपत्ति केवळ इंग्रज लोकांच्या प्रलापांवरून बसविली आहे, असें त्यांना वाटतें. मग असा प्रश्न येतो की, सध्याची जी अवदशा या देशाला आली आहे ती कशामुळे? नैमित्तिक का होईना, पण आपल्याला निकृष्ट दशा आली आहे हें विष्णुशास्त्री यांना मान्य आहे. मग ती कां आली? त्यांची उपपत्ति काय आहे?

## विस्तीर्णत्व

या देशाचें विस्तीर्णत्व आणि प्राचीनत्व हीं दोन कारणें त्याच्या ऱ्हासाला कारणीभूत आहेत, असें विष्णुशास्त्री यांचें मत आहे. रशिया वगळून राहिलेल्या

युरोपएवढा हिंदुस्थानचा विस्तार आहे. आणि युरोपमध्ये तेवढ्या प्रदेशांत एकोणीस राष्ट्रें आहेत तर हिंदुस्थानांत एकच आहे. शिवाय या देशांत अनेक धर्मपंथ, अनेक जाति, अनेक चालीरीति आहेत. येथे हिंदूंखेरीज फिरंगी, हबशी, रोहिले, पारशी, शीख अशा अनेक भिन्न जमाती असून त्यांच्या विवाहपद्धति, रीतिभाती, आहार-विहार अतिशय भिन्न आहेत. असे हे भिन्न समाज या अत्यंत विस्तीर्ण प्रदेशांत पसरलेले आहेत आणि हा विस्तारच या देशास बाधक झाला आहे. हें सांगून पुढे विष्णुशास्त्री यांनी इंग्लंड, तुर्कस्थान, प्राचीन ग्रीस यांचीं उदाहरणें देऊन, देश लहान, आटोपशीर असला म्हणजे त्यांतील लोक संघटित, एकरूप होऊं शकतात आणि म्हणूनच ते पराक्रम करूं शकतात, असें दाखविलें आहे. आणि हिंदुस्थानांत छपन्न देश, छपन्न भाषा, शेंकडो जाति, शेंकडो धर्म, शेंकडो आचार – इतक्यांत एकोपा व्हावा कसा, असा प्रश्न विचारला आहे. याच विवेचनांत इतर देशांच्या इतिहासांतलीं आणखीं उदाहरणें देऊन, आटोपशीर राज्यांत जी बळकटी असते ती मोठ्यांत असत नाही, अतिविस्तार राज्यास अपायकारकच होतो, असा सिद्धान्त त्यांनी मांडला आहे व हिंदुस्थानच्या सांप्रतच्या ऱ्हासास तेंच कारण आहे, असें मत मांडलें आहे.

## हेत्वाभास

विष्णुशास्त्री यांच्या या प्रतिपादनांत अनेक हेत्वाभास आहेत. हिंदुस्थान देश अतिविस्तीर्ण असला तर तो प्राचीन काळापासून तसाच आहे. असें असूनहि त्या प्राचीन काळीं तें विस्तीर्णत्व पराक्रम, कर्तृत्व, यांच्या आड आलें नाही, अपायकारक ठरलें नाही. व्यास, वाल्मीकि, कालिदास, पाणिनि, यास्क, पतंजली, रामकृष्ण, विक्रमादित्य, शिवछत्रपति, बाजीराव, रणजितसिंग, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई, यांचीं उदाहरणें स्वतः विष्णुशास्त्री यांनीच दिलीं आहेत. शक, यवन, हूण, युएची, यांच्यासारख्या परकीय रानटांचीं दहा-बारा आक्रमणें या देशावर आलीं. त्यांचें निर्दालन करून त्या सर्व जमातींना हिंदु समाजांत सामील करून टाकण्याचा अनेक वेळा हिंदूंनी विक्रम केला, तो याच काळांत. या देशाचा प्रचंड विस्तार जर आड आलाच असला, तर तो सर्व हिंदुस्थानावर एकछत्री साम्राज्य स्थापण्याच्या मार्गांत आला असेल. तरीहि चंद्रगुप्त, अशोक यांनी अखिल भारतावर त्या काळांत साम्राज्य स्थापन केलें होतेंच. आणि त्यानंतरहि सातवाहन, गुप्त, राष्ट्रकूट यांनी अखिल भारतावर नसली तरी, खूप मोठ्या विस्तारावर सत्ता स्थापिली होतीच; पण या मुद्याला तितकें महत्त्व नाही. अखिल युरोपवर एकछत्री सत्ता कधीच कोणाची नव्हती. तरी इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी या देशांनी पराक्रम केलेच. त्याचप्रमाणे भारतांतहि पल्लव, कदंब, वाकाटक, प्रतिहार, सेन, चालुक्य, यादव इत्यादि राज्यांनी पराक्रम करून विद्या-कलांची जोपासना इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत केलीच होती. तेव्हा विस्तीर्णत्व आणि कर्तृत्व , प्रगति, पराक्रम, स्वातंत्र्य,

यांचा अभाव यांत कसलाहि कार्यकारणसंबंध दाखवितां येत नाही. दहाव्या शतकानंतर अफगाण, घोरी, मोगल, इराणी यांचीं आक्रमणें सुरू झालीं. त्या वेळीं चव्हाण, राठोड, यादव, सेन यांचीं पूर्वीप्रमाणेच मर्यादित अशीं राज्यें भारतांत होतीं; पण त्यांच्यांतला जोम नष्ट झाला होता. त्यामुळे त्यांना या आक्रमणाला तोंड देतां आलें नाही; आणि याचीं कारणें निवृत्ति, शब्दप्रामाण्य, कर्मकांड, सिंधुबंदी, स्पर्शबंदी इत्यादि शृंखला, विद्याविमुखता, अंधश्रद्धा; विषम, अन्यायी, जुलमी समाजरचना, हीं होतीं. थोड्याफार निराळ्या शब्दांत लोकहितवादी, रानडे यांनी आपल्या अवनतीची हीच मीमांसा केली होती; आणि आज, साधारणतः नवव्या-दहाव्या शतकापासून हिंदुस्थानचा ऱ्हासकाळ सुरू झाला व तो वरील करणांमुळेच झाला, असेंच डॉ. मुनशी, म. म. मिराशी, डॉ. आळतेकर, चिंतामणराव वैद्य, डॉ. मुजुमदार, इत्यादि बहुतेक सर्व थोर इतिहासपंडितांनी मत मांडलेलें आहे. या ऱ्हासकाळांतहि रजपूत, विजयनगर, मराठे व शीख यांनी हिंदु समाजाचें संरक्षण केलें हें खरें; पण पाश्चात्त्य राष्ट्रांपुढे त्यांचाहि पराक्रम चालला नाही. या काळांत त्यांनी पूर्वीप्रमाणे प्रवास केला असता, जगभर व्यापार वाढविला असता, विज्ञानाची जोपासना केली असती, नवी युद्धविद्या हस्तगत केली असती, विचारस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य प्रस्थापित केलें असतें, लोकहितवादींनी म्हटल्याप्रमाणे इतिहास लिहिला असता, भूगोल पाहिला असता, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन या भाषांचा अभ्यास केला असता, निवृत्तिवाद, कर्मकांड यांचा समूळ उच्छेद केला असता, तर पुढे जपानने जें चाळीस-पन्नास वर्षांत करून दाखविलें तें रजपुतांना, मराठ्यांना, शीखांना करतां आलें असतें; पण या सामाजिक, राजकीय, धार्मिक, वैज्ञानिक, बौद्धिक, क्रांतीच्या तत्त्वांची त्यांना पुसट सुद्धा ओळख नव्हती. बंगाल, गुजरात, तमीळ, सिंध, आसाम, काश्मीर, उत्तरप्रदेश, ओरिसा, बिहार येथील लोकांना तर जगाकडे डोळे उघडून पाहण्याची सुद्धा या काळांत शक्ति नव्हती. त्यामुळे ते नवव्या-दहाव्या शतकापासून जे सत्त्वहीन झाले ते परवापर्यंत.

## परागतीचें कारण

बाराव्या-तेराव्या शतकापासून पश्चिम युरोपांत वरील सर्व तत्त्वांचा तत्त्ववेत्ते, विज्ञानवेत्ते, राज्यकर्ते, पंडित, सामान्य जन, आणि कोठे कोठे धर्मवेत्तेहि अंगीकार करीत होते आणि आपापल्या देशांत सर्वांगीण परिवर्तन घडवून आणीत होते. त्यामुळेच त्यांची अपूर्व प्रगति झाली. ते जगभर साम्राज्य स्थापूं शकले. उलट पूर्व युरोपांतील देशांनी हीं तत्त्वें स्वीकारलीं नाहीत. पोलंड, रुमानिया, बल्गेरिया इत्यादि पूर्व युरोपांतले देश विस्तीर्ण नव्हते, लहान, आटोपशीर होते; पण तरीहि ते मागासलेलेच राहिले. तेव्हा देशाचा लहान किंवा मोठा विस्तार यावर कांही अवलंबून नसून सामाजिक, धार्मिक, आर्थिक क्रांतीवरच प्रगति-परागति अवलंबून असते.

## चक्रनेमिक्रम

भारताच्या अवनतीचें प्राचीनत्व हें जें दुसरें कारण विष्णुशास्त्री यांनी सांगितलें आहे त्यांतहि असाच हेत्वाभास आहे. एक विस्तीर्णत्व भूगोलावरचें आहे तर दुसरें कालपटावरचें आहे इतकेंच. हिंदुस्थानचा इतिहास चार-पांच हजार वर्षांचा आहे. तेव्हा एवढ्या काळानंतर त्याला थकवा येऊन त्यामुळे ऱ्हासकाळ आला असला तर त्यांत नवल कसलें ? दीर्घकालीन प्रगतीनंतर रोमन साम्राज्य ऱ्हास पावलें, मिसर देशाला अवकळा आली, आणि आणखी दोन-तीन हजार वर्षांनी इंग्लंडचें तेंच होणार आहे, असें विष्णुशास्त्री म्हणतात. कालौघांत असेंच चालावयाचें. मनुष्य कितीहि बलवान असला तरी केव्हा तरी तो थकणारच. त्याचप्रमाणे राष्ट्रांचें आहे. उत्पत्ति, स्थिति व लय हें अवस्थात्रय जसें व्यक्तिभूत मनुष्यास टळत नाही तसेंच राष्ट्राला टळणार नाही; असें असतांना हिंदुस्थानाला आज जर लयावस्था प्राप्त झाली असली तर ती आमच्या नैसर्गिक मूर्खपणामुळे आली, आमच्या धर्म-विकृतीमुळे, जातिभेदामुळे, विद्याविमुखतेमुळे आली असें म्हणण्याचें काय कारण ? हा चक्रनेमिक्रम आहे ! कधी उन्नति, कधी अवनति हें चालावयाचेंच ! समाजाचे अवगुण त्याला जबाबदार आहेत असें म्हणतां येणार नाही.

## हा दैववाद

विष्णुशास्त्री यांनी मांडलेला हा युक्तिवाद त्यांना स्वतःलाच मान्य होता, असें दिसत नाही. कालगतीनेच जर सर्व होणार असेल तर मग देशाच्या उन्नतीचे उपाय समजाला सांगण्याचें प्रयोजन तरी काय ? मग प्रयत्नवादाला अर्थ तरी काय ? प्रारब्धवाद, कर्मवाद, यापेक्षा निराळा काय असतो ? दैववाद, प्रारब्धवाद तो हाच. विष्णुशास्त्री तो क्षणभर तरी मान्य करतील काय ? तसें असतें तर इंग्रजी विद्येचें वज्र हातीं घ्या, असें त्यांनी सांगितलें नसतें. मराठी भाषेचा अभिमान धरून नव्या विद्वानांनी ग्रंथ लिहावे असा अट्टाहास केला नसता. देशाभिमानाचा परिपोष करावा, त्या थोरल्या नात्यांत अठरापगड जातींचीं लहान नातीं विलीन करावीं, असा उपदेश केला नसता. आमच्या राजेरजवाड्यांनी, धनिकांनी संपत्तीचा उपयोग करतांना युरोपीय लोकांचा कित्ता घ्यावा, असें म्हटलें नसतें. भुतेंखेतें, शकुन-अप-शकुन, फलज्योतिष असल्या लोकभ्रमांतून समाजाला मुक्त करण्यासाठी लेख लिहिले नसते. विष्णुशास्त्री दैववादी असते तर वरील लोकभ्रमांचा, विशेषतः फलज्योतिषाचा त्यांनी पुरस्कार केला असता; पण त्याचा निषेध करून ग्रहज्योतिष – खरें ज्योतिषशास्त्र व इतर सृष्टिशास्त्रें यांचा न्यूटन, गॅलिलिओ, केप्लर यांच्याप्रमाणे अखंड अभ्यास आपण करावा, असा आग्रह ते करतात. यावरून प्रारब्धवाद त्यांना स्वप्नांतहि मान्य होण्याचा संभव नव्हता हें उघड आहे.

चक्रनेमिक्रमाप्रमाणेच उन्नति-अवनति होत असते असें जर खरेंच त्यांच्या मनांत असतें, तर त्यांनी उन्नतीचे उपाय जसे सांगितले नसते तशीच अवनतीची

वरच्याहून निराळी अशी कारणमीमांसाहि केली नसती; पण दीर्घकाळपर्यंत या देशांत विचारस्वातंत्र्य नाही, सृष्टिसंशोधन नाही, विद्याभिरुचि नाही, एकोपा नाही, प्रवृत्तिधर्म नाही, प्रवासाची आवड नाही, ग्रंथलेखन नाही आणि देशाभिमान नाही आणि तो जातिभेदामुळे नाही अशीं कारणें त्यांनी वरचेवर सांगितलीं आहेत. तेव्हा आमच्या अवनतीला आमचे आम्हीच जबाबदार आहों, आमच्या मूर्खपणामुळे आम्ही ऱ्हास पावलों, हें मत आम्हांस बिलकुल मान्य नाही, असें जरी ते म्हणत असले, तरी अवनतीचीं वरील कारणें त्यांनीच सांगितलीं आहेत, हें आपण विसरतां कामा नये.

आता आमच्या देशाला कांहीहि झालेलें नाही हें दाखविण्यासाठी विष्णुशास्त्री यांनी जीं प्रमाणें सादर केलीं आहेत त्यांचा विचार करून हा विषय संपवूं.

**आमचें शौर्य**

आमच्या ठायीं पूर्वीचें शौर्य, धैर्य, पराक्रम अजून कायम आहे हें सांगण्यासाठी इंग्रजांनी येथे तयार केलेली काळी फौज हें उदाहरण त्यांनी दिलें आहे. 'इंग्रजी भाषा' या निबंधांतहि डुप्लेने व पुढे इंग्रजांनी एतद्देशीय लोकांच्या फौजा तयार करूनच हिंदुस्थान जिंकला व सध्या इंग्रजी साम्राज्याचा तोच आधारस्तंभ आहे, हा हिंदी लोकांच्या शौर्याचा पुरावा म्हणून दिला आहे. आमच्या पलटणी अफगाणिस्तान, सयाम, चीन, इजिप्त, रशिया या देशांत इंग्रजांनी नेल्या तेव्हा त्या युरोपीय पलटणींइतक्याच शौर्याने लढल्या, असें टीप देऊन मुद्दाम निदर्शनास आणलें आहे. शिवाय लोकहितवादींवरील दुसऱ्या लेखांत त्यांनी म्हटलें आहे की, पूर्वीपासून शिपाईगिरीविषयी प्रख्यात असे जे रजपूत, पुरभय्ये वगैरे लोक त्यांच्या अंगचें पाणी हल्लीच्या चिरकालिक स्वस्थतेनेहि कमी झालें आहे, असें नाही. इतकेंच की, तें प्रगट होण्यास हल्ली बिलकुल जागाच नाही.

विष्णुशास्त्री यांनी हीं जीं प्रमाणें दिलीं आहेत त्यांवरून प्रत्यक्ष रणांगणांतलें शौर्य-धैर्य हिंदी लोकांच्या अंगीं होतें एवढें जरी सिद्ध होत असलें, तरी युद्धविद्या, युद्धनेतृत्व, त्यासाठी लागणारें स्वपरबलाचें ज्ञान, इतिहास-भूगोलाचें ज्ञान, लढाईंतल्या विविध व्यूहरचना यांचें कसलेंहि ज्ञान, की जें पूर्वी सर्वार्थाने या देशांत होतें, तें हिंदी लोकांच्या ठायीं नव्हतें हेंच सिद्ध होत नाही काय ? फ्रेंच, इंग्रज सेनापति व त्या राष्ट्राचे नेते यांनी आपल्या युद्धनेतृत्वाने यांना हाताखाली तयार केलें, व्यूह आखून या फौजा तेथे नेऊन उभ्या केल्या म्हणजे त्या असामान्य धैर्याने लढत. याचा अर्थच हा की आमच्याजवळ शौर्य असूनहि शत्रूवर विजय मिळविण्यासाठी — राष्ट्राचें रक्षण करण्यासाठी — त्याचा कसा उपयोग करावा, याची विद्या आमच्या जवळ नव्हती. रजपुतांचें शौर्य कायम होतें, हें खरें आहे. पण पृथ्वीराजाचा पराभव झाल्यानंतर पुढे अनेक शतकें आक्रमकांची साम्राज्यें स्थापणें व वाढविणें यासाठीच तें खर्ची पडलेलें होतें. हा अधःपात नव्हे काय ? आणि याला आमचे आम्हीच जबाब-

दार नाही काय ? आमच्या फौजा युरोपच्या मैदानावर पुष्कळदा युरोपीयांनाहि भारी ठरत असतांना, तें शौर्य स्वदेशरक्षणासाठी उपयोगी पडूं नये, यावरून या देशांत स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान शून्यावर येऊन ठेपला होता असा अर्थ होत नाही काय ? आणि हा अभिमान हें तर क्षात्र धर्माचें मुख्य लक्षण.

## आमची बुद्धिमत्ता

आमची बुद्धिमत्ता वेदकालाइतकीच आजहि प्रखर आहे, असें विष्णुशास्त्री म्हणतात, आणि इंग्रजी विद्येचें अध्ययन आमच्या लोकांनी अतिशय जलद केलें, जो विषय हातीं घ्यावा त्यांत ते पारंगत होतात, हें प्रमाण देतात. हें खरें आहे, पण ती इंग्रजी विद्या – म्हणजे रसायन, पदार्थविज्ञान, भूविज्ञान, जीवशास्त्र, भूगोल-खगोल शास्त्र, भाषा, विज्ञान, विद्युत्‌शास्त्र ही विद्या – निर्माण करण्याचें जें सामर्थ्य पूर्वी आमच्या ठायीं होतें तें आता सर्वस्वीं लुप्त झालें होतें, आणि ह्या सर्व भौतिक विद्या इंग्रज आम्हांला शिकवतील तेव्हा आम्हांला अवगत होणार अशी जी अवस्था आली तीवरून बुद्धिमत्तेच्या दृष्टीनेहि हिंदी जनांना अवकळा आली होती असेंच ठरत नाही काय ?

तेव्हा अगदी मूलभूत शौर्य-धैर्य किंवा बुद्धिमत्ता हे गुण जरी हिंदी लोकांच्या ठायीं असले तरी अनेक शतकें ते क्षीण व निर्जीव होऊन गेले होते असेंच म्हटलें पाहिजे. आणि शब्दप्रामाण्य, जिज्ञासाशून्यता, परमार्थप्रवणता, संशोधनावर येणारीं नाना तऱ्हेचीं बंधनें, प्रवासावर येणारीं जातीय बंधनें हींच त्याचीं कारणें होत असें म्हणण्यावांचून गत्यंतर नाही.

आमचें शौर्य-धैर्य कायम आहे, आमची बुद्धिमत्ता आजहि वेदकालाइतकीच प्रखर आहे, पण आमच्या या गुणांना अवसर न मिळाल्यामुळे ते प्रगट होत नाहीत, असें म्हणणें आणि ते गुण लोपले आहेत असें म्हणणें, हें सारखेंच आहे. विक्रमादित्य, शिवछत्रपति, शंकराचार्य, रामदास, तुकाराम, तात्या टोपे यांना काळ अत्यंत प्रति-कूल होता; पण त्यांनी आपल्या कर्तृत्वाला, शौर्याला, बुद्धिमत्तेला स्वतःच अवसर मिळविला. असा अवसर जेव्हा देशांतील लोकांना मिळवितां येत नाही तेव्हा समाजाचा अधःपात झाला आहे, असेंच म्हटलें पाहिजे; आणि तो अधःपात धर्माला अवकळा आल्यामुळे, सामाजिक न्याय नष्ट झाल्यामुळे, बुद्धिवाद लोपल्यामुळेच झालेला असतो, असेंच प्रत्येक देशाच्या इतिहासावरून दिसून येतें.

पण या बाबतींत इतिहासांतलीं वा अन्य ग्रंथकारांच्या ग्रंथांतलीं प्रमाणें देण्याची गरजच नाही. कारण स्वतः विष्णुशास्त्री यांनीच अन्यत्र तशी मीमांसा केली आहे. त्यांची दृष्टि झाकोळते तेव्हा ते सनातन धर्माचा व प्राचीन परंपरांचा असमर्थनीय अभिमान घेऊन उठतात. पण इंग्रजी विद्येचें वज्र त्यांच्या हातीं असलें म्हणजे त्यांचा विवेक-नेत्र उघडतो. आणि मग ते पूर्ण तटस्थपणें स्वजन दोषांकडे पाहूं शकतात. या क्ष-किरणांतून त्यांना काय दिसतें तें आता पाहूं.

- ९ -

# क्ष-किरणें

## अंतर्मुख

'आमच्या देशाला कांहीहि झालेलें नाही' हें विष्णुशास्त्री यांचें निदान टिकण्याजोगें नाही; त्याचप्रमाणे त्यांनी हिंदुस्थानच्या अवनतीची केलेली मीमांसाहि अनेक हेत्वाभासांनी भरलेली आहे, हें आपण गेल्या दोन लेखांत पाहिलें; पण तेथे हेंहि सांगितलें आहे की, कोणत्याहि कारणांनी त्यांनी वरील प्रकारे अयथार्थ निदानें केलीं असलीं तरी स्वदेशाच्या व्यंगांकडे, दोषांकडे, प्राचीन परंपरेंतील वैगुण्यांकडे, आणि स्वजनांच्या प्रमादांकडे ते चिकित्सक दृष्टीने पाहूंच शकत नव्हते हें खरें नाही. निबंधमालेंतील लेखांतच त्यांनी अंतर्मुख दृष्टि करून प्राचीन परंपरेंतील, हिंदु धर्मांतील अनेक दोष दाखवून त्यांवर परखड टीका केली आहे. इतकेंच नव्हे, तर वर जीं त्यांचीं अयथार्थ निदानें म्हणून सांगितलीं त्यांहून बरींच निराळीं अशीं निदानें शेवटच्या शेवटच्या 'केसरीं'तील लेखांत त्यांनी केलीं आहेत, असें आपल्याला आढळतें. त्यांनी हें जें आत्मनिरीक्षण केलें आहे त्याचा आता विचार करावयाचा आहे.

## जीवितकार्य

पण त्याहि आधी एक गोष्ट निदर्शनास आणावयाची आहे. ती ही की, विष्णुशास्त्री यांचें खरें कार्य म्हणजे या देशाचा तेजोभंग करणाऱ्या इंग्रज राज्यकर्त्यांना, पंडितांना आणि मिशनऱ्यांना त्यांच्याच पद्धतीने जहरी उत्तर देऊन येथील लोकांचा स्वत्वाभिमान जागृत करणें हें होतें. त्यांनी नवयुग निर्माण केलें तें या अर्थाने. इंग्रजी राज्याचें अंतरंग जाणून ते राज्यकर्ते स्वार्थी, लुटारू व दुष्ट प्रवृत्तीचे आहेत हें ध्यानीं घेऊन त्यांनी या देशाला घातलेल्या दास्यशृंखला तोडून टाकल्या पाहिजेत व त्यासाठी

सर्वस्वत्यागास सिद्ध झालें पाहिजे असा निश्चय करणाऱ्या तरुणांची पिढी त्यांनी निर्माण केली. आणि या त्यांच्या संदेशामुळेच या भूमींत सर्वत्र चैतन्य रसरसून येऊन लोकांच्या सर्वांगीण कर्तृत्वाला फुलोरा आला हें ऐतिहासिक सत्य आहे. त्यांच्या कार्याचें मूल्यमापन करतांना हें सत्य दृष्टीआड करण्याची सध्या चाल पडत आहे, पण तें दृष्टीआड केलें तर आपल्या देशाला लाभलेलें स्वातंत्र्यच आपल्याला दृष्टीआड करावें लागेल, हें आपण विसरतां कामा नये.

तेव्हा स्वातंत्र्याची प्रेरणा हें त्यांचें मुख्य जीवितकार्य हें नित्य ध्यानीं वागवून त्या संदेशाने प्रेरित झालेल्या तरुण वीरांनी रणांगणांत उतरतांना स्वतःच्या शारीर व मानसिक प्रकृतीच्या दृष्टीने कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे याविषयी त्यांनी जे उद्‌बोधक विचार सांगितले त्यांचें स्वरूप आता स्पष्ट करूं.

**यज्ञोपवीत**

'देशोन्नति' हा त्यांचा निबंध पाहा. मृत्यूच्या आधी थोडेच दिवस हा निबंध त्यांनी लिहिलेला आहे. देशाभिमानाचा अभाव ही जी भारताची सर्वांत मोठी व्याधी तिच्यावरच त्यांनी येथे नेमकें बोट ठेविलें आहे. ते म्हणतात की, " इकडील देशांतून देशाभिमान ही मनोवृत्तीच म्हणण्यासारखी लोकांस माहीत नाही. रोम, ग्रीस, इंग्लंड, अमेरिका वगैरे ठिकाणीं स्वदेशप्रीति म्हणून एक अत्यंत प्रबळ मनोवृत्ति आजला जशी आढळत आहे तशी एशिया खंडांतील कोणत्याहि देशांत आढळत नाही " असें व्यापक विधान करून १८५७ सालीं झालेल्या संग्रामाविषयी ते म्हणतात की, " त्यास कारण देशाभिमान बिलकुल नसून केवळ धर्माभिमान होय. इतकी काळी फौज जी एकाएकी बिथरली, तिच्यापैकी एकाहि शिपायाच्या अंगीं ह्यामडन् किंवा वॉशिंग्टन यांच्या अंगांतला आवेश ( देशाभिमान ) संचारला असेल असें बिलकुल म्हणवत नाही." हाच विचार आणखी स्पष्ट करण्यासाठी त्या वेळीं उपस्थित झालेल्या बर्वे-प्रकरणाविषयी त्या वेळच्या शिष्ट लोकांचे उद्‌गार त्यांनी दिले आहेत. ते म्हणत असत की, " या लष्कराच्या भाकरी भाजल्यावांचून यांचें काय अडलें होतें ? हीं राजकीय प्रकरणें, यांत आपल्यासारख्या गरीब पत्रकर्त्यांनी कशाला पडावें ? हरि हरि म्हणत स्वस्थ बसावयाचें सोडून, या मंडळींनी हा काय नसता उपद्‌व्याप आरंभिला आहे ? " त्या वेळचा समाज सार्वजनिक जीवनाला किती विमुख होता, देशसेवेच्या जाणिवेचा लवलेशहि लोकांच्या ठायीं कसा नव्हता, हें दाखविण्यासाठीच शास्त्रीबुवांनी हे उद्‌गार नमूद केलेले आहेत. १८९७ सालीं लो. टिळकांच्यावर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना तुरुंगवासाची शिक्षा होण्याचा संभव दिसला त्या वेळीं कांही लोकांनी त्यांना, " या लष्कराच्या भाकरी आपण भाजूं नये, " असाच सल्ला दिला होता. विष्णुशास्त्री म्हणतात, " वरच्यासारखें पोक्त तत्त्वज्ञान आमच्या वाचकांपैकी शेकडो किंवा हजारो जणांनी ऐकलें असेल. तर हीच स्थिति आजपर्यंत आमच्या देशांत चालत आली आहे. लोकांस अभिमानास चढायास

बाजू कोणती ? तर यज्ञोपवीत, गोब्राह्मण इत्यादि. स्वातंत्र्य, जन्मभूमि या शब्दांत वरच्यासारखा प्रभाव प्राच्य देशांत थोडाच आढळतो. ''

## जातिभेद घातक

हिंदुस्थानांतील अत्यंत बारीकसारीक गोष्टींचा सुद्धा तीव्र, उत्कट, जाज्वल्य अभिमान धरणारे विष्णुशास्त्री ! अंतर्मुख दृष्टि करून स्वदेशाच्या विपन्नावस्थेचें कारण सांगतांना, १८५७ सालच्या तेजस्वी संग्रामाची चिकित्सा करतांना सुद्धा, अतिशय तटस्थपणें, पूर्वग्रहदूषित न होतां, एक अतिशय विदारक सत्य सांगूं शकतात ! या देशांत देशाभिमान ही वृत्तीच नाही ! पण एवढेंच सांगून ते थांबत नाहीत; ही वृत्ति कां नाही हें सांगतांना जातिभेद हें एक मोठें कारण म्हणून त्यांनी सांगितलें आहे. त्याविषयी ते म्हणतात, '' याने तर या राष्ट्राची फूट अतिशयितच पाडली आहे. अठरापगड जातींस अठरा टोपकरांनी गुंडाळून टाकलें व साऱ्यांच्या हातीं सारखीच करवंटी दिली; पण लोकांचे डोळे अजून उघडत नाहीत.'' येथले ब्राह्मण, तुम्ही त्रिकर्मी नि आम्ही षट्कर्मी हींच भांडणें भांडत बसले होते. त्याविषयी शास्त्रीबुवा म्हणतात, '' यांना एकाहि कर्माची खरी ओळख नाही. मात्र या वादांत बिचारें ब्राह्मण्य तर टेम्स आणि रेणा यांच्या तीरांच्या आश्रयाने जाऊन राहिलें, या गोष्टीची दोघांहि पक्षकारांस शुद्ध नाही. ''

देशाभिमान ही वृत्तीच येथे नाही. मग ती आणण्यास, शास्त्रीबुवांच्या मतें, उपाय काय ? हा देश पादाक्रान्त करणाऱ्या पाश्चात्त्यांपासून ही गुरुकिल्ली आपण घेतली पाहिजे. त्यांचे इतिहास वाचून, त्यांच्या उलाढालींकडे सतत लक्ष पुरवून, आम्ही किती गचाळ लोक झालों आहों याची प्रचीती आपल्या ठिकाणीं बाणली पाहिजे. ( आमच्या देशाला कांही झालें नाही – हा भ्रम सोडून दिला पाहिजे ! ) ती बाणली असतां लोह-परिस न्यायाने आमचे नादान लोकहि काले करून बाणेदार होतील !

## अठरा धातूंची मूस

या लेखांत विष्णुशास्त्री यांनी पुनः पुन्हा जातिभेदावर टीका केली आहे. लेखाचा समारोप करतांना त्यांनी म्हटलें आहे, (पाश्चात्त्यांपासून आम्ही गुरुकिल्ली घेतली तर ) '' कालयोगेकरून या अठरा धातूंचीहि चांगली मूस बनून, सर्वांस साधारण जो देश त्याविषयी अभिमानवृत्ति सर्वांच्या हृदयांत स्फुरूं लागतील, व या देशांतील सगळ्या जाती देशबंधुत्वाच्या थोरल्या नात्यांत अंतर्मुख होऊन एकोप्यापासून सर्वांचें किती हित आहे हें दिवसेंदिवस अधिकाधिक उमजूं लागतील, अशी दृढ आशा आहे. ''

राष्ट्रभावनेचा अभाव, जातिभेद, हीं हिंदी लोकांच्या ऱ्हासाचीं मोठीं कारणें झालीं. पण ऐतिहासिक चिकित्सा करून माणूस वास्तव दृष्टीने पाहूं लागला की त्याला या ऱ्हासाचीं, अवनतीचीं अनेक लहानमोठीं कारणें आणि लक्षणें दिसूं

लागतात. विष्णुशास्त्री प्रारंभापासून स्वजनांकडे तशाच दष्टीने पाहत होते. त्यांनी स्वजनांवर क्ष-किरणें टाकलीं आहेत, असें म्हटलें तें याच अर्थानें.

## मूढविद्या

संस्कृत विद्या, जुने पंडित, त्यांचें दशग्रंथी पांडित्य यांचा शास्त्रीबुवांना केवढा अभिमान असावयास हवा ! पण या पंडितांची विद्या जडमूढ होती. म्हणून त्यांना त्यांचा अभिमान तर नव्हेच, उलट तिरस्कार वाटत असे. 'विद्वत्त्व आणि कवित्व' या निबंधांत त्यांनी या पंडितांच्या जड पांडित्यांवर अतिशय परखड टीका केली आहे. त्यांना काव्याची अभिरुचि मुळीच नाही. श्लेषासारखे शब्दचमत्कार याची त्यांना गोडी. या पंडितांना शब्दाचें प्रसन्नार्थत्व व एकार्थत्व कधीहि सहन होत नसतात. अशी टीका करून शास्त्रीबुवा म्हणतात, "युरोपांतील सामान्य पंडितास आमचे काव्य-ग्रंथ जसे समजतात तसे इकडील मोठमोठ्या शास्त्रयांसहि समजत नाहीत, व त्यांतील अप्रतिम रसाचा आस्वाद घेण्यास हे परस्थ लोक जर आम्हांस न शिकविते, तर तो आम्हांस कधीहि समजताना, यांतहि अगदी संशय नाही. सारांश, या शास्त्राची चांगली माहिती ज्यास करून घेणें असेल त्याने या विषयावरील इंग्रेजी ग्रंथ वाचले पाहिजेत." 'वाचन' या निबंधांत याहिपेक्षा कठोर टीका त्यांनी केली आहे. "या जुन्या शास्त्री, पंडितांस काव्याभिरुचि नव्हतीच, पण एकंदर विद्येचीच अभिरुचि त्यांना नव्हती," असें त्यांनी म्हटलें आहे.विद्याभिरुचीच नसल्यामुळे "खरें विद्यासुख हें जुन्या पद्धतीच्य लोकांस बहुतकरून मुळीच माहीत नाही." या ठिकाणींहि पुन्हा विष्णुशास्त्री यांनी आपल्या लोकांची युरोपीय लोकांशीं तुलना केली आहे. "काव्यशास्त्र-विनोदाने ज्यांचा काळ जातो असे धीमान पुरुष युरोप खंडांतच काय सापडतील ते सापडतील. आमच्या हिंदुस्थानांत तर विचारूंच नका. येथे पुराणें, ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथ लोक पूर्वी वाचीत असत, पण ते परमार्थ-बुद्धीने ! अर्थज्ञान किंवा रसानुभव घेऊन वाचणारे फारच थोडे. त्यामुळे वाचनापासून होणारा आनंद त्यांस कधी घडत नसे. व्यसन, निद्रा किंवा कलह ह्यांतच त्यांचा काळ जावयाचा !"

## युरोपियनांचे उपकार

'संस्कृत कविता' या लेखांत प्राच्य पंडितांवर अशीच टीका करून विष्णु-शास्त्री यांनी युरोपी पंडितांची मुक्तकंठाने स्तुति केली आहे. "आमच्या प्राचीन भाषेचा पुरस्कार जर पाश्चात्त्य पंडितांनी घेतला नसता, तर तिची काय दुर्दशा होऊन जाती, हें सांगवत नाही. या थोर मनाच्या लोकांनी तिचें नुसतें रक्षण केलें इतकेंच नाही तर तिचा सार्वत्रिक प्रसार होण्यास ते कारणीभूत झाले. यावरून साऱ्या भारतवर्षीय जनांवर त्यांचे केवढे उपकार आहेत तें सहज ध्यानांत येईल. शोधकपणा ह्या जो पाश्चात्त्य पंडितांचा गुण तो पूर्वीच्या पंडितांत मुळीच नव्हता म्हटलें तरी चालेल. आमच्या प्राचीन विद्यांचें अध्ययन करून त्या आम्ही जागरूक ठेवीत होतों

हें खरें. पण रत्नें बाळगणारांस जशी रत्नांची पारख नेहमी असतेच असें नाही त्याचप्रमाणे आमची स्थिति होती."

काव्याभिरुचि नाही, विद्यानंद काय तें जाणण्याची पात्रता नाही, शोधकपणा नाही, आणि आपल्या जवळच्या ग्रंथाची योग्यता समजण्याइतकी सुद्धा कुवत नाही ! हा दोष दिसायला जातिभेद, निवृत्ति यांपेक्षा लहान असला, तरी प्रत्यक्षांत तो तसा नाही, इतकेंच नव्हे, तर संस्कृतीचें जें आद्य लक्षण तेंच आमच्या ठायीं त्या तमोयुगांत नव्हतें, असा त्याचा भावार्थ असल्यामुळे तो दोष अत्यंत घातक होय, हें सहज ध्यानांत येईल. मराठ्यांच्या काळाच्या आधी अनेक शतकें हा देश अवनत स्थितींतच होता, असें एक-दोन ठिकाणीं विष्णुशास्त्री यांनी म्हटलें आहे; आणि त्यामुळे आर्य लोकांचा धर्म, विद्या, यांचा सर्वथा लोप होण्याचा समय आला होता तो मराठ्यांच्या पराक्रमामुळे टळला, असेंहि त्यांनी म्हटलें आहे. वरील विवेचनावरून असें दिसतें की, मराठ्यांच्या पराक्रमामुळे सर्वनाश होण्याचें जरी टळलें तरी विद्याभिरुचि, शोधकपणा, ज्ञानलालसा हे गुण कांही आपल्या पंडितांना लाभले नाहीत. ते युरोपियनांनी शिकविले तेव्हा त्यांचें महत्त्व आम्हांला समजलें. यावरून विद्याभिरुचीचा लोप हा समाजाला किती घातक ठरतो हें कळून येईल.

## निष्णात वैद्य

विष्णुशास्त्री यांनी आत्मनिरीक्षण कसें केलें आहे या दृष्टीने निबंधमाला तपासून पाहतां, असें दिसतें की, एखादा निष्णात वैद्य रोग्याची प्रकृति तपासूं लागला म्हणजे, बाह्यतः क्षुल्लक दिसणाऱ्या लक्षणांवरूनहि अंतरांतल्या मोठ्या व्याधी जसा अचूक जाणतो, त्याचप्रमाणे विष्णुशास्त्रीहि हिंदी जनांच्या मनाला जडलेल्या व्याधी जाणीत होते. जॉनसनचें चरित्र हा त्यांचा प्रबंध पाहा. प्रारंभींच त्यांनी सांगितलें आहे की, " हिंदुस्थानांतील जुन्या-नव्या कोणत्याहि भाषेंत चरित्रलेखनाचा प्रकार मुळीच आढळत नाही. आता शंकरविजय, ललितविस्तार, भोजप्रबंध किंवा भक्तिविजय, संतलीलामृत अशांसारखे ग्रंथ संस्कृतांत व मराठींत आहेत खरे, पण पुराणांत व इतिहासांत जितकें अंतर तितकेंच वरील ग्रंथांत व खऱ्या चरित्रांत ! ग्रीक व रोमन लोकांत प्लूटार्क, कॉर्नेलियस, नीपॉस वगैरे चरित्रकार जसे होऊन गेले तसा प्रकार इकडे बहुधा कधीहि झाला असेलसें वाटत नाही !" याचें कारण काय ? तर या रचनाविशेषाची अभिरुचीच लोकांत नव्हती व अजूनहि नाही !

## पुराण-वृत्ति

अभिरुचि नाही ! पुराणांची अभिरुचि आहे; पण इतिहासाची नाही; आणि इतिहासाची नाही तशीच – किंवा म्हणूनच चरित्राची – नाही. याचा अर्थ असा की, वास्तव सृष्टीचें – जड किंवा मानवी वास्तव सृष्टीचें – जें ज्ञान त्याचीच अभिरुचि आम्हांला नाही. हा काय लहान दोष आहे ? किंबहुना या दोषामुळेच इतर अनेक

व्याधी आम्हांला जडल्या, असें म्हटलें तरी चालेल. याच पुराणप्रेमी वृत्तीचे, पुढे डॉ. जॉनसन यांची चरित्रासाठी कां निवड केली, हें सांगतांना, शास्त्रीबुवांनी वर्णन केलें आहे. सर्वसाधारणपणें लोकांना अद्‌भुत पराक्रम करणाऱ्या लोकांचीं, चमत्कार करणाऱ्या संतांचीं, चरित्रें हवीं असतात. ज्ञानेश्वर, नामदेव, भक्त प्रल्हाद, सती सावित्री यांच्या चरित्रांत चमत्कार असतात. म्हणजे तीं चरित्रें हीं पुराणेंच असतात. म्हणून तीं लोकांना आवडतात. तीं सोडलीं तर शिकंदर, कोलंबस, वॉशिंग्टन यांचीं चरित्रें ते वाचतील. यांत दैवी चमत्कार नसले तरी अद्‌भुत पराक्रम असतात; आणि लोकांना ते पराक्रम दैवी आहेत, असेंच वाटत असतें. अशा लोकांविषयी शास्त्रीबुवा म्हणतात, "चरित्रांच्या वाचनापासून होणारा वास्तविक फायदा, त्यांस बिलकूल कळलाच नाही, असें म्हटलें पाहिजे."

## वास्तवाची अभिरुचि

हेंच खरें आहे. मानवाचीं चरित्रें त्यांना नकोच असतात. आपल्याकडे इतिहास-लेखन कां झालें नाही, हें सांगतांना विष्णुशास्त्री यांनी म्हटलें आहे की, आपल्या लोकांना नरस्तुति गाण्याचा कंटाळा होता. हें त्यांचें निदान अगदी बरोबर आहे. डॉ. जॉनसन याच्या चरित्रापासून काय मिळणार? संसारास व लोकव्यवहारास सदुपदेश प्राप्त होतो, तसा सार्वभौम राजांच्या लढायांपासून होणार नाही – असें शास्त्रीबुवा म्हणतात. हिंदी जनांना लोकव्यवहाराची चिंताच नव्हती. संसाराची काळजीच नव्हती. कारण तो मायामय असून क्षणिक आहे. चिरंतन आहे तो परमार्थ. तो पुराणांतील व्यक्तींच्या चरित्रांत आढळतो! म्हणून येथे पुराणें व तत्सम चरित्रें शेकड्यांनी झालीं. लोकव्यवहारास उपयुक्त अशीं चरित्रें झालींच नाहीत. त्यांची म्हणजे वास्तवाची अभिरुचि निर्माण करावी म्हणून तर विष्णुशास्त्री यांनी जॉनसनचें चरित्र लिहिलें.

## शब्दप्रामाण्य

विद्येची अभिरुचि नाही, हें जसें फार मोठें व्यंग तसेंच वास्तवाची अभिरुचि नाही, हेंहि फार मोठें घातक व्यंग होय. हिंदुस्थानांत प्राचीन काळांत उत्तम टीका-वाङ्मय नाही, ग्रंथांचें परीक्षण नाही हें सांगतांना अशाच आणखी एका व्यंगाचा त्यांनी निर्देश केला आहे. प्राचीन काळीं हिंदुस्थानांत इतिहासरचना नव्हती, चरित्र-लेखन नव्हतें, त्याचप्रमाणे, ग्रंथावर टीका हा प्रकारहि म्हणण्यासारखा नव्हता, असें 'ग्रंथावर टीका' या निबंधांत विष्णुशास्त्री म्हणतात. याचें कारण काय? शब्दप्रामाण्य-बुद्धि! हें तिसरें मोठें व्यंग होय. विष्णुशास्त्री यांनी या शब्दांत तें मांड-लेलें नाही; पण त्यांचा भावार्थ तोच आहे. ते म्हणतात, "आपणांहून जे थोर आहेत त्यांचे दोष काढण्याचा अधिकार आपणांस नाही, अशी मागे समजूत होती." यानंतर पुढे नव्या विद्वानांविषयी लिहितांना ते म्हणतात की, "आतासारखें मनाचें स्वातंत्र्य पूर्वी कधी नव्हतें, असे इंग्रज सरकारचे पोवाडे हे नवे विद्वानच गातात; आणि मेकॉले

मिल्ल, डॉ. विल्सन यांवर आम्हीं टीका केली तर तें महापातक असें त्यांना वाटतें." याचा अर्थ असा की, पूर्वी मनाचें स्वातंत्र्य नव्हतें म्हणूनच आपल्याकडे टीका-वाङमय झालें नाही. मल्लीनाथासारखे टीकाकार झाले, पण ते शब्दार्थ, व्याकरण यापलीकडे कधी गेले नाहीत. त्यामुळे काव्याचें हृदगत् विशद करून त्याची परखड गुणदोष-चिकित्सा करणें हें पूर्वी कधी झालें नाही 'संस्कृत कविता' या निबंधांत विष्णुशास्त्री लिहितात, "सुमारे तीनशे वर्षांपूर्वी युरोप खंडांत ज्याप्रमाणे ॲरिस्टॉटल याच्या ग्रंथांचें प्राबल्य असे व त्यांत यत्किंचितहि दोष काढणें म्हणजे केवळ पातकच, असें लोक मानीत असत त्याचप्रमाणे आपल्या देशांतील पंडितांची देखील कवि, शास्त्र-कार, इत्यादींविषयी समजूत असावी असें दिसतें. मिल्टन, ड्रायडन, बेकन इत्यादि महान् ग्रंथकारांविषयी इंग्रेज ग्रंथकार अगदी निर्भीडपणें जो अभिप्राय देतात तो वाचून, आमच्या देशांतील पंडितांच्या तर अंगावर खरोखर काटा उभा राहील!"

तेव्हा पाश्चात्त्यांप्रमाणे टीका-वाङमय येथे निर्माण न होण्याचें कारण, शास्त्री-बुवांच्या मतें, शब्दप्रामाण्य-बुद्धि किंवा विचारस्वातंत्र्याचा अभाव हेंच होतें, हें यावरून दिसून येईल. 'भाषापद्धति' या निबंधांत विनोदात्मक लिहिण्याची प्रवृत्ति मराठींत किंवा संस्कृतांत पूर्वी नव्हती, हा विचार त्यांनी मांडला आहे. मात्र त्याची कारणमीमांसा त्यांनी कोठेच केलेली नाही. पण ती केली असती तर हेंच कारण त्यांनी दिलें असतें. कारण विनोद ही कोणत्या ना कोणत्या व्यंगावर टीकाच असते.

- १० -

# इहवादी दृष्टिकोन

आपल्या समाज-पुरुषाच्या देहावर क्ष-किरणें टाकतांना विष्णुशास्त्री यांनी पूर्णपणें इहवादी दृष्टिकोन स्वीकारला होता, हें मागील विवेचनावरून ध्यानांत येईल; पण त्या लेखांत ज्या व्यंगांचा, दोषांचा विचार केला आहे त्यांचा परमार्थाशीं, धर्माशीं, अध्यात्माशीं फारसा संबंध नव्हता. देशाभिमान ही वृत्ति, काव्याची वा विद्येची अभिरुचि, वास्तव-दृष्टि, विनोद-बुद्धि यांचा येथे अभाव होता, असें म्हणण्यांत धर्म-ग्रंथाला, धार्मिक परंपरेला, धार्मिक तत्त्वांना कोठें बाधा पोचत नव्हती; पण ज्या तत्त्वांचीं, रूढींचीं, परंपरांचीं मुळें धर्मामध्ये आहेत त्यांची चिकित्सा करतांनाहि ते इहवादी दृष्टीचाच अवलंब करतात, असें आपणांस दिसून येईल. इंग्रजी विद्येला वज्र म्हणणाऱ्या व भौतिकज्ञान हेंच सर्व उन्नतीचें साधन आहे असें सांगणाऱ्या पंडिताच्या बाबतींत असें नसतें तरच नवल वाटलें असतें.

### निवृत्ति

आपल्या धार्मिक परंपरेंत अनेक शतकें निवृत्तिवादाचें फार महत्त्व होतें, हजारो वर्षें हिंदी लोक परलोकवादी व इहविमुख होऊन बसले होते, हें सर्वांस माहीतच आहे. 'इतिहास' या निबंधाच्या प्रारंभींच प्राचीन हिंदु लोकांत सप्रमाण व खरे इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति कां नव्हती हें सांगतांना, निवृत्तिवाद हें एक मोठें कारण म्हणून विष्णुशास्त्री यांनी सांगितलें आहे. ते म्हणतात, "आपल्या लोकांच्या मनाचा एकंदर कल निवृत्तिमार्गाकडे जेवढा दृष्टीस पडतो तेवढा प्रवृत्तिमार्गाकडे नाही. जग सर्व मिथ्या आहे, प्रपंचांतील सर्व व्यवहार लटके आहेत, अवघा ईश्वरी मायेचा गोंधळ आहे, "दिसें क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा नसे," असे विचार ज्यांच्या मनांत नेहमी घोळावयाचे, ज्यांचा परमार्थाकडेच विशेष ओढा, अशा

लोकांस रक्तपात, राज्यांच्या घडामोडी वगैरे गोष्टींचीं वर्णनें करून नरस्तुति गात बसण्याचा कंटाळा असल्यास नवल काय ?"

निवृत्ति, परमार्थप्रवणता, इहविमुखता हा विषय मोठा आहे. ती समाजाच्या ऱ्हासास कशी कारण होते याचें विवेचन करण्यास मोठा ग्रंथच लिहावयास हवा. (लो. टिळकांनी पुढे तो लिहिलाच.) त्या दृष्टीने पाहतां हें वरील विवेचन अगदी स्वल्प आहे. खरें म्हणजे तें विवेचन नाहीच. मनांत आलेला विचार त्यांनी मांडला इतकेंच; पण या निवृत्तिमार्गीतील संपत्तीची निंदा व काम-क्रोध-मद-मत्सरादि षड्रिपूंचा निषेध हीं जीं प्रधान तत्त्वें, त्यांविषयी विष्णुशास्त्री यांनी जें सविस्तर विवेचन केलें आहे त्यावरून, निवृत्ति हें आपल्या समाजाचें फार मोठें व्यंग आहे, ती एक मोठी व्याधी आहे, असें त्यांचें मत होतें, याविषयी शंका राहत नाही.

### धन – एक शस्त्र

'संपत्तीचा उपभोग' आणि 'गर्व' या निबंधांत, या दोन गोष्टींविषयी जुन्या तत्त्ववेत्त्यांचे जे विचार आहेत त्यांवर शास्त्रीबुवांनी अगदी परखड टीका केली आहे. संपत्ति, धन, लक्ष्मी यांविषयी प्राचीन महाज्ञानी पुरुष, थोर तत्त्ववेत्ते यांचीं मतें काय होतीं तें सांगतांना त्यांनी "मूढ जहीहि धनागमतृष्णाम्" इत्यादि वचनें देऊन खुद्द शंकराचार्यांचेच विचार मांडले आहेत. आणि एवढा मोठा प्रतिपक्षी समोर स्वतःच उभा करून, त्याचीं मतें एकदेशीय आहेत, असें आपलें मत स्वच्छ सांगितलें आहे. अनेक प्रमाणें देऊन त्यांनी असें दाखवून दिलें आहे की, दुराचार, मदांधता इत्यादि संपत्तीपासून होणारे जे अनर्थ त्यांचा संपत्तीशीं कार्यकारणरूप संबंध कांही नाही. मोठी राजसत्ता भोगीत असतांहि या विकारांपासून मुक्त असलेल्या राज-रत्नांचीं आपल्या इतिहासांत अनेक उदाहरणें आहेत; आणि संपत्तीपासून जसे अनर्थ होतात तसे अनेक लाभहि होतात ! तें एक शस्त्र आहे. त्याच्यापासून लाभ किंवा हानि होणें सर्वस्वीं त्याच्या मालकावर अवलंबून आहे. यास्तव संपत्तीची स्तुति किंवा निंदा दोन्ही व्यर्थ होत.

### धन – पुरुषार्थसाधन

जें व्यक्तीच्या बाबतींत तेंच राष्ट्राच्या बाबतींत. राष्ट्रांत संपत्ति फार झाली म्हणजे त्याच्या ऱ्हासास प्रारंभ झालाच म्हणून समजावें, असें मत गेल्या (अठराव्या) शतकाच्या अखेरपर्यंत रूढ होतें. 'ऋद्धिः चित्त विकारिणी।' हें वचन प्रसिद्धच आहे; पण शहाणा जो आहे तो जसा धनाने मदांध होऊन जात नाही, त्याचप्रमाणे ज्या राष्ट्राची राज्यरीति उत्कृष्ट आहे, त्यास धनाची समृद्धि कांहीहि अपाय न करतां, उलटी, अधिकच बलाढ्य करते. यास उदाहरणें अलीकडचीं इंग्लंड, फ्रान्स, प्रशिया इत्यादि राज्यें व प्राचीन काळचीं रोम, कार्थेज हीं राज्यें होत. हीं उदाहरणें सविस्तर देऊन शेवटीं शास्त्रीबुवांनी निष्कर्ष सांगितला आहे की, "संपत्तीची विपुलता ही उत्कर्षास किंवा अपायास कारण होणें हें राज्यांच्या अंगच्या मजबुतीवर

अवलंबून आहे. म्हणून तीं बुडाल्याचें अपेश तिच्यावर घालणें बरोबर नव्हे." या संपत्तीच्या विवेचनांतील एका वाक्यावरून विष्णुशास्त्री यांची इहवादी दृष्टि स्पष्ट दिसून येते. ते म्हणतात. "धर्माच्या व नीतीच्या आड न येतां परमेश्वराने सुखाचे जे हजारो पदार्थ या पृथ्वीवर निर्माण केले आहेत त्यांचें सुख घेणें, हें अगदी रास्त आहे. फार तर काय, आपल्या शास्त्राप्रमाणे असें करणें हें तिसऱ्या पुरुषार्थाचें साधन करणें होय." मानवाच्या ऐहिक सुखाविषयी हाच विचार पुढे आगरकरांनी जास्त सविस्तर मांडला आहे. ऐहिक सुखाविषयीची ही दृष्टि अगदी अर्वाचीन आहे.

## काम-क्रोध – मित्र

संपत्तीचा प्राचीन तत्त्ववेत्त्यांनी निषेध केला आहे म्हणून त्यांच्यावर विष्णुशास्त्री यांनी टीका केली ती सौम्य आहे; पण त्यांनी काम-क्रोधादि विकारांना षड्रिपु म्हटलें व त्यांची निंदा केली म्हणून शास्त्रीबुवांनी जी टीका केली आहे ती अगदी प्रखर आहे. ते म्हणतात, "परमेश्वराने मनाच्या ज्या निरनिराळ्या शक्ति निर्माण केल्या आहेत व त्यांस निरनिराळ्या वृत्ति जडविल्या आहेत, त्यांस अहेतुक किंवा अनर्थावह म्हणणें हें धर्माच्या दृष्टीने पाप व न्यायाच्या दृष्टीने मूर्खत्व होय." या विकारांचा विचार करतांना त्यांनी त्यांना घोड्याची उपमा दिली आहे. "बसणारा जर चतुर असेल तर त्याचा हवा तसा उपयोग करून घेतां येतो; पण तो जर कच्चा असेल तर घोडा त्यास खड्ड्यांत नेऊन टाकील. तेंच काम-क्रोधादि षड्विकारांचें आहे. तेव्हा हे सहा जण जगाचे केवळ शत्रूच आहेत असें नाही. उलट असेंहि म्हणतां येईल की, ते जगाचे हितकर्ते मित्रहि पण आहेत; या वृत्ति अनर्थकारक नाहीत. त्यांपासून मनुष्यास फार उपयोग आहे. इतकेंच मात्र की, त्यांस मनुष्याने नेहमी स्वाधीन ठेवून त्यांस आपण सर्वथा वश कधीहि होतां कामा नये."

षड्विकारांसंबंधीचें हें विवेचन 'गर्व' या निबंधांत आलें आहे. त्यांत प्रामुख्याने गर्व, अभिमान, अहंता या मनोवृत्तीचेंच विवेचन आहे; व त्याचा निष्कर्षहि असाच आहे. श्रीमंती, रूप इत्यादिविषयीचा गर्व हा दोषरूपच होय; पण थोर पुरुषांनी आपल्या गुणांचा गर्व वाहिला तर तो दोषावह न होता उलट शोभादायकच होतो. मौजेची गोष्ट अशी की, शोभादायक गर्वाचीं, आत्मस्तुतीचीं उदाहरणें देतांना विष्णुशास्त्री यांनी मिल्टन, वर्डस्वर्थ, भवभूति, जगन्नाथपंडित अशा कवींचीं उदाहरणें तर दिलीं आहेतच; पण त्यांच्या जोडीला परम भगवद्भक्त जे तुकाराम त्यांचेंहि उदाहरण दिलें आहे. "तोवरी तोवरी माळामुद्राभूषण। जंवतुक्याचें दर्शन झालें नाही॥" "तुका म्हणे आता उरलों उपकारापुरता।" या त्यांच्या वचनांवरून थोर पुरुषांना गर्व ही वृत्ति शोभादायकच ठरते, हें विष्णुशास्त्री यांचें म्हणणें यथार्थ वाटतें.

## गर्वाचें महत्त्व

या विकारांचा मनुष्याला फार उपयोग आहे, फार उपयोग आहे, असें या निबंधांत वारंवार म्हटलें आहे आणि त्यांच्या स्वतःच्या काळचेंच उदाहरण दिलें

आहे. त्या वेळीं इंग्रज पंडित, मिशनरी व राज्यकर्ते यांनी भारताच्या प्राचीन परंपरेची, धर्माची व थोर पुरुषांची निंदा करण्याचा विडाच उचलला होता; आणि त्यामुळे हिंदी लोक मनाने खचून जाण्याचा फार संभव होता. ही आपत्ति ध्यानांत घेऊन शास्त्रीबुवांनी त्यांना उपदेश केला आहे की, "वरील निंदेने त्यांनी बिलकुल खचून जाऊं नये, आणि मेकॉलेसारख्या मोठ्या नांवास न भितां व मिशनरी, पाद्री, बाटे यांच्या रागास न जुमानतां आपल्या देशावर वरील लोकांनी जीं अज्ञानमूलक व दुराग्रहजन्य परोपरीचीं दूषणें दिलीं आहेत, त्यांचें यथास्थित खंडन करावें." असें सांगून शेवटीं समारोप करतांना ते म्हणतात, "याप्रमाणें या मनोवृत्तीचा — गर्वाचा मनुष्यास अत्यंत उपयोग आहे. ही त्याचे ठायीं वास करीत नसेल तर मत्सरी व द्वेषी मनुष्याच्या निर्भर्त्सनेखाली तो तेव्हाच खचून जाऊन, त्याच्या अंगचे खरे गुणहि कदाचित् लोपून जातील."

धन-संपत्ति, काम-क्रोधादि षड्विकार यांची प्राचीन धर्मवेत्त्यांनी, साधूंनी, संतांनी एकजात निंदा करून त्यांना मानवाचे शत्रु ठरविलें आहे. असें असूनहि विष्णुशास्त्री यांनी त्यांच्यावर ही टीका करून, या मनोवृत्तींची मनुष्याने योग्य मर्यादेंत का होईना, पण जोपासना केली पाहिजे, असें निर्भय प्रतिपादन केलें. यांतच त्यांची विज्ञाननिष्ठ, इहवादी दृष्टि स्पष्ट दिसून येते.

## धननिषेध अयोग्य

धन-संपत्ति, पैसा, द्रव्य यांचा ख्रिस्ती धर्मानेहि हिंदु धर्माप्रमाणेच निषेध केला आहे. युरोपांतील धर्मक्रांतीचे प्रणेते लूथर, काल्व्हिन, यांसारखे जे धर्मसुधारक त्यांनी कॅथॉलिक पंथाच्या या संपत्तिविषयक दृष्टीचा निषेध करून भांडवलाला, भांडवलदारीला, व्यापाराला व सर्व आर्थिक उद्योगांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली नसती, तर युरोपांत औद्योगिक क्रान्ति झालीच नसती. कॅथॉलिक धर्माला व्याजबट्टा मंजूर नाही. त्यामुळे सावकारीचा सर्व धंदा प्राधान्याने ज्यू लोकांच्या हातीं होता. त्यांना ख्रिस्ती धर्म-बंधनें लागू नव्हतीं. अर्थशास्त्र व भौतिक विज्ञान यांची वाढ युरोपांत अठराव्या शतकांत झाली. तेव्हा शेती हा धंदा श्रेष्ठ व कारखानदारी, व्यापार हे हीन व्यवसाय होत हा सिद्धान्त पदभ्रष्ट झाला. प्रॉटेस्टंट पंथाचा एक अध्वर्यु जीन काल्व्हिन याला त्याच्या चरित्रकाराने भांडवलशाहीच्या विकासाचें श्रेय दिलें आहे. कारण त्याने सावकारी, व्यापार, कारखाने, पेढी या उद्योगांना नैतिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पुढील शतकांत विज्ञानाने तिलाच दृढता आणली व म्हणूनच युरोपच्या आर्थिक प्रगतीचा पाया घातला गेला. संपत्तीविषयीची हीच नवी दृष्टि विष्णुशास्त्री यांना आपल्या समाजांत रूढ करावयाची होती, असें 'संपत्तीचा उपभोग' या निबंधावरून दिसतें. ते दीर्घकाल जगते तर या विषयावर त्यांनी निश्चित ग्रंथरचना केली असती.

## कार्यकारण भाव

पण याहिपेक्षा, विष्णुशास्त्री यांची खरी विज्ञाननिष्ठा स्पष्ट दिसून येते ती त्यांच्या 'लोकभ्रम' या निबंधांतून. भुतेंखेतें, शकुन व फलज्योतिष यांविषयी त्यांनी जें विवेचन केलें आहे त्यावरून ग्रीक विद्येचें पुनरुज्जीवन झाल्यावर युरोपांत जें प्रबोधनयुग निर्माण झालें तेंच महाराष्ट्रांत निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता, याविषयी शंका राहत नाही. कार्यकारणभावाचा उदय हें प्रबोधनयुगाचें पहिलें व प्रधान लक्षण होय. 'रॅशनॅलिझम इन् युरोप' या आपल्या ग्रंथांत लेकी या पंडिताने याचें उत्तम विवेचन केलें आहे. या कार्यकारण भावाचा संस्कार लोकमानसावर करावा हाच हे निबंध लिहिण्यांत शास्त्रीबुवांचा हेतु स्पष्ट दिसतो. शकुन-अपशकुन आणि त्यांचीं सांगितलीं जाणारीं फळें, आकाशांतील ग्रह व मानवाचें भवितव्य यांच्यांत कसलाहि कार्यकारणसंबंध नाहीं हें त्यांनी पुन: पुन्हा सांगितलें आहे व कोणत्याहि गोष्टीची सत्यासत्यता ठरवावयाची ती प्रत्यक्षप्रमाणाने ठरवावी, असा सारखा आग्रह चालविला आहे.

## हा दीडशहाणा !

सामान्यत: लोक गतानुगतिक असतात. एकाने मानलें म्हणून दुसरा मानतो, आणि मग शेकडो, हजारो लोक तेंच खरें मानून त्यावर अचल श्रद्धा ठेवतात; आणि त्याच्या विरुद्ध कोणीं कांही सांगितलें, तर हजारो लोक मानतात ते मूर्ख, आणि हाच काय तो शहाणा, असा युक्तिवाद करतात. असले युक्तिवादच प्रगतीच्या आड येत असतात. विष्णुशास्त्री म्हणतात, "आजपर्यंत साक्रेटीस, कोलंबस, ग्यालिलिओ, न्यूटन, बेकन, वॉट वगैरे जे मोठमोठे शोधक होऊन गेले त्या सर्वांशीं बाकीच्या अज्ञानग्रस्त जगाचें हेंच भांडण; 'आज हाच निघाला दीडशहाणा आम्हांस सांगायला, आजपर्यंत लोक झाले ते सगळे मूर्खच !" एकंदर लोकांची मोठी चूक दृष्टीस पडते की, एखाद्या गोष्टीचा खरेंपणा तिच्या स्वरूपावरून न पाहतां ते नेहमी बहुमताकडे धांवत असतात. याचकरिता लोकशिक्षणाचा फैलाव होईल तेवढा देशास हितावहच होतो. त्याच्या योगाने लोकांचें भ्रमजाल तुटून सत्यासत्याची निवड करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य येऊं लागतें."

## ज्ञानाचा प्रभाव

हें सामर्थ्य ज्यांना नाही त्यांचीं मनें दुबळीं झालेलीं असतात, त्यांना क्षीणत्व आलेलें असतें; आणि अशीं क्षीण मनाचीं माणसें ज्ञानसंपन्नापुढे सहजच हतप्रभ होऊन त्याची गुलाम होतात. कोलंबसाचें विष्णुशास्त्री यांनी दिलेलें उदाहरण फार उद्‌बोधक आहे. अमेरिकेजवळील एका बेटांतील आदिवासी लोक त्याच्याशीं थोडें उद्दामपणें वागूं लागले होते. त्या सुमारासच चंद्रग्रहण आलें होतें. कोलंबसाला तें माहीत होतें; त्या आदिवासीजनांना अर्थातच हें ज्ञान नव्हतें. त्याचा फायदा घेऊन कोलंबसाने त्यांना धमकी दिली की, आज रात्रीं मी माझें सामर्थ्य तुम्हांला दाखवतों,

आणि रात्रीं चंद्राचा ग्रास होऊं लागलेला पाहतांच, याच्या अंगीं दैवी सामर्थ्य आहे अशी त्यांची खात्री झाली व अत्यंत भयभीत होऊन ते त्याला शरण आले !

## मानसिक क्रांति

इंग्रजी विद्या हें वज्र आहे व तें आपण हस्तगत केलें पाहिजे, असें विष्णुशास्त्री कां म्हणत असत, तें यावरून ध्यानांत येईल. इंग्रजांची भौतिक विद्या व तिच्यापासून त्यांना प्राप्त झालेल्या वीज, वाफ इत्यादि शक्ति यांमुळे हिंदी जनता दिपून गेली होती; व ते आदिवासीजन कोलंबसाला जसे शरण गेले तशी ही जनता इंग्रजांना शरण गेली होती. तेव्हा त्या जनतेला या भ्रामक श्रद्धेपासून मुक्त करण्यासाठी, लोकांत मानसिक क्रांति घडविणें अवश्य आहे, हें त्यांनी जाणलें होतें आणि म्हणूनच ज्ञानाची, इंग्रजी विद्येची उपासना ते त्यांना सांगत होते. युरोपांतील देशांची अर्वाचीन काळांत जी प्रगति झाली ती सृष्टिज्ञानामुळे झाली याविषयी त्यांना शंका नव्हती. यामुळेच लोकभ्रमांवरील निबंधांत सारखीं केप्लर, गॅलिलिओ, बेकन, न्यूटन, यांचीं उदाहरणें त्यांनी दिलीं आहेत व त्यांचा मोठा गौरव केला आहे. ते म्हणतात, सूर्याची स्थिरता, पृथ्वीचें भ्रमण, तिची अंतराळांत निराधार स्थिति, पदार्थमात्राचें आकर्षण करण्याची तिच्या अंगची शक्ति इत्यादि ज्योतिषांतील प्रमेयें, त्यांचें सोपपत्तिक ज्ञान होऊन संपूर्ण सृष्टीचें नव्या ज्ञान-नेत्राने जेव्हा मनुष्य अवलोकन करूं लागतो तेव्हा त्याचा अधिकार काय सांगावा ! त्याच्या ज्ञान-नेत्राचा टप्पा सृष्टीच्या सीमेपर्यंत जाऊन पोचतो असें म्हणावयास चिंता नाही ! विष्णुशास्त्री यांना जी मानसिक क्रांति अभिप्रेत होती ती ही. लोकांच्या मनांतले सर्व भ्रम नष्ट व्हावे व वस्तूचें रूप स्वतः पाहून तिच्याविषयी निर्णय करण्याचें सामर्थ्य त्यांना प्राप्त व्हावें यासाठी त्यांचा हा सर्व खटाटोप होता.

## विधवा – साध्वी

मनाचें हें सामर्थ्य हाच सर्व सामाजिक व धार्मिक क्रांतीचा पाया होय, हें त्यांनीच दिलेल्या एका उदाहरणावरून स्पष्ट होईल. आपल्याकडे विधवा स्त्रीचें दर्शन हा मोठा अपशकुन मानण्यांत येतो. त्याचा अत्यंत कडक शब्दांत निषेध करून ते म्हणतात, " असा अपशकुन मानणें हें विपद्ग्रस्त मानवी प्राण्याचा उपमर्द करणें आहे. हा प्रकार मुळीच केवढा मूर्खत्वाचा आहे. जी अत्यंत सदाचरणाने आपलें आयुष्य क्रमून आपल्या कुलास तर काय, पण सगळ्या मनुष्यजातीस भूषण आणीत आहे, त्या साध्वीचें दर्शन, पुरते तेरा दिवसहि जाऊं न देतां जो निर्लज्ज व विषयांध पुन्हा नवरा-मुलगा होऊन उभाच, अशा पुरुषाने अशुभ मानावें हा केवढा उलटा न्याय !" हजारो वर्षें ज्या विधवा स्त्रीला धर्मशास्त्रकारांनी रूढींनी, लोकाचारांनी निंद्य मानलें, अपशकुनी मानलें, करंटी, दळभद्री, असा जिचा उपहास केला तिला साध्वी म्हणण्याचें, मानवजातीला ती भूषण, असें म्हणण्याचें धैर्य, हें त्या सामर्थ्यांतूनच येतें.

### आस्तिक्य-बुद्धि

प्रारंभीच सांगितलें आहे की, निवृत्ति, लक्ष्मीची अनर्थावहता, षड्रिपु, शकुन-अपशकुन, फलज्योतिष यांचीं पाळेंमुळें धर्मशास्त्रांत रुतलेलीं आहेत. तेव्हा अशा विषयासंबंधी रूढीविरुद्ध प्रतिपादन करण्यामुळे धर्मश्रद्धा कमी होऊन नास्तिकपणा वाढविलासा होईल, अशी शंका वाचकांना येण्याचा संभव होता. त्याविषयी खुलासा करतांना विष्णुशास्त्री म्हणतात की, "ही केवळ भ्रांति होय. या लोकभ्रमांचा व धर्माचा बिलकुल संबंध नाही. उलट त्यांचा कांही अंशीं धर्माशीं विरोधच आहे;" पण ज्योतिषावरील निबंधाचा समारोप करतांना, याच्याहि पुढे जाऊन, केप्लर, न्यूटन यांनी ज्याचें प्रणयन केलें त्या खऱ्या ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनामुळे व मननामुळे मनुष्याच्या ठायीं आस्तिक्य-बुद्धि उत्पन्न होऊन जगत्कर्त्या परमेश्वराच्या ठायीं भक्ति वृद्धिगत होते, हा विचार त्यांनी मांडला आहे.

### विज्ञानपूत दृष्टि

विज्ञानाच्या प्रगतीमुळे, सृष्टिज्ञानामुळे परमेश्वरावरील भक्ति, प्रीति व श्रद्धा दृढ होते हा विचार पूर्णपणें इहवादी आहे. हॅनस कोहन या पंडिताने 'आयडिया ऑफ नॅशनॅलिझम' या आपल्या ग्रंथांत युरोपांतील धर्मक्रांतीचा विचार करतांना हाच मुद्दा मांडला आहे. न्यूटनने विश्व नियमबद्ध आहे हें सिद्ध केल्यामुळे लोकांना निसर्ग व परमेश्वर यांविषयी भीति न वाटतां भक्ति वाटूं लागली. परमेश्वर हा अनियंत्रित सुलतान नाही, तर नियमांनी, कायद्यांनी बद्ध असा शास्ता आहे, आणि हें विश्वहि त्याने नियमबद्ध करून ठेविलें आहे, हें पाहून लोकांना आनंद झाला व त्यांची परमेश्वराविषयीची भक्ति व आदर द्विगुणित झाला, असें कोहनने म्हटलें आहे. विष्णुशास्त्री यांनी हेंच प्रतिपादन केलें आहे. ते म्हणतात, "परमेश्वराच्या ठायीं प्रीति व भक्ति या दोन्ही वृत्ति, सृष्टीचें लेशमात्रहि अवलोकन लक्षपूर्वक केलें असतां, सुज्ञ मनुष्यांच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या आहेत; आणि धार्मिकपणाचें मूळ जी आस्तिक्य-बुद्धि ती प्रस्तुत शास्त्राने मनुष्याच्या मनांत दृढ होणार आहे." यावरून भुतेंखेतें, शकुन-अपशकुन यांच्यावरच काय, परंतु परमेश्वरावरहि अंधश्रद्धा असूं नये, असें विष्णुशास्त्री यांचें मत होतें हें दिसून येईल. आस्तिक्य-बुद्धीला सुद्धा, त्यांच्या मतें, केप्लर, गॅलिलिओ, न्यूटन यांचा आधार हवा. ही विचारसरणी अगदी अद्ययावत व विज्ञानपूत अशीच आहे.

- ११ -

# टीकाकार विष्णुशास्त्री

विष्णुशास्त्री यांच्या जीवनाचें ध्येय काय होतें, त्यांच्या बहुविध कार्यांचें उद्दिष्ट काय होतें, दहा वर्षांत 'शालापत्रक', 'निबंधमाला' व 'केसरी' यांत त्यांनी जें अनेक प्रकारचें साहित्य निर्माण केलें त्यांतून त्यांना अंततः काय साध्य करावयाचें होतें याची, आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून स्पष्ट कल्पना यावी, असें वाटतें.

**लेखणीचें उद्दिष्ट**

त्यांना या भूमींत नवी सृष्टि निर्माण करावयाची होती. येथल्या मानवी मनांत फार मोठें परिवर्तन घडवून आणावयाचें होतें. येथले सर्व लोक पुराणयुगांत राहत होते, त्यांना वास्तवांत आणून उभें करणें हें त्यांच्या लेखणीचें उद्दिष्ट होतें. पुराणांतल्या देवदेवतांच्या असंभाव्य कथा, त्यांतले अद्भुत चमत्कार लोकांना खरे वाटत असत. इंग्रज हे रावणासारखे आहेत व त्यांच्या पराभवासाठी राम पुन्हा अवतार घेईल, अशी त्यांची श्रद्धा होती. अशा या लोकांना कार्यकारणांच्या नियमांचा बोध करावा, वास्तव सृष्टि पुराणसृष्टीहून अगदी निराळी आहे, हें त्यांना शिकवावें, हा त्यांचा हेतु होता. हजारो वर्षे येथले लोक शब्दप्रामाण्यवादी होऊन त्यांच्या ठायीची, कार्यकारणाने, तर्काने, अनुभवाच्या आधाराने विचार करण्याची शक्ति नष्ट झाली होती. ती शक्ति जागृत करण्यासाठी विष्णुशास्त्री प्रयत्नशील होते.

जवळ जवळ प्रत्येक निबंधांत, आमच्या जुन्या लोकांच्या कांही विलक्षण समजुती आहेत, त्यांना विचार करण्याची सवय नसल्यामुळे त्या दृढ होऊन बसल्या आहेत, म्हणून त्यांना ज्ञान देऊन, विचार करण्यास शिकविलें पाहिजे, हा विचार त्यांनी मांडलेला आढळतो. इतिहासाचा अभ्यास कशासाठी करावा ? त्याने विचार-क्षमता वाढते. ग्रंथवाचनाचें फल काय ? त्यामुळे विचार करण्याची सवय लागते.

लोकभ्रम केव्हा नष्ट होतील ? कार्यकारणसंबंध त्यांना कळून विचार करतां आल्यावर. लोकशिक्षणाचा फैलावा झाला तर तो हितावह होय. कां ? त्यायोगे सत्यासत्याची निवड करण्याचें सामर्थ्य येतें !

विष्णुशास्त्री यांना जी मानसिक क्रांति घडवावयाची होती ती ही. त्या मानसिक क्रांतीचें आणखी एक लक्षण होतें. तें म्हणजे ऐहिकाविषयीचें प्रेम. हजारो वर्षांच्या संस्कारांमुळे इहलोकाविषयीची आस्थाच हिंदी जनांच्या मनांतून नाहीशी झाली होती. संपत्तीविषयी, षड्‌विकारांविषयी, नवी दृष्टि देऊन ती आस्था विष्णुशास्त्री यांना जागृत करावयाची होती. तीं जागृत झाल्यावर, त्यांच्या ठायीं देशाभिमान ही वृत्ति निर्माण होईल, अशी त्यांची खात्री होती.

## प्रवास

कालक्रम आणि भूगोल यांचें महत्त्व त्यांनी अनेक निबंधांत सांगितलें आहे. कारण त्यावांचून लोक आंधळेच राहतात. हिंदी लोक इतिहासलेखनाच्या अभावीं पुराणयुगांत म्हणजे तमोयुगांत राहत होते. प्रवासामुळे कदाचित् त्यांना जग दिसलें असतें; पण हजारो वर्षें त्यांनी प्रवासहि वर्ज्य मानला होता. १८७१ सालीं वयाच्या एकविसाव्या वर्षीच शालापत्रकांत 'प्रवास' हा निबंध लिहून विष्णुशास्त्री यांनी प्रवासाचें महत्त्व हिंदु लोकांना सांगितलें होतें. त्यांतलें पहिलेंच वाक्य असें आहे. "सांप्रत या पृथ्वीवर मानवजातीस जें एवढें वैभव प्राप्त झालें आहे तें प्रवासाच्या योगाने झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाही." आणि शेवटीं प्रवासाचा लोप झाल्यामुळे या देशाचें फार अहित झालें आहे, तरी आता लोकांनी नव्या प्रवास-साधनांचा फायदा घेऊन प्रवास करून मोठा लाभ करून घ्यावा, असा विचार मांडला आहे. या आरंभीच्या एकाच लेखांत विष्णुशास्त्री यांना अभिप्रेत असलेल्या मानसिक क्रांतीचीं सर्व लक्षणें बीजरूपाने दिसून येतात. ज्ञान, ग्रंथ, जिज्ञासा, इतिहासलेखना शोधकपणा, साहस, धारिष्ट, काव्याभिरुचि, विद्याभिरुचि, प्राचीन परंपरेचें प्रेम ग्रीसचा व युरोपचा आदर्श हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे सर्व घटक या निबंधांत आढळतात

## पाश्चात्त्य वळण

या सर्वांचा तात्पर्यार्थ असा की, त्यांना हिंदीजनांना पाश्चात्त्य जगांत न्यावयाचें होतें. पाश्चात्त्य विद्येचें वज्र त्यांना यासाठी हवें होतें. वर उल्लेखिलेले सर्व गुण त्या व्रजांत आहेत, याविषवीं त्यांना संदेह नव्हता. त्याच्या साह्याने त्यांना भारताला पाश्चात्त्य युरोपच्या वळणावर न्यावयाचें होतें.

## स्वत्व-आग्रह

मात्र हें त्यांना स्वत्व रक्षण करून साधावयाचें होतें. नव्या विद्वानांच्या स्वाभिमानशून्यतेवर टीका करतांना त्यांनी म्हटलें आहे, "इंग्रेज पहा ! त्यांचें भ्रमण साऱ्या जगभर आहे. हव्या तेवढ्या उलाढाली त्यांच्या जेथे जेथे चालल्या

आहेत; पण आपल्या देशास माघारी आले की पुनः इंग्रेजचे इंग्रेजच ! त्याचप्रमाणे इतक्या भाषा इंग्रेजीशीं मिसळल्या असतांहि ती कायमची कायमच."

ही विष्णुशास्त्री यांची दृष्टि होती. त्यांना पाश्चात्त्य विद्या हवी होती. धाडस, साहस, शोधकपणा इत्यादि पाश्चात्त्य गुण हवे होते. त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास हवा होता. संपत्ति, षड्विकार यांच्या बाबतींत त्यांचा आदर्श हवा होता. देशाभिमानासाठी त्यांना गुरु करण्यास त्यांची तयारी होती. त्यांचें वाङ्मय, त्यांचें साहित्यशास्त्र, त्यांचें इतिहासलेखन, त्यांची विद्याभिरुचि त्यांना अत्यंत प्रिय होती; पण हे सर्व स्वीकारतांना हिंदी जन हिंदीजनच राहिले पाहिजेत, असा त्यांचा प्रखर आग्रह होता।

येथून पुढे 'टीकाकार', 'चरित्रकार' व 'निबंधकार' या दृष्टींनी विष्णुशास्त्री यांचा अभ्यास आपणांस करावयाचा आहे. या तीनहि प्रकारच्या लेखनांत त्यांच्या जीवनाचें हें सर्व तत्त्वज्ञान, त्यांच्या विचारसरणीचे हे सर्व घटक, त्यांना अभिप्रेत असलेल्या मानसिक क्रांतींचीं हीं सर्व लक्षणें दिसून येतात. म्हणून प्रारंभीच तीं सर्व येथे एकत्र सांगितलीं आहेत.

### पाश्चात्त्य टीकापद्धति

टीकाकार या दृष्टीने विष्णुशास्त्री यांनी एक अत्यंत महत्त्वाचें कार्य केलें आहे. त्यांनी सर्व पाश्चात्त्य टीकापद्धति मराठींत आणली. ती पद्धति त्यापूर्वीच्या काळीं भारतांत कोठेहि नव्हती. येथे साहित्यशास्त्र निर्माण झालें होतें. पण त्या शास्त्रांतील सिद्धान्तांअन्वये काव्य-नाटकांचें परीक्षण कोणी करीत नसत. मल्लीनाथ हा फार मोठा टीककार होऊन गेला; पण अर्थबोध करून देणें व फार तर एखादा अलंकार स्पष्ट करणें यापलीकडे त्याने कधीहि टीका केली नाही. त्या काळच्या पंडितांची अभिरुचीहि अतिशय हीन होती. काव्याच्या खऱ्या गुणांचा त्यांना समजच नव्हता. यमक, अनुप्रास, श्लेष इत्यादि शाब्दिक करामती म्हणजेच काव्यगुण असें त्यांना वाटे; आणि त्यामुळे कालिदस, भवभूति, यांच्यापेक्षा तसली करामत करणारा माघ त्यांना श्रेष्ठ वाटे. त्यांच्या काव्य-समीक्षणांतला आणखी एक मोठा दोष म्हणजे गुणदोष-चिकित्सा ते कधीच करीत नसत. मोठ्या लोकांवर टीका करण्याचा आपल्याला अधिकार नाही, अशी त्यांची वृत्ति होती. त्यामुळे सुबंधूसारख्या अत्यंत गचाळ कवीचाहि ते गौरव करतांना दिसतात. तेव्हा तात्पर्य असें की, हिंदुस्थानांत काव्यसमीक्षा, टीका, रसग्रहण हा साहित्यप्रकारच उदयास आला नव्हता. इतिहास, चरित्र, निबंध यांच्याप्रमाणे याहि क्षेत्रांत विष्णुशास्त्री यांना नवाच संसार मांडावयाचा होता.

### दोषदर्शनहि

आणि त्यामुळे टीका म्हणजे काय, ती करणाऱ्याचे अंगीं कोणते गुण असावे लागतात, टीका करतांना गुणदोष-चिकित्सा करणें किती अवश्य असतें, हें सांगण्यापासून त्यांना प्रारंभ करावा लागला. 'ग्रंथावर टीका' या आपल्या निबंधांत त्यांनी

याविषयीचे आपले सव विचार मांडले आहेत. इतर लेखांत "काव्य म्हणजें काय हें एकंदर लोकांस कांहीच कळत नाही " " आमच्या मराठी वाचकांस अद्याप म्हणण्या-सारखी रसिकता आलेली नाही.' असें त्यांनी वारंवार सांगितलेंच आहे, व त्या-संबंधी तेथे स्पष्टीकरणहि केलें आहे. 'ग्रंथावर टीका' या निबंधांतील येथे लक्षणीय विचार एवढाच की, अनेक प्रकारे युक्तिवाद करून, त्यांनी टीकाकाराने निर्भयपणें काव्यांतील गुणांप्रमाणेच दोषांचीहि चिकित्सा केली पाहिजे हें पुनः पुन्हा आवर्जून सांगितलें आहे. ते म्हणतात की, " सर्व गुणांनी संपन्न असा एकहि मनुष्य सापडणार नाही. तसेंच ज्यांत लेशमात्रहि दोष आढळणार नाही, असाहि सापडणें केवळ अशक्य. आता कोणी म्हणतील की, मोठ्यांच्या अंगीं दोष असले तरी ते लहानाने काढूं नयेत; पण हें म्हणणे म्हणजे चंद्रास कलंकी म्हणूं नये, किंवा सूर्यबिंबावरचे काळे डाग पाहूं नयेत, असें म्हणण्यासारखेंच असमंजस होय."

याप्रमाणे टीकाशास्त्रांतले कांही विचार या निबंधांत सांगितल्यावर विष्णु-शास्त्री यांनी 'टेंपेस्ट' व 'तारा' या शेक्सपियरच्या नाटकांच्या मराठींतल्या भाषां-तरांवर पुढील कांही अंकांत, त्याअन्वये टीका केली आहे; पण विष्णुशास्त्री यांचे महत्त्वाचे टीकालेख म्हणजे 'संस्कृत कविपंचक' या ग्रंथांतील होत. ते त्यांनी १८७२ सालींच शालापत्रक या मासिकांतून प्रसिद्ध केले होते; पण हे निबंध आधी लिहिलेले असले तरी निबंधमालेंत त्यांनी सांगितलेलीं टीका-तत्त्वेंच त्यांत अनुसरलेलीं आहेत. अर्थात् हीं सर्व पाश्चात्त्य टीकाशास्त्रांतील तत्त्वें आहेत; आणि वर सांगितल्याप्रमाणे ही पद्धतीच सर्वस्वीं नवीन असल्यामुळे त्या निबंधांचा येथे प्रथम परामर्श केला पाहिजे.

**नवीन टीका**

कालिदास, भवभूति यांच्या काव्य-नाटकांचें समीक्षण करतांना विष्णुशास्त्री यांनी संविधानकाची रचना, स्वभाव-लेखन, शृंगार, वीर, करुणादि रस, भावना, मनाचे स्वाभाविक व्यापार, निसर्ग-वर्णन, प्रसंग-वर्णन, रम्य कल्पना, मधुर कोमल पदरचना इत्यादि काव्यसौंदर्याचे जे खरे घटक त्याअन्वयेच समीक्षा केली आहे. संविधानकाचें परीक्षण करतांना त्यांतील घटनांची स्वाभाविकता, त्यातील संगति-विसंगति, संभाव्यता यांची चर्चा करून महाभारत रामायणांतील मूळ कथेंत कवीने कोणते फेरफार केले आहेत व ते कां केले आहेत, याचाहि विचार ते करतात. वरील कवींचीं बहुतेक कथानकें अशीं उसनीं घेतलेलींच असल्यामुळे हा विचार अवश्यच होता.

हें सर्व समीक्षण करीत असतांना जागोजागीं शास्त्रीबुवांनी कालिदास, भवभूति यांची होमर, शेक्सपियर, मिल्टन वर्डस्वर्थ या पाश्चात्त्य कवि-श्रेष्ठांशीं तुलना केली आहे. तसेच त्या श्रेष्ठ भारतीय कविवरांच्यासंबंधी सर विल्यम जोन्स, गटे इत्यादि पाश्चात्त्य पंडितांनी जे गौरवोद्गार काढले तेहि उतरून दिले आहेत.

आणि शेवटीं रस, कल्पना, सृष्टि-वर्णन इत्यादि गुणांचीं उदाहरणें म्हणून त्या त्या कवीच्या काव्यांतील विपुल उतारे दिले आहेत.

पाश्चात्त्य पद्धति ती हीच. काव्यसौंदर्याचें असें शास्त्रशुद्ध विश्लेषण पौर्वात्य साहित्यशास्त्रांत कोठेंहि आढळत नाही. मूळ कथानकाशीं कवीच्या कथानकाची तुलना करून त्याने केलेल्या फेरफारांची चिकित्सा करणें, हें तर आपल्या साहित्य-शास्त्रकारांच्या स्वप्नांतहि कधी आलें नव्हतें. पाश्चात्त्य कवींच्या काव्य-नाटकांशीं आपल्या कवींच्या काव्य-नाटकांची तुलना ही तर त्यांना शक्यच नव्हती. कारण पाश्चात्त्य जगाच्या अस्तित्वाचीच त्यांना जाणीव नव्हती; पण दुर्दैव असें की, येथल्या कवींची परस्परांशीं चिकित्सक दृष्टीने तुलना, जी सहज शक्य होती, तीहि त्यांनी केली नाही; पण तुलना सहज शक्य होती असें म्हटलें हेंच चूक आहे. स्वतंत्र बुद्धीने कशाची चिकित्सा करण्याचें, काव्यांचीच नव्हे, जीवनांतील कोणत्याहि गोष्टीची चिकित्सा करण्याचें, सामर्थ्यच भारतीय मनाला राहिलेलें नव्हतें.

आपल्या लोकांना विचार करण्याची सवय नाही, त्यांना काव्य म्हणजे काय तें कळत नाही, त्यांच्या ठायीं रसिकता नाही, असें जें विष्णुशास्त्री यांनी ठायीं ठायीं म्हटलें आहे त्याचा हाच भावार्थ आहे. कालिदास असो, भवभूति असो, दंडी असो, सुबंधु असो. त्या जुन्या लोकांना सर्व कवि सारखेच वाटत. या मूढ वृत्तीचाहि विष्णुशास्त्री पुनः पुन्हा निषेध करतात. हे टीकालेख लिहिण्यांत त्यांचा काय हेतु होता, हें यावरून ध्यानांत येईल.

## सर्व कवि समकालीन

प्रत्येक कवीचा स्थल-काल-निश्चय करण्याचा जो प्रयत्न त्यांनी केला आहे त्यामागलाहि हेतु हाच आहे. जुन्या लोकांना सर्व कवि सारखे, तसे सर्व काळहि सारखेच होते. ज्ञानेश्वर आणि मोरया गोसावी, शिवछत्रपति आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्या भेटी घडविण्यांत बखरकारांनाहि कांही वावगें वाटत नसे. मग भक्तिभावाने काव्य वाचणाऱ्या लोकांची कथा काय? कालिदास आणि भवभूति हे समकालीन होते यावर त्यांची अढळ श्रद्धा होती. भवभूतीच्या विवेचनाच्या प्रारंभीं हे दोन कवि समकालीन असणें शक्य नाही, असा निर्णय देऊन विष्णुशास्त्री म्हणतात. "वरील वाद आमच्या वाचकांस बहुधा रुचणार नाही. त्या मनोवेधक आख्यायिकेच्या विरुद्ध जीं प्रमाणें वर दाखविलीं तीं वाचून त्यांचा फार हिरमोड होईल; पण या गोष्टीस इलाज नाही. या जगांत सत्यत्व व मनोहारित्व या गुणांचें साहचर्य नेहमीच आढळतें असें नाही!"

सर्व कवींचीं काव्यें सारखींच रम्य आणि सर्व कवि समकालीन! यांमुळे आणखीहि एक गोंधळ माजतो. या कवीचें काव्य त्याच्या नांवावर व त्या कवीचें आणखी तिसऱ्याच्या नांवावर हा प्रकार मागे सर्रहा चालू होता. 'नलोदय' नांवाचें एक अगदी अधम काव्य कालिदासाच्या नांवावर पूर्वकाळीं खपत होतें. याविषयी

लिहितांना शास्त्रीबुवा म्हणतात, "पुष्कळ सामान्य प्रतीचे व कित्येक अप्रयोजक ग्रंथहि कालिदासाच्या नांवावर मोडत आले आहेत, आणि पूर्वीच्या पंडितांत शोधकता मुळीच नसल्यामुळे ते सर्व त्याच्या मोठ्या नांवावर आजपर्यंत खपलेहि गेले ! कालिदासाच्या कवित्वाची ज्यास यत्किंचित तरी ओळख आहे त्यास वरील 'नलोदय' या क्लिष्ट काव्याच्या कर्तृत्वाविषयी बिलकुल संशय राहणार नाही. संस्कृत कवींच्या कुलगुरूची प्रसन्न व सरस वाणी कोणीकडे आणि हें हठ-कवित्व कोणीकडे !'

आणि तरीहि जुन्या शास्त्रीपंडितांना हा भेद जाणवत नव्हता !

## इतिहास-अभाव

या सर्व घोटाळ्याचें कारण काय? आपल्याकडचा इतिहास-लेखनाचा अभाव ! पुढे निबंधमालेंत 'इतिहास' या निबंधांत हें आपल्या प्राचीन संस्कृतीचें मोठें व्यंग्य होय असें विष्णुशास्त्री यांनी म्हटलें आहे. पण त्याच्याहि आधी तीन-चार वर्षें, हा विचार त्यांच्या मनांत येत होता असें दिसतें. 'संस्कृत कविपंचकां'त त्यांनी तीन-चार ठिकाणीं तो सांगून त्याविषयी मोठा खेद व्यक्त केला आहे. बाणभट्टाविषयी प्रास्ताविक लिहितांना ते म्हणतात, "ज्याप्रमाणे गाढ अंधकारांत रंगरूप, आकारमान, अंतर इत्यादिकांचीं भानें सर्व नष्ट होतात, त्याप्रमाणे एक इतिहासाशिवाय आमच्या साऱ्या ग्रंथसमूहभर गोंधळ माजला आहे. कोणता आधी, कोणता मागून, कोणत्याचा कसा प्रसंग होता इत्यादि गोष्टी समजण्याची मनास मोठी उत्कंठा वाटते ! . . .याप्रमाणे आपल्या देशाचा पुरातन इतिहास नसल्यामुळे आपली व एकंदर जगाचीहि मोठी हानि झाली आहे." याच निबंधांत पुढे त्यांनी म्हटलें आहे, "आपल्या लोकांत पूर्वीपासून एक मोठी गैदी चाल पडलीशी दिसते. ती ही की, शक म्हणून लिहावयाचा नाही. . .प्रस्तुत प्रसंगीं एक मोठी चमत्काराची व अंमळ लज्जेची गोष्ट आमच्या वाचकांस कळविणें आहे. ती ही की, बाणकवि केव्हा झाला याविषयीची आपली उत्कंठा, जी आपले स्वतःचे ग्रंथ तृप्त करण्यास समर्थ झाले नाहीत ती, एका चिनी ग्रंथाने सहज तृप्त केली. ( तो ग्रंथ म्हणजे हुएनसंगाचा ग्रंथ ).

संस्कृत कविपंचकांत कालक्रम आणि भूगोल यांचें महत्त्व अनेक ठिकाणीं विष्णुशास्त्री यांनी सांगितलें आहे, आणि कवींनी स्वतःची माहिती लिहून ठेविली नाही. लोकांनी त्यांचीं चरित्रें लिहिलीं नाहीत आणि इतिहास-लेखन केलें नाही म्हणून वारंवार खेद व्यक्त केला आहे. यावरून, लोकांत रसिकता निर्माण करावी हा जसा या लेखनामागे हेतु होता तसाच युरोपांतील चौदाव्या-पंधराव्या शतकाप्रमाणे येथे प्रबोधन घडवावें हेंहि त्यांचें उद्दिष्ट होतें, हें स्पष्ट होतें.

## परखड टीका

'ग्रंथावर टीका' या निबंधांत गुणांप्रमाणे दोषांचेंहि विवरण करण्यास हरकत नाही असें विष्णुशास्त्री यांनी सांगितले. तें या ग्रंथांत त्यांनी आचरूनहि

दाखविलें आहे. सुबंधु या कवीच्या 'वासवदत्ता' या कथेवर त्यांनी अगदी परखड टीका केली आहे; आणि त्यांतील कथानक असंभाव्य, तर्कहीन, विसंगत असून खऱ्या रसिकास आनंद देण्यासारखें त्यांत कांही नाही, असा निर्णय दिला आहे. 'दंडीच्या दशकुमार चरिता'विषयी जवळपास असाच अभिप्राय त्यांनी दिला आहे.

'टॅपेस्ट' व 'सिबेलाइन-तारा' या दोन नाटकांचीं मराठींत भाषांतरें झालीं होतीं. त्यांवर विष्णुशास्त्री यांनी जे अभिप्राय दिले तेहि पाश्चात्त्य टीकापद्धतीचा अवलंब करूनच लिहिले आहेत. मनुष्यस्वभावाची माहितगारी, भावना, यथापात्र भाषा, वातावरण या गुणांचा गौरव करून कण्वांच्या आश्रमांत वाढलेली शकुंतला व निर्जन बेटावर वाढलेली मिरांदा यांची मोठी हृद्य तुलना त्यांनी केली आहे. सिंबेलाईन हें नाटक शास्त्रीबुवांना आवडलें नाही. त्यावर अभिप्राय देतांना त्यांनी मूळ शेक्सपियरच्या कथानकावरहि टीका करण्यास कमी केलें नाही. "शेक्स-पियरच्या नाटकांत पाहतां प्रस्तुत गुण-संविधानकाच्या रचनेचा – प्राय: पूर्णपणें आढळत नाही. कथासूत्रांत गुंतागुंत झालेली दृष्टीस पडते, व कोठे कोठे असंबंधत्वहि नजरेस येतें. प्रस्तुत नाटकांतील कथानक मौजेचें असलें तरी त्यांत अनेक प्रकारचे दोष आहेत," असें ते म्हणतात.

आता विष्णुशास्त्री यांच्या टीका-वाङ्मयापैकी एक मोठा प्रबंध तेवढा राहिला. तो म्हणजे मोरोपंताची कविता हा होय. हा प्रबंध खूपच मोठा आहे. तरी साहित्य-समीक्षेच्या दृष्टीने त्याचा फारसा विचार करण्याचें कारण नाही. कारण त्यांत साहित्य-सौंदर्यापेक्षा इतर अवांतर गोष्टींचीच चर्चा फार आहे, तेव्हा त्याचा परामर्श अगदी थोडक्यांत करणेंच युक्त ठरेल.

**मोरोपंत**

प्रस्तुत प्रबंधांतील मुख्य प्रश्न 'कवि ही संज्ञा मोरोपंतास लावतां येईल की नाही ?' असा आहे; आणि ही संज्ञा त्याला पूर्णपणें लागू पडेल, असें त्याचें उत्तर विष्णुशास्त्री यांनी दिलें आहे; पण असें उत्तर त्यांनी दिलें असलें तरी कालि-दास, भवभूति यांच्या काव्यांचें विवेचन करतांना, रस, कल्पनाशक्ति, मनुष्य-स्वभावाचें ज्ञान, मनाचे व्यापार, सृष्टि, यांचें वर्णन, स्वभाव-लेखन इत्यादि काव्य-गुणांचीं उदाहरणें देऊन जसें त्यांनी सौंदर्यदर्शन घडविलें आहे तसें या विशाल प्रबंधांत कोठेहि घडविलेलें नाही. कांही रसभरित प्रसंगांचा एका ठिकाणीं फक्त निर्देश केला आहे. मग इतर गुणांचें काय ? शेवटच्या लेखांत शास्त्रीबुवांनी स्पष्ट म्हटलें आहे की, "आमच्या महाराष्ट्र कवींनी सामान्यत: पाहतां अर्थव्यंजनाच्या पलीकडे थोडेंच लक्ष दिलेलें आढळतें. अर्थ शब्दांनी व्यक्त झाला म्हणजे झालें. मग शब्दांच्या ठाकठिकीकडे किंवा सौंदर्याकडे लक्ष पुरवावयाचें नाही, असा त्यांचा प्रघात आढळतो ! ज्याने संस्कृत किंवा इंग्रजी कवितेचें रूप पाहिलें असेल त्यास प्रस्तुत कवीच्या ठायीं पदलालित्य, माधुर्य, प्रसाद इत्यादि गुण असावे तसे नाहीत हें

सहज वाटणार आहे." असें होण्याचें कारणहि शास्त्रीबुवांनी दिलें आहे. ते म्हणतात, "मोरोपंताचा जर संस्कृत पंचकाव्यावर व नाटकादिकांवर सतत परिश्रम असता तर त्यांतील सर्व विशेष त्याच्या कवितेंत दृष्टीस पडल्यावांचून राहतेना."

या सगळ्याचा भावार्थ असा की, संस्कृत वा इंग्रजी अभिजात साहित्यांत जे सौंदर्यगुण दृष्टीस पडतात ते मोरोपंताच्या कवितेंत आढळत नाहीत.

'विद्वत्त्व व कवित्व' या निबंधांत जुन्या शास्त्री-पंडितांना काव्याभिरुचि नव्हती हें दाखवितांना मोरोपंताविषयी हाच अभिप्राय, विष्णुशास्त्री यांनी दिला आहे. ते म्हणतात, "या शास्त्री-पंडितांच्या मतें, मोरोपंतासारखा कवि आजपर्यंत झाला नाही व पुढे होणार नाही; पण त्यांस एवढें समजत नाही की, यमक-प्रासांची गर्दी ही बुद्धीची दर्शक होय, पण ही बुद्धि व कवित्व एक नव्हेत."

'कविता' या निबंधांत तर वामनपंडित, मोरोपंत यांच्याविषयी विष्णुशास्त्री यांनी फारच स्पष्टपणें लिहिलें आहे. त्यांच्या मतें शाहिरांच्या लावण्या किंवा पोवाडे हीच मराठी भाषेची आद्य कविता. कारण, वामनपंडित, मोरोपंत वगैरे कवींनी मराठी भाषेंत आपली कविता लिहिली, तरी ती संस्कृत भाषेच्याच केवळ धाटणी-वर असल्यामुळे तीस मराठी कविता म्हणण्यापेक्षा संस्कृत कवितेचें रूपांतर म्हणावें हें वाजवी होय.

## तत्त्वचर्चा

साहित्य-समीक्षा हें एक शास्त्र आहे. साहित्याविषयी कांही सिद्धान्त सांगून त्यांचें विवरण करणें हा त्याचा एक भाग, आणि त्या सिद्धान्ताअन्वये काव्य-नाटकादि साहित्यकृतींचें परीक्षण करणें हा दुसरा भाग. विष्णुशास्त्री यांनी केलेल्या परीक्षणांचा विचार येथवर केला. पाश्चात्त्य समीक्षा-पद्धति मराठींत आणणें हें त्यांचें महत्त्वाचें कार्य होय, हें तेथे आपण पाहिलें. आता साहित्याविषयी त्यांनी जे तात्त्विक सिद्धान्त सांगितले आहेत त्यांची चर्चा करावयाची आहे.

खरें म्हणजे असे सिद्धान्त फारसे नाहीत. एक-दोनच आहेत. त्यांतहि महत्त्वाचा एकच आहे. 'कवित्वास अज्ञानावस्था विशेष अनुकूल असते.' 'कवितेचा ज्ञान-संपन्नतेच्या काळांत उत्तरोत्तर ऱ्हास होत जातो' हा तो सिद्धान्त होय. 'संस्कृत कवि-पंचक' या ग्रंथांत प्रथम बाणभट्टाच्या प्रस्तावनेंत त्यांनी तो मांडला आणि पुढे निबंधमालेंतील 'विद्वत्त्व आणि कवित्व' यांत त्याचा सविस्तर प्रपंच केला. या सिद्धान्ताची विशेष चर्चा करण्याचें कारण नाही. सध्या आता हा अगदी भ्रामक ठरला आहे. तो कोणीहि मानीत नाही. ज्या मेकॉलेच्या अनुकरणाने विष्णुशास्त्री यांनी हा सिद्धान्त मांडला त्याने सुद्धा उत्तरकाळांत तो रद्द ठरविला होता. तेव्हा त्याचें महत्त्व फारसें नाही. पण 'विष्णुशास्त्री यांची साहित्य-समीक्षा' आपण पाहत आहों तेव्हा विषयपूर्तीसाठी थोडी चर्चा करूं.

'विद्वत्त्व आणि कवित्व' या निबंधांत त्यांनी पुढीलप्रमाणे विधानें केलीं आहेत. व्याकरण, न्याय, मीमांसा इत्यादि शास्त्रें कवित्वास अपायकारक होत; कवीचें मन व तत्त्वज्ञानाचें मन स्वभावतः परस्परविरुद्ध होत; पहिल्याचा विषय कल्पना व दुसऱ्याचा विषय सत्यासत्य विवेचन. अप्रबुद्धतेच्या काळांत कल्पनाशक्ति जशी उद्दाम असते तशी पुढे कधीहि असत नाही. राष्ट्राच्या आद्य अवस्थेंत उत्कृष्ट कविता उदय पावते. पुढे विचारशक्तीचें प्राबल्य होऊन कवित्वाचा ऱ्हास होतो.

## अज्ञान व काव्य

यांतला एकहि सिद्धान्त खरा नाही, हें आता जगाच्या इतिहासावरून स्पष्ट दिसत आहे. आज जगांतलीं बहुतेक सर्व राष्ट्रें प्रौढ अवस्थेला आलेलीं आहेत. तरीहि रवीन्द्रनाथ टागोर, व्हिक्टर ह्यूगो, टेनिसन, शरच्चंद्र, गटे, हरिभाऊ, मुनशी प्रेमचंद, महादेवी वर्मा, टॉलस्टॉय, गॉर्की यांसारखे कवि, कादंबरीकार, नाटककार उदयास येत आहेत. तेव्हा विद्वत्त्व आणि कवित्व यांचा मुळांत कांही विरोध आहे, हें खरें नाही. मागल्या काळाकडे पाहिलें तरी हेंच दिसेल. वाल्मीकि, व्यास, कालिदास हे विद्वानहि होते आणि कविहि होते. त्यांचा काळहि अज्ञानावस्थेचा नव्हता. सर्व प्रकारचीं शास्त्रें तेव्हा उदयास आलीं होतीं व समाज चांगला प्रौढ झाला होता. तर्काच्या दृष्टीने पाहिलें तरी वरील सिद्धान्त चुकीचाच ठरतो. कवीला कल्पना सुचतात त्या अज्ञानामुळे सुचतात, हें जें गृहीत धरलेलें आहे तेंच चुकीचें आहे. नदी, चंद्र, कमल, स्त्री, हरिणशावकें, यांविषयीचें संपूर्ण शास्त्रीय ज्ञान कालिदासाला होतें. तरी त्यांवर त्याने रम्य कल्पना केल्या. कवीला साम्य दिसतें म्हणून तो तशी कल्पना करतो. तिच्याशीं अज्ञानाचा कांही संबंध नाही. तेव्हा काव्याला समाजाची व व्यक्तीची अज्ञानावस्था कारण असते, हा सिद्धान्त अगदी निर्मूल होय.

## निराळी उपपत्ति

स्वतः विष्णुशास्त्री यांनीहि याच्या अगदी विरुद्ध नव्हे, पण अगदी निराळी अशी काव्यनिर्मितीची उपपत्ति 'इंग्लिश कविता' या आपल्या निबंधांत मांडली आहे. शेक्सपियर, मिल्टन या कवींच्या काळीं इंग्लंड चांगलें प्रौढ दशेस आलें होतें. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत तर ती प्रौढता अगदी परिपक्व झाली होती. तरी त्या काळांत शेक्सपीयर, बायरन् वर्डस्वर्थ, शेली, कीट्स, असे कवि झाले. हे कां झाले ? विष्णुशास्त्री म्हणतात, "ज्या काळीं मोठाल्या लढाया, राज्यक्रांति, वगैरे लौकिक महत्त्वाच्या गोष्टी घडून येतात व राष्ट्रचें राष्ट्र जसें काय खळबळून जातें, त्याच संधीस वक्तृत्व, कविता, इतिहास इत्यादिकांचा उदय होतो, असा अलीकडील इतिहासकारांनी एक सिद्धान्त काढला आहे, आणि या महासिद्धान्ताचा प्रत्यय आज अनेक वेळा घडून आला आहे." हें सांगून शास्त्रीबुवांनी, पुढे याचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. तेव्हा कवित्वाच्या उदयास अज्ञानावस्था लागते, विद्वत्तेचा,

विचारशक्तीचा व तिचा विरोध असतो, हा सिद्धान्त विष्णुशास्त्री यांना स्वत:लाच तितकासा मान्य होता, असें दिसत नाही.

## उपयोग काय ?

आता राहिलेल्या एका मुद्द्याचा विचार करून 'टीकाकार विष्णुशास्त्री' हें प्रकरण संपवूं. 'संस्कृत कविपंचक' या पुस्तकाच्या उपोद्घातांत विष्णुशास्त्री यांनी म्हटलें आहे की, संस्कृत कवींविषयीचें आम्ही जें निरूपण करणार त्याचा उपयोग काय, असें कोणी विचारतील. हाच प्रश्न त्यांनी 'इतिहास' या निबंधाच्या प्रारंभीं व जॉनसनच्या चरित्राच्या प्रारंभीं उपस्थित केला आहे. याचा उपयोग काय ? इतिहासाचा उपयोग काय ? चरित्राचा उपयोग काय ? काव्य-सौंदर्य-समीक्षणाचा उपयोग काय ? आपल्या समाजाला त्या काळीं किती जडता, मूढता आली होती तें यावरून कळून येईल. असले प्रश्न आज कोणाच्या स्वप्नांतहि येत नाहीत. कोणीं तसे विचारलेंच तर त्याचें हसूं होईल. एवढें मानसिक परिवर्तन गेल्या शंभर-सव्वाश वर्षांत घडून आलें आहे. ज्या थोर पुरुषांच्या प्रयत्नाने हें परिवर्तन घडून आलें. त्यांतच विष्णुशास्त्री यांची गणना होते. हें परिवर्तन घडविणें हेंच त्यांचें जीवितकार्य होतें.

प्रस्तुतचा प्रश्न असा आहे की, संस्कृत कवींच्या काव्याच्या समीक्षणाचा उपयोग काय ? असे प्रश्न विचारणाऱ्यांना विष्णुशास्त्री प्रथम अगदी हेटाळून टाकतात. ते म्हणतात, "सुवासिक पुष्पांचा वास घेऊन काय करावयाचें आहे, सुंदर युवतींच्या लीला पाहण्यांत काय अर्थ आहे, हे प्रश्न कोणत्याहि मनुष्याच्या तोंडून प्राय: येणार नाहीत व आलेच तर त्या धन्य पुरुषाच्या ठायीं ब्रह्मदेवाने आपली कर्तबगारी कांही विशेष रीतीने ओतली आहे, अशी कल्पना करणें प्राप्त होतें. इतिहासाविषयी असा प्रश्न विचारणारा मनुष्य कल्पनेचा जड ठरून वृद्धप्रमदान्यायाने उपहास्य होतो, असेंच त्यांनी त्या निबंधांत म्हटलें आहे. तेव्हा असा प्रश्न विचारणारांचा त्यांना अतिशय तिरस्कार वाटे, हें उघड दिसतें. पण उपहास केल्यानंतर त्यांनी जीं उत्तरें दिलीं आहेत तीं आपल्या दृष्टीने लक्षणीय आहेत. कारण लेखणीचा प्रपंच करून त्यांना काय साधावयाचें होतें तें त्यावरून स्पष्ट होतें.

## राष्ट्र व भाषा

संस्कृत-काव्यविवेचनाचा उपयोग काय या प्रश्नाला त्यांचें उत्तर असें : प्रस्तुत विषयाच्या निरूपणाचें पहिलें मुख्य कारण त्याचें रमणीयत्व; पण या उपयोगाचें ज्यांस महत्त्व वाटत नाही त्यांना इतकेंच सांगतों की, या विषयापासून आपल्या लोकांस वरील मुख्य उपयोगाखेरीज दुसरेहि दोन मोठे उपयोग होणारे आहेत. ते, एक राष्ट्राच्या संबंधाने व एक देशभाषेच्या संबंधाने, असे आहेत.

विष्णुशास्त्री यांच्या सर्व लेखनामागे, सर्व उद्योगांमागे या दोन महत्त्वाच्या प्रेरणा होत्या. राष्ट्र व देशभाषा ! त्यांनी साहित्य-समीक्षण केलें त्यांत अर्थातच सौंदर्य-दर्शन हा मुख्य हेतु होता; पण तीं समीक्षणें लिहीत असतांनाहि, त्यांचें वरील

व्यवधान कधी सुटलेलें नव्हतें. या प्रेरणांचे ताणेवाणे या पटांतहि सारखे विणलेले दिसतातच.

' संस्कृत कविपंचक ' लिहिण्याचा उद्देश सांगतांना ते म्हणतात, " राष्ट्राच्या संबंधाने याचा उपयोग हा की, सध्या आम्हांस आमच्याविषयीचें जें लज्जास्पद अज्ञान आहे तें नाहीसें होऊन आपली योग्यता वास्तविक किती आहे हें चांगलें कळून येईल... इंग्रेज लोकांची विद्या व वैभव पाहून आम्ही पूर्वी केवळ चकित होऊन जात होतों व त्यांची योग्यता आम्हांस कधीहि यावयाची नाही असें म्हणत होतों. आमचे समज आता फिरले आहेत . . . बुद्धीच्या मानाने पाहतां आम्ही इंग्रेजांहून मुळीच कमी नसून ज्या कामांत आम्ही मन घालूं त्यांत त्यांची बरोबरी करूंच करूं."

भवभूतीच्या विवेचनाचा समारोप करतांना, या उद्योगाचा हेतु त्यांनी पुन्हा स्पष्ट केला आहे. तो हा की, " नेणत्या मुलास त्याच्या बापाचें भुईंत पुरलेलें अपार द्रव्य पुन: दृष्टिगोचर करावें; " " सध्याच्या निकृष्ट स्थितीस्तव बाकीच्या सर्व जगास सर्वथा तिरस्कारास्पद झालों असतांहि आपणांस ज्या एकाकडे पाहून सर्व अद्याप मान देताहेत – तें हें विद्यारूप महाभांडार आहे. "

हें भांडार किती संपन्न आहें हें हिंदी जनांना चांगलें उमगावें म्हणून पाश्चात्त्य पंडितांनी त्याचा जो गौरव केला आहे, त्यांतून अनेक अवतरणें विष्णुशास्त्री यांनी दिलीं आहेत. सर विल्यम जोन्स म्हणतो, " भारतीय साहित्याकडे कोठेंहि दृष्टि टाका. अनंताची कल्पना समोर उभी राहते. इतर देशांच्या साहित्याच्या राशींमध्ये हें साहित्य हिमालयासारखें उत्तुंग दिसतें. त्याचें अध्ययन कोणालाहि एका जन्मांत पुरें करतां येणार नाही. " " पृथ्वी आणि स्वर्ग यांचा मधुर संगम तुम्हांला पाहवयाचा आहे काय ? मग शाकुंतल पाहा. " असे जर्मन महाकवि गटे याचे उद्गार आहेत. " शाकुंतलाचा जगविख्यात कर्ता कालिदास हा, निसर्गाचा मानवी मनावर केवढा प्रभाव असतो त्याचें उत्कृष्ट वर्णन करतो. भावनांचा मधुर-कोमल आविष्कार आणि संपन्न कल्पनाशक्ति यांमुळे जगाच्या कवि-मालिकेंत त्याला श्रेष्ठ स्थान मिळालें आहे. " असा गौरव अलेक्झँडर हंबोल्ट याने केला आहे. मोनियर विल्यम्स याने ' हा भारताचा शेक्सपियर आहे, ' असे धन्योद्‌गार काढले आहेत.

भारतीयांचें हें सुप्त धन, विस्मृतींत गेलेलें धन, हें पैतृक धन त्यांना पुन्हा युरोपीय पंडितांनी दाखविलें; म्हणून त्यांचे आम्हांवर अनंत उपकार आहेत, असा ऋणनिर्देश विष्णुशास्त्री ठायीं ठायीं करतात तो राष्ट्रावरील भक्तीमुळेच होय.

### कृतज्ञता

या पाश्चात्त्यांच्या उपकाराच्या कल्पनेने विष्णुशास्त्री इतके भारून जातात की, प्रसंगवशात् कांही कारणाने त्यांच्यावर टीका करण्याची वेळ आली तर, आपण कृतघ्नता तर दाखवीत नाही ना, अशी त्यास शंका येते. ते म्हणतात, " त्यांवर टीका करण्याचा हक्क चालवावयास आम्ही मुखत्यार आहों हें खरें, पण तो हक्क कडक-

पणाने चालविणें आम्हांस उचित होणार नाही. कां की, आमच्या प्राचीन भाषेचा पुरस्कार पाश्चात्त्य पंडितांनी जर घेतला नसता तर तिची काय दुर्दशा झाली असती, हें सांगवत नाही. ग्रीक व रोमन ग्रंथांची रानटांच्या स्वाऱ्यांत जशी धुळधाण झाली व संस्कृत ग्रंथांचा मुसलमानांच्या तडाक्यांत जो नाश झाला तो मनांत आणला असतां, ज्या रसिक व थोर मनाच्या लोकांनी आमच्या जुन्या विद्येचें संपादन केलें, तिचें रक्षण केलें व तिचा सार्वत्रिक प्रसारहि केला, त्यांचे उपकार साऱ्या भारत-वर्षीय जनांवर केवढे आहेत हें सहज ध्यानांत येईल. "

भारतीयांत स्वत्व-जागृति करणें हें विष्णुशास्त्री यांचें जीवितकार्य होतें. संस्कृत साहित्य-भांडाराच्या दर्शनाने तें साधेल म्हणून त्यांनी त्याच्या सौंदर्याचें दर्शन त्यांना घडविलें; आणि या कामीं पाश्चात्त्य पंडितांनी अनमोल साह्य केलें म्हणून त्यांच्याविषयीची पराकाष्ठेची कृतज्ञता त्यांच्या मनांत वसत आहे. त्यांच्या देशप्रेमाचें हें मोठें मनोज्ञ दर्शन आहे.

- १२ -

# चरित्रकार विष्णुशास्त्री

### नवी ग्रंथ-पद्धति

साहित्य-समीक्षा लिहिण्यांत विष्णुशास्त्री यांचें जें उद्दिष्ट होतें तेंच चरित्र लिहिण्यांतहि होतें. त्यांना या देशांत मानसिक परिवर्तन घडवावयाचें होतें; लोकाभिरुचीस वळण लावावयाचें होतें; स्थल-कालाची चिकित्सा करणारी ऐतिहासिक दृष्टि लोकांना द्यावयाची होती; येथे प्रबोधनयुग निर्माण करावयाचें होतें; पाश्चात्त्य विद्येचा जो परिपाक इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांत झाला तो त्यांना येथे घडवून आणावयाचा होता; देशाभिमान ही वृत्तीच येथे नव्हती ती त्यांना जागृत करावयाची होती; आणि यासाठीच चरित्र-लेखन ही नवी ग्रंथ-पद्धति त्यांनी सुरू केली. डॉ. जॉनसन या चरित्र-ग्रंथाच्या प्रारंभीं तो ग्रंथ लिहिण्याचीं कारणें सांगतांना, ही एक नवी ग्रंथ-पद्धति आहे, हें एक कारण त्यांनी सांगितलें आहे. राष्ट्रीय संसारांत ज्याप्रमाणे त्यांना अनेक नव्या पद्धति निर्माण करावयाच्या होत्या त्याचप्रमाणे साहित्य-संसारांतहि निर्माण करावयाच्या होत्या. टीका ही नवी पद्धति, चरित्र ही नवी पद्धति, निबंध ही नवी पद्धति. अलीकडे यांना वाङमय-प्रकार म्हणतात. विष्णुशास्त्री यांनी त्यांना ग्रंथ-पद्धति म्हटलें आहें. त्यांतील चरित्र ही जी नवी ग्रंथ-पद्धति त्यांनी सुरू केली तिचा परामर्श आता करावयाचा आहे.

### उपयोग काय ?

विष्णुशास्त्री यांनी जे टीका-लेख लिहिले त्याच्या आरंभीं त्यांनी एक प्रश्न उपस्थित करून त्याचें उत्तर दिलें आहे. वाचक म्हणतील की, या टीकेचा उपयोग काय ? हाच प्रश्न जॉनसनच्या चरित्राविषयी लोक विचारणार. कारण अशा तऱ्हेचीं चरित्रें पूर्वी भारतांत केव्हाहि लिहिलीं गेलीं नव्हतीं. जीं चरित्रें लिहिलीं

गेलीं तीं सर्व देवादिकांचीं व संतांचीं, आणि त्यांनी केलेले अद्‌भुत चमत्कार हाच त्यांचा मुख्य विषय. डॉ. जॉनसन हा त्या कोटींतला मुळीच नव्हे. मग त्याच्या चरित्राचा उपयोग काय ? विष्णुशास्त्री यांनी प्रारंभींच या शंकेचें निरसन केलें आहे. अशा चरित्रापासून संसारास व लोकव्यवहारास उपयोग होतो. त्यापासून जो सदुपदेश प्राप्त व्हावयाचा तो सार्वभौम राजांच्या लढाया वाचल्यापासून होणार नाही, तर सामान्य लोकांच्या चरित्राच्या वाचनानेच होणार. सामान्य लोकांस ज्या अडचणी व जे प्रसंग येतात ते त्यांच्या सारख्याच मनुष्यांनी कसे टाळले व त्यांतून ते कसे उदयास आले हें समजल्यानेच तो हेतु साध्य होतो. या दृष्टीनें पाहतां शिकंदर, कोलंबस किंवा वॉशिंग्टन यांच्या चरित्रांपेक्षाहि जॉनसनसारख्यांचें चरित्रच जास्त उपयुक्त होय.

विष्णुशास्त्री यांना लोकाभिरुचीस वळण लावावयाचें होतें. असें वर म्हटलें आहे, त्याचा अर्थ यावरून स्पष्ट होईल. मानवी, वास्तवनिष्ठ चरित्राची त्या काळीं लोकांना अभिरुचीच नव्हती. ती प्रथम निर्माण करून मग तिचें पोषण करावयाचें, असें दुहेरी कार्य त्यांच्या पुढे होतें. डॉ. जॉनसनचें चरित्र लिहून त्यांनी तें साधलें आहे.

## वास्तवाशीं ओळख

अलीकडे चरित्रें लिहिलीं जातात त्यांना 'काल आणि कर्तृत्व', 'व्यक्ति आणि वाङ्मय' अशीं नांवें दिलीं जातात. त्यांचा आशय स्पष्ट आहे. व्यक्तीच्या चरित्रांत पार्श्वभूमि म्हणून तिच्या काळची सामाजिक, राजकीय, धार्मिक इत्यादि सर्व परिस्थिति बारकाईने वर्णिलेली असते. व्यक्ति ही त्या परिस्थितीशीं बद्ध असते, त्या परिस्थितीमुळे तिच्या जीवनाचें रूप पुष्कळ अंशीं निश्चित होतें हा सिद्धान्त यांत गृहीत धरलेला असतो; पण व्यक्तीच्या कर्तृत्वाला परिस्थितीमुळे वळण लागत असतें हा विचारच मागल्या काळीं चरित्रकारांच्या मनांत कधी आलेला दिसत नाही. महिपतीनें किंवा बरखरकारांनी लिहिलेलीं चरित्रें पाहिलीं की हें सहज ध्यानांत येईल. त्यांचे चरित्रनायक सर्व अवतारी पुरुष होते. परिस्थितीमुळे त्यांच्या कर्तृत्वावर परिणाम होणें हें त्यांना शक्यच वाटत नसे. त्यांनी अवतार घेतला, लोकांचें तारण केलें आणि ते निजधामाला निघून गेले. ज्ञानेश्वर किंवा समर्थ यांच्या चरित्रांत त्यांच्या ग्रंथांची सुद्धा नीट माहिती दिलेली नाही. त्या चरित्रांत आज वर्णितात तशी व्यक्तीहि नाही आणि वाङ्मयहि नाही. सारा भर भिंत चालविली, गाय जिवंत केली, देवळाचें तोंड फिरविलें, लक्ष चौऱ्यायशीचा चुकविला फेरा, यांवर आहे. हिंदी जनांच्या मनाचें पोषण गेलीं अनेक शतकें या अद्‌भुतावर, अवास्तवारच होत होतें. म्हणूनच ते राज्यकारभार, व्यापार, युद्ध, समाज-संघटना या प्रत्येक क्षेत्रांत अपयशी होत होते. पाश्चात्त्य विद्येमुळे मुख्य क्रांति कोणती झाली असेल तर ती ही की, वास्तवाशीं आपली ओळख झाली. पण प्रारंभीं ती सर्व इंग्रजी वाङ्मयाच्या व भाषांतरित वाङ्मयाच्या साह्याने होत होती. मराठींत तसें साहित्य निर्माण करून

बहुजनांपर्यंत ती क्रांति पोचवावी हा विष्णुशास्त्री यांचा उद्देश होता. म्हणूनच त्यांनी जॉनसन हा विषय निवडून त्याचें चरित्र अगदी अर्वाचीन पद्धतीने लिहिलें. त्यांत इंग्लंडची राजकीय, सामाजिक सर्व प्रकारची स्थिति त्या काळीं कशी होती याचें तपशीलवार वर्णन त्यांनी केलें आहे. इंग्लंडमध्ये राजकीय पक्ष कोणते होते, राजाचें स्थान काय होतें, लोकांचें स्वातंत्र्यप्रेम कसें प्रखर होतें, अमेरिकेंत क्रांति झाली तिच्यामागे प्रेरणा कोणत्या होत्या हें सर्व त्यांनी विवरून सांगितलें आहे; आणि या संदर्भात जॉनसनची राजकीय तत्त्वप्रणालि कोणती होती याची चर्चा केली आहे. अशा तऱ्हेची चर्चा पूर्वीच्या काळच्या चरित्रांत केव्हाहि आढळावयाची नाही.

## बॉसवेल आदर्श

परिस्थितीमुळे जशी व्यक्तीची घडण होते तशीच तिच्या भोवतालचे जे आप्त, मित्र, सुहृद, यांच्यामुळेहि होत असते, हें जाणून विष्णुशास्त्री यांनी गॅरिक, साव्हेज व बॉसवेल यांचीहि माहिती प्रसंगाने दिली आहे. गॅरिक हा प्रख्यात नट तर डॉ. जानसनचा शिष्यच होता. शेक्सपियरचीं मागे पडलेलीं नाटकें त्याने रंगभूमीवर आणलीं आणि त्या राष्ट्राच्या महाकवीविषयी सर्वांच्या ठायीं पुन्हा अतिशय प्रेम उत्पन्न करून लोकाभिरुचीस नवेंच वळण लावलें. लोकाभिरुचीस नवें वळण लावणें हें शास्त्रीबुवांचें उद्दिष्ट होतें हें वर अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. तसें असल्यामुळे तें कार्य करणाऱ्या लोकांचें त्यांना मोठें कौतुक असे व त्यांचा ते आवर्जून उल्लेख करतात. जॉनसनच्या आधी, आडिसनने लोकाभिरुचीस नवें वळण लावलें, जॉनसनने लोकांस विचार करावयास शिकविलें, बॉसवेलने जॉनसनचें चरित्र लिहून अपूर्व ग्रंथपद्धति सुरू केली, असें कौतुक निबंधमालेंत अनेक ठिकाणीं दृष्टीस पडतें. विष्णुशास्त्री यांनी आपलें ध्येय निश्चित केलें तें या अशा लोकांच्या ग्रंथांच्या अभ्यासामुळेच केलें, हें यावरून स्पष्ट दिसतें. बॉसवेलने जॉनसनचें जें चरित्र लिहिलें त्याचें त्यांनी जें वर्णन केलें आहे त्यावरून तो आदर्श पुढे ठेवूनच त्यांनी जॉनसनचें चरित्र लिहिलें असावें याविषयी शंका राहत नाही. बॉसवेलच्या चरित्राचे मुख्य गुण कोणते ? निःसीम सत्यभक्ति, मनुष्यस्वभावाचें ज्ञान आणि त्यांत मुख्य नायक, त्याचें मंडळ व त्याचा अवघा काळ यांचें आलेलें प्रतिबिंब. शास्त्रीबुवा म्हणतात तसा प्रकार इतरत्र कोठेहि नाही. त्याच्या ग्रंथाची लोकमान्यता अद्याप पहिल्यासारखी असल्याचें बीज तेंच होय.

## मित्रपरिवार

साव्हेज हा जॉनसनचा परम मित्र. दोघेहि समानशील. ते दोघे रात्रीचे बाहेर पडून पहाटेपर्यंत रस्त्याने भटकत असत; आणि भटकतांना काय करीत ? जगाच्या उलाढाली ! अनेक राजांना ते पदच्युत करीत, नव्या राज्यपद्धति प्रस्थापित करीत, युरोपांतल्या सर्व राष्ट्रांना नवे कायदे करून देत आणि जगाची नाना प्रकारांनी

सुधारणा घडवून आणीत. रात्रभर असें विधानसभेचें काम केल्यावर त्यांना थकवा येई, न्याहारी हवीशी वाटे; पण खिशांत दोन दमड्याहि सापडत नसत !

जॉनसनच्या क्लबची ही अशीच माहिती विष्णुशास्त्री यांनी मुद्दाम दिली आहे. या क्लबांत बर्क, गिबन, ग्यारिक, गोल्ड्स्मिथ, रेनॉल्डस, फॉक्स, सर विल्यम जोन्स असे त्या वेळेचे अनेक विख्यात पुरुष दर आठवड्यास जमत असत व इंग्रजी भाषेंतील नव्या-जुन्या ग्रंथकारांविषयी चर्चा करीत असत. ती चर्चा लोकांना इतकी महत्त्वाची वाटे की, त्या सभेंत ग्रंथाविषयी जो निर्णय होई त्यावर त्या ग्रंथाचें भवितव्य अवलंबून असे. मित्रपरिवाराच्या या वर्णनामुळे जॉनसनचें व्यक्तिमत्त्व अगदी स्पष्ट होतें हें सांगावयास नकोच.

## निष्पक्ष वृत्ति

चरित्र ही जी ग्रंथपद्धति तिचीं कांही लक्षणें वर सांगितलीं. चरित्रनायकाच्या गुणांप्रमाणे त्याचे दोषहि दाखवून देणें, त्यांची चिकित्सा करणें हें तिचें आणखी एक महत्त्वाचें लक्षण. ती चिकित्सा करतांनाहि विष्णुशास्त्री यांना पुन्हा तसें करणें कसें योग्य आहे हें वाचकांना समजावून देणें अवश्य वाटलें. कारण ही पद्धत पूर्वी येथे नव्हती. किंबहुना दोषचिकित्सा करणें युक्त नव्हे असेंच लोकमत येथे होतें. थोर कवीच्या काव्यांतले दोष दाखविणें युक्त नाही, आपला तो अधिकार नाही, हा जसा पूर्व काळीं समज होता तसाच चरित्रनायकावर कोणत्याहि कारणाने टीका करणें योग्य नव्हे, असाहि समज होता. म्हणून प्रथम दोषचिकित्सेचें समर्थन विष्णुशास्त्री यांना करावें लागलें. तें करतांना तेथे जो मुद्दा त्यांनी मांडला होता तोच येथे मांडला आहे. तो म्हणजे मानवाचें अपूर्णत्व. "दोषांचा सर्वथा अभाव हा एक परमेश्वराच्या ठायीं मात्र संभवतो. मनुष्यांत सर्वगुणसंपन्न व सर्व दोषविवर्जित असा कोणीहि नाही. यास्तव थोर पुरुषाचा गौरव जसा अवश्य तसाच त्याचा हीनपणा निष्पक्षपाती वृत्तीने सांगणेंहि जरूर आहे. अशामुळे त्या चरित्रापासून जो लाभ व्हावयाचा तो नष्ट होऊन त्याजवरची पूज्य-बुद्धि उडून जाते इत्यादि समजुती खोट्या आहेत."

अशी प्रस्तावना करून जॉनसनच्या बारीक-मोठ्या सर्व दोषांचें वर्णन विष्णुशास्त्री यांनी केलें आहे. वास्तविक जॉनसनबद्दल त्यांना पराकाष्ठेची भक्ति वाटत असे. ग्रंथलेखनाच्या बाबतींत तोच त्यांचा आदर्श होता. आपल्या नव्या विद्वानांनी तोच आदर्श पुढे ठेवावा, असें त्यांनी शेवटीं आवर्जून सांगितलें आहे. तरीहि त्यांनी विभूतिपूजक वृत्ति कोठेहि दाखविली नाही. जॉनसनच्या स्वभावांतील तिरसटपणा, सुस्तपणा, आळस हे दोष तर त्यांनी दाखविले आहेतच; पण त्याच्या पांडित्याला, विद्वत्तेला व विचारीपणाला बाधक होतील अशा दोषांचेंहि विवरण केलें आहे. जॉनसनचीं भाषणें सर्वच युक्तीस धरून असत असें नाही. कधी कधी तो वाद-विवादाच्या भरांत अप्रमाण गोष्टीहि बोलून जाई व आपला पक्ष खोटा आहे, असें पक्कें जाणीत असतांहि तो खरासा भासवून देण्याचा यत्न करी; कधी कधी

वितंडवादांत शिरून 'शेषं कोपेन पूरयेत्' अशी युक्ति लढविण्यासहि मागे घेत नसे. याशिवाय एखादा देश किंवा एखादी व्यक्ति यांच्याविषयी त्याचे जे कित्येक ग्रह होते त्यांचें पटलहि त्याच्या बुद्धि-चक्षूंवर प्रसंगविशेषीं येऊन ते प्रकृत विषयाचें यथावत् भान त्यास होऊं देत नसत. अमेरिकेंत राज्यक्रांति झाली त्या वेळीं जॉनसनने सरकार-पक्ष उचलून धरून लेख लिहिले. हे लेख अगदीच सरासरी आहेत. त्यांत युक्तीपेक्षा भाषासौंदर्य व आवेश हेच गुण विशेषतः आढळतात. अशा रीतीने जॉनसनची बुद्धि, तर्कशक्ति, त्याची विद्वत्ता, त्याची वैचारिक सचोटी यांनाहि उणेपणा आणणारे जे दोष तेहि विष्णुशास्त्री यांनी परखडपणें सांगून टाकले आहेत.

### इंग्रजांचें गुणगान

या चरित्राच्या प्रारंभींच डॉ. जॉनसन हा इंग्लिश राष्ट्राचा प्रतिनिधिभूत होता असें विष्णुशास्त्री यांनी म्हटलें आहे; आणि चारित्रावरील शेवटच्या निबंधांत त्या विधानाचें विवरण करतांना त्याच्या अंगचे प्रधान गुण हेच इंग्लिश राष्ट्राचे प्रधान गुण कसे होते तें सांगितलें आहे. हें विवेचन वाचतांना असें ध्यानांत येतें कीं, स्वदेशाचें, स्वकीयांचें गुणवर्णन करावें तसें, तशाच आत्मीयतेने, शास्त्रीबुवांनी इंग्रजांच्या गुणांचें वर्णन केलें आहे. इंग्रज राज्यकर्ते, इंग्रज मिशनरी व इंग्रज़ पंडित यांच्यावर प्रत्येक निबंधांत, संधि सापडेल तेथे, न सापडली तर विषयांतर करून, हत्यार धरणारा हा पुरुष, आपल्या त्याच लेखणीने इंग्रजांचें मुक्तकंठाने गुणगान करतो यावर क्षणमात्र विश्वास बसत नाही. पण विष्णुशास्त्री यांच्या चरित्राचें हेंच रहस्य आहे. पाश्चात्त्य संस्कृति, पाश्चात्त्य विद्या, पाश्चात्त्य समाज आणि प्राश्चात्त्य व विशेषतः इंग्रज लोक, यांच्याबद्दल त्यांच्या मनांत खराखुरा आदर होता. ती संस्कृति, ती विद्या येथे आणावी व पाश्चात्त्यांचे, इंग्रजांचे गुण आपल्या लोकांच्या अंगीं बाणवून, रुजवून, फार मोठें मानसिक परिवर्तन या समाजांत घडवून आणावें, हेंच त्यांचें उद्दिष्ट होतें. त्यामुळे राज्यकर्त्यांवर संधि मिळेल तेथे ते जसे टीका करीत तसेच जेथे संधि मिळेल तेथे ते इंग्रजांचें गुणगानहि करीत.

जॉनसन याच्या अंगचा पहिला गुण म्हणजे निश्चय. हा गुण इंग्रज राष्ट्राच्या ठायीं होता याचें प्रमाण काय ? त्यांनी हजारो मैल दूर असलेल्या हिंदुस्थानांत येऊन, शेकडो बिकट प्रसंगांवर मात करून येथे आपलें आधिपत्य स्थापन केलें हें ! त्याच-प्रमाणे अटलांटिक महासागरांत एका कोपऱ्यांत पडून राहिलेलें हें बेट, दोन हजार वर्षांपूर्वी कोणाला माहीतहि नव्हतें, तें आज वैभवाच्या शिखरावर चढलें आहे, व सारें जगहि त्याच्या उलाढालीस पुरेसें न होऊन विद्या, कला, कौशल्य यांचें तें केवळ माहेरघर होऊन राहिलें आहे, हा तरी वरील अमोलिक गुणाचाच प्रभाव होय !

इंग्रजांचा दुसरा मोठा गुण स्वाभिमान. त्याचें लक्षण काय? इतर देशांप्रमाणेच त्यांच्यांमध्ये हरएक प्रकरणीं परस्परांत मतभेद असतां व निरंतर राज्य-प्रकरणांत

वगैरे निकराने कलह चालले असतां, संकटसमयीं सर्वांनी एक होणें व साऱ्या पृथ्वीभर उलाढाल चालली असतां स्वदेशाचें वारें न विसरणें या दोन गोष्टींवरून त्यांच्या स्वाभिमानाचें स्वरूप कोणाच्याहि लक्षांत येणारें आहे. शिवाय पर-राज्याची तर गोष्ट, दूरच पण स्वराजाचाहि जुलूम त्यांस सहन न होऊन त्यांनी एकाचा शिरच्छेद केला व एकास पळवून लावला व राजाचे अधिकार अगदी संपुष्टांत आणून ठेवले, व थोरापासून लहानापर्यंत सर्वांस हवें तसें बोलण्याचालण्याची पूर्ण मोकळीक दिली !

विष्णुशास्त्री यांनी केलेलें इंग्रजांच्या स्वाभिमानाचें हें वर्णन अतिशय मार्मिक आहे. स्वाभिमानामुळे इंग्रज ऐक्य करतात. याचा अर्थ असा की, त्यांचा स्वाभिमान हा राष्ट्राभिमान आहे, आणि ऐक्यावांचून त्या अभिमानाच्या गप्पा फोल आहेत हें त्यांनी जाणलें आहे. या स्वाभिमानामुळेच ते स्वकीय राजाचीहि अरेरावी सहन करीत नाहीत. तेव्हा त्यांचा स्वाभिमान म्हणजे लोकाभिमान आहे, आणि लोकांच्या स्वातंत्र्याचा अपहार करणारा राजा स्वकीय असला तरी ते त्याला शत्रूच मानतात. विष्णुशास्त्री यांचा कल्पना-विहंग प्रजासत्ताक राज्याचीं स्वप्नें पाहत असे, असें आगरकरांनी म्हटलें आहे तें किती यथार्थ आहे तें यावरून ध्यानांत येईल; आणि जॉनसनचें चरित्र लिहिण्यांत त्यांचा हेतु काय होता हेंहि स्पष्ट होईल.

## प्रबोधन

या हेतूच्या सिद्धीसाठी या देशांत प्रथम विद्येचें पुनरुज्जीवन होऊन येथे युरोपांतल्याप्रमाणे प्रबोधनयुग प्रवर्तित झालें पाहिजे असें विष्णुशास्त्री यांना वाटत होतें. हें प्रबोधन घडविण्याचा मार्ग कोणता ? ग्रंथ-लेखन, ग्रंथ-निर्मिति. 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' हा लेख लिहिण्यास त्यांनी लेखणी उचलली तेव्हाच, किंवा त्याच्याहि आधी 'शालापत्रकां'त ते लिहूं लागले तेव्हापासून या देशाच्या उद्धाराचा ग्रंथ-निर्मिति हाच मार्ग होय हें त्यांच्या मनांत निश्चित झालें होतें. जॉनसनच्या चरित्राच्या समारोपांत त्याच्या चरित्रापासून आमच्या नव्या विद्वानांनी कोणता बोध घ्यावा हें सांगतांना त्यांनी त्यांना हाच उपदेश केला आहे.

## निरपेक्ष ग्रंथ-लेखन

प्रथमतः त्यांनी हें दाखवून दिलें आहे की, आज आपल्या मराठी भाषेची जी स्थिति आहे तीच शंभर वर्षांपूर्वी म्हणजे जॉनसनच्या काळीं इंग्रजी भाषेची होती; आणि त्या वेळीं तेथील वाचकांच्या अंगींहि इकडच्या सध्याच्या वाचकांइतकीच अभिज्ञता व रसिकता होती. विष्णुशास्त्री म्हणतात, "या सादृश्यावरून एक मोठी गोष्ट वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाही. ती ही की, इंग्रेज ग्रंथकारांच्या परिश्रमांनी ती भाषा जर आज इतक्या नांवारूपास आली तर आमच्या लोकांनी तसाच उद्योग केला तर तितकें किंवा निदान त्याच्या खालोखाल तरी त्यांच्या श्रमास यश कां येणार नाही ?" पण वरील सादृश्यावरून व जॉनसनच्या चरित्रावरून दुसरी एक गोष्ट एतद्देशीय ग्रंथकारांनी घेण्यासारखी आहे. ती ही की, ग्रंथ-रचनेच्या श्रमाचें

साफल्य फार दीर्घकाळाने होत असतें. तेव्हा त्यांनी आमच्या या धनहीन व ज्ञानहीन देशांत ग्रंथ-रचनेपासून फलनिष्पत्ति कितपत होण्याचा संभव आहे हें जाणून मुख्यत: देशहित-बुद्धीनेच आपलें काम बजावलें पाहिजे. कोणत्याहि लाभावर नजर न देतां पहिल्याने केवळ कर्तव्य म्हणूनच त्यांनी हातांत लेखणी धरली पाहिजे; आणि या चरित्रावरून दुसराहि एक महत्त्वाचा उपदेश ग्रंथरचनेच्या संबंधाने एतद्देशियांनी घेण्यासारखा आहे. जॉनसनचे इतके ग्रंथ झाले त्यांच्या वृत्तान्तांत कोठे 'सरकारचा उदार आश्रय', 'दक्षिणाप्राइज कमिटीकडून बक्षीस' असा कांही प्रकार दृष्टीस पडत नाही. कोशासारखीं प्रचंड कामें जीं उठलीं तीं फक्त लोकाश्रयावर! तर देश-भाषांचा उत्कर्ष व्हावा अशी ज्यांची मन:पूर्वक इच्छा असेल त्यांनी वरील गोष्टींचें चांगलें मनन केलें पाहिजे.

## कारणांतून कार्य

या देश-भाषांच्या उत्कर्षांतून अंतीं काय साधावयाचें? विष्णुशास्त्री यांनी पहिला निबंध लिहिला – 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति'; आणि शेवटचा – 'आमच्या देशाची स्थिति.' तेव्हा भाषा आणि देश हे त्यांच्या मतें अविभाज्य होते. पहिल्या लेखाच्या पहिल्या कलमांतच त्यांनी लिहून टाकलें आहे की, भाषेची अभिवृद्धि ही देशाच्या उत्कर्षाचें मोठेंच साधन आहे. जॉनसनच्या चरित्रांत त्यांनी शेवटीं हा विचार अगदी स्पष्ट केला आहे. मात्र तो चरित्र-निरूपणाच्या ओघांत केला आहे. आणि त्या वेळची इंग्रजी भाषा व आजची मराठी भाषा यांच्या स्थितींत जसें सादृश्य आम्हीं दाखविलें तसेंच त्या वेळची इंग्लंडची स्थिति व आजची या देशाची स्थिति यांतलें सादृश्य येथे दाखवीत आहों, असा भास निर्माण केला आहे.

जॉनसनच्या कारकीर्दीच्या अखेरीस अमेरिकेंतील वसाहतवाले इंग्लंडविरुद्ध बंड करून उठले व इंग्लंडने धाडलेल्या सैन्याचा पराभव करून स्वातंत्र्याचा जाहीरनामा त्यांनी फडकविला. विष्णुशास्त्री म्हणतात, "युद्धांत इंग्लंडची धुळधाणी उडून एवढें राज्यचें राज्य हातचें गेलें, यामुळे राजा व प्रधान-मंडळ यांची अतिशयित नाचक्की झाली व लोकपक्षास तेज आलें. त्यांतून विल्किज्, जूनियस यांच्यासारखे लोकपक्षाचे कैवारी यांनी तर आपल्या लेखांनी लोकांस आपले हक्क पुरतेपणीं भासवून देऊन प्रतिपक्षावर सारखा धडाका चालविला होता."

आता वरील स्थितीचें सादृश्य आमच्या देशांतहि कसें दृष्टीस पडूं लागलें आहे, तें सर्वांस माहीत आहेच. पाश्चात्त्य विद्येचा संस्कार इकडील लोकांस घडून त्याच्याबरोबर वर्तमानपत्रांचा फैलाव, लौकिक प्रकरणांची चर्चा, सार्वजनिक सभा, वगैरे प्रकारहि सहजच सुरू झाले आहेत. तेव्हा या कारणांपासून वरील कार्य (म्हणजे स्वातंत्र्याचा जाहीरनामा) उद्भवावें हें सहजच आहे. गारगोटीवर आपण होऊन जर चकमक झाडली आणि तींतून झाडण्यासरसा विस्तव पडला तर त्याबद्दल कोणास आश्चर्य वाटेल काय?

- १३ -

# निबंधकार विष्णुशास्त्री

निबंध ही विष्णुशास्त्री यांनी मराठींत आणलेली तिसरी नवी ग्रंथ-पद्धति होय साहित्य-समीक्षा ही पहिली, चरित्र ही दुसरी आणि निबंध ही तिसरी ग्रंथ-पद्धति किंवा वाङ्मयप्रकार होय. भारताची प्राचीन संस्कृति ही मोठी उन्नत असूनहि येथे इतिहास किंवा चरित्र ही पद्धति आली नाही त्याचप्रमाणे निबंध हीहि पद्धति प्राचीन काळीं कोणीं अवलंबिली नाही; आणि इतिहास-लेखन झालें नाही म्हणून आपलें एकपट नुकसान झालें असलें, तर निबंध-लेखन झालें नाही यामुळे शतपट नुकसान झालें आहे.

निबंध ही विचारप्रधान रचना आहे. बुद्धीला आवाहन करणें, तर्कशास्त्रीय पद्धतीने तिला आपले सिद्धान्त पटवून देणें, हें तिचें उद्दिष्ट आहे. एक विचारबीज मनांत येतांच त्याविषयीची सर्व माहिती संकलित करणें, तिचें वर्गीकरण करणें, मग तिची व्यवस्थित रचना करणें व त्यांवरून शेवटीं निष्कर्ष काढणें या पद्धतीने मानवी मनांत ग्रंथ किंवा निबंध तयार होतो. तसा तो तयार झाल्यावर विषयाचें महत्त्व, त्याचीं कारणें, त्याचें पूर्वरूप, सध्याचें रूप, रूढ समज, सत्य-दृष्टि, विरोधी विचार, आक्षेप, खंडन, मंडन, इतर पंडितांच्या तसल्याच विचारांशीं तुलना, ऐतिहासिक दृष्टींतून समीक्षण, परिणाम, अन्वयव्यतिरेक-दृष्टीने तपासणी, उपाय-चिंतन इत्यादि विविध अंगोपांगांनी त्याचा विकास करून त्याचा वटवृक्ष तयार करणें, ही निबंधरचना होय. या रचनेसाठी जें साहित्य जमवावयाचें तें सर्व अनुभव, इतिहास, तर्क, प्रयोग, अवलोकन यांच्या साह्यानेच जमवावयाचें, असा निबंधकाराचा कटाक्ष असतो; कारण त्याला लोकांच्या बुद्धीला आवाहन करावयाचें असतें.

अशी निबंधरचना भारतांत गेल्या शतकांत पाश्चात्त्य विद्या येथे आल्यानंतरच सुरू झाली. त्याआधी प्राचीन काळीं, संस्कृतांत किंवा नंतर प्रांतिक भाषांत कांही किरकोळ अपवाद वजा जातां, येथे कोणींहि, केव्हाहि अशी रचना केली नव्हती. पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारानंतर महाराष्ट्रांत बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी इत्यादि पंडित भौतिक दृष्टीने समाजाच्या उत्कर्षा-पकर्षाचा विचार करूं लागले, व समाजाच्या बुद्धीला स्वतःचे सिद्धान्त पटवून देण्याच्या हेतूने लेखन करूं लागले. यांतूनच निबंध ही नवी ग्रंथ-पद्धति निर्माण झाली. विष्णुशास्त्री यांनी आपल्या अभ्यासाने व भाषाप्रभुत्वाने तिलाच परिणत रूप प्राप्त करून दिलें. तें परिणत रूप म्हणजेच निबंधमाला होय.

विष्णुशास्त्री यांना स्वदेशाच्या उत्कर्षापकर्षाची मीमांसा करावयाची होती. आपल्या प्राचीन परंपरेच्या गुणदोषांची चर्चा करावयाची होती. इंग्रजी राज्यामुळे हिंदुस्थानाला लाभ कोणते झाले व त्याची हानि किती झाली तें ठरवावयाचें होतें. त्यांच्या आधीच्या पंडितांनी मांडलेल्या सिद्धान्तांचें परीक्षण करून त्यांतील ग्राह्या-ग्राह्य पाहवयाचें होतें. आणि यावरून स्व-समाजाला कांही मार्गदर्शन करावयाचें होतें. त्यांनी निबंध किंवा ग्रंथ रचले ते याच हेतूने. ( वक्तृत्व, इंग्रेजी भाषा, मोरो-पंताची कविता, आमच्या देशाची स्थिति — हे त्यांचे लहान लहान ग्रंथच आहेत.) नव्या विद्वानांनी ग्रंथ-रचना करावी हा त्यांचा आग्रह असल्यामुळे त्यांनी प्रथम तशी रचना करून त्यांच्यापुढे आदर्श निर्माण करून ठेविले. ती आदर्श रचना कशी आहे तें आता पाहावयाचें आहे. ही पाहणी जरा सूक्ष्मपणें व चिकित्सेने करणें अवश्य आहे. कारण हिंदुस्थानच्या सर्व इतिहासांत प्राकृत भाषेंत केलेली ही पहिलीच निबंध-रचना आहे. वर सांगितलेंच आहे की, इंग्रजांपूर्वी येथे कोणत्याच भाषेंत निबंध-रचना नव्हती. त्यांचें राज्य प्रस्थापित झाल्यावर अव्वल इंग्रजींत जे पंडित झाले त्यांनी निबंध-रचना केली, पण ती इंग्रजींतून. मराठींत जांभेकर, लोकहित-वादी यांनी निबंध लिहिले. त्यांचा आशय मोठा असला तरी ती रचना प्राथमिक स्वरूपाची होती. तिला प्रौढ, परिणत रूप दिलें तें विष्णुशास्त्री यांनी. म्हणून तिची चिकित्सा बारकाईनें होणें अवश्य आहे.

एखादी वास्तु किंवा एखादें मंदिर बांधावयाचें ठरलें की प्रथम त्या वास्तूचा सर्व नकाशा काढतात. मजले किती, प्रत्येक मजल्यावर दालनें किती, जिने कोठे, दारें कोठे, गच्ची कोठे अशी सर्व आखणी आधी करतात. आणि सर्वांना प्रथम वास्तूच्या स्वरूपाची स्पष्ट कल्पना देतात. निबंध-रचनेंत प्रारंभीं हेंच करावें लागतें. विष्णुशास्त्री यांनी प्रत्येक निबंधांत ही दक्षता घेतली आहे. 'संपत्तीचा उपभोग' हा निबंध पाहा. आरंभींच या निबंधांत कशाचें प्रतिपादन होणार आहे, तें त्यांनी सांगितलें आहे. प्राचीन काळीं बहुतेक सर्व देशांत संपत्तीला तुच्छ लेखीत असत. अर्वाचीन काळीं याच्या उलट मतें सर्वत्र झालीं आहेत. तेव्हा हीं मतें कितपत

खरीं किंवा खोटीं आहेत, त्यांत ग्राह्याग्राह्य काय आहे तें या निबंधांत दाखवावयाचें आहे. विषयाची स्पष्ट कल्पना अशी दिल्यानंतर प्रथम शंकराचार्य, सॉक्रेटीस इत्यादि प्राचीन थोर पुरुषांचें संपत्तीविषयीचें मत विष्णुशास्त्री, यांनी सविस्तर मांडलें आहे व मग त्याचें खंडन केलें आहे. नंतर वैयक्तिक दृष्टीने संपत्तीपासून होणारा लाभ व व राष्ट्रीय दृष्टीने होणारा लाभ यांविषयी विवरण केलें आहे. आणि युरोपीय लोक संपत्तीचा उपयोग करतात तसा आपण करावा हा निष्कर्ष सांगितला आहे.

'इतिहास' हा त्यांचा अतिशय गाजलेला निबंध पाहा. या विषयाचा व्याप, भारतीयांची त्याविषयीची अनास्था, तिचीं कारणें, ग्रीस, रोम या देशांत त्या शास्त्राचा झालेला उदय आणि शेवटीं इतिहासवाचनापासून होणारे जिज्ञासा-जागृति, नीतिबोध, मनाचें पोषण इत्यादि उपयोग अशी ही रचना होईल, असें आरंभीच विष्णुशास्त्री यांनी सांगून या वास्तूचा नकाशाच पुढे मांडला आहे. हा झाला पूर्वार्ध. उत्तरार्धांत — इंग्रज इतिहासकारांनी आमच्या इतिहासाची केलेली विटंबना, त्यांच्यांतल्याच कांही पंडितांनी केलेला गौरव, आमच्याच लोकांनी स्वतःची केलेली विटंबना, आणि शेवटीं या विषयाच्या अभ्यासाचें महत्त्व व त्याचीं साधनें, अशी विषयाची मांडणी आपण करणार आहों, हें प्रारंभींच सांगितलें आहे.

'आमच्या देशाची स्थिति' हा निबंध रचनेच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट झाला आहे. ज्यांना निबंध-रचनेचा अभ्यास करावयाचा आहे, ती कला हस्तगत करावयाची आहे, त्यांनी अनेक वेळा याचें पठण, मनन, चिंतन करावें. 'आमच्या देशाची स्थिति' — म्हणजे कोणाची स्थिति? आमच्या राज्यकर्त्यांची स्थिति, आमच्या राजेरजवाड्यांची स्थिति, आमच्या सामान्य जनांची स्थिति—ही ठळक रूपरेषा. मग राज्यकर्त्यांची स्थिति म्हणजे काय? या राज्यापासून आमचा झालेला लाभ, आमची झालेली हानि, ख्रिस्ती धर्मतत्त्वाप्रमाणे आमच्या राज्यकर्त्यांच्या कारभाराची तपासणी आणि त्यावरून निघणारा निष्कर्ष हा एका विभागाचा आराखडा. राजेरजवाडे — हा विषय असाच. या राजेरजवाड्यांचें पूर्वीचें वैभव, सध्याचें दैन्य व त्यांना उपदेश. सामान्य जनांची स्थिति या विभागाची मांडणी कशी आहे? इंग्लंडमधील सामान्य जनांची स्थिति, त्या तुलनेने येथल्या सामान्य जनांची स्थिति, आणि शेवटीं, धन्याला धत्तुरा व चाकराला मलिदा, अशी स्थिति झाली आहे. हा निष्कर्ष; आणि मग शेवटच्या विभागांत हिंदुस्थानाच्या अवनतीची इतरांनी केलेली मीमांसा, तिचें खंडन व शेवटीं स्वमत-प्रतिपादन.

अशी सुबद्ध, रेखीव, नेटकी रचना मराठींत अगदी अपूर्व होती. त्यामुळे ती पाहून वाचकांना तिची एकदम मोहिनी पडली, यांत कांही नवल नाही.

वर सांगितलेंच आहे की, लोकांच्या बुद्धीला आपले सिद्धान्त पटवून देणें हें निबंध या ग्रंथ-पद्धतीचें उद्दिष्ट आहे. इंग्रजी राज्य, ख्रिस्ती धर्म, भारताची प्राचीन परंपरा, गर्व, संपत्ति, विद्वत्व आणि कवित्व यांचे संबंध, समाजाचे उत्कर्षापकर्ष

याविषयी विष्णुशास्त्री यांनी पूर्ववयांतच कांही सिद्धान्त मनाशीं निश्चित केले होते. आणि ते लोकांच्या बुद्धीला पटवून देण्यासाठीच त्यांनी लेखणी हातीं धरली होती. शिवाय त्यांना लोकांना विचार करावयास शिकवावयाचें होतें, समाजाला सज्ञान-दशा आणावयाची होती. ती गद्य वाङ्मयानेच येते असें त्यांचें निश्चित मत होतें. 'इंग्रेजी भाषा' या प्रबंधाच्या अरंभींच त्यांनी म्हटलें आहे की, भाषेंत गद्य-ग्रंथांचा प्रचार सुरू होणें हें लोकसुधारणेचें एक मोठें चिन्ह आहे. कारण पद्य-रचना सोडून देऊन गद्याकडे जेव्हा लोकांचा कल होतो तेव्हा केवळ मनोरंजन करणाऱ्या विषयांहून अधिक योग्यतेच्या विषयांकडे त्यांचीं मनें प्रवृत्त झालीं, असें दिसून येतें. तेव्हा ही रीत पडणें हें राष्ट्राच्या सज्ञान अवस्थेचें सूचक होय, हें उघड आहे.

तेव्हा लोकांना विचार करावयास शिकवून, लोक-सुधारणा करावयाची, राष्ट्राला सज्ञान दशा आणावयाची हें उद्दिष्ट असल्यामुळे प्रत्येक गोष्टींत त्यांच्या तर्काला, बुद्धीला आवाहन करणें हें अपरिहार्यच होतें. हें बुद्धीला आवाहन करण्याचें कार्य विष्णुशास्त्री यांनी कोणत्या साधनांनी केलें ? इतिहासांतील उदाहरणें, मोठमोठ्या ग्रंथकारांचीं वचनें आणि तर्कशास्त्रीय युक्तिवाद, हे तीन मार्ग त्यांनी अवलंबिले आहेत. लोकभ्रम या प्रबंधाचा उपोद्घात करतांना त्यांनी म्हटलें आहे की, कोणत्याहि गोष्टीच्या खरेपणाविषयी खात्री होण्यास तीन प्रकार लागतात. एक तिची संभाव्यता, दुसरें प्रत्यक्ष प्रमाण, आणि तिसरें विश्वासपात्र मनुष्याचें भाषण किंवा लेख. ढोबळपणें पाहतां वर सांगितलेले युक्तिवाद, इतिहास व ग्रंथ म्हणजेच हे प्रकार होत. त्यांचा आपल्या निबंधांत विष्णुशास्त्री यांनी कसा उपयोग केला आहे तें पाहूं.

इतिहास हा विष्णुशास्त्री यांचा अत्यंत आवडता विषय. या विषयाइतकें त्यांचें दुसऱ्या कोठल्याच विषयावर प्रेम नव्हतें. आपल्या विधानांचा विस्तार व प्रपंच ते प्रामुख्याने इतिहासाच्या आधारेंच करतात. भारताचा इतिहास, मराठ्यांचा इतिहास हा तर त्यांनी अभ्यासलाच होता. पण त्यापेक्षाहि जास्त बारकाईने त्यांनी ग्रीस, रोम, इटली, इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, रशिया या पाश्चात्त्य देशांचा इतिहास पाहिला होता. ग्रीस व रोम यांचा इतिहास तर त्यांना जणू काय मुखोद्गतच होता. ज्यामध्ये त्यांनी ग्रीसमधील एखाद्या घटनेचा उल्लेख केलेला नाही असा त्यांचा प्राय: एकहि निबंध नसेल. वक्तृत्व हा त्यांचा प्रबंध पाहा. ग्रीस देश तर वक्तृत्वाचें आदिपीठ. आणि तेथील जगविख्यात वक्ता म्हणजे डेमोस्थेनीस. त्याच्या वक्तृत्व-कलेचें साग्रसंगीत वर्णन शास्त्रीबुवांनी केलें आहे. आणि त्याबरोबरच अथेन्स या नगरीचेंहि यासंबंधीचें माहात्म्य सांगितलें आहे. त्यानंतर क्रमानेच रोम येतें. तेथील सिपियो, केटो, मारियस, सीझर आणि शेवटीं डिमोस्थेनीसच्याच तोडीचा सिसेरो. त्याच्या वक्तृत्वाच्या यशाचे जे रोमहर्षक प्रसंग त्यांचें वर्णन त्यांनी तपशिलाने केलें आहे. त्यानंतरचें वक्तृत्वाचें पीठ म्हणजे इंग्लंड. तेथील चॅथम, फॉक्स, विल्यम पिट

बर्क, शेरिडन यांच्यापासून थेट ग्ल्याडस्टन, डिझरेली, ब्राइट येथपर्यंतचे वक्ते विवेचनांत येऊन जातात. 'इतिहास' हा निबंध मनांत येतांच विष्णुशास्त्री यांच्या मनांत प्रथम कोण उभा राहणार ? अर्थात् ग्रीसचा हिरोडोटस. तो जगांतला पहिला इतिहासकार ! त्याच्या पाठोपाठ साऱ्या जगांतला अत्युत्कृष्ट इतिहासकार थुसिडिडीस आणि तिसरा म्हणजे सॉक्रेटीसचा शिष्य जिनोफन. त्यानंतर रोमचे इतिहासकार लिव्हि, प्लुटार्क, सीझर, टासिरस आणि शेवटीं 'हल्लीच्या काळीं सर्वांहून विशेष ज्ञानसंपन्न असलेले लोक म्हणजे इंग्लिश: त्यांनी तर सर्व जगांतल्या देशांचे इतिहास लिहून ठेविले आहेत ! 'विद्वत्त्व आणि कवित्व' यांचे संबंध विशद करतांना ग्रीसमधील ऱ्हापसोडिस्ट, सिसेरो, इंग्लंडमधील जॉनसन, पोप, ड्रायडन, शेक्सपियर, मिल्टन यांचीं उदाहरणें आधार म्हणून त्यांनी दिलीं आहेत. तशीं दिल्यावांचून शास्त्रीबवांचा निबंध पुरा होणारच नाही. 'वाचना'चें महत्त्व सांगतांना पेट्रार्कची आठवण सांगितल्यावांचून सजावट पुरी होणार नाही. " पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काल " हा सिद्धान्त त्यांना विशद करावयाचा आहे. त्याला प्रमाणें ? होमर कवीने आकिलिसचा पराक्रम वर्णिला नसता तर शिकंदर झाला नसता. व्यासानें पांडव-चरित्र गाइलें नसतें तर शिवाजी उत्पन्न होऊन त्याने यवनांपासून राज्यश्री माघारी हरण केली असती काय ? शिकंदराचा इतिहास नसता तर सीझर कशाला होता ? आणि याच स्वरांत पुढे थोरले बाजीराव, चिमाजीअप्पा, थोरले माधवराव, व समशेरबहादूर गोकलखा ! शेवटीं निष्कर्ष – " तेव्हा इतिहास लिहावे लागतात. ते वाचून पुढे-मागे कोणाला तरी त्यांपासून उत्साह व प्रेरणा प्राप्त होते. "

विष्णुशास्त्री यांना लोकांना विचार करावयास शिकवावयाचें होतें; पण त्यासाठीच त्यांना बहुश्रुत करावयाचें होतें. आपल्या निबंधमालेचें, लोकांस बहुश्रुत करणें हें उद्दिष्ट आहे, असें त्यांनी दुसऱ्या अंकांतच सांगितलें आहे. इतिहासांतील शेकडो घटनांचा ते जागोजागीं आधार देतात. त्यामुळे हीं दोन्ही उद्दिष्टें साध्य होतात. आधार-प्रमाणांनी बोलावयाचें असतें, सप्रमाण विधानें करावयाचीं असतात, हा संस्कार निबंधमालेमुळे लोकांच्या मनावर सतत होत राहिला आणि अनेक देशांतील घडामोडी डोळ्यासमोर नित्य येत राहिल्यामुळे लोकांच्या जगाच्या ज्ञानांतहि भर पडली.

हेंच दुहेरी उद्दिष्ट साधण्यासाठी चिपळूणकरांनी आपल्या प्रतिपादनाला आधार म्हणून शेकडो ग्रंथकारांचीं अवतरणें बहुतेक सर्व निबंधांत दिलीं आहेत. विचारशक्ति जागृत होण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक घटनांना जसें महत्त्व आहे तसेंच पंडितांच्या ग्रंथांनाहि आहे. एकापरीने ते ग्रंथ म्हणजे ऐतिहासिक घटनाच आहेत. भारताचा प्राचीन इतिहास अत्यंत वैभवशाली होता. आम्ही एका थोर संस्कृतीचे वारस आहों, हें त्यांना जगाला व स्वजनांना पटवून द्यावयाचें होतें. हें महासत्य त्यांनी जागजागीं पाश्चात्त्य पंडितांच्या तोंडूनच वदविलें आहे. तीन हजार वर्षांपूर्वीच

पौर्वात्य लोक ग्रीक-रोमनांपेक्षा जास्त सुसंस्कृत होते, असें ऑक्ले म्हणतो. सिंधु-गंगा या प्रदेशांत फार प्राचीन काळीं तत्त्वज्ञान व अध्यात्म या प्रांतांत लोकांनी अत्यंत प्रगत विचार मांडले होते, असें बकलने म्हटलें आहे. नाना फडणीस, पूर्णय्या, झाशी-वाली, यशवंतराव होळकर यांचा सिडने स्मिथ, मरे, टॉरेन्स यांनी गौरव केला आहे. हे मुत्सद्दी व वीर स्त्री-पुरुष युरोपियांच्या बरोबरीचे होते, असें ते म्हणतात. हिंदी शिपायांचा युरोपांत इतका गौरव होत होता की, महाराणा फ्रेडरिक म्हणाला, असे शिपाई मला मिळाले तर मी युरोप सहज जिंकीन.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी नीतीच्या बाबतींत नसती ऐट करूं नये हें सांगण्यासाठी विष्णुशास्त्री ‘ दि वे टु रीगेन इंडिया ’ या ग्रंथांतला उतारा देतात. त्याचप्रमाणे बकल, व्हाल्टेअर यांचींहि अवतरणें देतात. भारताची इंग्लिश इतिहासकार कशी विटंबना करतात हें दाखविण्यासाठी मेकॉले, मिल, मॉरिस यांचे उतारे तर त्यांनी पुनः पुन्हा दिले आहेत. काव्य-नाटकांची चर्चा करतांना तर पोप, ड्रायडन, जॉनसन, वर्डस्वर्थ, शेक्सपियर, बायरन्, कालिदास, भवभूति, भारवी, जयदेव, बाण, भर्तृहरि, आडिसन मेकॉले, एडिंबरो रिव्ह्यू, वेस्ट मिनिस्टर रिव्ह्यू, यांच्या काव्य-नाटकांतील व टीकेंतील अवतरणांचा अक्षरशः वर्षाव करतात.

कोणी तरी मेकॉलेबद्दल असें म्हटलें आहे की, त्याचे ग्रंथ वाचणें म्हणजे सर्व ग्रंथालय वाचण्यासारखेंच आहे. विष्णुशास्त्री यांच्याबद्दल तेंच अगदी यथार्थतेने म्हणता येईल. आपल्या निबंधांतून इतक्या विविध क्षेत्रांतील ग्रंथकारांचा त्यांनी वाचकांना परिचय करून दिला आहे की, ग्रंथालय-वाचनामुळे जशा त्यांच्या जाणिवेच्या कक्षा रुंदावल्या असत्या तशाच निबंधमालेच्या वाचनाने त्या रुंदावल्या.

यानंतर आता शास्त्रशुद्ध युक्तिवाद विष्णुशास्त्री कसा करतात तें पाहवयाचें आहे.

युक्तिवाद करतांना त्याची अगदी सर्वमान्य व सर्वरूढ पद्धत म्हणजे पूर्वपक्ष-उत्तरपक्ष अशी मांडणी करणें. विष्णुशास्त्री तीच अनुसरतात. मराठीला हें लेणें पूर्वी कोणीं घातलें नव्हतें म्हणून त्याचें महत्त्व. ‘गर्व’ हा निबंध पाहा. योग्य रीतीचा गर्व हा दोषरूप नसून तो मनुष्याला शोभादायकच होतो, आणि षड्विकार हे रिपु नसून ते मित्र आहेत, असें प्रतिपादन चिपळूणकरांना करावयाचें आहे. हा अर्थातच उत्तरपक्ष होय. त्याच्या आधी प्रारंभींच पूर्वपक्षाचें मत काय आहे तें त्यांनी सविस्तर मांडलें आहे; आणि मग पूर्वपक्ष-खंडन व स्वपक्ष-मंडन केलें आहे. असें करतांना त्यांनी ग्रीक तत्त्वज्ञ सोलन, भारतीय तत्त्वज्ञ भर्तृहरि, विख्यात शास्त्रज्ञ न्यूटन, यांचीं उदाहरणें देऊन अयोग्य गर्व ते वाहत नसत, हें प्रथम सांगितलें आहे; आणि नंतर स्वपक्ष मांडतांना भवभूति, जगन्नाथपंडित, तुकाराम, मोरोपंत यांचीं अवतरणें देऊन त्यांचा गर्व त्यांना कसा शोभून दिसतो, तें दाखविलें आहे. आणि शेवटीं सध्याच्या

काळीं भारतीयांचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न चालू असल्यामुळे, अशा तऱ्हेचा गर्व वाहणें किती अवश्य आहे तें सांगितलें आहे.

'संपत्तीचा उपभोग', 'लोकभ्रम' या निबंधांची रचना अशीच शास्त्रीय पद्धतीने केलेली आहे. संपत्तीला तुच्छ लेखूं नये. राष्ट्राच्या उत्कर्षासाठी तिचें फार महत्त्व आहे, हें त्यांचें पहिल्या निबंधांत प्रतिपाद्य आहे. तेव्हा प्रथम ती तुच्छ आहे, त्याज्य आहे असें म्हणणाऱ्यांचा पक्ष शंकराचार्य, सॉक्रेटीस व संस्कृत मराठी कवि यांच्या आधारें मांडला आहे; आणि नंतर रोम, इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांचीं उदाहरणें देऊन उत्तरपक्ष मांडला आहे.

कार्यकारणभावाचा विचार हा युक्तिवादाचा एक प्रधान घटक होय. प्रतिपक्षाच्या सिद्धान्तामागे कार्यकारणभावाचा आधार नाही व आपल्यामागे तो आहे हें दाखविणें हा युक्तिवादाचा आत्माच होय. या युक्तीचा विष्णुशास्त्री यांनी अनेक ठिकाणीं अवलंब केला आहे. संपत्तीचें महत्त्व सांगतांना ते म्हणतात, दुर्बलता, दुराचार प्रवृत्ति हे जे अनर्थ त्यांचा संपत्तीशीं कार्यकारणरूप-संबंध नित्यत्वाने राहत नाही, कारण मोठी राजसत्ता भोगीत असतांना वरील विकारांपासून मुक्त असलेल्यांचीं उदाहरणें इतिहासांत अनेक आहेत. 'लोकभ्रम' या प्रबंधांत तर प्रामुख्याने याच पद्धतीचा त्यांनी अवलब केला आहे. भुतें-खेतें, शकुन-अपशकुन, आकाशांतील ग्रह आणि मानवी जीवनांत येणारे शुभाशुभ प्रसंग यांमध्ये कार्यकारण-संबंध कांही दाखवितां येत नाही, हें त्यांनी नाना प्रकारे दाखवून दिलें आहे; आणि शेवटीं म्हटलें आहे की, "हें घडतें तें काकातालीय न्यायाने घडतें. यास इंग्रजींत 'असोसिएशन ऑफ आयडियाज' ( कल्पनांची संगति ) असें म्हणतात; आणि मनाने घेतलेल्या कारणांचा व कार्यांचा असंबंध पुष्कळदा दृष्टीस पडल्याखेरीज वरील ग्रह नाहीसा होत नाही." असें असल्यामुळे हा असंबंध ते पुनः पुन्हा प्रस्थापित करतांना दिसतात.

अन्वय-व्यतिरेकाने आपला मुद्दा सिद्ध करणें हीहि युक्तिवादांत महत्त्वाची पद्धत मानली जाते. विष्णुशास्त्री अनेक वेळा ती अनुसरतात. वक्तृत्व हें लोकसत्ताक शासनपद्धतींतच उदयास येतें, असें त्यांना सांगावयाचें आहे. त्यासाठी प्रमाणें कोणतीं ? ग्रीसमध्ये अथेन्स संस्थानांत लोकसत्ता होती, तेथे ही कला उदयास आली. त्याच ग्रीसमध्ये स्पार्टा, थीबस, मासिडन या संस्थानांत लोकसत्ता नव्हती. तेथे कोणी मोठा वक्ता झाला नाही. इटलींत तसेंच घडलें. रोममध्येच फक्त मोठे वक्ते झाले. अन्यत्र नाही. अर्वाचीन काळांत इंग्लंड, अमेरिका या देशांत लोकसत्ताकें असल्यामुळे तेथे वक्तृत्वाचा उत्कर्ष झाला; पण आशिया खंडांत मोठमोठीं साम्राज्यें झालीं तरी प्रजासत्ताक-पद्धति तेथे नसल्यामुळे तेथे तसा उत्कर्ष झाला नाही. संपत्ति ही राष्ट्राला हानिप्रद ठरत नाही व दारिद्र्य हें सामर्थ्य प्राप्त करून देत नाही हा विचार मांडतांना विष्णुशास्त्री यांनी अन्वय-व्यतिरेक प्रमाणच दिलें आहे. रोम व कार्थेज हीं संपन्न राष्ट्रें होतीं; पण तरी शेकडो वर्षें त्यांची सत्ता टिकली.

उलट आफ्रिकेंतील अनेक देश पूर्ण दारिद्र्यांत दीर्घकाळ आहेत; पण त्यांनी मोठमोठीं राज्यें किंवा साम्राज्यें स्थापिल्याचीं उदाहरणें नाहीत. अन्य क्षेत्रांत उत्कर्ष साधला असेंहि नाही. 'भावे भाव: अभावे अभाव:' याचें अस्तित्व तेथे त्याचें अस्तित्व, याचा अभाव तेथे त्याचा अभाव – असें या पद्धतीचें स्वरूप आहे.

"प्रस्तुत मालेचा उद्देश" या निबंधमालेंतील दुसऱ्या निबंधांत सांगितल्या-प्रमाणे विष्णुशास्त्री यांना लोकांना बहुश्रुत करावयाचें होतें. लोकांमध्ये मार्मिकपणा वाढवून त्यांना विचार करण्याची सवय लावावयाची होती. कठीण पहाडांतून घाट बांधले असतां वाटसरांची जी सोय होते तीच सोय ज्ञानेच्छु लोकांसाठी करावयाची होती. ज्यास विद्यालयांतील शिक्षण न मिळाल्यामुळे ज्ञानाचा लाभ घडत नाही त्यांना ज्ञानाचा मार्ग खुला करावयाचा होता. लोकांत सदभिरुचीचा प्रसार करून त्यांच्यांत ग्रंथ वाचण्याची गोडी निर्माण करावयाची होती; आणि याचबरोबर मराठी भाषेची योग्यता किती आहे तेंहि समजून द्यावयाचें होतें. त्यांच्या निबंध-रचनेचें जें वर वर्णन केलें आहे त्यावरून तीं उद्दिष्टें निबंधमालेमुळे अचूकपणें साध्य होण्यासाठी त्यांनी काय धोरण ठेवलें होतें व कसकसे प्रयत्न केले होते, हें कळून येईल.

आरंभीं सांगितल्याप्रमाणे अशी रचना मराठींतच काय; पण भारतांतल्या कोणत्याहि प्रादेशिक भाषेमध्ये तोंपर्यंत झाली नव्हती. मराठीलाहि हा संस्कार प्रथमच घडत होता. त्या दृष्टीने त्याचें महत्त्व फार आहे. मराठी गद्याचे विष्णु-शास्त्री यांना जनक म्हणतात तें यासाठीच. गद्यरचनेचें सर्व शास्त्र त्यांना करतला-मलकवत झालें होतें. त्यामुळेच त्यांचे निबंध मराठींत अमर झाले आहेत. त्यांनी ही वाङ्मयवास्तु उभारण्यासाठी कशी भक्कम चौकट उभी केली होती तें येथवर आपण पाहिलें. आता तिची सौंदर्यशोभा त्यांनी कशी वाढविली त्याचा, म्हणजेच त्यांच्या शैलीचा, विचार करावयाचा आहे.

- १४ -

## वाग्वैभव

कोणत्याहि वास्तूचें निरीक्षण करतांना प्रथम तिचा भक्कमपणा तपासून पाहवा लागतो. कारण त्यावरच तिची सर्व उपयुक्तता अवलंबून असते. तिचा पाया, तिचे खांब, तिच्या भिंती या, वरील मजले पेलून धरण्याइतक्या भक्कम आहेत की नाहीत, हें आधी पाहवें लागतें. नंतर तिचीं दालनें, तिच्या खोल्या, देवघर, माजघर, सैंपाकघर, ओटी, पडवी हें सर्व सांसारिक व्यवहाराच्या दृष्टीने बांधलें गेलें आहे की नाही, हें पाहवें लागतें. ही पहिली तपासणी झाली म्हणजे मग तिचें सौंदर्य पाहवयाचें. तिच्यांतील प्रमाणबद्धता, समता, वक्रता, तिचा रंग, तिच्या भिंतीवरील चित्रें, हे सौंदर्याचे घटक होत. मंदिराची सर्व शोभा त्यावरून ठरते; आणि प्रथम ती शोभाच नजरेंत भरते. तरीहि खरा शिल्पज्ञ आधी तपासणी त्या मंदिराच्या टिकाऊपणाची व उपयुक्ततेचीच करील. निबंधमालेची समीक्षा करतांना हाच क्रम ठेवणें उचित होय. त्याअन्वये प्रथम विष्णुशास्त्री यांच्या निबंधांतील उपक्रमोपसंहार, विषयनिरूपणाची व्यवस्था, प्रतिपादनांतील आधारप्रमाणें, लेखकाची बहुश्रुतता, त्याची युक्तिवादपद्धति यांची समीक्षा आपण केली. आता त्या निबंधाच्या सौंदर्याची समीक्षा करावयाची आहे. हें सौंदर्य म्हणजेच लेखनशैली किंवा लेखकाचें वाग्वैभव होय.

हें सौंदर्य पाहूं लागतांच, प्रथम नजरेंत भरतें तें त्यांचें भाषाप्रभुत्व. लांब, प्रदीर्घ, पल्लेदार वाक्यांचीं त्यांनी फेक सुरू केली की वाचक स्तिमित होऊन जातो. भाषेला वाटेल तशी वांकविण्याचें सामर्थ्य लेखकाच्या ठायीं आहे, याची प्रचीति येते; आणि मनाला प्रफुल्लता येते. नवा गवई गावयास बसला व तो एखादा राग आळवूं लागला म्हणजे त्याच्या ताना, आलाप, व्यवस्थित संभाळून हा समेवर कसा

येणार, याची ऐकणाराला चिंता वाटते. विष्णुशास्त्री यांच्या आधीच्या लेखकांचे निबंध वाचतांना वाक्याचा तोल साधून ते शेवटपर्यंत कसे पोचणार, अशी शंका वाटूं लागते; पण शास्त्रीबुवांचे निबंध वाचतांना अशी शंका मनाला शिवतहि नाही. "जी भाषा बोलणारांनी दिल्ली-अटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जींत तुकाराम-रामदासांसारख्या भगवत्परायण साधूंनी आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रथित केले, जीस मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि कवींनी आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीने संस्कृत भाषेची प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरिता कोणत्याहि अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाही, अशी आमची खात्री आहे" अशीं दीर्घ वाक्यें ते सहज पेलूं शकतात हें लोकांना पहिल्या अंकापासूनच दिसूं लागलें; आणि भाषाप्रभुत्वाचा हा नवाच खेळ आपण पाहत आहों हें त्यांच्या ध्यानांत आलें. 'आमच्या देशाची स्थिति' या शेवटच्या निबंधांतलें हें वाक्य पाहा. "पण हल्ली चालू असणारें एकोणिसावें शतक हें तर सुधारणेच्या संबंधाने पहिल्या प्रतीचा बाणा मिरविणारें असतां व या शतकांत सद्धर्माचे पवित्र प्रेषित आकाशांतली दिवटी घेऊन सारें भूमंडळ आक्रमीत असतां व येशूच्या दयामय धर्माचा जिकडे तिकडे गजर करीत असतां, कंठस्नानाचा व झोटिंगपाच्छाईचा प्रचार पहिल्यापेक्षा आता काडीभरहि कमी आहे असें नाही." वाक्य लांब असूनहि अर्थाचा ओघ कोठें अडखळत नाही, प्रसन्नता कमी होत नाही. भाषाप्रभुत्वाचें हेंच लक्षण होय.

अशा या मोत्यांच्या सरांतून मधून मधून संस्कृतवरून मराठींत अन्वर्थक अशीं तयार केलेलीं वा घेतलेलीं शब्दांचीं रत्नें गुंफल्यामुळे भाषेची शोभा द्विगुणित झाली आहे. अभिवृध्यर्थ, कृतकृत्यता, पंडितमान्यता, उपपादन, पुनरुज्जीवन, विगतार्थ, भाषेचें वर्णसौंदर्य, बुद्धीची प्रगल्भता, उद्दाम कल्पनाशक्ति, मनोवृत्तीचे व्यापार, अनिष्टांचें मूळ, लेशमात्र शुभवर्तमान, भूमंडळ, श्वेतदीप, शार्मण्य देश, शब्दपांडित्य, दुर्मतांचें महाजाल, स्वार्थसाधु मिशनरी, अप्रयोजकपणा, तिरस्कारास्पद, जन्मसिद्ध निष्प्रतिबंध, मुद्रणस्वातंत्र्य, वर्तमानपत्र, स्थित्यंतर, जनसमूह, भरतखंड, देशबंधुत्वाचें थोरलें नातें. – यांसारखे शब्द शास्त्रीबुवांच्या निबंधांत मधून मधून चमकत असतात. मराठी भाषेच्या अंगीं अर्थव्यंजकता, वर्णसौंदर्य फार कमी आहे, हा अलीकडील विद्वानांचा ग्रह मोडून टाकण्यास आपले निबंध कारण व्हावे अशी त्यांची इच्छा होती. निबंधमाला वाचून खाली ठेवल्यावर ती इच्छा पूर्ण झाली आहे, असाच निर्वाळा वाचक देतील.

लांब, पल्लेदार, भरघोस वाक्यें आणि समर्पक, समुचित शब्दयोजना यांखेरीज इतरहि अनेक प्रकारचा शृंगार विष्णुशास्त्री यांनी आपल्या भाषेला चढविला आहे. त्यांतील एक विशेष शोभादायक अलंकार म्हणजे संस्कृत वचनें. आधार-प्रमाण म्हणून दिलेलीं अवतरणें, तीं हीं नव्हेत. त्यांचा परामर्श वर केला आहे. कल्पनासादृश्यामुळे

जशी काव्याला शोभा येते तशी विचारसाम्यदर्शक वचनांनी गद्याला येते. तशीं वचनें येथे अभिप्रेत आहेत. मराठी अवतरणेंहि त्यांनी दिलीं आहेत; पण भर आहे तो संस्कृत वचनांवर. त्यांतहि शिरोभागीं दिलेलीं अवतरणें पाहून मन हरखून जातें.

'प्रस्तुत मालेचा उद्देश' या निबंधांत बहुश्रुतता हें मासिक-पुस्तकांचें उद्दिष्ट असावें, असें त्यांना सांगावयाचें आहे. तो सर्व भाव व्यक्त व्हावा म्हणून "पिबामः शास्त्रौघान् ! उत विविधकाव्यामृतरसान् ।" हें भर्तृहरीचें वचन त्यांनी शिरोभागीं दिलें आहे. नानाविध शास्त्रें व काव्य-नाटकें आम्ही अभ्यासूं – असा त्याचा भावार्थ आहे. सर्व निबंधाचा सारार्थ यांत आला आहे; आणि श्लोकाच्या एका लहान चरणांत तो सामावल्यामुळे त्याला चित्तवेधक रूप आलें आहे. शिरोभागीं देण्यासाठी विष्णुशास्त्री यांनी सर्वत्र अशींच वचनें निवडलीं आहेत. सर्व प्रतिपादनाचें रूप एका दृष्टिक्षेपांत त्यामुळे येतें.

इतिहास या विषयावरील तिसरा निबंध पाहा. प्राचीन काळीं भारत हा अत्यंत वैभवशाली देश असूनहि आज इंग्लिश पंडित, इंग्लिश मिशनरी इत्यादिकांनी त्याची विटंबना मांडली आहे, हा या निबंधाचा विषय आहे. तो नेमका व्यक्त व्हावा म्हणून "न यत्र स्थेमानं. . .हरेरद्य द्वारे शिव शिव शिवानां कलकलः ।" हें जगन्नाथपंडिताचें भामिनी विलासांतील वचन त्यांनी दिलें आहे. "ज्या गुहेपुढे उभें राहण्यास मदमत्त हत्तीहि धजत नसत त्याच सिंहाच्या गुहेपुढे आज भालू भुंकत आहेत" यांतील रूपक किती समर्पक आहे; आणि मेकॉले, मिल प्रभृति पंडितांविषयीचा विष्णुशास्त्री यांच्या मनांतला तिरस्कार त्यांतून कसा टचून व्यक्त होतो, हें सहज ध्यानांत येईल; आणि निबंधांच्या प्रारंभीं दिलेलीं हीं वचनें म्हणजे निबंधमालेचें एक आगळें सौंदर्य आहे हें कोणालाहि मान्य होईल.

इंग्लिश राज्यकर्ते या देशांत केवळ लूटमार करीत आहेत, या भूमीचा रक्तशोष करीत आहेत; अशाने हा देश भुकेकंगाल होऊन उद्या त्यांना लुटावयालाच कांही राहणार नाही, एवढा तरी विवेक त्यांनी ठेवावा – हें 'आमच्या देशाची स्थिति' यांतील तिसऱ्या निबंधाचें प्रतिपाद्य आहे. अशा या निबंधाच्या आरंभीं कविवचन कोणतें आहे ? "राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेनां. . .नाना फलैः फलति कल्पलतेव भूमिः ।" हे राजा या भूमिरूप गाईचें तुला दोहन करावयाचें असेल तर लोक हा जो तिचा वत्स त्याचा उत्तम सांभाळ कर ! तसें केलेंस तरच ही भूमि नानाफलांनी समृद्ध होईल !" पारतंत्र्यामुळे आमची अतिशय हानि झाली आहे हा भावार्थ – "फारचि बरी निरयगति, परवशता शतगुणें करी जाच" या मोरोपंतांच्या वचनांतून उत्तम व्यक्त होतो. शकुन-अपशकुन फलज्योतिष हे सर्व लोकभ्रम आहेत, त्यांत तथ्य कांही नाही हें तुकोबांच्या – "सांगो जाणती शकुन, भूत भविष्य वर्तमान । त्यांचा आम्हांसि कंटाळा, पाहो नावडति डोळा ।।" या अभंगवाणीपेक्षा जास्त निश्चयात्मक रीतीने कोण सांगणार ? ग्रंथावर टीका करतांना कोणतें धोरण

संभाळावें तें विष्णुशास्त्री यांनी " नीरक्षीर विवेके हंसालस्यं त्वमेव तनुषे चेत् । विश्वस्मिन्नधुनाऽन्यः कुलव्रतं पालयिष्यति कः ।। " या जगन्नाथपंडिताच्या वाणींतून वदविलें आहे.

निबंधाच्या शिरोभागीं जशी, तशीच त्याच्या अभ्यंतरांतहि, शेकडो वच्चनें विष्णुशास्त्री गुंफून देतात. त्यांमुळे निबंध सारखे चमचमत राहतात व मनाला आल्हाद वाटतो. विद्वत्त्व आणि कवित्व एका ठिकाणीं नांदत नाहीत, कारण " प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङमुखी विश्वसृजः प्रवृत्तिः । " संपत्तीच्या अंगीं मूलतः हानिकारक कांही नाही, तिचा त्याग करणारा मनुष्य अधोगतीला जाणार नाहीच, असें नाही, तें सर्व मनुष्याच्या मनोनिग्रहावर अवलंबून आहे – हा भावार्थ " वनेषु दोषाः प्रभवंति रागिणां । निवृत्तरागस्य गृहं तपोवनम् ।।" या वचनानाने उत्तम व्यक्त होतो.

संपूर्ण इतिहास मनुष्याला कधी उपलब्ध होणार नाही हें खरें, पण म्हणून इतिहासाचा अभ्यासच करूं नये हें म्हणणें युक्त नाही. कारण – " आकाश अंत, न कळोनिहि अंतरिक्षीं । आकाश आक्रमति शक्त्यनुसार पक्षी । " – वामनपंडित.

नाना प्रकारचे न्याय आणि म्हणी हेहि भाषाशैलीचे शोभाकरधर्मच आहेत. कविवचनांप्रमाणेच त्यांनीहि सौंदर्यांत भर पडते. कांही पंडितांना काव्य आवडत नाही. त्यांच्याविषयी विष्णुशास्त्री म्हणतात की, "यामुळे काव्याचें मनोहर सौंदर्य लेशमान कमी होत नाही. उलट ते पंडितच वृद्धप्रमदान्यायाने उपहास्य होतात !" येथे आलेलें अनेक इंग्लिश अधिकारी अगदी सामान्य असतात; पण ते परत इंग्लंडला गेले की ' एरंडोऽपि द्रुमायते ' या न्यायाने मोठी प्रतिष्ठा पावतात. मारिस साहेबाने हिंदुस्थानचा इतिहास लिहिला. त्यांत भारतीय वीरांना उगीच एखादें पान देऊन, विस्तृत वर्णन केलें आहे तें मेजर लॉरेन्स, कर्नल मॉनसन यांचें. म्हटलेंच आहे – " स्वजातिः दुरतिक्रमा ! " रानावनांत, उन्हातान्हांत वाटेल तसे दौडणारे मराठे वीर संताजी, धनाजी, त्यांच्यापुढे औरंगजेबाच्या लष्करांतले तिस्मारखान अगदी निस्तेज झाले. मराठी भाषेंत म्हणच आहे " रानचा वारा आणि घरचा चारा ! यांची बरोबरी कशाने होणार नाही. "

न्याय आणि म्हणी हीं एक प्रकारचीं सुभाषितेंच असतात, पण तीं कवींचीं नसून समाजाचीं असतात; पण त्यामुळे तीं अगदी सुबोध असतात.

अत्यंत समर्पक व उद्‌बोधक उपमा-दृष्टान्त देऊन अर्थ फुलविण्याची हातोटी विष्णुशास्त्री यांच्या ठायीं विशेषत्वाने दिसते. 'इतिहास' या निबंधांत ते म्हणतात, ' इंग्रेज लोकांच्या अज्ञानाने व दुराग्रहाने, आणि ख्रिस्ती भटांच्या मतलबी व हेकट-पणाच्या उपदेशाने या देशांत स्वतःविषयीच्या दुर्मतांचें जें महाजाल चोहोकडे पसरलें आहे तें पार नाहीसें करून लोकांचीं मनें साफ दुरुस्त करणें तर ग्रीक लोकांच्या हर्क्यु-लीसने आजियस राजाच्या तबेल्यांत फार दिवस बिऱ्हाड करून राहिलेली लीद

व घाण दोन नद्या धरून त्यांत सोडून जशी पार धुवून टाकली, तसेच एखाद्या अचाट महावीराने उठून येथे केल्याखेरीज दुसरा मार्ग नाही!" "आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत आपलें प्रतिपादन नित्य एका पक्षाचें नसतें, कधी या पक्षाचें असतें तर कधी त्या पक्षाचें – याचें स्पष्टीकरण करतांना चिपळूणकर म्हणतात, "सत्य हें एकाच राष्ट्राला, एकाच धर्माला किंवा एकाच पक्षाला, अनुसरून असतें असें नाही; तर अशोधित धातूंत जसे सुवर्णरज यदृच्छेने मिसळलेले असतात, व रसायन-व्यापारांनी त्यांचें पृथक्करण करून ते वेगळे काढावे लागतात त्याचप्रमाणे सत्याची गोष्ट आहे. त्याचे अंश ज्यांत मिश्रित झाले नाहीत असा प्रायः कोणताहि पक्ष नाही. यास्तव एकाच पक्षाचा दृढ अभिमान हा दुरभिमान होय." 'लोकभ्रम' या निबंधांत शास्त्रीय सत्यापुढे बहुमताला कांही किमत नाही हा विचार सांगतांना ते म्हणतात, "ज्याच्यापाशी शास्त्रीय सत्याचें मजबूत प्रमाण आहे तो मनुष्य उलट पक्षाच्या कोटयानुकोटि मनुष्यास भारीच होतो. ठीकच आहे. पाहा की, ज्यापाशी दिवा आहे तो त्या दिव्यावर अंधाराचे डोंगरचे डोंगर आणून लोटले तरी डगमगेल काय? असो; पण अशा सत्यस्वरूप ज्योतीचे किरण एकंदर जगाच्या ज्ञाननेत्रांत सुखेकरून कधीहि प्रवेश करीत नाहीत." संपत्तीला विष्णुशास्त्री यांनी शस्त्र म्हटलें आहे. शस्त्र हितकारक किंवा घातक, असें कांहीच नसतें. त्याचा उपयोग करणाऱ्या मालकावर सर्व अवलंबून असतें. याचसाठी दुसरें उदाहरण त्यांनी अग्नीचें दिलें आहे. तेंहि असेच समर्पक आहे. षड्रिपूंचा विचार करतांना त्यांनी त्यांना घोड्याची उपमा दिली आहे. स्वार जर कुशल असेल तर घोडा हा कल्याणच करील; पण तो ताब्यांतून गेला तर मात्र कठीण प्रसंग. तसेच षड्रिपूंचें आहे. "वाऱ्यावांचून अग्नि जसा निर्बल त्याचप्रमाणे मोठी जाज्वल्य बुद्धीहि दृढ निश्चयावांचून पंगु होय;" "सूर्यबिंबावरून ढग जसे जातात-येतात व अखेरीस आपोआप वितळून जातात, त्याप्रमाणेच जॉनसनच्या ग्रंथांवर दूषकांचे आक्षेप शतशः आले व कालगत्या लीपूनहि गेले." "मोठ्यांच्या अंगीं दोष असले तरी ते लहानांनी काढूं नयेत हें म्हणणें म्हणजे चंद्रास कलंकी म्हणूं नये, किंवा सूर्याच्या बिंबावरचे काळे डाग पाहूं नयेत, असें म्हणण्यासारखेंच असमंजस झालें." असे उपमा-दृष्टान्त निबंधमालेंत जागोजाग दृष्टीस पडतात. त्यामुळे भावार्थ विशद तर होतोच; आणि शिवाय भाषेला मनोहारित्वहि येतें.

उपमा-दृष्टान्ताप्रमाणेच 'इसापनीति' व 'पंचतंत्र' यांतील मजेदार प्रसंग व चुटके यांनी भावार्थ खुलविणें हाहि विष्णुशास्त्री यांच्या शैलीचा एक विशेष आहे. "आकाशांतील प्रभूने आमचा कारभार करण्यासाठी इंग्रजांना मुनीम नेमलें आहे; पण हा मुनीम इसापनीतील खवाखाऊ माकडाप्रमाणे कृति करीत आहे!" भावार्थ असा की, दोन मांजरांच्या भांडणांत त्याने सर्व खवा स्वतःच लाटला त्याप्रमाणे येथील निरनिराळ्या जमातींच्या भांडणांत हा मुनीम न्याय देण्याचें मिष करून सर्व

खवा स्वतःच लाटीत आहे. "आम्ही हिंदुस्थानच्या कल्याणाकरिता येथे आलों" असें म्हणत इंग्रज सत्तारूढ झाले; आणि इसापनीतींतील घोड्यासारखी आमची स्थिति झाली. वरील स्वाराने त्यास सांगितलें, "बारें, तूं म्हणतोस तें खरें, पण आता नाही माझ्याने तुला सोडवत. तूं इतका उपयोगी आहेस हें मला पूर्वी माहीत नव्हतें. आता तुझ्या पाठीवरचें खोगीर कधी निघेल ही आशा सोडून दे." वानर आणि घोडा यांच्या वरील गोष्टीमुळे इंग्रज राज्यकर्त्यांचें स्वरूप चित्र काढल्याप्रमाणे डोळ्यापुढे उभें राहतें. पंचतंत्रांतील गोष्टीने हेंच उद्दिष्ट साधलें आहे. पंचतंत्रांतील तीन धूर्तांनी त्या भोळ्या ब्राह्मणास फसवून प्रत्यक्ष पशूवर जशी कुत्र्याची भ्रांति करविली, त्याप्रमाणे आमचे पूर्वज सर्व राष्ट्रांत अग्रगण्य असतां व साऱ्या जगाचे गुरु असतां त्यांच्या पदरीं या लबाड, कुत्सित लोकांनी वेडगळपणा बांधला आहे." मिशनरी, राज्यकर्ते व मेकॉलेसारखे पंडित हेच ते तीन धूर्त होत हें उघड आहे.

पण संस्कृत-मराठी कवींचीं वचनें, नानाविध न्याय, म्हणी, उपमा-दृष्टान्त; पंचतंत्र, इसापनीतींतील पशुपक्ष्यांच्या कथा यांपेक्षाहि विष्णुशास्त्री यांच्या शैलीचा जास्त तेजस्वी अलंकार म्हणजे उपहास-उपरोध हा होय. त्यांच्या शैलीची शोभा या एकाच अलंकाराने द्विगुणित नव्हे दशगुणित झाली आहे. व्हाल्टेअर, ज्यूनियस यांचा त्यांनी अभ्यास केला होता; आणि तसाच विखार आपल्या लेखणींत त्यांनी उतरविला होता. त्यामुळे तिचा डंख ज्यांना होई त्यांना असह्य वेदना होत. एलिफास, ज्ञानोदय यांचा जो जळफळाट त्या वेळीं त्यांच्या पत्रांवरून दिसून येई त्यावरून हा डंख किती विषारी असे, तें चांगलें कळून येतें. मेकॉले, मॉरिस यांसारखे इंग्रज विद्वान, विलसनसारखे पाद्री आणि लिटन, टेंपल, स्ट्रॅची यांसारखे राज्यकर्ते यांच्यावर विष्णुशास्त्री टीका करूं लागले म्हणजे त्यांच्या या उपरोधिक लेखनाला विलक्षण धार चढे; आणि ते विषदिग्ध खड्गाचे प्रहार भारताच्या शत्रूंवर होत असल्यामुळे वाचकांना विलक्षण आनंद होई. मेकॉलेसाहेब म्हणाले की, हिंदुस्थान-देश पोर्तुगाल, आयर्लंड यांहून भिकारी आहे. त्यावर विष्णुशास्त्री म्हणतात, "हिंदुस्थान भिकारी! वा:! दिवसाढवळ्या साऱ्या जगाच्या डोळ्यांत माती टाकण्याचें हें साहेबांचें धाडस त्यांचें त्यांसच शोभो! हिंदुस्थान जर दरिद्री झाला तर साहेबांचा देश कशाने श्रीमंत झाला कोण जाणे! शिशाच्या व कोळशाच्या खाणींनी तर नाही ना? कोणीं नाही म्हणावें? उद्या मेकॉलेसाहेबांचे एखादे बंधु जाहीर करतील की "अहो! हिमालयाविषयी भूगोलवेत्त्यांना भ्रांति आहे. आमच्या इंग्लंडांतील एखादें लहानसें टेकाडहि त्यास उंचींत हटवून टाकील! तसेंच गंगा, ब्रह्मपुत्रा यांना लंडनांतील एखादें गटारहि मागे सारून देईल!" 'ज्ञानोदय' हें जें ख्रिस्ती मिशनऱ्यांचें मासिक त्याने विष्णुशास्त्री यांशीं उभा दावा धरला होता. वेळोवेळीं त्यांच्यावर कडाका उडवून मिशनरी शास्त्रीबुवांना राजद्रोही ठरविण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या टीकेला उत्तर देतांना विष्णुशास्त्री म्हणतात, "बरोबरच आहे. मेकॉले, मिल्ल अशा

जगविख्यात ग्रंथकारांवरहि जो 'आपली क्षुद्र लेखणी' उचलतो तो महामूर्ख कसा नव्हे ? इंग्रेज लोकांनी त्यांच्या देशावर जन्मोजन्मीहि न फिटणारे जे असंख्य उपकार करून ठेवले आहेत ते न जाणता जो प्रत्येक इंग्रजास प्रतिख्रिस्त मानीत नाही, ख्रिस्ती धर्म खरा, हिंदु धर्म खोटा अशी ज्याची अजून खात्री झाली नाही; पाठीवर घाव घेऊन तडक पळणारा इंग्रजी सोजीरहि आमच्या बाजीरावापेक्षा, रणजित-सिंगापेक्षा शतपट अधिक शूर असें ज्यास भासत नाही, ज्याची पूर्वजप्रीति इंग्रेजी ज्ञानाने नष्ट होत नाही, महाराणीचे ठायीच्या राजनिष्ठेचा व आपल्या देशाच्या शूरांच्या वर्णनांत केवढा जबरदस्त विरोध आहे तो ज्यास दिसत नाही, तो केवढा नष्ट, केवढा कृतघ्न !"

इंग्रज भारताचें कल्याण करणार, त्यांचें राज्य दैवी कृपेने येथे आलें, या उद्‌गारांची विष्णुशास्त्री यांना भयंकर चीड असे. अशा प्रलापांचा समाचार घेतांना, 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत ते म्हणतात, "मराठीशाहीची टोलेजंग इमारत उभारून दिली तेव्हा शिवाजीमहाराजांनी इंग्रेजी शिपाईगिरी किंवा मुत्सद्दे-गिरी चार हजार कोसांवरून उसनी मागून आणली होती काय ? बाळाजीपंत पेशव्याने दिल्ली-अटकेपर्यंत नजर पोचवून अवघ्या बादशाहीस आपल्या जाळ्यांत गुदरविले तेव्हा आपली बुद्धि एखाद्या आंग्लभौम विद्यालयांत पाजळून घेतली होती काय ?"

इंग्रज राज्यकर्ते, पंडित व मिशनरी यांच्याप्रमाणेच स्वकीयांवरहि त्यांच्या नाकर्तेपणाबद्दल विष्णुशास्त्री उपरोधिक टीका करीत. त्या वेळच्या राजे-रज-वाड्यांवर टीका करतांना विष्णुशास्त्री म्हणतात, "पाटीलबोवांचा तर खुद्द लंडनवर भगवा झेंडा रोवण्याचा इरादा होता; आणि आता ? आता शिंदे यांनीं मोठें शतकृत्य केलें म्हणजे काय, तर कलकत्त्यास एखाद्या 'बॉलांत' कमांडर इन् चीफच्या बायकोबरोबर नाचले ! आणि महाराज होळकर यांनी मोठी तरवार गाजविली म्हणजे काय, तर एखादी गिरणी काढली !" पुणें-वर्णन लिहून स्वकीयांची निरर्गल निंदा करणाऱ्या लेखकाविषयी लिहितांना ते म्हणतात, "एकंदरींत हा ग्रंथ वाचला असतां मिशनरी लोकांच्या शिक्षणाने बुद्धि केवढी फाकते, सत्यनिष्ठा केवढी वाढते वगैरे गोष्टी स्पष्ट दिसून येतात !"

विष्णुशास्त्री यांच्या शैलीच्या या अभ्यासावरून, त्यांच्या यशाचें श्रेय त्यांचें स्वत्व, स्वाभिमान याविषयीचे जे विचार त्यांना जसें आहे तसेंच त्यांच्या अद्वितीय भाषाशैलीलाहि आहे हें सर्वांना मान्य होईल असें वाटतें. ते खरोखरीच मराठी गद्याचे जनक होते यांत शंका नाही.

- १५ -

# व्यक्तिमत्त्व

विष्णुशास्त्री यांचें कार्य आणि त्यांचें साहित्य यांचा येथवर सर्वांगीण विचार केला. त्यांचें ध्येय काय होतें, दर वेळीं डोळ्यांपुढे त्यांनी कोणतें उद्दिष्ट ठेवलें होतें, त्याच्या सिद्धीसाठी कोणते प्रयत्न केले आणि त्यांना यश काय आलें याचाहि विचार केला. आता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करून हें सर्व विवेचन पुरें करावयाचें आहे.

मनुष्याचें व्यक्तिमत्त्व हें त्याचे विचार, त्याच्या भावना, त्याची प्रज्ञा, त्याने केलेले बहुविध उद्योग, त्याचा मित्रपरिवार, आणि त्याच्या काळची परिस्थिति यांतून साकार होत असते; आणि त्या व्यक्तिमत्त्वांतून वरील घटकांवरहि परिणाम होत असतो. एका दृष्टीने आधी झाड की आधी बी अशासारखाच हा प्रश्न आहे. दोन्ही आधी आणि दोन्ही मागून असेंच नेहमी वाटत असतें. व्यक्तिमत्त्व आणि परिस्थिति यांचा विचार करतां या दोहींचा एकमेकांवर परिणाम होत असतो; आघात-प्रत्याघात होत असतात एवढेच निश्चयाने म्हणतां येईल. येथे आपणांस या तपशिलांत शिरावयाचें नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रधान गुण तेवढे पाहवयाचे आहेत. कारण हा प्रबंध म्हणजे त्यांचें चरित्र नसून त्यांच्या कार्याचें विवेचन व मूल्यमापन आहे.

## अहंवृत्ति

विष्णुशास्त्री यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रधान गुण म्हणजे त्यांची अहंवृत्ति हा होय. "मी मराठी भाषेचा शिवाजी आहे" हे त्यांचे उद्‍गार या अहंवृत्तींतूनच निघालेले आहेत. मराठी भाषा ही पुरेशी अर्थव्यंजक नाही. मनांतले सर्व विचार, सर्व भाव व्यक्त करण्याचें सामर्थ्य तिला नाही, असा आक्षेप त्या वेळीं कोणी घेत

असत. त्याला "आमचें पुस्तक (निबंधमाला) हेंच या आक्षेपाचें खंडन होय," असें उत्तर या अहंवृत्तीनेच दिलें. शाळाखात्याचे डायरेक्टर चॅटफील्डसाहेब एकदां शाळेंत आले होते. अशा वेळीं ते आपल्या अध्यापनाविषयी काय अभिप्राय देतील, या विचाराने शिक्षक सामान्यत: अस्वस्थ असतात; पण असली भीति, शंका, अस्वस्थता शास्त्रीबुवांच्या स्वप्नांतहि कधी आली नसेल. उलट त्यांनीच त्या दिवशीं डायरीमध्ये, "माणूस मोठा भला दिसतो, माझें त्याच्याविषयी अनुकूल मत झालें," असा अभिप्राय लिहून ठेवला. मला दुसऱ्यांचे अभिप्राय नको आहेत, मीच जगावर अभिप्राय देणार, हे त्या अहंवृत्तीचे बोल आहेत.

### आत्मप्रत्यय

ही अहंवृत्ति, हा अहंप्रत्यय विष्णुशास्त्री यांच्या ठायीं नसता तर त्यांच्या हातून जें कार्य झालें तें मुळीच झालें नसतें. मागे अनेक वेळा सांगितलेंच आहे की, इंग्रेज राज्यकर्ते, युरोपीय पंडित आणि मिशनरी हे हिंदी जनांचा तेजोवध करण्याचा अहर्निश प्रयत्न करीत होते; आणि हे सर्व लोक मोठे कर्तबगार, विद्वान, अनुभवी असे होते. त्यांना भारताच्या उद्धारार्थ परमेश्वरानेच धाडलें आहे, अशी श्रद्धा मोठमोठ्या हिंदी विद्वानांच्या मनांत निर्माण व्हावी, इतकें त्यांचें तेज होतें, इतकी दीप्ति त्यांच्याभोवतीं होती. अशा स्थितींत त्यांनी हिंदु धर्म, हिंदु परंपरा, हिंदु इतिहास; यांच्यावर जी निरर्गल टीका चालविली होती तिला उत्तर देणाऱ्या माणसाचा आत्मप्रत्यय अगदी असामान्य असणें अवश्य होते. अत्यंत उग्रदर्प असलेला अहंकारच तेथे टिकणें शक्य होतें. अतिशय दुर्दम्य अशा अहंमतीने संपन्न असलेला पुरुषच त्यांचे आघात लीलया झेलून त्यांच्यावर तितक्याच जोराने प्रत्याघात करण्यास समर्थ झाला असता. विष्णुशास्त्री हा तसा पुरुष होता. विष्णुशास्त्री म्हणजे मूर्तरूपाला आलेला अहंकारच होता. त्यामुळेच इंग्रेज म्हणजे देवमाणसें, सर्व गुणांचें आगर म्हणजे इंग्लंड, खरा धर्म म्हणजे सिनिया पर्वतावरचा, विद्वत्त्व, सुशीलत्व, शूरत्व हे सर्व गोऱ्या कातडयाकडे, आणि हिंदु म्हणजे अगदी कृमि-कीटक, असल्या घातक, भ्रांत तत्त्वज्ञानाच्या मगरमिठींतून ते स्वजनांना मुक्त करूं शकले. त्यांच्या ठायीच्या या अहंकारालाच, त्यांनी गर्व असें म्हटलें आहे. आणि या विपत्काळीं आपल्या सर्व समाजानेच अशा गर्वाची स्वत:च्या मनांत जोपासना केली पाहिजे, त्यावांचून आपली धडगत नाही, असें नि:शंकपणें सांगितलें आहे.

### राष्ट्रीय अहंकार

विष्णुशास्त्री यांच्या या वैयक्तिक अहंकाराला सामाजिक व राष्ट्रीय अहंकाराची बैठक होती, हें आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे. "आज हिंदी जनांचें कर्तृत्व अगदी हीन पातळीला गेलें असलें तरी त्यांच्या अंगचे गुण आज सुप्त आहेत." असें ते म्हणत. निबंधमालेचा उद्देश काय तें सांगताना ते म्हणतात, "आमच्या लोकांत कितीहि दोष असले तरी बुद्धीचा मंदपणा हा, आमचा अत्यंत तिरस्कार

करणाराच्यानेहि आमच्या माथीं मारवणार नाही ! चलाखपणांत आम्ही कोणत्या लोकांस हार जाणार नाही, अशी आमची खात्री आहे. आमच्या बुद्धीचे प्रभाव जगाच्या इतिहासावर अक्षय खोदलेले आहेत व चंद्र-सूर्य आहेत तोंवर त्यांचा झेंडा मिरवत राहील !" स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश, यांचा अभिमान तर त्यांना होताच; पण दैन्यावस्थेला गेलेल्या स्वजनांचाहि अभिमान ते तितक्याच तीव्रपणें प्रगट करीत. त्या स्वजनांच्या अभिमानाची, अहंवृत्तीची जपणूक करणें हेंच त्यांच्या वैयक्तिक अहंवृत्तीचें प्रमुख कार्य होतें.

**व्यासंग**

विद्वत्ता, पांडित्य, अखंड व्यासंग हा विष्णुशास्त्री यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा घटक होय. स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश यांवर होणाऱ्या आघातांचें निवारण करून ते आघात करणाऱ्या शत्रूंवर त्यांना प्रत्याघात करावयाचे होते. हें सर्व युद्ध बौद्धिक पातळीवरून व्हावयाचें होतें. इंग्रज पंडित व मिशनरी यांचीं सर्व शस्त्रास्त्रें बौद्धिक होतीं. इतिहास, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान यांच्या आधाराने ते बोलत व लिहीत. त्यांतून आधार काढून, प्रमाणें देऊन, हिंदु धर्म, हिंदु तत्त्वज्ञान यांतील सिद्धांतांचें खंडन करीत व स्वधर्माचें मंडन करीत. भारताच्या प्राचीन परंपरेला दूषण देतांना इतिहासाचें बळ मागे उभें करीत. विष्णुशास्त्री यांनी तींच शास्त्रास्त्रें वापरलीं नसतीं तर, हिंदी राजे इंग्रजांच्या भारी शस्त्रबळामुळे जसे रणांत पराभूत झाले तसेच, विष्णुशास्त्री इंग्रज पंडितांपुढे पराभूत झाले असते. पण शास्त्रीबुवांनी हें चांगलें जाणलें होतें, आणि डेक्कन कॉलेजांत असल्यापासूनच त्यांनी या युद्धाला लागणारी शस्त्रास्त्रें व दारुगोळा आपल्या कोठारांत भरण्यास सुरुवात केली होती. ग्रंथकार होण्याचें त्यांचें ध्येय तेव्हापासूनच निश्चित झालें होतें. बी. ए. झाल्यावर त्यांनी कायद्याचा अभ्यास करावा, असें कृष्णशास्त्री यांनी त्यांना सुचविलें होतें; पण त्यांनी तें मुळीच मनावर घेतलें नाही. त्यांना बौद्धिक कुरुक्षेत्रावर जावयाचें होतें, म्हणून त्या बाणभात्यांचा साठा ते करीत होते.

**बहुश्रुतता**

पण विष्णुशास्त्री यांची विद्वत्ता ही बहुश्रुततेच्या स्वरूपाची होती. एखादा विशिष्ट विषय घेऊन त्याचा सखोल अभ्यास त्यांनी केलेला नव्हता. डॉ. भांडारकर, न्या. मू. रानडे यांच्यासारखें त्यांचें पांडित्य नव्हतें. डॉ. भांडारकर हे संस्कृत विद्येचे, प्राचीन इतिहासाचे पंडित होते. न्या. मू. रानडे अर्थशास्त्राचे पंडित होते. विष्णुशास्त्री त्या अर्थाने कोठल्याच विषयाचे पंडित नव्हते. हिंदी जनांची स्वत्वजागृति करणें, आणि इंग्रज राज्यकर्त्यांचें खरें स्वरूप त्यांना दाखविणें हें त्याचें उद्दिष्ट होतें. ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे युरोपांत जसें प्रबोधन झालें, तसें प्रबोधन त्यांना येथे घडवावयाचें होतें. मागे एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रांत मानसिक क्रांति घडविणें हें त्यांचें उद्दिष्ट होतें. आणि या उद्दिष्टांसाठी अवश्य

तें वाचन, अवश्य तो व्यासंग, त्यांनी केला होता. या दृष्टीने इतिहास हा त्यांच्या व्यासंगाचा प्रधान विषय होता. वक्तृत्व, संपत्तीचा उपभोग, गर्व, मुद्रण-स्वातंत्र्य, लोकभ्रम, आमच्या देशाची स्थिति – कोणताहि विषय असो. ग्रीस, रोम, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, अमेरिका या देशांच्या व प्राचीन भारत व महाराष्ट्र यांच्या इतिहासांतील आधार-प्रमाणें देऊन ते उपपादन करतात. हे इतिहास मात्र त्यांनी फार बारकाईने वाचले होते. त्यांतील घटना व व्यक्ति त्यांच्या डोळ्यांपुढे सतत उभ्या असत आणि विषय निघतांच तेथे तेथे त्यांची गुंफण ते करीत असत. त्यामुळे त्यांची निबंधमाला रत्नजडित मालेप्रमाणे शोभिवंत दिसे, आजहि दिसते. संस्कृत कविता, भर्तृहरि, जगन्नाथपंडित यांचे ग्रंथ आणि पाश्चात्त्यांनी संस्कृत विद्येचे व प्राचीन भारताच्या थोरवीविषयी लिहिलेले ग्रंथ, हा त्यांचा दुसरा आवडीचा विषय होता. प्राचीन भारताची संस्कृति, त्या काळच्या विद्या, कला आणि एकंदर कर्तृत्व यांचा अभिमान जागृत करण्यासाठी त्यांनी हा अभ्यास साक्षेपाने केला होता. याशिवाय 'वेदार्थयत्न', 'कौमुदी महोत्सव', 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' अशा-सारख्या ग्रंथांचें परीक्षण करतांना वेदवाङ्मय, पाणिनि, पतंजली यांचे व्याकरण-ग्रंथ यांच्याविषयी अवश्य ती सर्व माहिती ते जमा करीत आणि येथील समाजाचें प्रबोधन करण्याच्या दृष्टीने त्या ग्रंथांचें समीक्षण करीत. मूळ ग्रंथाचें साकल्याने परीक्षण करणें असा त्यांचा उद्देशच नसे. महाराष्ट्रभाषेची अभिवृद्धि व्हावी, लोकांची ज्ञान-लालसा जागृत व्हावी हा हेतु ठेवून ते हीं समीक्षणें लिहीत. त्या त्या विषयाचें खोल ज्ञान त्यांना नव्हतें. तसें त्यांनी एक-दोन ठिकाणीं सांगूनहि टाकलेलें आहे; पण पुराण-युगांतून लोकांना वास्तव युगांत आणावें या दृष्टीने ग्रंथाचें परीक्षण करण्यास अवश्य तो व्यासंग ते निश्चित करीत.

'इंग्रेजी भाषा' हा त्यांचा प्रबंध पाहिला म्हणजे विष्णुशास्त्री यांचें अंतिम उद्दिष्ट आणि तें सिद्ध करण्यासाठी त्यांनी केलेला व्यासंग यांचें स्वरूप बरोबर कळून येईल व त्यावरून त्यांच्या व्यक्तित्वाची रूपरेषा मनापुढे स्पष्ट उभी राहील.

### गद्य-महत्त्व

या निबंधांत इंग्रेजी वाङ्मयांतील काव्य-नाटकादि साहित्याचा परामर्श ते जवळजवळ करीतच नाहीत. त्यांनी विवेचन केलें आहे तें प्रामुख्याने निबंध व इतिहास-ग्रंथ यांचें. सत्यदीपिकाकारांनी या प्रबंधावर जे आक्षेप घेतले त्यांना उत्तर देतांना विष्णुशास्त्री यांनी स्वतःच हें स्पष्ट केलें आहे; आणि याचें कारणहि उघड आहे. गद्य-ग्रंथांचा प्रारंभ हे राष्ट्राच्या सज्ञान अवस्थेचें सूचक होय, असा त्यांचा ठाम बुद्धिनिश्चय होता; आणि ती सज्ञान अवस्था या देशाला आणावयाची हें त्यांचें उद्दिष्ट होतें. म्हणूनच इंग्लंड या राष्ट्राला ती दशा ज्या ग्रंथांमुळे आली त्यांचें विवेचन त्यांनी केलें आहे. ते म्हणतात, "मागे स्पेक्टॅटर वगैरे पत्रें सांगितलीं, त्यांचा लोकांस अतिशय हव्यास लागून, वाचण्याची व ज्ञानसंपादनाची गोडी जशी त्यांस अधिका-

धिक लागत चालली, तसतसा इंग्लंडांत विद्येचा उत्कर्ष होऊं लागून, राजकीय प्रकरणांचाहि सामान्य लोकांत सुद्धा विचार होऊं लागला. शिवाय, नाना प्रकारच्या विषयांवर हजारो ग्रंथ होऊन, ते सर्वांस समजूं लागल्याने एकंदर राष्ट्राचे ठायीं अभिज्ञता व ज्ञानाविषयी उत्कंठाहि अधिकच प्रबळ झाली." हीच प्रगति येथे चिपळूणकरांना घडवावयाची होती. त्यांच्या निबंधमालेने वाचनाचा हव्यास लोकांना लागून त्याचें प्रत्यक्ष फल म्हणून भिन्न भिन्न क्षेत्रांतील लोकांना लेखनाची स्फूर्ति कशी झाली तें प्रारंभीच सांगितलें आहे.

### इंग्रज इतिहासकार

हें इंग्रजींतील निबंधवाङ्मयाविषयी झालें. इंग्रजींतील 'इतिहास-ग्रंथांचें'-विवेचन त्यांनी कशासाठी केलें ! पौर्वात्य देशांचा व विशेषतः भारताचा इतिहास लिहिणारे जे इंग्रज इतिहासकार त्यांचें सत्य स्वरूप दाखविण्यासाठी ! ते म्हणतात, 'इकडील लोकांविषयी खरें ज्ञान पाश्चात्त्य लोकांस होण्यास पहिली अवश्य गोष्ट ही की, अज्ञानास्तव, गर्वास्तव किंवा दुराग्रहास्तव त्यांच्या मनाने ज्या वेड्या निराधार समजुती घेतलेल्या असतात त्या काढून टाकून, त्यांनी आपला चित्तरूप-पट पहिल्याने स्वच्छ धुवून काढला पाहिजे. कारण इकडील लोकांविषयी ज्ञान व यथार्थबुद्धि या गुणांत यांतील बहुतेकांचा कमतरपणाच असतो.' शेवटीं निष्कर्ष म्हणून त्यांनी सांगितला आहे तो असा : सर्व गोष्टींचा यथार्थ विचार केला असतां, असें दिसतें की, मनुष्यमात्रांत जे दोष सापडतात त्यांपासून युरोपियन लोक झाले म्हणून ते तरी तिळमात्रहि मुक्त झाले आहेत असें नाही. यथार्थबुद्धि किंवा मनाची सम-वृत्ति या गुणांत सुधारणेच्या शिखरावर जाऊन पोचलेले व खऱ्या धर्माचीं तत्त्वें स्वीकारल्याने पावन झालेले आमचे पाश्चात्त्य बंधु इतरांपेक्षा वरचढ आहेत असें नाही.

### अनाग्रह दुर्मिळ

इतिहासाच्या अशा सूक्ष्म व व्यापक अध्ययनानंतर बुद्धीचें फल जें अनाग्रह तें अभ्यासकाला मिळावें अशी सहजच अपेक्षा निर्माण होते; आणि विष्णुशास्त्री यांना तें मिळालें होतें हें त्यांच्या अनेक निबंधांवरून स्पष्ट दिसतें; पण अनाग्रह आणि दुराग्रह यांचें चमत्कारिक मिश्रण त्यांच्या बुद्धींत झालें होतें; पण जगांतल्या थोर इतिहास-अभ्यासकांच्या बाबतींत अनाग्रहाची अपेक्षा बव्हंशीं विफलच झालेली दिसते. अलीकडे तो नियमच झाला आहे. मार्क्स, बकल, हंटिंग्टन, गोबिनो, चेंबरलेन, हेगेल, स्पेंगलर यांनी अर्थ, भूगोल, वंश, अध्यात्म, इत्यादींविषयी, प्रथम मनाशीं कांही सिद्धान्त निश्चित करून, त्यांच्या उपपादनासाठी इतिहास त्या त्या चौकटींत वाटेल तसा ठोकून बसविला आहे. त्यांच्या इतिहास-विवेचनांत पूर्वग्रह, अभिनिवेश, अविवेक, अंधता, पक्षपात हे दोष पानोपानीं दिसून येतात. त्या मानाने विष्णुशास्त्री हे शतपटींनी जास्त तटस्थता दाखवूं शकतात यांत शंकाच नाही; पण अनेक ठिकाणीं त्यांनी दुराग्रहाने कांही मतें मांडलीं आहेत हें खरेंच आहे. याविषयी सविस्तर

विवेचन मागे केलेंच आहे. येथे त्यांचें व्यक्तिदर्शन – या विषयाच्या पूर्ततेसाठी फक्त निर्देश करतों.

इंग्रज राज्यकर्त्यांविषयी त्यांच्या मनांत कमालीचा द्वेष असूनहि त्यांचे गुण त्यांनी अनेक ठिकाणीं मुक्त-कंठाने गाइले आहेत. त्यांची विद्याभिरुचि, त्यांची उद्योगप्रियता, त्यांची शोधक बुद्धि, त्यांचा देशाभिमान, त्यांची साहसप्रियता, त्यांची ज्ञानलालसा हे गुण आपण आत्मसात् केले पाहिजेत, त्यांच्यापासून शिकले पाहिजेत, असें अगदी मुक्तमनानें त्यांनी वारंवार स्वबांधवांना सांगितलें आहे; आणि त्याचप्रमाणे स्वजनांचे दोषहि त्यांनी परखडपणें सांगून त्यासाठी त्यांच्यावर कठोरपणें टीकाहि केली आहे. आपल्याला विद्याभिरुचि नाही, विद्यानंदाची कल्पना नाही, संपत्तीविषयी, षड्विकारांविषयी आपले सिद्धान्त प्रामादिक आहेत, देशाभिमान ही वृत्तीच आपल्या ठायीं नाही, जातिभेद हें त्याचें कारण आहे, आपण निवृत्तिमार्गी लोक आहों, लोकशाही पद्धति भारताला माहितीच नाही, इतिहास-लेखनाचा अभाव हें आपलें मोठें व्यंग आहे, असे हिंदी-जनांचे दोष ते ठायीं ठायीं दाखवितात; आणि बहुधा दर वेळीं युरोपियनांचा कित्ता घेण्यास सांगतात. पण असें असूनहि आपल्या देशाला कांहीएक झालें नाही, असें निक्षून ते सांगतात, आणि सध्याच्या निकृष्ट अवस्थेची अगदी अनैतिहासिक मीमांसा करतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करतांना नीर-क्षीर-विवेक करूनच क्षीर तेवढें घेण्याचें धोरण कटाक्षाने संभाळलें पाहिजे.

## मित्रवर्य महाजनी

त्या काळचे एक मोठे पंडित वि. मो. महाजनी हे विष्णुशास्त्री यांचे स्नेही व सहाध्यायी होते. त्यांना विष्णुशास्त्री यांच्या बंधूंनी आपण लिहिलेल्या विष्णुशास्त्री यांच्या चरित्रांत समाविष्ट करण्यासाठी, त्यांच्या ग्रंथांचें परीक्षण लिहिण्यास सांगितलें; पण महाजनी यांनी स्पष्ट कारणें सांगून नकार दिला. कारणें कोणतीं ? विष्णुशास्त्री यांची टीका एकांगी असे. त्यांची भाषा फार जहाल असे. लोकहितवादी, जोतिराव फुले, दयानंद यांच्यावर त्यांनी पूर्वग्रहदूषित मनाने टवाळी केली ती महाजनींना आवडली नाही. त्यांनी अनेक वेळा विष्णुशास्त्री यांना तसें लिहून पाहिलें; पण उपयोग झाला नाही. बंधूंना लिहिलेल्या पत्रांत त्यांनी म्हटलें आहे की, " विष्णुपंत यांनी मराठीची मोठी सेवा केली, ते मोठे देशभक्त होते, हें मला मान्य आहे. तसेंच ते केवळ अंध रूढिभक्त होते असेंहि नाही. अनेक वेळा त्यांनी समाजांतील अविवेकी रूढींवर टीका केलेली आहे; पण दुर्दैवाने ती टीका लोक विसरले आणि त्यांचे 'जॉन्सन', 'इतिहास' हे निबंध दुर्लक्षून 'लोकहितवादी', 'दयानंद' यांच्यावरील निबंधच तेवढे लोकांनी लक्षांत ठेवले. " (विश्रब्ध शारदा, पृ. २२२). हें पत्र वाचून माझ्या मनांत आलें की, विष्णुशास्त्री यांच्याविषयीचा हा अभिप्राय त्यांनी जाहीरपणें वर्तमानपत्रांत मांडावयास हवा होता, किंवा त्यांच्या बंधूंची विनंती मान्य

करून तसें परीक्षण लिहावयास हवें होतें. आपल्या मित्राचे गुणदोष दाखविणें त्यांचें कर्तव्यच होतें. त्यामुळे त्या मित्राच्या कार्याचें उज्ज्वल रूप तेवढेंच कायम राहून दोषपरिहार झाला असता व समाजाचा फायदाच झाला असता.

## नाण्याच्या दोन बाजू

अर्थात् निश्चित असें कांही सांगणें फार अवघड आहे. कारण ज्या त्यांच्य अहंवृत्तीचा वर गौरव केला आहे तिच्यांतूनच हे दोष निर्माण झाले होते. म्हणजे त्यांच्या प्रकृतीचाच तो घटक होता; आणि तो नाहीसा झाल्यावर प्रतिपक्ष्यावर बेगुमान हत्यार चालविण्याचें जें धैर्य त्यांच्या ठायीं होते, तें कितपत टिकून राहिलें असतें, तें सांगवत नाही. कांदा, लसूण अशा कांही कंदांना अत्यंत उग्र असा दर्प असतो. तो पुष्कळांना दुःसह होतो. त्यांना हे दोन्ही कंद आवडतात; पण कांही तरी रासायनिक प्रक्रिया करून हा दर्प तेवढा घालवावा, असें त्यांना वाटतें. त्यांना शास्त्रज्ञ सांगतात की, तो दर्प घालविला म्हणजे त्यांचे गुणहि त्याच्याबरोबरच जातील. कारण त्या दर्पांतच त्यांचें वैशिष्टय म्हणजे व्यक्तित्व असतें. विष्णुशास्त्री यांच्या बाबतींत असेंच केव्हा केव्हा वाटतें. दुराग्रह ही नाण्याची एक बाजू आहे. अत्यंत निर्भय, साहसी प्रतिपादन करण्याचें धैर्य ही त्याच नाण्याची दुसरी बाजू आहे. बहुतेक थोर पुरुषांची अशीच स्थिति असते. डॉ. जॉनसन हा जो विष्णुशास्त्री यांचा आदर्श, तोऽहि तसाच होता.

## राजद्रोह !

निर्भय लेखन हा जो चिपळूणकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रधान गुण तो पहिल्या अंकापासूनच दिसूं लगला होता. 'इतिहास' या प्रबंधांत तो प्रकर्षाने दिसून आला. आणि 'आमच्या देशाची स्थिति' या प्रबंधांत त्याची अगदी परिणति झालेली दिसते. या काळांत त्यांच्या प्रतिपक्ष्यांनी त्यांच्यावर इतर आरोप तर केलेच; पण प्रामुख्याने राजद्रोहाचा आरोप करण्यांत सर्वांची एकवाक्यता होती. ते सरकारी नोकर असल्यामुळे त्यांना प्रायश्चित्त देणें फारच सोपें होतें; पण येथे त्यांच्या प्रतिपक्ष्यांचा अंदाज सपशेल चुकला. कारण ही बेडी त्रासदायक होणार, हें दिसतांच, विष्णुशास्त्री यांनी लेखणी तोडण्याऐवजी ती बेडीच तोडून टाकली. त्याच्या आधीच्या वर्षी, एलिफाससाहेबाने 'इंग्रेजी भाषा' या निबंधांतील कांही उताऱ्यांचें इंग्रजी भाषांतर करून, सरकारकडे धाडलें आणि पुण्याच्या ब्राह्मणांवर सरहा राजद्रोहाचा आरोप ठेवला. यामुळे भिऊन वागण्याचें तर लांबच राहिलें, उलट 'निबंधमाला, वर्ष तिसरें' या अंकांत एकंदर टीकाकारांचा परामर्श घेतांना चिपळूणकरांनी त्या एलिफासचीच रेवडी करून टाकली. हे महाविद्वान् लेखक, हे हत्तीमहाराज, स्वतःच्या आवेशानेच निवळ खड्ड्यांत जाऊन कोसळले आहेत ! – या शब्दांत त्यांनी या साहेबाची संभावना केली; आणि शेवटीं म्हटलें की, "या योगाने आमच्या वाचकांस जर एवढें कळून येईल की, हजारो युरोपियनांच्या हातीं जाणाऱ्या पत्रांतहि

(सरकारी ग्याझिट — यांतच एलिफासने आपलें आरोपपत्र प्रसिद्ध केलें होतें) किती झोटिंगपाच्छाईचा मजकूर छापला जातो, व दुराग्रहास वश झाले असतां आमचे विद्यासंपन्न पाश्चात्त्य बंधु कोठवर भरकटत जातात, तर एवढयानेच या प्रत्युत्तराचें आम्ही साफल्य समजूं."

## सरकार !

सत्यदीपिकाकारांनीहि "सरकार हवें तें लिहिण्यास मोकळीक देतें तिचा मालाकार दुरुपयोग करून सरकारास नेहमी शिव्या देत असतात" असा आरोप केला होता. त्याला याच अंकांत मालाकारांनी कांदा-लसूण-मोहरी-मिरची असें एकत्र करून, अगदी झणझणीत उत्तर दिलें. ते म्हणतात, "'सरकार' व 'दुरुपयोग' या शब्दांचा अर्थहि आमच्या ख्रिस्ती बंधूस कळत नाही. आमच्या या भाविक व राजनिष्ठ बंधूस जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं तर सरकार दिसत नसेल ना? पाद्रीसाहेब सरकार, पवित्र शुभ वर्तमान सरकार, मेकॉलेप्रभृति ग्रंथकार सरकार, टेम्स नदी सरकार, साहेबी बूटहि सरकार! विलायती बुटासहि शिरसावंद्य मानीत जा, एरवी तुम्हांला हवें तें लिहिण्याची मुभा आहे!"

## नववा आक्ट

निबंधमालेला चार वर्षें पुरीं झालीं त्याच वर्षी "चालू सालचा नववा आक्ट हिंदुस्थानावर आदळला व हजारो लेखण्या एकाएकीं भय-स्तब्ध झाल्या. या आक्टाने कोणत्याहि जातीच्या अगर धर्माच्या लोकांस चिरड येईल असा मजकूर किंवा सरकारच्या राज्यपद्धतीच्या संबंधाने विरुद्ध विचार हीं दोन्ही मना केलीं आहेत!" 'निबंधमाला, वर्ष ४ थें' या अंकांत ही दुष्ट वार्ता देऊन, "देशदूषकांचा समाचार आता आम्हांस बेताबेतानेच घ्यावा लागेल." असें शास्त्री बुबांनी म्हटलें आहे. शिवाय "ख्रिस्ती बंधूंना उत्तर म्हणून लिहिलेला अंक छापखान्याच्या यंत्रावरून उतरून आम्हांस रद्द करावा लागला," असेंहि त्यांनी स्वतःच सांगितलें आहे.

## ज्वाला तरी ते

यावरून मालाकार घाबरले व त्यांनी आपली प्रौढी मागे घेतली, असें कित्येकांना वाटलें. त्या वेळीं कोणाला तसें वाटलें असलें तरी तें साहजिकच होतें; पण त्यांच्या मृत्यूनंतर पन्नास वर्षांनी त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनी, 'आमच्या देशाची स्थिति' हा प्रबंध वाचला असतांनाहि त्यांच्यावर तीच टीका करावी हें नवल आहे.

या प्रबंधांत विष्णुशास्त्री हें काय तेज होतें व "विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते", "केला जरी पोत बळेंचि खाले ज्वाळा तरी ते वरती उफाळे" या उक्ती त्यांच्या बाबतींत कशा यथार्थ होत्या हें कळून येतें. "इंग्रजशाहीपेक्षा मोगलाई बरी होती", "गरीब प्रजेची लूट करून आपल्या तुंबडया भरणें हाच आमच्या राज्यकर्त्यांचा उद्योग" अशी टीका तर त्यांनी केलीच; पण इंग्रेज येथे आले नसते तर, इतकेंच

काय, इंग्रेज जगांतच नसते तरी आमचें कांही नुकसान झालें असतें असें नाहीं, असें जहरहि आपल्या लेखणींतून ओतण्यास त्यांनी कमी केलें नाही.

**सहकार्य**

आणि अशा या निःस्पृह, निर्भय पुरुषाने आपल्या अल्प, अति अल्प आयुष्याच्या अखेरीस राष्ट्रीय प्रपंचांत जे बहुविध उद्योग सुरू केले त्यांत त्याच्या अंगच्या अगदी निराळ्या गुणांची कसोटी लागावयाची होती. ते गुण म्हणजे संयोजन-कौशल्य, सहकार्य, सामरस्य, मिळतें-जुळतें घेण्याची वृत्ति. आतापर्यंत त्यांनी कधी कोणाची परवा केली नव्हती. सरकारची, मिशनऱ्यांची, इंग्रज विद्वानांची तर नाहीच; पण बहुमताचीहि नाही. सत्य सांगण्याचा प्रसंग आला की, जग कांही म्हणालें तरी आम्ही त्याची मुळीच फिकीर करणार नाही, असें त्यांनी वारंवार लिहिलें होतें. पण आता अनेकांशीं मिळतें घेऊन काम करावयाचें होतें. कांही देवाण-घेवाण त्यांत अपरिहार्य होती. निःस्पृह, करारी माणसें बहुधा एकांतिक असतात. मिळतें-जुळतें घेणें ही वत्ति त्यांच्या ठायीं नसते. " तेजसोर्हि द्वयोर्देवा, सख्यं वै भविता कथम् " दोन तेजस्वी पुरुषांचें सख्य होत नसतें, असें महाभारतांत म्हटलें आहे. अनेक प्रसंगीं त्याचा प्रत्ययहि आपल्याला येतो. विष्णुशास्त्री यांच्या बाबतींत तसेंच होण्याचा संभव होता; पण तसें घडलें नाही. प्रसंग येताच त्यांनी तोहि गुण प्रगट केला.

**संयोजन**

संयोजन-कौशल्य हा विष्णुशास्त्री यांच्या व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा गुण होता. त्यांची निबंधमाला त्यांनी सर्वस्वीं एकट्याने चालविली. एका अक्षराची किंवा एका पैशाचीहि मदत त्यांनी कधी कोणाकडून अपेक्षिली नाही व घेतली नाही. पण शेवटच्या तीन-चार वर्षांत त्यांनी काव्येतिहाससंग्रह, चित्रशाळा, किताबखाना, न्यू इंग्लिश स्कूल, केसरी-मराठा, आर्यभूषण छापखाना असे बहुविध उद्योग सुरू केले; आणि त्यांतील बहुतेक यशस्वी झाले. संयोजन-कौशल्याच्या अभावीं हें यश मिळालें नसतें. यांतील चित्रशाळा, किताबखाना हे उद्योग त्यांनी निर्वाहाचें साधन म्हणून आरंभिले होते. सरकारी नोकरी आपल्या ध्येयाच्या आड येते हें दिसूं लागल्या-पासून त्यांनी असा कांही स्वतंत्र व्यवसाय करण्याचें निश्चित केलें होतें. कारण ते ध्येयवादी असले तरी व्यवहारदक्ष होते. स्वाधीन असें निर्वाहसाधन असल्यावांचून सर्व ध्येयवाद व्यर्थ ठरतो, हें त्यांनी जाणलें होतें. म्हणून १८७९ सालीं राजीनामा देण्यापूर्वीच त्यांनी वरील संस्था सुरू केल्या होत्या. काव्येतिहाससंग्रह हें मासिक आणि न्यू इंग्लिश स्कूल व केसरी-मराठा हे उद्योग स्वत्वजागृति, प्रबोधन, लोक-शिक्षण हीं जीं त्यांचीं प्रारंभापासून ठरलेलीं उद्दिष्टें त्यांच्या परिपूर्तीसाठी होते.

निबंधमालेप्रमाणे हे उद्योग एकट्याने उरकण्यासारखे नव्हते. म्हणून त्यांनी त्यासाठी निरनिराळीं निष्णात माणसें जोडलीं; व त्यांच्या सहकार्याने पावलें टाकलीं. प्रत्येक उद्योगाचें स्वरूप निश्चित करणें, त्याची आखणी करणें, त्याला अवश्य ती

साधनसामग्री सिद्ध करणें व कर्तबगार माणसें जोडून त्यांना संभाळणें हीच संयोजन-विद्या होय. काव्येतिहाससंग्रहांत महाराष्ट्राचा इतिहास, मराठी कविता व संस्कृत कविता असे तीन विभाग होते. त्यासाठी त्यांनी शंकर तुकाराम शाळिग्राम, काशिनाथ नारायण साने व जनार्दन बाळाजी मोडक यांचें सहकार्य मिळविलें. चित्रशाळेच्या उद्योगांत बाळकृष्णपंत जोशी, शाळिग्राम व पुढे वासुकाका जोशी हे त्यांचे सहकारी होते. किताबखान्याचें काम शाळिग्राम पाहत असत. 'न्यू इंग्लिश स्कूल' व 'केसरी-मराठा' या कार्यांत विष्णुशास्त्री यांना आगरकर, टिळक या महनीय पुरुषांचें सह-कार्य लाभलें होतें. शिवाय माधवराव नामजोशी, वामन शिवराम आपटे यांसारखे कार्यदक्ष सहकारीहि त्यांना मिळाले होते. यांतले बहुतेक सहकारी पुढे महाराष्ट्राच्या इतिहासांत निरनिराळ्या क्षेत्रांत उंच पदाला गेले हें आपणांस माहीत आहेच. आगरकर, टिळक यांचीं नांवें तर अजरामर झालीं आहेत. असे सहकारी विष्णुशास्त्री यांनी मिळविले व त्यांना एकत्र संभाळून सर्व उद्योग यशस्वी करून दाखविले यावरून त्या वेळच्या महाराष्ट्रांत त्यांनी केवढी पुण्याई संपादिली होती, हें सहज ध्यानांत येईल. इतक्या व्यक्ति आल्या की मतें, स्वभाव, कार्यक्षमता या दृष्टीने त्यांच्यांत अनेकप्रकारची भिन्नता असणारच. तें अपरिहार्यच असतें; पण तरीहि ही सर्व भिन्नता एक कार्यवाही करण्यांत विष्णुशास्त्री यशस्वी झाले. त्यांच्या अंगच्या संयोजन-विद्येचेंच हें फळ होय.

असें हें एक आगळें व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रांत १८५० सालीं जन्माला आलें होतें, व आपल्या ठायींच्या सर्व तेजाचा आविष्कार करून, स. १८८२ सालीं तें विश्व-तेजांत विलीन झालें.

आज आपण स्वातंत्र्यवृक्षाच्या सावलींत उभे आहों; पण त्या आधी शंभर-सव्वाशें वर्षें पारतंत्र्याच्या रखरखीत वाळवंटांत आपण उभे होतों. आपला सर्व जीवनरस करपून चालला होता; अशा वेळीं देशाच्या एका कोपऱ्यांत आताच्या स्वातंत्र्यवृक्षाचें रोप ज्याने लावलें व स्वतःच्या भविष्याची यत्किंचितहि परवा न करतां ज्याने त्याची जपणूक करण्याचें धैर्य समाजाला दिलें त्या पुरुषाचें नांव होतें – विष्णु कृष्ण चिपळूणकर.

■ ■ ■

# गोपाळ गणेश आगरकर

## ( अर्वाचीन दधीचि )

# चरित्र-रूपरेषा

## दधीचि

देवांवर मोठें संकट आलें होतें. वृत्रासुर उन्मत्त झाला होता. देवांचा त्याने छळ मांडला होता. देव हतबल झाले होते. अशा वेळीं दधीचि ऋषि त्यांच्या साह्यास धावून आले. आपल्या हाडांचें वज्र बनविलें तर त्याने इंद्राला वृत्राचा वध करतां येईल असें त्यांना कळलें. त्यांनी तत्काळ प्राणत्याग केला व देवांना आपल्या अस्थि उपलब्ध करून दिल्या. विश्वकर्म्याने त्यांपासून वज्र तयार केलें. तें वृत्रावर फेंकून इंद्राने त्याचा वध केला व देवांना संकटमुक्त केलें.

भारतीयांवर संकट आलें होतें. अंध, विवेकहीन, जीर्ण, पुराण, रूढिधर्म उन्मत्त झाला होता. हिंदूंचा त्याने छळ मांडला होता. हिंदु अगदी हतबल झाले होते. अशा वेळीं एक अर्वाचीन दधीचि ऋषि त्यांच्या साह्यास धावून आले. त्या पुराण, दुष्ट, रूढ धर्माच्या शस्त्रांचे आघात आपल्या हाडांवर झेलले तर तीं बोथट बनतील, निकामी होतील व मग आपल्या अस्थींचें वज्र त्यावर फेकलें तर तो दुष्ट धर्म नामशेष होईल, हें त्यांच्या ध्यानांत आलें. त्यांनी तत्काळ आपल्या हाडांवर ते शस्त्राघात झेलण्यास प्रारंभ केला व शेवटीं प्राणत्याग करून हिंदूंना आपल्या अस्थि उपलब्ध करून दिल्या. हिंदूंनी त्यांपासून वज्र तयार करून तें त्या अंध, दुष्ट, रूढ धर्मावर फेकलें. त्याला नामशेष केलें व समाज संकटमुक्त केला. त्या अर्वाचीन दधिचि ऋषींचें नांव गोपाळ गणेश आगरकर.

गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १८५६ सालीं कऱ्हाडजवळच्या टेंभू या खेड्यांत झाला. घरची फार गरिबी असल्यामुळे त्यांना बारा-तेराव्या वर्षांपासूनच शिक्षणासाठी नोकरी करावी लागली. कधी कारकुनाची, कधी कंपौंडरची अशा नोकऱ्या त्यांनी केल्या. कधी ते वार लावून शिकले, तर कधी शगिर्दी करून. पुढे

ते वऱ्हाडांत अकोल्यास आपले मामा सदाशिवराव भागवत यांच्याकडे गेले, तेथे मामांनी त्यांना आश्रय दिला. त्या अकोल्याच्या शाळेंतूनच ते १८७५ सालीं मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्या हाताखाली शिकण्याचें भाग्य त्यांना तेथे लाभलें होतें.

पुढे कॉलेजचें शिक्षण घेण्यासाठी त्यांना असेच कष्ट करावे लागले. 'वऱ्हाड समाचार' या पत्रांत ते कधी लेख लिहीत, वक्तृत्व-स्पर्धांत भाग घेऊन बक्षिसाचे पैसे मिळवीत, कधी मित्रांकडून, गुरुजनांकडून मदत घेत. तरीहि पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधला खर्च भागत नसे. एकाच सदऱ्यावर त्यांना वर्ष काढावें लागे. असे हाल झाल्यामुळेच त्यांची मूळची सुदृढ प्रकृति याच काळांत खालावूं लागली.

कॉलेजांतील पहिल्या वर्षीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर गोपाळरावांना शिष्यवृत्ति मिळूं लागली. त्यामुळे थोडी स्वस्थता मिळून इतिहास, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र इत्यादि आपल्या आवडत्या विषयांचा अभ्यास त्यांना करतां आला. १८७८ च्या नोव्हेंबर महिन्यांत ते बी. ए.ची परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. त्या वेळचे प्रिन्सिपॉल सेल्बी यांची या आपल्या शिष्यावर मर्जी होती. त्यांनी गोपाळरावांना फेलो नेमलें. दक्षिणा-फेलोशिप म्हणून त्यांना त्या वेळीं ७५ रु. महिना मिळत. यामुळे दोन वर्षे निवान्त अभ्यासाला मिळून १८८० च्या नोव्हेंबरांत ते एम्. ए. झाले. एवढी उच्च पदवी मिळविल्यानंतर त्या वेळीं त्यांना मोठ्या पगाराची सरकारी नोकरी सहज मिळाली असती; पण त्यांनी तो विचारहि केला नाही. त्यांनी दोन वर्षांपूर्वीच आईला कळविलें होतें की, "तूं माझ्याविषयी मोठे मनोरथ करीत असशील; पण विशेष संपत्तीची हाव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार आहे."

१८७९ सालीं आगरकर एम्. ए.चा अभ्यास करीत होते. त्या वेळीं टिळकहि एल्एल्. बी.च्या अभ्यासासाठी डेक्कन कॉलेजांत राहिले होते. तेथे त्या दोघांची मैत्री झाली. विष्णुशास्त्री यांच्या निबंधमालेचें वाचन पूर्वीपासून दोघेहि करीत असत. १८७६ सालीं कॉलेजच्या पहिल्या वर्षांत असतांनाच आगरकरांनी राजकीय विषयावर एक लेख लिहिला होता आणि तो घेऊन ते विष्णुशास्त्री यांच्याकडे गेले होते. डेक्कन कॉलेजांत आगरकर व टिळक दोघेहि देशस्थितीविषयी नित्य चर्चा करीत. त्याच सुमारास विष्णुशास्त्री नवी शाळा काढण्याच्या विचारांत आहेत हें त्यांना समजलें. तेव्हा दोघांनीहि त्यांना जाऊन मिळावयाचें ठरविलें. टिळक लगेच जाऊन मिळाले. १ जानेवारी १८८० या दिवशीं न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली; आणि वर्षअखेर एम्. ए. झाल्यावर आगरकर शाळेंत आले.

लोकशिक्षणाचें कार्य सर्व मार्गांनी करावयाचें असें त्या तिघांचें व त्यांच्या सहकाऱ्यांचें ठरलें असल्यामुळे त्यांनी पुढल्याच वर्षीं १८८१ च्या जानेवारीमध्ये केसरी व मराठा (इंग्रजी) हीं पत्रें सुरू केलीं व राष्ट्रीय जीवनाच्या विशाल क्षेत्रांत

प्रवेश केला. प्रारंभापासून आगरकर केसरीचें संपादक होते. तें पद त्यांनी १८८७ पर्यंत संभाळलें.

वृत्तपत्र-संपादकाचें पद म्हणजे काटेरी मुकुट आहे हें या तरुण पत्रकारांच्या लवकरच ध्यानांत आलें. कोल्हापूर संस्थानचे दिवाण बर्वे यांनी तेथले दत्तक राजे शिवाजीमहाराज यांचा छळ चालविला आहे, अशा वार्ता केसरीकर्त्यांच्या कानीं आल्या. केसरीने त्याविषयी कांहीं पत्रें प्रसिद्ध केलीं व लेखहि लिहिले. मराठ्यांतहि कांही लेख आले. तेव्हा बर्वे यांनी केसरीचे संपादक आगरकर व मराठ्याचे संपादक टिळक यांच्यांवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली. त्यांच्या बाजूचे साक्षीदार आयत्या वेळीं फिरले. बर्वे यांच्यावरचा आरोप कोर्टांत सिद्ध झाला नाही, आणि दोघां संपादकांना १०१ दिवसांची शिक्षा झाली. 'डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशेएक दिवस' या पुस्तकांत आगरकरांनी या तुरुंगवासाचें वर्णन केलें आहे.

हा खटला चालू असतांनाच १८८२ च्या मार्चमध्ये विष्णुशास्त्री कालवश झाले होते; त्यामुळे या नव्या मंडळींचा मूलाधारच निखळून पडला होता; पण हे दोघेहि पुरुष स्वयंप्रभ होते. त्यामुळे मुळीच न डगमगतां त्यांनी सुटून आल्यावर राष्ट्रकार्याची धुरा पुन्हा खांद्यावर घेतली.

न्यू इंग्लिश स्कूलचा जम बसल्यावर दोन-तीन वर्षांनी २४ ऑक्टोबर १८८४ रोजीं शाळेच्या चालकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि १८८५ सालीं २ जानेवारी रोजीं फर्ग्युसन कॉलेज सुरू केलें. बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, वामन शिवराम आपटे, म. शि. गोळे, वा. बा. केळकर, म. ब. नामजोशी, ना. कृ. धारप हे सोसायटीचे संस्थापक व आजीव सभासद होते. वा. शि. आपटे हे कॉलेजचे पहिले प्राचार्य झाले.

प्रारंभी टिळक व आगरकर यांच्यांत मतभेद नव्हते; पण १८८४ च्या सुमारास ते सुरू झाले. बालविवाह, असंमत वैधव्य या दुष्ट रूढि कायद्याने बंद कराव्या की नाही, सरकारला आपल्या धर्मांत हस्तक्षेप करूं द्यावा की नाही, या व असल्या प्रश्नांवरून डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सभासदांत तीव्र मतभेद होऊं लागले. यामुळे १८८७ सालीं डे. ए. सोसायटी व केसरी-मराठा हीं वृत्तपत्रें यांचा संबंध तोडून टाकण्यांत आला आणि टिळक, वा. बा. केळकर व ह. ना. गोखले हे छापखाना व वृत्तपत्रें यांचे संयुक्त मालक झाले. तेव्हापासून केसरींत सामाजिक सुधारणांच्या बाबतींत आगरकरांच्या मतांविरुद्ध लेख येऊं लागले. त्यामुळे त्यांनी केसरीचें संपादकपद सोडून दिलें आणि पुढल्या वर्षी १८८८ सालीं दसऱ्याच्या मुहूर्तावर 'सुधारक' हें पत्र काढलें.

पण डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील भांडणें एवढ्याने मिटलीं नाहीत. प्रारंभीं निर्वाहापुरतें वेतन सर्वांनी घ्यावें असें ठरलें होतें; पण पुढे सांपत्तिक स्थिती-प्रमाणे वेतन घ्यावें असें आगरकरांनी सुचविलें. तें टिळकांना पसंत पडलें नाही.

इंदूरच्या महाराजांनी दिलेल्या देणगीवरून असाच वाद निर्माण झाला व तो विकोपाला गेला. इतरहि अनेक कारणें झालीं व शेवटीं १८९० सालीं टिळकांनी सोसायटी सोडली.

आगरकर सोसायटींत शेवटपर्यंत राहिले. १८९२ सालीं प्राचार्य वामनराव आपटे मृत्यु पावले तेव्हा त्यांच्या जागीं आगरकरांची नेमणूक झाली. 'सुधारक' पत्रहि आगरकर नेटाने व उत्साहाने चालवीत होते. आता केसरी व सुधारक या दोन्ही पत्रांचे संसार स्वतंत्र झाले होते, तरी त्यांच्यांतील भांडणें मिटली नाहीत. प्रारंभीं त्यांच्यांतील मतभेद केवळ तात्त्विक होते, पण पुढे एकमेकांविषयी टिळक व आगरकर या थोर पुरुषांचीं मतें कलुषित झालीं. एकमेकांच्या सद्‌भावनेविषयीहि त्यांना शंका येऊं लागल्या. त्यामुळे त्यांच्यांतील वाद अगदी विकोपाला गेला व निंदा-प्रतिनिंदा यांना सीमा राहिली नाही.

फर्ग्युसनचा कारभार आगरकरांनी उत्तम चालविला होता; पण हळूहळू त्यांचा दम्याचा विकार बळावला. तरुणपणांत त्यांना अनंत हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. पुढे दारिद्र्य कांही अंशीं गेलें; पण समाजसुधारणेचा पक्ष त्यांनी उचलल्यामुळे त्यांना लोकनिंदा फार सोसावी लागली. त्यांच्या हयातींतच लोकांनी त्यांची प्रेतयात्रा काढली होती. या सर्वांचा परिणाम होऊन १८९५ सालीं आगरकर कालवश झाले.

टिळकांनी केसरींत आगरकरांच्यावर मृत्युलेख लिहिला त्यांत आगरकरांच्या मनोनिग्रह, स्वार्थत्याग, धैर्य, इत्यादि गुणांचा गौरव करून पुढे म्हटलें आहे की, " दु:खाची अगर संकटांची भीति न बाळगतां जो आपल्या ठायीं असणाऱ्या या सद्‌गुणांचा लोकसेवेसाठी उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे त्या कोटींतले होते. "

अशा या थोर पुरुषाचें – या अर्वाचीन दधीचीचें – कार्य आता आपल्याला अभ्यासावयाचें आहे. वर सांगितलेंच की, बी. ए.ची पदवी मिळाली तेव्हाच या पुरुषाने आईला लिहून टाकलें होतें की, " मी आपलें जीवन देशाला अर्पण करणार आहे." आता दोन वर्षांनी बुद्धि, प्रज्ञा, अर्पण-वृत्ति, राष्ट्रनिष्ठा, धैर्य, दृढनिश्चय या साधनांनी समृद्ध होऊन तो पुरुष हिंदुस्थानाकडे पाहूं लागला तेव्हा त्याला तो कसा दिसला तें प्रथम पाहूं.

- १ -

# आगरकरांना हिंदु समाज कसा दिसला ?

**प्रास्ताविक**

हिंदु समाजांतील कोणत्या दोषांमुळे त्याचा गेल्या हजार वर्षांत विलक्षण अधःपात झाला आहे, हें लोकांना पुनः पुन्हा सांगून, आता त्याचा उत्कर्ष होण्यासाठी कोणते उपाय केले पाहिजेत व पाश्चात्त्य लोकांचें कोणत्या बाबतींत अनुकरण केलें पाहिजे याचें दिग्दर्शन करण्याच्या हेतूने आगरकरांनी आपलें स्वतःचें 'सुधारक' नांवाचें वृत्तपत्र सुरू केलें. त्याच्या पहिल्याच अंकांत त्यांनी आपल्या देशाचें व आपल्या समाजाचें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. भरत खंडांत अनेक मोठे पर्वत, असंख्य नद्या व घनदाट अरण्यें आहेत. त्याच्या तिन्ही बाजूंना विशाल महासागर असून, त्याच्या विस्तीर्ण किनाऱ्यावर अनेक बंदरें आहेत. आपली भूमि अत्यंत सुपीक असून, देश अन्नवस्त्राच्या बाबतींत समृद्ध आहे. आपली खनिज संपत्तीहि विपुल आहे. अशा प्रकारे आपला हा देश भौतिक संपत्तींत जगांतील कोणत्याहि देशापेक्षा कमी नाही.

याच्या उलट आपल्या समाजाची स्थिति झालेली आहे याचें आगरकरांना अतिशय दुःख होत होतें. मानवी कर्तृत्वाच्या बाबतींत हिंदु समाज अगदी हीन दशेला पोचला आहे, त्याला शिलावस्था प्राप्त झाली आहे, असें त्यांनी म्हटलें आहे. भारताला प्रदीर्घ इतिहास लाभला आहे हें खरें, व हजार-दोन हजार वर्षांपूर्वी आपली संस्कृति बरीच उन्नत झाली होती हेंहि खरें. राज्य, धर्म, नीति, वेदान्त, न्याय गणित, ज्योतिष, इत्यादि शास्त्रें आणि विद्या व कला यांत आपण पुष्कळ प्रगति केली होती; पण त्यानंतर आपली प्रगति थांबली. आपला समाजवृक्ष आता जुना झाला आहे, वठला आहे, कसा तरी उभा आहे. समाजव्यवस्था चालीरीति, शास्त्रें,

कला या सर्व बाबतींत आम्ही जुनाट झालों आहों. आमची स्थिति दगडासारखी झाली आहे; तिच्यांत कांही बदल होत नाही. कारण आमच्यांत चैतन्यच उरलें नाही. आमचें व्यक्तिजीवन व राष्ट्रजीवन खुरटलें आहे. या स्थितीलाच आगरकरांनी शिलावस्था हें नांव दिलें आहे; आणि त्या शिलावस्थेचीं विविध लक्षणें त्यांनी आपल्या निरनिराळ्या लेखांत प्रसंगाप्रसंगाने सांगितलीं आहेत.

**अज्ञान**

हिंदु समाजाच्या या शिलावस्थेचें पहिलें लक्षण म्हणजे लोकांचें अज्ञान. त्यांना भूगोलाविषयी मुळीच माहिती नव्हती. पृथ्वी कशी आहे, आपला मायदेश कसा आहे, हें त्यांना ठाऊक नव्हतें. पुराणें हेंच त्यांचें ज्ञानभांडार. त्यावरच त्यांची सर्व भिस्त व श्रद्धा; आणि 'नवखंड पृथ्वी व दहावें खंड काशी' यापलीकडे या ग्रंथांची धाव गेलेली नव्हती. त्यांत प्राचीन राजांच्या कथा आहेत, पण इतिहास नाही. आपल्याकडे इतिहास लिहून ठेवण्याची पद्धतच नव्हती. त्यामुळे आपला इतिहासहि कोणाला ज्ञात नव्हता. दुसऱ्या देशांचा इतिहास जाणून घेण्याचाहि कोणीं प्रयत्न केला नाही. तशी बुद्धीच कोणाला झाली नाही. त्या काळीं दशग्रंथी ब्राह्मण आणि शास्त्री-पंडित कांही थोडे नव्हते; पण पुराणांबाहेरचें ज्ञान त्यांनी कधी मिळवलेंच नाही, त्याची पर्वाहि केली नाही. जगांत काय घडामोडी चालू आहेत, इतर देशांतील लोकांनी शास्त्रें, कला यांत किती प्रगति केली आहे, याची त्यांनी कधी चौकशीहि केली नाही. कारण जगांत जेवढें कांही ज्ञान आहे, तें सगळें संस्कृत ग्रंथांत भरलेलें आहे, असा भ्रम त्यांना झाला होता. आणि बहुसंख्य असा जो शेतकरी व कारागीर वर्ग त्याला तर आपल्या गावाबाहेर काय उलथा-पालथ चालली आहे, त्याचीहि गंधवार्ता नसे. तिकडे राज्यसत्ता बदलली, पर-धर्मीयांचीं आक्रमणें आलीं, तरी शेतकऱ्यांना त्याचा संसर्ग होत नसे.

अशा प्रकारे समाजांतील सगळे वर्ग अज्ञानी व उदासीन होते. लिहितां-वाचतां येणाऱ्या लोकांनाहि आपल्या समाजाची अवनति कशामुळे झाली आहे, उन्नति म्हणजे काय व ती होण्यासाठी कोणते उपाय केले पाहिजेत हें समजत नव्हतें. कारण कार्यकारणभाव पाहून तर्कशुद्ध विचार करण्याची पात्रताच त्यांच्या अंगीं नव्हती.

आगरकरांच्या निरनिराळ्या निबंधांतून याविषयीचे थोडे उतारे पुढे दिले आहेत. त्यांवरून हिंदु समाजाचें ज्ञान किती भयावह होतें आणि त्यामुळे स्वतःची उन्नति साधण्यास तो किती अपात्र, असमर्थ होऊन बसला होता, याची कल्पना येईल.

"या लोकांना समाजाच्या घटनेचीं, अभिवृद्धीचीं व लयाचीं कारणें ठाऊक नाहीत, पितृतर्पणापुढे यांचें ज्ञान गेलेलें नाही, अनेक देशांतील उद्योगी पुरुषांनी अहर्निश परिश्रम करून पदार्थ-धर्माचें केवढें ज्ञान संपादिलें आहे, विपद्विनाशक व सुखवर्धक किती साधनें शोधून काढलीं आहेत, राज्य, धर्म, नीति वगैरे विषयांतील विचार किती प्रगल्भ झाले आहेत, हें यांना ऐकूनसुद्धा ठाऊक नाही. . . जुनीं

शास्त्रें तेवढीं ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणें हें घोर पातक, अशी यांची समजूत आहे. जगत्कारणाच्या तोंडांतून, हातांतून, मांडींतून व पायांतून एकेक वर्ण निघाला अशी यांची वर्णोत्पत्तीविषयी कल्पना आहे, आहे ही सामाजिक स्थिति उत्तम, हींत फिरवाफिरव करण्यास कोठेंहि अवकाश नाही, अशा यांच्या समाजविषयक कल्पना." ( सुधारक काढण्याचा हेतु ).

"आमच्या बहुतेक जुन्या पंडितांस ऐतिहासिक पद्धति म्हणजे काय हें मुळीच ठाऊक नाही. त्यांना असें वाटतें की, जगांत जेवढें म्हणून कांही ज्ञान आहे तेवढें संस्कृत भाषेंतील ग्रंथसमूहांत भरलेलें आहे. त्याच्या बाहेर चहूंकडे अंधार आहे. त्यांना असें वाटणें कांही अंशीं स्वाभाविक आहे. ज्या अर्थीं दुसऱ्या भाषेंतील ज्ञान-भांडाराचा गंधहि त्यांना लागलेला नाही, त्या अर्थीं त्यांना त्यांची माहिती कोठून कळणार ? तेव्हा अर्थातच त्यांनी आपल्यापाशी असलेल्या छोटेखानी डबोल्यासच अखिल विश्वांतील संपत्समूह समजून त्याच्या महत्त्वाचे व अद्वितीयत्वाचे पोवाडे गात सुटावे, हें साहजिकच आहे." (स्वयंवर).

'गुलामांचें राष्ट्र' या लेखांत आमच्या ज्ञानाचें दारिद्र्य आगरकरांनी असेंच स्पष्ट करून दाखविलें आहे. "जें जें जुनें आहे तें सारें आम्हांस निर्दोष, पूज्य व संरक्षणीय वाटतें. आमच्या मनाच्या या खोडीमुळें जमिनींत खोल पुरलेल्या खांबा प्रमाणे आमची स्थिति झाली आहे. जुन्या वेदान्तापलीकडे वेदान्त नाही; जुन्या गणितापलीकडे गणित नाही, जुन्या अलंकारांहून अलंकार नाहीत, जुन्या व्यवहारा-पुढे गति नाही, जुन्या न्यायापेक्षा दुसऱ्या न्यायांत अर्थ नाही ! असल्या भ्रमामुळे आमचे डोळे बांधल्यासारखे होऊन आज कित्येक शतकें तेल्याच्या बैलाप्रमाणे आम्ही जुन्या शास्त्रांच्या आणि पुराणांच्या घाण्याभोवतीं घिरट्या घालीत आहों. या परिभ्रमणांतून सुटका झाल्याखेरीज कोणत्याहि शास्त्रांत किंवा कलेंत आमचें पाऊल पुढे पडण्याचा संभव नाही..."

"लिहितां-वाचतां येणाऱ्या लोकांत ज्यांना दुसऱ्या देशांविषयी कमींत कमी माहिती आहे असे कोणी लोक असतील, तर ते हिंदु लोक होत. यांना स्वतःस इतिहास लिहिण्याची आवश्यकता कधी वाटली नाही व लिहिण्याची अक्कल आली नाही. इतकेंच नाही तर दुसऱ्यांचे इतिहास अवलोकन करून त्यांपासून आपली सुधारणा करण्याची पर्वाहि त्यांनी कधीं केली नाही. एकंदरींत यांना इतिहासाचें माहात्म्यच समजलें नाही, असें तरी कां म्हणूं नये ?" 'आमचे दोष आम्हांस कधी दिसूं लागतील ?' या निबंधांत आगरकरांनी अशी टीका केली आहे.

ही सयुक्तिक आहे याविषयी वाद नाही. इतिहासाविषयीची अनास्था, उपेक्षा, अज्ञान हें हिंदूंच्या संस्कृतींतलें फार मोठें वैगुण्य आहे, हें खरेंच आहे; पण त्यापुढे जाऊन आगरकर जेव्हा "ज्या देशांतील व्यक्तींनी किंवा व्यक्तिसमुदायांनी केव्हाहि मोठमोठे पराक्रम केले नाहीत, ते इतिहास लिहिणार कशाविषयी आणि वाचणार

काय ?" असे उद्‌गार काढतात तेव्हा ते फार म्हणजे फारच रागावले आहेत, इतकेंच ध्यानांत घ्यावयाचें. कारण या देशांतल्या लोकांनी मोठमोठे पराक्रम केलेले आहेत हें त्यांनी पुढे याच लेखांत व अन्यत्रहि सांगितलेलें आहे.

पण ही किरकोळ गोष्ट आहे. ब्रिटिश येण्यापूर्वी हजार-दीड हजार वर्षे हा देश अगदी लाजिरवाण्या अज्ञानांत बुडून राहिला होता याबद्दल शंकाच नाही; आणि पाश्चात्त्य भौतिक विद्यांचा अभ्यास करून आम्ही ज्ञानविज्ञानांत त्यांच्या बरोबरीस आल्यावांचून आमचा उत्कर्ष होणार नाही, हें त्यांचें म्हणणेंहि यथार्थच आहे.

**कर्मकांडात्मक धर्म**

हिंदु समाजांत रूढ झालेले तर्कशून्य धार्मिक आचार हें त्याच्या शिलावस्थेचें दुसरें लक्षण होय. त्यांत सोवळें-ओवळें, प्रेतसंस्कार, शिमग्यांसारखे बीभत्स सण यांचा समावेश आगरकरांनी केला आहे. ब्राह्मण लोकांत सोवळ्याचें प्रस्थ फारच माजलें होतें. त्यांच्या कल्पनेप्रमाणे नवें कोरें वस्त्र विटाळत नाही. धूतवस्त्र सोवळ्यांत चालतें, पण तें लवकर विटाळतें. रेशमी किंवा लोकरीचें वस्त्र सुती वस्त्रापेक्षा अधिक शुद्ध. त्याचें शुद्धत्व कशानेच बिघडत नाही. परटाकडची भाताची खळ लावलेलीं वस्त्रें एका शितोड्याने शुद्ध होतात. जेवणाखाण्याच्या बाबतींत तर सोवळेपणाचा फारच गोंधळ असतो. हरभऱ्याची डाळ आधी भिजवून मग वाटली तर ती निर्लेप, पण ती आधी दळून तिचें पीठ पाण्यांत घातलें तर मात्र खरकटें होतें. त्याचें पिठलें मुकटा नेसल्याशिवाय तोंडांत घालण्याची सोय नाही. भडबुंज्याकडचे पोहे खाता येतात, पण बाजारांतला भाजी-भात किंवा पावबिसकुट यांकडे ब्राह्मणाने पाहण्याची सोय नाही. प्रवासांत कोणाचाहि स्पर्श झालेलें अन्न चालतें, पण घरांत कुणबिणीने केलेली भाकरी मुळीच चालत नाही. हरणाचें किंवा वाघाचें कातडें फारच शुद्ध मानलें जातें. तें धार्मिक विधींत बसायला घेतात. पण गाय इतकी पवित्र मानलेली असून तिचें कातडें मात्र पवित्र नाही. सोवळें म्हणजे शुचिता असा अर्थ असतो तोंपर्यंत तें स्पृहणीय होय. पण वरील रूढ कल्पनांशीं स्वच्छतेचा कांही संबंधच नसतो. विटाळ-चांडाळाच्या चमत्कारिक कल्पनांवर हे नियम बसविलेले असल्यामुळे त्यांना विवेकाचा कस लावतां येत नाही. 'सोवळ्याची मीमांसा' या निबंधांत आगरकर म्हणतात, "या अर्थाच्या सोवळ्याचें मंडन विवेकदृष्ट्या करणें अत्यंत दुर्घट आहे. त्याला विवेकाची कात्री लावली की त्याच्या चिंधड्या होतात." जुन्या आचारांवर टीका करतांना आगरकरांनी त्यांतील असंबद्धता व तर्कशून्यता अनेक उदाहरणें देऊन स्पष्ट केली आहे. ब्राह्मण लोक इतर जातींच्या हातचें पाणी पीत नाहीत; पण गवळ्याने पाणी घातलेलें दूध दिलें तर तें त्यांना चालतें ! मुलींच्या बाहुल्या, पुरुषांच्या पगड्या, पुस्तकें, जोडे वगैरे वस्तु कोण तयार करतो, त्यांचे घटक काय, त्यांमुळे सोवळें किती बिघडतें, याचा कोणीं विचारहि करीत नाही. मेलेल्या जनावरांच्या कातड्याचे जोडे नित्य वापरायला योग्य आणि ते बनवणारा चर्मकार मात्र अगदी अपवित्र. मुसलमान

व युरोपियन लोक गोमांस खातात, तरी त्यांचा स्पर्श व सहवास आम्हांस चालतो; मात्र महार, मांग, ढेड यांची सावलीहि अमंगळ मानली जाते. हें सर्व विसंगत व असयुक्तिक आहे असें सांगून आगरकर म्हणतात, " श्रद्धाळू धार्मिकांस आपल्या धर्म-समजुती व त्यांवर अवलंबणारे आचार यांस बुद्धिवादाच्या प्रखर मुशींत घालण्याची छाती होत नाही. त्यांना अशी भीति वाटते की, ते हिणकस ठरल्यास, पुढे काय करावें ? "

कर्मकांडात्मक धर्मांतला दुसरा मूर्खपणाचा आचार म्हणजे हिंदूंचा प्रेतसंस्कार. आगरकरांना तो फारच भयप्रद, अमंगळ व कष्टमय वाटतो. प्रेताला न्हाऊ घालणें, सवाष्ण स्त्रीच्या प्रेताला नवें पातळ नेसवून मळवट भरून तिची ओटी भरणें, तिरडी-वरून प्रेत नेणें, स्मशानांत क्षौर करणें, प्रेतावर कणकीचे गोळे ठेवणें, गळकें मडकें पाण्याने भरून घेऊन चितेला प्रदक्षिणा घालणें, हे सर्व विधि त्यांच्या मतें बीभत्स आहेत; पण त्यांतील विधवेचें सक्तीने केशवपन करण्याची चाल त्यांना अत्यंत क्रूर व निर्दयपणाची वाटते. पतिव्रता स्त्रीने दुसऱ्याशीं बोलणें किंवा त्याच्याकडे पाहणेंहि पुरुषांना खपत नाही; पण पति मेला की लगेच त्याच्या विधवेला हे लोक न्हाव्या-बरोबर एका खोलींत कोंडून तिचे केस जबरदस्तीने काढायला लावतात ! याचा त्यांना फारच संताप येतो. श्राद्धविधीविषयीहि आगरकरांना असाच तिरस्कार वाटतो. जिवंत मनुष्याला जे अन्नवस्त्र व उपभोगाचे पदार्थ लागतात, तेच मेलेल्या माणसाला अर्पण करण्यांत काय अर्थ आहे ? त्याचा अशरीरी आत्मा त्या पदार्थांचा उपभोग कसा घेणार ? आगरकर आपल्या 'प्रेतसंस्कार' या लेखांत म्हणतात "तुम्ही जे प्रेतविधि करतां, त्यांवरून जिवंत मनुष्य आणि मेलेला मनुष्य यांतील भेद तुम्हांला कळत नाही, असें म्हणणें भाग आहे. "

मेलेल्या मनुष्याच्या आप्तांना जें क्षौर करावें लागतें व जें अशौच पाळावें लागतें, त्यावरहि आगरकरांनी टीका केली आहे. ते म्हणतात, "समुद्रपर्यटन, अभक्ष्य भक्षण वगैरे दोषांस क्षौरादिकांचीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. व ज्या अर्थी प्रेताच्या मुलाला व बायकोलाहि तेंच प्रायश्चित घ्यावें लागतें त्या अर्थी बाप किंवा नवरा मरणें हें मुलाच्या व बायकोच्या हातून घडणारें दंडनीय पातक आहे, असाच आमच्या लोकांचा म्हणजे आम्हां सर्वश्रेष्ठ म्हणविणाऱ्या अत्यंत मूर्ख ब्राह्मण लोकांचा समज असला पाहिजे हें उघड आहे. विटाळ म्हणजे काय हें तुम्हांला बिलकुल कळत नाही असें वाटतें. जर तें तुम्हांला कळत असतें तर सुतकाहून सोयराचा विटाळ तुम्ही अधिक दूष्य मानिला असता."

हिंदु समाजांत जे अनेक लज्जास्पद आचार रूढ होते, त्यांतील शिमग्याच्या सणाला आगरकरांनी पहिला क्रमांक दिला आहे. त्याविषयी 'पांचजन्याचा हंगाम' या निबंधांत प्रारंभींच ते म्हणतात, "इतका बीभत्स सण दुसऱ्या कोणत्याहि देशांत पाळला जात असेल, असें आम्हांस वाटत नाही. माघ शुद्ध पौर्णिमेपासून फाल्गुन वद्य

पंचमीपर्यंत हिंदु धर्माने हिंदु लोकांस पशुतुल्य वर्तन करण्याचा पास दिला आहे!" त्या दिवसांत उनाड, टारगी पोरेंच काय, पण मोठे संसारी पुरुष देखील रस्तोरस्तीं, अर्वाच्य उखाणे घेऊन बोंब मारीत हिंडत असत. होळी-पौर्णिमेच्या दिवशीं घरोघरीं व चवाठ्यावर होळी पेटवून तिला पांचजन्ययुक्त प्रदक्षिणा घालण्याचा प्रघात होता. तो एक धार्मिक विधीच मानला जात असे; पण तेवढ्याने हा सण पार पडत नसे. होळीच्या रानटी देवतेला खूष करण्यासाठी नंतरचे पांच दिवस जो धुडगूस चाले, तो तर फारच बीभत्स असे. होळीच्या राखेंत माती, शेण किंवा त्याहून घाण पदार्थ कालवून केलेल्या खातेऱ्याने एकमेकांना माखणें, तुटक्या केरसुण्या व फाटकी शिपतरें डोक्यावर घेऊन व गाढवावर बसवून त्या सोंगाची मिरवणूक काढणें, अचकट-विचकट लावण्या म्हणणें, बाजूच्या लोकांवर खातेरें उडवून त्यांच्या नांवाने पांचजन्य करणें व स्त्रियांची टिंगल करणें,असें पशुतुल्य वर्तन करायला कोणालाहि लाज वाटत नसे.

या सणाचे भक्त त्याचें समर्थनहि करतात. ते म्हणतात की, होळीच्या धुरामुळे मनुष्याला अपायकारक असे सूक्ष्म जंतु मरून जातात. बोंब मारण्यामुळे आगीच्या प्रसंगीं चार माणसांना गोळा करून आग विझवण्याचा प्रयत्न कसा करावा त्याचें शिक्षण मिळतें. बीभत्स वर्तनाचेंहि असेंच समर्थन केलें जातें. मनुष्याच्या स्वभावांत ज्या वाईट वृत्ति व विकार असतात त्यांना नीतिनियमांमुळे कोंडून ठेवलेलें असतें. त्यांना केव्हा तरी असें मोकळें सोडलें नाही तर ते अनावर होऊन शेवटीं त्यांचा घातक परिणाम व्हायचा. पण आगरकरांना ही विचारसरणी मुळीच पसंत नाही. मनुष्याच्या विकारांना अशी वाट देण्याची गरज नाही हें सांगतांना ते म्हणतात, "मनुष्याच्या मनांतला दुर्वृत्तीचा अंकुर समूळ उपटण्याचा प्रयत्न केला नाही तर स्वल्प वयांत तो सारें अंतःकरण आपल्या विषारी विस्ताराने व्यापून टाकून सद्-वृत्तींची वाढ बिलकुल होऊं देत नाही. तेव्हा शिमग्यासारखे सण नाहीसे करून टाकल्यास आमचें कोणत्याहि प्रकारे नुकसान होण्याचा संभव नाही. शिमग्यावांचून शिमग्यांतले निंद्य प्रकार समाजांत नित्य घडत असतात. आम्ही मात्र त्यांना धर्माच्या नांवाने फाजील उत्तेजन देऊन आपलें अधिक नुकसान करून घेत आहों."

सनातन धर्माभिमानी लोक या कर्मकांडालाच खरा धर्म मानतात. वास्तविक नीति व सदाचार हा खरा धर्म होय; पण त्याची परवा न करतां हे लोक तर्कशून्य आचारांनाच जास्त महत्त्व देतात. मांसाहार, मदिरापान, व्यभिचार, विश्वासघात, क्रूरपणा अशीं निंद्य कर्में करणारा मनुष्य रूढ आचार-धर्मांचें पालन करीत असेल, तर तो यांना धर्मनिष्ठ वाटतो. त्याच्याशीं अन्नोदक व्यवहार करण्यासच काय, पण त्याच्या अंगुष्ठाचें तीर्थ घेऊन आपल्या पापाचें क्षालन करून घेण्यास देखील ते तयार ! पण सदाचारसंपन्न अशा ब्राह्मण किंवा प्रभू माणसाने शूद्राच्या हातचें पाणी घेतलें किंवा ख्रिस्ती माणसाकडचा घोटभर चहा घेतला की लगेच त्याला

पतित मानून ते त्याच्यावर बहिष्कार टाकीत असत. मात्र त्याने प्रायश्चित्त घेऊन ब्राह्मणांना दक्षिणा दिली की झाला तो शुद्ध व अन्नोदक-व्यवहारास योग्य. रूढ आचारांत चूक झाली की धर्म बुडतो, पण नीति बिघडली तर मात्र धर्म बुडत नाही, अशी त्यांची घातक समजूत होती. मनुस्मृतीसारख्या शास्त्रग्रंथांत त्या समजुतीला आधार नाही; पण तें कोण बघतो ! शास्त्रात् रूढिर्बलीयसी !

असें असलें तरी, इंग्रजांच्या राज्यांत परिस्थिति इतकी बदलली व दैनंदिन जीवनावर तिचा एवढा प्रभाव पडला की, पूर्वीचे नित्याचे कर्मठपणाचे अनेक आचार-धर्म नियमितपणें पाळणें कठीण वाटूं लागलें, सरकारी नोकरी संभाळतांना त्यांची अडचण होऊं लागली आणि बरेच लोक त्यांकडे दुर्लक्ष करूं लागले. साहेबाशीं व त्याच्या शूद्र नोकरांशीं सहवास व शेकहँड घडायचा; आगगाडींतून प्रवास करतांना वाटेल त्या जातीचे लोक शेजारीं येऊन बसायचे; त्यांचा विटाळ टाळायचा कसा, व तो घालविण्यासाठी स्नान तरी कितीदा करायचें ? डॉक्टरांचें औषध घ्यायलाच पाहिजे, मग त्यांतले निषिद्ध पदार्थ पोटांत गेले तर काय करणार ! काम-धंद्यासाठी प्रवास केलाच पाहिजे; त्या घाई-गर्दींत स्नान-संध्येचा नेम कसा पाळणार ! इंग्रजी शिक्षणामुळे सुशिक्षित लोकांची श्रद्धा थोडी तरी कमी झाली होतीच. त्यांचा आचारधर्म जरासा शिथिल होणें साहजिक होतें; आणि त्यांच्यावर अवलंबून असलेलीं वृद्ध माणसें त्यांना जाब विचारूं शकत नव्हतीं. त्यांची सत्ता गरीब अबलांवर व मुलाबाळांवर तेवढी चालायची. कांही दांभिक लोक जाणूनबुजून ब्राह्मणधर्माचें उल्लंघन करीत होते, दुराचार करीत होते; पण त्यांना वाळीत टाकण्याचें कोणी मनांतहि आणीत नव्हतें. तांबोळ्याकडचा ओला चुना, हलवायाकडची मिठाई यांमुळे दोष लागतो हें कोणाच्या ध्यानांतच येत नव्हतें. सनातनी लोकहि निष्ठेने आचारधर्म पाळीत नव्हते. 'ग्रामण्य-प्रकरण' या निबंधांत आगरकर याविषयी म्हणतात, " नवीन तऱ्हेचें शिक्षण लोकांस मिळूं लागल्यामुळे तरुण पिढीच्या मनांत नवीन धर्मकल्पना आणि नवीन आचार यांचा उदय होऊं लागला आहे. इतकेंच नाही, तर या कल्पनांचा आणि या आचारांचा परिणाम जुन्या लोकांवरहि अप्रत्यक्ष रीतीने त्यांस न कळत होत आहे; आणि त्यांच्या मर्जीविरुद्ध व समाजाविरुद्ध ते सुधारक बनत आहेत. "

सुधारणेला विरोध करणाऱ्या सनातनी धर्ममार्तंडांबद्दल आगरकर लिहितात की, आज जे धर्माभिमानी थाटले आहेत, ते खऱ्या खऱ्या धर्मरक्षण बुद्धीने पुढे आले आहेत, असें नाही. तसें असतें तर चालू धर्मसमजुतींविरुद्ध हजारो गोष्टी त्यांच्या डोळ्यांपुढे घडत असून व कित्येक तर खुद्द त्यांच्या घरांत शिरल्या असून तिकडे ते जी डोळेझाक करतात ती त्यांनी कधीच केली नसती.

अशा प्रकारे जुना आचारधर्म हळूहळू शिथिल होत चालला होता; पण आगरकरांना त्या कर्मकांडात्मक धर्माचा केवढा उबग आला होता तें त्यांच्या पुढील उद्गारांवरून स्पष्ट समजतें — हे अमंगळ हिंदु धर्मा, जबरदस्त पंचाक्षऱ्याप्रमाणे

आम्हां साऱ्या अज्ञ लोकांस त्वां भारून टाकून केवळ गुलाम केलें असल्यामुळे आज कित्येक युगें अगदी अशक्य गोष्टी आम्ही शक्य मानीत आहों, व अत्यंत निंद्य कृत्यें वंद्य मानून तुझ्या संतोषाकरिता तीं बेलाशक करीत आहों; पण ध्यानांत ठेव ! या तुझ्या अश्लाघ्य व निर्घृण वर्चस्वाचा अंत होण्याचा काल अगदी समीप येऊन ठेपला आहे. आजपर्यंत त्वां आम्हांस ज्या असह्य यातना भोगण्यास लावलें आहेस, व जीं अनन्वित कर्मे आम्हांकडून करविलीं आहेस, त्या सर्वांबद्दल तुझीं पाळेंमुळें खणून काढून विचारकुंडांत पेटवलेल्या प्रचंड अग्नीच्या कल्लोळांत तुझी आहुति देणाऱ्या नवीन ऋषिवर्याचा अवतार नुकताच झाला आहे.

## स्त्री-जीवन

हिंदु समाजांतील स्त्रीची हीन-दीन अवस्था हें त्या समाजाच्या शिलावस्थेचें तिसरें लक्षण होय. स्त्रियांच्या बाबतींत हिंदु धर्मशास्त्र फार निष्ठुर आहे. तें स्त्री-पुरुषांना समान अधिकार देत नाही, वेगवेगळा न्याय लावतें; तें पुरुषांचें पक्षपाती आहे. स्त्रियांवर त्याने फार अन्याय केलेला आहे. पडद्याची चाल, बालविवाह, विधवा-विवाहाची बंदी, शिक्षणाला बंदी या सर्व स्त्रीच्या दास्यत्वाच्या खुणा आहेत. स्त्रीला समाजांत प्रतिष्ठाच नव्हती, ती पुरुषाची दासी मानली जात होती. तिला घराबाहेर मानाचें स्थानच नव्हतें. पुरुषाच्या जीवनाचा अल्पांश, प्रजोत्पत्तीचें साधन, कष्टाची धनीण एवढीच तिची किंमत होती. तिच्या स्वतःच्या गुणांचें कांहीच महत्त्व नव्हतें. पतीच्या मृत्यूमुळे स्त्रीचें प्राणोत्क्रमण झालें किंवा ती सती गेली तर ती साध्वी असें मानलें जात होतें.

विधवा स्त्रीची अवस्था तर त्याहून शतपटींनी दयनीय होती. पति मेला की तिचा संसार संपला, तिला जगण्याचें कारणच राहिलें नाही; तिने पतीच्या प्रेता-बरोबर सती जावें हाच सर्वोत्तम मार्ग मानला जात होता. कारण पतीच्या मागे तिने जिवंत राहणें हें त्या कुटुंबावर संकटच होतें. तिचें पाऊल वाकडें पडण्याची भीति सदैव असायची. त्यासाठी तिला सोवळी करण्याची चाल पडली. पतीचा आधार नसल्यामुळे घरांतल्या कोणीहि तिला छळावें अशी मुभा होती. तिच्याकडून किती काबाडकष्ट करून घ्यावें याला तर सीमाच नसे. गोळाभर अन्नासाठी बटकीप्रमाणे सर्वांची सेवा करावी, अपमान सोसावे, मुलांचे हाल झालेले मुकाट्याने पाहवें हेंच तिच्या नशिबीं येत असे. 'शहाण्यांचा मूर्खपणा' या लेखांत आगरकर म्हणतात — "ब्राह्मणी विधवा ही हिंदु लोकांच्या निष्करुणेची, मात्सर्याची, अविचाराची, विप-रीत व रानटी धर्मश्रद्धेची आणि अन्यायीपणाची खूण आहे !"

विधवेचें केशवपन म्हणजे हिंदु स्त्रीवर होणाऱ्या घोर अन्यायाचें व जुलमाचें मूर्तरूपच होय. विधवेला पुन्हा विवाह करायला बंदी करूनच समाज थांबला नाही, तर तिला विद्रूप करून माणसांतून उठवण्याची व्यवस्था त्याने करून ठेवली. आणि ही तिची विटंबना कशासाठी, तर तिच्या व समाजाच्या नीतीच्या रक्षणा-

साठी ! निराधार विधवेकडे पाहून परपुरुषाची कामवासना जागृत होणार व त्याचें पाऊल वाकडें पडणार. ' शहाण्यांचा मूर्खपणा ' या वर उल्लेखिलेल्या लेखांत आगरकरांनी या कल्पनेवर फार कडक टीका केली आहे. ते म्हणतात, " गतभर्तृकांची कृत्रिम कुरूपता राष्ट्राच्या नीत्युन्नतीस अवश्य आहे असें ज्यांचें मत असेल ते त्यांचें वपनच करून कां थांबतात कोण जाणे ! त्यांचे हातपाय तोडावे, डोळे काढावे, नाकें कापावीं, त्यांना कांही खाऊ न घालतां कोंडून घालाव्या म्हणजे त्यांचें कामविकार प्रबल होणार नाहीत व त्यांना कोणाशीं संबंध ठेवतां येणार नाही. किंबहुना त्यांना अफूच्या गोळ्या किंवा सोमलाच्या पुड्या देण्याचा प्रघात पाडला तर त्यांच्या हातून अनीति घडण्याचा मुळीच संभव नाही. "

" बालविवाहाची चाल हें स्त्रीच्या दुर्दशेचें एक प्रमुख कारण आहे. स्त्री व पुरुष वयांत आल्यानंतरच त्यांचें मीलन घडावें, असा सृष्टीचा नियम आहे. त्याचें उल्लंघन झालें तर समाजावर त्याचे घातक परिणाम होतात. हिंदु समाजांत बालविवाहाची चाल शेकडो वर्षें रूढ असल्यामुळेच आमची प्रजा क्षीण, अल्पायुषी, नादान, उत्साहशून्य व भेकड अशी होत आहे. आमचें मानसिक सामर्थ्यहि नाहीसें होत आहे, " असें आगरकरांचें मत आहे. बालविवाह बंद झाल्यास बालविधवा होणार नाहीत, पुरुषांच्या अंगीं अधिक पौरुष दिसूं लागेल, असें ते म्हणतात. स्त्री-पुरुषांच्या सुखासाठी त्यांनी स्वयंवराचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मतें स्वयंवर नाही तो बालविवाहच होय. हिंदु समाजांत पूर्वी स्वयंवराची चाल होती, तरुणपणीं विवाह होत असत; पण पुढे ते बंद होऊन बालविवाह सुरू झाला. तो इतका पराकोटीला गेला की, मुलें जन्माला येण्यापूर्वीच त्यांचें लग्न कांही लोक ठरवूं लागले, आणि लहान अर्भकांचींहि लग्नें करूं लागले. ऋतुप्राप्तीपूर्वीच मुलीचें लग्न केलें पाहिजे, नाही तर पितर नरकांत जातात, असें धर्मशास्त्र सांगतें. त्यामुळे ज्यांना कामविकार अजून माहीत नाही अशा मुला-मुलींचा लग्नसोहळा उरकून त्यांना रात्रीं शृंगारलेल्या खोलींत कोंडायचें व त्यांनी रतिसुख भोगावें अशी अपेक्षा करावयाची, अशी सर्वांना घाई झालेली असे. स्त्री-पुरुषांच्या रतिसुखाचा भंडवडा व मातेरें करण्याची अधिक मूर्खपणाची रीत कल्पनीय असेल काय, असें आगरकरांनी म्हटलें आहे. तारुण्याने मुसमुसलेल्या, कामाने व प्रणयरंगामुळे धुंद झालेल्या, संगमोत्सुक स्त्री-पुरुषांच्या मीलनाची बहार व अल्पवयी, अजाण मुला-मुलींना बळजोरीनें एकत्र कोंडण्याचा अत्याचार यांची तुलना करून, आगरकरांनी बालविवाहाचा निषेध केला आहे.

बालविवाहांत लहान मुलीचें कित्येकदा वयस्क किंवा जख्खड म्हाताऱ्या पुरुषाशींहि लग्न केलें जातें. कारण विवाहाच्या बाबतींत पुरुषांवर कसलेंच बंधन नाही. अशा विजोड विवाहामुळे कामांध पुरुष कधी कधी आपल्या अल्पवयी स्त्रीवर अत्याचार करण्यासहि मागेंपुढे पाहत नाहीत. बंगालमध्ये हरिमोहन याने तसलें दुष्ट कृत्य केलें. त्यांत ती मुलगी मेल्यामुळे, तें उघडकीस आलें.

बालविवाहामुळे मुलींना प्राथमिक शिक्षणहि मिळूं शकत नाही. आणि त्यांची वाढहि नीट होत नाही. त्यामुळे त्यांचें व सर्व राष्ट्राचें अतोनात नुकसान होतें. स्त्रियांची ही गुलामगिरी नष्ट होऊन गृहस्थिति सुधारल्यावांचून राष्ट्राची सुधारणा होणें शक्य नाही, असें आगरकरांनी प्रतिपादिलें आहे.

**विषम समाजरचना**

समाजाच्या शिलावस्थेचें चौथें लक्षण म्हणजे विषमता हें होय. प्रत्येक देशांत विचार करणारे, उपभोग घेणारे व कष्ट करणारे असे तीन ठळक वर्ग आढळतात. तिसऱ्या वर्गांतील लोक काबाडकष्ट करून आवश्यकतेचे व चैनीचे पदार्थ उत्पन्न करतात आणि वरच्या दोन वर्गांतले लोक त्यांचा उपभोग घेतात. जेव्हा ही विषमता वाढूं लागते तेव्हा देशाचा ऱ्हास होऊं लागतो. आगरकरांना अशी स्थिति या देशांत उत्पन्न झालेली दिसली आणि त्यांनी तरुण सुशिक्षितांना, ती बदलण्याचा यथाशक्ति प्रयत्न करावा, असा उपदेश केला.

विषम समाजरचनेचा दुसरा प्रकार म्हणजे जातिभेद व अस्पृश्यता. भारतांत एका वर्णाचे चार वर्ण झाले; आणि त्या चार वर्णांपासून हजारो जाति उत्पन्न झाल्या. समाजाच्या या विघटनेमुळे किती हानि झाली आहे तें आगरकरांनी एका लेखांत सांगितलें आहे. या जातींतील उच्चनीचतेमुळे देशाभिमान संकुचित झाला, धार्मिक आचारविचारांत मतभेद उत्पन्न होऊन परस्पर वैर, मत्सर व झगडे सुरू झाले. अन्नोदक व्यवहार व विवाह यांत नाना प्रकारच्या अडचणी उत्पन्न झाल्या; भूतदया, उदारता, धर्मबुद्धि यांचें क्षेत्र मर्यादित झालें.

हिंदु समाजांत अतिशूद्रादि लोकांना अपवित्र व अस्पृश्य मानण्याची जी वृत्ति अजूनहि दिसून येते, ती मनुष्याच्या विचारीपणास अत्यंत लांछनास्पद आहे, असें आगरकरांनी स्पष्ट बजावलें आहे. महार, मांग, धेड वगैरे जातींचे लोक कधीहि गोवध करीत नाहीत व गोमांस खात नाहीत. मुसलमान व युरोपियन लोक मात्र तसें करतात. तरीहि त्यांचा स्पर्श सवर्णांना चालतो आणि महाराची सावलीहि चालत नाही. अशा प्रकारे आपल्या धर्मांतील कांही माणसांना हीन, अपवित्र व अस्पृश्य मानून त्यांना दूर लोटल्यामुळे ते ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रचाराला चटकन बळी पडतात व ख्रिस्ती होतात, ही गोष्ट आगरकरांना अत्यंत उद्वेगजनक वाटत होती. उच्च वर्णांचे लोक शूद्रातिशूद्र लोकांना नीच न मानतां त्यांच्याशीं अन्नोदकव्यवहार करूं लागतील व त्यांच्या धर्मांतराला आळा घालतील तो सुदिन, असें त्यांनी म्हटलें आहे.

'सोवळ्या-ओवळ्याची पुरवणी' या लेखांत या जातीय विषमतेविषयी लिहितांना आगरकर म्हणतात, "समाजाच्या विलक्षण रहाटीमुळे उच्च-नीचत्व अस्तित्वांत येऊन तदनुसार जो व्यवसाय-विभाग सहजगत्या झाला आहे, त्यास ईश्वरकृत मानून उच्च वर्गांत जन्मास आलेल्या लोकांनी नीचवर्गांत जन्मास आलेल्या

लोकांना अपवित्र व अस्पर्श मानणें याहून मनुष्याच्या विचारीपणास लांछनास्पद अशी दुसरी गोष्ट नाही. "न वदेत् यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि" एवढा ज्या महं-मदीयांविषयी आम्हांस तिरस्कार होता, त्या गोहत्या करणाऱ्या म्लेंछांचें व तत्समान युरोपियनांचें, राज्याधिकारांमुळे आम्हांस कांहीच वाटेनासें होऊन, ज्यांना वैदिक धर्म शिरसावंद्य, ज्यांचा धर्म व आचार हिंदु, जे अनादि कालापासून हिंदुस्थानचे रहिवासी, ज्यांच्या हातून गोवध होत नाही. . .अशा हिंदूंचा आम्ही तिरस्कार करतों, त्यांना स्पर्श करण्यास भितों आणि त्यांहून अनेक कारणांमुळे अस्पर्श अशा परकीयांस दृढालिंगन देतों, हा केवढा प्रमाद होय ?"

अशा तऱ्हेची टीका जागोजाग करून आगरकरांनी हें दाखवून दिलें आहे की, हिंदूंमधील जातिभेद, अस्पृश्यता व तज्जन्य विषमता ही इतिहास, तर्क, समाजहित-दृष्टि यांपैकी कोणत्याहि दृष्टीने पाहिलें तरी समर्थनीय ठरत नाही. समाज-प्रगतीच्या दृष्टीने पाहिलें, तर तें हिंदु समाजाचें घोर पापच आहे.

## राजकीय शिलावस्था

केवळ धार्मिक व सामाजिक जीवनांतच आम्हांला शिलावस्था आली आहे असें नाही. राजकीय जीवनांतहि आमची तीच स्थिति आहे; आणि त्याचें कारण हें की, आज हजारो वर्षें या देशांत अनियंत्रित राजसत्तेवांचून, दुसरी शासनपद्धति माहीतच नाही. "राजा कालस्य कारणम्"– ही आमची श्रद्धा. राजा आई, राजा बाप, राजा करील ती पूर्व दिशा, लोक राजाचे गुलाम या आमच्या राजकीय कल्पना रामराज्यापासून आजपर्यंत जशाच्या तशा कायम आहेत. आगरकर म्हणतात, "ज्याला याचें प्रत्यंतर पाहिजे असेल त्याने बडोदें, लष्कर (ग्वाल्हेर), हैदराबाद, म्हैसूर वगैरे पाहिजे त्या नेटिव संस्थानाची फेरी करून तेथील जुन्या पद्धतीच्या लोकांचे विचार व आचार कसे आहेत याची बारकाईने चौकशी करावी. त्या संस्था-नच्या शास्त्यांपैकी एखाद्याने आपल्या प्रजेपैकी एखाद्याला केवळ चैनीखातर चाब-काचा खरपूस मार दिला, अथवा राखेचा तोबरा चढवून पाठीवर भला मोठा दगड दिला, किंवा प्रसंगविशेषीं एखाद्याचे नाही तसले हाल करून खूनहि केला, तरी देखील भोगणाऱ्याचे आप्त किंवा इतर लोक आपल्या स्वामीविरुद्ध उठावयाचे नाहीत. ही आमची राजभक्ति आणि राजनिष्ठा ! धिक्कार असो आम्हांला ! आमच्या राज-भक्तांनी परक्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी आपल्या देशांत येऊं दिल्या आणि एकाच्या जुलमाचें जूं निघालें नाही तोंच दुसऱ्याच्या जुलमाचें जूं मानेवर घेतलें, आणि आपल्या बायकापोरांसह, शतकेंच्या शतकें हवे तसले हाल सोशीत हीन दास्यावस्थेंत काढलीं, यांत नवल तें काय ?" (आमचे दोष आम्हांस केव्हा दिसूं लागतील ?)

हे धिक्काराचे उद्‌गार वरील निबंधाच्या शेवटीं शेवटीं आले आहेत. त्या आधी, "गेल्या दोन हजार वर्षांत आम्ही जीवरक्षणापलीकडे कांही केलें नाही, आणि अशाच स्थितींत पुढील युगें लोटावयाचीं असतील, तर आम्ही एकदम नाहीसें

व्हावें हें इष्ट आहे," असें आगरकरांनी म्हटलें आहे. चंद्रगुप्तापासून रावबाजीपर्यंत हिंदूंनी कांहीच पराक्रम केला नाही, असें आगरकर म्हणत नाहीत; पण त्यांच्या मतें तो इतका अल्प आहे की, त्यामुळे आमच्या ऐतिहासिक शून्यतेस बाध येतो असें त्यांस वाटत नाही.

आज भारताच्या प्राचीन इतिहासाचें जें संशोधन झालें आहे त्याअन्वये पाहतां इसवी सनाच्या पहिल्या सहस्रकाला आगरकरांचे हे उद्गार लागू पडतील असें नाही. सातवाहन, गुप्त, राष्ट्रकूट, चालुक्य, पाल, वर्धन, भोज, पल्लव, कदंब इत्यादि अनेक महापराक्रमी राजघराणीं या भूमींत होऊन गेलीं व त्यांनी सतत हजार-दीड हजार वर्षें परकीय आक्रमकांचें निर्दाळण करून या भूमीच्या वैभवांत सर्वांगांनी भर घातली, असें इतिहास सांगत आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सहा सोनेरी पानें या ग्रंथांत हा सर्व इतिहास दिला आहे; पण एक तर असे महापुरुष या भूमींत होऊनहि आम्ही त्यांचे पराक्रम विसरून गेलों आणि युरोपीय लोकांनी त्यांचे इतिहास शोधून काढल्यावर आम्हांला आमच्या वडिलांची ओळख पटावी ही स्थिति मोठी भूषणावह नाही; आणि दुसरें म्हणजे ब्रिटिशांच्या पूर्वीच्या सात-आठशे वर्षांचा इतिहास आगरकर म्हणतात तसाच आहे. जीवरक्षणापलीकडे आम्ही कांही करूं शकलों नाही. विद्या नाही, कला नाही, संशोधन नाही, महाकाव्य नाही, व्याकरण नाही, कोश नाही, समाजरचनेचीं नवीन तत्त्वें नाहीत, शासनाच्या नव्या कल्पना नाहीत. शिलावस्था म्हणजे दुसरें काय असतें ?

'सामाजिक घडामोड' या निबंधांत राजकीय जीवनाविषयी हेच विचार आगरकरांनी मांडले आहेत आणि "आज ( त्यांच्या काळीं ) आम्ही पूर्ण हतबल झालों आहों, परावलंबी झालों आहों, प्रतिकारशून्य झालों आहों, याचें कारण म्हणजे आमची ती राजभक्तीच होय," असें सांगितलें आहे. ज्या त्या गोष्टींत राजाच्या तोंडाकडे पाहण्याची आम्हांस खोड ! लोकशिक्षण असो, व्यापारवृद्धि असो, यांत्रिक शोध असो, मादक द्रव्यनिषेध असो, सामान्य नीतिप्रसार असो – काय पाहिजे तें असो, अगदी शुष्क गोष्टींपासून मोठ्या महत्त्वाच्या गोष्टींपर्यंत सरकारपुढे तोंड वेंगाडल्याशिवाय आमचे हातून कांहीएक होणार नाही; असा आमचा पक्का ग्रह होऊन बसला आहे. कांही अंशीं ही स्थिति अपरिहार्य आहे. पारतंत्र्यांत शतकेंच्या शतकें ज्यांचीं गेलीं आहेत त्यांना स्वातंत्र्याचा बाऊ वाटावयाचा; आणि पारतंत्र्यच सुखावह वाटावयाचें !

### गुणलोप

अशा प्रकारे हिंदु समाजाला जी शिलावस्था आली होती, तिच्यामुळे त्याचें सर्व कर्तृत्व नष्ट झालें होतें. अज्ञान, अनियंत्रित व जुलमी राजसत्ता, विषमता, विपरीत धर्मकल्पना, यांमुळे राष्ट्रसंवर्धनास आवश्यक अशा सर्व गुणांचा लोप झाला होता. हिंदु लोकांत शूर वीर, मुत्सद्दी बरेच होते; पण सामान्य लोकांत

देशाभिमान पूर्वीपासूनच नव्हता. तो असता तर मुसलमानांचें राज्य येथे स्थापन झालेंच नसतें. आमच्या नादानपणामुळे देशाला कायमचें पारतंत्र्य आलें. मूर्खपणाचे धार्मिक आचार, दुष्ट रूढि, विषम समाजरचना, राज्यकौशल्याचा अभाव यांमुळें स्वातंत्र्यरक्षणाचें सामर्थ्यंच आमच्यांत राहिलें नाही. आगरकर म्हणतात, "पेशवाईचा जो मोड झाला तो आमची सामाजिक व धार्मिक स्थिति जशी पाहिजे तशी चांगली नव्हती म्हणून झाला; आणि येथून पुढेहि आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहण्यास आम्ही आपली गृहस्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे. चांगली राजकीय स्थिति ही चांगल्या गृहस्थितीचें व धर्मपद्धतीचें फळ आहे."

पण हिंदु समाजाची तत्कालीन स्थिति पाहतां, आगरकरांना वाटूं लागलें की, आम्ही पारतंत्र्यालाच लायक आहोंत. गुलामांचें राष्ट्र या लेखांत ते म्हणतात, "राष्ट्राचें ऐक्य होण्यास लागणारा एक तरी गुण आम्हांत भरपूर आहे काय? धैर्य नाही, उत्साह नाही, बल नाही; ज्ञान नाही, तर्क नाही, उद्योग नाही, कला नाही; खरा देशाभिमान नाही, खरी धर्मश्रद्धा नाही; खरें बोलण्याची किंवा खरें आचरण करण्याची सवय नाही; सारांश, चांगलें असें कांही नाही." हिंदु लोक मनुष्य नसून कीटक झाले आहेत; तेव्हा फ्रेंच, इंग्रज, जर्मन किंवा अमेरिकन लोकांनी येथे येऊन या देशावर राज्य करावें हेंच बरें, असें त्यांनी उद्वेगाने म्हटलें आहे. मराठींत चांगले ग्रंथ कां होत नाहीत? या प्रश्नाचें उत्तर आगरकरांनी दिलें आहे की, समाजाची सर्वच क्षेत्रांत अवनति झालेली असतांना, दुसरें कांहीच चांगलें नसतांना, ग्रंथ तरी चांगले कसे होणार! या विधानावरून त्यांचा या बाबतींतला उद्वेग स्पष्ट दिसून येतो.

## नवशिक्षितहि सुधारणा-विरोधी

अशा प्रकारे हिंदु समाजाला शिलावस्था प्राप्त झालेली असतांना गेल्या शतकाच्या प्रारंभीं येथे इंग्रजांची सत्ता सुरू झाली आणि त्यांनी पाश्चात्त्य विद्येचा प्रसार केल्यामुळे समाजांत थोडेंसें चैतन्य खेळूं लागलें. देशाचा ऱ्हास कोणत्या कारणांमुळे होतो, राष्ट्रोन्नतीचीं तत्त्वें कोणतीं; गृहस्थिति, समाजरचना यांत कोणती सुधारणा केली पाहिजे, खरा धर्म कोणता, राजकीय स्थिति कशी असायला हवी, हें सर्व बऱ्याच जणांना पाश्चात्त्य ग्रंथांच्या द्वारें कळूं लागलें; आणि त्यांतून एक नवा सुधारणावादी वर्ग निर्माण झाला. लोकहितवादी, रानडे, तेलंग हे त्या वर्गाचे नेते होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे हळूहळू समाजाच्या सर्व क्षेत्रांत परिवर्तनहि सुरू झालें; आणि लवकरच समाजांत क्रांति होऊन सर्वांगीण सुधारणा होईल, देशाची उन्नति होईल अशी आशा उत्पन्न झाली; पण त्याच सुमारास सुशिक्षित, नवविद्यासंपन्न लोकांतच एक प्रतिगामी, पुराणमतवादी पक्ष निर्माण झाला. त्या पक्षावर आगरकरांनी फार कडक टीका केली आहे; कारण ज्यांना नवीन ज्ञान प्राप्त झालेलें नाही

त्यांनी सुधारणेला विरोध करणें अगदी साहजिक आहे; पण ज्यांना तें मिळालें आहे, आणि सुधारणेचें महत्त्वहि पटलेलें आहे, त्यांनीहि सुधारणेला विरोध करावा हें समाजाच्या उन्नतीला फार घातक आहे, असें त्यांना वाटत होतें. 'स्वयंवर' या लेखांत बालविवाहाविषयी विचार करतांना ते लिहितात, "जुन्या पंडितांस वाटतें की, जगांत म्हणून जेवढें कांही ज्ञान आहे तेवढें संस्कृत भाषेंतील ग्रंथसमूहांत भरलेलें आहे. त्याच्या बाहेर चहूंकडे अंधार आहे. त्यांना असें वाटणें कांही अंशीं स्वाभाविकहि आहे; पण ज्या आमचे डोळे उघडले आहेत, त्या आम्हीहि संकुचित दर्शनाच्या शास्त्रीवैदिकांप्रमाणे किंवा अगदी मूढ जनांप्रमाणे वागत सुटावें ही मोठ्या लाजेची गोष्ट आहे."

कांही सुशिक्षित लोक सुधारकांची व त्यांच्या नवविचारांची टिंगल करण्यांत भूषण मानीत होते. पंडिता रमाबाई या विदुषीचें व्याख्यान पुण्यांत झालें, तेव्हा कांही टवाळांनी तिथे जी हुल्लड केली तिचा तर आगरकरांना फारच संताप आला. पुण्याचे लोक आफ्रिकन लोकांपेक्षाहि रानटी झाले आहेत, असे उद्गार त्यांनी काढले. कांही वर्तमानपत्रांनी त्या टवाळांना उत्तेजन द्यावें, याचेंहि त्यांना फार दुःख झालें.

आपल्या देशांत स्वतंत्रपणें विचार करणारे लोक निघाल्यावांचून देशाची प्रगति होणार नाही, असें आगरकरांचें ठाम मत होतें; पण आपल्या समाजांतील सुशिक्षित लोकहि नवीन विचार मनांत आणण्यास तयार नाहीत, असें त्यांना दिसून आलें. आगरकर म्हणतात, जुनें तेवढें निर्दोष व चांगलें असा आग्रह धरून बसून जर कोणी नवीन गोष्टींचें चिंतन व चर्चा करणार नाही, तर रूढ विचारांतले व आचारांतले प्रमाद दूर होणार कसे व नवीन विचारांचें व आचारांचें चांगुलपण प्रस्थापित होऊन ते रूढ होणार कसे ? समाजाचा उत्कर्ष व्हावयास हवा असेल तर वाटेल त्या गोष्टींचा विचार करण्याची तयारी हवी, असें त्यांनी वारंवार सांगितलें आहे. देवाचें अस्तित्व, वेदांचें अपौरुषयत्व, मुंज, लग्न, इत्यादि संस्कारांची आवश्यकता, स्त्री-पुरुषांचा स्वैर समागम, संपत्तीवरील हक्क इत्यादि प्रश्नांचा निर्भयपणें व सखोल विचार करणें अत्यंत अत्यावश्यक आहे; पण सुशिक्षित लोकांनाहि तसा विचार मनांत येणें म्हणजे पाप वाटत असे, त्यामुळे आगरकरांनी त्यांच्यावर कडक टीका केली आहे.

कांही सुशिक्षित लोक सुधारणेला विरोध करतांना, इंग्रजांपेक्षा पूर्वी आम्ही अत्यंत प्रगत होतों, असें सांगून आपल्या गतवैभावाचें गाणें गाऊं लागत. इंग्रज लोक अगदी रानटी अवस्थेंत होते, तेव्हा आम्हांला शेती, विणकाम, लेखन या कला ज्ञात होत्या, मोठीं घरें बांधतां येत होतीं व आम्ही सुधारणेच्या शिखरावर होतों, अशी बढाई ते मारीत. अशा आम्हांला पाश्चात्त्यांच्याकडून कांहीहि शिकण्याची आवश्यकता नाही, सुधारणा करण्याचें कारण नाही, हा त्यांचा आशय; पण आगरकर म्हणतात की, 'अशा फुशारकीने त्या पक्षाचें मंडन न होतां उलट मुंडनच होतें; कारण पूर्वीच

इतके सुधारलेले लोक आता अधिकच सुधारलेले असायला हवे होते; पण तसे ते नाहीत. ती सुधारणाहि राहिली नाहीं व तें वैभवहि नष्ट झालें. देशाभिमान्यांची ही नवी जात केवळ बढाईखोर आहे; त्यामुळे त्यांना स्वदोष दिसेनासे होतात व सुधारण्याची इच्छाच होत नाही; याचा आगरकरांना विशेष राग येत असे.

आमची जुनी संस्कृति, आमचें धर्मशास्त्र, आमचें गणित, आमचें तत्त्वज्ञान हें निर्दोष व श्रेष्ठ होतें, असें म्हणून पूर्वजांचें नुसतें गुणगान करीत राहणें हें बहुभाष विधवेसारखें आहे, असें सांगून आगरकर पुढे म्हणतात, " पराक्रमी पतीच्या निधना-मुळे नवीन संतानाची आशा खुंटलेली ती गतभर्तृका ज्याप्रमाणे असलेल्या अपत्यांनाच वारंवार दृढालिंगन देऊन 'आमचे पुरुष असे होते, आमच्या पुरुषांनी असें केलें, तसें केलें' अशा प्रकारचे गुणानुवाद गाण्यांतच समाधान मानून घेते व आपल्या जीविताची कृतार्थता समजते, त्याप्रमाणे जुन्या थोर पुरुषांचे गुण गाण्यांतच आमच्या पुरुषार्थाची परमावधि होऊन बसली आहे. "

सुशिक्षित लोकांत आगरकरांना असा एक वर्ग आढळला की, ज्यांना पाश्चात्य सुधारणेचे नवे विचार पटत होते, पण ते समाजांत प्रसृत करण्याची त्यांची तयारी नव्हती. समाजाचे दोष दाखविण्याला त्यांचा विरोध अशासाठी होता की, अशिक्षित लोकांपुढे अशा प्रकारचा बुद्धिवाद मांडल्याने त्यांचा बुद्धिभेद होऊन, समाजांत अनवस्था उत्पन्न होईल. या आक्षेपांत बराच अर्थ आहे हें मान्य करूनहि, आगर-करांनी म्हटलें आहे की, " संक्रमणकाळांत तसें होणें अपरिहार्य असतें; आणि दुसरें असें की, सुधारकांनी खूप उपदेश केला तरी लोक लगेच तसें वागूं लागतील, असा संभव नसतो. समाजाची सुधारणा मुंगीच्या गतीने होत असते. नवीन विचार लोकांना सांगणें हें सुशिक्षित लोकांचें कर्तव्यच आहे. त्यावांचून तरणोपाय नाही. "

सुशिक्षित लोकांत असे कांही जण होते की, ज्यांना नवीन विचार पटले असले तरी, ते लोकांत प्रसृत करण्याचें धैर्य त्यांच्या अंगीं नव्हतें. आगरकरांच्या मतें हा आमचा राष्ट्रीय दोषच आहे. " आमच्या पंडितांना लोकापवादाचें भय फार असल्या-मुळे ते पांडित्य-प्रदर्शनापलीकडे सहसा जात नाहीत; त्यांना आपल्या समजुती-प्रमाणे आचरण करण्याची उत्कट इच्छा किंवा धैर्य होत नाही," असें सांगून आगर-करांनी भास्कराचार्यांचें उदाहरण दिलें आहे. ग्रहणें कशीं लागतात याचें खरें ज्ञान त्यांना असूनहि ते स्नान, दान, मंत्र-जप इत्यादि मूर्खपणाचे आचार सोडूं शकले नाहीत. 'आमचें ग्रहण सुटलें नाही' या लेखांत शेवटीं त्यांनी म्हटलें आहे, " लोकाप-वादाचें भय टाकून, आपल्या मनास शुद्ध दिसेल तें लोकांस सांगण्याचें व तदनुसार वागण्याचें धैर्य केलें पाहिजे; आणि तसें पुष्कळांकडून होऊं लागले तरच अज्ञान-राहूने ग्रासलेल्या आमच्या या हतभाग्य देशाचें ग्रहण लवकर सुटणार आहे. "

" लोकमान्य टिळकांचीं मतें सुधारणेस अनुकूल असूनहि केवळ सवंग लोक-प्रियता व पुढारीपण मिळवण्यासाठी त्यांनीं आपलीं मतें बाजूला ठेवून पुराणमताभि-

मानी लोकांचा पक्ष घेतला," असा आगरकरांचा गैरसमज झाला होता. स्वाभिमान व स्वराज्यनिष्ठा जागृत करून स्वातंत्र्य-संपादनासाठी अखंड प्रयत्न करणें हेंच परतंत्र देशाचें परम कर्तव्य होय; सामाजिक सुधारणा नंतर करतां येईल, असें टिळकांचें ठाम मत होतें; पण तें आगरकरांना मान्य नव्हतें. टिळकांना ते ढोंगी समजत होते आणि त्यांच्यावर सतत टीका करीत होते. "जे कोणत्याहि मिषाने लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील, त्यांनी लोकांची मर्जी संपादण्यासाठी त्यांच्या दुराग्रहांचें मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय." हें आगरकरांचें विधान टिळकांना उद्देशूनच केलेलें होतें. त्यापुढे जाऊन आगरकरांनी सनातनी लोकांना बजावलें की, "हे तुमचे पुढारी नव्हेत. टिळक व जिनसीवाले हे मनाने सुधारकच आहेत. त्यांना स्त्री-शिक्षण, बालविवाह-निषेध, वपन-निषेध, पुर्नविवाह वगैरे सुधारणा व्हायला हव्या आहेत. मात्र त्या कायद्याने लोकांवर लादण्याला त्यांचा विरोध आहे एवढेंच. तेव्हा लोकांनी त्यांना आपले पुढारी मानूं नये. साधनें आणि मार्ग यांबद्दल त्यांचें मत भिन्न असलें तरी ते आमच्यासारखेच सुधारणावादी आहेत. त्यांच्या नादीं तुम्ही लागाल तर फसाल."

हिंदु समाजाला शिलावस्था आली आहे, त्याचें सारें व्यक्ति-जीवित्व व राष्ट्र-जीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें, किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदि-वानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघाताने कठीण झालेल्या लाकडासारखें किंवा हाडकासारखें शेकडो वर्षें होऊन राहिलें आहे, असें आगरकरांनी सुधारकाच्या पहिल्या अंकांतच म्हटलें आहे. त्यांना हिंदु समाज कसा दिसला हें यावरून स्पष्ट होईल. त्यांनी 'केसरी'साठी लेखणी उचलली तेव्हाच हिंदु समाजाविषयी त्यांचें हें मत झालें होतें. पुढे सतत केलेल्या चिंतनामुळे तें अगदी निश्चित झालें आणि 'सुधारक' पत्राला प्रारंभ करतांनाच त्यांनी तें समाजाला सांगून टाकलें.

अशा या समाजाच्या अंगीं चैतन्य आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे तेंहि प्रारंभापासूनच त्यांच्या मनांत सुनिश्चित झालेलें होतें. या समाजाला शिलावस्था येण्याची त्यांनी केलेली कारणमीमांसा आणि ती नाहीशी होऊन पुन्हा तो प्रगतिपथावर येण्यासाठी त्यांनी सांगितलेली उपाययोजना यांचीच आता चिकित्सा करावयाची आहे.

पण ती चिकित्सा करण्यापूर्वी एकदा जरा मागे वळून पाहूं आणि मग पुढे जाऊं. मागे वळून काय पाहवयाचें?

विष्णुशास्त्री आणि आगरकर यांच्यांतील विचारसाम्य.

हिंदुस्थानाला शिलावस्था आली आहे असे शब्द विष्णुशास्त्री यांनी वापरले नाहीत; पण त्यांनी येथल्या समाजाचे जे दोष दाखविले आहेत त्यांवरून त्यांचा भावार्थ तोच होता हें स्पष्ट दिसतें. कारण आगरकरांना हिंदुस्थान जसा दिसला तसाच त्यांना दिसला होता. येथल्या लोकांना ज्ञानलालसा नाही, विद्याभिरुचि नाही.

कार्यकारणभावाचें आकलन नाही, इतिहास लिहिण्याची बुद्धि नाही, असें विष्णुशास्त्री म्हणत असत. हें मागें सांगितलेंच आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन परंपरेचें ते गुणगान करीत असले तरी शिवछत्रपतींच्या पूर्वी अनेक शतकें या देशाचें प्राचीन वैभव नष्ट झालें होतें व प्राचीन आर्य लोकांचा धर्म, विद्या, आचार, इत्यादिकांचा सर्वथा लोप होण्याचा समय आला होता, असें मत त्यांनी वक्तृत्व या निबंधांत मांडलेलें होतेंच.

हिंदुस्थानच्या शिलावस्थेविषयी जसें दोघांचें एकमत होतें तसेंच पाश्चात्त्य विद्येच्या महत्त्वाविषयी व पाश्चात्त्य लोकांच्या गुणांविषयी व संस्थांविषयीहि त्यांचें जवळ जवळ एकमत होतें. त्यांचेंच आपण अनुकरण केलें पाहिजे. त्यांना गुरु केलें पाहिजे असें विष्णुशास्त्री यांनी देशाभिमान, विद्याभिरुचि, उद्योगशीलता, संपत्तीचा उपभोग, व्यक्तिस्वातंत्र्य, यांचें विवेचन करतांना ठायीं ठायीं म्हटलें आहे. आगरकरांचे त्यांविषयीचे विचार येथे मांडलेच आहेत. पाश्चात्त्य शिक्षण व तेथील नवीन कल्पना यांत मनुष्य-सुधारणेच्या अत्यवश्य तत्त्वांचा समावेश झाला आहे, म्हणून ज्यांना लयास जावयाचें नसेल त्यांनी त्यांचें अवलंबन केलेंच पाहिजे, असें त्यांनी म्हटलें आहे.

हें एवढें विचारसाम्य पाहून मोठें आश्चर्य वाटतें. आश्चर्य अशासाठी की, रोगाचें निदान व त्यावरील उपाय या दोन्ही बाबतींत इतकें साम्य असतांना भारताच्या अवनतीच्या मीमांसेच्या बाबतींत त्यांच्यांत दोन ध्रुवांइतकें अंतर असावें ! सामाजिक व धार्मिक आचार-विचारांमुळे आम्हांस पारतंत्र्य आलें, असें आगरकर म्हणतात; तर या पारतंत्र्यामुळे आमची अवनति झाली असें विष्णुशास्त्री म्हणतात. शिवाय उन्नति-अवनति ही चक्रनेमिक्रमाने होत असते असेंहि विष्णुशास्त्री यांनी अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. याच भिन्न दृष्टिकोणामुळे सुधारणाविरोधक असे जे नवे विद्वान् त्यांच्यावर आगरकर कडक टीका करतात, तर विष्णुशास्त्री सुधारक व सुधारणा यांचा तीव्र उपहास करतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदुस्थानच्या अवनतीविषयी पुढे जीं मतें मांडलीं बव्हंशीं तशींच मतें आगरकरांनी मांडलेलीं आहेत. रोटीबंदी, बेटीबंदी, व्यवसायबंदी इत्यादि सप्तशृंखला आपणच आपल्या पायांत ठोकून घेतल्यामुळे आपला अधःपात झाला, आणि पुढे स्वातंत्र्य प्राप्त झालें तरी या बेड्या ज़र आपण तोडल्या नाहीत तर तें टिकणार नाही, असें सावरकर सांगत असत. समाजरचनेविषयी हेंच तत्त्वज्ञान या शतकाच्या पूर्वार्धांत आपल्या नेत्यांनी मान्य केलें म्हणूनच हा समाज संघटित व स्वातंत्र्यलढा देण्यास समर्थ झाला हें उघड आहे. असो.

या ग्रंथांत केसरीच्या त्रिमूर्तीच्या कार्याचें विवेचन करावयाचें असल्यामुळे त्या त्रिमूर्तींच्या तत्त्वज्ञानांतील साम्य-वैषम्य पाहत पाहत असें पुढे जाणें हें उद्बोधक होईल.

- २ -

# व्यक्तिस्वातंत्र्य

## व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप

समाजाला अशी शिलावस्था येण्याचें, आगरकरांच्या मतें, मुख्य कारण म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप हें होय. हिंदु लोकांच्या मनावर मध्ययुगांत नाना प्रकारचीं बंधनें घातलीं गेल्यामुळे कोणाला आचारस्वातंत्र्य राहिलें नाही, उच्चार स्वातंत्र्य राहिलें नाही आणि विचारस्वातंत्र्यहि राहिलें नाही. सर्व समाजावर श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माची सर्वंकष सत्ता चालत होती. वेदप्रामाण्य म्हणजे वेदवाक्यांचें बंधन होतें; कर्मवाद म्हणजे पूर्वजन्मांतील कर्माचें बंधन होतें; स्मृतींचें म्हणजे धर्मशास्त्राचें बंधन; वर्णव्यवस्थेचीं सामाजिक बंधनें, तशींच जातिबंधनें, अशीं असंख्य बंधनें अगदी अनुल्लंघनीय होतीं. तीं बंधनें न मानावीं तर जातिबहिष्काराची भीति होती. राजकीय बंधनें होतीं तीं वेगळींच, कारण राजाची सत्ता अनियंत्रित होती. त्याच्या मर्जीप्रमाणे व लहरीप्रमाणे सारी प्रजा गुलामी जीवन कंठीत होती. अशा साचेबंद, नियंत्रित जीवनांत व्यक्तीला स्वतंत्रपणें विचार करावयास अवसरच राहत नाही. शेकडो वर्षें अशा अवस्थेंत राहिल्यामुळे माणसांचें स्वतंत्र व्यक्तित्व हळूहळू खुरटून गेलें व शेवटीं नष्ट झालें. त्याचा परिणाम असा झाला की, समाजांत नवीन विचार, नवीन कल्पना यांचा उदय होणें थांबलें, समाजाची प्रगति थांबली व अधोगति सुरू झाली.

अशा अवनत समाजाचा उत्कर्ष व्हायला हवा असेल, तर प्रथम व्यक्ति निर्माण केली पाहिजे, असा आगरकरांचा सिद्धान्त आहे. ' सुधारक काढण्याचा हेतु ' या निबंधांत ते म्हणतात, " समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत

व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका घ्यावयाचा हें अर्वाचीन पाश्चात्त्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे." आपल्या सर्व लेखनांत आगरकरांनी याच तत्त्वाचा तळमळीने पुरस्कार केला आहे. किंबहुना व्यक्तिस्वातंत्र्याचा उद्घोष करणें हेंच त्यांचें जीवितकार्य होय, असेंहि म्हणतां येईल.

## पाश्चात्त्य सुधारणांचा स्वीकार

पाश्चिमात्य विद्येच्या प्रसारामुळे समाजाची शिलावस्था हळूहळू बदलूं लागली; कारण नवीन विचारांचें वारें समाजांत खेळूं लागलें. नवीन शिक्षणाबरोबरच पाश्चिमात्य सुधारणांचा अंगीकार आपण केला तरच व्यक्तिस्वातंत्र्याची स्थापना होऊं शकेल व मग समाजाची उन्नति होईल, असें त्यांनी प्रतिपादिलें आहे; आणि म्हणूनच ज्या तत्त्वांच्या अनुरोधाने समाजांत सुधारणा घडवून आणायची त्या नवीन तत्त्वांचें विवेचन त्यांनी आपल्या लेखांत केलें आहे. पाश्चिमात्य शिक्षणांत मनुष्य-सुधारणेच्या अत्यावश्यक तत्त्वांचा समावेश झालेला आहे, म्हणून ज्या लोकांस लयास जावयाचें नसेल त्यांनी त्यांचें अवलंबन केलेंच पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. पाश्चात्त्य विद्येला आगरकरांनी दुर्बिणीची उपमा दिली आहे ती अगदी सार्थ आहे. ते म्हणतात, " ज्याला दुर्बिणीचें किंवा सूक्ष्मदर्शक यंत्राचें साहाय्य आहे, त्याला ज्या गोष्टी स्पष्ट दिसतात, त्या ज्याला त्यांचें साहाय्य नाही, त्याला तितक्या स्पष्ट दिसत नाहीत; तसेंच ज्याने शास्त्राभ्यास केला आहे, ज्याने इतिहास वाचला आहे, ज्याने जगाचा पुष्कळ अनुभव घेतला आहे व ज्याने विचारांत दीर्घ काळ घालविला आहे, अशा तत्त्ववेत्त्यास मनुष्य-प्रवृत्तीची दिशा जितकी नीट समजणार आहे, तितकी ती अशिक्षितास समजण्याचा संभव नाही.

पाश्चात्त्य सुधारणेचीं मूलतत्त्वें ज्यांना पटलीं आहेत, त्यांना आपल्या समाज-व्यवस्थेंत अनेक दोष दिसून येतील. ते सामान्य लोकांना दाखवून देऊन, नवीन तत्त्वांचा पुरस्कार करतांना, नवीन विचारांचें प्रतिपादन निर्भयपणें केलें पाहिजे, असें आगरकरांनी सांगितलें आहे. लोकमत नवीन विचारांना प्रतिकूलच असणार; पण त्या लोकमताला भिऊन चालणार नाही. ज्यांना समाजाला नवीन वळण लावून त्याची उन्नति करण्याची इच्छा आहे त्यांनी सत्यप्रतिपादन करणें अवश्य आहे. नाही तर लोकमतांत बदल होणारच नाही. समाजधुरीणांना लोकमताचा बागुलबोवा वाटूं लागला, ते लोकमताविरुद्ध जाण्यास भिऊं लागले, तर कोणत्याहि समाजाला उन्नतावस्था येणें शक्य नाही, असें त्यांनी बजावलें आहे.

## आमचा राष्ट्रीय दोष

लोकापवादाचें भय वाटणें हा, आगरकरांच्या मतें आपला राष्ट्रीय दोष आहे व त्यामुळे आपलें अतिशय नुकसान झालें आहे. समाजाच्या हितास्तव ज्याला जी गोष्ट बरी वाटेल ती त्याने उघडपणें बोलून दाखवणें यांतच समाजाचें कल्याण आहे, असें त्यांनी सांगितलें आहे. ज्या कारणांमुळे आपली अधोगति झाली, तीं समाजाला

निर्भयपणें सांगितलीं पाहिजेत आणि समाजाच्या उन्नतीसाठी ज्या सुधारणा करणें आपल्याला योग्य वाटतें त्याहि सांगणें अवश्य आहे. लोकाग्रणी तसें न करतील तर समाजाची सुधारणा कधीच होणें शक्य नाही. त्याचा नाश होणें अटळ आहे. निर्भयपणाचें महत्त्व विशद करतांना आगरकरांनी पुढे म्हटलें आहे, "पाश्चात्त्य ज्ञान पुष्कळ मिळवलें, नवीन विचार आत्मसात् केले तरी, त्याप्रमाणे वागण्याचें धैर्य नसेल तर त्यांचा समाजाला कांहीच उपयोग नाही. आपल्याकडील तत्त्ववेत्त्यांत एक मोठा दोष दिसून येतो तो हा की, त्यांना आपल्या समजुतीप्रमाणे आचरण करण्याची उत्कट इच्छा किंवा धैर्य होत नाही. रूढ आचारधर्माचे आम्ही इतके गुलाम झालों आहों की, जुन्या गोष्टी आम्हांला सोडवत नाहीत. वाडवडिलांच्या विहिरींत खारें पाणी असलें तरी तेंच आम्हांला प्रिय, तेंच आम्ही पिणार, असा आमचा दुराग्रह आहे. तो दुराग्रह सोडला पाहिजे. युरोप खंडांतील लोकांनी दुराग्रह सोडला म्हणून त्यांचा उत्कर्ष झाला. मध्ययुगांत युरोपांतील लोकहि धर्मपाशांनी अगदी जखडलेले होते, पण त्यांनी ते पाश तोडून टाकले म्हणून त्यांची उन्नति झाली. त्याप्रमाणेच आपणहि आपले कर्मकांडात्मक धर्माचे पाश तोडले पाहिजेत; आणि नवीन विचारांचें प्रतिपादन निर्भयपणें केलें पाहिजे. असें सतत केल्यानेच त्याप्रमाणे आचरण करण्याचें धैर्य येतें." निर्भयपणा हा व्यक्तिस्वातंत्र्याचा एक पैलू आहे.

### विवेक हाच आधार

धर्मपाश तोडून टाकायचे म्हणजे बालविहासारख्या अनिष्ट प्रथा बंद करायला हव्या; पण त्यामुळे उभय कुळांतील चाळीस पिढ्यांना दुर्गति प्राप्त होण्याचें भय सामान्य लोकांना वाटत असतें, कारण तसें धर्मशास्त्र आहे. शेकडो वर्षें समाज तो आचारधर्म पाळीत आहे. यामळे कांही लोक धर्मशास्त्रांतच नवीन विचारांना, सुधारणेच्या तत्त्वांना, आधार शोधून काढण्याचा प्रयत्न करतात. त्यांना कोणत्या तरी प्राचीन ऋषीचा आधार हवा असतो. त्यावर आगरकर म्हणतात की, अशा आधाराची मुळीच आवश्यकता नाही. विवेक हाच आमचा आधार. आमची बुद्धि, आमची तळमळ, आमचें सृष्टिविषयक ज्ञान त्या जुन्या ऋषींच्या बुद्धीहून किंवा ज्ञानाहून कमी तर नाहीच, उलट अधिक आहे. तेव्हा धर्माचा निर्णय करण्याचा त्यांना जेवढा अधिकार होता तेवढा आम्हांलाहि आहे. म्हणून जुन्या धर्मशास्त्रांतील जे नियम आमच्या दृष्टीने समाजाला हितकारक असतील तेवढेच आम्ही पाळूं व जे आम्हांला अपायकारक वाटतात ते टाकून देऊन त्यांच्या जागीं आम्ही नवीन नियम, समाजाला हितकारक असे नियम, तयार करूं.

### इष्ट असेल तें –

समाजव्यवस्थेचे नियम करतांना जुन्या शास्त्रांचा आधार न घेतां स्वतःच्या बुद्धीचा आधार घेणार असा निर्धार व्यक्त केल्यानंतर आगरकरांनी त्याबद्दल स्वतःची भूमिका कोणती आहे, तें स्पष्ट केलें आहे. मनुष्याला बुद्धि असल्यामुळेच

निरनिराळ्या व्यक्तींत व समाजांत मतभेद उत्पन्न होतात, तसें होणें अनिवार्य आहे. प्रत्येकाने स्वत:ला योग्य वाटतील तेच विचार लोकांना सांगितले पाहिजेत व त्याप्रमाणे आचरण केलें पाहिजे. "इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार" हें आगरकरांच्या प्रतिपादनाचें सार त्यांनीच सांगितलें आहे. स्वत:च्या विचारसरणीबद्दल आगरकरांना केवढा जबर आत्मविश्वास वाटत होता तें त्यांच्या पुढील विधानावरून ध्यानांत येतें. "एखाद्या दुसऱ्या मनूची आणि पाराशराची कथा काय? आमच्या अर्वाचीन विचारास ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटूं लागल्या आहेत, त्यांस शेकडो मनूंचे व सहस्रावधि पाराशरांचे आधार दाखविलेत व त्यांचा प्रसार न व्हावा म्हणून कितीहि अडथळे आणून घातलेत तरी, आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतीस लागलेला वणवा कोटचवधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवाताने विझण्याचा मुळीच संभव नाही."

पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारामुळे हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक विचारांत क्रांति होईल व आचारांतहि बदल होईल, अशी खात्री आगरकरांना वाटत होती. कारण इंग्रजी सत्ता आल्यापासून हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक मूढतेस धक्के बसूं लागले होते. नवीन प्रकारच्या शिक्षणामुळे लोक स्वतंत्रपणें विचार करूं लागले होते, समाजाला जागृति आली होती. त्यामुळे व परिस्थितीच्या प्रभावामुळे हिंदूंच्या आचारांत बरीच शिथिलता आली होती. हिंदु धर्माला उतरती कळा लागली असा ग्रह होऊन त्याच वेळीं सनातन धर्माभिमानी लोक जुन्या आचारधर्मास कवटाळून बसलेले असल्यामुळे, त्याचें प्रस्थ चालू राहवें, त्याची सत्ता सर्व समाजावर पुन्हा प्रस्थापित व्हावी असा प्रयत्न ते करीत होते हें खरें; पण इंग्रजी शिक्षण चालू असे-पर्यंत ती गोष्ट साध्य करणें अशक्य आहे, असें आगरकरांनी त्यांना बजावलें आहे. तेव्हा तसा व्यर्थ प्रयत्न न करतां नव्या कल्पनांचा स्वीकार करणें हेंच सर्वांच्या हिताचें आहे. अन्यथा तरुण पिढी वैदिक धर्माचा अजीबात त्याग करून निधर्मी बनेल असाहि इशारा त्यांनी दिला आहे.

### विचारकलह

पाश्चात्त्य शिक्षणामुळे, नव्या विचारांच्या प्रसारामुळे सुशिक्षित लोकांना आपल्या जुन्या आचारधर्मांतील दोष दिसूं लागले आणि ते सुधारावे अशी इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. त्यामुळे समाजांत दोन पक्ष निर्माण झाले; सुधारणावादी आणि सनातन धर्माभिमानी लोकांत वादविवाद सुरू झाले, कलह होऊं लागला. आगरकरांच्या मतें हें इष्टच आहे. ते म्हणतात, "बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतकें भितां कशासाठी? दुष्ट आचारांचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहीत. आजपर्यंत या देशांत हा कलह माजावा तितका कधीच न माजल्यामुळे हें भरतखंड इतकीं शतकें अनेक प्रकारच्या विपत्तींत

खितपत पडलें आहे. पाश्चिमात्य शिक्षणामुळे ज्या दिवशीं या वादास प्रारंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या भावी इतिहासांत महोत्सव करण्यासारखा होईल." विचारांचा कलह म्हणजे माणसांत चैतन्य निर्माण झाल्याचें द्योतक आहे आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या निर्मितीसाठी त्याची नितान्त आवश्यकता आहे, असें त्यांचें निश्चित मत होतें.

अशा प्रकारे व्यक्तिस्वातंत्र्याच्या स्थापनेसाठी समाजांत कोणत्या सुधारणा करणें अवश्य आहे, त्यासाठी काय केलें पाहिजे, समाजाला काय शिकवलें पाहिजे, त्याचा परिणाम काय होईल यासंबंधी मनाचा निश्चय झाल्यानंतर, आगरकरांनी स्वतःची भूमिका ठरवून त्याप्रमाणे वागण्याचा निर्धार केला होता. सत्य तेंच सांगणार ही त्यांची प्रतिज्ञा होती. त्यापायीं वाटेल तीं संकटें येवोत; त्यांना तोंड देण्याची त्यांची तयारी होती. 'महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र' या लेखांत ते म्हणतात, "लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळे, लोकच्छंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे. इतकेंच नाही, तर लोकांस अप्रिय परंतु पथ्यकर असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध पुनः पुन्हा त्यांचे पुढे आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीविताचें सार्थक अशी त्याची दृढ कल्पना झाली आहे."

समाजशिक्षणाचें हें दुर्घट कार्य आगरकरांनी स्वार्थत्यागपूर्वक चालवलें, आणि त्यामुळे जो उपहास व जे शिव्याशाप समाजाकडून त्यांना मिळाले ते त्यांनी सहन केले. पूज्य व प्रिय आप्तजनांचा रोषहि त्यांना पत्करावा लागला. विरुद्ध पक्षाच्या लोकांनी त्यांच्या डोळ्यादेखत त्यांची प्रेतयात्रा काढली तीहि त्यांना पाहवी लागली. पण हें सर्व त्यांनी एखाद्या स्थितप्रज्ञासारखें सोसलें. कारण आपलें सत्यप्रतिपादन केव्हा ना केव्हा तरी लोकांना पटेल व समाज त्याचा स्वीकार करील अशी त्यांना आशा वाटत होती.

- ३ -

# मनुष्यसुधारणेचीं मूलतत्त्वें

## ऐतिहासिक चिकित्सा

हिंदु समाजाला जी शिलावस्था आलेली होती ती नष्ट होऊन त्याच्या ठायीं पुन्हा प्राणसंचार व्हावा यासाठी 'व्यक्तिस्वातंत्र्य' हा निर्णायक उपाय होय, असें आगरकरांचें मत होतें. त्याचें प्रतिपादन त्यांनी कसें केलें तें आपण वर पाहिलें; पण आगरकरांनी आपलें हें प्रतिपादन अधिक व्यापक भूमिकेवरून अनेक ठिकाणीं केलें आहे आणि त्याचाहि परामर्श घेणें अवश्य आहे.

त्यांची व्यापक भूमिका ही की, 'व्यतिस्वातंत्र्य' हें आज आपल्याला जडलेल्या व्याधीवरच औषध आहे असें नाही, तर एकंदर मनुष्यसुधारणेचेंच तें मूलतत्त्व आहे. समाजाच्या प्रारंभीच्या काळीं सर्वच क्षेत्रांत 'आज्ञाप्रामाण्य' किंवा 'दंडसत्ता' किंवा आगरकर ज्याला 'बलात्कार' म्हणतात त्याच तत्त्वावर समाजाचे सर्व क्षेत्रांतले व्यवहार चालू असतात. धर्म, राजकीय जीवन, समाजरचना या जीवनाच्या भिन्न अंगांचा विचार केला व त्या दृष्टीने मानवाचा इतिहास पाहिला तर धर्माचार्य, राजा व श्रेष्ठ वर्णीयांनी केलेल्या स्मृति किंवा कायदे यांच्या आज्ञेप्रमाणेच सर्वसामान्य जनतेला वागावें लागत असे, असें दिसतें. स्वतःच्या मताप्रमाणे वर्तन करण्याचा अधिकार कोणालाहि नव्हता. यालाच आगरकर बलात्कार-तत्त्व म्हणतात. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत हें कांही अंशीं अपरिहार्यच असतें, असेंहि त्यांनी म्हटलें आहे. कारण स्वतः विचार करून उत्कर्षमार्ग कोणता तें अचूकपणें जाणण्याचें बौद्धिक सामर्थ्य त्या काळीं सामान्यजनांना आलेलें नसतें. अशा स्थितींत म्हणजे वन्यावस्थेंत समाज असतांना लोकांना स्वातंत्र्य दिलें तर समाजांत अराजक माजेल, मारामाऱ्या, लूट, विध्वंस, रक्तपात यांना ऊत येऊन सर्वत्र बेबंदशाही माजेल;

आणि मग समाजाचें अस्तित्वच धोक्यांत येईल. म्हणून आगरकर म्हणतात, " तशा स्थितींत पराकाष्ठेचा क्रूर व जुलमी असा राजा असला तरी त्यापासून समाजाला नुकसानीहून अधिक फायदा होतो; आणि त्या एकटयाच्या जुलमापासून होणारी पीडा एकंदरीने अधिक हितावह होते. त्या अवस्थेंत सारी दृष्टि समाजाच्या अस्तित्वावरच दिली पाहिजे. मनुष्यासारख्या बलहीन प्राण्यास क्रूर पशूंच्या व पशुतुल्य व्यक्तींच्या त्रासांतून सुटण्यास कसा तरी समाज करून राहणें व आपल्याचपैकी एखाद्या बलवंताचा आश्रय करणें, याहून स्वसंरक्षणाचा दुसरा मार्ग नसतो. (आमचें काय होणार ?) पण समाज जसजसा समंजस, विवेकी होऊं लागतो तसतसें हें बलात्कार-तत्त्व नाहीसें होऊन समाजाचे व्यवहार संमति-तत्त्वावर होऊं लागतात; आणि तसे झाले तरच त्याची प्रगति होते. व्यक्तिस्वातंत्र्य हा त्या संमति-तत्त्वाचाच पूर्ण विकास होय.

अशा रीतीने मनुष्यसुधारणेचें मूल-तत्त्वच व्यक्तिस्वातंत्र्य आहे, हळूहळू बलात्कार नष्ट होऊन त्याच्या जागीं संमति-तत्त्व आल्यावांचून समाजाची प्रगति होणें शक्य नाही. हें आपल्या समाजाच्या नीट ध्यानांत आलें तर पाश्चात्त्य सुधारणेच्या तत्त्वांना असलेला त्याचा विरोध कमजोर होऊन हळूहळू तो नाहीसा होईल असें मनांत आल्यामुळे आगरकरांनी त्या मूल-तत्त्वांची ऐतिहासिक चिकित्सा केली आहे. ते म्हणतात, " तारवास जसें सुकाणूं किंवा इमारतीस जसा पाया तशी सामाजिक रचनेस व स्थित्यंतरास हीं तत्त्वें आहेत. "

हिंदु-समाज गाढ अज्ञानांत बुडालेला होता, त्याला कार्यकारणभाव कळत नव्हता, त्यामुळे त्याच्यावर लादलीं गेलेलीं असंख्य बंधनें त्याला प्रिय वाटत होतीं. तीं बंधनें केव्हा कशामुळे आलीं, आचारधर्म कोणत्या हेतूने सुरू झाला, हें लोकांना माहीत नव्हतें. कोणतें कर्म केलें असतां पुण्य लाभतें व कोणत्या कर्मामुळे पाप लागतें एवढेंच त्यांना माहीत होतें. त्या परंपरागत कर्मकांडावर त्यांची अंधश्रद्धा होती; पण धर्मसत्ता, राजसत्ता यांचें मूल स्वरूप समजलें की लोकांचे डोळे उघडतील; ते विविध आचार, तीं व्रतवैकल्यें व त्या अनंत रूढि यांचे समाजावरील पाश तुटून जातील व लोकांची बुद्धि स्वतंत्र होईल, या आशेने आगरकरांनी ही ऐतिहासिक चिकित्सा केली आहे.

आमचा धर्म सनातन आहे, प्राचीन काळापासून चालत आलेला आहे, तो अपरिवर्तनीय असून परंपरागत आचार व रूढि पाळणें हेंच समाजाच्या हिताचें आहे, अशी लोकांची समजूत झालेली होती. आम्हीं उन्नतीचें शिखर गाठलेलें आहे; आणि अधिक उन्नतीला अवसर नाही, असेंहि त्यांना वाटत होतें; पण पाश्चात्त्य विद्यारूपी दुर्बिणींतून जगाचें अवलोकन केल्यानंतर हा भ्रम नाहीसा होईल, अशी आगरकरांना खात्री वाटत होती; म्हणून त्यांनी समाजाला मनुष्यसुधारणेचीं मूल-तत्त्वें सांगून, मानवी प्रगतीची दिशा दाखविण्यासाठी हा प्रपंच केला आहे. जग सारखें

बदलत चाललें आहे, असें सांगतांना तें म्हणतात, "या विश्वांतील कोणतीहि सचेतन किंवा अचेतन वस्तु स्थिर नाही; प्रत्येक क्षणास प्रत्येकींत दृश्य किंवा अदृश्य फेरफार होत आहेत. सध्या पृथ्वीवर जे ज्ञानी पुरुष आहेत, त्या सर्वांच्या अंतःकरणाची अलीकडे अशी खात्री होत चालली आहे की, जगाचीं स्थित्यंतरें अनादि व अनंत आहेत. तस्मात् आपणांस अनुकूल अशा स्थित्यंतरास आपण साहाय्यभूत व्हावें हें आपणांस योग्य आहे."

आगरकरांनी मनुष्यजातीच्या स्थित्यंतरांचे धार्मिक, राजकीय व सामाजिक असे तीन विभाग कल्पून त्यांचा क्रमाने विचार केला आहे; तो आता पाहवयाचा आहे.

## धार्मिक

काम, क्रोध, लोभ, मत्सर, दया इत्यादि मानवी मनोवृत्ति जशा नैसर्गिक आहेत, तशीच धर्मवृत्तीहि नैसर्गिक आहे. मात्र मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेंत ती स्पष्टपणें दिसत नाही; त्याच्या अंतःकरणांत अगदी सूक्ष्म अशा बीजरूपाने ती उत्पन्न झालेली असते. मनुष्याची अवस्था जसजशी बदलत जाते, तसतसा त्याच्या धर्मकल्पनेचा विकास हळूहळू होत जातो. निर्गुण, निराकार व सर्वगामी परमेश्वराची अत्यंत उन्नत कल्पना प्रारंभापासून मानवाच्या मनांत होती, हें खरें नाही. प्रथम तो निर्जीव वस्तु किंवा पशु यांच्या रूपाने निसर्गशक्तींची पूजा करूं लागला. मग अनेक देवता उत्पन्न झाल्या. त्या सगुण देवतांची उपासना हजारो वर्षें चालू आहे. कालांतराने अनादि, अनंत विश्वसंचालक अशा एकाच परमेश्वराची कल्पना उदित झाली. त्यानंतर द्वैत, अद्वैत इत्यादि तत्त्वज्ञान उदय पावलें. यावरून हें दिसून येईल की, वेद अनादि असून, त्यांतील सूक्तांचे द्रष्टे जे प्राचीन ऋषि त्यांना एकदम पूर्ण ज्ञान प्राप्त झालें होतें, ही समजूत अत्यंत भ्रामक आहे; तिला कसलाहि आधार नाही. अनेकत्वानंतर एकत्वाची, स्थूलानंतर सूक्ष्माची, जडानंतर चिद्रूपाची, साकारानंतर निराकाराची कल्पना मनुष्याच्या विकास पावत जाणाऱ्या बुद्धीस येणें हेंच अत्यंत स्वाभाविक आहे. पदार्थविज्ञान, रसायन, वैद्यक, न्याय इत्यादि शास्त्रांतहि उत्तरोत्तर असाच विकास होत गेला आहे. ज्याप्रमाणे जड सृष्टीच्या शास्त्रीय विचारांत गुरुत्वाकर्षण ठाम होऊन गेलें आहे, त्याप्रमाणे धर्मविचारांत सर्वशक्तिमान् व सर्वज्ञ अशा एका परमेश्वराची कल्पना दृढ होऊन गेली आहे; आणि आगरकरांच्या मतें मनुष्याला अजूनहि पूर्णावस्था आलेली नाही.

## निसर्गपूजा

रानटी अवस्थेंतील मनुष्याला विश्वाचे व्यापार, पदार्थांचे धर्म, वस्तूंत होणारीं नैसर्गिक रूपांतरें यांचें ज्ञान नसल्यामुळे त्याला ऊन, पाऊस, वारा, वीज, पूर वगैरे नैसर्गिक घटना आणि वाघ, सिंह इत्यादि क्रूर पशु यांची भीति वाटते. त्यांच्यापासून स्वसंरक्षण कसें करावें हें त्याला समजत नाही, म्हणून तो त्यांची पूजा

करून संकटें निवारण्याचा प्रयत्न करूं लागतो; यांतच धर्मकल्पनेचा उगम आहे. बाह्य सृष्टींतील निर्जीव वस्तु आणि प्राणी यांनाहि आपल्यासारखींच मनें आहेत, आपल्यासारखेच राग-द्वेषादि विकार आहेत, असें मानून त्यांना संतुष्ट राखण्यासाठी त्यांचें स्तवन करणें, त्यांना कांही तरी वस्तु अर्पण करणें यांतून देवकल्पना व देवपूजा उदय पावली. सारांश, मनुष्याच्या अज्ञानामुळे, भिन्न भिन्न घटनांचीं कारणें त्याला कळत नसल्यामुळे अशा विचित्र कल्पना त्याच्या मनांत येतात आणि त्याच त्याला खऱ्या वाटूं लागतात. सूर्य, चंद्र, दगड, माती, इत्यादि निर्जीव वस्तु; वड, पिंपळ, तुळस इत्यादि वनस्पति; मत्स्य, कूर्म, वराह, उंदीर, गाय, नाग, इत्यादि प्राणी यांना देव मानून त्यांची विविध प्रकारे पूजा करण्याची चाल भारतांतच नव्हे, तर जगांत सर्वत्र रूढ आहे.

**पिशाच-कल्पना**

सृष्टींतील सचेतन व अचेतन वस्तूंच्या ठायीं मनुष्याचें बरें-वाईट करण्याची शक्ति असते, असें समजून त्यांना देवता मानणें हा देवतोत्पत्तीचा एक प्रकार; व प्रबल पुरुषासच जिवंतपणीं व मरणोत्तर देव मानून त्याची पूजा करणें हा दुसरा प्रकार होय. रानटी माणसाला झोप व मरण यांतील भेद कळत नाही. झोपलेला मनुष्य जिवंत असतो, त्याचप्रमाणे मेलेला मनुष्यहि दुसऱ्या कोणत्या तरी अवस्थेंत जिवंत असला पाहिजे व आपल्या भोवतीं वावरत असला पाहिजे, असें त्याला वाटतें. मेलेल्या मनुष्याचें शरीर नाहीसें झालें तरी, त्याचा जीव किंवा आत्मा पिशाचरूपाने त्या व्यक्तीच्या स्वभावधर्माप्रमाणे आपल्याला सुख किंवा त्रास देत राहतो, ही श्रद्धा जगांतील बहुतेक रानटी लोकांत आढळून येते. त्यामुळे त्या पिशाचाला प्रसन्न करण्या-साठी किंवा त्याचा रोष होऊं नये म्हणून, त्याला प्रिय असलेली वस्तु अर्पण करणें, प्रार्थना करणें किंवा दुष्ट पिशाचाला मांत्रिकाच्या मदतीने गाडण्याचा प्रयत्न करणें, हे प्रघात सुरू झाले. पुढे कांही कारणांमुळे हींच पिशाचें वृक्षांच्या किंवा जनावरां-च्या रूपाने प्रगट होऊन आपल्याला आनंद किंवा पीडा देतात, असें वाटून त्यांची आराधना सुरू झाली. याच पद्धतीने नद्या, पर्वत, चंद्र, सूर्य इत्यादि मोठ्या वस्तूंत आपल्या मृत आप्तांनी मरणोत्तर प्रवेश केला असेल, असा विश्वास उत्पन्न होऊन त्यांची पूजा करण्याचा प्रघात पडला असावा. रानटी लोक आपल्याहून श्रेष्ठ असा मनुष्य दिसला की त्याला देव मानतात व त्याला भिऊं लागतात. तो मेल्यानंतर त्याचें पिशाच तर अधिकच भीतिदायक ठरतें. त्यामुळे त्याला कांही तरी देऊन संतुष्ट ठेवण्याची प्रथा सुरू होते. आगरकर म्हणतात, " मृत आप्तांच्या पिशाचांनी आपणा-वर कुपित न होतां आपली कृपादृष्टि सदैव चालू ठेवावी आणि पोरांबाळांस त्रास देऊं नये हें सारें श्राद्धविधीच्या व पितृतर्पणाच्या बऱ्याच भागांचें गुह्य आहे." अशा प्रकारे पिशाच-कल्पनेंतून देवतांची कल्पना निघाली आहे, असें सांगून आगरकर म्हणतात, " ज्या उपायांनी व कृतींनी रानटी व अर्धवट सुधारलेलीं माणसें आनंद

पावतात, त्याच उपायांनी व कृतींनी देवताहि आनंद पावत असतील, असा आमचा भरवसा ठरून गेल्यामुळे आमच्यांतील अज्ञ लोकांचा पूजाविधि अत्यंत उपहासास्पद झाला आहे. सांब हा थेट पिशाचवर्गांतून देववर्गांत आला असल्यामुळे त्याचें रूप आणि त्याची पूजाहि पिशाचाचें रूप आणि पूजा यांसारखीं झालीं आहेत."

राजा हा फार पराक्रमी व सर्वसत्ताधीश असल्यामुळे लोक त्याला मोठा मान देत आले आहेत. स्वार्थसाधु लोकांनी तर त्याला देवाचा अंश किंवा साक्षात् देवच ठरविलें. जिवंत राजाविषयी अशी कल्पना असल्यामुळे तो मेल्यावर महादेव ठरतो; आणि त्याला प्रसन्न करण्यासाठी त्याची विशेष प्रकारे पूजा करावी लागते.

देवाची कल्पना प्रथम पिशाच-कल्पनेपासून निघाली असावी, असें स्पेन्सरने अनेक प्रमाणांनी सिद्ध करून दाखविलें आहे. आगरकरांच्या मतें हिंदूंचा महेश किंवा शंकर हा देव अशा प्रकारचें उत्तम उदाहरण आहे. सृष्टीचा संहार करणें हें त्याचें काम. त्याच्या भक्तांनी शंकराचें जें वर्णन केलें आहे, तें त्या संहारकार्याला साजेसें उग्र आहे. चितेंतली राख अंगाला लावणें, मेलेल्या पशूचें ओलें कातडें अंगावर घेणें, गळ्यांत नररुंडमाला धारण करणें, वेताळाबरोबर नाचणें असें त्याचें रूप भक्तिभावाने वर्णिलें जातें. त्यावरून महादेव हा एक महापिशाच आहे यांत संशय नाही.

मृतात्मे, पिशाच व देव हीं नांवें मात्र भिन्न आहेत; बाकी त्यांची मूळ प्रकृति एकच आहे, हा सिद्धान्त सांगितल्यावर आगरकरांनी, देवळें हीं थडग्यांपासून झालीं आहेत, असेंहि सांगितलें आहे. पूर्वी प्रेतें पुरण्याची चाल होती, तशी अजूनहि आहे. कांही जातींचे लोक व जंगम, गोसावी, वगैरे पंथांचे अनुयायी प्रेतें पुरतात, व त्या जागीं थडगीं बांधतात. प्रेतांचें दहन करणारे लोकहि मृत मनुष्याची समाधि बांधतात. थडगें किंवा समाधि हें पिशाचाचें निवासस्थान असतें. पिशाचाचा देव झाला की त्याची समाधि म्हणजे देवालय ठरतें.

मूर्तिपूजेचा उगम पिशाच-कल्पनेंतूनच झालेला आहे, असें आगरकरांचें मत आहे. ते म्हणतात, "मूळ वस्तूचे गुण तिच्या प्रतिमेंत उतरतात हाच ग्रह प्रधानतः मूर्तिपूजेच्या मुळाशीं आहे. प्रथमावस्थेंतील लोकांना प्रकृति व तिची प्रतिकृति यांतील भेद न समजल्यामुळे, लहान मुलांप्रमाणे, एकीचे गुण दुसरींत उतरतात असा त्यांचा समज होतो; आणि म्हणून त्यांना असें वाटतें की, जर मृत मनुष्याच्या थडग्यावर त्याची प्रतिमा ठेविली तर तींत त्याचें पिशाच शिरेल." अशा प्रतिमांची आराधना व पूजा करून त्यांना तेल, पीठ वगैरे पदार्थ चोपडण्याची चाल सर्वत्र आढळते. अडाणी लोक दगडाला, थडग्याला तेल व शेंदूर लावून त्याची पूजा करतात, त्याला अन्नाचा वा मद्य-मांसाचा नैवेद्य दाखवतात; यांतूनच म्हसोबा, पिरोबा, खंडोबा, इत्यादि देव जन्माला आले आहेत. सारांश, अज्ञान व अप्रबुद्धता यांतून मूर्तिपूजा उदय पावली आहे.

**आचार-प्रकरण**

माणसांचा समूह एकत्र नीटपणें नांदायला हवा असेल, तर त्यांच्या वागण्या-वर बंधनें घालावीं लागतात. परस्परांशीं वागण्याचीं हीं जीं बंधनें वा नियम त्यांनाच आचारपद्धति म्हणतात. अशा नियमांची समाजाला फारच आवश्यकता असते. त्यांच्यावांचून समाज चालावयाचा नाही. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत त्यांतील घटकांच्या अज्ञानामुळे, भीतीमुळे किंवा दुराग्रहामुळे, कार्यकारण न कळल्यामुळे अनेक प्रकारचे अंध, तर्कशून्य आचार रूढ होतात. पूर्वी युरोपांत अशा प्रकारचा आचारधर्म रूढ होता व आपल्याकडे तो अजूनहि चालू आहे; पण ज्ञानाच्या प्रसारा-मुळे हीं आचारबंधनें शिथिल होऊं लागतात व वेडेपणाच्या आचारांचा लोप होतो. हीच सुधारणेची दिशा होय. शास्त्रांची प्रगति झाली, कार्यकारणभाव कळूं लागला की धर्मकल्पना उन्नत होतात. बुद्धीचा विकास झाला की प्राथमिक व पौराणिक कल्पना मिथ्या भासूं लागतात, असंख्य देवतांची पूजा करणें अयोग्य वाटूं लागतें, आणि सर्व ब्रह्मांडास उत्पन्न करून त्याचें परिपालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो.

ज्ञानाच्या प्रसारामुळे व बुद्धीच्या विकासामुळे आचारधर्माचें स्तोम कमी होतें, त्याचप्रमाणे नीति व सदाचार हाच खरा धर्म होय हें कळूं लागतें. अज्ञानाचा निरास करून लोकांना अशा धर्माची शिकवण द्यावी, याच हेतूने आगरकर पाश्चात्त्य सुधारणेच्या तत्त्वांची सतत चर्चा करीत होते. " त्यामुळे तुमच्या धर्माचारांत प्रचंड क्रांति होऊन तुमचें वर्तन पराकाष्ठेचें साधें व फक्त नीतीच्या नियमांनी चालणारें असें होईल; संध्या, ब्रह्मयज्ञ, श्रावण्या, श्राद्धें, वगैरे चालू धर्माचार पूर्णपणें लयास जाऊन त्यांच्या जागीं अधिक उपयुक्त व समंजसपणाचे आचार प्रचारांत येतील; आणि सत्यपरायणता, न्यायरति, परोपकृति व शहाणपणा, इत्यादि सद्गुणांची वृद्धि होऊन लोकांना आतापेक्षा शतपट अधिक सुख मिळूं लागेल. " असा त्यांना विश्वास वाटत होता.

आपल्या धार्मिक संस्थांची अशी ऐतिहासिक चिकित्सा केल्यानंतर आगरकरांनी राजकीय व सामाजिक संस्थांची व आचारांचीहि चिकित्सा केली आहे; आणि या दोन्ही क्षेत्रांत मनुष्यसुधारणेचा ओघ कोणत्या दिशेने वाहत आहे तें दाखविलें आहे. या दोन्ही विषयांत बलात्काराकडून संमति-तत्त्वाकडे जगाची वाटचाल होत आहे, सर्व सुधारलेले देश त्या दिशेने निघाले आहेत, असें त्यांनी प्रतिपादिलें आहे.

**राजकीय**

मनुष्याचा रानटीपणा कमी होऊन तो समाज बनवून राहूं लागला की त्या समाजांत राजा व प्रजा किंवा शास्ता व शासित असे दोन वर्ग उत्पन्न होतात. समाज-व्यवस्थेसाठी अशा राजसत्तेची फारच आवश्यकता असते; कारण तीवांचून समाजाचें अस्तित्वच फार काळ टिकणार नाही. रानटी लोकांचाहि एक राजा असतोच व

त्याची सत्ता अनियंत्रित असल्यामुळे तो बहुधा फार जुलमी असतो; पण सर्वांनी परस्परांना मारण्यापेक्षा एकाचा जुलूम पत्करला. मनुष्य हा जात्या बलहीन असल्या-मुळे, राजाने कितीहि छळ केला तरी तो सोसून समाजांत राहण्यांतच आपलें हित आहे, असें त्याला वाटतें; कारण राजा पराक्रमी असतो व तो प्रजेचें संरक्षण करतो.

ज्याच्या अंगीं धैर्य, शौर्य, चातुर्य, इत्यादि गुण असतात तोच राजा होतो. लोक त्याला खूप मान देऊं लागतात व स्वार्थसाधु स्तुतिपाठक त्याला देवच म्हणूं लागतात. हळूहळू राजाहि स्वतःला देव मानूं लागतो. तो निरंकुश असल्यामुळे लोक त्याचा जुलूम सहन करतात. त्यामुळे तो अधिकच जुलमी होतो. दुबळी प्रजा त्यांचा प्रतिकार करूं शकत नाही; पण मोठमोठ्या सरदार-कुळांवर जर राजाने जुलम केला, व तो असह्य झाला, तर तीं कुळें प्रतिकारास सिद्ध होतात आणि प्रजेच्या मदतीने राजाविरुद्ध उठाव करतात. अशा संघर्षांत सरदारांचा जय झाला, तर राजसत्ता नष्ट होऊन तिच्या जागीं सरदार-कुळांची सत्ता स्थापन होते. कालांतराने हे सरदारहि सत्तेमुळे मदांध होऊन प्रजेवर जुलूम करूं लागतात. तो जुलूम असह्य झाला व लोक संघटित होऊं शकले, तर ते सरदारांची सत्ता नष्ट करून स्वतःची सत्ता स्थापन करतात,

अशा प्रकारे राजसत्ता नष्ट होऊन तिच्या जागीं लोकांची सत्ता प्रस्थापित व्हायची असेल, तर त्यासाठी लोकांच्या ठायीं तेवढें सामर्थ्य असलें पाहिजे. प्रबळ राजसत्ता किंवा सरदारांची सत्ता उलथून टाकण्यांत युरोपांतील लोक यशस्वी झाले आहेत; पण आम्ही हिंदु लोक किंवा मुसलमान, चिनी यांच्यांत तें सामर्थ्य नाही. त्यामुळे जुलूम असह्य झाला की ते थोडीशी धडपड करतात; आणि फिरून गुलाम-गिरी पत्करतात. अज्ञान, अंधश्रद्धा, तर्कशून्य बंधनें यांमुळे हे समाज दुबळे झाले आहेत. त्यांना पाश्चिमात्य ज्ञानामृत पाजून त्यांच्यांत प्रथम चैतन्य आणलें पाहिजे, अशी आगरकरांची धारणा होती. म्हणून त्या वेळच्या लोकनेत्यांना त्यांनी बजावलें आहे की, "ज्या उपायांनी राजसत्ता लोकांच्या हातीं येईल ते आपण करीत असलों म्हणजे आपलें कर्तव्य झालें, असें समजून स्वस्थ बसतां कामा नये; तर ज्या उपायांनी राजसत्ता (स्वराज्य) प्राप्त झाली असतां तिचें संरक्षण व तिचा सदुपयोग करतां येईल, असें शिक्षण त्यांस अगोदर दिलें पाहिजे."

अनियंत्रित राजसत्ता म्हणजे जुलूम, जबरदस्ती, सक्ति. यालाच आगरकरांनी बलात्कार म्हटलें आहे. अशी राजसत्ता जाऊन तिच्या जागीं लोकांची सत्ता येणें याचाच अर्थ बलात्काराकडून संमति-तत्त्वाकडे वाटचाल होणें असा आहे. व्यक्ति-स्वातंत्र्य ही याच्याच पुढची पायरी होय.

## सामाजिक

सामाजिक व्यवहारांतहि बलात्काराकडून म्हणजे सक्तीच्या तत्त्वाकडून संमति-तत्त्वाकडे मार्गक्रमण चालू आहे. "आमचें काय होणार" या लेखांत

आगरकर म्हणतात. " जों जों मनुष्यांची सुधारणा होत जाते तों तों त्यांच्या अन्योन्य व्यवहारांतील बलात्काराचें तत्त्व लयास जाऊन त्याच्या जागीं संमति-तत्त्व प्रस्थापित होतें, व या कारणास्तव येथून पुढे राजा व प्रजा, कुलाधिपति व कुलावयव, पति व पत्नी, मातापितरें व अपत्यें, स्वामी व सेवक, गुरु व शिष्य, विक्रेता व ग्राहक यांतील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्काराने न होतां संमतिपूर्वक होत जाणार आहेत. "

मनुष्याचें शरीर व समाज यांच्यांत बरेंच साम्य आढळतें. समाजाला शरीराची व त्यांतील व्यक्तींना अवयवांची उपमा नेहमी दिली जाते. ज्याप्रमाणे शरीराचे निरनिराळे अवयव वेगवेगळीं कामें करीत असले तरी, ते एकमेकांवर अवलंबून असतात व एकमेकांना मदत करीत असतात; त्याचप्रमाणे समाजाचे अवयव म्हणजे व्यक्ति एकमेकांवर अवलंबून असतात व एकमेकांना मदत करीत असतात. शरीराचे अवयव असें सहकार्य न करतील तर शरीर-व्यापार चालणार नाहीत; तसेच व्यक्तींच्या सहकार्यावांचून समाजव्यवस्था टिकणार नाही, हें खरें आहे.

पण समाज व मानवी शरीर यांच्या रचनेंत फार फरक आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्तीला मन असतें, वेगळें ज्ञान असतें, संवेदना असते, स्वतःची इच्छा असते. त्यामुळे व्यक्तीला स्वतंत्रपणें सुखदुःखाचा अनुभव घेतां येतो. तसें शरीरांतील अवयवांचें नसतें. त्या प्रत्येक अवयवाला वेगळें मन नसतें, व त्यासर्वांचे व्यापार त्या व्यक्तीच्या सुखासाठी चालू असतात. व्यक्तीचें जें सुख तेंच तिच्या अवयवांचें सुख होय; पण समाज हा काल्पनिक पुरुष आहे. म्हणून हें ध्यानांत ठेवलें पाहिजे की, समाजाचें कल्याण म्हणजे त्याच्या अवयवांचें, त्यांतील व्यक्तींचें कल्याण होय; तेव्हा समाजाच्या हितासाठी व्यक्तीच्या सुखाचा बळी दिला तरी चालेल असें म्हणणें भ्रामक आहे, कारण व्यक्तींच्या हिताहून निराळें असें समाजाचें हित नसतें.

तथापि बरेच पंडित, समाजाच्या हितासाठी व्यक्तींच्या हिताकडे दुर्लक्ष केलें तरी चालेल, असें मानतात. त्यांच्या म्हणण्याचा खरा भावार्थ असा असतो की, समाजांतील कांही लोकांच्या कल्याणासाठी इतरांच्या हिताकडे दुर्लक्ष करावें लागतें. देशाच्या राजाचें किंवा वरिष्ठ वर्गाचें जें कल्याण तें साऱ्या समाजाचें कल्याण असाहि अर्थ कांही लोक करतात. ज्या समाजांत अशा संकुचित दृष्टीने वर्तन होत असतें, त्यांत एक सत्ताधारी, श्रीमंत वर्ग व दुसरा हीन-दीन, दलित वर्ग, अशी विभागणी झालेली असते. ही विषमता नष्ट होऊन सर्वांना शक्य तितकें समान सुख मिळणें हें समाजाच्या सुधारणेचें व प्रगतीचें लक्षण होय. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत बहुतेक व्यवहार बलात्काराने होत असतात; आणि म्हणून त्याच्या सर्व अवयवांस सुखाचा सारखा वांटा मिळत नाही. तो मिळूं लागल्यास ते व्यवहार समाजघटकांच्या अन्योन्य संमतीने होऊं लागले पाहिजेत. पाश्चात्त्य जगांत सध्या हें घडूं लागलें आहे. म्हणजेच संमति-तत्त्व प्रस्थापित होऊं लागलें आहे.

त्यानंतर आगरकरांनी पति-पत्नीसंबंधाचा विचार केला आहे. त्यांच्या मतें पाश्चिमात्य देशांतील गृहस्थिति व विवाहप्रथा अगदी निर्दोष नसली तरी, भारतीय विवाहपद्धतीपेक्षा पुष्कळ चांगली व अनुकरणीय होती. हिंदुस्थानांत पूर्वी तीन लग्न-पद्धति चालू होत्या. पुरुषांनी स्त्रियांना जिकून किंवा पळवून आणून त्यांच्याशीं लग्न करणें ही एक प्रथा; बापाकडून मुली विकत घेणें ही दुसरी; व स्त्री-पुरुषांनी एक-मेकांना पसंत करून लग्न करणें ही तिसरी होय. पहिली प्रथा आदिवासी लोकांत अजूनहि थोडीबहुत आढळते. दुसरी पद्धत देशांत सर्वत्र चालू आहे. तिसरी मात्र आज अनेक शतकें आपल्याकडे चालू नाही. वधूला वर व वराला वधू पसंत पडून त्यांचा विवाह होणें हा प्रशस्त प्रकार केवळ पुराणांत व संस्कृत नाटकांत वाचायला मिळतो. पूर्वी स्वयंवराची चाल होती, पण ती आता मुळीच रूढ नाही. पूर्वी केव्हा तरी एका स्त्रीने अनेक पति करण्याची चालू होती, असें द्रौपदीच्या उदाहरणावरून दिसतें. बहुभार्यात्व तर या देशांत अजूनपर्यंत चालू आहे. यावरून आमच्याकडे स्त्री-पुरुषसंबंध बलात्कार-तत्त्वावर चालत होते हें सिद्ध होतें. संमति-तत्त्वास अनुसरून विवाह होऊं लागले म्हणजे एकपत्नीकत्वच स्थापित झालें पाहिजे. बालविवाहाची प्रथा म्हणजे लहान मुलामुलींचा विक्रय करण्याचा हक्क आईबापांना असतो याचेंच चिन्ह होय. विषमविवाह, स्त्रीचें दास्य, इत्यादि गोष्टी अत्यंत शोचनीय असून, त्यांत बलात्काराचा पुष्कळ भाग आहे. पाश्चात्त्य लोकांत ज्याप्रमाणे परस्परांच्या संमतीने विवाह होतात व एकपत्नीकत्व रूढ झालें आहे, तसें आपल्याकडे व्हायला हवें. आणि नवीन शिक्षणामुळे बलात्कारतत्त्व मागे पडून त्या जागीं संमति-तत्त्व स्थापित होईल अशीं चिन्हें आगरकरांना दिसुं लागलीं होतीं.

त्यानंतर आगरकरांनी कुटुंब-संस्थेचा विचार केला आहे. भारतांत प्राचीन काळीं श्रेष्ठायत्त कुटुंब-पद्धति प्रचलित होती. त्या पद्धतींत कुलपतीचा म्हणजे कुटुंब-प्रमुखाचा अधिकार फार मोठा असे. कुटुंबांतील सर्व माणसांवर त्याची अनिर्बंध सत्ता चालत असे. त्यांतील कोणीहि मिळविलेल्या धनाची व्यवस्था करण्याचा अधि-कार त्याला होता; कोणालाहि तो हवी ती शिक्षा करूं शकत असे. म्हणजे कुटुंब-व्यवस्था बलात्कार-तत्त्वाने चालत होती.

अशा प्रकारची श्रेष्ठायत्त कुटुंब-व्यवस्था आर्य लोकांत सुरू होण्यापूर्वी त्यांची अवस्था पारध करून जगणाऱ्या वनचरांप्रमाणे असली पाहिजे. तशा अवस्थेंत आयुष्य कंठणाऱ्या लोकांत श्रेष्ठायत्त कुटुंब-पद्धतिहि आढळत नाही. ते लोक पशुपालन करूं लागले म्हणजे मग ती पद्धति त्यांच्यांत सुरू होते. पाळलेल्या गुरांची जोपासना संरक्षण, गवतचाऱ्याची व्यवस्था, दूधदुभतें वगैरे कामें कुटुंबांतील निरनिराळ्या माणसांकडे सोपविलेलीं असतात; आणि तीं नीटपणें करून घेण्यासाठी मुख्य माण-साला सर्वांवर अधिकार गाजवावा लागतो. इतर कुटुंबांशीं भांडण व मारामारी करण्याचा प्रसंग आला तर तोच पुढाकार घेतो. पुढे तेच लोक शेती करूं लागले तरी

तीच कुटुंब-पद्धति त्यांच्यांत चालू राहते. त्यानंतर समाज व्यापार व उद्योगधंदे करूं लागतो. या अवस्थांतराबरोबरच समाजाची सुधारणा होत असते. त्यामुळे कुटुंब-व्यवस्थेंतहि बदल होत जातो; आणि सर्व व्यवहार संमति-तत्त्वावर होऊं लागतात.

आपल्या काळीं हिंदु-समाजांत रूढ असलेल्या धर्मकल्पना, सामाजिक रूढि व आचार यांचें मूळ कशांत आहे व त्या कल्पनांना व आचारांना कवटाळून बसणें किती असमंजसपणाचें आहे तें लोकांच्या निदर्शनास आणण्यासाठी आगरकरांनी धर्म, राजकारण व रूढ सामाजिक आचार यांची ही ऐतिहासिक चिकित्सा केली आहे. आपले सर्व आचार परमेश्वरप्रणीत आहेत व भावी उत्कर्ष त्यामुळेच होणार आहे हा भ्रम नाहीसा व्हावा व लोक, सुधारणेला, पाश्चात्त्य सुधारणेच्या तत्त्वांच्या स्वीकाराला, उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतु होता. हीं तत्त्वें विशिष्ट काळापुरतींच नसून, मनुष्यसुधारणेचीं सर्व इतिहासांत दिसून येणारीं तत्त्वें तीं हींच आहेत, हा सिद्धान्तहि त्यांनी या उद्देशानेच मांडला. यायोगे आपली धर्मव्यवस्था, समाजरचना, कुटुंब-संस्था व विवाह-संस्था यांतील बलात्कार-तत्त्व नष्ट होऊन सर्वत्र संमति-तत्त्व स्वीकारलें जाईल अशी त्यांना आशा होती.

-४-

# सुधारणा — अग्रक्रम व मार्ग

मानवी समाजांत सर्वच क्षेत्रांत स्थित्यंतर झालें पाहिजे, त्यावांचून समाजाची उन्नति होणार नाही, असा सिद्धान्त सांगून आगरकरांनी त्या स्थित्यंतराचीं मूलतत्त्वें कोणतीं याची सविस्तर चर्चा केली; तिचा परामर्श आपण मागील प्रकरणांत घेतला. आता सुधारणांच्या अग्रक्रमाविषयी त्यांचीं काय मतें होतीं याची चर्चा करावयाची आहे.

## सर्वांगीण सुधारणा

पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारामुळे भारतांत मन्वंतर कसें झालें तें आपण मागे पाहिलें आहे. राजा राममोहन राय, लोकहितवादी, रानडे, वगैरे सुधारणावादी पुरुषांनी तें घडवून आणलें. त्यांनी सर्वांगीण सुधारणेचा पुरस्कार केला होता. केवळ सामाजिक व धार्मिक सुधारणा होऊन भागणार नाही, राजकीय व आर्थिक सुधारणाहि व्हायला हव्या, असें त्यांनी प्रतिपादिलें आहे. लोकहितवादींनी तर एका पत्रांत हिंदी पार्लमेंटची स्थापना करावी असें सुचविलें आहे. गेल्या शतकांत स्थापन झालेल्या 'बाँबे असोसिएशन', 'ब्रिटिश इंडिया असोसिएशन', 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन' इत्यादि संस्था राजकीय सुधारणांचा पुरस्कार करण्यासाठीच होत्या.

तथापि त्या सुधारणावादांत राजकीय सुधारणेला दुय्यम स्थान होतें, तिचें स्वरूप प्राथमिक होतें. तिच्या पुरस्कर्त्यांच्या मनांत स्वराज्याची कल्पनाहि नव्हती. इंग्रजी राज्य म्हणजे परमेश्वरी योजनाच आहे, असें त्यांना वाटत होतें. त्यांतच समाजाचें कल्याण होईल अशी त्यांची अपेक्षा होती आणि म्हणून त्यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांवर विशेष भर दिला. त्या सुधारणासुद्धा इंग्रजांकडूनच घ्यायच्या, त्यांचेंच अनुकरण करून समाजाला नवें वळण लावायचें, असाच सुधारणावाद्यांचा

विचार होता. ते इंग्रजांना आपले गुरु व पालक मानीत होते; कारण पाश्चात्त्य विद्येमुळेच त्यांना सुधारणेचा मार्ग दिसूं लागला होता.

**विष्णुशास्त्री**

पण इंग्रजी राज्याचें रूप हळूहळू पालटूं लागलें. दुष्काळ, हलाखी, बेकारी, या संकटांनी सारा देश ग्रस्त झाला. त्यामुळे तत्कालीन तरुणांना त्यांतील ईश्वरी योजनेचें सूत्र दिसेनासें झालें. उलट पारतंत्र्य ही एक महान् आपत्ति आहे असें त्यांना वाटूं लागलें व इंग्रज हे आपले गुरु व पालक नसून या राष्ट्राचे शत्रु आहेत अशी त्यांची खात्री होऊं लागली. तरुणांची ही भावना स्पष्टपणें व निर्भीडपणें व्यक्त करून लोकांमध्ये स्वातंत्र्याची आकांक्षा जागृत करणारा पहिला नेता म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर हा होय. त्यांनी महाराष्ट्रीयांच्या मनांत स्वत्वजागृति कशी केली याचें सविस्तर विवेचन आपण पूर्वी केलेंच आहे. ही जागृति करतांना त्यांनी पारतंत्र्यामुळेच आपलें वैभव व सुख नष्ट झालें असून, परकीय सत्ता हेंच आपल्या दैन्याचें मुख्य कारण होय, असें ठामपणें प्रतिपादिलें; आणि प्रथम स्वराज्य मिळविलें तरच देशाची उन्नति होईल हा विचार प्रस्थापित केला; आणि यांतूनच सुधारणांच्या अग्रक्रमाविषयी प्रथम महाराष्ट्रांत आणि नंतर सर्व भारतांत वाद निर्माण झाला. विष्णुशास्त्री सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या विरुद्ध नसले तरी त्यांचा आत्मीयतेने त्यांनी पुरस्कार कधी केला नाही. उलट त्या सुधारणांचा आग्रह धरणारांचा त्यांनी सदैव उपहासच केला. कारण पारतंत्र्य हेंच आपल्या अधोगतीचें मूळ कारण आहे, असें त्यांना वाटत होतें. आगरकरांचें मत बरोबर याच्या उलट होतें. सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत आपलें तत्त्वज्ञान व आचार-विचार अत्यंत प्रतिगामी व घातक असल्यामुळेच आपली अवनति झाली व त्यामुळेच आपल्याला पारतंत्र्य आलें असा त्यांचा बुद्धिनिश्चय होता. विष्णुशास्त्री यांना ते येऊन मिळाल्यानंतर एक-दोन वर्षांतच विष्णुशास्त्री यांचा काळ झाला. त्यामुळे त्यांच्यांतील मतभेद विकोपाला गेले नाहीत. नाही तर ते गेलेच असते. लोकमान्य टिळकांशीं त्यांचें पुढे वितुष्ट आलें हें प्रसिद्धच आहे. याची सविस्तर चर्चा पुढे येईलच. येथे एवढेंच ध्यानांत घ्यावयाचें की, सुधारणांचा अग्रक्रम हा विषय त्या वेळीं अत्यंत महत्त्वाचा होता. भारताच्या नेत्यांमध्ये दुफळी व्हावी इतकें त्याला त्या वेळीं महत्त्व होतें.

याच सुमाराला काँग्रेसची स्थापना झाली व 'आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा' या वादाचें लोण तेथेहि पोचलें. काँग्रेस ही प्रामुख्याने राजकीय सुधारणांसाठीच स्थापन झाली होती. त्यामुळे तिच्या व्यासपीठावरून राजकीय सुधारणांचा पुरस्कार व्हावा हें साहजिक होतें; पण तिच्यांतील बहुतेक लोक सामाजिक सुधारणांचा उपहास करीत हें आज विचित्र वाटतें. किती मुलींचे प्रौढविवाह झाले म्हणजे, किंवा किती विधवांचे विवाह झाल्यावर सरकार लोकांना राजकीय हक्क देईल, असें ते चेष्टेने विचारीत.

## तिचें धोरण

एकंदर काँग्रेसची वृत्ति अशी असली तरी, न्यायमूर्ति रानडे यांच्यासारखे विचारी लोकहि काँग्रेसमध्ये होते. त्यांनी राजकीय सुधारणांबरोबर सामाजिक सुधारणांचाहि पुरस्कार केला; पण काँग्रेसमध्ये ती चळवळ न आणतां त्यांनी त्यासाठी स्वतंत्र अशी सामाजिक परिषद् ही संस्था स्थापन केली. काँग्रेसतर्फे सामाजिक सुधारणांची चळवळ न करण्याचें कारण उघड होतें. काँग्रेसमध्ये हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी इत्यादि सर्व धर्मांचे लोक होते, व त्या प्रत्येक धर्माच्या अनुयायांचे सामाजिक प्रश्न वेगळे होते. बालविवाह, विधवाविवाहबंदी हे प्रश्न ख्रिश्चन समाजांत नव्हते. पारशी, ख्रिश्चन या समाजांत स्त्री-शिक्षणाला तसा विरोध नव्हता. मुस्लिम समाज या सर्व दृष्टींनी फार मागासलेला होता, पण सामाजिक सुधारणेचें त्याला हिंदूंपेक्षाहि जास्त वावडें होतें. शिवाय दुसरें असें की, एका धर्माच्या सभासदाने अन्य धर्माच्या धार्मिक वा सामाजिक दोषांवर टीका करणें व त्यांत सुधारणा सुचविणें हें कोणालाच सहन झालें नसतें. स्वधर्मीयाने केलेली धार्मिक आचारावरची टीकाहि तेव्हा कोणाला रुचत नव्हती, मग अन्य-धर्मीयांची टीका कशी रुचणार ? पण काँग्रेसमध्ये तो विषय आल्यावर तशी टीका होणें अपरिहार्यच होतें. म्हणून राजकीय व आर्थिक विषयांखेरीज अन्य कोणतेहि विषय काँग्रेसमध्ये आणूं नयेत असा विचार सर्वांनीच संमत केला.

## वादाचें स्वरूप

पण काँग्रेसमध्ये सामाजिक सुधारणांचा प्रश्न आणला नाही तरी ती चळवळच करूं नये हें पुष्कळांना मान्य नव्हतें व त्यांनीच वर सांगितल्याप्रमाणे सामाजिक परिषदेची स्थापना केली होती; आणि प्रारंभीं काँग्रेसच्या मंडपांतच त्या परिषदेचें अधिवेशन भरत असे; पण त्यांतहि पुढे विरोध होऊं लागला. कारण सामाजिक सुधारणेला मुळांतच विरोध असणारा एक पक्ष त्या वेळीं निर्माण झाला होता. त्या पक्षाचीं मतें व विचारसरणी यांचें विवेचन मागे केलेलेंच आहे.

यांतच आणखी एका वादाची भर पडली. मलबारीशेठ या पारशी गृहस्थाने बालविवाह व असंमत वैधव्य या हिंदु समाजांतील रूढि कायद्याने बंद कराव्या, असा पक्ष मांडला व तशी चळवळहि सुरू केली. याची सतानत हिंदूंना दोन कारणांनी चीड आली. एका परधर्मीय गृहस्थाने आपल्या सामाजिक बाबतींत हस्तक्षेप करावा हें त्यांना सहन झालें नाही; आणि कायद्याने समाजसुधारणा करावी हेंहि त्यांना मान्य नव्हतें. त्यामुळे मूळ वादाला आणखी फाटे फुटले व उभय पक्षांत अत्यंत कटुता निर्माण झाली.

आगरकरांचा राजकीय सुधारणांना विरोध नसला तरी सामाजिक सुधारणा मागे पडाव्या हें त्यांना मान्य नव्हतें. सामाजिक सुधारणा झाल्यावांचून राजकीय सुधारणांना अर्थच प्राप्त होणार नाही, असें त्यांचें ठाम मत होतें. मागे आपल्याला

राजकीय स्वातंत्र्य होतें; पण सामाजिक व धार्मिक स्थिति असावी तशी नव्हती म्हणून तें स्वातंत्र्य गेलें, असें अनेक लेखांत त्यांनी म्हटल्याचें वर सांगितलेंच आहे. शिवाय कायद्यानें सामाजिक सुधारणा करण्यास त्यांचा मुळीच विरोध नव्हता. इतकेंच नव्हे तर कांही रूढि कायद्याच्या साह्यानेच तत्काळ नष्ट केल्या पाहिजेत, असें त्यांचें मत होतें. यामुळे सामाजिक सुधारणा आधी झाल्या पाहिजेत या पक्षाचा हिरिरीनें पुरस्कार करण्यासाठी त्यांनी लेखणी उचलली व आपल्या सर्व सामर्थ्यानिशी प्रतिपक्षावर हल्ला केला. या वादासंबंधी 'सुधारकां'त त्यांनी अनेक लेख लिहून विरुद्ध पक्षाचें खंडन व स्वमताचें मंडन केलें.

विरुद्ध पक्षाचें मत असें होतें की, आपण आपलें स्वातंत्र्य पुन्हा मिळविण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे. स्वातंत्र्य हें सर्वांनाच प्रिय असल्यामुळे तें मिळविण्याच्या बाबतींत लोकांमध्ये मतभेद असण्याचा संभव नाही. त्यामुळे सर्व लोक संघटितपणें तसा प्रयत्न करतील, असें त्या पक्षाच्या पुढाऱ्यांना वाटत होतें. सामाजिक सुधारणांच्या बाबतींत मात्र मतभेदाला बरीच जागा होती; किंबहुना सुधारणेला विरोध करणारेच फार लोक होते. त्यामुळे समाजांत कलह उत्पन्न होऊन, स्वातंत्र्यासाठी जे संघटित प्रयत्न व्हायला हवेत ते होणार नाहीत असें भय त्या पक्षाला वाटत होतें. म्हणून सामाजिक सुधारणेच्या मागे न लागतां आधी एकदिलाने स्वातंत्र्यासाठी चळवळ केली पाहिजे असें त्यांचें मत होतें.

## तीन पक्ष

या प्रश्नाविषयी अनेक निरनिराळीं मतें प्रचलित होतीं. शरीराच्या अवयवांचे दृष्टान्त त्या त्या मतांच्या पुष्टीसाठी सांगितले जात. कांही लोकांचें असें म्हणणें होतें, की शरीराचे व्यापार नीट चालण्यासाठी ज्याप्रमाणें मेंदूचें कार्य व्यवस्थित चालायला हवें, त्याप्रमाणे समाजशरीर नीट चालण्यासाठी त्याच्या मेंदूच्या जागीं असणारी राज्यव्यवस्था चांगली असायला हवी; म्हणून राजकीय सुधारणा प्रथम हातीं घेतली पाहिजे. दुसऱ्या कांही लोकांच्या मतें शरीराचें आरोग्य हृदयाच्या बळकटीवर अवलंबून असतें आणि धर्म म्हणजे समाजपुरुषाचें हृदयच होय; म्हणून समाजाच्या स्वास्थ्यासाठी धर्मसंशोधन हें आपलें आद्य कर्तव्य होय. आणखी कांही लोकांचें म्हणणें असें की, शरीरांत पचनेंद्रियांचें स्थान श्रेष्ठ आहे, अन्नाचें पचन होऊन सर्व शरीराचें पोषण करणारा द्रव उत्पन्न होतो तो पचनेंद्रियामुळे, आणि समाजरूपी शरीरांत तेंच महत्त्वाचें कार्य गृहाचार किंवा कुटुंबव्यवस्था करीत असते. कुटुंबव्यवस्था जितकी चांगली असेल तितकी समाजव्यवस्थाहि चांगली राहते; म्हणून प्रथम कुटुंबस्थिति सुधारली पाहिजे. अशा प्रकारे कोणी राजकीय, कोणी धार्मिक, तर कोणी सामाजिक सुधारणेला अधिक महत्त्व देतात. न्या. तेलंग यांनी सामाजिक सुधारणेच्या अगोदर राजकीय सुधारणा झाली पाहिजे, असें प्रतिपादिलें होतें. युरोपांतले बरेच विद्वान् त्याच मताचे होते. उलट धर्मसुधारणा अधिक

महत्त्वाची मानणारेहि पुष्कळ पंडित तिकडे होते. त्यांच्या मतें सोळाव्या शतकांत युरोपांत जी धर्मक्रांति झाली, तिच्यामुळेच तो देश विलक्षण सुधारला. त्या धर्मक्रांतीसाठी अनेक विचारी पुरुषांनी पुष्कळ यातना भोगल्या, पण आपला निश्चय ढळूं दिला नाही. त्यांच्या त्या दृढ निश्चयामुळेच अलीकडील बहुतेक राजकीय सुधारणा झाल्या आहेत.

या तीन पक्षांत आगरकरांना मान्य असा पक्ष म्हणजे गृहसुधारणा ज्यांना सर्वश्रेष्ठ वाटते अशा विद्वानांचा. त्यांच्या मतें कुटुंबें म्हणजे राष्ट्राचे मुख्य घटक असल्यामुळे त्यांची सुधारणा झाल्यांवाचून राष्ट्राची सुधारणा किंवा राजकीय सुधारणा होणें शक्य नाही. आगरकरांना ही विचारसरणी मान्य होती. ते म्हणतात, "ज्या देशांतील कुटुंबांत गुलामगिरी व क्रौर्य यांचा अंमल जारीने गाजत आहे, त्या देशांतील राज्यपद्धतींत ते दुर्गुण पूर्णपणें प्रतिबिंबित झालेच पाहिजेत व त्यामुळे त्या राष्ट्रास विकलता आलीच पाहिजे." त्यांच्या मतें हिंदुस्थानांतली सामाजिक व धार्मिक स्थिति चांगली नव्हती म्हणूनच समाज दुर्बल झाला व त्याचें स्वातंत्र्य नष्ट झालें.

## पारतंत्र्य अनुकूल

सामाजिक सुधारणेला आगरकरांनी अग्रक्रम दिला त्याचें आणखी एक कारण हें की, त्यांच्या मतें पारतंत्र्य हें अशा सुधारणांना जितकें अनुकूल असतें, तितकें स्वातंत्र्य नसतें. परकीय सरकार या देशांतील सामाजिक व धार्मिक सुधारणांविषयी उदासीन असतें; सुधारकांना तें प्रोत्साहन देत नाही किंवा विरोधहि करीत नाही. राजकीय सुधारणांच्या बाबतींत मात्र तें जागरूक असतें; आणि प्रसंग पडेल तेव्हा त्यांना कसून विरोध करतें. स्वतंत्र देशांतील राज्यकर्ते व प्रजा यांचा धर्म एकच असल्यामुळे सरकारी अधिकारी सामाजिक व धार्मिक सुधारणांना बहुधा प्रतिकूल असतात; बहुतेक अधिकारी जुन्या मतांनाच अनुकूल असतात. त्यामुळे स्वतंत्र देशांत नवीन विचार प्रसृत करणें व नवे आचार रूढ करणें फार कठीण असतें.

पण गेल्या शतकांत भारताच्या समाजस्थितीसंबंधी इंग्रजांनी जें धोरण अवलंबिलें होतें, त्यावरून आगरकरांचें वरील मत बरोबर दिसत नाही. पाश्चात्त्य विद्यांचा भारतांत प्रसार होऊन येथील लोकांची सामाजिक उन्नति व्हावी यासाठी कित्येक इंग्रज अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले. ते कौटुंबिक व स्त्रीविषयक सुधारणांना अनुकूल होते. सतीची चाल इंग्रजांनीच बंद केली; पण जातिभेद, अस्पृश्यता, उच्चनीचत्व, हे सामाजिक दोष नाहीसे करणें इंग्रजांच्या हिताचें नसल्यामुळे त्यांनी तसा प्रयत्न केला नाही; उलट ते वाढवण्याचाच प्रयत्न केला. फोडा व झोडा हीच त्यांची नीति होती. हिंदु समाजांतील भेद जेवढे विकोपाला जातील तेवढे त्यांना हवे होते. हिंदु-मसलमानांचे दंगे होऊन, त्यांची एकजूट होणें अशक्य ठरावें अशीच त्यांची इच्छा होती. देशांतील जनतेंत जितकी यादवी वाढेल तितकें तिच्यावर राज्य करणें सोपें

जाईल, असा त्यांचा हिशेब होता. त्यामुळे ते सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या बाबतींत उदासीन होते, असें म्हणतां येणार नाही.

दुसरें असें की, इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, जपान इत्यादि देश स्वतंत्र असूनहि त्या देशांतील सामाजिक व धार्मिक सुधारणांना राज्यकर्त्यांनी विरोध केला नाही. तेव्हा या सुधारणांना स्वातंत्र्य प्रतिकूल असतें व पारतंत्र्य अनुकूल असतें, हें खरें नाही.

## अधिकार नाही

राजकीय सुधारणांच्या आधी सामाजिक सुधारणा कां केल्या पाहिजेत, हें सांगतांना आगरकर म्हणतात की, राजकीय सुधारणा मागण्याचा आपल्याला हक्कच नाही; कारण आपण स्त्री, शूद्र व अस्पृश्य यांना हीन लेखतों. त्यांच्या जीवनावर आपण असंख्य निर्बंध लादले आहेत, म्हणजे त्यांना दास्यांत ठेवलें आहे, हा त्यांच्यावर फार मोठा अन्याय केला आहे. स्वतःच्या बांधवांवर अन्याय करणाऱ्यांना दुसऱ्याजवळ न्याय मागण्याचा अधिकार नाही. महाराची सावली पडली असतांहि विटाळ मानणारे लोक "रंगावर कांही मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाही," असें उच्चरवाने प्रतिपादून गोऱ्या लोकांसारखा दर्जा आपल्याला मिळावा, असें म्हणूं लागले, तर त्याला कोणीहि किंमत देणार नाही. गोऱ्या लोकांकडून समान वागणूक मिळायला हवी असेल तर आपणहि अस्पृश्यांना समानतेने वागवलें पाहिजे. याचाच अर्थ असा की, सामाजिक सुधारणा आधी केल्या पाहिजेत.

## खरें मत

राजकीय सुधारणांच्या आधी सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत असा जरी आगरकरांचा आग्रह असला, तरी सर्व सुधारणा एकदमच व्हाव्या, असें त्यांचें खरें मत होतें. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत त्याचे राजकीय, सामाजिक व धार्मिक आचार फारसे भिन्न नसतात. त्या सर्व प्रकारच्या आचारांची सुधारणा होत जाते तेव्हाच तो समाज सुधारला, असें म्हणतां येतें. विकसित अवस्थेंतल्या समाजांत राजकीय, सामाजिक व धार्मिक असे भिन्न भिन्न आचार व नियम असले, तरी ते केवळ व्यवस्थेसाठी असतात. त्या सर्वांची एकसमयावच्छेदेकरून सुधारणा होत जाणें म्हणजेच तो समाज सुधारणें होय. भारतांत पाश्चात्त्य विद्येचा प्रसार झाल्यामुळेच सुधारणेचें वारें वाहूं लागलें. राजकीय सुधारणांसाठी राष्ट्रसभेची स्थापना झाली, तशी सामाजिक सुधारणांसाठी सामाजिक परिषद् अस्तित्वांत आली; पण जुन्या मताच्या लोकांना राष्ट्रसभेचें राजकीय कार्य जसें मान्य होतें, तसें सामाजिक परिषदेचें कार्य पसंत नव्हतें. रानडे, तेलंग प्रभृति नेत्यांना पाश्चात्त्य ज्ञानामुळे सर्वांगीण सुधारणेची महती पटली होती, आणि ते राजकीय सुधारणेप्रमाणेच सामाजिक सुधारणांचाहि पुरस्कार करीत होते. पण जीर्णमतवादी लोक त्यांच्या सामाजिक सुधारणांविषयक विचारांची टवाळी करीत. आगरकरांनी अशा लोकांची गणना मूर्खांत केली असून, त्यांना स्पष्ट इशारा दिला आहे की, त्यांनी कितीहि असंबद्ध

बंडबड वा टवाळी केली, सामाजिक सुधारणेला कितीहि विरोध केला तरी क्रांति अटळ आहे. ते म्हणतात, "हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढें कांही खरोखर निर्दोष आहे त्याला कशाचीहि भीति नाही; पण जें कांही सदोष व अहितकारक आहे तें सारें पाश्चिमात्य ज्ञानकुंडांत जळून खाक होणार."

सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिला पाहिजे, असा पक्ष अत्यंत हिरिरीने आगरकरांनी मांडला असला तरी तितक्याच हिरिरीने त्यांनी "राजकीय सुधारणा आधी झाल्या पाहिजेत," असाहि पक्ष मांडला आहे. 'फेरजमाबंदी व लष्करी खर्च' या सुधारकांतील लेखांत ( निबंधसंग्रह भाग ३ रा, पृ. ११५–१६ ) "सामाजिक सुधारणांपेक्षाहि राजकीय सुधारणा विशेष आवश्यक आहेत; म्हणून राजकीय सुधारणा सामाजिक सुधारणांच्या आधी झाल्या पाहिजेत. वास्तविक सुधारणांचा असा क्रम असतांना सरकार त्याचा व्युत्क्रम (उलटापालट) करूं पाहत आहे, ( व आमची दिशाभूल करीत आहे,) " असें निःसंदिग्ध प्रतिपादन त्यांनी केलें आहे. आचार्य जावडेकर यांनी 'आधुनिक भारत' या आपल्या ग्रंथांत वरील लेखांतील प्रदीर्घ उतारा देऊन (पृ. १५०–१५१) त्याविषयी विवेचनहि केलें आहे.

## बुद्धिपुरस्सर

या सर्व सुधारणा बुद्धिपुरस्सर केल्या पाहिजेत, असा आगरकरांचा आग्रह होता. कारण त्या सहजगत्या, कालौघाने होणार नाहीत, असें त्यांचें मत होतें. पाश्चात्त्य शिक्षण, लोकसंख्येंतील वाढ, प्रवास इत्यादि कारणांमुळे कांही थोडे बदल आपोआप घडून आले असले तरी, ते चिरस्थायी होण्याचा संभव नसतो; आणि महत्त्वाच्या सुधारणा अशा प्रकारे आपोआप होतहि नाहीत. परिस्थितीच्या प्रभावाने जें होईल तें पत्करणें यांत कांही पुरुषार्थ नाही; तर प्रयत्नपूर्वक वर्तनांतर घडवून आणण्यांत भूषण आहे. म्हणून आगरकरांनी तरुण सुशिक्षित लोकांना अशी विनंती केली आहे की, "तुम्ही कालावर व वस्तुस्थितीवर अवलंबिणें पुरें करून, ज्या सुधारणा तुम्हांस अत्यंत आवश्यक अशा वाटत आहेत त्या करण्याविषयी बुद्धिपूर्वक प्रयत्न करण्यास लागलें पाहिजे. जे लोक असें करीत नाहीत ते हळूहळू दैववादी बनून निरुद्योगी होत्साते क्षीण होत जातात व शेवटीं समूळ नष्ट होतात."

तरुणांना असें आवाहन करण्याचें कारण हें होतें की, या देशांत असमता वाढत चालली होती; तिची परमावधि होऊन समाजाची दुर्दशा होण्यापूर्वीच तिला आळा घालणें आवश्यक आहे, असें आगरकरांना वाटत होतें. वृद्ध किंवा जुन्या मतांच्या लोकांच्या हातून हें कार्य होणें शक्य नव्हतें; कारण त्यांचा सर्व सुधारणांना विरोधच असतो; म्हणून तरुणांनी हें कार्य अंगावर घ्यावें, असें त्यांचे म्हणणें होतें.

## कायद्याचें साह्य

अवश्य त्या सर्व सामाजिक सुधारणा लवकर घडवून आणण्यासाठी कायद्याची कास धरायला मुळीच हरकत नाही, असेंहि आगरकरांचें मत होतें. सर्व कांही काय-

द्याने होईल असें नाही; शक्यतों लोकांना शिक्षण देऊन त्यांचीं मनें वळवून सुधारणा करणें हें उत्तम; पण कांही सुधारणा अशा होत्या की, त्या लोकमतावर अवलंबून ठेवणें इष्ट नव्हतें. आगरकर म्हणतात, "लोकांच्या आचारांत जेवढा अत्यंत क्रूरपणाचा व अविचाराचा भाग असेल तेवढा, साधेल तर, तीव्र उपायांनी नाहीसा करण्यास हरकत नाही. आमच्यामधील सतीची चाल अशा प्रकारच्या सक्त उपायांनीच बंद करण्यासारखी होती; व आठ-दहा वर्षांच्या पोरींच्या गळ्याभोवतीं विवाहाचे फास घालून त्यांचा आमरण छळ करण्यास प्रवृत्त होणाऱ्या आई-बापांचें मूर्खत्वहि अशाच रीतीने बंद करण्यास कांही हरकत नाही, असें आमचें मत आहे." विधवेच्या केशवपनाची चालहि क्रूर व जुलमाची असल्यामुळे ती कायद्यानेच बंद करायला पाहिजे, असें त्यांनी म्हटलें आहे.

लोकशिक्षणामुळे सामाजिक सुधारणा हळूहळू सहजगत्या होतील, त्यासाठी सरकारी कायद्याची मदत घेण्याची आवश्यकता नाही, असें म्हणणारे लोक स्वमताच्या पुष्टयर्थ असाहि युक्तिवाद करीत की, कायदा केल्यामुळे लोकांचें स्वातंत्र्य नष्ट होतें. बालविवाह, केशवपन वगैरे चालींतले दोष शिक्षणामुळे लोकांना कळू लागले असून, लोक आपणहून त्यांत सुधारणा करूं लागले आहेत. तेव्हा आपल्या सामाजिक व्यवस्थेंत सरकारने हस्तक्षेप करण्याची मुळीच आवश्यकता नाही; त्यामुळे आपलें हित न होतां अहितच होईल, असेंहि त्यांचें म्हणणें होतें. पण ज्या हक्कासाठी व स्वातंत्र्यासाठी हे लोक आक्रोश करीत होते, तो हक्क कसला ? तर पोटच्या पोरीचें कुंकूं पुसून तिला विद्रूप करण्याचा. आगरकर म्हणतात की, या लोकांना हक्क, स्वातंत्र्य या शब्दांचा अर्थच समजत नाही; त्यांचें बोलणें म्हणजे स्वातंत्र्याच्या शुद्ध वल्गना होत.

यासंबंधी प्रतिपक्षाला उत्तर देतांना आगरकरांनी असा प्रतिप्रश्न विचारला आहे की, मग सर्वच सुधारणा लोकशिक्षणावर का अवलंबून ठेवीत नाही ? समाजांत शिवीगाळ, मारहाण, चोरी, दरोडे, खून इत्यादि गुन्हे सतत घडतात. अज्ञान आहे तोंपर्यंत अशा गोष्टी घडणारच. जसजसा शिक्षणाचा प्रसार होत जाईल तसतसे हे अनर्थ नाहीसे होत जातील; म्हणून पोलिस, न्याय वगैरे सर्व सरकारी खातीं बंद करून सगळा खर्च शिक्षणासाठी केला म्हणजे झालें. चोरी-गुंडगिरीसाठी कायद्याचा बडगा कशाला हवा ! पण हा विचार कोणालाहि मान्य होण्याचा संभव नाही; कारण समाजकंटकांची सुधारणा होईपर्यंत जो त्रास होईल, तो सहन करण्यास कोणीच तयार नसतें. हीच विचारसरणी सामाजिक सुधारणांना लागू करून त्या कायद्याने घडवून आणल्या पाहिजेत, असें आगरकरांचें म्हणणें होतें. अन्याय सहजपणें दूर होत नसेल तर तो सक्तीने, कायद्याने नष्ट करण्यांत अहित नसतें. गुलामांचा व्यापार सरकारने बंद केला तेव्हा कांही स्वार्थी लोकांनी गिल्ला केला; पण तो कायदा

हितावहच ठरला. त्याचप्रमाणे वैवाहिक गुलामगिरी लवकर बंद करण्यासाठी कायद्याची आवश्यकता आहे.

### सक्ती अवश्य

शिक्षणामुळे लोकांचीं मतें बदलून त्यांनी आपण होऊन आपल्या आचार-विचारांत सुधारणा केल्या तर उत्तमच होय; पण असें बहुधा घडत नाही; कारण सर्वांना योग्य शिक्षण मिळतेंच असें नाही; आणि तसें तें मिळालें तरी देखील लोक स्वयंप्रेरणेने कांहीहि करीत नाहीत. इंग्लंड, फ्रान्स इत्यादि सुधारलेल्या देशांतहि समाजाला इतकी प्रगतावस्था प्राप्त झालेली नाही, असा निष्कर्ष आगरकरांनी काढला आहे. त्या देशांत सुद्धा कोणतीहि सुधारणा लोकांवर सक्ती केल्यावांचून झालेली नाही. अशी सक्ती करणारी सत्ता भिन्न भिन्न प्रकारची असेल; पण तिला इष्ट वाटणाऱ्या गोष्टी जबरदस्तीनेच लोकांच्या गळीं उतरवाव्या लागतात. त्यामुळे लोकांवर थोडासा जुलूम झाल्यासारखें दिसतें; पण आगरकर म्हणतात की, जुलूम, सक्ती या शब्दांना घाबरण्याचें कांहीच कारण नाही. बालविवाह, विधवांचें केशवपन, सती या दुष्ट रूढींमुळे स्त्रियांवर जो जुलूम होतो, त्या मानाने सरकारची सक्ती कांहीच नाही. अशी सक्ती केल्यावांचून प्रचलित दुष्ट रूढींचा भयंकर जुलूम थांबणार नाही. कारण लोक निष्क्रिय आहेत. आगरकर म्हणतात, "ज्याने उठावें त्याने शिक्षण सर्वांच्या मुळाशीं आहे, स्वप्रचोदित क्रिया अत्यंत कल्याणकारक आहे, सरकारी सक्ती पराकाष्ठेची विघातक आहे असें सांगत सुटावें व हाताने कांही करूं नये, अशा प्रकारचा खुळा बाजार सर्वत्र माजला आहे!"

### स्पेन्सरचा विपर्यास

सुशिक्षित लोक स्पेन्सर, मिल्ल वगैरे पाश्चात्त्य पंडितांचे ग्रंथ वाचून प्रभावित होतात आणि त्यांचे विचार व सिद्धान्त आपल्या मताला आधार म्हणून सांगतात. पण या बाबतींत बरेच लोक स्पेन्सरच्या मतांचा विपर्यास करतांना दिसतात. समाजाच्या कोणत्या स्थितींत सरकारकडे कोणत्या प्रकारचा व किती अंमल असावा, याविषयी त्याने आपले विचार स्पष्टपणें मांडले आहेत; पण समाजाच्या उत्तमावस्थेंत लागू पडणारे सिद्धान्त आपले लोक आपल्या मागासलेल्या समाजाला लागू करतात. "याहून विशेष मूर्खपणाचा भ्रम असणें शक्य आहे काय?" असे उद्गार आगरकरांनी काढले आहेत.

### स्वातंत्र्य ?

सामाजिक सुधारणेच्या बाबतींत सरकारी हस्तक्षेपामुळे आमच्या स्वातंत्र्याला बाधा येते, असें म्हणणारे लोक इतर बाबतींत मात्र सरकारच्या विनवण्या करतात; गोवधबंदी, मद्यपानबंदी, धंदेशिक्षण यासाठी सरकारने कायदे करावे, सक्ती करावी, ती चालेल असें लाचारपणें म्हणतात, याची आगरकरांना फार चीड येत असे. ते वचारतात, "सामाजिक सुधारणांविषयी इंग्रज सरकार परकीयत्वामुळे अत्यंत

उदासीन आहे, म्हणूनच त्यासंबंधाने स्वातंत्र्याची तुम्ही एवढी ऐट मिरवतां, हें खरें नाही काय ? तसें नसेल व तुम्ही खरेंच स्वातंत्र्यप्रिय असाल, तर मग इतर गोष्टींत सरकारची गुलामगिरी कां पत्करतां ?"

## धर्मात हस्तक्षेप नको !

समाजसुधारणेला कायद्याची मदत घेण्यास अशिक्षित, पुराणप्रिय व जीर्ण मतवादी लोकांनी विरोध केला तर तें साहजिक आहे; कारण त्यांचीं मनें संकुचित असतात; पण सुशिक्षित लोकांनीहि कायद्याला विरोध करावा याचें आगरकरांना फार आश्चर्य वाटे. त्यांच्या या विरोधांत योग्यायोग्य विचार नसून दुराग्रहच आहे, असें त्यांनी म्हटलें आहे. सुशिक्षित लोक कायद्याला विरोध करतांना दुसरा युक्तिवाद असा करीत की, सरकार परकीय लोकांचें असल्यामुळे त्याने आमच्या धर्माचारांत ढवळाढवळ करूं नये हें बरें; नाही तर १८५७ सालीं जसा धर्मनिष्ठ सैनिकांच्या मनाचा क्षोभ होऊन दुर्धर प्रसंग गुदरला, तसाच प्रसंग पुन्हा ओढवेल. पण या आक्षेपांत कांहीच अर्थ नव्हता. कारण सरकार असल्या विरोधाकडे मुळीच लक्ष देत नव्हतें किंवा त्याला ज्या सुधारणा इष्ट वाटत होत्या त्या करण्यासाठी कोणाच्या परवानगीकरिता थांबत नव्हतें. सतीची प्रथा बंद करण्याचा कायदा, पुनर्विवाहाचा कायदा त्याने केला तेव्हा कोणाला विचारलें नाही, की कोणाचा विरोध जुमानला नाही. इंग्रज सरकार हिंदु समाजाच्या हितासाठीच असले कायदे करीत असतांना त्याला हे दुराग्रही लोक विरोध करतात; आणि पोर्तुगीज व मुसलमान लोकांनी पूर्वी अनन्वित अत्याचार केले तेव्हा मात्र हिंदु लोकांनी ते निमुटपणें सोसले. म्हणून आगरकर विचारतात, " हे भेकड व प्रतिष्ठाखोर हिंदु लोकांनो, त्या वेळेस तुमचा धर्माभिमान कोठे गेला होता ?"

'सामाजिक सुधारणा आणि कायदा' या लेखांत आगरकरांनी सक्ती केव्हा योग्य व केव्हा अयोग्य याविषयी चर्चा केली आहे. ते म्हणतात, " व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचें प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल, तें आचरण जरी त्या व्यक्तीस घातक असलें, तरी तिने तें करूं नये अशी सक्ती करण्याचा समाजास अधिकार नाही. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजबंधन या दोहोसहि मर्यादा आहेत." व्यभिचार किंवा मद्यपान हें वाईट असलें तरी, त्यामुळे समाजाला त्रास होत असेल तरच तें करणाऱ्या व्यक्तीला कायद्याने प्रतिबंध करणें योग्य ठरेल; पण सती, केशवपन, वगैरे रूढि इतक्या क्रूर व घातक आहेत की, त्या कायद्याने बंद करणें हेंच हितकारक होय, असें त्यांनी प्रतिपादिलें आहे.

अशा प्रकारे आगरकरांनी समाजसुधारणेसाठी कायद्याचा आग्रह धरला असला तरी कायद्याच्या सामर्थ्याची व उपयुक्ततेची मर्यादाहि ते जाणत होते. कायद्याने सर्व साधेल असें त्यांना वाटत नव्हतें. म्हणूनच त्यांनी तरुण सुशिक्षितांना विज्ञापना केली आहे की, कायद्याला विरोध करूं नका व त्यावर सर्वस्वी अवलंबूनहि

राहूं नका; तर ज्या सुधारणा करणें योग्य व आवश्यक वाटत असेल, त्या धैर्यानें तावडतोब करायला लागा.

## जात कां करीत नाही ?

कांही सुशिक्षित मंडळी सामाजिक व धार्मिक सुधारणांना मनांतून अनुकूल असूनहि त्या प्रत्यक्ष आचरणांत आणण्याचें धैर्य त्यांच्या अंगीं नसतें. सुधारणा अयोग्य आहेत असेंहि ते दाखवूं शकत नाहीत; आणि सुधारकांचे विचार बरोबर आहेत, असें उघडपणें मान्य करण्याचें औदार्यहि त्यांच्या जवळ नसतें. म्हणून ते लोक असा युक्तिवाद करतात की, " या सुधारणा अगदी इष्ट आहेत, त्या करणें अवश्य आहे, पण तसें करायला अनुकूल असा काळ अजून आलेला नाही. पाश्चात्त्य शिक्षणामुळे आम्हांला त्या सुधारणांचें महत्त्व कळतें; पण पुष्कळ लोकांना अजून तें शिक्षण मिळालेलें नसल्यामुळे त्यांना तें महत्त्व समजत नाही. त्यांना शिक्षण मिळाल्यावर तेहि सुधारणा स्वीकारण्यास तयार होतील. मग सर्वांनी एकदमच त्या कराव्या हें योग्य आहे. पण ज्यांना हें मान्य नसेल, सुधारणा घडवून आणण्याची ज्यांना अगदी घाई झाली असेल, त्यांनी आपली एक वेगळी जातच करावी, सर्व सुधारणा अमलांत आणून करून दाखवाव्या, व त्या हितावह आहेत हें इतरांना पटवून द्यावें. मग लोक त्यांचें अनुकरण करण्यास तयार होतील. "

अशा प्रकारचा उपदेश सुधारकांना करणारे लोक आगरकरांच्या मतें दांभिक व भेकड आहेत. आपला भित्रेपणा छपविण्यासाठीच ते अशीं मानभावी भाषणें करतात. जात करणें म्हणजे एखादी साधी, सोपी, सहज करण्याजोगी गोष्ट नव्हे; पण त्याचा मुळीच विचार न करतां हे लोक कांही तरी बोलतात. तथापि आगरकरांनी त्यांच्या त्या विचित्र सूचनेलाहि समर्पक उत्तर देऊन ठेवलें आहे. हिंदु समाजांत आधीच असंख्य जाती आहेत; आणि त्या जातिभेदामुळे समाजाची अतिशय हानि झालेली आहे, म्हणून त्यांत आणखी एका नवीन जातीची भर घालणें हें अनर्थकारक होईल. तेव्हा नवीन जात करण्याचा सल्ला देणारे हे लोक नुसते मूर्खच नाहीत, तर देशाचे शत्रु आहेत, असें आगरकरांनी म्हटलें आहे.

सुधारकांची वेगळी जात केल्यामुळे त्यांना सुधारणा लवकर करून दाखवतां येतील, हेंहि खरें नाही. कारण जातिभेदामुळे ज्या अनंत अडचणी नेहमी येतात त्या नवीन जातीच्या लोकांनाहि येणार. त्या अडचणी येऊं नयेत, सर्वांनाच, निर्धास्तपणें नवें आचरण करतां यावें, म्हणूनच कायद्याची मदत हवी, असें सुधारकांचें म्हणणें होतें. ज्या कारणासाठी कायदा हवा त्याच कारणासाठी नवी वेगळी जात करणें योग्य नव्हे, असें आगरकरांनी म्हटलें आहे. आणि वेगळी जात करून, सुधारणा हितावह आहेत असें सिद्ध केलें तरी, अज्ञानी दुराग्रही लोक त्या स्वीकारतील अशी खात्रीहि नाही. तेव्हा वेगळी जात करणें हें अगदी निरर्थक व अनिष्ट होय.

-५-

# भिन्न क्षेत्रांतील अपेक्षित सुधारणा

सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक इत्यादि सुधारणांचें तौलनिक महत्त्व, त्या सुधारणा घडवून आणण्याचें लोकशिक्षण व कायदा हे मार्ग आणि या संबंधांतून निर्माण होणारे वाद यांविषयी आगरकरांचीं काय मतें होतीं त्याचें विवरण गेल्या प्रकरणांत केलें. आता या क्षेत्रांत त्यांना काय सुधारणा अपेक्षित होत्या तें पाहवयाचें आहे. सामाजिक सुधारणांवर आगकरांचा सर्व भर होता हें खरेंच आहे, पण सामाजिक रूढींचीं सर्व पाळेंमुळें धर्मशास्त्रांत असल्यामुळे धार्मिक सुधारणांचाहि त्यांनी तशाच उत्कटतेने पुरस्कार केला आहे. राजकीय सुधारणांच्या बाबतींत आगरकरांच्याविषयी जरा गैरसमज आहेत हें मागे सांगितलेंच आहे. अनेक लेखांत त्यांनी राजकीय सुधारणांचाहि, नव्हे, स्वराज्यरूप जी सर्वांत मोठी राजकीय सुधारणा तिचाहि, जोरदार पुरस्कार केला आहे. सामाजिक सुधारणांवर त्यांनी जेवढें लिहिलें त्यामानाने हे लेख संख्येने कमी आहेत एवढेंच. असो, या तीनहि क्षेत्रांत त्यांना कोणत्या सुधारणा अपेक्षित होत्या तें आता पाहूं.

## सामाजिक सुधारणा

(१) **स्त्री-जीवन** – आगरकरांच्या मतें राष्ट्राची उन्नति ही त्यांतील समाजाच्या स्थितीवर अवलंबून असते; आणि समाजस्थिति ही गृहस्थितीवर अवलंबून असते. गृहस्थिति म्हणजे कुटुंबांतील व्यक्तींची स्थिति व त्यांचे परस्परसंबंध. ही गृहस्थिति स्त्रीचें कुटुंबांतील स्थान, तिची प्रतिष्ठा, तिचे अधिकार, तिचें स्वातंत्र्य यांवर अवलंबून असते. म्हणूनच आगरकरांनी स्त्री-जीवनसुधारणेला विशेष महत्त्व दिलें आहे. जातिभेद, अस्पृश्यता यांविषयी त्यांचीं मतें तशींच तीव्र आहेत; पण

स्त्रीविषयक दुष्ट रूढींचा त्यांनी जितका विचार केला आहे तितका विचार त्यांनी इतर बाबतींत केलेला नाही.

बालविवाह, त्यामुळे होणारे अनर्थ, लहान मुलींवर होणारे अत्याचार, बालविधवांची दुर्दशा, स्त्री-पुरुष विषमता, त्यामुळे स्त्रियांवर होणारा अन्याय, त्यांच्या बाबतींतली धर्मशास्त्राची निष्ठुरता, त्या शास्त्राने केलेली स्त्रीची अवहेलना; अप्रतिष्ठा याविषयी आगरकरांनी केलेलें जें विवेचन त्याचा आपण हिंदु समाजाच्या शिलावस्थेचें वर्णन करतांना परामर्श घेतला आहे. येथे आता सारार्थाने ते विचार पुन्हा सांगून त्यांनी स्त्री-जीवनविषयक ज्या सुधारणा उपदेशिल्या आहेत, त्यांचा विचार करावयाचा आहे.

(२) **बालविवाह** – स्त्रियांच्या दुःस्थितीचें प्रधान कारण म्हणजे हिंदु समाजांतील बालविवाहाची रूढि हें होय. स्त्रीच्या नशिबीं येणारीं बहुतेक सर्व दुःखें, सर्व आपत्ति, या रूढीमुळेच येतात व त्यामुळे समाजाचीहि अपरिमित हानि होते, असें आगरकरांनी वारंवार सांगितलें आहे. तरुण सुशिक्षितांस विज्ञापना करतांना ते म्हणतात, "ज्याप्रमाणे जोरदार वृक्ष निपजण्यास मूळ अंकुर जोरदार पाहिजे; त्याप्रमाणे देशांत सुदृढ स्त्री-पुरुषें निपजण्यास, सुदृढ मुलें होण्यास, वैद्यकशास्त्रांत जो खऱ्या विवाहाचा काल सांगितला आहे त्याचें उल्लंघन होतां कामा नये. या कालाचें उल्लंघन आम्हांकडून आज अनेक वर्षें होत असल्यामुळे आमची प्रजा क्षीण, अल्पायुषी, श्रम करण्यास नादान, उत्साहशून्य व भेकड अशी होत आहे. आमच्या शरीर-सामर्थ्याचा लोप झाल्यामुळे आमचें मानसिक सामर्थ्यहि नाहीसें होत आहे. बालविवाह बंद झाल्यास आज घरोघरीं ज्या हतभाग्य बालविधवा दृष्टीस पडतात त्या दृष्टीस पडेनाशा होतील, पुरुषांच्या अंगीं अधिक पौरुष दृष्टीस पडूं लागेल, तरुणांस अधिक उद्योग करण्याची हिंमत येईल व धाडसाचीं कामें अंगावर घेण्याची छाती होऊं लागेल. विवाहापूर्वी मुलींस ज्ञानसंपादण्यास अधिक फुरसद मिळाल्यामुळे पुढे त्यांच्या हातून अपत्यसंवर्धनाचें व प्रपंच चालविण्याचें काम अधिक चांगल्या रीतीने होऊं लागेल. पण हें सर्व होण्यास बालविवाहाची चाल बंद झाली पाहिजे आणि ती बंद होणें न होणें सर्वथैव तुमच्यावर आहे." तरुणांना असा उपदेश करून त्यांनी ही चाल बंद करण्यासाठी 'महाराष्ट्र बालविवाह निषेधक मंडळी' स्थापावी अशी सूचना केली आहे व अशी मंडळी स्थापन झाल्यास तिचा पहिला सभासद होण्यास 'सुधारक' तयार आहे, असें आश्वासन दिलें आहे. केवळ स्त्रीसमाजावरच नव्हे तर या देशावर ओढवलेल्या बहुतेक सर्व अनर्थपरंपरा या बालविवाहामुळेच ओढवल्या आहेत, असा आगरकरांचा निश्चित सिद्धान्त होता, हें वरील उताऱ्यावरून दिसून येईल.

'सामाजिक सुधारणा आणि कायदा' या लेखांत बालविवाहाच्या रूढीवर च तिचें समर्थन करणाऱ्यांवर आगरकरांनी अत्यंत प्रखर टीका केली आहे; आणि

हीं रुढि कायद्याने बंद केलीच पाहिजे, असा आग्रह धरला आहे. शिवाय त्यांनी असेंहि सांगितलें आहे की, केवळ त्या कायद्याने सर्व कार्य होईल असें नाही. कारण कायदा मुलींच्या बाबतींत फार तर दहा-बारा वर्षांपर्यंत मजल मारील; पण एवढ्याने समाधान मानून चालणार नाहीं. आपणांस त्याच्यापुढे पुष्कळ गेलें पाहिजे; आणि तो पुढचा सर्व मार्ग क्रमण्यास समाजाच्या पायांतच जोर पाहिजे.

या दुष्ट घातक रूढीमुळेच बालवैधव्य व केशवपन या अत्यंत क्रूर व राक्षसी आपत्ति स्त्रियांवर कशा येतात त्याचें सविस्तर वर्णन याच लेखांत आगरकरांनी केलें आहे व त्याहि रूढि कायद्याने नष्ट केल्या पाहिजेत, असें प्रतिपादिलें आहे. या अमानुष रूढींमुळे आगरकरांच्या चित्ताचा केवढा दाह होत असेल हें ज्यांना पाहवयाचें असेल त्यांनी हा लेख पुन: पुन्हा वाचावा.

बालविवाह व त्यापासून होणारे अनर्थ यांपासून स्त्रीचें रक्षण करण्यास आपल्या समाजांत स्वयंवर-पद्धति रूढ केली पाहिजे असें आगरकरांचें मत होतें. स्त्री-जीवनांत ही सुधारणा झाली तर स्त्रीच्या व्यक्तित्वाचा विकास होऊन ती सध्यापेक्षा पुष्कळच जास्त सुखी होईल, असें प्रतिपादन त्यांनी 'प्रियाराधन', 'स्वयंवर'. 'वल्लभोपासना' या लेखांतून केलें आहे.

(३) **स्वयंवर** – स्वयंवरपद्धतीचें समर्थन करतांना प्रथम त्यांनी, युरोपीय ग्रंथकारांच्या आधारे, स्वयंवराची पद्धत प्राणिवर्गांतच दृष्टीस पडते असें नसून, वनस्पतींतहि दृष्टीस पडते, हा विचार मांडला आहे. स्वयंवर-पद्धति निसर्गसिद्ध आहे, म्हणून ती आपण अंगीकारिली पाहिजे, असें यावरून त्यांना सांगावयाचें आहे. निसर्गाने घालून दिलेल्या या आदर्शाचा आम्हीं अनादर केल्यामुळे या देशांत स्त्री-पुरुषांच्या रतिसुखाचा अगदी भंडवडा झाला आहे, असें सांगून पाश्चात्त्य व पौवार्त्य स्त्री-पुरुषांच्या प्रणयरंगांची त्यांनी तुलना केली आहे. " ज्यांच्या अवयवांची पूर्ण वाढ झाली आहे, ज्यांच्या विषयवासना जागृत झाल्या आहेत, उत्कंठा, अधीरता, लज्जा यांनी ज्यांचीं मनें व्यापून राहिलीं आहेत, अशा स्त्री-पुरुषांच्या प्राथमिक रतिसुखाची बहार कोणीकडे, व पंतोजीचा मार खाणाऱ्या, अभ्यासाखाली अर्धमेल्या झालेल्या, दुर्बल, भेकड, अशा आमच्या सोळा-सतरा वर्षांच्या पोरांच्या व ज्यांचा भातुकलीचा आणि बाव्हला-बाव्हलीचा खेळ नुकताच कोठे सुटला आहे अशा आमच्या बारा-तेरा वर्षांच्या निस्तेज, लाजाळू व अज्ञान पोरींच्या बळजोरीच्या महालाची बहार कोणीकडे !"

ही तुलना इतकी बोलकी आहे की, स्वयंवर-पद्धतीचें मंडन करण्यासाठी आणखी कोणताच मुद्दा मांडण्याची गरज नाही; पण त्या वेळचा समाज इतका मंद, बधिर व जीर्ण झाला होता की, ही तुलना समजण्याचीहि त्याला पात्रता नव्हती. म्हणून आगरकरांनी आणखी बरेंच विवेचन केलें आहे. त्यांतील मुख्य विचार हा की, आमच्या देशांत प्राचीन काळीं स्वयंवर-पद्धति रूढ होती, तेव्हा ती

आज पुन्हा अनुसरण्यास कांहीच हरकत नाही. हा मुद्दा सांगतांना श्रीकृष्ण-रुक्मिणी, अर्जुनसुभद्रा, वत्सला-अभिमन्यु, शकुंतला-दुष्यंत, नल-दमयंती यांचीं उदाहरणें आगरकर देतात; आणि हिंदुसमाजधुरीणांना सांगतात की, एकीकडे या प्राचीन स्वयं-वरांचें व तीं पद्धत स्वीकारणाऱ्या स्त्री-पुरुषांचें तुम्ही कौतुक करतां आणि सध्या ती पद्धत अवलंबावी असें म्हणणाऱ्यांवर दुसरीकडे भडिमार करतां; तेव्हा तुम्ही रूढींचे दास आहांत, भेकड आहांत, जें सत्य दिसतें त्याचा पुरस्कार करण्यास लाग-णारें मनोधैर्य तुमच्याजवळ नाही. कोणी म्हणतील की, प्राचीन काळीं ती पद्धत योग्य होती; पण सध्या मात्र ती हितावह नाही. त्यावर आगरकर विचारतात की, असें म्हणण्याचें कारण काय? शकुंतला, मालती, सुभद्रा, आणि दुष्यंत, माधव, अर्जुन इत्यादि पौराणिक स्त्री-पुरुषांच्या प्रकृतींत आणि आजच्या आमच्या प्रकृतींत जमीन-अस्मानाचें अंतर पडलें आहे काय? असें आम्हांस बिलकुल वाटत नाही. तारुण्य, आरोग्य, बुद्धि, संपत्ति, स्वरूप, विद्या जितकें त्यांना प्रिय होतें तितकेंच आम्हांसहि आहे. दुःखाचा कंटाळा व सुखाचा अभिलाष जितका त्यांना होता तितकाच आम्हांलाहि आहे. तेव्हा स्वयंवरामुळे ते स्त्री-पुरुष जितके सुखी होत तितकेच आजचे स्त्री-पुरुषहि होण्याचा संभव आहे.

आगरकरांची वृत्ति कशी क्रांतिकारक होती तें यावरून दिसून येईल. बाल-विवाह, वैधव्य, स्वयंवर इत्यादि रूढींबद्दल जीर्णवादी लोकांहून त्यांचीं मतें तर भिन्न होतींच; पण प्राचीन काळचे स्त्री-पुरुष पुण्यशील, धर्मनिष्ठ, तो काळच सत्य-युगाचा, धर्मोत्कर्षाचा; आणि आजचे स्त्री-पुरुष पापी, धर्मभ्रष्ट व आजचा काळ ह्या कलियुगाचा, धर्महानीचा अशी जी विकृत विचारसरणी हिंदु समाजांत रूढ झालेली होती व जी सर्व अधःपाताला कारण झाली होती तिच्याविषयीच भिन्न मत सांगून त्यांनी मुळावरच घाव घातला आहे.

(४) **राष्ट्रीय चारित्र्य** — बालविवाहाची रूढि व स्वयंवर-पद्धतीचा अभाव यांचा केवळ आरोग्य, व सुदृढ प्रजा यांशींच संबंध आहे असें नव्हे. आगरकरांच्या मतें या दोन पद्धति सर्व राष्ट्रीय चारित्र्याच्या निदर्शक आहेत. प्रियाराधन या लेखाचा समारोप करतांना अत्यंत तीव्र व कडवट भाषेंत त्यांनी आपले याविषयीचे विचार मांडले आहेत. ते म्हणतात, "ज्या लोकांना कोणीं तरी पसंत केलेल्या बायका चालतात, ज्या लोकांना रत्युपभोगासाठी दुसऱ्यांनी कोंडून घालावें लागतें, ज्या लोकांना ज्ञानसंपादन, द्रव्यसंपादन, लौकिकसंपादन सामर्थ्यसंपादन, विषयसौख्य-रसज्ञान-संपादन यांपैकी कोणतीहि गोष्ट कमाविण्यापूर्वी 'जबरीसंभोग' करण्याची चटक लागली आहे व ज्यांच्या हातून या पापामुळे प्रतिदिवशीं प्रेमाचे हजारो खून पडत आहेत, शारीरिक व मानसिक अनंत यातना भोगाव्या लागत आहेत, विद्या व वित्त संपादण्याची बिलकुल कुवत राहिलेली नाही, खऱ्या जातिविशिष्ट सुखाची कल्पना ज्यांच्या स्वप्नांत सुद्धा येत नाही, ज्यांना संसार असार होऊन गेला आहे व

आयुष्य हें ज्यांना दुर्वह ओझ्यासारखें झालें आहे, अशा लोकांनी राष्ट्रीय सभांच्या फंदांत पडून मनासारखे राज्यकर्ते वरण्याची इच्छा कशाला धरावी ?"

याचा भावार्थ स्पष्ट आहे. माझी स्त्री मी निवडीन, हा आग्रह ज्याच्या बुद्धीला नाही त्याला आयुष्यांत कोणतीच गोष्ट स्वमताने निवडण्याचें सामर्थ्य प्राप्त होत नाही, असें आगरकरांचें मत आहे. असे लोक नेहमी प्रवाहपतितच राहणार. त्यांच्या जीवनाची दिशा दुसरे कोणी तरी ठरविणार. राज्यकर्ते आपले आपण निवडणें म्हणजेच स्वातंत्र्याचा लाभ करून घेणें आणि स्वयंवर-पद्धति यांचा असा घनिष्ठ संबंध आहे.

(५) **असंमत वैधव्य** – स्त्रियांच्या दुःस्थितीचें दुसरें कारण म्हणजे असंमत वैधव्य हें होय. त्यांतहि बालपणीं आलेलें वैधव्य ही अतिदारुण आपत्ति होय. हिंदु समाजांतील वरिष्ठ वर्गांतील स्त्रियांच्या पुनर्विवाहास धर्मशास्त्राने व रुढीने अनेक शतकें बंदी घातलेली होती. आगरकरांच्या मतें बालविवाह जितका निषिद्ध तितकीच पुनर्विवाहबंदीहि निषिद्ध होय. विधवा स्त्रीला पुनर्विवाहाची बंदी करूनच समाज थांबला नाही, तर असें वैधव्य सक्तीने तिच्यावर लादून त्याने त्या स्थितींतलें तिचें जीवनहि नरकप्राय करून टाकलें, याची आगरकरांना भयंकर चीड येते. विधवा स्त्रीला समाज अपवित्र मानतो, तिचें दर्शन हा अपशकुन मानतो; आणि तिच्या दुःखांत तिला सहानुभूति दाखविण्याऐवजी, तिच्या कर्मानेच ती आपत्ति ओढवली, असें म्हणून तिच्या दुःखावर डागण्या देतो. इतकी क्रूरता, इतका अमानुषपणा जगांत दुसऱ्या कोठेहि सापडणार नाही. विधवेला समाजजीवन इतकें असह्य करून टाकतो की, आगरकरांच्या मतें त्यामुळेच अनेक स्त्रिया सती जाण्यास सिद्ध होतात. ते म्हणतात, जिचा नवरा मेला तिचें होईल तितक्या उत्तम रीतीने संगोपन करण्याची उदार चाल आमच्या देशांत असती तर सहगमनाची रूढि येथे कधीच न पडती; इतकेंच नव्हे, तर पतिवियोगामुळे एकाएकीं प्राण सोडणारी किंवा आत्महत्या करणारी स्त्री देखील कधीहि दृष्टीस न पडती.

(६) **पुनर्विवाह** – असंमत वैधव्य, पुनर्विवाहबंदी ही रूढि आगरकरांना बालविवाहाइतकीच घातक वाटत असली तरी त्यांनी वैधव्य किंवा पुनर्विवाह यासंबंधी स्वतंत्र व विस्तृत असें विवेचन केलेलें नाही. पण विष्णुशास्त्री पंडित यांनी या बाबतींत जे प्रयत्न केले त्यांचा आगरकरांनी गौरव केला आहे. त्यावरून या विषयासंबंधी त्यांचीं मतें काय होतीं याची सहज कल्पना येते. विष्णुशास्त्री यांनी प्रथम पुनर्विवाह सशास्त्र आहे, धर्मवचनांचा त्याला आधार आहे हें सिद्ध करण्यासाठी प्रमाणें गोळा केलीं व याविषयी कोणांस शंका असेल तर त्यांनी वादास उभे राहवें, अशा अर्थाचे जाहीरनामे शहरोशहरीं लावले. पण कोणीहि वादास आलें नाही. तेव्हा मग शास्त्रीबुवांनी पुनर्विवाहोत्तेजक मंडळीतर्फे सोळा वर्षांच्या एका विधवेचा पुनर्विवाह घडवून आणला. या वेळीं "तुमच्या छापखान्यास आम्ही आग

लावूं " अशी पंडितांना लोकांनी धमकी दिली होती, तरीहि ते डगमगले नाहीत. यामुळे आगरकरांना त्यांचें विशेष कौतुक वाटत होतें.

याविषयी विवेचन करतांना ' न करत्याचा वार शनिवार ' या लेखांत आगरकरांनी सुधारणा-पक्षावर टीका करणाऱ्यांचा ढोंगीपणा, त्यांची भेकड वृत्ति, त्यांचें असत्याचरण यांवर विदारक प्रकाश टाकला आहे. आगरकरांना ' उतावळे सुधारक ' असें लोक म्हणत असत; पण विष्णुशास्त्री पंडितांनी कसलाच उतावळेपणा केला नव्हता. त्यांनी शास्त्राधार जमविले होते. लोकांशीं वाद करण्याची सिद्धता दाखविली होती. तरी त्यांच्यावरहि जीर्णवादी लोकांनी गहजब केलाच. तेव्हा थंड्या सुधारकांविषयीहि समाजाची तीच दृष्टि होती, असें दिसून आलें. त्या वेळीं विष्णुशास्त्री पंडित यांना वे. व्यंकटशास्त्री यांनी पुनर्विवाहासाठी शास्त्राधार काढून दिले होते. त्यांचें मत पुनर्विवाहाला अनुकूल होतें, पण शंकराचार्यांपुढे वाद निघाला तेव्हा सनातनी लोकांनी त्यांना अतिशय भीड घालून उलट मत द्यावयास भाग पाडलें. याविषयी लिहितांना आगरकर म्हणतात, " अशा निर्लज्जपणाने पुनर्विवाह अशास्त्र ठरविण्याचा झालेला प्रयत्न पाहून विधिपक्षाच्या मंडळीस पराकाष्ठेचा राग यावा, व सरकार-दरबार व्हावेत व कित्येक मंडळींच्या मनांतून शंकराचार्यांवर फिर्याद करण्याचा विचार यावा यांत विलक्षण असें आम्हांस कांहीच वाटत नाही."

(७) **स्त्रीशिक्षण –** गृहस्थिति आधी सुधारली तरच देशाची सर्व स्थिति सुधारेल असें आगरकर कां म्हणत असत, हें त्यावरून कळून येईल. बालविवाह, केशवपन, असंमत वैधव्य इत्यादि ज्या रूढींमुळे आमची गृहस्थिति बिघडली होती त्या रूढींच्या मागे अत्यंत तर्कदुष्ट, अमानुष अशी विचारसरणी होती; आणि त्याचप्रमाणे ढोंगी, अंध, असत्यप्रवण अशी वृत्तीहि होती. प्रत्यक्ष त्या रूढीपेक्षाहि ती विचारसरणी व ती वृत्ति या समाजाला जास्त घातक होत्या. म्हणूनच आधी गृहस्थिति सुधारली पाहिजे, असा आगरकरांचा आग्रह होता, व ती सुधारावयाची तर स्त्रीजीवनाची स्थिति सुधारली पाहिजे असें ते म्हणत. ही स्त्रीजीवनाची स्थिति सुधारण्यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे स्त्रीक्षिण हा होय, असें त्यांनी सांगितलें आहे. मुलांना प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता आहे; पण मुलींना, त्यांच्या मतें, अशा शिक्षणाची गरज जास्त आहे. कारण अपत्यसंगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर असते. संसार चालविण्याची जबाबदारी पुरुषांवर असली तरी मुलाला जन्म देऊन त्याच्या शरीराची व मनाची जोपासना करण्याचें काम स्त्रीच करीत असते. ज्या स्त्रीला प्राथमिक शिक्षण मिळालें आहे ती स्त्री अशिक्षित स्त्रीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारें अपत्यसंगोपन करूं शकेल यांत कांही शंका नाही. पाश्चात्त्य देशांत हा विचार आता सर्वमान्य झालेला आहे. पूर्वी त्या देशांतहि सामान्य स्त्रिया अशिक्षित असत. याला अपवाद म्हणजे स्पार्टन लोकांचा; त्यांच्या स्त्रियांना पुरुषांसारखेंच सर्व प्रकारचें शिक्षण मिळत असे, त्यामुळे त्या स्त्रियांना कुटुंबांत प्रतिष्ठा

मिळत असे; आणि त्यांची संततीहि चांगली निपजत असे. रोमन लोकहि मुलांप्रमाणे मुलींना शिक्षण देत असत. तथापि युरोपांत धर्मक्रांति होईपर्यंत स्त्री-शिक्षणाकडे लोकांनी फारसें लक्ष दिलें नव्हतें. ल्यूथरने धर्मसुधारणेप्रमाणेच स्त्री-शिक्षणाविषयीहि आग्रह धरला होता, कारण बायबलांतील खरें रहस्य पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाहि कळल्याशिवाय खरी धर्मसुधारणा होणार नाही, असें त्याचें मत होतें.

समाजाच्या उन्नतीसाठी मुलींना उच्च शिक्षणहि मिळणें अवश्य आहे, असें आगरकरांनी प्रतिपादिलें आहे; पण त्याचा विचार करण्यापूर्वी बालविवाहाची चाल बंद होऊन प्रौढविवाह सुरू होणें अत्यावश्यक आहे, असें त्यांनी म्हटलें आहे. कारण तेरा-चौदाव्या वर्षांपासूनच जर मुलींच्या मागे गर्भारपण, बाळंतपण व अपत्यसंगोपन हीं लचांडें लागलीं, तर त्यांना अभ्यास करणें अशक्य होतें; म्हणून उच्च शिक्षण मिळवायचें असेल, तर मुलींनी तोंपर्यंत अविवाहित राहिलें पाहिजे. हें उघड आहे.

(८) **एकत्र शिक्षण** – स्त्रियांना व पुरुषांना एकाच प्रकारचें शिक्षण द्यावें आणि तेंहि एकत्र द्यावें, असेंहि आगरकरांचें मत होतें. वैवाहिक जीवनांतील विपत्ति टाळण्यासाठी त्यांच्या मतें, अशा शिक्षणाची आवश्यकता आहे. कांही लोकांचें मत असें होतें की, मुलींना फक्त प्राथमिक शिक्षण द्यावें आणि मग त्यांना घरींच ठेवून प्रपंचव्यवस्था शिकवावी. त्यांना आणखी शिक्षण देण्याविषयी आग्रहच असेल तर मुलांप्रमाणे भूगोल, शास्त्रें असले अवघड विषय न शिकवतां त्यांना शिवणकाम, गायन, पाकशास्त्र, गृहव्यवस्था, भरतकाम, शिशुसंगोपन, आरोग्य हे विषय शिकवावे. स्त्रियांचीं कामें वेगळीं व त्यांची बुद्धीहि कमी म्हणून त्यांना असें वेगळ्या प्रकारचें शिक्षण देणें योग्य होय, असें त्यांचें म्हणणें होतें. आगरकर म्हणतात की, हें मत स्वार्थी आहे. शेकडो वर्षें पुरुषांनी स्त्रियांवर वर्चस्व गाजवलें, तें स्त्रियांना उच्च शिक्षण दिलें तर नाहीसें होईल, आपली सत्ता जाईल अशा भीतीने हे लोक असलीं तर्कशून्य मतें मांडतात. स्त्रीची बुद्धि उच्च शिक्षणासाठी योग्य नाही हें मत पाश्चात्त्य देशांतील अनुभवाने खोटें ठरलें आहे. जीं शास्त्रें व ज्या कला केवळ पुरुषांनाच सुसाध्य आहेत अशी कल्पना होती, तीं शास्त्रें व त्या कला स्त्रियांनाहि सुसाध्य असून, त्यांच्या अभ्यासामुळे स्त्रियांच्या नैसर्गिक चारुतेवर कांही परिणाम होत नाही, किंवा त्यांच्या अपत्यसंगोपनाच्या कामांतहि उणीव येत नाही, असें दिसून आलें आहे.

स्त्री-पुरुषांना एकाच प्रकारचें शिक्षण द्यावें, एवढेंच नव्हे तर तें एकत्र द्यावें, त्यांत समाजाचें हितच आहे, या मताचाहि आगरकरांनी पुरस्कार केला आहे. हिंदु समाजांत स्त्री-पुरुष मोकळेपणीं एकत्र वागूं शकत नाहीत; तसें वागणें योग्य मानलें जात नाही; कारण त्यामुळे समाजाची नीतिमत्ता ढासळेल अशी भीति वाटते. पण युरोपांतील स्त्री-पुरुष सर्व सामाजिक समारंभांत मिसळून वागतात, म्हणून कांही

त्यांच्यांत अनीति माजली आहे, असें दिसत नाही. उलट स्त्रियांच्या सान्निध्यामुळे पुरुष नेहमी उल्हसित असतात. स्त्रियांना घरांत किंवा गोषांत ठेवल्याने समाजाची नीति वाढते, या म्हणण्यांतहि कांही अर्थ नाही. स्त्री-पुरुषांचा नित्य सहवास असेल, मोकळेपणीं बोलणें-चालणें असेल, तर त्यांच्या मनांत विषयवासना उत्पन्न होण्याचा संभव कमी असतो, उलट विशेष-प्रसंगींच नटलेल्या स्त्रिया दृष्टीस पडल्यामुळे पुरुषांच्या मनांत त्यांच्याविषयीं ओढ उत्पन्न होऊन, त्या अप्राप्य असल्यामुळे विकृत भावना निर्माण होतात. नित्य सहवास लाभल्याने नीतीचा परिपोषच होईल, असभ्यपणाचें वर्तन बंद होईल, बोलण्यांतली अश्लीलता कमी होईल. अशा प्रकारे प्रौढ स्त्री-पुरुषांचा मिश्र समाज सुखावह होण्यासाठी त्यांना लहानपणापासूनच एकत्र शिक्षण देणें अवश्य आहे. अशा शिक्षणामुळे चांगला परिणाम होतो, असा अनुभव युरोप-अमेरिकेंत आला आहे. वरिष्ठ शिक्षणहि तरुण-तरुणींना एकत्र देणें चांगलें, असें दिसून आलें आहे. अशा प्रकारें एकत्र शिक्षण देण्यावर पुढील आक्षेप घेण्यांत येत —

१. स्त्री-पुरुषांत नैसर्गिक भेद असतो, त्याप्रमाणे त्यांच्या शिक्षणांत फरक करणें अवश्य असतें. एकत्र शिक्षण दिलें तर तसा फरक करतां येणार नाही. २. मुलांच्या दांडगेपणाचा मुलींच्या वर्तनावर दुष्परिणाम होतो. मुलींच्या सहवासामुळे मुलांचा व्रात्यपणा मात्र कमी होत नाही. ३. मुलामुलींच्या सहवासामुळे त्यांची विषयवासना लवकर जागृत होऊन त्यांच्या जीवनावर अनिष्ट परिणाम होईल.

आगरकर म्हणतात, अनुभवाने हे आक्षेप चुकीचे ठरले आहेत. १. एकत्र शिक्षणामुळे दोघांनाहि समजेल असें शिकवणें अवश्य होतें व तेंच अधिक उपयुक्त ठरतें. २. मुलांचा दांडगेपणा व व्रात्यपणा मुलींच्या सान्निध्यामुळे कमी होतो असें दिसून आलें आहे. ३. सहवासामुळे विषयवासना जागृत न होतां मनें शांत व गंभीर होतात व जीवनांतील साथी निवडणें सोपें होतें, असाच अनुभव आला आहे.

योग्य वेळीं मुलींना कांही उपयुक्त शिक्षण दिलें तर तें त्यांना पुढील आयुष्यांत चरितार्थासाठीहि निश्चितपणें कामीं येईल, हा विचारहि आगरकरांनी मांडला आहे. पतिनिधनामुळे स्त्री निराधार व परावलंबी होत असल्यामुळे, विधवेचें जिणें जगण्यापेक्षा पतीबरोबर जाळून घेणेंच बरें, असें तिला वाटण्याचा संभव असतो. त्यामुळेच सहगमनाची दुष्ट रूढि सुरू झाली असावी. स्वतःचें पोट भरण्यापुरतें शिक्षण तिला मिळालेलें असेल, तर विधवा स्त्री मानाने जगूं शकेल व सहगमनाचा विचार तिच्या मनांत येणार नाही, असें त्यांनी प्रतिपादिलें आहे.

(९) **जातिभेद** — स्त्री-जीवनाची दुःस्थिति हें जसें हिंदुस्थानच्या अधःपाताचें एक कारण, तसेंच सामाजिक विषमता हें, आगरकरांच्या मतें, दुसरें कारण होतें. वर्णभेद, जातिभेद, अस्पृश्यता इत्यादि अनेक रूपांनी ती विषमता या समाजांत हजारो वर्षे रूढ झाली होती व या समाजाच्या प्रगतीची सर्व आशा नष्ट करून टाकीत होती. " जात का करीत नाही ? " या प्रश्नाला उत्तर देतांना आगरकर

म्हणतात, "जातीमुळे आपला देशाभिमान संकुचित झाला आहे. जातीमुळे ज्ञान, कला, शास्त्रें हीं जेथल्या तेथे कोंडल्यासारखीं झालीं आहेत. जातीमुळे धर्मविचारांत व आचारांत मतभेद उत्पन्न होऊन तो परस्पर वैरास, छळास व मत्सरास कारण झाला आहे. जातीमुळे अन्नव्यवहार, विवाह वगैरेंच्या संबंधाने अतिशय गैरसोय झाली आहे. जातीमुळे देशांतल्या देशांत किंवा परदेशीं प्रवास करणें कठीण झालें आहे, जातीमुळे परद्वीपस्थ व परधर्मीय लोकांपासून अलग राहवें लागल्यामुळे फार नुकसान होत आहे. या जातीमुळे आमची भूतदया, आमचें बंधुप्रेम, आमची उदारता, आमची धर्मबुद्धि आमची परोपकाररती यांचें क्षेत्र अतिशय मर्यादित झालें आहे. सारांश, आज ज्या अनेक विपत्ति आम्ही भोगीत आहों, त्यांपैकी ज्यांचें जनन जातिभेदापासून झालें नाही अशा फारच थोड्या असतील.

आगरकरांच्यानंतर गेल्या पाऊणशे वर्षांत भारताच्या इतिहासाचें खूप संशोधन झालें असून, हिंदूंच्या समाजरचनेचा व इतिहासाचा अनेक मोठमोठ्या पंडितांनी कसून अभ्यास केला आहे, त्यांपैकी बहुतेकांनी जातिभेदामुळे हे दुष्परिणाम, हे अनर्थ झाले असल्याचें मान्य करून, आगरकरांच्या या मताला प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें पाठिंबाच दिला आहे. आगरकरांच्या सामाजिक निदानाचा हा मोठाच विजय मानला पाहिजे.

या जातिभेदामुळे खऱ्या नीति-धर्माची या समाजांत कशी परवड झाली होती हें आगरकरांनी 'आता धर्माभिमानी स्वतःच वेगळी जात करणार म्हणतात' या लेखांत दाखवून दिलें आहे. ते म्हणतात, अमुक देशांत किंवा अमुक जातींत जन्म होणें हें कांही मनुष्याच्या हातचें नाही. परंतु सदाचाराने किंवा दुराचाराने वागणें हें मनुष्याच्या हातचें आहे. पहिल्या गोष्टीमुळे मनुष्य दोषी होतो असें गृहीत धरलें तरी तो दोष दुसऱ्या दोषापेक्षा अर्थातच कमी असला पाहिजे; पण हा विचार आमचे सनातनी बांधव करणार नाहीत. तारतम्याने पाहिल्यास भिन्नधर्मीय व भिन्नदेशीय सुजनाने स्पर्शिलेल्या अन्नपाण्याहून स्वदेशीय व स्वधर्मीय दुर्जनाच्या हातचें पाणी अधिक त्याज्य असें आम्हांस वाटतें. हीन जातीय आणि दुराचारी यांत नीतिदृष्ट्या पाहतां दुराचारी हा खरा अस्पृश्य होय; पण हिंदुसमाजांत जातिभेदाचा प्रभाव इतका आहे की, हा सामान्य विवेक लोकांनी केव्हाहि दाखविलेला नाही. वाटेल त्या दुराचारी, पापी, समाजद्रोही मनुष्याला हिंदु लोक जवळ करतील; पण सदाचारी हीनजातियाची सावली सुद्धा घेणार नाहीत. आगरकरांच्या मतें हा अधर्म आहे.

(१०) **ॲनी बेझंट** – १८९३ सालीं ॲनी बेझंट या हिंदुस्थानांत आल्या आणि त्यांनी पुण्यास एक व्याख्यान देऊन असें सांगितलें की, "पाश्चात्त्य व भारतीय समाजरचनेची तुलना करतां भारतीय समाजरचना श्रेष्ठ ठरते; पाश्चात्त्य समाजांत अति श्रीमंत व अति दरिद्री असे दोन वर्ग पडत आहेत म्हणून ती समाजरचना वर्णव्यवस्थेपेक्षा हीन आहे." यावर टीका करतांना आगरकर म्हणतात की,

" अशीं व्याख्यानें ऐकून आमच्या धर्माभिमानी लोकांस या स्त्रीस कोठें ठेवूं आणि कोठे न ठेवूं, असें झालें आहे. पण त्यांनी हें ध्यानांत ठेवावें की ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्णव्यवस्थेच्या कैवारणीस या चार जातींत जे असंख्य पोटभेद आहेत ते मुळीच संमत नाहीत. ते मोडून टाकणें अत्यवश्य आहे असें तिचें मत आहे. आमचे लोक हें करण्यास तयार आहेत काय ? असतील तर या हिंदु आचार-विचारांचें मंडन करणाऱ्या विदुषीचे आम्हांवर अगणित उपकार झाले, असें आम्ही मोठ्या आनंदाने कबूल करूं. "

वास्तविक जिला आपण वर्णव्यवस्था म्हणतों ती भारतांत ऐतिहासिक काळांत कधीच अस्तित्वांत नव्हती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चारच वर्ण आहेत व त्यांच्यांत पोटभेद, जातिभेद मुळीच नाहीत, अशी स्थिति भारतांत केव्हाहि नव्हती. त्याचप्रमाणे ब्राह्मण केवळ अध्ययन-अध्यापन, क्षत्रिय फक्त राज्यकारभार व युद्ध, वैश्य फक्त धनोत्पादन आणि शूद्र केवळ सेवा करीत आहेत असेंहि कधी इतिहासांत दिसत नाही. इतकेंच नव्हे, तर इतिहासपूर्व काळांतहि अशी स्थिति नव्हती. याचा अर्थ असा की, भारतांत चातुर्वर्ण्यव्यवस्था केव्हाहि अस्तित्वांत नव्हती; पण चातुर्वर्ण्य, चातुर्वर्ण्य असा घोष मात्र कायम चालू होता. या ढोंगीपणाची आगरकरांना अत्यंत चीड येत असे. या लेखांत त्यांनी पुढे हीच टीका केली आहे. हल्ली जे लोक ब्राह्मण या नांवाखाली मोडतात त्यांनी आपला सगळा वेळ अध्यात्मविचारांत घालविला पाहिजे. तसें करण्यास ते लोक राजी आहेत काय ? तसें ते नसतील तर आपणांस ब्राह्मण म्हणवून घेऊन फुकाची आढ्यता मारण्यांत व टाळ्यांच्या गजरांत व्याख्यात्रीचें अभिनंदन करण्यांत काय अर्थ आहे ?

(११) **वर्णसंकर हितावह** – जातिभेद, वर्णभेद यांविषयी आगरकरांचे असे विचार असल्यामुळे या देशांत वर्णसंकर घडून येणें हितावह होय, असें त्यांनी स्पष्टपणें प्रतिपादिलें आहे. वर्णसंकर ही धर्मग्लानि होय असें जीर्णवादी लोकांना वाटतें; पण आगरकर म्हणतात, " त्यांच्या धर्मग्लानीच्या बऱ्याच भागास आम्ही धर्मग्लानि न समजतां धर्मोत्कर्ष समजतों. मूर्तिपूजा अजीबात नाहीशी होणें, यज्ञयागांचें थोतांड शिथिल होत जाणें, वर्णसंकर होऊन पाहिजे त्याला पाहिजे त्याशीं अन्नोदकव्यवहार करण्याची किंवा लग्न करण्याची सदर परवानगी असणें, पाहिजे त्याने पाहिजे त्या शास्त्रांचा किंवा धर्मग्रंथांचा अभ्यास करणें, वगैरे गोष्टी प्रचारांत आल्यास कोणत्याहि प्रकारची धर्मग्लानि होणार आहे असें आम्हांस वाटत नाही. त्या जुन्या प्रकारच्या आचारांनी हिताहून अहितच अधिक होत आहे, असा आमचा समज आहे. "

(१२) **पूर्णावस्था** – मानवजातीची पूर्णावस्था मागे येऊन गेली व ती पूर्णावस्था अद्याप यावयाची आहे व ती पुढे येणार आहे, अशीं दोन मतें लोकांत रूढ आहेत. त्यांपैकी पूर्णावस्था मागे होऊन गेली या मताचा व जातिभेदाचा दृढ संबंध

आहे, असें आगरकरांचें मत होतें. पूर्णावस्थेचें विवेचन करतांना ते म्हणतात, " ज्यांची जातिभेदावर श्रद्धा आहे त्यांच्या मतें मानवाच्या पूर्णावस्थेचा काळ मागेच होऊन गेला असून आता समानतेकडे मानवाचा कल होत असल्यामुळे दिवसेदिवस मनुष्यजातिभ्रंश पावत आहे; पण जेथे लोकांना जन्मतः सर्वांमध्ये साम्य आहे असें वाटत असतें तेथे याहून भिन्न स्थिति असते. तेथे कोणासहि आपण आहों तीच पूर्णावस्था आहे असें भासत नाही. आपल्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यास जागा आहे असें प्रत्येकास वाटतें व त्यास ती करण्यास पुष्कळ उमेद असते. युरोपीय समाजांत ती समजूत दृढ होत आहे. या समजुतीनेच त्यांचे सुधारणेकडे सदोदित प्रयत्न चालले आहेत. या समजुतीने युरोपीय लोकांत किती परिश्रम, किती उद्योग, किती धाडस व किती घडामोड सुरू आहे याची आमच्याने कल्पनाहि करवत नाही." ( केसरींतील निबंध, पुस्तक दुसरें, पृ. ८१).

(१३) **अस्पृश्यता** – जातिभेदाविषयी आगरकरांची मतें जशीं अगदी पुरोगामी व क्रांतिकारक होतीं तशींच अस्पृश्यतेविषयीहि होतीं. या विषयाचें त्यांनी विस्तृत विवेचन केलेलें नाही; पण एक-दोन ठिकाणीं जातां जातां जीं मतें मांडलीं आहेत त्यावरून त्या काळांतहि आगरकर किती निर्भयपणें लिहीत असत हें ध्यानीं येईल. ते म्हणतात, " महाराची सावली पडली असतां विटाळ मानणारे लोक, कितीहि लांब जिभा करून, " अमचा रंग काळा असला व तुमचा गोरा असला म्हणून काय झालें ? रंगावर कांही मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाही, " वगैरे गोष्टी प्रतिपादूं लागले; तथापि त्यांच्या शब्दांस जोर येण्याचा संभव नाही. त्या शब्दांस जोर येऊन इतरांनी ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास, 'ब्राह्मणोस्य मुखमासीत्' हें पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन, आपल्या मांडीला मांडी भिडवून शाळांतून बसण्यास महारांस मोकळीक दिली पाहिजे." (मूळ पाया चांगला पाहिजे). 'इति श्रीचहाग्रामण्य प्रकरणं समाप्तम्' या लेखांत याच्याहि पुढे जाऊन ते म्हणतात, " ब्राह्मणेतरांच्या हातचा चहा पिण्यांत आम्हांस दोष वाटत नाही. इतकेंच नव्हे, तर नीच मानलेल्या महारांची स्थिति सुधारून त्यांची व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांची एक पंगत झालेली जर आम्हांस पाहतां येती तर आम्ही स्वतःस मोठे कृतार्थ मानलें असतें, ही गोष्ट आमच्या देशबांधवांपासून आम्ही चोरून ठेवीत नाही."

(१४) **वर्णभेद** – वर्णभेद, जातिभेद, अस्पृश्यता हीं विषमतेचीं जुनीं कारणें होत. पाश्चात्यविद्येमुळे येथल्या समाजाची ही जुनी घडी विस्कटली हें खरें. आपला समाज व्यक्तिवादी होऊं लागला; आणि विचारस्वातंत्र्य, व्यवसायस्वातंत्र्य हीं प्राप्त होऊन समाजाची घडण बदलूं लागली. या नव्या समाजांत स्वातंत्र्या-बरोबरच समता तत्त्वालाहि तितकेंच महत्त्व होतें; पण तरीहि त्यांत वर्गभेद निर्माण होऊन एक नवीनच विषमता निर्माण होऊं लागली होती. विषमतेच्या याहि

कारणाचा आगरकरांनी जातिभेदासारखाच विचार केला होता. आणि वेळीच या विषमतेला पायबंद घातला नाही तर आपला समाज उत्सन्न होईल, असा इशाराहि दिला होता. ते म्हणतात.

"आमच्यामध्ये विचारस्वातंत्र्य व व्यवसायस्वातंत्र्य आल्याने आमच्या समाजाचें पूर्वी जें जातिभेदामुळे व धर्मभेदामुळे वर्गीकरण झालें होतें त्याचा आता लोप होत जाऊन प्राप्तीच्या व संपत्तीच्या मानाने वर्गीकरण होत चाललें आहे."

(१५) **वर्गकलह** – सांपत्तिक विषमता हें वर्गीकरणाचें नवीन तत्त्व कशामुळे आलें तें सांगून, याच लेखांत, तें तत्त्व समाजास राज्यकारणीं किती अपायकारक आहे व त्यापासून किती जुलूम होत आहे, त्याचीहि कल्पना लोकांना आगरकरांनी दिली होती. इतकेंच नव्हे तर कामगारवर्गाने संघटित होऊन या नव्या जुलमाचा प्रतिकार केला पाहिजे, असा उपदेशहि त्यांनी केला होता. 'रेल्वे कंपन्या व रेल्वे-कडील नोकर' या लेखांत ते म्हणतात, "राजांचा व धन्यांचा आपल्या प्रजेशीं व नोकरांशीं नित्य कलह चाललेला असतो. तो इतका की, हा कलह हा उभयतांच्या मनोवृत्तीचा स्वाभाविक परिणाम, आणि उभयतांचा सलोखा हा अपवाद, असें म्हटलें तरी चालेल. आमच्या रेल्वे-कंपन्या आणि त्यांचे नोकर या दुसऱ्या कोटींत पडतात. रेल्वेकडील नोकरांनी आपल्या धन्याशीं कलह करण्याचा निश्चय केल्याखेरीज त्यांची विपत्ति दूर होण्याचा संभव नाही" (केसरींतील निवडक निबंध, पुस्तक १ लें). या विषयावरील अन्य लेखांत आगरकरांनी कोळशाच्या खाणी, गोद्या, तारायंत्रें इत्यादि इतर धंद्यांतहि कामगारांना कट (संप) करणें कसें अवश्य आहे तें सांगून युरोप-अमेरिकेंतील कामगार संप करून आपलें उद्दिष्ट कसें साध्य करून घेतात त्याचें वर्णन केलें आहे. संप हा जसा सांपत्तिक विषमता नष्ट करण्याचा मार्ग तसाच भांडवलदारांच्या बाजूने आचरण्याचा दुसराहि एक मार्ग आहे. कामगारांना नफ्यांतला कांही वांटा देणें हा तो मार्ग आहे. आज हा विचार पूर्ण रूढ होऊन गेला असून तो प्रत्यक्ष आचरणांतहि आणला जात आहे. पण १८८० साला-पासून, केसरीच्या प्रारंभीच्या अंकापासून, आगरकरांनी त्याचें प्रतिपादन केलेलें आढळतें. यावरून केवळ प्राचीन काळच्या सामाजिक विषमतेचाच विचार आगर-करांनी केला असें नसून, सध्याची घडी विस्कटल्यावर नव्या समाजरचनेंत उद्-भवणाऱ्या नव्या आर्थिक विषमतेचाहि विचार केला होता, असें दिसून येईल.

ही नवी आर्थिक विषमताहि जुन्या जातीय विषमतेइतकीच घातक असल्या-मुळे ती नष्ट करण्यासाठी तरुणांनी बद्धपरिकर व्हावें अशी या देशांतल्या 'तरुण सुशिक्षितांस आगरकरांनी विज्ञापना' केली आहे. तिचा सारार्थ असा : विचार करणें, सुखदु:खाचा अनुभव घेणें व क्रिया करणें या तीन गोष्टींपैकी पहिलींत, दुसरींत व तिसरींत प्रत्येक मनुष्य चूर होऊन गेलेला असतो. दीर्घ-चिंतन करून ग्रंथरूपाने आपलें तत्त्वज्ञान लोकांपुढे मांडणारांचा एक वर्ग. अशांस बाह्य सुखांचा फार उपभोग

सांपडत नाही. दुसरा वर्ग सुखाभिलाषी लोकांचा. यास मानसिक सुखापेक्षा शरीरसुखाची चाड विशेष असते. वारुळांत जशी एक खुशालचेंडू राणी मुंगी असते, तीसारखे हे सुखपरायण लोक होत. या सुखपरायण वर्गाशिवाय आणखी एक तिसरा वर्ग असतो. या वर्गांतील लोकांची क्रिया-प्रवृत्ति (शारीर कष्ट करण्याची शक्ति) फार जबरदस्त असते; व एका दृष्टीने त्यांस समाजाचे आधारस्तंभ म्हणतां येईल. यांनी काबाडकष्ट करून चैनीचे पदार्थ उत्पन्न करावे व इतर दोन वर्गांनी त्यांचा उपभोग घ्यावा असें आजपर्यंत बऱ्याच अंशीं चालत आलें आहे: ही असमता ज्या देशांत वाढत जात असेल त्या देशाच्या ऱ्हासाचा प्रारंभ झाला आहे, असें समजावें. जेव्हा या असमतेची परमावधि होते तेव्हा घनघोर राज्यक्रांति होऊन समाजचे समाज लयास जातात, धुळीस मिळतात किंवा त्यांत अपूर्व स्थित्यंतरें होतात. यावरून हें दिसून येतें की, सध्या वरील तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात ते कायमचे नव्हेत. हळूहळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हीं समप्रमाणाने करावीं लागून साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे व जों जों ती तशी होत जाईल तों तों खरी उन्नति होऊं लागली असें म्हणतां येऊं लागेल.

समाजवाद हा शब्द आगरकरांच्या काळीं आपल्याकडे रूढ झालेला नव्हता; पण त्यांच्या वरील प्रतिपादनाचा भावार्थ तोच आहे हें सहज ध्यानांत येईल. त्यांनी हे लेख लिहिले त्या वेळीं संपत्तीची समान नव्हे, पण न्याय्य वांटणी सुद्धा होऊं लागली नव्हती. त्यासाठी दोन महायुद्धें व्हावीं लागलीं; पण त्यानंतर आता पाश्चात्त्य देशांत तरी त्यांनी वर्तविलेली सुखानुभवाची समान इयत्ता प्रत्यक्षांत येत आहे; आणि जेथे ती तशी आलेली नाही त्या देशांची वाटचालहि त्याच मार्गाने चालू आहे, असें दिसतें. हें भविष्यदर्शन पाऊणशे वर्षांपूर्वी आगरकरांना झालें होतें. हाच त्यांच्या प्रतिभेचा विशेष.

## धार्मिक सुधारणा

हिंदु धर्माला आगरकरांच्या काळीं अत्यंत मलिन, हीन रूप आलें होतें. गेलीं हजार वर्षें तो कर्मकांडात्मक जड धर्म झाला होता. समाजाला अत्यंत घातक अशा रूढींचा त्यांत बुजबुजाट झाला होता. अशा त्या धर्माची आगरकरांना अगदी शिसारी येत असे. " हे अमंगल हिंदु धर्मा " असें त्याला संबोधून ते त्याच्यावर प्रखर टीका करीत. ती टीका कोणत्या प्रकारची होती तें मागे आपण पाहिलेंच आहे. आता त्यांच्या मतें धर्माचें उन्नत, परिणत रूप कोणतें होतें तें पाहावयाचें आहे.

(१) **ऐहिक सुखवर्धन** – आगरकरांना हिंदु धर्माचें संशोधन करून त्याला निर्विकल्प रूप आणावयाचें होतें. तें निर्विकल्प रूप कोणतें ? " मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन " हा भावी काळांत सार्वत्रिक धर्म व्हावा अशी त्यांची इच्छा होती. त्या धर्माची त्यांनी स्वतः दीक्षा घेतली होती, आणि आपल्या समानधर्मी सुधारक मित्रांना, " त्यांनी कोणास न भिता, आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त व कल्याणप्रद

वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें, आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें," असा उपदेश ते करीत असत.

यावरून हिंदु धर्मांत कोणती सुधारणा व्हावी असें त्यांना वाटत होतें, उन्नत धर्माविषयी त्यांचे काय विचार होते, याची कल्पना येईल.

धर्माच्या निर्विकल्प रूपाविषयी आगरकरांनी हा जो सिद्धान्त मनाशीं निश्चित केला होता त्याच्यामागे त्यांचें दीर्घ चिंतन, दीर्घ अध्ययन व समाजहिताविषयीची तळमळ ही पुण्याई उभी होती. धर्माविषयी त्यांनी जे विचार मांडले आहेत ते सर्व त्यांतून उद्भवलेले आहेत.

(२) **इहवाद** – आजच्या परिभाषेंत बोलावयाचें, तर आगरकर खरेखुरे इहवादी होते. आज इहवाद, धर्मनिरपेक्षता हें तत्त्व म्हणून आपण स्वीकारलेलें आहे, आणि भारताचें शासन इहवादी करावयाचें अशी येथल्या नेत्यांनी प्रतिज्ञा केलेली आहे; पण तसें घडवावयाचें, तर आपल्या एकंदर सामाजिक व्यवहाराचें अधिष्ठानच बदलणें अवश्य आहे; कारण आज हजारो वर्षें आपल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक . . .सर्व अंगोपांगांवर धर्म-ग्रंथांची अप्रतिहत अशी सत्ता प्रस्थापित झालेली आहे. श्रुति-स्मृति-पुराणोक्त धर्माची हिंदु जीवनावरची ही सत्ता नष्ट झाल्यावांचून येथे इहवाद यशस्वी होणें शक्यच नाही. आगरकरांच्या आधी पन्नास वर्षें राममोहन रॉय, लोकहितवादी, म. फुले, न्या. मू. रानडे इत्यादि थोर पुरुषांनी बुद्धिप्रामाण्यवादाचा पुरस्कार करून ती सत्ता नष्ट करण्याचे प्रयत्न केले. त्या सर्वांमध्ये आगरकरांच्या प्रयत्नांना विशेष महत्त्वाचें स्थान आहे.

आगरकर स्वत: अज्ञेयवादी होते. "ईशस्वरूप आमच्या सांप्रतच्या ज्ञानेंद्रियांस अगम्य आहे. हा धर्मासंबंधीचा शेवटचा सिद्धान्त आहे," असें त्यांनी 'आमचें काय होणार' या निबंधांत सांगून टाकलें आहे; आणि या अनुरोधानेच ते समाजशास्त्रीय तत्त्वांचें विवेचन करीत. 'आम्हा मनुष्यांना पाहिजे काय व तें मिळेल कशाने ?' या आपल्या निबंधांत ऐहिक अभिवृद्धीला, मानवाच्या इहलोकीच्या उन्नतीला (पारलौकिक) धर्माची मुळीच आवश्यकता नाही, असें त्यांनी नि:संदिग्धपणें सांगितलें आहे. ते म्हणतात, "ग्रीस व इटली देशांचें जुनें वैभव, फ्रान्स देशांतील बडी राज्यक्रान्ति, जर्मनी आणि रशिया यांचे जय, पेशव्यांचा प्रचंड राज्यविस्तार, अमेरिकन लोकांचें स्वातंत्र्य व ज्यावरून सूर्य कधी मावळत नाही असें इंग्रजांचें अफाट राज्य यांचा धर्माशीं म्हणण्यासारखा कांहीएक संबंध नाही. यासाठी ऐहिक सुख पाहिजे असेल त्यांनी राजनीति, पदार्थविज्ञान, नीतिप्रसार, विद्योत्तेजन, यंत्र-कलाप्रसार व धनसंचय या विषयांकडे आपलें तन-मन-धन लावावें." याच निबंधांत अन्यत्र त्यांनी म्हटलें आहे की, "ऐहिक व पारमार्थिक सुखाचे विषय व ते संपादण्याचीं साधनें अगदी भिन्न असल्यामुळें एकमेकांचें एकमेकांशीं बहुधा पटत नाही. किंवा तीं परस्परांना उपरोधक असतात, असें म्हटलें तरी चालेल." हा विचार

सांगून ऐहिक उन्नतीसाठीहि धर्माची आवश्यकता आहे, असें आग्रहाने प्रतिपादन करणारे जे न्या. मू. रानडे त्यांच्यावर आगरकरांनी कडक टीका केली आहे.

(३) **बुद्धिवादाचे जनक** – आजच्या इहवादी तत्त्वज्ञानाचा भावार्थ हाच आहे. पारलौकिक, शब्दप्रामाण्यवादी, पोथीनिष्ठ धर्माचें वर्चस्व ऐहिक व्यवहारावर मुळीच असतां कामा नये हाच इहवादाचा मूळ सिद्धान्त आहे. जातिभेद, अस्पृश्यता, बालविवाह, पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, लोकशाही, राजसत्ता, जमिनीची मालकी, इत्यादि जे अनेक प्रश्न सामाजिक जीवनांत निर्माण होतात त्यांच्यासंबंधीचा निर्णय इतिहास, अवलोकन, तर्क, अनुभव, प्रयोग यांच्या आधारानेच केला पाहिजे. श्रुति-स्मृति, बायबल, कुराण यांतील वचनांचा यांत कसलाहि संबंध असतां कामा नये, असे इहवाद सांगतो. आगरकरांच्या प्रतिपादनाचा सारार्थ हाच आहे. भारतांतील बुद्धिवादाचे जनक आगरकरांना म्हणतात तें याच कारणासाठी. त्यांच्या आधीचे राममोहन, रानडे, दयानंद इत्यादि थोर पुरुष जीर्णवादी लोकांप्रमाणे शब्दप्रामाण्यवादी नव्हते; पोथींतील अंध-धर्माचे अनुयायी नव्हते. तरी सामाजिक सुधारणांना शास्त्रवचनांचा आधार शोधून काढावा, असा त्यांचा प्रयत्न असे. आगरकरांना हें मनु-पाराशरांचे वर्चस्व मुळीच मान्य नव्हतें. आम्हांला सामाजिक बाबतींत निर्णय करण्याचा त्यांच्याइतकाच अधिकार आहे, असें तें निश्चयाने सांगत.

मनुष्यजातीची पूर्णावस्था भविष्यकाळीं व्हावयाची आहे हा बुद्धिवादी पंडितांचा दुसरा सिद्धान्त आहे. बहुतेक सर्व प्राचीन धर्मवेत्ते असें मानीत नाहीत. त्यांच्या मतें मानवी समाजाची पूर्णावस्था मागे सत्ययुगांत होऊन गेली व आता तिचा अध:पात चालू आहे. म्हणूनच सध्याच्या युगाला कलियुग म्हणतात. मनु, कानफ्यूशियस इत्यादि धर्मवेत्त्यांचे समाजाला स्थिरावस्था आणण्याचे प्रयत्न असत ते याचसाठी. कारण गति प्राप्त झाली की ती अध:पतनाकडेच नेणार, असें त्यांना वाटत असे. म्हणून आहे ही स्थिति तरी टिकवावी या हेतूने त्यांनी धर्मशास्त्र रचलें होतें आणि तसें शास्त्र रचून समाजाला स्थिरावस्था आणण्यांत ते यशस्वी झाले होते, यांत शंका नाही. याच अवस्थेला आगरकर शिलावस्था म्हणतात, आणि हिंदु समाजावर ओढवलेली ती सर्वांत मोठी आपत्ति होय, असें त्यांचें म्हणणें होतें, आणि तें अगदी यथार्थ होतें. त्यामुळेच आता ती शिलावस्था नष्ट करावयाची तर मनु-याज्ञवल्क्यांच्या धर्मशास्त्रामागे सत्य-कलियुगाची जी कल्पना होती ती नष्ट करणें अवश्य होतें. त्याच हेतूने आगरकरांनी हा प्रपंच केला आहे. पुढे सर्व कलियुग आहे, आता कांही केलें तरी समाजाचा अध:पातच होणार हा विचार ज्या लोकांच्या मनांत दृढमूल होऊन बसणार आहे त्यांची उन्नति होणें कदापि शक्य नाही. कारण उद्योग करण्याची उभारी माणसाला येते ती भविष्यकाळच्या आशेमुळे. ती आशाच कलियुगाच्या तत्त्वज्ञानामुळे नष्ट झाल्यावर उद्योग करण्याचा उत्साह मानवाच्या

मनांत टिकून राहणें शक्यच नसतें. हें जाणूनच आगरकरांनी मानवी समाजाची पूर्णावस्था पुढे आहे, हा सिद्धान्त मांडला आहे. कारण मनुष्यजातीचें ऐहिक सुख-संवर्धन हें त्यांचें अंतिम उद्दिष्ट होतें.

(४) **विषयसुखाचें महत्त्व** – ऐहिक, भौतिक सुखभोगाचें महत्त्व आगरकर सांगतात तो विचार असाच क्रान्तिकारक आहे. सर्व धर्मांनी या सुखभोगांची निंदाच केलेली आहे. वेदान्ती संन्यासमार्गी, पारलौकिक धर्मनिष्ठ पंडित नेहमी संसार, स्त्री-पुत्र, धन, राज्य, वैभव यांचा तिरस्कार करतात व त्यांचा त्याग केला पाहिजे, त्यावांचून मोक्ष मिळणार नाही, असें प्रतिपादन करतात. पण मानवजातीचें मोक्ष हें ध्येय आहे हेंच आगरकरांना मान्य नाही. अखिल मानवजातीला ऐहिक सुखाचा लाभ करून देणें यालाच ते धर्म मानतात. त्यामुळे ऐहिक सुखभोगाचें ते आध्यात्मिक सुखासारखेंच आदराने वर्णन करतात. "भात-भाकरीवर कसा तरी जीव राखावा व दोन जाडेभरडे कपडे घालून शरीर झाकावें यापलीकडे आमच्या लोकांची सुखोपभोगाची कल्पना जातच नाही" याविषयी खेद प्रदर्शित करून आगरकर म्हणतात, "आपल्यामध्ये स्वसुखोपभोगाची ही जी हेळसांड माजली आहे, ती अत्यंत दूषणीय आहे, इतकेंच नव्हे तर ती देशाला शारीरिक व मानसिक दारिद्र्य येण्याचें आदिकारण होय. (केसरींतील निबंध, पुस्तक दुसरें, पृ. १२२). ऐहिक सुखाकडे या दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ति असल्यामुळेच आगरकरांनी त्याचे पुढील उद्‌गार काढले आहेत. "तीव्र भूक व विषयवासना यांस उत्तम रीतीने भागवितां आल्यास जें समाधान होतें तें अद्वितीय व अवर्णनीय आहे, हें सत्यप्रिय व विचारी मनुष्यास कबूल केलें पाहिजे" (पृ. १४४). ऐहिक सुखाची व त्यांतल्या त्यांत विषयसुखाची उठल्याबसल्या निंदा करण्यास चटावलेल्या वेदान्त-प्रवण मनुष्यास हे उद्‌गार अगदी असह्य होतील; पण हेच विचार राष्ट्राच्या समृद्धीला व म्हणूनच लोकशासनाला पायाभूत होत असतात हें जाणून ते निर्भयपणें सांगितल्याबद्दल आपण आगरकरांना शतशः धन्यवाद दिले पाहिजेत.

(५) **प्रवृत्तिवाद** – ऐहिक सुखाविषयी असा दृष्टिकोण असलेला पंडित प्रवृत्तिवादाचाच पुरस्कार करणार यांत शंका नाही. आगरकरांनी अनेक ठिकाणीं तसा पुरस्कार केला आहे. 'समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक' या निबंधांत ते म्हणतात, "मनुष्यांत व इतर प्राण्यांत एक मोठा भेद आहे. उदरपोषण व स्वजातिवर्धन यांशिवाय इतर सुखांची इतर प्राण्यांना कल्पनाहि नसते; पण मनुष्याला या दोन सुखांशिवाय इतर अनेक मानसिक व शारीरिक उपभोग घेण्यासारखीं मनें व शरीरें प्राप्त झालीं आहेत व त्या अनेक सुखोपभोगांकडे त्याची प्रवृत्तीहि आहे. आता यामुळे मनुष्य अधिक सुखी आहे की नाही याचें समाधानकारक उत्तर देतां येईल, असें वाटत नाही. थोडया वासना व थोडी तृप्ति आणि पुष्कळ वासना व पुष्कळ तृप्ति या दोन स्थितींपैकी इष्टतर कोणती याचा निर्णय करण्यास कोण समर्थ होणार आहे? या

वादांत समंजस मनुष्याने कधी पडूं नये. यांतूनच निवृत्ति व प्रवृत्ति असे दोन विचार व आचारपंथ झाले आहेत; पण फल-मूलाशन करून राहवें, पूर्ण वैराग्याचें अवलंबन करावें, पर्वतांच्या गुहांत वास करावा आणि संसाराच्या भानगडींत पडूं नये, असे निवृत्तिपंथाचे प्रचारक आज शेकडो वर्षें सांगत असतां, व बऱ्याच अंशीं वागून दाखवीत असतां प्रवृत्ति मार्गाकडे जग अधिकाधिक चाललें आहे. तेव्हा सामान्य विचाराअंतीं असें दिसून येईल की, ऐहिक उपभोगांमुळे मनुष्यप्राणी इतर प्राण्यांपेक्षा सुखी होवो न होवो, त्या उपभोगांची वांछा तृप्त करावी असाच मनुष्याचा स्वभाव आहे; आणि हें जाणून त्याने इतर प्राण्यांपेक्षा शेकडोपट अधिक उद्योग केला पाहिजे.

असा उद्योग न केला तर मनुष्याला इष्ट वाटणारीं सुखें तर मिळणार नाहीतच; पण तसा उद्योग करणाऱ्या लोकांशीं निवृत्तिमार्गी लोकांची गाठ पडली तर त्यांचें स्वातंत्र्यच नष्ट होईल व त्या उद्योगी लोकांच्या अधीन होऊन त्यांना रहावें लागेल. हिंदु लोकांचें सध्या तसें झालें आहे. शेकडो वर्षें कमी वासना व कमी तृप्ति हा निवृत्तिमार्ग स्वीकारून ते निरुद्योगी राहिले; आणि आता अत्यंत उद्योगी अशा इंग्रज लोकांशीं त्यांची गाठ पडली आहे. तेव्हा एकतर आम्ही त्यांच्यासारख्या उद्योग करण्यास राजी झालें पाहिजे किंवा ते ज्या स्थितींत आम्हांला ठेवतील त्या स्थितींत राहण्यास सिद्ध झालें पाहिजे. आमचें भावी स्वातंत्र्य, अथवा आमचें निरंतरचें दास्य, सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे.

प्रवृत्तिवादावर एक आक्षेप नेहमी घेतला जातो. मनुष्य एकदा ऐहिक सुखाच्या मागे लागला की सुखेच्छेला, त्याच्या वासनांना मर्यादा राहत नाही, आणि त्यामुळे समाजाचा अधःपात होतो. या आक्षेपाला आगरकरांनी दिलेलें वरील उत्तर अभिनव असें आहे. जास्त वासना व जास्त तृप्ति यांमुळे मनुष्य सुखी होवो न होवो; पण भीतीमुळे तो निरुद्योगी झाला तर जो अधःपात होतो तो केव्हाहि स्वीकारार्ह ठरणार नाही. निवृत्तीमुळे समाजाचें स्वातंत्र्यच जातें. यापेक्षा दुसरा अधःपात तो काय ? निरयगति कांही निराळी असते काय ?

आगरकरांनी हिंदु धर्मावर व एकंदर धर्म या संस्थेवर फार प्रखर टीका केली आहे; आणि ऐहिक उत्कर्षास धर्माची मुळीच गरज नाही असें म्हटलें आहे; पण ही त्यांची टीका कर्मकांडात्मक धर्मावर आणि पारलौकिक धर्मावर होती हें आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे; पण धर्माचा व्याप एव्हढा मर्यादित नाही. समाजाचा प्रभव (उत्कर्ष) ज्याने होतो तो धर्म, ज्यामुळे धारणा होते तो धर्म, अशा ज्या धर्माच्या व्याख्या प्राचीनांनी केलेल्या आहेत, त्याअन्वये पाहतां आगरकरांना धर्मनिष्ठा पूर्ण मान्य होती, असें दिसून येईल. ध्येयवाद, त्याग, सदाचार, नीतिनिष्ठा, लोकसेवा, परोपकार, सत्यनिष्ठा या तत्त्वांनी संपन्न असा जो धर्म तोच खरा धर्म होय, असें त्यांनी अनेक ठिकाणीं म्हटलें आहे; आणि त्या भूमिकेंतून कर्मकांडात्मक धर्मावर टीका केली आहे. कारण त्या धर्माचे पुरस्कर्ते मांसाहार, मदिरापान, व्यभिचार,

अनृत-भाषण, विश्वासघात, अप्रामाणिकपणा, क्रूरपणा हीं महापातकें आचरणाऱ्या मनुष्यावर तुटून पडत नसत. निदान त्याकडे दुर्लक्ष करीत. असा महापातकी मनुष्य स्नानसंध्या, टिळेमाळा, जपजाप्य करीत असेल तर त्याच्या पायाचें तीर्थ घेण्यासहि सनातन धर्मनिष्ठ लोक तयार होतील; पण या पातकापासून अगदी अलिप्त असलेला मनुष्य जर शूद्राच्या हातचें पाणी पिईल तर मात्र त्याला ते धर्मभ्रष्ट मानतील ! अशी टीका करून आगरकर संतापाने म्हणतात, काय धर्म ! काय धर्म-शास्त्रें ! धिक् तुमच्या धर्माला, आणि तुम्हांला !

आगरकरांचा रोख कशावर होता हें यावरून ध्यानीं येईल. समाजाचा अभ्युदय घडविणारा जो धर्म त्यावर त्यांचा मुळीच आक्षेप नव्हता. इतकेंच नव्हे; तर त्या धर्माचें त्यांनी स्वतःच जन्मभर आचरण केलें होतें. याच दृष्टीने प्रा. वामन-राव जोशी यांनी त्यांना धर्मनिष्ठ, आस्तिक असें म्हटलें आहे. वामनराव 'ध्येय हाच देव' मानीत असत. आणि त्या अर्थाने आगरकरांची देवावरहि श्रद्धा होती असें त्यांनी म्हटलें आहे.

आचार, नीति व तत्त्वज्ञान हीं धर्माचीं तीन अंगें. त्यांतील आचाराला जड कर्मकांडाचें रूप आलें की तो आगरकरांना त्याज्य वाटे. एरवी सदाचार, बुद्धि-पूर्वक घालून दिलेले नियमन त्यांना मान्यच होते. नीतीसंबंधी वर लिहिलेंच आहे. नीति हाच खरा धर्म असें त्यांना वाटत असे. राहिलें तत्त्वज्ञान. या बाबतींत आगरकरांनी फारसें विवेचन कोठें केलेलें नाही. 'ईशस्वरूप आमच्या सांप्रतच्या ज्ञानेंद्रियास अगम्य आहे,' असें ते म्हणत असत; पण कोणत्याहि प्रकारच्या तत्त्व-ज्ञानास त्यांनी कधी तुच्छ लेखिलें नाही. उलट त्या चिंतनाचें त्यांनी फार महत्त्व गाइलें आहे. देवतोत्पत्ति या विषयाचा समारोप करतांना ते म्हणतात, "जो जो बुद्धीचा विकास होत जाऊन कार्यकारणांचा संबंध कळूं लागतो तो तो प्राथमिक व पौराणिक कल्पना मिथ्या भासूं लागून भूत-पिशाच, देव-दानव यांची असत्यता प्रत्ययास येते. पूजेस व प्रार्थनेस ओहोटी लागते आणि कांही वेळ सर्व ब्रह्मांडास उत्पन्न करून त्याचें परिपालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्प-नेचा उदय होतो. पण पुढे वेदान्त-विचाराच्या कुंडांत पेटलेल्या अग्नींत हें द्वैतहि खाक होऊन जातें व अहं ब्रह्मास्मि एवढा अनिर्वचनीय विचार मागे राहतो ! व्यक्तीच्या व राष्ट्राच्या धर्मविचारांचा हा कळस आहे. येथपर्यंत ज्याची मजल आली त्याला सर्व धर्म तुच्छ आहेत !

मोठमोठे वेदान्ती-तत्त्ववेत्ते तरी यापेक्षा निराळें काय सांगतात ?

## राजकीय सुधारणा

आगरकर जसे कडवे सामाजिक सुधारक होते, तसेच राजकीय क्षेत्रांतहि सुधारणावादी होते, हें त्यांचें असामान्यत्वच म्हटलें पाहिजे. कारण बहुधा असें आढळत नाही. महाराष्ट्रांतील इतर पुढारी कुठल्या तरी एकाच क्षेत्रांत विशेष

कार्य करणारे होते. लोकहितवादी, रानडे, भांडारकर यांनी मुख्यतः सामाजिक व धार्मिक सुधारणेचा पुरस्कार केला. त्यांच्या लेखांत लोकांचे सामान्य हक्क, प्रतिनिधित्व अशांसारख्या राजकीय सुधारणांची मागणी आहे, नाही असें नाही; पण त्यांचा मुख्य भर सामाजिक व धार्मिक सुधारणांवर होता. त्याच्या उलट टिळक प्रभृति जहाल पुढाऱ्यांचा मुख्य भर राजकीय सुधारणांवर होता. त्यांना सामाजिक सुधारणा नको होती असें नाही; पण राजकीय स्वातंत्र्यासाठी सर्व सामर्थ्य वापरलें पाहिजे, त्यानंतर सामाजिक सुधारणा सहज होतील, असें त्यांचें मत होतें. आगरकरांना मात्र समाजाची सर्वांगीण सुधारणा होणें अत्यंत आवश्यक वाटत होतें. राजकीय, धार्मिक व सामाजिक या तिन्ही क्षेत्रांत सुधारणा होते तेव्हाच समाजाची खरी उन्नति होते, असें त्यांचें मत होतें आणि सर्व सुधारणा एकाच वेळीं होणें उचित होय असेंहि त्यांना वाटत होतें; पण धार्मिक व सामाजिक सुधारणा प्रथम झाल्यावांचून राजकीय सुधारणा करणें व मिळालेलें स्वातंत्र्य टिकवणें हिंदु समाजाला शक्य नाही म्हणून सामाजिक सुधारणांना त्यांनी अग्रक्रम दिला. तथापि त्यांच्या अनेक लेखांत त्यांनी राजकीय सुधारणांचेंहि विवेचन केलें आहे आणि जहाल पक्ष इंग्रजी राज्यकारभारावर जशी कडक टीका करीत असे, तशीच टीका आगरकरांनीहि केली आहे. तिचें स्वरूप आता पाहवयाचें आहे.

(१) **दारिद्र्य** – ‘ गुलामाचें राष्ट्र ’ या लेखांत आगरकरांनी हिंदुस्थानच्या दुर्दशेचें वर्णन केलें आहे. इंग्रज सरकारने आपल्या राज्याच्या रक्षणासाठी जें सैन्य ठेवलें होतें त्यावर अतोनात खर्च चालू होता आणि इतर खात्यांचा कारभारहि अत्यंत महागडा होता. एका शतकांत त्यासाठी दोन निखर्व रुपये या देशांतून परदेशांत गेले. अशा प्रकारे हा देश धुऊन निघत होता, इंग्रज लोक त्याची लूट करीत होते. त्यामुळे इथल्या लोकांची अन्नान्नदशा झाली होती. हें इंग्रजी राज्य असेंच चालू राहिलें, तर त्याचे या देशावर इतके भयंकर दुष्परिणाम होतील की, भुकेमुळे बेफाम झालेले लोक सरकारविरुद्ध बंड करून उठतील असें त्यांना वाटत होतें. ज्याला या देशाविषयी कळकळ आणि लोकहिताविषयी तळमळ वाटत असेल त्याने ही वस्तुस्थिति उघड करून सांगितलीच पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. ह्यूमसाहेबाने आपल्या पत्रांत हिंदुस्थानांतल्या भयानक दारिद्र्याचें वर्णन केलें होतें; आणि दादाभाई नौरोजी, डॉ. हंटर वगैरे लोकहि तेंच सांगत होते. इथले निम्म्याहून जास्त लोक अर्धपोटी आहेत, असेंच त्यांचें म्हणणें होतें.

दुसऱ्या एका लेखांत आगरकरांनी मुंबई शहराच्या तत्कालीन वैभवाचें वर्णन करून पुढे असें म्हटलें आहे की, हा सगळा बाह्य देखावा डोळे दिपविणारा आहे. वरवर पाहणाराला सगळीकडे झगमगाट दिसत असला, ऐश्वर्य भरलेलें दिसत असलें, तरी या देशाची व लोकांची स्थिति याहून अगदी वेगळी आहे, फार वाईट आहे. देशांतील बहुतेक संपत्ति फक्त कांही शहरांतून साठलेली आहे व तीहि इंग्रज

लोकांच्या मालकीची आहे. बाकी सर्व लोक भुकेकंगाल झालेले आहेत. ई. इं. कंपनी इथला कारभार पाहत होती तेव्हा इथल्या लोकांची स्थिति बरी होती; पण ब्रिटिश सरकारचें राज्य सुरू झाल्यापासून ती खालावत गेली आणि आता तर कमालीची बिघडली आहे. कांही उदार वृत्तीचे इंग्रज लोक हें जाणतात व तसें कबूलहि करतात; पण इथला कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांना मात्र तसें वाटत नाही. इथे सर्व आबादीआबाद आहे, इथले लोक सुखी आहेत, अशी त्यांची समजूत झाली असून, त्याप्रमाणे ते ब्रिटिश सरकारला व लोकांना सांगतात.

अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत चांगली समृद्धि होती, असें एका इंग्रज मनुष्याने लिहून ठेवलें आहे. इथल्या लोकांना आवश्यक अशा सर्व गोष्टी इथे भरपूर मिळत होत्या. कशाची कमतरता नव्हती. पण त्यानंतर एका शतकाच्या आंत, इथे इंग्रजांचें राज्य आल्यामुळे आता भयानक दारिद्र्य पसरलें आहे. हिंदुस्थानाचा वित्तक्षय चालू आहे. ब्रिटिश लोकांनी जी राज्यव्यवस्था इथे सुरू केली आहे व जे कायदे केले आहेत ते सर्व ब्रिटिश लोकांच्या व व्यापाऱ्यांच्या हितार्थ केले आहेत. त्यामुळे या देशाचें सतत शोषण चालू आहे. चरकांत घालून उसाचा रस काढतात त्याप्रमाणे ते परकीय राज्यकर्ते हिंदी लोकांचें रक्त पिळून घेत आहेत. ही राज्यपद्धति आर्थिक दृष्टीने हिंदुस्थानला अत्यंत हानिकारक असून, तिच्यामुळे आम्ही लवकरच नाहीसें होऊं, असें भय आगरकरांनी व्यक्त केलें आहे; पण पुढे त्यांनी असेंहि म्हटलें आहे की, इंग्लंडमध्ये मेकॉले, रिपन यांच्यासारखे उदार वृत्तीचे बरेच लोक असून, ते हिंदुस्थानावर अशी विपत्ति येऊं देणार नाहीत, असें वाटतें.

इंग्रज लोक जाणुनबुजून आम्हांला दारिद्र्याच्या खाईंत लोटत नसले तरी, त्यांनी केलेल्या कायद्यांमुळे तसें नकळत घडत आहे, हें खरें. म्हणून त्यांच्या नजरचुकीने आमचें जें नुकसान होत आहे तें त्यांच्या ध्यानांत आणून दिलें पाहिजे. त्यांना वस्तुस्थिति समजावून दिली पाहिजे, असेंहि आगरकरांनी म्हटलें आहे.

जगांत जे सुधारलेले देश आहेत, त्यांतील हिंदुस्थान हा सर्वांत गरीब आहे, हे दाखविणारे कांही आकडे आगरकरांनी आपल्या लेखांत दिले आहेत. ग्रेट ब्रिटनमधील प्रत्येक माणसाचें वार्षिक उत्पन्न ४२० रुपये, कॅनडांतील माणसाचें २६९ रुपये, हॉलंडमधे २६०, फ्रान्समध्ये २५८, जर्मनींत १८८, पोर्तुगालमधे १४०, नॉर्वेत १३०, रशियांत १००, तर हिंदुस्थानांतील प्रत्येक माणसाचें सरासरी वार्षिक उत्पन्न फक्त २० रुपये; आणि त्यांतले सगळे त्याला मिळतेंच असें नाही. कांही भाग परदेशांत जातो. त्याचा वार्षिक खर्च मात्र ३० रुपये असतो. याचा अर्थ असा की, बहुसंख्य लोकांना पोटभर अन्न मिळत नाही. माणसाचा निरोगीपणा ज्यावर अवलंबून असतो, तें मीठ देखील आपल्याला योग्य प्रमाणांत मिळत नाही. इंग्लंडमधील प्रत्येक माणसामागे ७० पौंड मीठ खर्च होतें, तर हिंदुस्थानांत प्रत्येकाला वर्षांत १० पौंडच मीठ मिळतें. या हलाखीचे भयंकर परिणाम हिंदुस्थानांतील लोकांवर स्पष्ट दिसत

आहेत. इंग्लंडमधील मनुष्याचें सरासरी आयुर्मान ४० वर्षें आहे तर, हिंदी माणसाचें फक्त २३.५ वर्षें. हिंदुस्थानांतील जमीन सुपीक आहे, निसर्गसंपत्ति भरपूर आहे, सर्वांना पुरेसें अन्न येथे उत्पन्न होतें, पण तरीहि लोकांना पोटभर अन्न मिळत नाही. त्यामुळे लाखो लोक अकालीं मरून जातात. त्याशिवाय रोगराईला बळी पडणारे लाखो लोक निराळेच. इंग्रजांच्या राज्यांत इतर सुखसोयी व सुधारणा बऱ्याच आल्या. शांतता प्रस्थापित झाली. शिक्षणाचा प्रसार झाला, हें खरें. पण लोकांना अन्नवस्त्र पुरेसें मिळत नसतांना त्या सुधारणांना मुळीच किंमत नाही. तेव्हा इंग्रज राज्यामुळे अखेरीस आमचें काय हित होईल हें सांगणें कठीण आहे, असें आगरकरकरांनी म्हटलें आहे.

(२) **दारिद्र्याचीं कारणें** — अशा प्रकारे हिंदुस्थानांत जें भयानक दारिद्र्य पसरलें होतें, त्याचीं कारणमीमांसा आगरकरांनी कांही लेखांत केली आहे. ब्रिटिश सरकारचे जे सनदी व बिनसनदी नोकर हिंदुस्थानचा कारभार पाहत होते, त्यांना मोठाले पगार दिले जात, त्यांच्या राहण्याच्या जागा, त्यांचा प्रवास, त्यांचीं पेन्शनें, यांसाठीहि अवाढव्य खर्च होत असे. हा सर्व खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून केला जाई. आधीच हिंदुस्थानांतील नोकरशाहीचा कारभार अत्यंत उधळेपणाचा होता आणि त्यांत रुपयाचा भाव खाली आल्यामुळे त्या नोकरवर्गाचें बरेंच नुकसान होऊं लागलें. तेव्हा सर्वांनी आकांडतांडव करून आपला पगार वाढवून घेतला. त्याचा बोजा हिंदुस्थानच्या तिजोरीवरच पडला. तो प्रचंड खर्च भागवण्यासाठी गरीब प्रजेवरील कर वाढवणें एवढाच उपाय सरकारजवळ होता.

हिंदुस्थानांतील दारिद्र्याचें दुसरें कारण म्हणजे इंग्रज लोकांनी इथले उद्योगधंदे बंद पाडून इंग्लंडमध्ये उत्पन्न होणाऱ्या वस्तूंचा मोठा व्यापार इथे सुरू केला हें होय. त्या मार्गें दरवर्षीं अमाप संपत्ति हिंदुस्थानांतून इंग्लंडला जात असल्यामुळे इथल्या उद्योगधंद्यांना आणि व्यापाराला पुरेसें भांडवल मिळेनासें झालें. मुसलमानांच्या स्वाऱ्या पूर्वी येऊन गेल्या त्या वेळीं त्यांनी जी संपत्ति लुटून नेली तिला कांही मर्यादा होती. पुढे मुसलमानी राज्य सुरू झालें तेव्हा ते राज्यकर्ते व सरदार वगैरे सर्व लोक इथेच स्थायिक झाल्यामुळे संपत्तीचा बाहेर जाणारा ओघ थांबला, इथला व्यापार खूप वाढला व देशाची भरभराट झाली. इंग्रजांनी मात्र स्वतःचा व्यापार वाढवण्यासाठी हिंदी लोकांचा व्यापार बुडवला आणि त्यामुळे हिंदुस्थानांत दारिद्र्य वाढलें.

दारिद्र्याचें तिसरें कारण म्हणजे ब्रिटिश साम्राज्यासाठी जीं युद्धें चालू होतीं, त्यांचा सगळा खर्च हिंदुस्थानच्या माथीं टाकला जात होता. ब्रह्मदेशाशीं युद्ध, वायव्य सरहद्दप्रांतांतील लढाया, यांचा खर्च भागवण्यासाठी हिंदी प्रजेवर कर वाढवण्यांत आले आणि प्रांतिक सरकारांनी शिक्षणावरील खर्च कमी करून केंद्र-

सरकारला जास्त द्रव्य द्यावें, असा हुकूम काढण्यांत आला. ही नवीन प्रकारची सरंजामदारीच सरकारने सुरू केली होती.

या युद्धांमुळे फायदा झाला इंग्लंडचा, खर्च मात्र हिंदुस्थानचा. त्यामुळे प्राप्तीवरील कर व मिठावरील कर वाढवण्यांत आला. रुपयाचा भाव कमी झाल्यामुळेहि बोजा वाढला आणि अनेक वस्तु महाग झाल्या. अशा प्रकारे सर्व बाजूंनी लोकांचें दारिद्र्य वाढत गेलें.

(३) **इंग्रजांचें काळें अंतरंग** – इंग्रज लोकांमध्ये कांही उदार वृत्तीचे पुरुष असले तरी, एकंदरींत ते लोक किती स्वार्थी व मतलबी होते याची आगरकरांना पूर्ण जाणीव होती. इंग्रजांच्या स्वार्थी धोरणाचें विवेचन त्यांनी 'तीन अर्थशास्त्रें' या लेखांत केलें आहे. इंग्रजांनी हिंदुस्थान जिंकला व येथे आपलें राज्य स्थापलें तें कांही हिंदी लोकांच्या कल्याणासाठी नव्हे, तर स्वतःच्या फायद्यासाठीच ते राज्य करीत आहेत आणि तें अगदी स्वाभाविक आहे, असें आगरकरांनी म्हटलें आहे. त्यांच्या येथील राज्यामुळे हिंदुस्थानांतलाच नव्हे, तर सबंध आशिया खंडांतला बहुतेक व्यापार त्यांच्या हातीं आला आणि त्यामुळे तें राष्ट्र गबर झालें. त्यामुळे इथल्या लोकांचा व्यापार बंद झाला त्याची त्यांना मुळीच पर्वा नाही. या व्यापारामुळे त्यांचा अतोनात फायदा होतो, तो सोडायला ते कधीहि तयार होणार नाहीत. आगरकर म्हणतात, "आमचा सगळा व्यापार आमच्या हातीं फिरून पडूं देण्यापेक्षा आमचें राज्य ते आम्हांस अधिक आनंदाने परत देतील !"

प्रजेची फारच हलाखी होऊन असंतोष वाढूं नये म्हणून राज्यकर्ते प्रजेच्या कल्याणाची चिंता वाटते असें दाखवतात; पण तें नाटक असतें. चौकशीसाठी कमिशन नेमावें, शेतकऱ्यांना थोडी सूट द्यावी, करांत थोडी सूट द्यावी, एखादा कालवा काढावा किंवा विहीर खणावी, बीं-बियाणें वांटावें, गुरांचा दवाखाना काढावा, कोठे जंगलांतील गवत मोफत द्यावें, अशा प्रकारच्या क्षुल्लक सुधारणा करून, ते त्यांचा गाजावाजा खूप करतील, पण कापूस, धान्य, भिन्न धातु, यंत्रें यांचा व्यापार आमच्या हातीं यायला हवा, तो मात्र येऊं देणार नाहीत. काळजापर्यंत जाऊन भिडलेल्या जखमेवर नुसती मलमपट्टी करून कांही उपयोग होत नाही, चांगलीं औषधें द्यावीं लागतात. व्यापार हेंच आमचें रक्तवर्धक औषध होय. पण राज्यकर्ते आम्हांला तें देत नाहीत. फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, वगैरे स्वतंत्र देश आपापल्या व्यापाराला उत्तेजन व संरक्षण देतात तसें इंग्लंड देखील स्वतःच्या व्यापारासाठी मदत देतें; पण हिंदुस्थानच्या बाबतींत मात्र 'सरकारने व्यापारांत हस्तक्षेप करूं नये' या सामान्य नियमाकडे सरकार बोट दाखवतें. तेलंग, रानडे, दादाभाई नौरोजी या शास्त्रज्ञांनी सरकारला आमच्या व्यापारास कशी मदत करतां येईल तें सुचवलें असलें तरी, सरकार तिकडे लक्षच देत नाही. झोपेचें सोंग करणाऱ्याला जागे कसें करतां येणार ! तसेंच या बाबतींतहि सरकारच्या विनवण्या करून कांही उपयोग होत नाही.

इंग्लिश लोकांच्या अनेक गुणांची आगरकरांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली असली, तरी त्यांचें राजकीय व आर्थिक धोरण अन्यायाचें आहे हें उघडपणें सांगणें आपलें कर्तव्य आहे असें ते मानीत. त्यांच्या चुका दाखवण्याचें काम आपण करावें, त्या सरकारने दुरुस्त केल्या तर ठीकच. नाही तर " प्रजेची दारुण दैन्यावस्था कोणत्याहि राज्यकर्त्यांस केव्हा तरी विघातक झाल्यावांचून राहत नाही " असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

अठराव्या शतकांत इंग्लिश लोकांच्या दृष्टीने हिंदुस्थानांतली परिस्थिति फार बिकट होती. तथापि अनंत हालअपेष्टा सोसून त्यांनी येथे आपली सत्ता स्थापिली. त्यांचा पराक्रम व त्यांची कर्तबगारी सध्या येथे राज्य करणाऱ्या लोकांत मुळीच नाही. उलट ते नादान, क्रूर व स्वार्थी असून, विलासीहि आहेत. त्यांना कित्येक सुखोपभोग मिळत असूनहि त्यांची इथल्या परिस्थितीबद्दल तक्रार असतेच; हिंदुस्थानला ते काळें पाणी म्हणजे अगदी वाईट देश म्हणतात. हिंदुस्थानांत नोकरी करणें म्हणजे हद्दपार केलेल्या मनुष्याप्रमाणे कष्टमय, दुःखमय जिणें कंठणें असें मानतात. अशा इंग्रज अधिकाऱ्यांना आगरकर विचारतात की, " हिंदुस्थानांत जर तुमचे एवढे हाल होतात, तर तुम्ही येथे येतां कशाला ? इकडे आल्यानंतर तुम्हांला जर इथे राहणें असह्य वाटूं लागतें, तर तुम्ही परत कां जात नाही ? येथे राज्य करणें जर तुम्हांला कठीण वाटत असेल, तर तें तुम्ही सोडून कां देत नाही ? तुमच्या सुखासाठी इथल्या गरीब लोकांना कां पिळून काढतां ? "

अफू व दारू यांच्या बाबतींत ब्रिटिश सरकारने जें दुटप्पी धोरण अवलंबिलें होतें, त्यावर आगरकरांनी खूप ताशेरे झाडले आहेत. वास्तविक पाहतां हे दोन्ही मादक पदार्थ अपायकारक आहेत; पण तुलनेने पाहतां अफूपेक्षा दारूचे परिणाम जास्त घातक असतात. अल्प प्रमाणांत अफूचें सेवन केलें तर तें शरीराच्या आरोग्याला उपकारक ठरतें असेंहि एक मत आहे; पण ब्रिटिश सरकार इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्या दारूचा खप हिंदुस्थानांत वाढविण्यास उत्तेजन देतें; कारण त्यामुळे ब्रिटिश व्यापाऱ्यांचा फायदा होतो. हिंदुस्थानांतील लोकांचें दारूचें व्यसन कमी करण्यासाठी इंग्लंडमधून येणाऱ्या दारूवर अधिक कर बसविणें अवश्य आहे, पण त्यामुळे ब्रिटिश व्यापाऱ्यांचें नुकसान होईल, म्हणून सरकार तसें करीत नाही. दारूपायीं आमचें वाटोळें झालें तरी चालेल, पण इंग्रजांचें नुकसान होतां कामा नये, म्हणून हिंदी लोकांच्या घशांत दारूच्या बाटल्या ओतायच्या, असें सरकारचें धोरण आहे. अफूच्या कमी घातक व्यसनापासून मात्र हिंदी लोकांची सुटका केलीच पाहिजे, असें सरकारला वाटतें. हिंदुस्थानांतून चीनमध्ये जी अफू जाते तिच्यामुळे हिंदुस्थानला आठ-नऊ कोटि रुपये फ़ायदा होतो; पण हा व्यापार बंद करण्याचा सरकारचा विचार आहे. कारण अफू खाणें फार वाईट ! त्यामुळे आर्थिक नुकसान झालें तरी पर्वा नाही, कारण तें नुकसान नेटिव्ह संस्थानांचें व हिंदुस्थान सरकारचें होतें. त्यावर मानभावी-

पणें त्यांनी तें कसें तरी भरून काढावें असें ब्रिटिश सरकार म्हणतें. दारूचें व्यसन कितीहि वाईट असलें तरी, तिच्या खपावर आळा घालून स्वतःचें नुकसान करून घ्यायला मात्र तें सरकार तयार नाही. पण सुदैवाने अफूचा व्यापार बंद करण्याविषयी जो ठराव पार्लमेंटमध्ये मांडण्यांत आला होता, त्याला ग्लॅडस्टनने विरोध केल्यामुळे तो रद्द झाला आणि ग्लॅडस्टनने मांडलेला नेमस्त ठराव पसार झाला. अफूचा व्यापार नीतीच्या दृष्टीने हीन असला, तरी या बाबतींत केवळ नैतिक तत्त्वांचा विचार करून चालणार नाही; तर आर्थिक व राजकीय विचारहि केला पाहिजे; हिंदुस्थानचें किती नुकसान होईल, प्रजेची काय दशा होईल, इतर अडचणी काय येतील, हें पाहिलें पाहिजे, असें त्याने प्रतिपादिलें आणि तें पार्लमेंटने मान्य केलें; पण अशी गोष्ट घडणें हें अपवादात्मकच.

'हिंदुस्थानचें राज्य कोणासाठी' या लेखांतहि आगरकरांनी इंग्रजांचा स्वार्थीपणा उघड करून दाखविला आहे. लिबरल पक्षाच्या कांही नेत्यांच्या मनांत ग्लॅडस्टनप्रमाणे हिंदुस्थानविषयी उदारपणाचे विचार येत असत; हिंदुस्थानांत यांत्रिक शिक्षणाची व कारखान्यांची वाढ व्हावी, राज्यकारभाराच्या निरनिराळ्या खात्यांत हिंदु लोकांना अधिकाराच्या जागा द्याव्या, सारांश, त्या लोकांची प्रगति व्हावी असें त्या नेत्यांना वाटत होतें; पण कॉन्झर्वेटिव्ह पक्षाच्या लोकांना मात्र तें मंजूर नव्हतें. हिंदी लोकांना कोणत्याहि खात्यांत वरच्या जागा देऊं नयेत, कारखाने तेथे वाढूं नयेत असेंच त्यांचें ठाम मत होतें; कारण त्यामुळे इंग्रजांचें वर्चस्व कमी झालें असतें. हिंदुस्थानचा फायदा होवो न होवो, त्यांना त्याची पर्वा नव्हती. इंग्लंडचा फायदा झाला पाहिजे, इंग्रजांचें राज्य कायम राहिलें पाहिजे हाच त्यांचा हेतु होता. त्यामुळे हिंदुस्थानांत इथल्या लोकांसाठी सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा ठेवण्यासहि त्यांचा विरोध होता. हिंदु लोकांनी राज्यकारभारांत शिरकाव करणें त्यांना मुळीच पसंत नव्हतें. कारण त्यामुळे तेवढ्या जागा इंग्रजांना कमी झाल्या असत्या व त्यांना चरायला रान कमी झालें असतें

"इंग्लंड व हिंदुस्थान यांचा संयोग घडून आल्यापासून हिंदुस्थानचें कांहीच कल्याण झालें नाही किंवा हिंदुस्थानच्या लोकांस मुळीच न्याय मिळाला नाही, असें प्रतिपादणें म्हणजे केवळ कृतघ्नपणा होय, हें आम्हांस कबूल आहे; पण ज्या गोष्टींचा संबंध इंग्लंडच्या तिजोरीशीं, तेथील व्यापाराशीं किंवा इंग्रजांच्या अन्य हिताहिताशीं पोचत असेल अशा बाबतींत इंग्लंडने हिंदुस्थानचें कल्याण केल्याचें किंवा येथील लोकांस इंग्लंडपासून न्याय मिळाल्याचें क्वचितच उदाहरण दाखवितां येईल." आगरकरांच्या या विधानांत वरील सर्व विवेचनाचें सार आहे. साम्राज्यासाठी युद्धें, व्यापार, सिव्हिल सर्व्हिस या बाबतींत अन्याय झालाच होता. त्यांत कापडावरील जकातीबाबतच्या धोरणामुळे भरच पडली. रुपयाची किंमत कमी झाल्यामुळे जी तूट येणार होती, ती भरून काढण्यासाठी सरकारने परदेशांतून

येणाऱ्या मालावर शेकडा पांच जकात बसविण्याचें ठरविलें होतें. ही जकात म्हणजे हिंदुस्थानातील लोकांवर अप्रत्यक्ष करच होता; पण त्यांतहि मोठा अन्याय म्हणजे ब्रिटिश गिरणी मालकांच्या फायद्यासाठी त्यांच्या कापडावरील जकात माफ करणें हा होय. मँचेस्टरचें कापड इकडे येत होतें, त्यावर जकात बसविली तर तिथल्या गिरणीवाल्यांचा रोष पत्करावा लागला असता. आणि तें ब्रिटिश सरकारला परवडणारें नव्हतें. हिंदुस्थानचें नुकसान झालें तरी चालेल, पण ब्रिटिश कारखानदारांचें व व्यापाऱ्यांचें नुकसान मुळीच होता कामा नये, हेंच त्याचें धोरण होतें. मग तूट भरून काढण्यासाठी प्राप्तीवरील कर वाढवण्याचा विचार सुरू झाला. हा विचार तर फारच घातक होता. "इंग्लिश अधिकाऱ्यांचे खिसे भरण्यासाठी आधीच निष्कांचन झालेल्या प्रजेला असें पिळून काढणें अत्यंत लज्जास्पद आहे; सरकारच्या या वर्तनास काय नांव द्यावें तें आम्हांस समजत नाहीं," असे उद्‌गार आगरकरांनी काढले आहेत. तसेच आयात होणाऱ्या यंत्रसामग्रीवर व दगडी कोळशावर जकात बसल्यामुळे हिंदुस्थानांतील गिरणीवाल्यांचें कापड महाग होऊन त्यांना बाहेरील मालाशीं चढाओढ करणें कठीण पडणार होतें. मँचेस्टरवाल्यांना ही जकात पडणार नव्हती; आणि कापडावरहि जकात नाही; म्हणजे त्यांचा दुहेरी फायदा होणार.

हिंदुस्थानांतील दारिद्र्याची मीमांसा करून व इंग्लंडच्या स्वार्थी धोरणावर टीका करून आगरकरांनी राज्यकर्त्यांना वारंवार इशारा दिला आहे की, आतिलोभ धरूं नका; नाही तर तुम्हांला हें राज्यच सोडून जावें लागेल. पूर्वी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अमर्याद लोभामुळे १८५७ सालचा प्रक्षोभ ओढवून घेतला, त्याचप्रमाणे ब्रिटिश राज्यकर्ते भरमसाठ कर वाढवून प्रजेंत असंतोष वाढवीत आहेत; त्याचा परिणाम फार घातक होईल. दारिद्र्य असह्य झालें तर प्रजा बंड करून उठेल; आणि "इतक्या कष्टाने रचलेली इमारत ढासळल्यावांचून राहणार नाही", असें आगरकरांनी लिहिलें आहे. "लोभमूलानि पापानि" हें वचन ध्यानांत ठेवा, असेंच त्यांच्या लेखाचें शीर्षक आहे.

(४) **स्वावलंबन** – अशी विपन्नावस्था आलेली असतांना, ती नाहीशी करून ऊर्जितावस्था आणण्यासाठी स्वावलंबन हाच सर्वोत्तम उपाय होय, असें आगरकरांनी प्रतिपादलें आहे. आपणच आपल्या भाग्याचे शिल्पकार आहोंत; "नर करणी करे तो नरका नारायण हो जाय" हें हिंदी वचन लक्षांत ठेवून आपण दीर्घोद्योगाचा अवलंब करायला हवा, तरच आपली स्थिति सुधारेल व सर्व प्रकारचे सुखोपभोग आपल्याला मिळूं लागतील, असें त्यांनी म्हटलें आहे. सरकारचें नियंत्रण करण्याचें सामर्थ्य लोकांच्या अंगीं असलें पाहिजे. सरकार जुलमी असणें किंवा नसणें, हें लोकांवर अवलंबून असतें. ज्यांना स्वातंत्र्याची खरी चाड असेल, ते योग्य संधि मिळतांच आपलें स्वातंत्र्य मिळवण्यासाठी धडपड करतील. "इंग्लिश लोकांनी आमची संपत्ति नेली, आम्हांला गुलाम केलें, कंगाल केलें, असें रडगाणें गात बसण्यांत अर्थ नाहीं" म्हणून

लोकांना जागे करून, उद्योगास प्रवृत्त करावें, स्वतःच्या पायावर उभे राहून दारिद्र्य नष्ट करण्याचा मार्ग दाखवावा हाच त्यांच्या लेखनाचा हेतु होता.

स्वावलंबनाचा मार्ग दाखवतांना आगरकरांनी आपल्या लोकांच्या नादानपणावरहि ताशेरे झाडले आहेत. आम्ही दुबळे, नालायक म्हणून आमचें राज्य गेलें व त्यामुळेच आमचा व्यापार बुडाला, उद्योगधंदे बंद झाले आणि दारिद्र्य कपाळीं आलें. इंग्रज लोक आपण होऊन सुखासुखी त्यांचे कारखाने आमच्या ताब्यांत देणार नाहीत. धमक असेल तर ते आपण आपल्या कर्तबगारीने काबीज केले पाहिजेत; पण आम्ही पंगु, अडाणी व आळशी असल्यामुळे तें कठीण आहे. इंग्रज लोक उद्योगप्रिय आहेत, कारण त्यांना सुखोपभोगाची आवड आहे; आणि त्यासाठी नाना प्रकारच्या वस्तु निर्माण करण्याची बुद्धि आहे; पण आम्हांला हजारो वर्षें वैराग्याची शिकवण मिळालेली असल्यामुळे सुखोपभोगाची फारशी आवड नाही, व त्यासाठी उद्योग करण्याची इच्छा नाही. आम्ही अल्पसंतुष्ट आहों. हा अल्पसंतुष्टपणा सोडल्याशिवाय आम्हांला मोठमोठे उद्योग करतां येणार नाहीत. देशासाठी कष्ट करण्याची व नुकसान सोसण्याची ईर्षा बाळगून मोठे यांत्रिक कारखाने काढले पाहिजेत, व खंडोगणती माल उत्पन्न केला पाहिजे, असें त्यांनी म्हटलें आहे.

आता मोठाले उद्योग व कारखाने सुरू करावयाचे म्हणजे मोठें भांडवल हवें. त्याचा तर आमच्याकडे अभाव ! तें उभारण्यासाठी लोकांनी आपला सोन्याचा हव्यास कमी करावा; दागदागिने, लग्नसमारंभ यांवरील खर्च कमी करावा; ज्यांच्याजवळ थोडाबहुत पैसा शिल्लक असेल त्यांनी तो बँकेंत न ठेवतां थोडेसें धाडस करून उद्योगधंदेवाल्यांना द्यावा; मग भांडवल निश्चित जमेल, असें आगरकरांनी म्हटलें आहे.

शेवटीं आगरकरांनी पुढील वाक्यांत वरील सर्व कहाणीचें सार सांगितलें आहे – आमच्या अंगीं देशाभिमान असता; आम्ही धर्मवेडाने वेडावून जाऊन आपापसांत तंटे करीत नसतों; परशत्रूला तोंड देण्यासारखी आम्हांत जूट असती; राष्ट्रहितासाठी स्वहितत्याग करण्याची आवड आम्हांस असती; आम्हांस आमचें राज्य चालविण्याची अक्कल असती; आणि कोणत्याहि प्रकारच्या संकटास न डगणारें धैर्य आमच्या अंगीं असतें, तर मुसलमान तरी येथे कशाला येते ! आणि इंग्रज तरी कशाला येते ! तेव्हा रडत न बसता राज्यकर्तृत्वाचे गुण संपादन करणें हाच श्रेष्ठ उपाय होय, असा उपदेश त्यांनी केला आहे.

समाजसुधारणांचीं मुळें ज्याप्रमाणे धर्मशास्त्रांत गुंतलेलीं होतीं त्याचप्रमाणे आर्थिक सुधारणांचीं मुळें पारतंत्र्यांत, सत्ताधाऱ्यांच्या राजनीतिशास्त्रांत गुंतलेलीं होतीं. त्यामुळे आगरकरांनी आर्थिक व राजकीय सुधारणांचा विचार बहुधा एकत्रच केलेला आहे. त्यामुळे त्यासंबंधीचें विवेचनहि येथे एकत्र केलेलें आहे.

- ६ -

# प्राचीन परंपरेचा अभिमान

आगरकरांनी आपल्या लेखांतून स्वकीय समाजांतील चालीरीति, रूढि, सण, धार्मिक आचार, विधि, जातिभेद, गुणलोप यांवर प्रखर टीका केली आहे; आणि परकीय लोकांची विद्या, त्यांची समाजव्यवस्था, त्यांचा राज्यकारभार यांची विलक्षण स्तुति केली आहे. त्यामुळे त्यांच्यासंबंधी कांही लोकांचा असा गैरसमज झाला होता की, त्यांना भारतीय संस्कृतीबद्दल तिरस्कार वाटत होता; पण हा समज खरा नाही. इंग्लिश लोकांची त्यांनी अनेक बाबतींत स्तुति केलेली असली, तरी त्यांच्या राजकीय व आर्थिक धोरणावर त्यांनी कडक टीका केली आहे ( हें आपण वर पाहिलेंच आहे ); आणि त्यांनी आपल्या प्राचीन परंपरेचा अभिमानहि वारंवार प्रगट केला आहे. समाजाची सुधारणा व्हावी या सद्हेतूनेच त्यांनी सामाजिक दोषांवर टीका केली व इंग्रजांचे गुण गाईले हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे.

**स्वधर्म**

आगरकरांना स्वधर्माचा विलक्षण अभिमान होता. हिंदु धर्मांत अनेक व्यंगें असलीं किंवा आमच्या अनेक चालीरीति मूर्खपणाच्या असल्या तरी, आपला धर्म सोडून दुसरा एखादा धर्म स्वीकारणें हें त्यांना मुळीच मान्य नव्हतें. तसें करील तो सुधारकच नव्हे; स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भितां, त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे, असें त्यांनी म्हटलें आहे. हिंदु धर्मांतील दोष दाखवून त्यावर ते तीक्ष्ण प्रहार करीत असले तरी, धर्मांतर त्यांनी निंद्यच मानलें होतें. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या थापांना भुलून अतिशूद्र लोक ख्रिस्ती धर्माकडे धांव घेत होते, ही

गोष्ट त्यांना उद्वेगजनक वाटत होती; कारण ख्रिस्ती लोकांच्या धर्मसमजुती कांही अधिक चांगल्या नव्हत्या. देश ख्रिस्ती व्हावा, ही कल्पनाहि त्यांना असह्य वाटत होती. पाश्चात्त्य लोकांचे जे विचार योग्य वाटत असतील, ज्या कल्पना ग्राह्य असतील त्यांचा स्वीकार केला पाहिजे हें खरें. पण जुनें असेल तेवढें सर्व टाकून, प्रत्येक गोष्टींत परकीयांचें अनुकरण करणें ही सुधारणाहि नव्हे व तें हितावहहि नाही; तर भारतीय संस्कृतीमधील चांगल्या गोष्टी न सोडतां अवश्य तेवढ्याच पाश्चात्त्य कल्पना अंगीकारणें उचित होय, असें त्यांनी प्रतिपादिलें आहे.

## भारतीय कला

स्वधर्म व स्वसमाज यांवर टीका करतांना आगरकरांनी आपले असंख्य दोष दाखवून, आपल्या समाजाची इंग्रजांशीं तुलना करून आपण अत्यंत क्षुद्र लोक आहों, असें म्हटलें आहे; पण असें असलें तरी त्यांनी असेंहि स्पष्टपणें सांगितलें आहे की, आज आपली स्थिति अतिशय हीन झाली असली तरी तेवढ्यावरून प्राचीन काळींहि आपली तशीच स्थिति होती असें मुळीच सिद्ध होत नाही. अनेक लेख लिहून त्यांनी असें दाखवून दिलें आहे की, आम्ही ज्याचा अभिमान धरावा असें खूपच वैभव आमच्या प्राचीन इतिहासांत होतें. ते म्हणतात, "नीति, औदार्य वगैरे मानसिक गुणांचा, किंवा काव्य, चित्र, गायन, वादन इत्यादि ललितकलांचा, अथवा दुर्गरचना गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथे अभ्युदय होऊन त्यांची इतकी समृद्धि झाली होती की, त्या संबंधाने आजमितीस सुद्धा आम्हांस कोणापुढेहि खाली पाहण्याची आवश्यकता नाही.

जी नवीन यंत्रकला पाश्चात्त्य देशांत विकास पावली आहे, ती युरोपियन लोकांकडून आम्हांला शिकायला हवी हें खरें; पण आमची जुनी हस्तकलाहि उच्च दर्जाची होती आणि तिचें रक्षण करणें अत्यंत आवश्यक आहे, असें मत आगरकरांनी प्रगट केलें आहे. जुन्या हस्तकलेच्या विकासासाठी त्या नवीन यंत्रकलेचें साहाय्य घेतलें पाहिजे; नाही तर तिचा लोप होईल, असें त्यांचें म्हणणें आहे. ती हस्तकला अभिमानास्पद असल्यामुळेच ती नष्ट होणें त्यांना इष्ट वाटत नव्हतें.

## पाश्चात्त्य पंडितांची टीका

कांही पाश्चात्त्य पंडितांनी अशी टीका केली आहे की, हिंदुस्थानांतील लोकांनी स्वत: कलाकौशल्याची अभिवृद्धि कधीच केलेली नाही; जें कांही हस्तकौशल्याचें काम इथे दिसतें, तें सर्व त्यांनी ग्रीक, रोमन व मुसलमान यांच्याकडून शिकन केलेलें आहे. त्यांचें स्वत:चें असें येथे कांही नाही. हें विधान कसें साफ चुकीचें आहे हें सिद्ध करण्यासाठी आगरकरांनी पुष्कळ परिश्रम करून साधकबाधक पुरावे गोळा केले आहेत. यासंबंधी त्यांनी जें विवेचन केलें आहे, त्याचा सारांश खाली दिला आहे, त्यावरून भारतीय कलांचें पुराणत्व निर्विवादपणें सिद्ध होतें, यांत शंका नाही.

कलांच्या अभिवृद्धीसाठी कोणत्याहि देशांत समृद्धि असावी लागते. अन्नधान्य, वस्त्रप्रावरण यांची विपुलता असते तेव्हाच कलावंतांना चरितार्थासाठी फार कष्ट वा चिंता करावी लागत नाही; आणि कलाकुसरीचीं कामें करायला वेळ व स्वस्थपणा मिळूं शकतो. भारतांत प्राचीन काळीं सर्व प्रकारची समृद्धि नांदत होती. हिमालय, विंध्य, सह्य वगैरे पर्वतांवर घनदाट अरण्यें असून, त्यांत नाना प्रकारचे वृक्ष होते, शेकडो जातींचे पशुपक्षी होते; सर्वत्र सुपीक जमीन असून खंडोगणती धान्य पिकत होतें; येथे खनिज संपत्ति भरपूर होती. एकंदरींत कशाची कमतरता नसल्यामुळे या देशांतील लोकांना कलेचा विकास करण्यासाठी अवश्य असणारें स्वास्थ्य लाभत होतें.

या समृद्धीमुळे हिंदुस्थानांत विविध प्रकारच्या कला पूर्वी विकसित झाल्या होत्या, हें अनेक प्रमाणांनी सिद्ध करून दाखवतां येतें. मनुस्मृति हा ग्रंथ सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीचा असून, त्यांत अनेक कलांचा व कारागिरांचा उल्लेख आहे. त्यांचें सविस्तर वर्णन त्या ग्रंथांत नसलें, तरी त्या काळीं त्या कला विकसित झालेल्या असल्या पाहिजेत, हें उघड आहे. देवालयें, हौद, विहिरी, प्रासाद, दुर्ग, इत्यादि बांधण्याचें शास्त्र हिंदु लोकांना ज्ञात होतें.; लोकर, कापूस, ताग, रेशीम यांपासून वस्त्रें विणून तीं रंगविण्याची कला त्यांना अवगत होती; सोन्यारुप्याचे दागिने घडविण्यांत ते कुशल होते. लोखंड, तांबें, पाषाण, हस्तिदंत यांचीं पात्रें वा सुबक वस्तु ते बनवीत होते; नाणीं तयार करीत होते, आणि विविध प्रकारच्या वस्तूंचा परदेशांशीं मोठा व्यापार चालू होता, असें मनुस्मृतीवरून कळतें. तोपर्यंत भारतांत ग्रीक लोक येऊन स्थायिक झाले नव्हते; आणि मुसलमान तर त्यानंतर शेकडो वर्षांनी आले. तेव्हा आज ज्या कला येथे आढळतात त्यांची अभिवृद्धि फार प्राचीन काळीं झालेली आहे; तिचा ग्रीक वा मुसलमान लोकांशीं कांही संबंध नाही. रामायण व महाभारत या ग्रंथांतहि असे अनेक उल्लेख आढळतात. सर जॉर्ज बर्डवूड यांनी रामायणाच्या आधारे हिंदुस्थानच्या कलांच्या पुराणत्वाचें मंडन केलें आहे. भरत रामाला भेटण्यासाठी निघाला, त्या वेळीं अयोध्येंतील लोकहि त्याच्याबरोबर निघाले. त्यांत सर्व प्रकारचे कारागीर होते, असें वर्णन रामायणांत आहे. यावरून त्या काळीं त्या कला विकसित झालेल्या होत्या, यांत कांही शंका नाही. ग्रीक लोक हिंदुस्थानांत कायमचे राहिले नव्हते; पण त्यांच्याशीं भारतीय लोकांचें दळणवळण मात्र चालू होतें. तेवढ्यावरून हिंदु लोकांनी ग्रीकांकडून सगळी कारागिरी घेतली, असें म्हणतां येत नाही. उलट येथील कलाकुसरीच्या वस्तु परदेशांत जात होत्या व त्यांचें तिकडे कौतुक होत असे, असेंच त्यावरून म्हणावें लागेल. मुसलमान लोक इथे येऊन स्थायिक झाले, व त्यांनी येथे राज्य केलें हें खरें; पण ते संस्कृतीने श्रेष्ठ नव्हते; त्यामुळे त्यांचा प्रभाव पडणें शक्य नव्हतें; आणि ते येण्यापूर्वीच आमच्या कला विकसित झालेल्या होत्या.

## वेदांतील पुरावा

वेद हे हिंदूंचे आद्य ग्रंथ आहेत आणि ते सर्वांत प्राचीन ग्रंथ आहेत याविषयी जगांतील पंडितांचें एकमत आहे. वेदांतील ऋचा म्हणजे इंद्र, वरुण, सूर्य इत्यादि देव यांच्या प्रार्थना आहेत. त्या प्रार्थना ज्या आर्यलोकांनी केल्या आहेत, त्यांना अनेक वस्तूंचे धर्म समजलेले असावे, ते वन्यावस्थेंतून वर येऊन त्यांच्यांत समाज-व्यवस्था उत्पन्न झालेली असावी, त्यांना राज्यधर्म, माहीत झालेला असावा, असें अनुमान करतां येतें. पंडितकृत वेदार्थयत्नांत, वेदांत निरनिराळ्या वस्तूंचे व कलांचें जे उल्लेख आहेत त्यांची जंत्री दिली आहे. त्यावरून त्या काळीं आर्य लोकांना सोनें, रुपें, लोखंड इत्यादि धातूंचा उपयोग माहीत होता, शेती व पशुपालन हे उद्योग ते करीत होते, धनुष्यबाण, खड्ग, रथ वापरीत होते, घरें, शहरें व किल्ले बांधीत होते, असें दिसून येतें. यावरून असें सिद्ध होतें की, या सर्व कला येथे अत्यंत प्राचीन काळीं उदय पावल्या आणि विकसित झाल्या होत्या.

## बाह्य पुरावा

भारताच्या प्राचीन संस्कृतीविषयी परकीय संशोधकांनी पुष्कळ लिहून ठेवलेलें आहे. 'फ्लारिडा' व 'पेरिप्लस' या ग्रंथांत भारताच्या व्यापाराविषयी बरीच माहिती मिळते. मिरी, दालचिनी, नीळ, केशर, हळद, कापूर, हस्तिदंत या पदार्थां-प्रमाणेच सोन्यारुप्याचे दागिने, रेशमी कापड, मलमल, साखर; साग, शिसवी, शिंगें, वगैरेंचें कोरीव सामान; काचेचीं भांडीं, सोन्यारुप्याचीं तबकें इत्यादि वस्तूहि भारतांतून परदेशीं जात होत्या. इ. स. पूर्वी अनेक शतकें असा व्यापार चालत होता, असें त्या ग्रंथांवरून कळतें. यावरून प्राचीन काळीं पुष्कळ उच्च दर्जाची संस्कृति भारतांत नांदत होती, हें सिद्ध होतें.

## हिंदु स्त्रीचें चारित्र्य

स्वधर्म व प्राचीन भारतीय परंपरा यांबद्दल आगरकरांना जसा अभिमान होता, तसाच हिंदु स्त्रीच्या चारित्र्याविषयी त्यांना फार आदर होता. त्यावर कोणीं कुत्सित टीका केलेली त्यांना मुळीच खपत नसे. अशबरनर नामक एका इंग्लिश गृहस्थाने नॅशनल रिव्ह्यूमधील आपल्या लेखांत हिंदु विधवांबद्दल अत्यंत अशिष्ट विधानें केलेलीं जेव्हा त्यांनी वाचलीं तेव्हा ते फारच संतापले. मात्र त्यांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीने संयमपूर्वक लेख लिहून त्या आरोपाचें खंडन केलें आहे. अशबरनरने लिहिलें होतें की, " हिंदु विधवांस वाटेल तसा आनाचार करण्यास हिंदु समाजाने पूर्ण सनद दिली आहे. तिच्या पापाचरणाकडे समाज जाणूनबुजून दुर्लक्ष करितो. " या आरोपांत मुळीच तथ्य नाही; कारण कर्नल मनरोसारख्या गृहस्थांनी हिंदु स्त्रियांचें शुद्ध आचरण आदर्शवत् मानलें आहे, असें आगरकरांनी दाखवून दिलें आहे.

अशबरनरप्रमाणेच ऑगस्टस बुड्लर्ड नांवाच्या एका लष्करी अधिकाऱ्यानेहि हिंदु स्त्रियांविषयी विपर्यस्त विधानें केलेलीं होतीं. त्यांचाहि आगरकरांनी एका लेखांत असाच समाचार घेतला आहे. त्या गृहस्थानें हिंदुस्थानी संगीताचा खोल अभ्यास करून एक ग्रंथ लिहिला. तो चांगला असला, तरी त्याने नायकिणींच्या तोंडीं असलेल्या शृंगारिक चीजांवरून इथल्या सामान्य स्त्रियांना अगदी कामातुर ठरवून टाकलें आहे आणि त्याची कारणमीमांसाहि केली आहे. अशा प्रकारे काव्य व संगीत यांवरून लोकांच्या नीतीविषयी कांही निष्कर्ष काढणें हें अगदी खुळचट व चुकीचें आहे, असें सांगून शेवटीं आगरकर म्हणतात, "कोणत्याहि देशांतील लोकांनी दुसऱ्या देशांतील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचें धाडस करूं नये. तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचाराने आणूं लागतील, तर तुमच्या मडमांनी आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें इतक्या त्या पवित्र आहेत, असें म्हणण्यास आम्ही कधीहि सोडणार नाही ! हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतकें शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याहि देशांत सापडणार नाही."

- ७ -

# व्यक्तिमत्त्व

**करुणा, मानवता**

आगरकरांची मूळ प्रेरणा मानवतेची, करुणेची, भूतदयेची होती असें दिसतें. विष्णुशास्त्री, टिळक, सावरकर यांची प्रेरणा राष्ट्रोद्धाराची, स्वातंत्र्याची, होती. दीन, दलित जनता, शूद्र, अस्पृश्य, स्त्रिया यांचा उद्धार व्हावा याची आच त्यांना नव्हती असें नाही; पण तसें न केल्यास समाज संघटित होणार नाही, एकजूट साधणार नाही, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत ब्रिटिशांविरुद्ध अखिल भारताची आघाडी उभारतां येणार नाही, ही त्यांना मूळ चिंता होती. अखिल जनता जागृत करण्यासाठी त्यांनी आपापल्या परीने प्रयत्न केले ते राष्ट्रसंघटनेच्या हेतूने. आगरकरहि राष्ट्रनिष्ठ व स्वातंत्र्यवादीच होते, पण समाजसुधारणेचा त्यांचा जो आग्रह होता, त्यासाठी त्यांना जी पराकाष्ठेची तळमळ वाटे तिच्या मागे दया, करुणा ही प्रेरणा फार प्रभावी होती. म्हणजे त्यांचें चित्त गलबलून येत असें तें बालविधवा, उपेक्षित स्त्रिया, दलित जनता यांना भोगाव्या लागणाऱ्या यातना, कष्ट, जुलूम यांमुळे. विषमता, अन्याय हा मानवतेविरुद्ध अन्याय आहे, याचा त्यांना संताप येत असे आणि तो अन्याय दूर झाला पाहिजे, ती विषमता नष्ट झाली पाहिजे, हा त्यांचा पहिला उमाळा असे. ते लेखणी उचलीत ती त्या प्रेरणेने.

**तीव्र भावना**

यामुळेच आगरकर आपल्या दोन थोर सहकाऱ्यांपेक्षा जास्त भावनाप्रधान झाले होते. विष्णुशास्त्री व टिळक यांच्या वृत्तींत व लेखनांत भावनांचा ओलावा तसा फार कमी, पांडित्याचा प्रकर्ष करून, इतिहासांतील प्रमाणांचा वर्षाव करून, उपरोध, उपहास, या शस्त्रांनी प्रतिपक्षाला जमीनदोस्त करण्यावर विष्णुशास्त्री

यांचा भर असे. आणि शत्रूवर तसा भडिमार केल्यावर त्याच्याकडे विष्णुशास्त्री मिस्किलपणें पाहत उभे आहेत, असें चित्र मनापुढे येतें. लो. टिळक स्थितप्रज्ञ वेदान्ती होते. सुख-दुःख, राग-द्वेष त्यांनी जिंकले होते. म्हणून लहान, आटोपशीर वाक्यांत वस्तुस्थिति सांगून ते अन्याय व जुलूम यांची कल्पना आणून देत. "मनांत रागद्वेष न आणतां, कर्तव्य-बुद्धीने तूं लढ" असें श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितलें. त्याला तें कितपत जमलें हा प्रश्नच आहे; पण टिळक तसे लढत आहेत, असें चित्र मनापुढे येतें, हें खरें आहे. जनतेंत संताप, असंतोष, चीड निर्माण व्हावी हें त्यांचें उद्दिष्ट होतें; आणि त्या भावनांचा प्रक्षोभ निर्माण करण्यासाठी अवश्य तो संताप व चीड तेहि व्यक्त करीत; पण हें सर्व कर्तव्य-बुद्धीने, कर्मयोगी वृत्तीने चाललें आहे, असें वाटावें, अशी त्यांच्या लेखनाची, भाषणाची बैठक असे. आगरकर मात्र जीवनाच्या मूळ कंदापासून उन्मळून लिहीत-बोलत आहेत असें वाटतें. सनातनी लोकांविरुद्ध, ब्रिटिशांविरुद्ध, ते संतापून लिहितात, तेव्हा ते त्या संतापाच्या आहारीं गेले आहेत असें वाटतें.

बालविवाह, त्यापायी मुलींच्यावर होणारे अत्याचार, अस्पृश्यांची होत असलेली मानखंडना, विधवा स्त्रियांचें सक्तीने होणारें वपन, सनातन्यांचें ढोंगी सोवळें-ओवळें, हें पाहून त्यांचा मनःक्षोभ अनावर होई, आणि मग ते हिंदु समाजावर मर्मभेदी टीका करीत. तुम्ही नादान आहांत, भेकड आहांत, तुमचा धर्म अमंगल आहे, बीभत्स आहे, निर्दय आहे, वंचक आहे, असे शब्द त्यांच्या लेखणींतून उतरत, आणि ज्या हिंदु धर्माने हीं अनन्वित कृत्यें करविलीं त्याचीं पाळेमुळें खणून काढून विचारकुंडांत पेटलेल्या अग्नींत त्यांची आहुति देण्यास ते सिद्ध होत; आणि इतका भडिमार करूनहि हा समाज सुधारण्याचीं चिन्हें दिसलीं नाहीत की, अतिशय निराश होऊन हा हिंदु समाज नष्ट होऊन गेला तरी बरें, असे आततायी उद्‌गार ते काढीत. इतकी कमालीची तीव्रता व उत्कटता विष्णुशास्त्री व टिळक यांच्या भाषेंत क्वचितच व्यक्त होते.

## बुद्धिप्रामाण्य

पण असें भावनांचें वर्चस्व मनावर असूनहि आगरकर कमालीचे बुद्धिप्रामाण्यवादी होते. केवळ भावनाप्रेरित असें लेखन त्यांनी केव्हाहि केलें नाही. कॉलेजमध्ये असतांनाच त्यांनी मिल्ल व स्पेन्सर ह्यांच्या ग्रंथांचा अभ्यास केला होता. त्याचे त्यांच्या मनावर खोल संस्कार झाले होते, आणि त्यामुळेच ते प्रखर बुद्धिवादी झाले होते. त्यांच्या आधी महाराष्ट्रांत निर्माण झालेले जांभेकर, लोकहितवादी, रानडे, भांडारकर, तेलंग हे जे थोर पुरुष यांच्यांत अंधश्रद्धावादी कोणीच नव्हतें; पण जुन्या धर्मशास्त्रांतील अनुकूल वचनें शोधून काढून त्यांच्या आधारें परिवर्तन घडवून आणावें असें त्यांचें धोरण होतें. आगरकरांना हें मुळीच मान्य नव्हतें. एका ऋषीविरुद्ध अशा रीतीने दुसरा ऋषि उभा करण्यांत कांही अर्थ नाही, असें ते म्हणत. त्या ऋषींना जेवढी प्रज्ञा होती, बुद्धि होती, ज्ञान होतें तेवढेंच, किंवा थोडें अधिकच

आम्हांला आहे, असें ते निर्भयपणें सांगत, आणि अशा रीतीने कोणत्याहि प्रकारच्या प्रामाण्याच्या मुळावरच कुठार घालीत.

### क्रांतिवाद

यामुळेच आगरकर पूर्णपणें क्रांतिवादी झाले होते. क्रांतिवाद व पुनरुज्जीवनवाद हे जगांतले दोन सनातन पंथ आहेत. सुधारणा दोन्ही पंथांना हवी असते; पण जुनेच घासून-पुसून त्याला नवें रूप द्यावें, त्यांतच अवश्य तो बदल करून त्याचा स्वीकार करावा, असे पुनरुज्जीवनवादी म्हणतात ( अलीकडे अंधश्रद्धेने जुन्याचें समर्थन करणें असा पुनरुज्जीवन याचा अर्थ झाला आहे. तो बरोबर नाही ) क्रांतिवादी जुन्याचीं पाळेंमुळें खणून तेथे सर्वस्वीं नवीनाची स्थापना करावी, अशा वृत्तीचा असतो. आगरकर प्राधान्याने क्रांतिवादी होते. विष्णुशास्त्री, टिळक हे प्राधान्याने पुनरुज्जीवनवादी होते. जुन्या स्वरूपांत चातुर्वर्ण्य किंवा विवाहविषयक रूढि टिकून राहव्या असें त्यांना वाटत नसे, पण जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्य त्याज्य मानलें तरी गुणकर्मनिष्ठ चातुर्वर्ण्य अवश्य मानावें असें ते म्हणत. चातुर्वर्ण्य मुळांतच नष्ट करून टाकावें, अशी आगरकरांची विचारसरणी होती. विवाहाच्या बाबतींत असेंच होतें. बालविवाह टिळकांना मान्य नव्हता, पण सुधारणा सुचवितांना, मुलीचें लग्न पंधराव्या वर्षानंतर करावें, इतक्याच मर्यादेपर्यंत टिळक जातात, पण आगरकर एकदम पाश्चात्त्य लोकांप्रमाणे आपण प्रेमविवाह रूढ करावे व जो प्रेमविवाह नाही तो बालविवाहच होयं असें सांगून, प्रणयबद्ध तरुण स्त्री-पुरुषांच्या प्रणयांतील उत्कट आनंदाचें मुक्त मनाने वर्णन करतात. टिळकांच्या बाबतींत हें कल्पनेला सुद्धा सहन होणार नाही.

### नास्तिक

मिल्ल, स्पेन्सर यांचा अभ्यास, बुद्धिप्रामाण्य व रूढ हिंदु धर्माची आलेली घृणा याचीच परिणति होऊन आगरकर अज्ञेयवादी आणि खरे म्हणजे नास्तिक झाले. जगाचा संसार, न्यायाने, सत्याने आणि सर्व भूतांच्या कल्याणासाठी चालविणारा कोणी परमेश्वर आहे यावर त्यांची श्रद्धा नव्हती. मिल्ल, स्पेन्सर यांचा टिळकांनीहि अभ्यास केला होता, आणि आरंभी न्या. रानडे यांच्याशीं झालेल्या वादांत त्यांनी आगरकरांचाच पक्ष घेतला होता; पण पुढे वेदान्त व प्राचीन भारतीय परंपरा यांचा अभ्यास जसजसा वाढूं लागला तसतसे ते पूर्ण आस्तिक व श्रद्धासंपन्न झाले. आगरकर मात्र शेवटपर्यंत अज्ञेयवादी व नास्तिकच राहिले. यामुळे देवदेवता, धर्मकल्पना, कुटुंब-संस्था यांची मूलगामी चिकित्सा ते करीत व तो धर्म आणि त्या देवता यांची चीरफाड करून त्यांचीं आतडीं नि कातडीं आपल्यासमोर धरीत. धर्मकल्पना, देवकल्पना या मुळांत पिशाच-कल्पनेपासून उदय पावल्या आहेत, आणि देव हें पिशाचाचेंच रूपांतर आहे, असें मत ते मांडतात; आणि असे तात्त्विक सिद्धान्त सांगून स्वस्थ न बसतां शंकर या देवतेचें अगदी प्राकृत वर्णन करून ही

देवता म्हणजे एक महापिशाचच आहे, असें ते सांगून टाकतात. लोकमान्य टिळकांना देवतांचें हें मूळ स्वरूप मान्य नसेल असें म्हणतां येणार नाही; पण त्या आधारें सध्या समाज ज्यांना पूज्य मानतो त्या शंकर, गणपति, ब्रह्मा, विष्णु या देवतांची व एकंदर मूर्तिपूजेची अशी चीरफाड त्यांनी कधी केली नाही. मात्र घातक श्रद्धा जपून ठेवाव्या अशी त्यांची वृत्ति नव्हती. नाही तर हजारो वर्षें अखिल भारतांत मान्य झालेल्या शंकराचार्यांच्या 'गीताभाष्यां'तील मतें सांप्रदायिक, एकदेशी व आग्रही ठरवून त्यांनी तीं सर्वथैव त्याज्य मानलीं नसतीं. भागवतांत कर्मयोगाचें महत्त्व कमी करून भक्तीला प्राधान्य दिलें आहे, हें टिळकांना आक्षेपार्ह वाटलें. तरी त्यांनी टीका इतकीच केली की, " भक्तीचें माहात्म्य सांगण्यासाठी, भागवतपुराण ही पुराणपोळी मागाहून बनविली आहे. " श्रीकृष्णाच्या चरित्रांतील गोपींच्याबरोबर त्याने केलेला शृंगार हा भाग विसंगत वाटतो, पण त्यावर " हा भाग मागाहून घातलेला आहे " इतकाच अभिप्राय टिळक देतात; पण आगरकर त्याला एकदम शिनळ, जारशिरोमणि ठरवून मोकळे होतात. परिवर्तन, स्थित्यंतर सर्वांनाच हवें होतें; पण जुन्याचा त्याग करतांना तो संभाळून करावा, आदराने करावा, त्यावर अक्षता टाकाव्या अशी टिळकांची वृत्ति होती. तर तें उचलून नाल्यांत फेकून द्यावें ही आगरकरांची वृत्ति. एक पुनरुज्जीवनवाद तर एक क्रान्तिवाद ! दोन्ही समाजाला सारखेच उपयुक्त.

**पाश्चात्त्य आदर्श**

आगरकरांनी पांडित्य जोडलें तेंहि याच धोरणाने. पुनरुज्जीवन त्यांना मान्यच नसल्यामुळे संस्कृत विद्येच्या ते वाटेसच गेले नाहीत. वेद, उपनिषदें, महाभारत, रामायण यांचा आधार ते कधी घेत नाहीत. या ग्रंथांतील अवतरणें ते कधी देत नाहीत. विष्णुशास्त्री, टिळक यांच्या निबंधांच्या प्रारंभीं पुष्कळ वेळा संस्कृत वचनें दिसतात. आगरकरांनी चुकून सुद्धा प्रारंभीं असें वचन दिलेलें नाही. संस्कृत वचनांच्या आधारें कांही सांगावें, हें त्यांच्या वृत्तींतच नव्हतें. त्यांचे आधार म्हणजे मिल्ल, स्पेन्सर, कोंट. ग्रीस, रोम, रशिया, इंग्लंड, फ्रान्स ह्या देशांचे इतिहास त्यांनी बारकाईने पाहिले होते. क्वेकर, प्रोटेस्टंट ह्या धर्मपंथांचा आधार ते वारंवार घेतात. फ्रेंच-क्रांति, लूथरकृत धर्मक्रांति, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध ह्यांचें सखोल ज्ञान त्यांनी प्राप्त करून घेतलें होतें; आणि त्या आधारांनीच ते आपल्या निबंधांची सजावट करीत; पण वेद, उपनिषदें, रामायण, महाभारत, भर्तृहरि यांच्यांतून जीवनरस घेऊन आपलें साहित्य फुलवावें असें त्यांना कधीच वाटलें नाही. टिळकांना पाश्चात्त्य विद्या, पाश्चात्त्य विज्ञान, पाश्चात्त्य लोकायत्त-संस्था, आगरकरांच्या-इतक्याच, किंबहुना जास्तच महत्त्वाच्या वाटत; पण जीवनरसाचा अमृतकुंभ म्हणजे वेदोपनिषदेंच होत अशी त्यांची धारणा होती. आगरकर मात्र पाश्चात्त्य पंडित, पाश्चात्त्य ग्रंथ, पाश्चात्त्य तत्त्ववेत्ते, त्यांचें तत्त्वज्ञान या प्रवाहांतच अखेरपर्यंत मज्जन करीत राहिले होते.

## अहंप्रत्यय

पाश्चात्य तत्त्वज्ञान व एकंदर पाश्चात्य विद्या ह्यांच्या अखंड चिंतनाने त्यांची अस्मिता, त्यांचा अहंप्रत्यय हा विष्णुशास्त्री, टिळक यांच्याइतका प्रबळ झाला होता. किंवा तो जास्तच प्रबळ असण्याची शक्यता आहे. पाश्चात्त्य आक्रमक, मिशनरी आणि पाश्चात्त्य पंडित यांशीं सामना करावयाचा असल्यामुळे या तीनहि महा-पुरुषांचा अहंप्रत्यय हा अत्यंत प्रबळ व तेजस्वी असणें अवश्यच होतें. त्यावांचून या संग्रामांत ते क्षणमात्र टिकूं शकले नसते; पण आगरकरांना इतरांच्या मानाने दसपट मानसिक बळाची आवश्यकता होती. कारण त्यांना वरील सर्वांशीं सामना देऊन शिवाय स्वजनांशीं लढा करावयाचा होता. स्वजनांविरुद्ध, स्वधर्मीयांविरुद्ध व स्वदेशीयांविरुद्ध आणि एकंदर विश्वाविरुद्ध एकट्याने उभें राहवें, ही परंपरा भारतांत केव्हाच नव्हती. युरोपांत सॉक्रेटिसने ती सुरू केली; आणि वायक्लिफ, जॉन हस, लूथर यांनी व पुढे विज्ञानवेत्त्यांनी ती अखंड चालविली. विश्वाविरुद्ध उभें राहण्याची ही परंपरा भारतांत प्रथम कृतीने महात्मा फुले यांनी व तत्त्वज्ञानाने आगरकरांनी सुरू केली. अशा पुरुषांचा आत्मप्रत्यय हा इतरांपेक्षा दसपटींनी, शतपटींनी भक्कम असला पाहिजे यांत शंकाच नाही. आगरकर त्या आत्मिक बलाने अगदी संपन्न होते. त्यामुळेच मनु-पाराशर, देवदेवता, पुराणें, स्वकालीन विरोधक, निकटचे सहकारी, इंग्रज स्वार्थी पंडित, मिशनरी व राज्यकर्ते ह्यांच्यांशीं अखंड, आमरण झुंज देण्याचें सामर्थ्य त्यांना लाभलें.

## धीर पुरुष

या जगांत सुखाने जगण्यासाठी लोकप्रियता, राजमान्यता व पैसा यांचा आधार अवश्य असतो. न्या. रानडे यांना लोकप्रियता आरंभीं तितकीशी नव्हती, पण पुढे ती बरीच मिळाली. राजमान्यता तर प्रारंभापासूनच त्यांना विपुल प्रमाणांत लाभली. पैशाच्या दृष्टीने ते चांगले संपन्न होते. टिळकांना राजमान्यता शून्य ! नव्हे, शून्याच्याहि खाली; पण ती उणीव लोकप्रियतेने पूर्ण भरून निघाली होती. पुढे पुढे लोक त्यांना परमेश्वरच मानीत. पैशाच्या दृष्टीने पाहतां आरंभीं त्यांना सुस्थिति नव्हती तरी उत्तर काळीं ती चांगलीच मिळाली होती. आगरकरांना यांतलें कांहीहि लाभलें नाही. जन्मापासून दारिद्र्य त्यांच्या राशीस होतें. त्याने त्यांची पाठ शेवट-पर्यंत कधीहि सोडली नाही. देव-धर्म, श्रुति-स्मृति यांशीं त्यांनी वैर धरल्यामुळे त्यांना लोकप्रियता कधीच मिळणें शक्य नव्हतें, आणि टिळकांइतकेंच ते इंग्रज सरकारला शत्रु लेखीत असल्यामुळे राजमान्यतेचें सुखहि त्यांना कधी प्राप्त झालें नाही. अशा स्थितींत भरल्या जगांत पूर्ण एकाकीपणें, आपल्या विवेकाने सांगित-लेल्या सत्यासाठी अविरत, अविश्रांत, झुंजत राहणारे आगरकरांसारखे धीरपुरुष जगांत दुर्मिळच असतात.

## लेखनशैली

आगरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे सर्व गुणविशेष त्यांच्या लेखनांत पदोपदीं दिसून येतात. त्यांची लेखनशैली याच गुणविशेषांनी नटलेली आहे. अत्यंत प्रबल असा आत्मप्रत्यय त्यांच्या ठायीं असल्यामुळे त्यांचीं विधानें ठाम, निश्चित व निःसंदिग्ध अशीं असतात. त्यांत साशंकता, डळमळ, किंवा चाचरेपणा कधीहि दिसणार नाही. ठामपणाचा, निश्चयाचा हा गुण केसरीच्या त्रिमूर्तींपैकी प्रत्येक मूर्तीच्या लेखनांत आढळतो. कारण तिघांची अहंवृत्ति सारखीच तेजस्वी होती. आपण जगाला शिकविण्यासाठीच जन्माला आलों आहों, असा आत्मिक हुंकार यांपैकी प्रत्येकाच्या ठायी होता. त्यामुळे त्यांच्या निबंधांना उपनिषत्कर्त्या ऋषीचें तेज प्राप्त झालेलें आहे. या तिघांचे निबंध म्हणजे महाराष्ट्राचीं व भारताचीं उपनिषदेंच आहेत. हे तिघेहि तत्त्ववेत्ते निबंधकार होते. त्यांनी आपल्या लेखणीने महाराष्ट्रांत नवी सृष्टि निर्माण केली. ती सृष्टि निर्माण करण्याइतकी प्रज्ञा, इतकी सर्जनशक्ति, आणि इतकें वाणीचें प्रभुत्व त्यांच्या ठायीं निश्चित होतें. त्यामुळे उपनिषत्कर्त्या ऋषींच्या वाणींत जो दृढपणा, निश्चितपणा, आणि जोम दृष्टीस पडतो तोच यांच्या वाणींतहि प्रत्ययास येतो. "सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाही, तर तिला दास करण्याचा अधिकार मला आहे, असा विचार मनुष्याच्या अंतःकरणांत वागूं लागला म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेस प्रारंभ होतो." "म्हणून कोणी तरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थलें दाखविण्याचें व समाजांतील बहुतेक लोकांना अप्रिय, परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढे आणण्याचें काम करण्यास तयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांही व्यक्तींच्या सुद्धा अंगीं नसेल त्या समाजांनी वर डोकें काढण्याची आशा कधीहि धरूं नये." "मुसलमान लोकांनी येथे अनेक शतकें राज्य केलें, पण त्यांच्या दीर्घकालीन अमलाने आम्ही जितके डबघाईस आलों नाही तितके या शतसांवत्सरिक ब्रिटिश अमलाने आलों आहों." अशा तऱ्हेची सिद्धान्तवाक्यें आगरकरांच्या निबंधांत सर्वत्र आढळतात. त्यांतूनच त्यांचा आत्मप्रत्यय स्पष्ट दिसून येतो.

## बुद्धीला आवाहन

पण असा पुरेपूर आत्मप्रत्यय असला तरी आपलीं वचनें, आपलीं विधानें लोकांनी प्रमाण मानावीं, असा चुकून सुद्धा विचार आगरकरांच्या मनांत आला नाही. साधार, सप्रमाण, तर्कशुद्ध प्रतिपादन करून लोकांच्या बुद्धीला आवाहन करावें, त्या बुद्धीला पटवून द्यावें, हेंच धोरण आगरकरांचें होतें. लो. टिळकांची हीच वृत्ति होती. प्राचीन धर्माचें प्रतिपादन आता पाश्चात्त्य पद्धतीने केलें पाहिजे, जुन्या काळच्या मन्वादि धर्मशास्त्रकारांप्रमाणे नुसतीं विधानें करून भागणार नाही, असें त्यांनी गीतारहस्यांत मुद्दाम सांगितलें आहे. आगरकरांची हीच पद्धति होती. हिंदुस्थानचा अधःपात, आमचे भ्रांत सामाजिक विचार, घातक रूढि यांमुळे झाला

आहे व पाश्चात्त्य सुधारणांचा अंगीकार केल्यावांचून आमचा निभाव लागणार नाही हें 'सुधारकाच्या' पहिल्या अंकांतच त्यांनी सांगितलें आहे. तेथे त्यांनी तर्कनिष्ठ पद्धतीचाच अवलंब केला आहे. समाजांतील भिन्न वर्गांत विषमता वाढत गेली तर त्याचे भयंकर परिणाम होतील, हें तरुण सुशिक्षितांस पटवून देतांना त्यांनी इतिहासांतील विपुल प्रमाणें दिलीं आहेत. इंग्रजी राज्याची उलट बाजू आगरकर दाखवूं लागले की, त्यांच्या प्रतिपादनशैलीचे सर्व गुण प्रकट होतात. रेल्वे-कंपन्यांचा कारभार, अफूचा व्यापार, इंग्रजांनी साम्राज्यविस्तारासाठी केलेलीं युद्धें, त्यांपायी भारतीयांची झालेली अन्नान्नदशा यांविषयी आगरकरांनी केलेलें कोणतेंहि विवेचन काढून पाहा. इतिहास, अर्थशास्त्र, राजनीति इत्यादि शास्त्रांतील अचूक आधार, अचूक प्रमाणें देऊन आपलें प्रतिपादन भक्कम पायांवर उभें करण्याची त्यांनी कोशिस केली आहे, असेंच दिसून येईल.

### व्याजोक्ति

उपरोध, उपहास, व्याजोक्ति, वक्रोक्ति हा कांही आगरकरांच्या लेखणीचा प्रधान गुण नव्हे. तें लेणें विष्णुशास्त्री यांच्या लेखणीचें आहे; पण अंध, जीर्ण, नादान अशा हिंदु समाजाबद्दलचा संताप अनावर झाला की, आगरकरांच्या लेखणीला तितकीच उपरोधाची धार चढूं लागते व तिचा तिखटपणा तसाच तीव्र होतो. बालविवाहास कायद्याने बंदी केली तर आई-बापांच्या स्वातंत्र्याला बाध येईल, असा मुद्दा कोणी मांडीत. त्याबद्दल लिहितांना आगरकर म्हणतात, "वाहवा! हें आई-बापांचें स्वातंत्र्य, हा त्यांचा अधिकार! पोटच्या पोरीचें कुंकूं पुसण्याचा अधिकार, मुलाच्या बायकोस नापितापुढे बसविण्याचा अधिकार! सुशिक्षित म्हणविणाऱ्यांनी या हक्कासाठी आक्रोश करावा या विस्मयजनक देखाव्याची कल्पना करणें देखील कठीण आहे!" जुन्या धर्मशास्त्रकारांचा अभिमान बाळगणें, त्यांना संभाळून घेणें, हें टिळकांचें धोरण; तर जेथे संधि मिळेल तेथे त्यांच्यावर प्रहार करणें ही आगरकरांची वृत्ति. डोंगरीच्या तुरुंगाचें वर्णन करतांना ते म्हणतात, "तुरुंगांत बायको आली म्हणजे तिचे केस कापतात व कांकणें पिचवितात. तरी तुरुंगाचे कडक कायदे अपराधी बायकांचीं डोकीं केवळ संन्याशाचे असोले गोटेच होऊं देत नाहीत. निरपराधी बायकांस तसली विद्रूपता आणणें हें आमच्या सदय महर्षींच्या धर्माकडे सोपविलें आहे."

### उपमा-दृष्टान्त

कल्पनाशक्तीचा खेळ आगरकरांच्या लेखनांत फारसा दिसून येत नाही, तरी मधून मधून कांही उपमा-दृष्टान्तादि रम्य अलंकार त्यांच्या निबंधांतून दृष्टीस पडतात व तेवढाच विरंगुळा वाटतो. पाश्चात्त्य विद्येला त्यांनी दुर्बिणीची उपमा दिली आहे ती अत्यंत समर्पक आहे. दुर्बिणींतून आकाशस्थ गृहगोलांचें, तारकांचें सम्यक् स्वरूप कळतें तसें नुसत्या दृष्टीने कळत नाही. त्याचप्रमाणे मनुष्य-

सुधारणेची दूरची, भविष्यकाळची दिशा पाश्चात्त्य विद्यारूप दुर्बिणींतून जशी सम्यक् आकळतां येईल तशी त्या विद्येच्या अभावीं येणार नाही. स्वतःच्या अंगीं मुळीच कर्तृत्व नसतांना दर पावलास पूर्वजांचें गुणगान करणाऱ्या जीर्णवादी लोकांना त्यांनी पराक्रमी पुरुषाच्या बहुभाष विधवेची उपमा दिली आहे. पतिनिधनामुळे नवीन संतान होण्याची तिला आशा नसते. त्यामुळे आमचे पुरुष असे होते, तसे होते असें नुसतें गुणगान ती करीत बसते. तसेच हे लोक. स्वतःच्या हातून पराक्रम होईल ही आशा त्यांना नसते. म्हणून मग ते पूर्वजांचीं स्तोत्रें गात बसतात.

## प्रौढ भाषा

आगरकरांची भाषा प्रौढ व संस्कृतप्रचुर आहे. केव्हा केव्हा तिची संस्कृत-प्रचुरता जास्तच जाणवते हें खरें, पण तें अपवादात्मक प्रसंगीं. आणि तशी झाली तरी त्यांच्या अंतरीचा भावार्थ, त्यांचा आवेश, त्यांची तळमळ, प्रतिपक्षाविषयी त्यांच्या मनांत असलेली चीड, त्यांचा संताप, त्यांचा स्वाभिमान त्यांची सहृयता हे सर्व भाव उत्तम प्रकट व्हावें असा ओघ तिला आलेला असतो. त्यांचीं वाक्यें अनेक वेळा दीर्घ व पल्लेदार झालेलीं दिसतात. केव्हा केव्हा तीं चौदा-पंधरा ओळींपर्यंत पसरतात. तरीहि अर्थौघ कोठे कुंठित झाला, असें वाटत नाही. त्या ओघाच्या वेगा-मुळे प्रसन्नता कोठे गढूळली आहे, असें होत नाही. त्यांचा संताप अनावर झाला आहे, आवेश तीव्र झाला आहे आणि विचारांचा ओघ आता पर्वताचे कडे भेदून जाणार आहे, असें वाटून मनाला आनंदच होतो.

'सुधारका'वर अनेक आपत्ति आल्या, लोकांनी त्याच्यावर दारुण आघात केले. तेव्हा आता 'सुधारक' बंद पडणार, असें कोणी म्हणूं लागले, तर त्यांना आगरकर निर्भयपणें बजावीत की, "टाकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल व तीं वाचण्यास निदान एक तरी इसम तयार असेल तोंपर्यंत समाजाला भिऊन स्वस्थ बसण्याचें स्त्रैणकर्म 'सुधारका'ला स्पर्श करूं शकणार नाही."

आगरकरांच्या सर्व व्यक्तिमत्त्वाचा आशय या वाक्यांत समावलेला आहे या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्कारामुळे मराठी भाषा समृद्ध, संपन्न झाली, तिला एक आगळें तेज व सौंदर्य प्राप्त झालें, आणि 'सुधारका'च्या पहिल्या अंकांत आगरकरांनी थोर समाजसुधारकांविषयी स्वतःच म्हटल्याप्रमाणे, त्यांच्या व्यक्ति-मत्त्वांतून प्रकट झालेल्या त्यांच्या चारित्र्यामुळे, त्यांच्या वर्तनामुळे, जगाचें हित व त्यांच्या जन्माची सार्थकता झाली.

■ ■ ■

# लोकमान्य
# बाळ गंगाधर टिळक

के. त्रि. १४

# चरित्र-रूपरेषा

लो. बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म १८५६ सालीं रत्नागिरी येथे झाला. त्यांचे वडील गंगाधरपंत हे प्राथमिक शिक्षक होते; पण ते बहुश्रुत असून, त्यांचा संस्कृतचा व्यासंग चांगला होता. त्यांनी मुलाला शाळेंत घालण्यापूर्वी त्याचा बराच अभ्यास घरीं करून घेतला होता. १८६६ सालीं त्यांची बदली पुण्यास झाली. टिळकांचें सर्व शिक्षण पुण्यासच झालें. १८७२ च्या डिसेंबरांत ते मॅट्रिक झाले व १८७३ सालीं डेक्कन कॉलेजमध्ये त्यांनी नांव घातलें. मॅट्रिक होण्याच्या आधीच्या वर्षींच टिळकांचा विवाह झाला होता. त्यांच्या पत्नीचें नांव सत्यभामाबाई.

टिळक १८७७ सालीं बी. ए. झाले व १८७९ सालीं एल्‌एल्. बी. झाले. विष्णुशास्त्री यांनी न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेचा संकल्प आधीच जाहीर केला होता. तेव्हा एल्‌एल्. बी. होतांच टिळक त्यांना जाऊन मिळाले. १ जानेवारी १८८० रोजीं न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली; आणि टिळक तेथे अध्यापनाचें कार्य करूं लागले. १८८४ सालीं याच मंडळींनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली; व या संस्थेने १८८५ सालीं फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. तेव्हा टिळक त्या कॉलेजांत प्राध्यापक म्हणून काम करूं लागले. पुढे १८९० सालीं सोसायटीच्या इतर सभासदांशीं टिळकांचा अंगीकृत धोरणाविषयी मतभेद होऊन त्यांनी संस्थेचा राजीनामा दिला.

विष्णुशास्त्री व टिळक, आगरकर, नामजोशी प्रभृति त्यांचे सहकारी ह्यांनी जानेवारी १८८१ मध्ये 'केसरी' व 'मराठा' हीं दोन साप्ताहिक वृत्तपत्रें सुरू केलीं. त्या वेळीं आगरकर केसरीचे व टिळक मराठ्याचे संपादक झाले. पुढे सामाजिक सुधारणेच्या कांही तत्त्वांवरून टिळक व आगरकर यांचा मतभेद होऊन तो विकोपाला गेला; आणि १८८८ सालीं आगरकरांनी 'सुधारक' हें स्वतंत्र पत्र काढलें. आधीच्या वर्षापासूनच टिळक केसरीचे संपादक झाले होते. पुढे १८९० सालीं सोसायटीचा

राजीनामा दिल्यावर केसरी व मराठा ह्या वृत्तपत्रांच्या कामालाच त्यांनी सर्वस्वीं वाहून घेतलें.

१८८२ सालीं कोल्हापूर-प्रकरण झालें. कोल्हापूर संस्थानचे कारभारी श्री. बर्वे हे महाराजांचा छळ करतात, असा मजकूर केसरींत आला. त्यामुळे त्यांनी बदनामीची फिर्याद केली. तींत आरोप सिद्ध न झाल्यामुळे टिळक व आगरकर ह्यांना जुलै महिन्यांत १०१ दिवसांची शिक्षा झाली. ते दोघे संपादक डोंगरीच्या तुरुंगांत होते. ऑक्टोबरमध्ये सुटका होऊन ते परत वृत्तपत्रांचें काम पाहूं लागले.

विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणेच स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश यांच्या अभिमानांतूनच टिळकांनाहि कार्याची प्रेरणा मिळाली होती; आणि पारतंत्र्य हा नरक असून, तें नष्ट करण्यासाठी व स्वदेशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जीवित अर्पण करावयाचें हा त्यांचा ध्येयवाद प्रारंभींच निश्चित झाला होता. केसरी व मराठा या पत्रांतून त्यांनी लेखन केलें तें या ध्येयाच्या सिद्धीसाठीच केलें.

१८९० सालापासून त्यांनी इंग्रजी राज्यकारभारावर प्रखर टीका करण्यास प्रारंभ केला. हळूहळू ते लेख उग्र होऊं लागले. या लेखी टीकेला पुढे त्यांनी गणपति-उत्सव व शिवाजी-उत्सव यांची जोड दिली. १८९४ सालीं गणपति-उत्सव सुरू झाला. त्याला १८९६ सालीं राष्ट्रीय रूप आलें. त्याच सालीं शिवाजी-उत्सवहि सुरू झाला. पहिला उत्सव रायगडावर झाला व मग हळूहळू तो महाराष्ट्रभर आणि बाहेरहि पसरला. १९०५ सालीं तर जपानांतहि शिवाजी-उत्सव झाला.

हे दोन्ही उत्सव राष्ट्रजागृतीसाठीच होते. इंग्रज सरकारविरुद्ध असंतोष पसरविणें हाच त्यांचा हेतु होता. या जत्रा-उत्सवांतून सुशिक्षित लोकांनी खेड्यापाड्यांत जाऊन सरकार करीत असलेल्या जुलमाची लोकांना जाणीव करून द्यावी, असा उपदेश टिळक नित्य करीत असत. १८९६ सालच्या दुष्काळांत त्यांनी आणखी एका मार्गाने हेंच जागृतीचें कार्य सुरू केलें . तो मार्ग म्हणजे साराबंदीची चळवळ हा होय. यामुळेच त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप येऊन १८९७ च्या सप्टेंबरमध्ये त्यांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली; पण पुढे थोड्या दिवसांनी राजकीय वातावरण निवळलें. मॅक्समुल्लरसारख्या पंडिताने इंग्लंडमध्ये कांही खटपट केली; यामुळे शिक्षा कमी होऊन टिळक सहा महिने आधीच सुटले.

१८९८ ते १९०८ हा दहा वर्षांचा काळ म्हणजे टिळकांच्या राजकीय कर्तृत्वाचा मध्यान्हकाळ होय. ते या काळांतच ‘हिंदी असंतोषाचे जनक’ झाले. या काळांतच ‘स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य’ ही राष्ट्रीय चळवळीची चतुःसूत्री त्यांनी सांगितली. ते अखिल भारताचे नेते झाले, ते याच काळांत. १९०८ सालची शिक्षा त्यांनी अत्यंत धैर्याने व स्थितप्रज्ञ-वृत्तीने स्वीकारली. तेव्हा त्रिखंडांत त्यांची कीर्ति होऊन मानवी इतिहासांत महापुरुष म्हणून त्यांची गणना होऊं लागली. ते नामदार टिळक होते ते लोकमान्य टिळक झाले ते याच काळांत.

ताईमहाराजप्रकरणाच्या अग्निदिव्यांतून त्यांना याच काळांत जावें लागलें. बाबामहाराज हे त्यांचे मित्र. त्यांच्या पत्नी ताईमहाराज. मृत्युसमयीं बाबामहाराजांनी टिळकांना आपल्या मिळकतीचे विश्वस्त नेमलें. त्याअन्वये टिळकांनी जगन्नाथमहाराज यांना ताईमहाराजांच्या मांडीवर दत्तक दिलें; पण यांतून वाद व खटले निर्माण होऊन टिळकांच्या आयुष्याचें एक तप यांत खर्ची पडलें. यांतच बाईवर हात टाकल्याचा आरोप त्यांच्यावर आणून त्यांना आयुष्यांतून उठविण्याचा सरकारने घाट घातला होता; पण त्यांतून ते मुक्त होऊन अधिकच तेजाने तळपूं लागले. पुढे १९१५ सालीं प्रीव्हि कौन्सिलमध्ये त्यांच्यासारखा निकाल होऊन या प्रकरणावर शेवटचा पडदा पडला.

१९०८ सालीं टिळकांना राजद्रोहाची दुसरी शिक्षा झाली; ही सहा वर्षांची होती. ती संपवून १९१४ सालीं ते सुटून आले. या वेळीं ब्रह्मदेशांतील मंडाले या गावीं त्यांना ठेवलें होतें. तेथेच त्यांनी 'भगवद्गीतारहस्य' हा विख्यात ग्रंथ लिहिला; आणि हिंदुधर्मांत फार मोठें परिवर्तन घडवून आणलें.

टिळक सुटून आले तेव्हा पहिलें महायुद्ध सुरू झालें होतें. त्यांचा राष्ट्रीय पक्षहि निस्तेज व विस्कळित झाला होता. ही सर्व परिस्थिति ओळखून टिळकांनी इंग्रज सरकारला युद्धकार्यांत साहाय्य करण्याचें ठरवून लष्करभरतीचा उपदेश सुरू केला. इंग्लंड संकटांत आलें ही हिंदुस्थानला सुसंधि आहे, याच वेळीं कांही स्वराज्याचे हक्क मिळाले तर मिळतील, असें त्यांचें धोरण होतें.

त्यांच्या सहा वर्षांच्या अनुपस्थितींत कॉंग्रेस मवाळांच्या हातीं गेली होती, पण १९१५ सालीं टिळकांनी आपल्या अनुयायांसह कॉंग्रेस-प्रवेश केला; आणि लवकरच तिच्यावर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें. पुढच्या सालीं सुप्रसिद्ध होमरूल लीगची – हिंदी स्वराज्यसंघाची – त्यांनी स्थापना केली; आणि सर्व हिंदुस्थानभर दौरा काढून मरगळलेल्या चळवळीला पुन्हा तेज आणलें. अर्थात् यांमुळे त्यांच्यावर पुन्हा सरकारची वक्रदृष्टि झाली व त्यांच्यावर पुन्हा खटला भरण्यांत येऊन त्यांच्याकडून पन्नास हजारांचा जामीन मागण्यांत आला; पण या वेळीं न्यायदेवता जरा जागी होती. हायकोर्टाने खालच्या कोर्टाचा निकाल फिरवून त्यांना मुक्त केलें.

१९१६ सालची लखनौची कॉंग्रेस दोन कारणांनी महत्त्वाची ठरली. या अधिवेशनांतच " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व मी तें मिळवीनच " हा महामंत्र त्यांनी उच्चारला; आणि लखनौलाच हिंदु-मुस्लिम करार घडवून आणून त्यांनी स्वराज्याच्या चळवळीसाठी एकसंध फळी निर्माण केली.

१९१७ सालीं स्टेटसेक्रेटरी मॉंटेग्यू यांनी ब्रिटिश सरकारचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत, हिंदुस्थानाला जबाबदारीचें स्वराज्य देऊन साम्राज्यांतील एक भागीदार करणें हें ब्रिटिश सरकारचें धोरण आहे, असें आश्वासन दिलें होतें. सरकारी धोरणांतील हें परिवर्तन फार मोठें होतें. 'स्वराज्य' हा शब्द उच्चारणें हाच पूर्वी

राजद्रोह होता; पण आता, अंतिम उद्दिष्ट म्हणून का होईना, सरकारने तें मान्य केलें. टिळकांच्या चळवळीचा हा मोठाच विजय होता.

१९१८ सालीं टिळक होमरूलचें शिष्टमंडळ घेऊन विलायतेस गेले. टाइम्सचा वार्ताहर चिरोल याच्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद लावणें हाहि एक हेतु तेथे जाण्यांत होता. चिरोलच्या खटल्याचा निकाल त्यांच्या विरुद्ध गेला. शिष्टमंडळाचें काम मात्र कांही स्वरूपांत साधलें. तेथील मजूर पुढाऱ्यांची सहानुभूति हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या चळवळीला लाभली. हीं दोन्ही कामें संपवून टिळक १९१९ सालअखेर हिंदुस्थानांत परत आले. चिरोलप्रकरणीं टिळकांचा अडीच-तीन लाख रुपये खर्च झाला होता. तो खर्च टिळक परत आल्यावर ग्रंथ लिहून त्यावर पैसे मिळवून भरून काढणार होते; पण ते येथे पोचण्याच्या आधीच लोकांनी स्वयंस्फूर्तीने तीन लाख रुपये फंड जमवून तो प्रश्न सोडवून टाकला होता.

टिळक विलायतेंत असतांनाच हिंदुस्थान सरकारने रौलेट बिलें पास करून दडपशाहीचा वरवंटा फिरविण्यास प्रारंभ केला होता. त्याच्या निषेधार्थ महात्माजींनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. तिच्यांतूनच 'जालियनवाला बाग' हें हत्याकांड उद्भवलें. या वेळीं चळवळ अगदी अपूर्व अशी झाली, व आपण नसतांना एवढी चळवळ झालेली पाहून टिळकांना फार समाधान वाटलें.

१९१९ च्या डिसेंबरअखेर अमृतसरला काँग्रेसचें अधिवेशन झालें. त्या वेळीं 'मॉंटेग्यूसाहेबांनी दिलेल्या सुधारणा निराशाजनक व असमाधानकारक आहेत' या ठरावांतील शब्दांविषयी फार वाद झाला; पण अखेरीस टिळकांचे म्हणणें मान्य होऊन काँग्रेसचें ऐक्य अभंग राहिलें. या अधिवेशनास टिळक गेले तेव्हा त्यांचा अमृतसरला अपूर्व सन्मान झाला. "हिंदुस्थानांत राष्ट्रीय भावनांचा प्रसार करणाऱ्या आदिपुरुषांत टिळकमहाराजांची गणना प्रमुख स्थानीं केली जाते" असे उद्गार स्वामी श्रद्धानंदजी यांनी काढले.

लोकमान्यांनी जन्मभर केलेल्या कार्याची भारताने त्यांना ही जणू पावतीच दिली !

ही पावती मिळतांच टिळकांचें जीवितकार्य संपल्यासारखें झालें. "माझ्या सर्व शक्ति क्षीण होत चालल्या आहेत," असें ते अलीकडे म्हणतच असत. महात्मा-जींचा उदय झाल्यामुळे, आपल्या कार्याचा वारसा चालविणारा नेता भारताला मिळाला आहे, हा दिलासाहि त्यांना मिळाला होता. त्यामुळेच कृतार्थता वाटून त्यांनी आपली जीवितयात्रा संपविली. ३१ जुलै १९२० च्या उत्तररात्रीं ते अनंतांत विलीन झाले.

- १ -

# स्व-राज्यांतील 'स्व'चा व्याप

## राष्ट्राचा आत्मा

लो. टिळक अमरावतीस गेले असतांना, एक भलें मोठें वऱ्हाडी पोगोटें घातलेला शेतकरी त्यांच्या दर्शनास आला होता. 'हा खेड्यांतील कुणबी माणूस, लोकमान्यांना भेटून काय करणार', असें वाटून दारावरील स्वयंसेवक त्याची दाद घेईना; पण त्यांचें बोलणें ऐकून लोकमान्य स्वतःच बाहेर आले. शेतकऱ्याला फार आनंद झाला. त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून थोड्या वेळाने तो परत गेला. तेव्हा स्वयंसेवकाकडे वळून लोकमान्य म्हणाले, "हिंदुस्थानांत शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा आहे. त्याच्यावरील मालिन्याचा पडदा जर दूर करतां आला तरच हिंदुस्थानचा उद्धार होईल. याकरिता शेतकरी आपला व आपण शेतकऱ्याचे, असें आपणांस वाटावयास हवें." (लोकमान्य टिळक आठवणी व आख्यायिका खंड, २, पृ. ३८.)

'समाइकीने उभारलेल्या भांडवलाचे कारखाने' या केसरीच्या पहिल्या वर्षी लिहिलेल्या लेखांतच त्यांनी म्हटलें आहे, "देश सधन असो वा निर्धन असो, जित असो वा अजित असो; लोकसंख्येच्या मानाने हलक्या दर्जाचे म्हणजे काबाडकष्ट करून निर्वाह करणाऱ्या लोकांची संख्या जास्त असावयाची. याकरिता या समाजाची स्थिति जोंपर्यंत सुधारली नाही तोंपर्यंत देशस्थिति सुधारली, असें कधीहि म्हणतां येणार नाही."

देश म्हणजे काय, लोक म्हणजे कोण हें लोकमान्यांच्या मनांत त्यांनी केसरीसाठी लेखणी उचलण्याच्या आधीच निश्चित झालें होतें.

देश म्हणजे शेतकरी, देश म्हणजे काबाडकष्ट करणारी जनता. शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा! चाळीस वर्षें हें सत्य ते हिंदी समाजाला शिकवीत होते. ते अद्वैत

वेदान्ताचे उपासक होते. भारतांत हें अद्वैत त्यांना प्रत्यक्षांत कोठे दिसलें ? हिंदी राष्ट्र व शेतकरी आणि कामकरी यांच्यांतील अभेदाचें दर्शन त्यांना प्रारंभापासूनच झालें होतें.

## हाच धर्म

"हिंदुस्थानची खरी स्थिति पाहवयाची असेल, तर शहरें पाहून उपयोग नाही. खेड्यांतील शेतकऱ्यांची किंवा मजुरांची स्थिति पाहिली पाहिजे." (केसरी, १४-१-१९०२). "हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आणि देवता, हिंदुस्थानवासी हेंच आमचें बंधुत्वाचें नातें, व त्यांची सामाजिक व राजकीय स्थिति सुधारण्याचा एकनिष्ठ प्रयत्न करणें हाच आमचा धर्म." (केसरी, १९-१२-१८९३). असे विचार त्यांनी केसरींत ठायी ठायी मांडलेले आढळतात.

लोकमान्यांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवांत नवीन काय होतें ? "साळी, माळी, सुतार, रंगारी, ब्राह्मण, व्यापारी, मारवाडी, चांभार ह्या सर्व जाती, क्षणभर आपला जातिमत्सर सोडून देऊन, परस्परांशीं एकदिलाने व एका धर्माभिमानाने मिसळल्या" ही या उत्सवांतली आनंददायक अशी विशेष गोष्ट होती. (केसरी, १८–९–१८९४.)

'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' असें एक पुस्तक प्राचार्य महादेव शिवराम गोळे यांनी लिहिलें होतें. त्यांत ब्राह्मण समाजाच्या ऱ्हासाची कांही कारणमीमांसा त्यांनी केली होती. या पुस्तकावर टीका करतांना टिळकांनी म्हटलें आहे, "सर्व हिंदु समाजास कुदशा प्राप्त झाली आहे. तिचा विचार न करतां केवळ ब्राह्मणांच्या ऱ्हासाचें निदान ठरविणें म्हणजे पुच्छग्राही, पादग्राही आंधळ्याप्रमाणे मीमांसा करणें होय. हें एकदेशीय व चुकीचें आहे." अशी टीका करून शेवटीं निष्कर्ष म्हणून त्यांनी सांगितलें आहे की, "जें कांही करावयाचें तें सर्व जातींकरिता व सर्व प्रांतांतील लोकांकरिता, त्यांस बरोबर घेऊन, त्यांच्या साहाय्यानेच केलें पाहिजे. शंभर वर्षांपूर्वी दक्षिणेंतील ब्राह्मणांनी इतर प्रांत काबीज करण्याच्या कामीं शौर्य व साहस प्रकट केलें होतें. आता सार्वजनिक हिताच्या कामीं पुढाकार घेऊन ती चळवळ सर्व राष्ट्रभर पसरविण्याचें काम ब्राह्मणांनीच अंगावर घेतलें पाहिजे. यांत ब्राह्मणांनी निष्काम पुढारीपण करावें."

खरा हिंदुस्थान खेड्यापाड्यांत आहे आणि येथे राष्ट्र निर्माण करावयाचें म्हणजे या खेड्यापाड्यांत जागृति करावयाची, असा टिळकांच्या मनाशीं सिद्धान्त झालेला होता. "राष्ट्रीय महोत्सवांत सुशिक्षितांनी काय केलें पाहिजे" हें सांगतांना त्यांनी सांगितलें आहे की, त्यांनी मोठ्या जत्रांना प्रचंड सभांचें रूप द्यावें व खेड्यापाड्यांतील झोपडींत राजकीय चळवळीचा प्रवेश करून द्यावा. बहुत श्रमांनी त्यांनी स्वतः पैदा केलेलें नैतिक व धार्मिक ज्ञान लिहितां-वाचतां न येणाऱ्या खेड्यापाड्यांतील आपल्या बंधूंना त्यांनी सुलभ उपायाने द्यावें, व आपली खरी स्थिति

काय आहे, याची लोकसमूहाला जाणीव करून द्यावी. सरकार करीत असलेल्या जुलमाची त्यांना आठवण करून द्यावी व सर्वांत धर्म-बुद्धि जागृत करून राष्ट्रीयत्वास बळकटी आणावी.

## रामदासी संप्रदाय

डॉ. भडकमकर यांच्यांशीं बोलतांना एकदा लोकमान्य म्हणाले, "काँग्रेसच्या चळवळीकडे खेड्यापाड्यांतील लोकांचेंहि लक्ष वेधून, पुढाऱ्यांना खऱ्या लोकांचा पाठिंबा मिळावा, अशा तऱ्हेचे प्रयत्न मी अगदी प्रारंभापासून करीत आहे; तरी पण आपली सर्व चळवळ अद्याप बुद्धिमान् वर्गांतच चालली आहे...ह्या सर्व चळवळी आता धार्मिक व औद्योगिक प्रश्नांच्या पायांवर उभारून खालवर कोना-कोपऱ्यांत पसरविल्या पाहिजेत. या कामाकरिता स्वार्थत्यागी, अल्पसंतुष्ट, उद्योगी, गरीब माणसें उपदेशक म्हणून तयार करून त्यांस वक्तृत्व, वैद्यकी, ज्योतिष, थोडें-बहुत धर्मशास्त्र इत्यादि लोकोपयोगी कला शिकवून, खेड्यांतून रहावयास पाठवून, राजकीय रामदासी संप्रदाय वाढविला पाहिजे...हे लोक समाजांत ठिकठिकाणीं पसरून लोकांच्या सुखदु:खाशीं समरस होऊन वावरूं लागले म्हणजे लोकांचीं मनें आकर्षित करूं शकतात...आणि मग चळवळ अंत:स्फूर्तीने उत्पन्न झाल्यासारखी होऊन तिला जिवंतपणा प्राप्त होईल." (आठवणी, खंड २ रा, पृ. २५५.)

कलकत्त्याला लोकमान्यांचें 'स्वराज्य' या विषयावर व्याख्यान झालें. त्या वेळीं, "मला होमरूलच्या खटपटीसाठी प्रत्येकी रुपया, आठ आणे देणारींच हजारो माणसें पाहिजेत", असें त्यांनी सांगितलें. कलकत्त्याला लोकमान्यांचें आदरातिथ्य सर्व कोट्याधीश मारवाडी लोकांनी केलें होतें. त्यांना ही मागणी ऐकून मोठा विस्मय वाटला. ते लोकमान्यांना म्हणाले, "तुम्हांला फंडाची जरूर असेल तर आम्हांला गुप्त इशारा द्या. आम्ही तुम्हांला लाखो रुपये मध्यरात्रीं आणून देऊं. असे प्रत्येक माणशीं आठ आणे, रुपया कशाला मागता ?" त्यावर लोकमान्य म्हणाले, "तूर्त जी होमरूलची खटपट आम्हांला करावयाची आहे तिला 'स्वराज्य पाहिजे' म्हणणारीं व स्वराज्याच्या खटपटीला प्रत्येकीं आठ आणे, रुपया देणारीं माणसें मिळालीं तरी पुरे." 'स्वराज्य'मधील 'स्व'चा लोकमान्यांच्या मनांत काय अर्थ होता तें यावरून स्पष्ट होईल. आठ आणे, रुपया देणारीं हजारो माणसें, स्वराज्य पाहिजे म्हणणारीं लाखो माणसें – यांचें राज्य म्हणजे स्वराज्य ! (आठवणी, खंड २ रा, पृ. ४६४.)

चाळीस वर्षें लोकमान्य हिंदी लोकांना 'स्व'चा हा अर्थ समजावून देत होते. हिंदुस्थानचे 'स्व' म्हणजे कोण ? शेतकरी, कुंभार, सुतार, लोहार, कोष्टी हे कारागीर, वारली, कोळी, कारखान्यांतील कामगार, भिल्ल, कातकरी, तेली, तांबोळी हे लोक म्हणजे 'स्व'. मूठभर सुशिक्षित म्हणजे 'स्व' नव्हे. कोट्याधीश मारवाडी, संस्थानिक, राजे, सरदार हे तर नव्हेच नव्हे.

## विशेष काय ?

आज सर्व जगांत शेतकरी, कामगार व एकंदर कष्टकरी जनता यांचा जयजयकार चालू आहे. भांडवली देशांत सुद्धा यांना अग्रमान दिला जातो. ' जय किसान, जय जवान ' ही आपली घोषणा सुप्रसिद्धच आहे, असें असतांना लोकमान्यांनी शेतकरी हा देशाचा कणा आहे, राष्ट्राचा आत्मा आहे, असें सांगितलें यांत विशेष तें काय, असें वाटण्याचा संभव आहे; पण आपण हें ध्यानांत घ्यावें की, ज्या वेळीं टिळकांनी हें महासत्य सांगितलें त्या वेळीं, म्हणजे १८८०च्या सुमाराला, त्याचा उच्चार करणारे जगांत ते एकटेच नेते होते. चीनचे नेते डॉ. सनयत् सेन ह्यांना त्या राष्ट्राचे जनक मानण्यांत येतें; पण त्यांचा सर्व भर लष्करी उठावणीवर होता. मानवेंद्र रॉय यांनी म्हटलें आहे की, १९२१ सालापर्यंत राष्ट्राची खरी शक्ति किसानांमध्ये आहे, याचा उमग त्यांना पडला नव्हता. चार पिस्तुलें जमा केलीं की क्रांति होते, असा त्यांचा समज होता. शिवाय ज्या साम्राज्यवादी ब्रिटन, फ्रान्स ह्या देशांनी चीनवर भयानक अत्याचार केले होते त्यांची आपल्याला मदत होईल, अशी त्यांची शेवटपर्यंत श्रद्धा होती. (रेव्होल्युशन अँण्ड काउंटर रेव्होल्यूशन इन् चायना, पृ. २५१–३२०). पाश्चात्त्य देशांत याच कालखंडांत इटली, जर्मनी यांची राष्ट्रसंघटना चालू होती, पण सरंजामदार, सरदार, लष्कर यांच्या बळावरच ती उभारणी चालू होती. शेतकरी ही महाशक्ति आहे, या सत्याचा अवगम तेथील नेत्यांना झाला नव्हता. जपानमध्येहि हीच स्थिति होती. १८५५ च्या सुमारास त्या देशांत अर्वाचीन युग सुरू झालें; पण तेथल्या नेत्यांनी नवीन जपान घडविला तो सरदार, सरंजामदार, लष्कर, राजा यांच्या शक्तीच्या आश्रयानेच घडविला. १८८० सालीं शेतकरी, किसान हा राष्ट्राचा आत्मा आहे, हा सिद्धान्त मांडणारा जगांत लोकमान्य टिळक हा एकच महापुरुष होता.

## बटाट्याचें पोतें

मार्क्सवादी लोक शेतकरी, कामकरी, किसान, जवान म्हणजे एकंदर जी जनता तिच्या नांवाने उद्‌घोष करीत असतात; आणि अर्वाचीन काळांत मार्क्सचे अनुयायी किसानांच्या संघटना बांधतातहि. पण हें सर्व १९२० नंतरचें आहे. तोंपर्यंत किसान, शेतकरी ही एक शक्ति आहे, हें मार्क्सवादाला मान्यच नव्हतें. मार्क्सचा सर्व भर गिरणी-कारखान्यांतील कामगारांवर होता. खरे क्रांतीचे नेते, त्याच्या मतें, कामगारच होते. क्रांतीच्या आघाडीवरचे शिपाई म्हणजे कामकरीच होत, असा त्याचा सिद्धान्त होता. भांडवलदार, जमीनदार, व्यापारी, बुद्धिजीवी हे वर्ग तर क्रांतिकारक नव्हेतच; पण मार्क्सच्या मतें किसानहि नव्हेत. मार्क्सचें किसानांच्याबद्दल फार वाईट मत होतें. तो शेतकऱ्यांना ' बटाट्याचें पोतें ' म्हणत असे. त्याच्या मतें शेतकरी हा एक वर्ग होऊच शकत नाही; कारण तो संघटित होणें अशक्य आहे. प्रत्येक शेतकऱ्याजवळ दोन-चार एकरांचा जमिनीचा लहान तुकडा असतो आणि

त्याची कसणूक व निगा तो स्वत: व त्याचे कुटुंबीय हे स्वतंत्रपणें करीत असतात. त्यामुळे ते परस्परांपासून विलग असतात. धनोत्पादनाच्या दृष्टीने त्यांचे हितसंबंध गुंतलेले नसतात. प्रत्येक शेतकरी स्वतंत्रपणें पोटाचा उद्योग करूं शकतो. त्यामुळे शेतकरी हा संघटित होऊं शकत नाही. श्रमविभाग त्याच्या व्यवसायांत होत नाही, विविधता त्यांत येत नाही, कृषिशास्त्राची तो वाढ करूं शकत नाही. यामुळे शेतकरी कायम मागासलेला राहतो आणि भांडवलादार, जमीनदार, बुद्धि-जीवी, कारागीर यांच्याप्रमाणेच तो पुराणवादी व क्रांतिविरोधी होऊन बसतो. कामगार मात्र, गिरण्या-कारखान्यांत विलगपणें काम करूं शकत नसल्यामुळे अपरिहार्यपणेंच एकजीव होतात. त्यांचा जीवनउद्योग त्यांना एकत्र बांधूनच ठेवतो. त्या उद्योगांत यांत्रिक प्रगतीशीं नित्य संबंध येत असल्यामुळे तो पुरोगामी होतो. म्हणूनच तो अटळपणें क्रांतिकारक होतो. शेतकऱ्याला अशी कसलीच संधि नसल्यामुळे तो नेहमी विघटितच असावयाचा. तो बटाटयाचें पोतेंच राहवयाचा. (मार्क्स-एंगल्स — सिलेक्टेड वर्क्स, खंड १ ला, पृ. ३०३).

मार्क्सचें हें मत अत्यंत हास्यास्पद आहे हें इतिहासानेच दाखवून दिलें आहे. कम्युनिस्ट क्रांति, त्याच्या मतें, इंग्लंड, जर्मनी या प्रगत भांडवली देशांत व्हावयाची होती; पण ती झाली रशिया व चीनमध्ये. तेथे कामगारवर्ग उदयालाच आला नव्हता. चीनमध्ये तर तो अस्तित्वांतच नव्हता. आणि माओ-त्से-तुंग याने शेतकऱ्यांची संघटना करूनच चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांति घडविली. रशियांत कामगार-वर्ग थोडया प्रमाणांतच होता. त्यामुळे सोव्हिएट नेत्यांना किसानांचें साह्य घ्यावेंच लागलें. पण मार्क्सवादी भ्रमांत ते पुरते अडकलेले असल्यामुळे प्रारंभीच्या काळांतहि किसानांना ते कामगारवर्गाला पोसणारे गुलाम अशा दृष्टीनेच वागवीत असत.

## मार्क्सवादी भ्रम

मार्क्सचा तो सिद्धान्त मुळांतच तर्कदुष्ट होता. धनोत्पादन साधनामुळे कामगार एकजीव होतात आणि म्हणून ते संघटित होऊं शकतात ही कल्पनाच अशास्त्रीय आहे. एखाद्या कारखान्यापुरतें फार तर तें खरें असेल; पण मार्क्स, "जागतिक कामगारांनी वर्गभेदाच्या तत्त्वावर संघटित व्हावें" असें सांगत होता. ज्यांनी सात जन्मांत एकमेकांचीं तोंडें पाहिलेलीं नव्हतीं, ज्यांना एकमेकांच्या अस्तित्वाची सुद्धा जाणीव नव्हती व ज्यांची आर्थिक स्थिति परस्परांच्या तुलनेने अत्यंत विषम होती त्या कामगारांची संघटना मार्क्सला सुलभ वाटत होती आणि कायम एकमेकांच्या सान्निध्यांत राहणारे, समदु:खी, समश्रद्ध शेतकरी मात्र संघटनेला अपात्र ! असे भ्रम मार्क्सवादच पोसूं शकतो.

लोकमान्य टिळकांना असला भ्रम कधीच नव्हता. भिन्न वर्गांमध्ये निर-निराळ्या कारणांनी भेद असतात हें ते जाणीत होते; पण हे भेद राष्ट्रसंघटनेच्या आड येतील हें त्यांना मुळीच मान्य नव्हतें. वर्गभेदाचें भ्रामक तत्त्वज्ञान त्यांनी

कधीच स्वीकारलें नाही. त्यामुळे अर्वाचीन युगांत शेतकरी ह्याच राष्ट्राचा आत्मा होय हें सत्य तें जाणूं शकले आणि भारतांत तें दृढमूल करूं शकले.

पण शेतकरी हा राष्ट्राचा कणा होय असें त्यांचें मत होतें म्हणून गिरणी-कारखान्यांत काम करणारा जो कामगारवर्ग त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केलें किंवा त्याला हीन मानलें असें नाही. १९०२–३ सालापासून त्यांनी त्या वर्गांतहि आपले कार्यकर्ते पाठवून कामगारांत राष्ट्रीय जागृति करण्यास प्रारंभ केला होता. १९०८ सालीं त्यांना शिक्षा झाली त्या वेळीं मुंबईचे कामगार खवळून उठले व सरकारी अत्याचारांना न जुमानतां त्यांनी सहा दिवस संप चालू ठेवला तो टिळकांना ते राष्ट्रपुरुष मानीत होते म्हणूनच होय. तेव्हा शेतकरी आणि कामकरी यांच्यांत टिळक भेद करीत नव्हते, हें स्पष्ट आहे. प्रारंभापासून भारत म्हणजे सर्व कष्टकरी जनता असेंच समीकरण त्यांनीं मनाशीं निश्चित केलें होतें.

**समन्वय**

आणि केवळ शेतकऱ्यांच्या किंवा कामकऱ्यांच्या बाबतींतच नव्हे, तर सर्वच दृष्टींनी त्यांनी वर्गविग्रहाचें तत्त्व त्याज्य ठरवून टाकलें होतें. त्यांना या विस्कळित, विघटित, भेदजर्जर, जाति, पंथ, धर्म, जमाती यांनी शतशः विभागलेल्या हिंदी समाजांतून एक राष्ट्र निर्माण करावयाचें होतें. म्हणून त्यांनी धर्मसमन्वयाचें, जाति-समन्वयाचें आणि त्याचप्रमाणे वर्गसमन्वयाचें धोरणच अंगीकारलेलें होतें. अमका धर्म, अमकी जात, अमका वर्ग जास्त राष्ट्रवादी आणि अमका कमी, असा मुळांतच कांही भेद आहे, असें त्यांनी कधीहि मानलें नाही. पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्याशीं बोलतांना एकदा त्यांनी, संगीताच्या भाषेंत, आपलें राष्ट्रीयत्वाचें तत्त्वज्ञान स्पष्ट करून सांगितलें होते. ते म्हणाले, "तुमच्या गाण्याच्या विषयांत ऐक्याचा धडा अवश्य शिकण्यासारखा आहे. कसा तो पहा – तंबुरा, सतार, सारंगी, दिल-रुबा, बीन, रुद्रवीणा, ताऊस, फिड्ल, तबला, मृदंग, हार्मोनियम हीं निरनिराळ्या स्वरूपाचीं वाद्यें आहेत. तीं वाजविण्याच्या तऱ्हाहि निरनिराळ्या व वाजविणारीं माणसेंहि निरनिराळीं असतात; परंतु निरनिराळीं वाद्यें, तीं वाजविणाऱ्यांच्या मनांत एकच ध्येय असल्यामुळे, परस्परांना उपकारकच होतात. उलट एकाच जातीचीं वाद्यें असून सुद्धा वाजविणाऱ्यांच्या मनांत ऐक्य नसेल तर, तींच अनुप-कारकहि होतील. यावरून धर्मभेद, जातिभेद, पक्षभेद, पंथभेद असले तरी ध्येय एकच ठेविलें तर खरोखर कोणतीहि अडचण येणार नाही. निरनिराळ्या रस्त्यांनी एकाच गावाला जातां येतें; पण गाव गाठण्याचें ध्येय नसून एकमेकांचे रस्ते अड-विण्याचें किंवा मोडून टाकण्याचें ध्येयच धरल्यामुळे, कोणालाहि पुढे जातां येत नाही. तरी आपलें कर्तव्य समजून, फलाविषयी निरिच्छ राहून, मार्ग क्रमीत असलें पाहिजे. म्हणून म्हणतों, अशा कर्तव्यबुद्धीने तुमचा तंबुरा छेडला जाऊं दे !" ( आठवणी, खंड २ रा, पृ. २७१.)

'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा मंत्र उच्चारतांना लोकमान्यांच्या मनांत 'स्व'चा केवढा व्याप होता, हें यावरून ध्यानांत येईल. स्व म्हणजे सर्व लोक किंवा प्रजा. म्हणजेच अखिल भरतखंड, सर्व राष्ट्र. हा व्यापक अर्थ प्रत्येक भारतीयाच्या मनांत बिंबविण्याचा, वाचेने, मनाने व कृतीने त्यांनी अहर्निश प्रयत्न चालविला होता.

## सर्व पंथ, सर्व धर्म

स्वतः टिळक हिंदु धर्माचे व त्यांतहि सनातन वैदिक पंथाचे अतिशय अभिमानी होते; पण लिंगायत, जैन, बौद्ध या पंथांचा त्यांनी कधीहि अनादर केला नाही. कर्नाटक प्रांताचे नेते गंगाधरराव देशपांडे ह्यांना त्यांनी एकदा मुद्दाम सांगितलें की, तुम्ही सार्वजनिक चळवळ कर्नाटक प्रांतांत करीत आहांत. तेथे लिंगायत लोक बरेच आहेत. तेव्हा पहिली गोष्ट म्हणजे लिंगायत लोकांच्या धर्म-ग्रंथांचा चांगला परिचय करून घेऊन, त्या धर्माच्या उदार तत्त्वांचा आदरपूर्वक अभ्यास करा. म्हणजे त्या धर्मांतील लोकांसंबंधाने आपला आदर वाढून आपल्याला त्यांची सहानुभूति मिळते, नाही तर विनाकारण गैरसमज होतो. जैनपंथाविषयी त्यांनी मुनि जिनविजय यांच्यापाशीं असाच आदरभाव व्यक्त केला होता. ते म्हणाले, जैन समाजाची सांपत्तिक स्थिति फार उत्तम आहे. तो समाज देशाच्या ज्ञानप्रसारक संस्थांना सहानुभूति दाखवून मदत करील तर देशकार्यांत फार बहुमोल मदत होईल. (आठवणी, खंड २ रा, पृ. २१, ४७). कोलंबो येथे 'बौद्ध धर्म व वैदिक धर्म' या विषयावर लोकमान्यांचें व्याख्यान झालें होतें. त्यांत त्यांनी बौद्ध धर्माविषयी असेच गौरवोद्गार काढले होते. ते म्हणाले, "बौद्ध धर्माने वैदिक धर्मांतील संन्यासाची कल्पना स्वीकारली, पण त्याबरोबरच संन्याशाने समाजांत राहून समाजसेवा करावी, कर्मयोगी व्हावें, अशी त्यास दिशा लावली. . .बौद्ध धर्मामुळे वैदिक धर्मांतील अनेक अनावश्यक आचारांची छाटाछाट होऊन वैदिक धर्माचें स्वरूप जास्त शुद्ध व जोमदार झाले, हें मान्य केलेंच पाहिजे."

हें हिंदु धर्मांतील पंथाविषयी झालें. ख्रिश्चन व मुस्लिम या धर्मांविषयीहि लोकमान्यांची अशीच वृत्ति होती. त्यांच्या 'स्व'मध्ये त्यांचाहि समावेश होत होता. भरतभूमीला जो कोणी मातृभूमि मानील, येथल्या राष्ट्रपुरुषांची जो पूजा करील व या भूमीशीं जो एकनिष्ठ असेल तो टिळकांचा 'स्व' होता. बॅ. बॅप्टिस्टा व मौ. शौकतअल्ली यांनी सांगितलेल्या आठवणींवरून ( खंड २रा, पृ. ५४७, ५७९ ) व टिळकांच्या कलकत्ता, अमरावती येथील भाषणांवरून हें निःसंदेह सिद्ध होईल.

अत्यंत शुद्ध अशा राष्ट्रीय वृत्तीची टिळक प्रारंभापासून कशी जोपासना करीत होते तें यावरून ध्यानांत येईल. धर्मभेद त्यांनी राष्ट्रीय वृत्तीच्या कधी आड येऊं दिला नाही. दादाभाई हे पारशी होते. पण त्यांची राष्ट्रसेवा पाहून त्यांनी निरंतर त्यांचा 'पितामह, महर्षि' असा गौरव केला. बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा हे ख्रिश्चन

गृहस्थ, पण टिळकांनी हिंदी स्वराज्य संघाचे त्यांना अध्यक्ष केलें. बॅ. जिना यांची आरंभीं वृत्ति पूर्ण राष्ट्रीय होती. त्या वेळीं टिळक त्यांना असाच मान देत.

संगीताच्या दृष्टान्तांत त्यांनी सांगितलेला विचार ते प्रत्यक्षांत कसा आणीत होते तें यावरून विशद होईल. राष्ट्रीय जीवनांतील सर्व तारा परस्परांना उपकारक होऊन सर्वांतून संवादी असा एकच मधुर सूर निघावा ही त्यांची तळमळ होती.

या देशांतील सर्व वर्ण, सर्व जाति, सर्व धर्म, सर्व पंथ, सर्व प्रांत यांतील गरीब, श्रीमंत, कष्टकरी, बुद्धिजीवी या सर्वांचा 'स्व'मध्ये समावेश करून राष्ट्र-तत्त्वावर त्यांची संघटना कोणीहि, केव्हाहि बांधलेली नव्हती. ती बांधणें हें टिळकांचें उद्दिष्ट होतें. हें उद्दिष्ट अभूतपूर्व असें होतें. त्यांनी तें कसें साधलें हें आता पाहावयाचें आहे.

- २ -

# पाश्चात्य विद्या

हिंदुस्थानांतील शतधा विघटित अशा हिंदी समाजांतून एक राष्ट्र निर्माण करावयाचें हें अभूतपूर्व उद्दिष्ट टिळकांनी कसें साध्य केलें ?

पाश्चात्त्य विद्या व पाश्चात्त्य संस्कृति यांच्या साह्याने !

लो. टिळक हे सनातन धर्माचे अभिमानी होते; प्राचीन परंपरेचाहि त्यांना फार अभिमान होता; सुधारकांवर त्यांनी फार प्रखर टीका केली होती; असें असतांना त्यांनी पाश्चात्त्य विद्या व पाश्चात्त्य संस्कृति यांचा आश्रय केला, त्यांचा अवलंब करून हिंदुस्थानांत राष्ट्र-निर्मिति केली, हें वाचून अनेकांना विस्मय वाटेल, आश्चर्य वाटेल. पुष्कळांना हें विधान रुचणार नाही, पटणार नाही; पण तें खरें आहे. तें अगदी पूर्ण सत्य आहे. त्या विद्येवांचून त्यांना आपलें उद्दिष्ट साध्य करतां आलेंच नसतें. त्या संस्कृतीच्या आश्रयावांचून त्यांना एक पाऊलहि पुढे टाकतां आलें नसतें. लोकमान्यांना स्वत:लाहि ही पूर्ण जाणीव होती.

## पाश्चात्त्य शास्त्रें

१९०७ सालीं बेळगावला 'सरकारी शिक्षण व राष्ट्रीय शिक्षण' या विषयावर बोलतांना ते म्हणाले, " तरुण पिढीने विद्वान्, बुद्धिमान् निश्चयी व शरीर-सामर्थ्याने युक्त व्हावें, इतकीच आमची इच्छा नाही. तर आमच्या तरुणांनी पाश्चात्त्य शास्त्रांत पारंगत व्हावें, अशीहि आमची प्रबल इच्छा आहे. हीं पाश्चात्त्य शास्त्रें आमच्या विद्यार्थ्यांस शिकविण्याच्या कामीं ज्या दिवशीं हरकत होईल त्या दिवशीं हिंदुस्थानचा भाग्योदय सरला असें मी समजेन." ( लोकमान्य टिळकांचीं व्याख्यानें, पृ. ९३ ). पाश्चात्त्य शास्त्रांचें लोकमान्य किती महत्त्व मानीत होते, तें यांवरून ध्यानांत येईल.

## सुशिक्षित शत्रु

राष्ट्रीय पक्षाच्या चळवळीवर टीका करतांना मोर्लेसाहेब म्हणत की, " हिंदुस्थानांतले सुशिक्षित लोक हे इंग्रजी राज्याचे खरे शत्रु आहेत." त्याला उत्तर देतांना टिळक म्हणत की, " आम्ही सुशिक्षित लोक त्यांचे शत्रु कां झालों ? तर आम्हांला मिळालेल्या शिक्षणामुळे. म्हणजे आम्ही त्यांचे शत्रु नसून, आमचें ज्ञान हें त्यांचे शत्रु आहे." ( उक्त ग्रंथ, पृ. ३ ). हाच विचार त्यांनी पुण्याला गायकवाड-वाड्यांत झालेल्या व्याख्यानांत त्याच सालीं पुन्हा मांडला आहे. " सरकार म्हणतें शिकलेले लोक आमचे शत्रु आहेत. रयत अजून आमच्या नादीं आहे. त्यांना तसेंच ठेवण्याचा आमचा उद्योग आहे, पण सुशिक्षित म्हणतात, तें आम्ही कधीहि होऊं देणार नाही." जें ज्ञान शाळा-कॉलेजांत, विद्यापीठांत सुशिक्षितांना मिळालें तें सर्व रयतेंत पसरणें व रयतेलाहि इंग्रजांचे शत्रु बनविणें, हा उद्योग टिळकांनी जन्मभर केला. सर्व सुशिक्षितांनी रामदासी बनून तेंच कार्य करावें अशी त्यांची शिकवण होती. कारण या ज्ञानाच्या साह्यानेच राष्ट्र घडावयाचें आहे अशी त्यांची निश्चिति होती.

गणपतीपुढे व्याख्यान असलें की, न चुकतां लोकमान्य सांगत की, " गणपति ही ज्ञानाची देवता आहे, आज मला तिची मदत पाहिजे आहे." गणपति-उत्सव कशा-साठी आहे ? " ज्ञान मिळावें म्हणून ही सारी खटपट आहे. आम्हांला धर्मदृष्टचा सामाजिकदृष्टचा व राजकीयदृष्टचा, वळण पाहिजे आहे. केवळ मौज करण्या-करिता आम्ही हा उत्सव करीत नाही. तुम्ही जिवंत रहावयाला योग्य आहा की नाही हें निश्चयाने दाखवावयाचें आहे." ( उक्त ग्रंथ, पृ. ४५, ५० ).

## अमेरिकेसारखें शिक्षण

हें ज्ञान म्हणजे कोणतें ज्ञान ? अर्थातच पाश्चात्त्य विद्यांचें ज्ञान. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय, तें स्पष्ट करतांना त्यांनी हें अनेक वेळा सांगितलें आहे. " राष्ट्रीय शिक्षणांत आम्हांला मराठींत शिक्षण पाहिजे. त्यांत व्यापारी व शास्त्रीय विषयांचें शिक्षण पाहिजे हें खरें; पण मुख्य मुद्दा हा नाही. इंग्लंड, अमेरिका यांसारख्या स्वतंत्र देशांत जें शिक्षण देतात तसलें शिक्षण आम्हांला पाहिजे आहे. आम्हांला जोमाचीं माणसें पाहिजे आहेत. तीं सरकारला कदाचित् पटावयाचीं नाहीत, पण त्याला कांही इलाज नाही. कुंडींतल्या झाडाप्रमाणे ठराविक उंचीपर्यंत झाड वाढूं देण्याची सरकारची इच्छा आहे. आम्हांला पूर्ण वाढ होऊं द्यावयाची आहे. आम्हांला स्वराज्याचें शिक्षण पाहिजे आहे. सरकारला ओशाळलेला शिक्षकवर्ग या कामाचा नाही." ( व्याख्यानें, पृ. २४ ). " इंग्लंडने ज्याप्रकारच्या संस्था काढून आपली स्थिति सुधारली तशा प्रकारच्या संस्था काढून आपण आपली स्थिति सुधारून घेतली पाहिजे. जपानने चाळीस वर्षांत जें केलें तें इंग्रजांनी दीडशे वर्षांत हिंदुस्थानांत केलें नाही. आपलें शिक्षण अपुरें आहे, तें पुरें करण्याचा यत्न तुम्ही कराल, अशी मी आशा करतों." ( व्याख्यानें, पृ. ७० ).

## ज्ञान हें सामर्थ्य

जें ज्ञान टिळकांना अभिप्रेत होतें, जें खेड्यापाड्यांत पसरण्याचा त्यांचा आग्रह होता. ज्यामुळे जोम येतो, ज्यामुळे वृक्षाची पूर्ण वाढ होते, तें ज्ञान म्हणजे इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान येथल्या विद्यार्थ्यांना मिळणारें ज्ञान होय. स्वराज्य-प्राप्तीसाठी त्या ज्ञानाचें साह्य त्यांना हवें होतें. सरकारी व सरकारमान्य शाळांत इतिहास, भूगोल, रसायन, पदार्थविज्ञान हेच विषय शिकवीत, पण ते निर्जीवपणें, ओशाळेपणें शिकवीत. लोकमान्यांना राष्ट्रीय शिक्षणांत विषय तेच शिकवावयाचे होते; पण त्या शिक्षणाने विद्यार्थ्यांचीं मनें त्यांना समर्थ करावयाचीं होती; इंग्रजी राज्यामुळे आमचें नुकसान होत आहे, हें त्यांना शिकवावयाचें होतें, त्या ज्ञानाच्या साह्याने लोकांची प्रतिकारशक्ति त्यांना जागृत करावयाची होती; स्वधर्म, स्वभाषा, भारतीय परंपरा यांचा अभिमान जागृत करावयाचा होता; आणि 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क असून मी तें मिळवीनच' ही ईर्षा विद्यार्थ्यांच्या मनांत निर्माण करावयाची होती. म्हणून इंग्लंड, अमेरिकेंत जी विद्या मुलांना देतात ती त्यांना येथल्या मुलांना द्यावयाची होती. त्या विद्येंत खरें सामर्थ्य आहे हें त्यांनी जाणलें होतें.

## प्रत्यक्षनिष्ठ शास्त्रें

वर जीं पाश्चात्त्य शास्त्रें सांगितलीं तीं प्रत्यक्षनिष्ठ व प्रयोगक्षम आहेत. तीं दृष्टफल आहेत, धर्मशास्त्राप्रमाणे अदृष्टफल नाहीत. तेव्हा त्यांचा विचार करतांना आपण प्रत्यक्षाला, प्रयोगजन्य निर्णयाला, दृक्प्रत्ययालाच महत्त्व दिलें पाहिजे, त्या बाबतींत वेदांचा किंवा पूर्वाचार्यांचा आधार घेऊन दृक्प्रत्यय खोटा, असें मानणें केव्हाहि योग्य नाही, असें लोकमान्य टिळकांनी अनेक वेळा आवर्जून सांगितलें आहे. " पाश्चात्त्य राष्ट्रें अद्याप जिवंत आहेत, आणि तीं आपल्या शास्त्रांची वाढ करण्याच्या उद्योगांत सतत मग्न असतात. प्राचीन काळीं आमचे आचार्य असाच उद्योग करीत असत; पण पुढे ही वृत्ति सुटली व आमच्या शास्त्रांची वाढ खुंटली." टिळक म्हणतात, " ख्रिस्ती शकानंतर कांही शतकांनी शास्त्रविद्येचा जिवंतपणा कमी होऊं लागला, आणि आमचे पंडित पूर्वाचार्यांनी केलेले सिद्धान्तच खलीत बसण्याच्या उद्योगास लागले. हिंदुस्थानांतील शास्त्रांची ही स्थिति सदर शास्त्रें युरोपियन पंडितांच्या हातांत पडल्यावर पालटली." ( लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड ४ था, पृ. ४८५, ४८६ ). आता आपल्या शास्त्रांना जिवंतपणा यावयास हवा असेल तर आपण प्रत्यक्षनिष्ठ झालें पाहिजे, असें टिळकांनी पुन: पुन्हा बजाविलें आहे.

## ब्रह्मवाक्यहि अप्रमाण

पंचांग-संशोधनाच्या बाबतींत त्यांची ही विज्ञाननिष्ठा अनेक वेळा प्रत्ययास आलेली आहे. १९ मे १९०० च्या केसरींतील लेखांत त्यांनी म्हटलें आहे की, " केरू-नाना, दीक्षित ह्यांच्यांवर आधुनिक यवनाचार्य म्हणजे युरोपीय ज्योतिर्गणिती यांच्या संशोधनाचा परिणाम झालेला आहे. स्वत: वेध घेऊन त्याप्रमाणें जुनें शास्त्र सुधारलें

पाहिजे, असें त्यांचें मत होतें. पूर्वी ब्रह्मगुप्ताची अशीच वृत्ति होती. त्याने आर्यभट्टाच्या गणितास दोष दिलेले आहेत. तो म्हणतो, "ब्रह्मदेवाने सांगितलेलें ग्रह-गणित महान् काळ गेल्यामुळे खिळखिळें झालें आहे. तें मी जिष्णुसुत ब्रह्मगुप्त स्पष्ट करून सांगतों." यावरून असें दिसतें की, ब्रह्मदेवाचें वाक्यहि जसेंच्या तसें मानतां येत नाही, हें सांगण्याचें धैर्य त्या काळीं होतें. गर्गादि ग्रंथकार तर स्वच्छ म्हणतात की, "म्लेंच्छ, यवन यांनी स्थापिलेलें शास्त्र उत्तम आहे. तेव्हा त्यांनाहि ऋषींप्रमाणे पूज्य मानलें पाहिजे." अशी वृत्ति असल्यामुळेच प्राचीन काळीं आमचीं शास्त्रें जिवंत राहिलीं; पण पुढे ही वृत्ति पालटली. त्यामुळे शास्त्रांची वाढ खुंटली."

तेव्हा पुन्हा आपण त्या प्रत्यक्षनिष्ठ, दृक्प्रत्ययशरण-वृत्तीचा अवलंब केला पाहिजे, असा उपदेश टिळकांनी केला आहे. त्या काळीं जुन्या गणितग्रंथांच्या नियमाप्रमाणे चंद्र-सूर्य व इतर ग्रह यांचे अस्तोदय होत नसत. तेव्हा गणित चुकत होतें हें उघड आहे; पण अंधश्रद्ध लोक तें मान्य करून नवें गणित स्वीकारण्यास तयार नव्हते. त्यामुळेच पंचांगाचा वाद माजून राहिला होता. या वेळीं, "ज्योतिषाच्या गणिताची साक्ष प्रत्यक्ष आहे – 'प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ' – गणिताप्रमाणे चंद्र-सूर्य आकाशांत दिसतील तर तें गणित खरें, नाही तर खोटें" हा विचार टिळकांनी केसरींतून वारंवार मांडला. पाश्चात्त्य विद्येचा संस्कार आपल्या लोकांच्या मनावर व्हावा हाच त्यांतला हेतु होता.

**अनाग्रह**

वैद्यकशास्त्राचा विचार करतांना त्यांनी हीच विचारसरणी अवलंबिलेली होती. 'आर्यवैद्यकाचें पुनरुज्जीवन' या लेखांत ते म्हणतात, "आमचें जुनें वैद्यक नव्या वैद्यकापेक्षा कांही बाबतींत पुष्कळ मागे आहे, ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, शारीरशास्त्र वगैरे वैद्यकीस उपयुक्त व आवश्यक शास्त्रांचा पश्चिमेकडील लोकांनी गेल्या एक-दोन शतकांत चांगला अभ्यास करून तीं शास्त्रें पुष्कळ पूर्णतेस नेलीं आहेत." हें सांगून टिळकांनी ज्योतिषशास्त्राप्रमाणेच प्राचीन काळचें भारतीय वैद्यकहि पुष्कळ प्रगत होतें, तेव्हा त्याचाहि अभ्यास करावा व प्राच्य आणि पाश्चात्त्य हा भेद न मानतां, सत्याचें मधुकर-वृत्तीने ग्रहण केलें पाहिजे, असें तत्त्व सांगितलें आहे; आणि नंतर म्हटलें आहे की, "आग्रहास शास्त्रीय शोधांत जागा नाही. अनुभवाच्या व परीक्षणाच्या कसोटीस उतरेल तीच गोष्ट असल्या प्रकरणीं खरी मानावी लागते." (केसरींतील लेख, खंड ४ था, पृ. २०२).

वैद्यक व ज्योतिष हीं प्रत्यक्षनिष्ठ शास्त्रें झालीं. पण व्याकरण, वेदार्थमीमांसा याहि बाबतींत, आमच्या शास्त्रांची वाढ प्राचीन काळींच खुंटली होती, आणि युरोपीय पंडितांनी ती बंद पडलेली परंपरा पुन्हा चालू केली, असें सांगून टिळकांनी त्यांचा गौरव केला आहे; आणि शेवटीं एक व्यापक विधान केलें आहे की, "आमच्या

शास्त्रांचीच नव्हे तर आमच्या उद्योगधंद्यांची व कलांचीहि हीच स्थिति झालेली आहे. उदाहरणार्थ, वस्त्रें विणण्याची किंवा रंगविण्याची कला घ्या. यांत आम्ही पुष्कळच प्रावीण्य व कौशल्य संपादन केलें होतें. पण पुढे त्यांची वाढ खुंटली. युरोपियन लोकांस आमच्याकडून या कलेचें जें ज्ञान मिळालें तें याच स्थितींतलें होय; परंतु या वेळीं युरोपीय राष्ट्रें जिवंत असल्यामुळे त्यांनी आमच्याकडून संपादन केलेल्या सदर कलांच्या ज्ञानांत भर घालून त्यांचा प्रवाह पुढे चालू ठेवला; आणि त्या कलांच्या साहाय्याने आपला देश श्रीमंत करून आम्हांस उलट भिकेस लाविलें." ( वेदांताची आणि उद्योगाची दिशा, केसरींतील लेख, खंड ४ था, पृ. ४८६ ).

लो. टिळकांचीं हीं विवेचनें वाचतांना एक गोष्ट स्पष्टपणें जाणवते की, समाजाला जिवंतपणा यावयास हवा असेल, तर त्याने पाश्चात्त्यांप्रमाणे प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम, दृक्प्रत्ययशरण अशा शास्त्रांचा अनाग्रही-बुद्धीने, केवळ सत्याकडे दृष्टि ठेवून, अभ्यास केला पाहिजे, हा सिद्धान्त त्यांच्या मनाशीं निश्चित झाला होता. आणि पाश्चात्त्य शास्त्रांच्या अध्ययनाने असे संस्कार हिंदी जनतेच्या मनावर व्हावेत, अशी त्यांना तळमळ लागलेली होती. 'दोन शब्दांत दोन संस्कृति' या आपल्या लेखांत स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पाश्चात्त्य व पौर्वात्य संस्कृतींत जो भेद सांगितला आहे, तोच आजच्या काळाच्या दृष्टीने, लो. टिळकांना मान्य होता. पाश्चात्त्य संस्कृति प्रत्यक्षनिष्ठ आहे; आणि आपली पोथीनिष्ठ आहे, असें सावरकरांनी सांगितलें आहे. टिळकांच्या विवेचनाचा भावार्थ तोच आहे. म्हणूनच पाश्चात्त्य विद्येचा, आपण त्यांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून, अभ्यास केला पाहिजे, असें त्यांनी पुनः पुन्हा सांगितलें आहे.

### पाश्चात्त्य ऋषि

आणि हें केवळ भौतिक शास्त्रांच्या बाबतींत नव्हे, तर प्राचीन भारतीय जे वेदोपनिषदादि ग्रंथ त्यांच्याहि अभ्यासाच्या बाबतींत आपण पाश्चात्त्य पद्धतीचाच अवलंब केला पाहिजे, असा टिळकांचा आग्रह होता. प्रो. मॅक्समुल्लर या थोर पंडिताचा मृत्युलेख टिळकांनी लिहिला आहे. त्यांत रॉथ, बॉप, वेबर, बुल्हर या पंडितांच्या कार्याचें महत्त्व सांगतांना ते म्हणतात, "त्यांनी प्राच्य-भाषा, प्राच्य-धर्म, या विषयांवर जे अनेक ग्रंथ लिहून ठेविले आहेत, ते इतके महत्त्वाचे आहेत की, प्राच्य-भाषांचा किंवा धर्म-ग्रंथांचा इतउत्तर जर कोणास सूक्ष्म व नव्या पद्धतीने अभ्यास करावयाचा असेल, तर या पाश्चात्त्य विद्वानांचे ग्रंथ वाचल्याखेरीज त्याच्या अध्ययनाची परिपूर्ति कधीहि व्हावयाची नाही." मॅक्समुल्लर यांच्याबद्दल तर टिळकांना इतका आदर होता की, त्यांनी त्यांना प्राचीन भारतीय ऋषिमुनींच्या पदवीला नेऊन बसविलें आहे, आणि म्हटलें आहे की, "विद्यादेवीची इतक्या एकनिष्ठपणें सेवा करणारे पंडित आमच्या देशांत प्राचीन काळीं पुष्कळ होत असत; व सायणाचार्यांसारखे तेराव्या शतकापर्यंत झालेले आहेत; पण मध्यंतरीं ही परंपरा जी कमी झाली ती

अद्यापहि पूर्ववत् झाली नाही, ही मोठ्या दु:खाची गोष्ट आहे. ग्रंथलेखनासाठी मॅक्समुल्लर यांस जी सवलत मिळाली ती दुसऱ्या कोणा विद्वानास मिळाली नसती असें नाही; पण त्यांच्यासारखी विद्याभिरुचि असणारा व एकनिष्ठपणें विद्या-व्यासंग करणारा आमच्यामध्ये हल्लीच्या काळांत तरी कोणी नजरेस येत नाही, ही मोठ्या दु:खाची गोष्ट आहे. हिंदुस्थानांतील आधुनिक विद्वानांनी प्रो. मॅक्समुल्ल-रांच्या चरित्रापासून जर कांही बोध घ्यावयाचा असेल तर तो ह्याच होय. राजकीय बाबतींत आम्हांस, आमच्या अंगीं कितीहि गुण असले तरी, पुढाकार घेण्यास या राज्यांत संधि सापडणें कठीण आहे; पण विद्याव्यासंग, तत्त्वज्ञान, धर्मविचार किंवा शास्त्रीय शोध या बाबतींत आमच्या बुद्धीचा बराच उपयोग आम्हांस अद्याप करून घेतां येण्यासारखा आहे; व तेवढा जरी आमच्या विद्वानांनी करून घेतला तरी त्यापासून देशाचें पुष्कळ कल्याण झाल्याखेरीज राहणार नाही."

हर्बर्ट स्पेन्सर या थोर पाश्चात्त्य पंडिताच्या अज्ञेयमीमांसेचें परीक्षण करतांना लो. टिळकांनी पाश्चात्त्य विद्या व पाश्चात्त्य विद्वान् यांचा असाच मुक्तकंठाने गौरव केला आहे. ते म्हणतात, "अलीकडे दोन-तीन शतकें ज्योतिषशास्त्र, रसायन-शास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, विद्युच्छास्त्र वगैरे आधिभौतिक शास्त्रांची पुष्कळ अभिवृद्धि होऊन, जगांतील नैसर्गिक शक्तीने एकंदर पदार्थांचीं जीं स्थित्यंस्थरें किंवा रूपांतरें होतात त्यांचे नियम आपणांस अधिकाधिक कळत जाऊन, त्यापासून मनुष्य-जातीचा अत्यंत फायदा झालेला आहे, ही गोष्ट सर्वांस निर्विवाद कबूल आहे." पाश्चात्त्य शास्त्रांचें असें महत्त्व सांगून, टिळकांनी त्या शास्त्रांच्या ज्ञानप्राप्तीच्या पद्धतीचें वर्णन केलें आहे. पाश्चात्त्य विद्येचें अनन्यत्व आहे तें त्या पद्धतींत आहे. "जड सृष्टींतील पदार्थांचें सूक्ष्म अवलोकन, तदंतर्गत गुणधर्मांचें व्यवस्थित व सखोल विवेचन आणि परस्पर विभिन्न दिसणाऱ्या पदार्थांचें किंवा गुणधर्मांचें एक-मेकांशीं सदृशत्व किंवा विसदृशत्व समजणें हीं आता जशी सुगम झालीं आहेत तशीं कधीहि झालेलीं नव्हतीं. . . त्याचप्रमाणे सर्व पदार्थांस सामान्यत: व्यापून असणारे दिक्कालादि पदार्थ अनादि व अनंत असले तरी, त्यांचा इतर पदार्थांशीं कोणत्या प्रकारचा संबंध असतो, याचें अर्वाचीन शास्त्रांतून जितकें चांगलें विवेचन आहे, तितकें जुन्या ग्रंथांतून नाही व त्याचें कारणहि उघड आहे. गेल्या दोनशें-तीनशें वर्षांत आधिभौतिक शास्त्राची जी अभिवृद्धि झाली तिच्या योगाने हें ज्ञान आपणांस प्राप्त झालेलें आहे." (केसरींतील लेख, खंड ४ था, पृ. ३०५). लो. टिळकांनी अत्यंत प्रांजल-बुद्धीने येथे पाश्चात्त्य विद्येची महती गायिली आहे. दिक्, काल हे तत्त्व-ज्ञानाचे विषय, पण त्यांचें स्वरूपहि अर्वाचीन शास्त्रांमुळे जास्त चांगलें स्पष्ट होतें, असें ते पूर्ण अनाग्रही-वृत्तीने मान्य करतात. हे विचार त्यांनी १९०१ सालीं मांडले. त्यानंतर दोन वर्षांनी हर्बर्ट स्पेन्सर मृत्यु पावले. तेव्हा त्यांचा मृत्युलेख लिहितांना मॅक्समुल्लरसाहेबांच्या मृत्युलेखांतल्याप्रमाणेच त्यांनी उद्गार काढले आहेत. ते

म्हणतात, "आजन्म विद्या-व्यासंग व तत्त्व-विचार यांत आपला सर्व वेळ घालविणारे व स्वभावतःच वैराग्यशील व विगततृष्ण असे महापुरुष आपल्या देशांत प्राचीन काळीं बरेच होत असत, परंतु ती प्रवृत्ति नाहीशी होऊन पुष्कळ दिवस झाले आहेत, व इंग्रजी शिकलेल्या विद्वानांतहि वैराग्य, तत्त्वज्ञान, सतत विद्याव्यासंग, हे गुण अद्याप दृष्टीस पडूं लागले नाहीत." हें दुःख व्यक्त करून शेवटीं समारोप करतांना टिळकांनी कपिल, गौतम, कणाद, बुद्ध या प्राचीन तत्त्ववेत्त्यांशीं स्पेन्सरसाहेबांची तुलना केली आहे व "असे पुरुष देशांत उत्पन्न होणें हेंच देशाच्या सजीवतेचें लक्षण होय" असें म्हटलें आहे. ( केसरींतील लेख, खंड ४ था, पृ. ३५७, ३६७ ).

## राष्ट्राचे नागरिक

हिंदी समाज लो. टिळकांनी राष्ट्र या तत्त्वावर संघटित केला तो पाश्चात्त्य विद्या व पाश्चात्त्य संस्कृति यांच्या साह्याने केला, याचा अर्थ आता ध्यानांत येईल, असें वाटतें. राष्ट्रसंघटना याचा ढोबळ अर्थ सर्वांना माहीत असतो. ही संघटना धर्म-जाति-निरपेक्ष असते, ती वर्गभेद, प्रांतभेद मानीत नाही, एक ध्येय, एक राष्ट्रभाषा, एक परंपरा यांनी या संघटनेंतील सर्व लोक एकजीव झालेले असतात, हीं तत्त्वें आता सर्वश्रुत झालीं आहेत; पण याच्याहि पलीकडे एक अत्यंत महत्त्वाचें तत्त्व राहतें, त्याची जाणीव असावी तितकी लोकांना नसते. समाजांतील प्रत्येक माणसाला, सर्व समाजाच्या उत्कर्षापकर्षाची जबाबदारी माझ्या शिरावर आहे, आणि ती जबाबदारी पार पाडण्यासाठी मी सतत प्रयत्नशील असलें पाहिजे, अशी जेव्हा जाणीव असते तेव्हाच तो समाज राष्ट्रपदवीला जाऊं शकतो. ही जाणीव होणें म्हणजेच अस्मिता, व्यक्तित्व जागृत होणें; आणि राष्ट्राच्या नागरिकाचें व्यक्तित्व हें पहिलें लक्षण होय. या व्यक्तित्वाची जागृति व परिपोष पाश्चात्त्य विद्येवांचून होणें शक्य नाही, हें लो. टिळकांनी प्रारंभीच जाणलें होतें. म्हणूनच पाश्चात्त्य विद्येच्या उपासनेसाठी त्यांचा अट्टाहास होता.

## स्वावलंबन

राष्ट्रांतील प्रत्येक नागरिक सर्व समाजाची चिंता वाहण्यास समर्थ व्हावा यासाठी उपाय काय ? राष्ट्रीय प्रपंचाचीं सर्व कामें स्वतःहून अंगावर घेणें व तीं पार पाडणें हा एकच उपाय यावर आहे. आमचे उद्योगधंदे बुडाले. ते सरकार काढणार नाही, ते आमचे आम्हीं काढले पाहिजेत. कारखाने आम्हीं काढले पाहिजेत, भांडवल आम्हीं जमविलें पाहिजे. हें काम एकटयादुकटयाचें नाही, म्हणून पाश्चात्त्यांचें अनुकरण करून आम्हीं प्रत्येक कामासाठी सभा स्थापिल्या पाहिजेत. हा विचार टिळक केसरीच्या पहिल्या वर्षापासून सांगत होते. "युरोप-अमेरिकेच्या इतिहासापासून घेण्याजोगी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांची सभास्थापनपद्धति होय. राजकीय सभा, सामाजिक सभा, अर्थव्यवहार करणाऱ्या सभा, धार्मिक सभा. ( कंपन्या, बँका, पेढया यांना टिळकांनी सभाच म्हटलें आहे). पाश्चात्त्य लोक हरएक कामांत सभा

स्थापन करतात. आपण त्यांचें अनुकरण केलें पाहिजे. आपल्याकडे भांडवल नाही. एकेकटा मनुष्य कारखाने काढूं शकणार नाही. तेव्हा सभा स्थापून भांडवल जमविणें यावांचून दुसरा तरणोपाय नाही. या सभा स्थापन करण्याचें काम ज्यांस इंग्रजी विद्येचा संस्कार झाला आहे अशाच लोकांनी प्रथम हातीं घेतलें पाहिजे; कारण त्यांच्या साह्यावांचून सभा स्थापन होणें अगदी अशक्य आहे; पण याआधी राजकीय सभा स्थापन झाल्या पाहिजेत. त्यांपासून मनुष्यास, एकत्र येऊन काम केल्याने किती फायदा होतो तें कळूं लागतें. शिवाय जों जों अशा प्रकारची सभा मोठी असते तों तों तिचें अधिकाधिकच प्रावल्य होतें व सरकारासहि एक प्रकारची दहशत पडते. अशा रीतीने राजकारणी सभा स्थापण्याचें शिक्षण मिळाल्यावर उद्योगाच्या व व्यापाराच्या सभा स्थापणें सुलभ होतें." (वर्ष १लें, अंक ४९, ५०; केसरींतील निवडक निबंध, पहिलें पुस्तक, आवृत्ति २ री, पृ. २०८–२१३ – दोन अंकांतील लेखांचा सारार्थ वर दिला आहे). "असा प्रयत्न इंग्रजी शिकलेल्यांनी केला पाहिजे. असें त्यांनी न केल्यास त्यांच्या देशहिताच्या संबंधाने सर्व गप्पा व्यर्थ जाणार आहेत व पाश्चात्त्य देशांतील लोक या देशास रानटी व सार्वजनिक कामांत उदासीन असें म्हणतात तें यथार्थ ठरणार आहे." (उक्त ग्रंथ, पृ. २१२).

या देशाचें हेंच मुख्य दुखणें होतें. येथले प्रजाजन सार्वजनिक कामांत उदासीन होते. असे लोक राष्ट्र घडवूं शकत नाहीत. अशा या प्रजाजनांना राष्ट्रभक्तीची दीक्षा देणें हें लोकमान्यांचें मुख्य कार्य होतें.

## नवी शेती, नवे उद्योग

राष्ट्रनिर्मिति करण्यासाठी टिळकांना या समाजपुरुषाच्या देहांतील प्रत्येक पेशी जागी करावयाची होती. या देहांतील प्रत्येक स्नायु चलनवलन करूं लागला पाहिजे, प्रत्येक वाहिनी, प्रत्येक धमनी आपलें जीवनरस वाहण्याचें काम उत्तम करूं लागली पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. आपली शेती, या विषयावर बोलतांना, पांडुरंग गोपाळ बाळ महाजन यांना ते म्हणाले, "पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणेच हे लोकशेती करतात; तींत सुधारणा म्हणून नाही. आपण सुधारणा करून इतरांच्या फायद्याकरिता तो अनुभव लोकांपुढे ठेवला पाहिजे." सांगलीला अस्पृश्यांतर्फे त्यांना मानपत्र देण्यांत आलें, त्या वेळीं ते म्हणाले, "अस्पृश्यांनी शिक्षण घेतलें पाहिजे; पण तरी नोकरीच्या मागे त्यांनी लागूं नये. धंदा घाणेरडा म्हणून तो अपमानास्पद न मानतां, नवीन वळणावर त्याची सुधारणा करणें हेंच श्रेयस्कर. अस्पृश्य आपल्या धंद्याची सुधारणा करतील तेव्हाच त्यांचा उद्धार झाला असें मी समजेन." डॉ. मोतीराम वेलकर यांच्यापाशीं बोलतांना, स्वराज्य मिळाल्यावर अनेक प्रयोगशाळा काढून देशांतील वनस्पतींचें संशोधन करून, वैद्यकशास्त्रांत प्रगति करण्याचा आपला मनोदय त्यांनी व्यक्त केला होता. कारण आता नुसतें कफ, वात, पित्त या कल्पनांना चिकटून चालणार नाही.

## पाश्चात्त्य धर्तीचें स्वराज्य

लोकमान्यांना शेती नवी हवी होती, उद्योग, वैद्यकशास्त्र नवें हवें होतें; आणि या जागृतींतून येणारें स्वराज्यहि नवें म्हणजे पाश्चात्त्य धर्तीचें हवें होतें. 'मराठा राष्ट्रीय संघा 'तर्फे भरलेल्या सभेंत लोकमान्य बोलत होते. ते म्हणाले, "आता आपल्याला पूर्वीचें स्वराज्य नको असून पाश्चात्त्य धर्तीवरील स्वराज्य पाहिजे आहे. आपल्या जातिभेदामुळेच येथे ब्रिटिशांचें राज्य स्थापन झालें आहे व जातिभेद असाच पुढे चालू राहणार असेल तर, स्वराज्यांतहि आमची अशीच अधोगति होईल." ( आठवणी, २,२०३).

जाति-पंथ-धर्मभेदातीत स्वराज्य, म्हणजेच हिंदी लोकांचें राज्य लोकमान्यांना हवें होतें. राष्ट्रसंघटना ती हीच; आणि त्यासाठी शेतकरी, अस्पृश्य, रेल्वेकामगार, वैद्य, मठपति या राष्ट्रपुरुषांच्या सर्व अवयवांत ते संजीवनी भरीत होते. एका खाजगी बैठकींत ते म्हणाले, "प्रस्तुत चळवळ मी करीत आहें याचा खरा अर्थ ध्यानांत घ्या, मी आज लोकजागृति करीत आहे. मृतवत् झालेल्या देहांत संजीवन घालीत आहे. ... ज्या दिवशीं स्वराज्याशिवाय जगणें शक्य नाही, ही भावना लोकांत मुरेल, तो दिवस खरा. . .तोंपर्यंत लोकांत अग्नि चेतविणें एवढेंच महत्त्वाचें काम करणें जरूर आहे."

## पाश्चात्त्य आदर्श

पाश्चात्त्य विद्या व पाश्चात्त्य संस्कृति लोकमान्यांना किती प्रिय होती, हें यांवरून ध्यानांत येईल. राष्ट्र, लोकशाही, विज्ञान या पाश्चात्त्य संस्कृतीच्या निष्ठा होत्या. समता, बंधुता, व्यक्तित्व, विचारस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य, हीं तत्त्वें त्यांच्या बुडाशीं होतीं; आणि तीं सर्व पाश्चात्त्य विद्येंतून निर्माण झालीं होतीं. म्हणून स्वराज्याचें रूप ठरवितांना, चळवळीचे मार्ग, आखतांना, संस्था उभारतांना, संघटना करतांना पाश्चात्त्यांचा आदर्श पुढे ठेवला पाहिजे, असें ते सांगत असत.

१९०८ सालच्या 'समेट कसा होईल' या लेखांत ते म्हणतात " पार्लमेंट सभेंत राष्ट्राचें हित कसें साधतात याचें प्रत्यक्ष उदाहरण आपल्या डोळ्यापुढे आहे; मग राष्ट्रीय सभेंत अमुक पक्षाचे लोक पाहिजेत, बाकीच्यांनी तेथे येण्याचें प्रयोजन नाही, असा आग्रह धरणें अनुदारपणाचें लक्षण नव्हे काय ? मतभेदामध्ये मतैक्य, बेकीमध्ये एकी उत्पन्न करून राष्ट्रकार्य कसें साधावयाचें या प्रश्नाचा पाश्चिमात्य लोकांनी निकाल लावलेला आहे." वंगभंगाच्या चळवळीला उत्तेजन देतांना, टिळक म्हणतात, "शंभरापेक्षा अधिक वर्षांच्या शिक्षणाने बंगाली लोक इंग्रजी रीतीची चळवळ करण्यास शिकले आहेत, आणि त्यांनी जर संघशक्ति अशीच कायम ठेविली तर त्यांच्या चळवळीचा पगडा सरकारवर बसण्याचा संभव आहे." ( केसरी, १५–८–१९०५ ). रशिया, अमेरिका, आयर्लंड या देशांतील चळवळीचीं उदाहरणें त्यांनी अशाच संदर्भांत दिलीं आहेत. "मँचेस्टरवाल्यांनी केला तसा

अन्याय अमेरिकेंत झाला तेव्हा अमेरिकेंत क्रान्ति झाली; रशियांतील प्रोफेसरांनी, मजुरांनी, विद्यार्थ्यांनी, कारखानदारांनी, एडिटरांनी, दुकानदारांनी आपलें म्हणणें धैर्यानें, कशाचीहि परवा न करतां, झारसाहेबांपुढे मांडलें तेव्हा जगांतील सर्व बादशहांत प्रबळ असे हे बादशहा मट्टयास आले. हिंदुस्थानांतहि अशी लढाई जुंपण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत." ( केसरी, २८–११–१९०५ ). आयर्लंडांत लँडलीग म्हणून जी सभा आहे, त्या सभेने पुष्कळ जमीनदार लोकांस बहिष्कृत केलें आहे. अशाच तऱ्हेने जर या वेळेस आपल्याकडे बहिष्काराचें रूपांतर होईल तर त्यापासून पुष्कळच फायदा होईल."

लोकमान्यांना स्वराज्य हवें होतें तें पाश्चात्त्य धर्तीचे हवें होतें, हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळेंच राष्ट्रसभा, सार्वजनिक सभा, होमरूल, लीग अशा पाश्चात्त्यांसारख्या संस्था स्थापून, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, विचारस्वातंत्र्य इत्यादि पाश्चात्त्य संस्कृतींतील तत्त्वांचा अवलंब करून, आणि स्वदेशी बहिष्कार, करबंदी अशा मार्गांनी लोकांनी जागृत होऊन, त्याग करून, दंड, तुरुंग, मृत्यु या शिक्षा सोसून स्वराज्य मिळविलें तरच तें टिकविण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं येतें हें त्यांनी जाणलें होतें. पाश्चात्त्य विद्या, पाश्चात्त्य संस्कृति व पाश्चात्त्य कार्यपद्धति यांविषयी त्यांचा आग्रह होता तो यासाठीच.

- ३ -

# प्राचीन परंपरा

## संजीवनी

लो. टिळक हे प्राचीन परंपरेचे अतिशय अभिमानी होते. हिंदुस्थानची प्राचीन परंपरा अत्यंत उज्ज्वल असून, जगांतल्या इतर कोणत्याहि देशाच्या वा समाजाच्या परंपरेपेक्षा ती फार श्रेष्ठ होती, असें त्यांचें निश्चित मत होतें. आपल्या परंपरेच्या श्रेष्ठतेची जाणीव, तिचा सार्थ अभिमान, म्हणजे एकराष्ट्रीयत्वाची संजीवनीच होय, असें त्यांना वाटत असे. त्या वेळीं देश पारतंत्र्यांत होता, आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांची वैज्ञानिक पाश्चात्त्य संस्कृति ही तत्कालीन हिंदु संस्कृतीपेक्षा प्रत्येक बाबतींत श्रेष्ठ आहे, असें पावलोपावलीं प्रत्ययास येत होतें. यामुळे हिंदी जनतेचा आत्मविश्वास खचत चालला होता. तो तसा खचावा, आपण स्वराज्याला, स्वातंत्र्याला लायक नाही, असें वाटून हिंदी मनाला मरगळ यावी व पारतंत्र्याविरुद्ध झगडा करण्याची त्यांची शक्ति, त्यांची इच्छाच नष्ट व्हावी, असा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जाणूनबुजून प्रयत्न चालविला होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी या सांस्कृतिक आक्रमणाला कसें तोंड दिलें व महाराष्ट्रियांचा स्वाभिमान कसा जागृत केला, हें मागे आपण पाहिलेंच आहे. लो. टिळकांनी त्यांचें तेंच कार्य दृढनिश्चयाने पुढे चालवून हिंदी जनतेंत चैतन्य निर्माण करण्याचा अखंड प्रयत्न चालविला होता.

पण यामुळेच, परंपरेच्या या अभिमानामुळेच लो. टिळकांना अनेकांनी प्रतिगामी, पुराणवादी, पुनरुज्जीवनवादी, सुधारणाविरोधी, कर्मठ सनातनी ठरविलें होतें, आणि आजहि त्यांच्या कार्याचें मूल्यमापन करतांना कांही पंडित या आरोपाचा पुनरुच्चार करतांना दिसतात. म्हणून टिळकांच्या या परंपराभिमानाचें स्वरूप काय होतें तें तपासून पाहणें आवश्यक ठरतें.

## आक्षेप

प्रतिगामी, पुराणवादी याचा अर्थ स्पष्ट आहे. परंपरेने चालत आलेल्या जुन्या रूढि, त्या कालबाह्य झाल्या असल्या, समाजाला घातक ठरत असल्या तरी, अंधश्रद्धेने तशाच पुढे चालविल्या पाहिजेत, असा हट्टाग्रह धरणारा तो पुराणवादी होय. कर्मठ सनातनी याचा अर्थ असाच आहे. समाजांतल्या अनेक आचारांना कालांतराने अर्थ राहत नाही. त्यांतलें मूलतत्त्व नाहीसें झालेलें असतें. तरी अंधपणें ते आचार तसेच पाळत राहणारा तो कर्मठ सनातनी होय. पुनरुज्जीवनवाद तो हाच. इंग्रजींतील रिव्हायव्हॅलिझम या शब्दाचा तो मराठी प्रतिशब्द आहे. जुन्या पीठिका, परंपरा, रूढि यांचा त्या जुन्या म्हणूनच अभिमान धरणें, त्या पुराण आहेत म्हणूनच, साधु आहेत, असें म्हणणें, हा पुनरुज्जीवनवाद होय. लो. टिळकांनी संमतिवयाच्या कायद्याला केलेला विरोध, त्यांनी प्रार्थनासमाजावर केलेली टीका, रानडे, भांडारकर यांच्या अनेक आचारविचारांवर घेतलेले आक्षेप यांचा आधार घेऊन, टीकाकारांनी टिळकांना वरील विशेषणें लावलेलीं आहेत.

पाश्चात्त्य विद्या व पाश्चात्त्य संस्कृति यांचें टिळक किती महत्त्व मानीत होतें, ती विद्या येथे आमच्या विद्यार्थ्यांना प्राप्त झाली पाहिजे, याविषयी त्यांचा कसा आग्रह होता, प्रत्यक्षनिष्ठा, विचारस्वातंत्र्य, अनाग्रही-बुद्धीने केलेलें सत्य संशोधन या पाश्चात्त्य संस्कृतीच्या मूलतत्त्वांचा त्यांनी निश्चयाने कसा पुरस्कार चालविला होता, याचें मागील प्रकरणांत केलेलें विवेचन काळजीपूर्वक वाचलें तर टिळकांच्या-वर कर्मठपणाचा, अंधश्रद्धेचा आरोप लोकांनी करावा, आज पन्नास वर्षांनंतरहि करावा, याचें आश्चर्य वाटेल; पण यासाठीच टिळकांच्या परंपरेच्या तत्त्वज्ञानाचें परीक्षण करणें अवश्य आहे.

## परिवर्तनाचा पुरस्कार

जातिभेद, अस्पृश्यता, चातुर्वर्ण्य हा, सनातन्यांच्या मतें, हिंदु धर्माचा आत्मा होय. लो. टिळकांचें यांविषयी काय मत होतें? १९०७ सालीं बेळगाव येथे ‘सरकारी शिक्षण व राष्ट्रीय शिक्षण’ या विषयावर त्यांचें भाषण झालें. त्यांत ते म्हणाले, “जातिभेद, जातिद्वेष, वा जातिमत्सर, यांच्या योगाने आमचा देश कसा विभागला जात आहे, कसा भाजून निघत आहे, कसा करपून जात आहे, याचेंहि ज्ञान राष्ट्रीय शाळेंतील मुलांना मिळालें पाहिजे.” “परमेश्वर अस्पृश्यता मानील तर मी परमेश्वरच मानणार नाही” हे त्यांचे उद्‌गार इतिहासाने नमूद केलेले आहेत. १८९१ सालीं डॉ. भांडारकर यांनी आपल्या गतभर्तृका कन्येचा पुनर्विवाह केला. तेव्हा टिळकांनी त्यांच्या मनोधैर्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें व प्रत्यक्ष कृतिरूप सुधारणा करणें हाच सामाजिक सुधारणा करण्याचा खरा मार्ग होय, असे उद्‌गार काढले. १८९३ सालीं धोंडो केशव कर्वे यांनी पुनर्विवाह केला त्या वेळीं त्यांचेंहि टिळकांनी अभिनंदन केलें व ते पानसुपारीलाहि गेले होते. बालविवाहाच्या संबंधांत

टिळकांनी १८९० सालीं जें पत्रक काढलें होतें प्रसिद्धच आहे. चार-पांचशे लोकांनी एकत्र येऊन करार करून, मुलीचें लग्न सोळा वर्षांच्या आंत करूं नये, पुरुषाने चाळीसच्या पुढे लग्न केल्यास विधवेशीं करावें, विधवेचें वपन करूं नये, अशा कांही सुधारणांस स्वतः बांधून घ्यावें, असें तें पत्रक होतें; आणि टिळकांनी स्वतःच्या मुलीचा विवाह तिच्या वयाच्या पंधराव्या वर्षानंतरच केला. आनंदीबाई जोशी त्या काळांत अमेरिकेंत जाऊन डॉक्टर होऊन आल्या त्या वेळीं टिळकांनी त्यांचें मुक्तकंठाने अभिनंदन केलें व "आनंदीबाईंची मूर्ति शांतपणें सर्व कुलीन स्त्री-पुरुषांच्या हृदयांत निरंतन वास करील", असे त्यांच्याविषयी धन्योद्‌गार काढले.

पतितपरावर्तन किंवा शुद्धि याला सनातन शास्त्री-पंडितांचा तीव्र विरोध होता व अजूनहि आहे; पण लो. टिळक शुद्धीचे पुरस्कर्ते होते. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्याशीं बोलतांना ते एकदा म्हणाले, "हे आमचे जुने लोक खुळचट-पणाचे वाद किती दिवस करीत बसणार आहेत, समजत नाही. जग किती धडा-क्याने पुढे चाललें आहे. जो तो आपल्या धर्माची संख्या वाढवीत आहे; आणि आमचे शास्त्री-पंडित पाहवे तर पतितपरावर्तन योग्य की अयोग्य, याचा वाद-विवादच करीत बसले आहेत." (आठवणी खंड २, पृ. ११०). पण पतितांचें परा-वर्तन एवढ्याचाच टिळक पुरस्कार करीत असें नाही. धर्माच्या कोणत्याहि क्षेत्रां-तील समाजाच्या प्रगतीला अवश्य जें परिवर्तन त्याचा ते नेहमीच पुरस्कार करीत. 'हिंदुत्व आणि सुधारणा' या लेखांत त्यांनी म्हटलें आहे की, "हिंदु धर्मांतील तत्त्वें सुधारणेस प्रतिकूल आहेत, असें नाही. असें असतें तर आजपर्यंत हिंदु धर्माने टिका-वच धरला नसता व हिंदु राष्ट्रहि कायम राहिलें नसतें." याच भावार्थाने, "आता स्मृतिकार निर्माण झाला पाहिजे, स्मृति बदलण्याचा काळ आता आला आहे", असा विचार त्यांनी एकदा मांडला होता. (आठवणी खंड २, पृ. ४१९).

## वेदांविषयी

वेदांचें प्रामाण्य व वेदांचें अपौरुषेयत्व हीं दोन्ही लो. टिळकांना मान्य होतीं, असा एक समज रूढ आहे; आणि त्याला आधारहि आहे. हिंदु धर्माचें लक्षण सांगतांना त्यांनी 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' असें पहिलेंच लक्षण सांगितलें आहे. आणि प्रो. जिनसीवाले ह्यांनी वेद हे अपौरुषेय मानतां येत नाहीत, असा पक्ष मांडला असतांना, टिळकांनी उलटपक्ष घेऊन, वेद अपौरुषेय आहेत, असा विचार मांडला होता. पण असें जरी असलें तरी प्रामाण्य व अपौरुषेयत्व यांचा जो रूढ अर्थ आहे, त्याअन्वये टिळकांना तीं तत्त्वें मान्य होतीं असें कधीच म्हणतां येणार नाही. गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत "वेदवादरताः पार्थ", "यावानर्थ उदपाने" आणि "त्रैगुण्यविषया वेदाः" या श्लोकांत श्रीकृष्णांनी वेदांचा जो अधिक्षेप केला आहे तो टिळकांनी पूर्णपणें मान्य केला आहे. कांही उपनिषदांतहि वेदांतील यज्ञयागांचा अधिक्षेप आहे. त्यांचेंहि टिळकांनी समर्थन केलें आहे. यामुळे वेदांना साहजिकच

गौणत्व येतें; पण टिळकांनी तें मान्य करून वेदांचा गौरव करणारा असा जो त्या श्लोकाचा सांप्रदायिकांनी लावलेला अर्थ तो त्याज्य ठरविला आहे. हें ध्यानांत घेऊनच त्यांच्या वेदप्रामाण्याचा अर्थ आपण केला पाहिजे; शिवाय, मागल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे, पाश्चात्त्यांच्या ज्या अनेक संस्थांचें व तत्त्वांचें अनुकरण करावयास त्यांनी सांगितलें त्यांचें विवेचन करतांना त्यांनी वेदप्रामाण्याचा उल्लेख सुद्धा केलेला नाही, आणि इतरत्रहि कोठें, वेदवचन असें आहे म्हणून तुम्ही असें आचरण करा, असें चुकून सुद्धा त्यांनी सांगितलेलें नाही. तेव्हा वेदप्रामाण्य याचा, वैदिक परंपरेचा वारसा, तिचा अभिमान यापलीकडे कांहीच अर्थ त्यांच्या मनांत नव्हता हें उघड आहे.

वेदांच्या अपौरुषेयत्वाचें असेंच आहे. वेद अर्थाच्या दृष्टीने नित्य-शब्दांच्या दृष्टीने नव्हे, आणि अतिप्राचीनत्वाच्या दृष्टीने अनादि, असा प्राचीन ऋषींनी अर्थ केला होता व त्याच दृष्टीने ते अपौरुषेय होत, असा खुलासा टिळकांनी केलेला आहे. पण त्याहिपेक्षा निर्णायक गोष्ट ही की, टिळकांनी वेदांचा कालनिश्चय केलेला आहे. इ. पू. ५००० च्या सुमारास वेदरचना पूर्ण झाली असा सिद्धान्त त्यांनी मांडला आहे. यावरून वेद अपौरुषेय नव्हते, आणि अनादीहि नव्हते असेंच त्यांचें मत होतें हें दिसून येतें. वेदरचनाकर्ते पुरुष उत्तर-ध्रुवाजवळ राहत होते, असें सांगतांनाहि त्यांनी वेदांचें मानवी कर्तृत्व उघड उघड मान्य केलें आहे. त्या ऋषींच्या भौगोलिक परिस्थितीचें वर्णन त्यांत आहे, म्हणूनच उत्तर-ध्रुवाचा सिद्धान्त त्यांना मांडतां आला. अपौरुषेयत्व किंवा परमेश्वरकर्तृत्व जर मानलें, तर विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा संबंधच येत नाही. शिवाय 'खाल्डियन वेद व अथर्ववेद' या प्रबंधांत त्यांनी खाल्डिया व भारत यांच्यांत त्या काळीं दळणवळण असलें पाहिजे व त्यामुळेच अथर्ववेदांत खाल्डियन वेदांतील कांही शब्द व कांही विचार आलेले आहेत, असा विचार मांडलेला आहे. यावरून तर वेदांचें मानवी कर्तृत्व त्यांना संपूर्णपणें मान्य होतें हें अगदी स्पष्ट होतें.

जातिभेद, अस्पृश्यता या रूढि टिळकांना मान्य नाहीत. जन्मनिष्ठ, विषमतामूलक चातुर्वर्ण्य त्यांना मान्य नाही. बालविवाहाची रूढि घातक आहे, असें ते म्हणतात. पुनर्विवाह करणाऱ्यांचें ते अभिनंदन करतात. शुद्धीचा ते पुरस्कार करतात. धर्मपरिवर्तनाचा आग्रह धरतात. वेदांचें प्रामाण्य व वेदांचें अपौरुषेयत्व हेंहि त्यांना मान्य नाही, आणि शंकराचार्यांच्या गीताभाष्याचें खंडन करून हजारो वर्षे हिंदु-मनावर असलेलें त्यांचें वर्चस्व त्यांनी नष्ट करून टाकलें. आणि तरीहि प्राचीन परंपरेचा त्यांना अभिमान होता, याचा अर्थ काय ?

## प्रेरणा व स्फूर्ति

१९०८ सालीं अकोला येथे लो. टिळकांचे 'शिवाजीमहाराज व परिस्थितीचें बंड' या विषयावर व्याख्यान झालें. त्यांत त्यांनी याचा अर्थ स्पष्ट केला आहे.

(व्याख्यानें, पृ. २३७), " शिवाजीने केलें तेंच आम्हांस करावयास सांगता की काय ? " असा प्रश्न तेव्हा लोक विचारीत. शिवाजीने मुसलमानांशीं लढाया केल्या. मराठ्यांनी बंगालवर स्वाऱ्या केल्या, तसें पुन्हा करावयाचें की काय ?– असा या प्रश्नाचा भावार्थ आहे. त्यावर टिळकांचें उत्तर असें की, तसें नाही. शिवाजीमहाराज ही एक प्रेरणा आहे. स्फूर्ति आहे. कशीहि परिस्थिति आली तरी, आम्ही तिच्यावर मात करूं शकतों, हा विश्वास त्यांच्या स्मरणामुळे निर्माण होतो. टिळक म्हणतात, " शिवाजीने केलें तसें तसें तंतोतंत करा, असें आम्ही सांगतों म्हणून कोणाचा गैरसमज असल्यास तो काढून टाका. वैश्वदेवाचे वेळीं बापाचा कासोटा सुटत होता म्हणून मुलाने मुद्दाम सोडणें हें जितकें मूर्खपणाचें, तितकेंच हें मूर्खपणाचें आहे. " मग शिवाजीचें स्मरण कशाला ? त्याचा उत्सव कशाला ?

## आत्मविश्वास

" निराशेच्या व अंधकाराच्या परिस्थितींतून आम्ही एकदा वर आलों. ती परिस्थिति ज्यांनी बदलली त्यांचे आम्ही वंशज आहों, त्यांचेंच रक्त आमच्यांत खेळत आहे, तेव्हा आम्हीहि सध्याची निराशेची परिस्थिति बदलूं शकूं, हा आत्मविश्वास जोपासण्यासाठी महाराजांचा उत्सव करावयाचा. इतर देशांत थोर लोक झाले नाहीत असें नाही. अमेरिकेचा वॉशिंग्टन तसा पुरुष होता; पण शिवाजींच्या धैर्याकडे पाहवयाचें तें एवढ्यासाठी की, शिवाजी आपल्यांतला असून त्याने महत्कार्य केलें. लॉर्ड कर्झन यांनी लॉर्ड क्लाइव्ह याच्या स्मारकाचा उपक्रम केला होता. त्यांना जितका क्लाइव्ह प्रिय त्यापेक्षा शिवाजीमहाराज महाराष्ट्राला शतसहस्र, नव्हे तर लक्षपट प्रिय असले पाहिजेत. स्वराज्य म्हणजे देशप्रीति, पराक्रम, परिस्थिति जिंकून पराक्रम करणें – हें शिवाजीच्या चरित्राचें रहस्य आहे. किंबहुना हा त्या चरित्राचा जीव की प्राण आहे. "

## मी – जाणीव

परंपराभिमानाचा अर्थ यावरून स्पष्ट होईल. शौर्य, धैर्य, पराक्रम, स्वराज्याकांक्षा, कर्तृत्व, परिस्थितीवर मात करण्याची शक्ति माझ्या ठायीं आहे, असा आत्मप्रत्यय म्हणजे एकंदर मानवी गुणसंपदा हा समाजाचा प्राण होय. परंपरेच्या अभिमानाने हा प्राण टिकवितां येतो. म्हणून त्या अभिमानाचें देशाला महत्त्व. विशिष्ट रूढि, विशिष्ट आचार, किंवा त्या परिस्थितीमुळे उद्भवलेले शत्रु-मित्र-भाव, त्या वेळीं अंगीकारलेलीं तत्त्वें ह्यांचें अनुकरण म्हणजे परंपरेचा अभिमान, असा अर्थ नाही. यामुळेच मुस्लिमांनीहि शिवाजी-उत्सवांत सहभागी व्हावें, असें टिळक सांगत. कारण शिवाजीमहाराज हें एक राष्ट्रीयत्वाचें प्रतीक होतें. बंगाली लोकांनी मोठ्या भक्तिभावाने शिवाजी-उत्सव केला तो याच कारणासाठी. पूर्वजांच्या उत्सवामुळे, महाभारत, रामायण, वेद-उपनिषदें या ग्रंथांच्या पठनाने, स्फूर्ति मिळते, चैतन्य भरतें, संजीवनी लाभते, आत्मविश्वास जागृत होतो. म्हणजेच समाज जिवंत

राहतो ! विल् ड्युरँट याने म्हटल्याप्रमाणे, मी कोण, ही जाणीव मनुष्याला सतत कायम राहणें अवश्य असतें. ती क्षणमात्र ढळली तर तो वेडा ठरेल. व्यक्तीच्या ठायीं या मी-च्या जाणिवेचें जें महत्त्व तेंच परंपरेच्या जाणिवेचें, स्वत्वाच्या सातत्याचें, पूर्वजांच्या अभिमानाचें राष्ट्राच्या, समाजाच्या ठायीं महत्त्व आहे. लो. टिळकांच्या परंपरेच्या अभिमानाचा हाच अर्थ आहे.

वरील व्याख्यानाचा समारोप करतांना ते म्हणाले, "स्वार्थ, भीति, यांनी प्रेरित झालेल्या लोकांच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां, पूर्वजांचे पराक्रम आठवून त्यांचेंच रक्त आपल्या अंगांत खेळत असून, त्यांनी केलेली कर्तबगारी करून दाखविण्याचें सामर्थ्य आपणांत आहे, अशी मनाची खात्री ठेवून, काम केल्यास परमेश्वर आपणांस यश देईलच देईल."

## ऐक्याची वृद्धि

लो. टिळकांच्या प्रत्येक कार्यामागें भारतांत एकराष्ट्रीयत्व निर्माण करणें हेंच उद्दिष्ट होतें; आणि त्या एकराष्ट्रीयत्वासाठी पाश्चात्त्य विद्या व संस्कृति यांचें साह्य त्यांना जसें अवश्य वाटत होतें तितकीच, किंबहुना एका दृष्टीने त्यापेक्षा जास्त, भारतीय परंपरेच्या अभिमानाची जागृति हीहि त्यांना अवश्य वाटत होती. परंपरेचा अभिमान हा राष्ट्र-संघटनेचा त्यांना प्राणच वाटत होता. शिवाजीउत्सव हा राष्ट्रीय उत्सव आहे, असें ते आग्रहाने सांगत त्याचें हेंच कारण आहे. गणेशोत्सवहि त्यांनी याच दृष्टीने सुरू केला होता. 'यंदाचा गणपत्युत्सव' या लेखांत ते म्हणतात, "कोणत्याहि लोकांत ऐक्याची वृद्धि होण्यास जीं अनेक साधनें असतात त्यांपैकीच एक उपास्यदैवत असणें हें एक कारण आहे. . .आणि वर्षांतून दहा दिवस तरी एकाच देवतेच्या भजन-पूजनांत लोक निमग्न झाल्याने त्यांच्यांत ऐक्याची वृद्धि होणार नाही, असें कोण म्हणेल ?" अशा भजन-पूजनांतून स्वधर्माचा अभिमान जागृत करणें व त्यांतूनच राष्ट्रभक्तीची शिकवण देणें हें त्यांचें उद्दिष्ट होतें. कारण, ते म्हणतात, "स्वधर्माच्या श्रेष्ठत्वाचा ज्यांस अभिमान वाटत नाही त्यांस स्वराष्ट्राच्या श्रेष्ठत्वाचा तरी अभिमान कोठून वाटणार ?" ( केसरींतील लेख, खंड १, पृ. ४८७ ).

'गणेशोत्सवाचा समारोप' या व्याख्यानांत टिळकांनी राष्ट्रीय जागृतीसाठी, स्वराज्यप्राप्तीसाठी हा उत्सव आहे, हें स्पष्ट केलें आहे. ते म्हणाले, "हा उत्सव दहा दिवस आहे. त्यानंतर वर्षभर तुम्ही काय करणार ? माझें असें सांगणें आहे की, हजारो वर्षें जी गोष्ट तुम्ही भोगलीत ती गोष्ट – स्वराज्य – गेल्याबद्दल तुमच्या मनाला चटका लागेल, असे कांही करा." असें कांही करावयाचें म्हणजे काय करावयाचें ? तर "गणपतीच्या विसर्जनानंतर स्वदेशी व बहिष्कार ही वाळू येथून नेऊन तुम्ही आपआपल्या घरांतून पसरावी व बहिष्काराचे शत्रु हे जे उंदीर त्यांपासून आपला बचाव करावा."

**पारमेष्ठ्य**

याच व्याख्यानांत राष्ट्रजागृतीचा हा मार्ग सांगून 'स्वराज्या'चा संबंध त्यांनी प्राचीन परंपरेशीं जोडून दिला आहे. ते म्हणाले, "गणपतीची आराधना करतांना स्वराज्य, वैराज्य, पारमेष्ठ्य राज्य, अधिराज्य, हें मागण्याची आपली पूर्वापार चाल आहे. हे शब्द ज्या मंत्रांत आहेत ते मंत्र प्राचीन आहेत. तुम्ही त्या शब्दांचा अर्थ विसरून गेला होता. ही कल्पना पुन्हा आठवावी म्हणून बंगाल्यांतील चळवळ झालेली आहे. . .तुमच्या यत्नांचा लय अखेरीस पारमेष्ठ्यांत होईल." ( व्याख्यानें पृ. ५४ ).

**राष्ट्रीय उत्सव**

हे दोन्ही उत्सव नव्या पद्धतीने व्हावे याबद्दल टिळकांचा कटाक्ष होता. हिंदु धर्मांत सण व उत्सव पुष्कळ आहेत; पण ते बहुतेक घरगुती आहेत. सार्वजनिक नाहीत. पंढरीच्या विठोबाच्या यात्रेसारखे कांही उत्सव सार्वजनिक आहेत, पण हे उत्सव अथवा यात्रा पुरातन असल्याने त्यांचें स्वरूप आपणांस पाहिजे त्या रीतीचें करणें अशक्य नसलें तरी बहुतेक असाध्य आहे. तेव्हा ती उणीव भरून काढण्यासाठी हे राष्ट्रीय उत्सव सुरू केलेले आहेत. गणेशोत्सवाप्रमाणेच शिवाजीउत्सवाविषयीहि त्यांनी असाच विचार मांडलेला आहे. ते म्हणतात, "कित्येकांस अशी धास्ती आहे की, शिवाजी-उत्सव लवकरच रामनवमीच्या थाटावर जाईल व त्यापासून फारसें हित होणार नाही, परंतु असल्या शंका निराधार आहेत. शिवाजीमहाराज अवतारी पुरुष असले तरी त्यांचा उत्सव आम्ही करतों, तो ते मार्गदर्शक थोर पुरुष होते म्हणून करतों. अवतारी पुरुष होते या दृष्टीने नव्हे, ही गोष्ट सर्वांनी लक्षांत ठेविली पाहिजे. रामजयंतींत व शिवजयंतींत भेद आहे तो हाच होय. रामचंद्रांनी वानरांच्या साह्याने लंका घेतली ही गोष्ट आता पौराणिक झाली; पण श्रीशिवाजीमहाराजांनी मावळ्यांच्या साह्याने मराठी राज्याची स्थापना केली ही गोष्ट पौराणिक होऊं शकत नाही. .हीं त्यांच्या कृतीचीं फलें जोंपर्यंत आमच्या डोळ्यासमोर आहेत, तोंपर्यंत शिवजयंतीचा उत्सव केवळ दैविक पुरुषांच्या उत्सवाप्रमाणे होईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाही." ( केसरींतील लेख, खंड १ला, पृ. ४८७, ५३१ ). लोकमान्यांना परंपरेचा अभिमान जागृत करावयाचा होता तो स्वराज्यासाठी, अधिराज्यासाठी, पारमेष्ठ्यासाठी, हें यावरून स्पष्ट होईल. म्हणूनच त्यांना महत्त्व वाटे तें त्या चैतन्याचें, बाह्य आचाराचें नव्हे !

आचार, विचार, रूढि, तत्त्वें, संस्था, धोरणें बदललीं तरी परंपरेचा त्याग केला, असें होत नाही. त्या प्राचीन वैभवाचें, कर्तृत्वाचे, गुणसंपदेचें आम्ही वारस आहों, ही जाणीव – तिचें रक्षण – म्हणजे परंपरेचें रक्षण होय. 'हिंदु धर्मांतील एकी व सहिष्णुता' या व्याख्यानांत टिळक म्हणतात, "आमच्या परंपरेला विरुद्ध न जातां – आणि ही मर्यादा अत्यंत महत्त्वाची आहे.– ज्या गोष्टींचा स्वीकार करणें इष्ट

वाटेल त्या गोष्टी स्वीकारणें ही आमची फार दिवसांपासूनची प्रवृत्ति आहे. हिंदूंवर अनेक वादळें आलीं...तरी आमचा धर्म आज जिवंत आहे, हें हिंदु धर्माच्या अंगीं असलेल्या लवचिकपणाचें फल होय." (व्याख्यानें, पृ. ३०). "आम्हांला धर्मदृष्टचा, सामाजिकदृष्टचा व राजकीयदृष्टचा वळण पाहिजे आहे," असें 'आमचें कर्तव्य' या व्याख्यानांत त्यांनी म्हटलें आहे (पृ. ५०). म्हणजे या तीनहि क्षेत्रांत परिवर्तन होणें त्यांना अवश्य वाटत होतें. मग सातत्य, अखंडत्व कशांत राहिलें? याच व्याख्यानांत ते पुढे म्हणतात, "तुमच्या धर्मांतील जिवंतपणा व तेज आणि तुमची ऐतिहासिक परंपरा लक्षांत घेतां तुम्हांला अपयश कधीहि येणार नाही, अशी माझी खात्री आहे."

## हें ज्ञात होतें

सुप्रसिद्ध इंग्लिश तत्त्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांच्या ग्रंथांच्या आधारें मराठींत श्री. ना. ल. फडके यांनी 'अज्ञेय मीमांसा' असा ग्रंथ तयार केला होता. त्याचें परीक्षण करतांना लो. टिळकांनी, प्रथम हें अवघड कार्य केल्याबद्दल फडके यांची प्रशंसा केली आणि नंतर त्यांच्यावर अशी टीका केली की, स्पेन्सरसाहेबांचे सिद्धान्त स्पष्ट करतांना आमच्या प्राचीन ऋषींनी अशाच तऱ्हेचे तत्त्वविचार पूर्वी सांगितले होते, हा विचार त्या ग्रंथांत सांगून, त्या दोन तत्त्वविचारांतील साम्य-वैषम्याचा विचार फडके ह्यांनी केला नाही; तो करावयास हवा होता. कारण तसें न केल्यामुळे, हा कांही तरी नवीनच विचार आपण ऐकत आहोंत, आपल्याकडे असें प्रगल्भ तत्त्वज्ञान पूर्वी नव्हतें, असा समज होतो आणि तसा समज होणें अगदी अनिष्ट आहे. टिळक म्हणतात, "हे आधुनिक काळचे ऋषिवर्य आम्हांस पूज्य व वंद्य आहेत; पण त्यामुळे आम्ही आपल्या पूर्वीच्या ऋषिवर्यांस विसरून केवळ स्पेन्सरसाहेबांचे पोवाडे गात बसावें हें आम्हांस बरें वाटत नाही." (केसरींतील लेख, खंड ४, पृ. २४०).

## मालिन्य झटकलें

लो. टिळकांनी ही टीका केली त्या वेळीं (इ. स. १८९६) तर तिचें महत्त्व फार होतें. हिंदुस्थानांतील जनतेचा आत्मप्रत्यय त्या वेळीं नष्ट होण्याची वेळ आली होती. इंग्रजांच्या आक्रमणामुळे, पारतंत्र्यामुळे, आणि त्यांच्या भौतिक, वैज्ञानिक संस्कृतीच्या दीप्तीमुळे आपल्या हिंदी समाजाचा तेजोभंग झाला होता. पाश्चात्त्यांच्या तुलनेने, आपण फारच हीन दर्जाचे लोक आहों, असा भाव त्यांच्या मनांत येत होता. अशा वेळीं हें मनोमालिन्य नष्ट करण्याची फार आवश्यकता होती. आणि त्याला उपाय एकच. एके काळीं आम्हीहि पराक्रमी, कर्तृत्वशाली होतों, हर्बर्ट स्पेन्सरसारख्या जगविख्यात तत्त्ववेत्त्यासारखें गहन तत्त्वचिंतन करण्याचें सामर्थ्य आमच्या ठायींहि होतें, ही जाणीव जागृत करणें हाच तो उपाय होय. पूर्वी आम्ही पराक्रमी होतों या जाणिवेने आजहि तोच पराक्रम करण्याचें

सामर्थ्य आमच्या ठायीं आहे, आम्ही हीन दर्जाचे नाही, हा भाव उदित होऊन मनावरचें मालिन्य झटकून जातें.

### अस्मिता

श्रीस्वामी विवेकानंद समाधिस्त झाले त्या वेळीं त्यांच्या कार्याचा टिळकांनी त्यांच्यावरच्या मृत्युलेखांत गौरव केला. त्यांत हीच विचारसरणी आहे. पाश्चात्त्य आमच्यापेक्षा सर्व दृष्टींनी श्रेष्ठ आहेत, ते आमचे गुरु आहेत, आमच्या उद्धारासाठी परमेश्वराने त्यांना हिंदुस्थानांत धाडलें आहे, ही दैवी योजना आहे, अशा तऱ्हेचे विचार येथले मोठमोठे विचारी पुरुष मांडीत होते. असें असतांना पाश्चात्त्य देशांतील सर्वश्रेष्ठ देश जो अमेरिका तेथे जाऊन सर्व जगाच्या धर्मपरिषदेंत 'हिंदु धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे' हा सिद्धान्त एका हिंदु संन्याशानें जगज्जेत्या लोकांच्या गळीं उतरवावा व 'विवेकानंद म्हणजे परमेश्वराचा अवतार आहे', 'विवेकानंद म्हणजे खिस्ताची मूर्ति आहेत', असे धन्योद्गार त्यांच्या मुखीं आणावे यापेक्षा जास्त चैतन्यप्रद, स्फूर्तिप्रद, उत्साहदायक काय असूं शकेल ? "स्वामींनी आमच्यावर अनंत उपकार करून ठेविले आहेत", असें टिळकांनी म्हटलें आहे तें याच कारणासाठी. हिंदी राष्ट्राच्या अस्मितेला त्यांनी संजीवनी दिली; आणि ती प्राचीन धर्म-तत्त्वांच्या वेदान्ताच्या, पुनरुज्जीवनाने !

### आत्मप्रत्यय

लो. टिळकांनी भारताच्या प्राचीन वाङ्मयाचा अतिशय सखोल अभ्यास करून त्यावर अनेक ग्रंथ लिहिले, निबंध लिहिले, इतरांनी लिहिलेल्या ग्रंथांचीं परीक्षणें केलीं. याच्या मागे अनेक हेतु असले तरी त्यांतील प्रधान हेतु एकच होता. या भरतभूमीचें, तिच्या प्राचीन वैभवाचें, तिच्या धर्माचें, तिच्यांतील थोर पुरुषांचें, त्यांच्या तत्त्वचिंतनाचें, कर्तृत्वाचें, प्रज्ञेचें, बुद्धिमत्तेचें श्रेष्ठत्व सिद्ध करणें आणि तें हिंदी जनतेला व जगाला दाखवून देणें हा तो हेतु होय. प्राचीन परंपरेचा असा अभिमान जागृत झाल्यावांचून समाजांत जोम येत नाहीं, चैतन्य येत नाही, त्याची मरगळ जात नाही, त्याच्या ठायीं आत्मविश्वास जागृत होत नाही, आत्मप्रत्ययाचा स्फुल्लिंग त्याच्या मनांत झगझगत नाही, अशी त्यांच्या बुद्धीची निश्चिति होती.

टिळकांच्या प्राचीन परंपरेच्या अभिमानाचा अर्थ आपण समजून घेत आहोंत. तो अभिमान म्हणजे विशिष्ट आचार-विचार-रूढि यांचा अभिमान नव्हे, तर येथील थोर पुरुषांच्या कर्तृत्वाचा, प्रज्ञेचा, बुद्धिमत्तेचा, एकंदर गुणसंपदेचा अभिमान होय. स्वत्वाचा अभिमान तो हाच. स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश यांचा अभिमान म्हणजेच हा परंपरेचा अभिमान होय. याच अर्थाने त्यांनी एका व्याख्यानांत "ज्याला वेदादि ग्रंथपरंपरा मान्य आहे तो हिंदु झाला', असें सांगितलें आहे. (व्याख्यानें, पृ. २९). "या अभिमानाचें महत्त्व काय ? 'हिंदु' हा शब्द उच्चारल्या-

बरोबर त्यांतील सर्वांना एक प्रकारची ईर्षा, एक प्रकारचा उसाह, एक प्रकारचा आवेश निर्माण झाला पाहिजे." ( व्याख्यानें, पृ. २८ ).

गणेशोत्सव, शिवाजीउत्सव यांचा या दृष्टीने विचार केलाच आहे. आता त्यांच्या जगविख्यात ग्रंथांचा याच दृष्टीने विचार करून हें प्रकरण संपवूं.

## मृगशीर्ष

लो. टिळकांनी वेदकालनिर्णय केला आहे. आपल्या 'मृगशीर्ष' अथवा 'आग्रहायणी' अथवा 'ओरायन' या ग्रंथांत त्यांनी असें सिद्ध केलें आहे की, वेदरचना ही इ. पू. ५००० वर्षें या सुमारास पूर्ण झाली. हा सिद्धान्त त्यांनी ज्योतिर्गणिताच्या साह्याने मांडला आहे. त्यापूर्वी पंडित मॅक्समुल्लर याने वेदकाल हा इ. पू. १२०० वर्षें असा ठरविला होता. डॉ. हौ याने इ. स. पू. २४०० असा निश्चित केला होता. त्यांनी आपले सिद्धान्त भाषाशास्त्राच्या आधारें मांडले होते. त्यांना ज्योतिर्गणितपद्धति मान्यच नव्हती. त्यांचें म्हणणें असें की, त्या पद्धतीने कालनिर्णय करण्याच्या दृष्टीने पाहतां दक्षिणायन व उत्तरायण यांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म हालचालींच्या ज्ञानाची उपलब्धि असणें, हें ऋग्वेदकाळीं शक्यच नव्हतें. हें ज्ञान त्या वेळच्या ऋषींना होतें याचा पुरावा वेदांत मुळीच सापडत नाही. पण लो. टिळकांनी ऋग्वेदांतल्या ऋचा देऊनच त्या पंडितांचें मत खोडून काढलें. आपला प्रबंध त्यांनी इतका साधार व सप्रमाण लिहिला की, हळूहळू, नाखुषीने का होईना, पाश्चात्त्य पंडितांना तो स्वीकारावा लागला. आणि त्यामुळे वेदवाङ्मय हेंच जगांतलें प्राचीनतम वाङ्मय होय, हें सिद्ध झालें व त्या अतिप्राचीन काळीं सुद्धा भारताची संस्कृति अत्यंत प्रगल्भ दशेला पोचली होती, याविषयी वाद राहिला नाही. हिंदी जनतेची मान यामुळे जगांत उंचावली यात शंकाच नाही.

## राष्ट्रीय महाकाव्य

कुलगुरु चिंतामणराव वैद्य यांनी 'महाभारत ए क्रिटिसिझम' असा एक ग्रंथ लिहिला होता. त्याचें लोकमान्यांनी केसरींत विस्तृत परीक्षण केलें होतें. त्यांतील पहिल्याच लेखांत त्यांनी महाभारताची थोरवी वर्णन केली आहे. "देशांतील थोर प्राचीन ऐतिहासिक पुरुषांचें उदात्त चरित्र लोकांस सांगून त्यांच्या वंशजांत शौर्य, अभिमान, सत्यनिष्ठा, धर्म-बुद्धि वगैरे अनेक सूक्ष्म सद्गुण जागृत करणारें प्राचीन काव्य जेथे उपलब्ध आहे, तेथे तेथे तें राष्ट्रीयत्वाचें प्रधान अंग मानलें गेलें आहे. . . राष्ट्रांतील सर्व लोकांस एकसमयावच्छेदेकरून आनंद, ज्ञान, ईर्षा किंवा उत्साह देणारें प्राचीन महाकाव्यासारखें दुसरें साधन मिळणें कठीण आहे. आमच्या देशांतील महाभारत आणि रामायण हीं दोन अशीं प्राचीन महाकाव्यें आहेत." ह्या दोन्ही महाकाव्यांना पहिल्यापासून आर्ष महाकाव्यें म्हणण्याचा परिपाठ आहे. ह्यांतील महाभारत या ग्रंथाची थोरवी आता सर्वमान्य झाली आहे. कारण "महाभारतांत नीति आहे, धर्म आहे. मानवी कर्तव्याचा सशास्त्र विचार त्यांत आहे.

त्यांत तत्त्वज्ञान आहे, इतिहास आहे, समाजव्यवस्था आहे, युद्धकला आहे. अशा प्रकारचा सर्वांगसुंदर व सर्वोपजीव्य झालेला दुसरा ग्रंथ संस्कृत वाङ्मयांतच काय, पण इतर देशांच्याहि वाङ्मयांत आढळत नाही." (केसरींतील लेख, खंड ४, पृ. ४३१, ४३२).

### कणाद, कपिल

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं जॉन डाल्टन या प्रसिद्ध युरोपीय शास्त्रज्ञाने परमाणुवादाचा सिद्धान्त मांडला व त्याच शतकाच्या उत्तरार्धांत चार्लस डार्विन याने आपला विकासवादाचा सिद्धान्त मांडला. हे दोन्ही सिद्धान्त विज्ञानाच्या इतिहासांत युगप्रवर्तक ठरले आहेत. गीतारहस्यांतील 'कापिलसांख्यशास्त्र व क्षराक्षरविचार' या प्रकरणांत त्यांचा उल्लेख करून टिळकांनी म्हटलें आहे की, "भारतांत प्राचीन काळीं कणादाने परमाणुवाद सांगितला होता व कपिलाने विकासवाद किंवा गुणपरिणामवाद प्रस्थापित केला होता." आणि हें सांगून ते पुढे म्हणतात की, "अर्वाचीन काळीं भौतिक शास्त्रज्ञांना ज्या युक्त्या व जीं साधनें उपलब्ध आहेत तीं प्राचीन भारतीय दर्शनकारांना मुळीच उपलब्ध नव्हतीं. तरी सृष्टीची वाढ किंवा घटना कशी असावी याबद्दल सांख्यशास्त्रकारांनी दिलेल्या तात्त्विक सिद्धान्तांत आणि अर्वाचीन आधिभौतिक शास्त्रांच्या तात्त्विक सिद्धान्तांत फारसा भेद नाही, ही आश्चर्य करण्याजोगी गोष्ट आहे."

प्रत्येक ठिकाणीं लोकमान्य टिळकांना प्राचीन हिंदु संस्कृतीचें असामान्यत्व, असाधारणत्व, अद्वितीयत्व, श्रेष्ठत्व प्रस्थापित करावयाचें आहे आणि तें दाखवून मृतवत् झालेल्या हिंदुसमाजांत ईर्षा निर्माण करावयाची आहे, त्याला उत्साह द्याव-याचा आहे. त्यावांचून तो राष्ट्रपदवीला जाणें अशक्य होतें.

वेद, महाभारत, कणादकपिलांचीं दर्शनें यांचें विवेचन करतांना लो. टिळकांनी प्राचीन भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व सिद्ध केलें. मग श्रीमद्भगवद्गीतारहस्य हा जो त्यांच्या आयुष्यांतील मौलीभूत ग्रंथ त्यांत हा विचार, हा सिद्धान्त पुनःपुन्हा मांडलेला आढळला तर त्यांत कांहीच नवल नाही. गीतारहस्य हा ग्रंथ प्रामुख्याने प्रवृत्ति-धर्माचें अथवा कर्मयोगाचें विवेचन करण्यासाठी लिहिलेला आहे; पण प्राचीन भारतीय संस्कृतीचें असाधारणत्व भारतीयांना दाखवून देणें व त्यांना संजीवनी देऊन राष्ट्रकार्यास प्रवृत्त करणें हा टिळकांच्या सर्व उद्योगाचा ध्रुवतारा असल्या-मुळे, तसे विचार त्यांनी गीतारहस्यांत पदोपदीं मांडलेले आहेत.

### असा ग्रंथ

पहिल्या प्रकरणाच्या आरंभींच त्यांनी गीतेच्या अद्वितीयत्वाविषयी पुढील विधान केलें आहे. "पिंडब्रह्मांडज्ञानपूर्वक आत्मविद्येचीं गूढ व पवित्र तत्वें थोड-क्यांत, पण असंदिग्धरीतीने सांगून, त्यांच्या आधारें मनुष्यमात्रास आपल्या आध्या-त्मिक पूर्णावस्थेची ओळख करून देणारा...व संसारांत भांबावून गेलेल्या मनास

शांत आणि विशेषत: निष्काम कर्तव्यास प्रवृत्त करणारा यासारखा बालबोध ग्रंथ संस्कृतांतच काय पण जगांतील इतर वाङ्मयांतहि सापडणें दुर्मिळ होय."

हें प्रारंभीचें विधान झालें. त्यानंतर ग्रंथाच्या अभ्यंतरांत अनेक ठिकाणीं कांट, ग्रीन, कोंट इत्यादि पाश्चात्त्य पंडितांचे तात्त्विक, आध्यात्मिक व नीतिविषयक सिद्धान्त व उपपत्ति देऊन, त्या गीतेच्या तुलनेने कशा अपुऱ्या, असमाधानकारक व म्हणूनच अग्राह्य आहेत, हें दाखवून गीतेंतील तत्त्वज्ञानाचें श्रेष्ठत्व टिळकांनी सिद्ध केलें आहे; आणि 'गीतेचें बहिरंग-परीक्षण' या शेवटच्या प्रकरणांतहि प्रथम गीतेचा काळ निश्चित करून मग गीतेंतले अनेक विचार व तत्त्वें, यहुदी धर्म, ख्रिस्ती धर्म किंवा पायथागोरससारखे ग्रीक पंडित यांच्याकडून घेतलेलीं आहेत, अशा तऱ्हेचे पाश्चात्त्य पंडितांचे जे प्रवाद त्यांचें खंडन करून ते धर्मच गीतेचे ऋणी असण्याचा जास्त संभव आहे, हा विचार मांडून, पुन्हा त्या दृष्टीने गीतेचें श्रेष्ठत्व संदेहातीत करून ठेविलें आहे.

वैष्णवांचे गुरु श्रीसत्यध्यानतीर्थ यांच्याशीं चर्चा करतांना लोकमान्य एकदा म्हणाले की, "मी असें स्पष्ट सांगतों की, अनेक हेतूंप्रमाणे राजकारणाकरिताहि मीं गीतारहस्य लिहिलें आहे." (आठवणी खंड २, पृ. ११०) आपल्या प्राचीन परंपरेचा अभिमान जागृत करून हिंदी जनतेला स्वातंत्र्यसंग्रामासाठी सिद्ध करणें हें तें राजकारण होय.

गीतारहस्यच काय, पण टिळकांचा प्रत्येक ग्रंथ, त्यांची प्रत्येक चळवळ, त्यांची प्रत्येक संस्था या राजकारणासाठीच होती. प्राचीन परंपरेचा अभिमान हा त्यांनी चालविलेल्या या यज्ञांतील अग्नीच होता.

# - ४ -

# धर्माचें पुनरुज्जीवन

## जीवनोद्देश

अरविंदबाबूंनी टिळकांच्या जीवनोद्देशाचें अत्यंत समर्पक वर्णन केलें आहे. "हिंदी राष्ट्राचें पुनरुज्जीवन करणें, त्याला त्याच्या गतकालाप्रमाणे, किंबहुना शक्य असल्यास जास्तच वैभवशाली व उज्ज्वल करणें, हाच टिळकांचा जीवनोद्देश होता. तेवढ्यासाठी त्यांना नुसती राजकीय जागृतीच करावयाची नसून, सुप्तावस्थेंत असलेल्या राष्ट्राच्या आत्म्याला, पूर्वकालावर त्याच्या भविष्यकालाचें अधिष्ठान ठेवून, खडबडून जागे करावयाचें होतें. टिळकांनी आपल्या आयुष्यांत जे जे उद्योग केले त्याचा साक्षात् अथवा परंपरेने ह्या राष्ट्रसंवर्धनाकडेच संबंध पोचतो."

लो. टिळकांच्या जीवितकार्याचें यापेक्षा जास्त यथार्थ वर्णन कोणाला करतां येईल, असें वाटत नाही. राष्ट्रसंवर्धन, राष्ट्राचें पुनरुज्जीवन, हिंदुस्थानचें राष्ट्र या तत्त्वावर संघटन !

## देव-देश-अद्वैत

त्यांनी हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें तें यासाठीच. यासाठी त्यांनी पहिला महत्त्वाचा विचार सांगितला तो हा की, धर्म व राजकारण दोन नाहीत. देश आणि देव हे भिन्न नाहीत. "देश आणि देव हे दोन मानणारे जे लोक आहेत ते सर्व प्रकारे धर्मभ्रष्ट आहेत असें मी समजतों," असें ते म्हणत. २५ व २६ फेब्रुवारी १९०८ ह्या दोन दिवशीं लो. टिळकांचीं पुण्याला व सोलापूरला दासनवमीनिमित्त दोन व्याख्यानें झालीं. त्यांत समर्थांच्या कार्याचें विवेचन करतांना त्यांनी या विषयीचें आपलें तत्त्वज्ञान स्पष्टपणें मांडलें आहे. ते म्हणतात, "धर्म आणि व्यवहार यांची

जोडी कशी घालावयाची हें रामदासांनी शिकविलें. घराचें दार बंद करून उपासना केली की संपलें. घराबाहेर कोणाचेंहि राज्य असो, बाहेर वाटेल त्या आपत्ति येवोत, त्यांचा धर्माशीं कांही संबंध नाही, असा एक पूर्वी समज असे. राजकीय व्यवहार, देशाची कल्पना, यांचा धर्मांत अंतर्भाव होत नाही, अशा प्रकारची कल्पना किंवा कुकल्पना आमच्यांत शिरली होती; पण रामदासांनी हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन केलें. या धर्मांत असें तत्त्व आहे की, ज्याला मोक्षप्राप्ति पाहिजे असेल त्यास आपल्या देशबांधवांची काळजी केल्याखेरीज गत्यंतर नाही. जे आपल्या देशाकडे पाहत नाहीत, 'जे का रंजले गांजले त्यांस' आपले म्हणत नाहीत, आपले हजारो देशबांधव विपत्तींत असतांना जे नाक धरून घरांत बसतात, ते ढोंगी आहेत, अशा प्रकारची बुद्धि उत्पन्न करणें म्हणजे राष्ट्र जिवंत करणें आहे." (व्याख्यानें, पृ. १५२, १५३).

लो. टिळकांनी हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन केलें याचा हा अर्थ आहे. देश व धर्म हे अभिन्न आहेत, अशा प्रकारची बुद्धि निर्माण करून त्यांना हिंदी राष्ट्र जिवंत करावयाचें होतें. वरील दोन व्याख्यानांत पुनः पुन्हा हा भावार्थ त्यांनी मांडला आहे. "धार्मिक व राजकीय उत्सव आपणांस विभक्त करतां येणार नाहीत. शरीराच्या डाव्या-उजव्या अंगांप्रमाणे ते चिकटलेले आहेत", "समर्थांचे शिष्य घरोघर हिंडत व लोकांस स्वातंत्र्याचा व मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवीत असत,' "पारतंत्र्यामध्ये व्यापार, हिंमत, उमेद ह्या सर्व बाजूंनी देशाचा ऱ्हास झालेला असतो. अशा वेळीं देश वर आणण्यास केवळ धर्म-बुद्धि असून चालत नाही," "रामदासांनी महाराष्ट्रांत जागृति केली म्हणजे लोकांना गंध लावायला शिकविलें, असा अर्थ नाही. तुकारामांनाहि हा अर्थ अभिप्रेत नव्हता. उच्च कल्पना, अत्युच्च कल्पना लोकांस शिकवून त्या त्यांच्यांत खेळूं देणें, जातिजातींतील भेद नाहीसे करून आपण सारे एकच आहों, असें वाटावयास लावणें हें खरें धर्म-शिक्षण होय. इंग्रजी तत्त्ववेत्त्यांनी हीं तत्त्वें सांगितलीं आहेत, आणि तीं आपल्या उपयोगाचीं आहेत. हीं तत्त्वें पूर्वी आपल्यांत होतीं; पण तीं आपण विसरलों आहों." (व्याख्यानें, पृ. १४४).

हीं जीं विसरलेलीं तत्त्वें, हा जो खरा धर्म, त्याचें टिळकांना पुनरुज्जीवन करावयाचें होतें. लोकांना या धर्माचें शिक्षण द्यावयाचें होतें.

### भगवंताचें अधिष्ठान

लोकमान्य विलायतेस जावयास निघाले तेव्हा त्यांना ब्रह्मवृन्दातर्फे पानसुपारी झाली. त्या वेळच्या भाषणांत चळवळीला भगवंताचें अधिष्ठान असणें म्हणजे काय तें त्यांनी स्पष्ट केलें. "चळवळीच्या कचेरींत एखादी मूर्ति बसवून तिच्या पुढे धूप जाळला म्हणजे तेथे भगवंताचें अधिष्ठान होतें असें नाही. भगवंताचें जगांत कार्य काय, तर साधूंचें रक्षण, दुष्टांचें निर्दालन व धर्माची स्थापना. हीं कार्यें जेथे चाललीं असतील तेथे भगवंताचें अधिष्ठान आपोआपच आलें. आमची होमरूलची चळवळ

ही हिंदुस्थानची भूमि परकीय जुलमांतून सोडविण्यासाठी आणि सनातनधर्म रक्षिण्यासाठी आहे. म्हणून तींत भगवंताचें अधिष्ठान आहेच आहे." (आठवणी खंड १ ला, ज.स. करंदीकर—आठवण, पृ. १४९). वासुदेव विठ्ठल दास्ताने यांनी अशाच प्रकारची आठवण दिली आहे. त्यांचे भुसावळचे एक मित्र टिळकांना म्हणाले की, "आज पंचवीस-तीस वर्षे इतक्या परिश्रमाने चळवळ चालली आहे; पण यश येत नाहीं. तेव्हां भगवंताचें अधिष्ठान नाही म्हणून तर अपयश येत नसेल ना? आपल्या चळवळींत ईश्वराची पूजा-अर्चा, भजन, आराधना कांही होत आहे का? आपणांस त्यांत वेळ खर्च करतां येत नाही. त्यामुळे भगवंताचें अधिष्ठान मिळत नाही, म्हणून असें होत नसेल ना?" त्यावर टिळक म्हणाले, "माझी चळवळ हेंहि आराधनेचेंच स्वरूप आहे. अशा प्रकारच्या प्रयत्नांत निमग्न राहणें हीच उत्कृष्ट आराधना होय. ईश्वरचिंतनांत असतांना जें सुख, जी शांति मिळते त्याचा प्रत्यक्ष अनुभव मला घ्यावयास सांपडत आहे." (आठवणी खंड २, पृ. ३१३). पंढरपूरच्या वारकऱ्यांना "तुम्ही राष्ट्रोन्नतिरूप मोक्ष मिळवा", असा उपदेश टिळकांनी केल्याचें वर एकदां सांगितलेंच आहे. १९०७ सालच्या एका व्याख्यानांत त्यांनी अगदी स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे की, "मोक्ष ज्याने मिळेल तेवढाच धर्म, अशी आमच्या धर्माची तरी व्याख्या नाही." (व्याख्यानें, पृ. २७).

## गीतारहस्य

धर्म आणि राजकारण, देव आणि देश, भगवंताचें अधिष्ठान आणि स्वराज्याची चळवळ हें जें अद्वैत लो. टिळकांनी निरनिराळ्या व्याख्यानांतून आणि लेखांतून प्रतिपादिलें तेंच अतिशय व्यापक तत्त्वज्ञानाच्या रूपाने त्यांनी गीतारहस्यांत प्रतिपादिलें आहे. लोकमान्यांनी धर्माचें खरें पुनरुज्जीवन केलें तें हेंच. गीतारहस्याच्या उपसंहारांत त्यांनी असें दाखवून दिलें आहे की, निवृत्ति मार्ग, हा प्रथम उपनिषत्कारांनी व सांख्यांनी प्रचारांत आणला. तत्पूर्वीचा वैदिक धर्म प्रवृत्तिपरच होता. "संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांत जीं वर्णनें आहेत त्यांवरून हा मार्ग (कर्मयोग) आमच्या देशांत अनादिकालापासून चालत आला आहे असें सिद्ध होतें. किंबहुना एरवी हा देश कधीच वैभवशाली झाला नसता." (पृ. ४९४).

## प्रवृत्तिमार्ग

या प्रकरणांत पुढे त्यांनी प्रवृत्तिमार्ग किंवा कर्मयोग याच्या चढउताराचा इतिहास थोडक्यांत दिला आहे. उपनिषदानंतर श्रीकृष्णांनी प्रवृत्तिमार्गाचें पुनरुज्जीवन केलें. मध्यंतरीं जैन, बौद्ध यांच्या काळीं पुन्हा संन्यासमार्गाचा, संसारत्यागाचा प्रभाव वाढला; पण स्मृतिकारांनी पुन्हा वैदिक कर्मयोगाचें पुनरुज्जीवन केलें; पण पुढे शंकराचार्य, रामानुज, मध्व इत्यादि सर्व आचार्यांनी संन्यासपक्ष स्वीकारून त्याचाच उपदेश सर्व देशभर केला. भागवतधर्मीय संत मंडळीहि कर्मयोगाला गौणच लेखीत. कर्मयोग हें संन्यासमार्गाचें अंग आहे, असें म्हणण्याऐवजी तें भक्तिमार्गाचें अंग किंवा

साधन आहे, असें संत म्हणत, एवढाच फरक. याला अपवाद म्हणजे समर्थ रामदासस्वामी. त्यांनी कर्ममार्गाचें खरें महत्त्व शुद्ध व प्रासादिक मराठींत सांगितलें आहे. पुढे महाभारताच्या गद्यात्मक भाषांतराच्या आधारे कर्मयोगाच्याच तत्त्वांचा अभ्यास मराठेशाहींत सुरू होता; पण कर्मयोगाचें हें पुनरुज्जीवन आमच्या दुर्दैवाने फार दिवस टिकलें नाही. ( गीतारहस्य, पृ. ४९९ ).

प्रवृत्तिमार्गाच्या आश्रयावांचून देश वैभवशाली होणें शक्य नाही. अशी टिळकांच्या मनाची निश्चिति असल्यानेच त्यांनी त्या मार्गाचें पुनरुज्जीवन करण्यासाठी 'गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र' हा अगविख्यात ग्रंथ लिहिला, आणि हिंदी राष्ट्राच्या उन्नतीची चळवळ दृढ पायावर उभी केली.

## टाळकुटे

देव आणि राष्ट्र यांच्या अद्वैताची, म्हणजेच कर्मयोगाची ही शिकवण आपल्या समाजाला किती अवश्य होती, हें विनायक नारायण जोशी ( साखरेबुवा ) यांनी दिलेल्या आठवणीवरून ध्यानीं येईल. ( खंड ३ रा, पृ. १०१ ). आध्यात्मिक ग्रंथांचें चिंतन करून ज्ञानेश्वरमहाराजांच्या ग्रंथांवर व्याख्यान लिहावें, असा आपला विचार आहे, असें साखरेबुवांनी लोकमान्यांस सांगितलें; तेव्हा ते म्हणाले, " ते ग्रंथ तर लिहाच पण त्याशिवाय धार्मिक विषयावर स्वदेशाचें कल्याण करण्याविषयी लोकांत जागृति उत्पन्न होईल, अशीं व्याख्यानें देण्यास तुम्ही सुरुवात करा." त्यावर साखरेबुवा म्हणाले की, " तें माझ्या हातून होणार नाही; मला ही तुमची देशकल्याणाची दिशाच मान्य नाही. यापेक्षा शेकडो पटींनी जास्त पुण्य प्राप्त करून घेण्याचा उपाय ज्ञानेश्वरमहाराज, शंकराचार्यादिकांनी सांगितला आहे; त्याचें आचरण करणें अधिक श्रेयस्कर आहे."

हें ऐकून लोकमान्य रागावले आणि म्हणाले, "तर मग तुम्ही खांद्यावर पताका घेऊन पंढरीस जाणार आणि वाळवंटांत टाळ कुटीत बसणार तर! हेंच ना तुमच्या अध्ययनाचें फल ? तुम्ही आपल्या प्रवचनांत ब्रह्म सत्य, जगन्मिथ्या, अशी नुसती बडबड केल्याने, पारतंत्र्याच्या दुःखांत होरपळत असलेल्या हिंदुस्थानांतील लोकांस त्यापासून यत्किंचित् तरी गारवा येईल का ? मी म्हणतों यांपैकी तुम्हांस कांही पटत नाही, याचेंच मला आश्चर्य वाटतें. अध्यात्म-विचाराचा विषय अजीबात सोडून द्या, असें माझें मुळीच म्हणणें नाही. फक्त त्या विषयाचा उपयोग देशकल्याणाकडे करा एवढेंच माझें सांगणें आहे."

पंढरपुरास एकदा लोकमान्यांचें व्याख्यान झालें. दुसऱ्या दिवशीं तेथील एक उत्पात ह. भ. प. दत्तुबुवा भुजंग त्यांना म्हणाले, " आपलें एखादें व्याख्यान धर्मावर होतें तर बरें होतें." त्यावर लोकमान्य म्हणाले, " धर्मावरच कालचें माझें व्याख्यान झालें. माझा धर्म स्वराज्य मिळविण्याखेरीज दुसरा नाही. स्वराज्य कसें मिळवावयाचें

या एकाच विचाराने सबंध हिंदुस्थान आज हलत राहिलें पाहिजे." ( आठवणी, खंड ३, पृ. १२९ ).

## पाश्चात्त्य पद्धति

लो. टिळकांना कोणत्या धर्माचें पुनरुज्जीवन करावयाचें होतें तें यावरून स्पष्ट होईल. प्राचीन वैदिक धर्मांत अनेक पंथ होते, शाखा होत्या, मतमतांतरें होतीं. त्यांतून हिंदुस्थानच्या उत्कर्षास पोषक अशीं तत्त्वें निवडून काढून त्यांचें पुनरुज्जीवन करावें असा त्यांचा हेतु होता; आणि हें पुनरुज्जीवन नव्या, शास्त्रीय, पाश्चात्त्य पद्धतीने झालें पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

नव्या पद्धतीने म्हणजे काय? शास्त्रीय पाश्चात्त्य पद्धति कोणती? बुद्धिवादाची, विचारस्वातंत्र्याची, तर्क, अनुभव, इतिहास यांच्या आधारें आपलें प्रमेय सिद्ध करण्याची.

जुनी पद्धति शब्दप्रामाण्याची, केवळ सिद्धान्त सांगण्याची, आज्ञा करण्याची होती. गीतारहस्यांतील उपसंहार या प्रकरणांत टिळकांनी म्हटलें आहे की, " मन्वादि स्मृतींतून व उपनिषदांतून सत्य, अहिंसा यांविषयीच्या आज्ञा किंवा आचार स्पष्टपणें नमूद केलेले आहेत; पण मनुष्य हा ज्ञानवान प्राणी असल्यामुळे वरच्यासारख्या नुसत्या विधानांनी त्याचें समाधान न होतां, हे नियम घालून देण्याचें कारण काय हें समजून घेण्याची त्याला स्वभावतः इच्छा होते."

ही त्याची इच्छा तृप्त करून नव्या राष्ट्र-धर्माचीं तत्त्वें त्याच्या बुद्धीला पटवून दिलीं पाहिजेत, म्हणजेच या धर्माचें प्रवचन शास्त्रीय पद्धतीने केलें पाहिजे, असें टिळक निक्षून सांगत असत.

ते म्हणत, " शिकलेल्या लोकांवर धर्मतत्त्वांचें वजन पाडण्यास नव्या तऱ्हेने या विषयाचें प्रतिपादन झालें पाहिजे व त्यांच्यापुढे पाश्चात्त्य पद्धतीने धर्माचें विवेचन करून त्याचें श्रेष्ठत्व त्यांस पटविलें पाहिजे." टिळकांचें असें मत असल्यामुळेच ते स्वामी विवेकानंद, अभेदानंद, ॲनी बेझंट यांचा मनःपूर्वक गौरव करीत. " आधिभौतिक शास्त्रांच्या प्रसाराने ख्रिस्ती धर्माच्या मांडणींत पुष्कळ फेरफार झाला आहे व तशा प्रकारचा फेरफार हिंदु धर्माच्या मांडणींत होणें जरूर आहे", असें त्यांचें मत होतें.

जुनीं धर्मतत्त्वें, जुने आचार, रूढि, संस्था यांचीहि नव्या काळाला अनुसरून पुनर्रचना केली पाहिजे व त्यांना कार्यक्षम बनविलें पाहिजे, असें त्यांचें धोरण होतें. शंकराचार्यांच्या पीठासंबंधी बोलतांना ते म्हणाले, " जगद्‌गुरुंच्या जागीं नवीन तऱ्हेने शिकलेला इसम पाहिजे म्हणजे तो पुष्कळ कार्य करील. त्यांतून हल्लीच्या काळीं त्या मनुष्यास इंग्रजी आलेंच पाहिजे. परिस्थितीप्रमाणे या गोष्टी आता झाल्याच पाहिजेत. इंग्रजी शिकल्याशिवाय आपल्या धर्माचें वजन चोहोकडे पाडतां यावयाचें नाही. धर्माचें वजन पाडण्यास तुलनारूपाने त्याचें विवेचन केलें पाहिजे." डॉ. कुर्तकोटी

यांना शंकराचार्यांच्या गादीवर आरूढ व्हावें, असा आग्रह टिळकांनी केला व त्यांनी तो मानला हें प्रसिद्धच आहे.

**एकवाक्यता अनिष्ट**

नव्या धर्माचें प्रवचन पाश्चात्त्य पद्धतीने, शास्त्रीय पद्धतीने, आधिभौतिक शास्त्रांच्या आधारें, बुद्धीला पटवून देण्याच्या हेतूने झालें पाहिजे अशी धारणा असल्यामुळेच लो. टिळकांनी गीतेवरचें त्यांचें गीतारहस्य हें जें प्रवचन तें सर्वस्वीं त्या पद्धतीने केलेलें आहे. जुन्या शास्त्री-पंडितांची शब्दप्रामाण्यपद्धति त्यांना सर्वस्वीं त्याज्य वाटत असे. अनेक श्रुतिवचनें, स्मृतिवचनें पाहतां असें दिसतें की, त्यांचे अर्थ परस्परांहून अगदी भिन्न आहेत, परस्परविरोधीहि आहेत. अशा वेळीं कोणतें वचन ग्राह्य, कोणतें त्याज्य, हें स्वतःच्या बुद्धीने ठरविणें हाच उपाय असतो; पण स्वतःच्या बुद्धीने विचार करणें व एखादें श्रुतिवचन त्याज्य ठरविणें हें जुन्या शास्त्री-पंडितांना पाप वाटे, अब्रह्मण्य वाटे. म्हणून तें श्रुति-स्मृतिवचनांतील शब्दांची, अर्थाची वाटेल ती ओढाताण करून त्या सर्वांचा अर्थ एकच आहे, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत. टिळकांना ही पद्धति मान्य नव्हती. त्यांनी म्हटलें आहे की, " याचा परिणाम असा होतो की, वेदसंहितेपासून तो पुराणांपर्यंत एकच अर्थ प्रतिपाद्य मानल्यामुळे वैदिक धर्म हा ज्याच्या-त्याच्या सांप्रदायाप्रमाणे एकच उभा सोट आहे, शाखापल्लव फुटून वाढलेला वृक्ष नव्हे, अशी लोकांची समजूत होते; आणि मग दुसऱ्याचा सांप्रदायिक सोट खरा वैदिक नसून, माझाच सांप्रदायिक सोट खरा वैदिक होय, असे तंटे उपस्थित होतात. . .तेव्हा निरनिराळ्या वचनांची एकवाक्यता करतांना एक मुख्य आणि इतर ओढाताणीने तदर्थक बनविण्यापेक्षा देश-काल-वर्तमानादि परिस्थिति-भेदामुळे एकाच वैदिक बीजापासून निघालेल्या वृक्षास अनेक शाखा फुटणें शक्य आहे, असें समजून त्याप्रमाणे सर्व वचनांची व्यवस्था लावणें हें आमच्या मतें ऐतिहासिकदृष्ट्या व धर्मदृष्ट्याहि अधिक समंजस व वस्तुस्थितीला अनुरूप आहे, " गीतारहस्यावरील टीकाकारांना उत्तर देतांना टिळकांनी हा विचार मांडलेला आहे. ( केसरी, २६–१०–१९१५ ).

**स्वतंत्र चिंतन**

लोकमान्यांनी गीतारहस्य लिहितांना हीच पद्धति अनुसरली होती. उपनिषदांतील बहुसंख्य उपनिषदें संन्यासमार्गी आहेत; कांही थोडीं कर्मयोगमार्गी आहेत. पण त्यांतील वचनांची एकवाक्यता करण्याचा मुळीच प्रयत्न न करतां, त्यांनी त्यांतील भिन्न मतें आहेत तशीं मांडून स्वतःला ग्राह्य काय तें स्पष्टपणें सांगितलें आहे. उपनिषदें म्हणजे प्रत्यक्ष श्रुति ! त्यांच्या बाबतींतहि टिळकांनी प्रामाण्य मानलें नाही. मग शंकर, रामानुज, मध्व, वल्लभ ह्या आचार्यांचीं भाष्यें त्यांनी मानलीं नाहीत यांत नवल काय ? तीं भाष्यें त्यांच्या बुद्धीला पटेनात म्हणून तर त्यांनी स्वतंत्र बुद्धीने विचार करून गीतेचा अर्थ लावला आणि कांट, ग्रीन इत्यादि पाश्चात्त्य पंडितांच्या

मतांची चर्चा करून, इतर धर्मांतील सिद्धान्तांशीं तुलना करून, आधार, प्रमाणें, कारणें देऊन, चिकित्सक बुद्धीला पटेल अशा रीतीने, कर्मयोगशास्त्र सांगितलें.

## ऐक्यबंध

धारणात् धर्म इत्याहुः, धर्मो धारयते प्रजाः ।। प्रभवार्थाय भूतानां धर्मस्य नियमः कृतः । यः स्यात् प्रभवसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ।। अशा प्राचीनांनी धर्माच्या व्याख्या केल्या आहेत. ज्याने धारण होतें तो धर्म, ज्याने उत्कर्ष साधतो तो धर्म, असा त्यांचा अर्थ आहे; पण गेलीं अनेक शतकें हा अर्थ हिंदुस्थानांतून लुप्तच झाला होता. ऐहिक उत्कर्षाचा, समाजाच्या भरण-पोषणाचा, उन्नति-अवनतीचा धर्माशीं कांही संबंध आहे, हेंच येथील धर्मधुरीणांना मान्य नव्हतें. लो. टिळकांना हा संबंध पुन्हा प्रस्थापित करावयाचा होता आणि त्या प्राचीन व्याख्यांतील भावार्थाचें पुनरुज्जीवन करावयाचें होतें. त्यासाठीच देव व देश एकच आहेत, असें त्यांनी सांगितलें. आणि त्यासाठीच धर्म हा सर्वांना एकत्र संघटित करणारा ऐक्यबंध असावा, असें प्रतिपादन त्यांनी वारंवार केलेलें आहे.

'गणपति-उत्सव' या लेखांत ते म्हणतात, "पुण्यांतील गणपतीचा यंदाचा उत्सव फक्त ब्राह्मणांनी केला नसून, त्यांत सर्व हिंदूंचा हात आहे व याबद्दल जितका अभिमान वाटणें साहजिक आहे तितका सर्वांस वाटत आहे. साळी, माळी, सुतार, रंगारी, ब्राह्मण, व्यापारी, मारवाडी, चांभार देखील, या सर्व जाती क्षणभर आपापला जातिमत्सर सोडून परस्परांशीं एका दिलाने व एका धर्माभिमानानें मिसळल्या ( ही आनंद मानण्यासारखी गोष्ट असतांना ) यांत खेद करण्याजोगी काय गोष्ट झाली ? " ( केसरी, १८–९–१८९४ ).

त्या वेळीं पुराणवादी लोकांनी गणपति-उत्सवावर असा आक्षेप घेतला होता की, सार्वजनिक उत्सव करण्यांत गणपतीला विटाळ होऊन तो रागावतो. (त्या वेळीं प्लेगची साथ आली ती गणपतीच्या कोपामुळेच आली, असें पुण्यांत पुष्कळ लोकांना वाटत असे. ) यावर टिळकांनी एका व्याख्यानांत सांगितलें की, "लोक जमल्याने देवाला विटाळ होतो म्हणणें म्हणजे देवाने माणसें उत्पन्न केलीं नाहीत, असें म्हणण्यासारखें आहे. वेदांत चार वर्ण आहेत. ब्राह्मण मुखाच्या ठिकाणीं, क्षत्रिय बाहूच्या ठिकाणीं, वैश्य ऊरूच्या ठिकाणी व शूद्र चरणाच्या ठिकाणीं आहेत. मग डोक्याला काय पायाचा विटाळ होतो किंवा बाहूला पायाचा विटाळ होतो ? असें धरल्यास आधी डोकें तोडून निराळें ठेवावें लागेल. " ( व्याख्यानें, पृ. २६ ).

गणेशोत्सव हा फक्त ब्राह्मणांचा आहे असा प्रवाद उठवून ब्राह्मण व मराठे यांच्यांत फूट पाडण्याचा प्रयत्न त्या वेळीं सरकार करीत असे. त्यासंबंधी लिहितांना टिळक म्हणतात, " कांही हिंदु-धर्माची नालस्ती करणाऱ्या ब्राह्मणविद्वेषी लोकांनी मराठे आणि ब्राह्मण ह्यांच्यांमध्ये फूट पाडून सर्व हिंदुसमाजाचें अकल्याण करण्याच्या प्रयत्नास सुरुवात केली आहे. करिता आपण सर्वत्रांनी या वेळीं सावध राहिलें

पाहिजे. आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे की, हिंदु-समाजाच्या ह्या दोन आधार-स्तंभांनी उभयतांस हितकर होईल, असें वर्तन ज्याप्रमाणे आजपर्यंत ठेविलें तसेंच पुढेहि ठेविलें पाहिजे." ( केसरी लेख, खंड १ ला, १८–९–९४ ).

शिवाजी-उत्सव सुरू करण्यांत टिळकांचा हाच हेतु होता. सर्व हिंदु-समाजाचें ऐक्य ! त्यांनी त्यासंबंधी विवेचन करतांना सांगितलें आहे की, "राष्ट्रांतील महा-पुरुषांचें स्मरण हें राष्ट्रीयत्व कायम राहण्यास एक चांगलें साधन आहे. शिवाजी-महाराजांनी मराठे, ब्राह्मण, परभू, शेणवी असा भेद न करतां "गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः ।" या न्यायाने सर्वांस एकराष्ट्रीयत्वाच्या जाळ्यांत आणलें. त्यामुळे त्यांचें स्मरण सर्वांस विशेष श्रेयस्कर होईल यांत शंका नाही. शिव-छत्रपतींचा उत्सव करणाऱ्यांनी उत्सवाचा हा हेतु ध्यानांत ठेवून त्यांत कोणताहि जातिभेद मानतां कामा नये. यंदाचे उत्सवांत एक-दोन ठिकाणीं असला प्रकार झाल्याचें ऐकिवात आहे. ही जर गोष्ट खरी असेल तर वेळींच तिचा बीमोड झाला पाहिजे." ( केसरी लेख, खंड १ ला, पृ. ५३२, ३३ ).

लोकांत ऐक्याची वृद्धि होण्यास एक उपास्यदैवत असणें हें मोठें साधन असून गणेशोत्सवाचा तोच हेतु होता, हें मागे एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. स्वधर्माचा अभिमान जागृत करणें हाहि त्यांत हेतु होता. त्या संबंधांतच टिळकांनी म्हटलें आहे की, "स्वधर्माच्या श्रेष्ठत्वाचा ज्यास अभिमान वाटत नाही त्यास स्वराष्ट्राच्या श्रेष्ठत्वाचा तरी अभिमान कोठून वाटणार? धर्मोन्नतीचा व धर्माभिमानाचा जर राष्ट्रीय अभ्युन्नतीशीं कांही संबंध असला तर तो याच प्रकारचा होय." ( केसरींतील लेख खंड १ ला, पृ. ४८८ ).

लो. टिळकांना धर्मजागृति करावयाची होती ती राष्ट्रजागृतीसाठी होय, हें यावरून स्पष्ट होईल.

## हिंदी राष्ट्र

पण त्यांच्या धर्मजागृतीच्या या प्रयत्नामुळे त्यांच्यावर अनेक लोकांनी अनेक आक्षेप घेतले होते. हिंदु धर्माची जागृति म्हणजे अन्य धर्मीयांचा द्वेष, असें समीकरणच कित्येकांच्या मनांत होतें. इंग्रज सरकार तर जाणूनबुजून तसा त्यांच्यावर आरोप करीत असे. सरकारला हिंदु-मुसलमानांत दुही माजवावयाचीच होती. तेव्हा टिळकांचें हें धर्मजागरण आणि त्यांचा हिंदुत्वाचा अभिमान यांचा त्यांनी विपर्यास करावा हें युक्तच होतें. पण स्वतःस पुरोगामी म्हणविणाऱ्या अनेक हिंदु नेत्यांनीसुद्धा असा विपर्यास चालविला होता.

लो. टिळकांना भारतांत राष्ट्र निर्मावयाचें होतें तें हिंदी राष्ट्र होय. हिंदु, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, मुस्लिम हे सर्व धर्म त्यांतील पंथ-उपपंथ, ह्या सर्वांचें एक राष्ट्र त्यांना घडवावयाचें होतें. असें असतांना हिंदुधर्मीयांचेंच ऐक्य करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा हें विसंगत नाही काय, अशी शंका त्यांच्या भक्तांना सुद्धा येत असे.

अशा शंकांचें वेळोवेळीं निरसन करून, त्यांनी आपली विशुद्ध राष्ट्रीय भूमिका स्पष्ट केली आहे. तिचा परामर्श घेऊन हें विवेचन संपवूं.

१९०४ च्या गणेशोत्सवांत ते म्हणतात, "नुसती हिंदु धर्माची जागृति केली तर इतर धर्मांचा तिरस्कार वाढेल व त्यामुळे राष्ट्रैक्याचा घात होईल ... असें म्हणणारी अजूनहि कांही मंडळी आहे; पण धर्माचा नायनाट करून सर्व समाज धर्मशून्य बनल्यामुळे राष्ट्रैक्य किंवा राष्ट्रोन्नति झाल्याचें जगांत एकहि उदाहरण नाही. . . इतर धर्मांबद्दल द्वेष व विरोध वाढूं न देतां हिंदु धर्माची जागृति व उन्नति करून हिंदुधर्मीयांचा मिलाफ करणें शक्य आहे."

## समानहितत्व

"या देशांतील सर्वधर्मीयांनी आपापल्या धर्माचा अभिमान अवश्य बाळगला पाहिजे, पण तो राष्ट्रीयत्वाच्या आड येऊं देतां कामा नये." असें हिंदु-मुसलमानांचे तंटे सुरू झाले तेव्हापासून टिळक सांगत आले आहेत. 'हिंदु-मुसलमानांचा समेट' या लेखांत ते म्हणतात, "हिंदु-मुसलमान लोकांनी ज्या नात्याने एकत्र राहावयाचें तें कांही अंशीं अमेरिकेंत निरनिराळ्या जातींचे, निरनिराळ्या धर्मांचे लोक जसे एकत्र राहतात तशा प्रकारचें असलें पाहिजे. . . हिंदु-मुसलमान लोकांचे रीतिरिवाज, संस्कार, उत्सव-सोहळे हे बऱ्याच गोष्टींत भिन्न आहेत, परंतु एकदा सलोख्याने व मित्रत्वाने वागावयाचें, असा निश्चय झाल्यावर एकमेकांनी एकमेकांच्या सोयीसाठी व समजुतीसाठी कांही गोष्टी करण्यास व कांही गोष्टी सोडण्यास कबूल झालें पाहिजे." ( केसरींतील लेख, खंड १, पृ. २३५ ). 'ख्रिस्ती धर्म व हिंदुस्थानांतील लोकांचें राष्ट्रीयत्व' या लेखांत या विषयाचें टिळकांनी आणखी स्पष्टीकरण केलें आहे. ते म्हणतात, "राष्ट्रीयत्वाची सिद्धि होण्यास स्वधर्म, स्वभाषा, स्वदेशाभिमान व पूर्वेतिहासस्मरण ह्या गोष्टी कारणीभूत होतात, हें 'राष्ट्रीयत्वाची कल्पना' या लेखांत, सुमारें एक महिन्यापूर्वी आम्हीं सांगितलेंच आहे. तथापि समानहितत्व हें राष्ट्रीयत्वाची कल्पना सिद्ध होण्याचें प्रत्यक्ष कारण होय व स्वधर्मप्रीति वगैरे दुय्यम प्रकारचीं कारणें होत, असेंहि आम्हीं सांगितलें होतें. म्हणजे हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींतील लोकांमध्ये जर यापुढे केव्हा राष्ट्रीयत्वाची कल्पना उत्पन्न होऊन ती प्रबल होण्याचा संभव असेल, तर सर्व लोकांनी स्वधर्म, स्वभाषा व आपला पूर्वेतिहास यांविषयी प्रीति बाळगून सर्वांस समान असें जे राजकीय हक्क ते मिळविण्यास उद्युक्त झाले पाहिजे." ( केसरींतील लेख, खंड ३ रा, पृ. २३८ ).

लोकमान्यांचें 'हिंदी राष्ट्र' हें निश्चित उद्दिष्ट असल्यामुळेच त्यांनी पारशी, ख्रिश्चन, मुस्लिम ह्या सर्वांना एकराष्ट्रीयत्वाच्या मुशींत ओतण्याचा अखंड प्रयत्न चालविला होता. आज ज्याच्यावर कांही अर्धवट लोक गहजब करीत आहेत तो 'लखनौचा करार' यासाठीच होता. आणि सर्वधर्मीयांनी आपापल्या धर्मांचा

अभिमान बाळगून त्याचें राष्ट्रीय दृष्टीने पुनरुज्जीवन करावें असें ते सतत सांगत असल्यामुळे त्यांचे हिंदु-धर्मजागृतीचे प्रयत्न राष्ट्रैक्यास मुळीच बाधक नव्हते, हें स्पष्ट आहे.

लो. टिळकांना हिंदु धर्माचें जें पुनरुज्जीवन करावयाचें होतें त्याचें स्वरूप काय होतें तें येथवर केलेल्या विवेचनावरून स्पष्ट होईल. बनारसला ३ जानेवारी १९०६ या दिवशीं भारत-धर्म-महामंडळापुढे त्यांचें जें व्याख्यान झालें त्यांत या-संबंधीचे त्यांचे सर्व विचार एकत्र आलेले आहेत. तेव्हा स्वतंत्रपणें निराळा समारोप करण्याऐवजी त्या व्याख्यानाचा सारार्थ येथे देऊनच या विवेचनाचा समारोप करतों.

लोकमान्य म्हणतात, " भारत-धर्म-महामंडळ हें नांव सार्थ केव्हा होईल ? हिंदु धर्मांत सध्या अनेक पंथ, उपपंथ, शाखा, उपशाखा यांचें तण फार झालें आहे. त्या सर्वांना एकत्र संघटित करून त्यांचें दृढ ऐक्य मंडळ करील तेव्हा त्याचें ' धर्म महामंडळ ' हें नांव सार्थ होईल. आपणांत अनेक भेद व फळ्या असतांना, एक पंथ दुसऱ्याचा तिरस्कार करीत असतांना, म्हणजेच आपण असे शतधा विभक्त असतांना हिंदु म्हणून वैभवास चढणें आपल्याला शक्य होणार नाही.

" धर्माची व्याख्याच मुळी ' धारण करणारा तो धर्म ' अशी आहे. धारण करणें म्हणजे एकत्र आणणें, बांधणें. माणूस व परमेश्वर ह्यांना व सर्व मानवांना एकत्र संघटित करणें म्हणजे धारणा करणें होय. यासाठी प्राचीन काळाकडे दृष्टि टाकून वेद, गीता आणि रामायण हें जें आपल्या परंपरेचें वैभव आहे तें शिरसावंद्य मानून आपण आपसांतले इतर भेद दृष्टीआड केले पाहिजेत आणि एक बलाढ्य हिंदु राष्ट्र निर्माण केलें पाहिजे.

" सध्या आपल्या धर्माला वाईट कळा आली आहे. फूट, दुही, भेद, विभक्तता ह्यांनी आपल्याला ग्रासलें आहे. आपण अत्यंत आळशी व मूर्ख झालों आहों. आपल्या प्राचीन ग्रंथांचा आपण अभ्यास करीत नाही. त्या ग्रंथांचें सुवर्ण वैभव आपल्या ध्यानांत आणून देण्यास आपल्याला पाश्चात्त्य पंडितांची गरज भासते. हे सर्व दोष महामंडळाने नष्ट करून आपल्या प्राचीन धर्माचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे.

" आपल्या प्राचीन धर्माचीं तत्त्वें किती उज्ज्वल आहेत तें आज विज्ञानाने सिद्ध होत आहे. सर्व चराचरांत चैतन्य भरलें आहे हा वेदान्ताचा सिद्धान्त आज जगदीशचंद्र बोस यांनी शास्त्राच्या आधारें सिद्ध केला आहे. आत्म्याच्या अमरत्वाचा सिद्धान्त इतके दिवस स्पेन्सरसारखे पंडित मान्य करीत नव्हतें; पण सर ऑलिव्हर लॉज, मेयॉर यांसारखे शास्त्रज्ञ आता शरीराबरोबर आत्मा विनाश पावत नाही, असें सांगत आहेत. अमेरिकन पंडित आज वेदान्त, योग यांचा अभ्यास करीत आहेत; आणि तेच असें दाखवीत आहेत की, या शास्त्रांतलीं तत्त्वें विज्ञानपूत आहेत.

" हें ध्यानीं घेऊन आपण आपल्या प्राचीन धर्म-ग्रंथांचें पुन्हा नव्या दृष्टीने संपादन केलें पाहिजे; आणि विज्ञानाच्या नव्या प्रकाशांत ते जगापुढे मांडले

पाहिजेत. असें केल्याने ते सर्वांच्या आदरास पात्र होतील. सर्वत्र त्यांना मान्यता मिळेल. हिंदु धर्म हा सत्याच्या पायावर उभारलेला आहे, आणि इतर सर्व धर्म असेच सत्याच्या पायावर उभारलेले आहेत असें तो मानतो. म्हणून तुझा धर्म तुला, माझा मला, अशी त्याची उदार सहिष्णु वृत्ति आहे.

"अशा या उदार धर्माचें साह्य घेऊन आपण आपसांतले भेद त्या महाप्रवाहांत बुडवून टाकले पाहिजेत व एक अभंग, एकसंध समाज निर्माण केला पाहिजे. असें केलें तरच जगतांतील थोर राष्ट्रांच्या मालिकेंत आपल्याला योग्य असें स्थान मिळूं शकेल." (बाळ गंगाधर टिळक, हिज् रायटिंग्ज अँड स्पीचेस, गणेश अँड को., मद्रास, पृ. १२–२०).

- ५ -

# स्वराज्याचें राजनीतिशास्त्र

भिन्न धर्म, वंश, पंथ, भाषा, प्रांत, परंपरा इत्यादि कारणांनी भेद-जर्जर झालेल्या हिंदी समाजांतून एक संघटित हिंदी राष्ट्र निर्माण करणें हें लो. टिळकांचें अंतिम ध्येय होतें, हें वर अनेकवार सांगितलेंच आहे. या राष्ट्रनिर्मितीसाठी धर्म, समाजरचना, अर्थव्यवस्था, राजकारण ह्या सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत फार मोठें परिवर्तन घडविणें अवश्य आहे, हें प्रारंभापासूनच त्यांच्या मनाशीं निश्चित झालेलें होतें; आणि म्हणूनच त्या सर्व दिशांनी त्यांनी प्रयत्न आरंभिले होते. त्या प्रयत्नांचाच मागोवा येथवर आपण घेतला. गेल्या प्रकरणांत, त्यांच्या मतें धर्मक्षेत्रांत कोणतें परिवर्तन व्हावयास हवें होतें त्याचें विवरण केलें. आता राष्ट्रनिर्मितीसाठी व स्वराज्यप्राप्तीसाठी कोणतें राजनीतिशास्त्र हिंदी समाजाला त्यांनी सांगितलें त्याचा विचार करावयाचा आहे.

### केवळ स्वार्थासाठी

स्वराज्याच्या राजनीतिशास्त्रांतला त्यांचा पहिला सिद्धान्त हा की, कोणताहि देश दुसऱ्या देशावर सत्ता गाजवितो, तो केवळ स्वार्थासाठी होय. जित देशाच्या कल्याणासाठी कोणी कधीहि असला उद्योग करीत नाही. 'अनावर राज्य-विस्तार' या लेखांत ते म्हणतात की, "इंग्रज लोक हिंदुस्थानाचें राज्य करीत आहेत तें दरबारी भाषेंत जरी हिंदुस्थानच्या हिताचें असलें तरी, वास्तविकरीत्या पाहिलें तर इतर युरोपियन राष्ट्रांची एशिया किंवा आफ्रिका खंडांत जी राज्यतृष्णा व चळवळ दिसून येते तीहून इंग्लिश लोकांची चळवळ फारशी भिन्न नाही असें आढळून येतें." ( केसरी, खंड २ रा, २५ फेब्रुवारी १९०२ ). याच लेखांत इंग्रजांच्या जगांतल्या अवाढव्य उद्योगाचें वर्णन करून हिंदुस्थानांतील त्यांचा कारभार

केवळ स्वार्थानें प्रेरित झाला आहे, हें पुनःपुन्हा सांगितलें आहे. 'फार दिवस घडत असलेला वचनभंग' या लेखांत १८९३ साली एका इंग्रज अधिकाऱ्याचे उद्‌गारच त्यांनी दिले आहेत. "हिंदुस्थान देश जो जिंकला आहे तो, हिंदुस्थानच्या फायद्यासाठी नाही. तर राज्यकर्त्यांचा व्यापार वाढावा व त्यांच्या पोराबाळांची तरतूद व्हावी एवढ्याकरिताच होय", असें एका मोठ्या इंग्रज अंमलदाराने बोलून दाखविलें होतें. (केसरी, खंड १ ला, पृ. १७६).

**परकी सरकार**

हाच भाव लोकांच्या मनांत दृढमूल करण्यासाठी इंग्रज सरकार हें परकी सरकार आहे, असें वारंवार अट्टाहासाने ते सांगत असत. के. सी. एस्. आय्. ही बडी पदवी धारण करणाऱ्या एका इंग्रजाने, हिंदुस्थानांत इंग्रजांनी सर्व जुन्या संस्था, परंपरा चालू ठेवल्या आहेत, लोकांना स्वातंत्र्य दिलें आहे व लोकांच्या हिताच्या दृष्टीनेच कारभार चालविला आहे, तेव्हा अशा सरकारला परकी सरकार म्हणणें योग्य नाही, असा मुद्दा मांडला होता. त्याला टिळकांनी जें उत्तर दिलें आहे त्याचा आशय असा : आमच्या देशाची सांपत्तिक स्थिति सारखी खालावत चालली आहे. या देशाचा पैसा पांच हजार कोसांपलीकडे जाऊन पडतो. हत्यारांचा कायदा, ज्यूरीचा कायदा यांत पाश्चिमात्य व पौर्वात्य असा भेद केला जातो; असें असतांना इंग्रज सरकार परकी नव्हे, असें म्हणणें लपंडावाचें आहे. ज्या दिवशीं इंग्रज लोकांपुरते निराळे कायदे होण्याचें बंद होईल, अठरापगड जातींसारखीच टोपीवाले ही एकुणिसावी जात होईल, ज्या वेळीं हिंदुस्थानच्या तिजोरींतील सर्व पैसे हिंदुस्थानांतच खर्च होतील, व इंग्लंड आणि हिंदुस्थान हे मित्रत्वाच्या नात्याने राहूं लागतील तेव्हाच इंग्रज सरकारचा परकेपणा लुप्त होईल. (केसरी, लेख खंड १ ला, पृ. ३६९).

**राजकारणाचा पाया**

इंग्रज सरकार परकी आहे, तें हिंदुस्थानच्या प्रजेचा रक्तशोष करीत आहे, त्यांच्या राज्यांत हिंदुस्थानचा सारखा अधःपात होत आहे, हें राज्य अन्यायाचें आहे, जुलमाचें आहे, या राज्यांत लोकांची अन्नान्नदशा होऊन दरसाल लक्षावधि लोक मृत्युमुखीं पडत आहेत, आणि तरीहि दिवसेंदिवस जास्त जास्त कर लादून, सारा वाढवून इंग्रज येथल्या प्रजेला पिळून काढीत आहेत, हा जो विचार, आणि यांतून सिद्ध होणारें जें तत्त्वज्ञान तें म्हणजे टिळकांच्या राजकारणाचा पायाच होय. त्यांनी हिंदी जनतेंत जो असंतोष निर्माण केला तो इंग्रजांची ही रक्तपिपासु राजनीति लोकांच्या निदर्शनास आणूनच केला. स्वराज्य कशासाठी पाहिजे या प्रश्नाला त्यांचें हेंच उत्तर होतें. तात्त्विकदृष्ट्या पाहिलें तर परकी सुराज्यापेक्षां स्वकीय वाईट राज्यहि चांगलें हें खरें; तसें एक-दोन ठिकाणीं टिळकांनी म्हटलेंहि आहे; पण अंतीं हा विचार तात्त्विकच राहतो. कारण परकी सत्ताधारी प्रजेच्या कल्याणाची चिंता वाहून, खरोखरच केवळ प्रजेच्या हिताच्याच दृष्टीने कारभार करूं लागले,

तर त्यांचें परकीयत्व तत्काल लुप्त होईल. येथल्या अनेक जातिजमातींपैकी ती एक जमात होऊन तिची 'स्व'मध्येच गणना होईल; आणि तसें टिळकांनी स्वतःच म्हटलें आहे, हें वरील उताऱ्यावरून दिसून येईल. तेव्हा हें सरकार अन्यायी आहे, जुलमी आहे, स्वार्थप्रेरित आहे, लुटारू आहे, रक्तशोषक आहे, हा विचार सतत मांडून, त्याचें काळें अंतरंग लोकांना दाखवून त्यांना स्वराज्याच्या चळवळीसाठी, इंग्रज सरकारशीं लढा करण्यासाठी सिद्ध करणें हेंच टिळकांचें राजकारण होय. त्यांनी पुनः पुन्हा तुरुंगावासाच्या दारुण यातना सोसल्या आणि आत्म-बलिदानाची सतत सिद्धता ठेवली ती यासाठीच.

## नवी राजनीति

हें राजकारण, स्वराज्याची ही राजनीति, हिंदुस्थानाला सर्वस्वीं नवी होती. एका व्यक्तीने शासनावर, सत्ताधाऱ्यावर टीका करावयाची, विचाराने, तत्त्वज्ञानाने तिचा नैतिक पायाच हादरून टाकावयाचा आणि त्यासाठी हालअपेष्टा, तुरुंगवास सोसावयाचा ही कल्पनाच या देशाला पूर्वीच्या काळीं कधी स्फुरलेली नव्हती; कारण राज्यक्रांति लोकांकडून करवावयाची असते हा विचारच येथे कधी उद्भवला नव्हता. भारतांत लो. टिळकांनी तो प्रथम मांडला; आणि त्या पद्धतीने येथे जागृति घडवून आणली. त्यांच्या या कार्याचें या प्रकरणांत विवेचन करावयाचें आहे.

## दारिद्र्य

इंग्रजी राज्यांत हिंदुस्थान दरिद्री होत आहे, हें दारिद्र्य दिवसेदिवस भीषण स्वरूप धारण करीत आहे, आणि हें असेंच चालू राहिलें तर एक दिवस या देशांत भडका उडाल्यावांचून राहणार नाही, हा विचार लो. टिळक केसरीच्या पहिल्या वर्षापासून सतत सांगतांना दिसतात. राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी यांनी दीर्घकाल अभ्यास करून प्रथम हा विचार १८७१ सालीं विलायतेंत 'ईस्ट इंडिया फायनॅन्स कमिटी'पुढे साक्ष देतांना मांडला; आणि तोच पुढे त्यांनी 'पॉवर्टी अँड अन्‌ब्रिटिश रूल इन् इंडिया' या ग्रंथांत विस्ताराने प्रतिपादिला. हाच विचार पायाभूत म्हणून स्वीकारून विष्णुशास्त्री, आगरकर व टिळक ह्यांनी आपलें राजकारण उभारलें, असें आचार्य जावडेकर ह्यांनी म्हटलें आहे तें यथार्थ आहे. दादाभाईंच्याबरोबरच श्री. डिग्बी या इंग्रज गृहस्थाच्या 'प्रॉस्परस इंडिया' या ग्रंथाचा उल्लेख टिळकांनी केला आहे. त्यानेहि दादाभाईंच्यासारखाच सिद्धान्त मांडला आहे. कॉंग्रेसचे आद्य प्रवर्तक श्री. ह्यूम यांचाहि टिळकांनी याच दृष्टीने मोठा गौरव केला आहे. पंडित गुरु गोविंद हे इंग्लंडमध्ये राहणारे एक हिंदी गृहस्थ. त्यांनी तेथील 'स्टेट्समन' या मासिकांत चार-पांच लेख लिहून हिंदुस्थानांत इंग्रजी राज्यामुळे सर्वत्र आबादीआबाद आहे, असें गुणगान करणाऱ्या डॉक्टर हंटर या गृहस्थाला खरमरीत उत्तर दिलें होतें. हे त्यांचे लेख १८८० सालांतले आहेत. डिग्बीसाहेबहि

त्या वेळेपासूनच लिहीत होते. या सर्वांच्या आधाराने टिळकांनी इंग्रज राज्यकर्त्यांची राजनीति कशी आहे, तें हिंदी लोकांना स्पष्ट करून सांगितलें.

## पाऊण आणा रोज

'आम्ही आमच्या दारिद्र्यांतून कशाने सुटूं' या लेखांत टिळकांनी डिग्बी यांच्या प्रतिपादनाचा मथितार्थ दिला आहे. लोकमान्य म्हणतात, "डिग्बी यांनी आपल्या 'हिंदुस्थानासंबंधी प्रश्न' या पुस्तकांत हिंदु लोकांच्या दारिद्र्याची अशी खाशी तसबीर काढली आहे की, ती पाहून पाषाणाला सुद्धा द्रव आल्यावांचून राहणार नाही. डिग्बी यांनी म्हटलें आहे की, "नेटिव राजे प्रजेला चाबकाखाली झोडीत, पण आम्ही (इंग्रजबहाद्दरांनी) त्यांच्या अंगाला विंचवाच्या नांग्या लावल्या आहेत." (केसरी, वर्ष दुसरें, अंक १ ते ४). याच डिग्बीसाहेबांच्या दुसऱ्या 'प्रॉस्परस इंडिया' या उपरोधी नांवाने लिहिलेल्या पुस्तकाच्या आधारें, टिळकांनी हिंदी जनतेच्या दारिद्र्याचा हिशेब दिला आहे. १८५० सालीं हिंदुस्थानचें दर माणशीं रोजचें उत्पन्न दोन आणे होतें. १८८० सालीं तें दीड आण्यावर आलें व १९०० सालीं तें फक्त पाऊण आणा होतें. डिग्बी यांनी सरकारी रिपोर्टांचेच आधार घेऊन ही माहिती दिली आहे. आणि आरंभीच हिंदुस्थानचे महानबाब लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांना उद्देशून म्हटलें आहे की, "माझ्या पुस्तकांतील गोष्टी सर्व सरकारी रिपोर्टांतून घेतल्या आहेत. त्या खोट्या तरी ठरवा किंवा हिंदुस्थानास भिकेस लावणारी राज्यपद्धति तरी बदला." (केसरी, लेख, खंड २, रा पृ.२९५, ३००).

## सुवर्णभूमीची अन्नान्नदशा

हिंदुस्थानला हें भीषण दारिद्र्य कशामुळे आलें ? एके काळीं ही भूमि म्हणजे सुवर्णभूमि होती. सतराव्या-अठराव्या शतकांत येथे डीलाव्हेल, रे, टार्मर, डॉ. फ्रायर इत्यादि जे युरोपीय प्रवासी येऊन गेले त्यांनी येथल्या उद्योगधंद्यांच्या भरभराटी-संबंधाने मोठ्या गौरवाने लिहून ठेविलें आहे. प्राचीन काळीं तर इराण, चीन, रोम, तुर्कस्थान या देशांशीं आमचा व्यापार चालू होता. येथले कारागीर अत्यंत कुशल असून, त्यांच्या कलाकौशल्याची ख्याति जगभर झाली होती. गेल्या शतकापर्यंत युरोपांतील राजस्त्रिया हिंदुस्थानांतील सुती व रेशमी तलम वस्त्रांवांचून दुसरीं वस्त्रें वापरण्यास नाखूष असत. असे हे कुशल कारागीर व त्यांच्या मालाचा जगभर विक्रय करणारे व्यापारी यांच्यामुळे हिंदुस्थानांत बाहेरून सोन्याचे पाट वाहत येत असत. असा हा देश आता भिकेला कां लागला ? त्याची अन्नान्नदशा कां झाली ?

## नरडीस नख

येथल्या कारागिरांचें कलाकौशल्य व येथला व्यापार इंग्रज सरकारने जाणून-बुजून नष्ट केला म्हणून हिंदुस्थानला दारिद्र्य आलें आहे, असा सिद्धान्त टिळकांनी मांडला. 'आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले ?' (केसरी, ११-११-१९०२); आणि 'कंपनी सरकार व इंग्रज सरकार' (२५-११-१९०२), या लेखांत त्यांनी हा

सिद्धान्त सविस्तर मांडला आहे. सर थॉमस मनरो यांनी 'हाऊस ऑफ कॉमन्स कमिटीपुढे काश्मिरी शालीची कीर्ति गायिली ती ईस्ट इंडिया कंपनीच्या डाय-रेक्टरांस सहन झाली नाही. आणि १७६९ सालींच त्यांनी हुकूम काढला की, हिंदुस्थानांतील फक्त कच्च्या मालास उत्तेजन द्यावें व पक्का माल होतां होईल तो तयारच होऊं देऊं नये. त्याअन्वये येथील कोष्टयांना कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कंपनीच्या कारखान्यांतच त्यांनी नोकरी केली पाहिजे, स्वतंत्रपणें माल तयार करतां कामा नये, असें फर्माविलें; आणि ज्यांनी नकार दिला त्यांना कडक शिक्षा केल्या. यानंतर कंपनीने येथून देशाबाहेर जाणाऱ्या मालावर जबर जकात बसविली. अशा मालावर शेकडा ६२२ पावेतों जकात ठेवून हिंदी व्यापाऱ्यांच्या व कारागिरांच्या नरडीस नख लावण्यांत आलें. येथल्या उद्योगांची व व्यापाराची अशी व्यवस्था केल्यावर कंपनी विलायती माल हिंदुस्थानांत पाठविण्यास मोकळी झाली. कारण स्पर्धा नाहीशी झाली होती. याचा परिणाम काय झाला ? १८३० सालीं विलायतेंतून फक्त साडेसात लाखांचा माल हिंदुस्थानांत येत असे. तोच १९०० सालीं जवळ जवळ ९२ कोटि रुपयांचा माल तिकडून आला. आमचा माल परदेशीं जाऊं नये व तेथला माल येथे यावा एवढीच व्यवस्था करून कंपनीचे अधिकारी थांबले नाहीत. देशांतल्या देशांत पाठविल्या जाणाऱ्या मालावर देखील त्यांनी जबर जकात बसविली. यामुळे येथला व्यापार व येथली कारागिरीहि सर्वस्वीं बुडाली.

कोष्टयाच्या धंद्याप्रमाणेच इतर कलाकौशल्याच्या धंद्यांची अवस्था झाली. हा सर्व नाश जाणूनबुजून करण्यांत आला होता. इतर राहिलेल्या धंद्यांचा नाश इंग्रजी सुधारणांमुळे झाला. येथे आगगाडी आली. त्याच्या आधी १७८० मध्ये एकटया गंगेच्या प्रवाहांतून मालाची ने-आण करणारे ३०,००० नावाडी होते. आग-गाडीमुळे एवढया लोकांच्या तोंडचें अन्न गेलें. येथल्या प्रत्येक उद्योगाची इंग्रजी राज्यामुळे अशी वाताहत झाली; आणि आम्ही अन्नाला मोताद झालों.

असें सर्व विवेचन करून 'आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले ? ' या लेखाच्या शेवटीं टिळक म्हणतात, "हिंदुस्थानचा व्यापार ठार झाला अथवा येथील लोकांचे उद्योगधंदे बुडाले यांत नवल नाही. जर अशा तऱ्हेचे कायदे इंग्लंडास लागू केले असते अथवा इतकी परतंत्र स्थिति दहा-वीस वर्षेंच इंग्लंडांत राहिली असती तर तें राष्ट्र केंव्हांच रसातळाला गेलें असतें, असें मानणें तर्कशास्त्रास सोडून होणार नाही."

केसरी व मराठा या पत्रांच्या पहिल्या वर्षापासून लो. टिळक हा विचार सतत सांगत आले आहेत. केसरीच्या पहिल्या सात वर्षांतील अनेक लेख 'केसरींतील निवडक निबंध' या नांवाने दोन पुस्तकांत छापलेले आहेत. त्यांतील 'आम्ही या दारिद्र्यांतून कशाने सुटूं ?', 'व्यापाराखेरीज तरणोपाय नाही', 'अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन', 'समाइकीने उभारलेल्या भांडवलाचे कारखाने', "उद्योगवृद्धि', 'भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन' आणि 'हिंदुस्थानचें कला-

कौशल्य ' ह्या लेखांत पुन:पुन्हा हा विचार मांडण्यांत आलेला आहे. 'मराठा' पत्राच्या १८८१ सालच्या पहिल्या दोन महिन्यांतच याविषयी चार लेख आले आहेत. १८८२ च्या प्रारंभींहि असेच लेख आढळतात. त्यांचा मथितार्थ असा :

## रानतोड्र लोक

इंग्लिशांनी आमचा सर्व व्यापार बळकावला आणि येथल्या उद्योगधंद्यांचा नाश केला, हेंच आमच्या दारिद्र्याचें खरें कारण आहे. हिंदुस्थान सध्या केवळ कच्चा माल पुरविणारा देश होऊन बसला आहे. आम्हांला लागणारा सर्व पक्का माल परदेशांतून येतो, विलायतेंतून येतो, ही अत्यंत लज्जास्पद स्थिति आहे. ती नाहीशी करावयाची तर आम्ही देशी उद्योगधंदे काढले पाहिजेत. हा देश सृष्टिजन्य पदार्थांच्या बाबतींत समृद्ध आहे. येथे मजुरीहि स्वस्त आहे. पण त्या मूळ द्रव्यावर, कच्च्या मालावर, संस्कार करून त्याचा पक्का माल करण्याचे कारखाने येथे नाहीत. आम्ही केवळ धान्यपिकवू व रानतोडू लोक झालों आहों. एवढ्यावर कोणतेंहि राष्ट्र संपत्तिमान् होत नाही ! आम्हीं खंडीच्या खंडी मूलद्रव्यें उत्पन्न करावीं, दुसऱ्या राष्ट्रांनी तीं जहाजें भरभरून न्यावीं आणि त्यांवर कुशलतेची करामत करून ती पुन: आम्हांकडे विकण्यास आणावीं व हवे तसे पैसे मिळवावे ही केवढी दु:खाची गोष्ट ! असा प्रकार आमच्या देशांत आणखी कांही वर्षें चालला तर येथील माणसें एकमेकांना खाऊं लागतील, यांत काडीचा संशय नाही.

## औद्योगिक विकास

या भीषण भवितव्यांतून सुटावयाचें असेल, तर आपण कच्च्या मालाचा पक्का माल करण्याचे कारखाने येथे काढले पाहिजेत. त्यासाठी भांडवल लागेल तें समाइकीने उभारलें पाहिजे; आणि तज्ज्ञ कारागीर लागतील त्यासाठी आपले विद्यार्थी परदेशीं पाठवून त्यांना तज्ज्ञ करून आणलें पाहिजे.

या वेळीं असे विद्यार्थी परदेशीं धाडण्याची एक योजना पुण्याच्या सार्वजनिक सभेने आखली होती. तिचा पाठपुरावा केसरी व मराठा या दोन्ही पत्रांत केलेला आढळतो. मराठा पत्रांत शास्त्रीय ज्ञानाचें महत्त्व विवरून सांगितलें असून शास्त्रीय ज्ञानावांचून खरी संस्कृति निर्माण होऊं शकत नाही, असें म्हटलें आहे; आणि शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व औद्योगिक विकास हा सध्याच्या दारिद्र्यांतून सुटण्याचा एकमेव उपाय होय, असें सांगितलें आहे.

## स्वदेशी

'स्वदेशी व बहिष्कार ' ही चळवळ १९०५ च्या सुमारास सुरू झाली; आणि अत्यंत वेगाने सर्व देशभर पसरली, पण तोहि विचार केसरीच्या पहिल्या वर्षापासूनच टिळकांच्या मनांत उदित झाला होता, असें दिसतें. मँचेस्टरच्या व्यापाऱ्यांनी नाना उपाय करून त्यांच्या हिंदुस्थानांत येणाऱ्या मालावरची जकात कमी करून घेतली. बाह्यत: त्यांनी असें दाखविलें की, हिंदु लोकांना कपडा स्वस्त पडावा हा

यामागे हेतु आहे. टिळकांनी त्यांना मार्जार-साधु, बकध्यानी असें म्हणून येथल्या गिरण्या बुडविण्यासाठीच हें कारस्थान केलेलें आहे, हें स्पष्ट सांगितलें आहे; आणि स्वजनांना उपदेश केला आहे की, परदेशांतून येणाऱ्या कापडावरील जकात सरकारने माफ केली, यामुळे इकडील गिरणीवाल्यांचें नुकसान होत आहे. तें न होण्यास इकडील लोकांनी स्वदेशी कापड वापरण्याचा निश्चय करावा. त्यामुळे लाखो रुपये परदेशीं जातात ते स्वदेशीं राहतील.

## औद्योगिक पारतंत्र्य

या देशाला राजकीय पारतंत्र्य आलें होतें. तें नष्ट करून त्याला स्वराज्य प्राप्त व्हावें यासाठी टिळकांनी सर्व आयुष्यभर तन-मन-धन झिजविलें; पण त्या राजकीय पारतंत्र्याचीं मुळें आपल्या औद्योगिक पारतंत्र्यांत आहेत हें प्रारंभापासूनच त्यांनी जाणलें असल्यामुळे त्या पारतंत्र्याचें पूर्ण स्वरूप ओळखून आपण त्या पारतंत्र्याच्या बेड्या प्रथम तोडल्या पाहिजेत, असें ते सतत सांगत असत. ( 'औद्योगिक पारतंत्र्य', केसरी, २५–९–१८९४ ), स्वराज्याच्या राजनीतिशास्त्रांतला त्यांचा हा सर्वांत महत्त्वाचा सिद्धान्त होता.

## शेतकऱ्याचा रक्तशोष

व्यापार व उद्योग यांचा नाश हें हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें एक कारण झालें. दुसरें महत्त्वाचें कारण म्हणजे इंग्रज सरकारने चालविलेला येथल्या शेतकऱ्याचा रक्तशोष हें होय. हा रक्तशोष करण्याचें सर्वांत मोठें साधन म्हणजे सारावाढ हें होय. हिंदुस्थानचा शेतकरी ब्रिटिश राज्याच्या पूर्वकाळीं सुखी होता, संतुष्ट होता; पण इंग्रजांचें राज्य झाल्यापासून त्याची सुस्थिति लोपून तो हळूहळू कर्जबाजारी होऊं लागला व शेवटीं अन्नालाहि महाग झाला.

'शेतकऱ्यांचा कायदा' या लेखांत टिळक लिहितात, "हिंदुस्थानांतील एकुणीसविसांश लोकांचा उदरनिर्वाह परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीने जमिनीवर चालतो, पण जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकरीवर्गास कोण विपन्नावस्था प्राप्त झाली आहे, याचा विचार केला म्हणजे अंगावर काटा उभा राहतो." ( केसरी, २–२–१८९२ ). १८७५ सालीं सावकारांच्या जुलमाला त्रासून त्यांचा सूड घेण्यासाठी शेतकऱ्यांनी दंगा केला. त्या वेळीं एक कमिशन नेमून त्याचा अहवाल हातीं आल्यावर सरकारने 'शेतकऱ्यांचा कायदा' म्हणून प्रसिद्ध असलेला कायदा केला. या वेळीं शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचें मुख्य खापर सावकारांच्या माथीं फोडण्याचा सरकारने प्रयत्न केला. सरकारनेच नेमलेल्या कमिशनने शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचें मुख्य कारण सावकार नसून, सरकारची सारावाढ हें खरें कारण असें सांगितलें होतें; पण सरकारने तें मुळीच मान्य केलें नाही.

त्यानंतर पुढील दहा-पंधरा वर्षांत तो शेतकऱ्यांचा कायदा शेतकऱ्यांना हितावह न ठरतां घातकच होत आहे, असें दिसून आलें. तेव्हा सरकारने पुन्हा

कमिशन नेमलें. याच वेळीं कलकत्त्याच्या स्टेट्समन या पत्राने या विषयावर पांच-सहा लेख लिहून, शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणास सावकार लोक जबाबदार नसून, खरें कारण सरकारचा कडकपणा हेंच आहे, इतकेंच नव्हे तर सावकार लोकांपासून शेतकऱ्यांस पूर्वी जी पुष्कळ प्रकारची मदत मिळत असे तीहि कायदा झाल्यापासून बंद झाल्यामुळे त्यांचे अतिशय हाल होऊं लागले आहेत, असा स्पष्ट अभिप्राय दिला. त्या लेखांचाच सारांश टिळकांनी देऊन आपल्या लोकजागृतीच्या कामास पुन्हा चालना दिली.

## सारावाढ

लो. टिळक कायमधारा पद्धतीचे पुरस्कर्ते होते. त्या पद्धतीने शेतकऱ्याला जमिनीची मशागत करून तिची सुधारणा करण्यास हुरूप येतो. आपण जमिनींत कष्ट केले, तर त्याचें फळ कांही वर्षांनी सारावाढ करून सरकार हिरावून घेईल, असा धसका शेतकऱ्याच्या मनांत राहील तर कष्ट करण्यास त्यास उत्साह वाटणार नाही, हें उघडच आहे; पण इंग्रज सरकारला त्याची पर्वा नव्हती. "हिंदुस्थानला पिळून काढलें पाहिजे", असे लॉर्ड सॅलिसबरी जाहीरपणेंच म्हणाले होते; आणि हिंदुस्थान सरकारने तेंच धोरण ठेविलें होतें. जमिनीचें उत्पन्न वाढलें तर सरकारने थोडा सारा वाढवावा हें ठीक आहे, पण त्याला कांही मर्यादा आहेत. १८७४ आणि १८८४ या दोन सालीं विलायत सरकारने ठराव करून या मर्यादा घालून दिल्या होत्या. कांही ठिकाणीं शे. ३३, कांही ठिकाणीं शे. ६६ व जास्तींत जास्त म्हणजे शे. १०० अशी सारावाढ त्या ठरावांनी मंजूर केली होती. पण १८९९ सालीं हिंदुस्थान सरकारने सर्रास दुप्पट, तिप्पट व कोठे कोठे पांच-सहापट सारावाढ केली. त्यांवरच 'फेरपाहणीचा जुलूम' (केसरी २४–१०–१८९९), या लेखांत टिळकांनी कडक टीका करून 'प्रजेचा संतोष' हेंच ज्या सरकारच्या राज्याच्या बळकटीचें लक्षण आहे, त्याने अन्यायाने, दांडगाईने आपल्या तिजोरीची भर करणें चांगलें नाही, असा इशारा दिला आहे.

## ठिणगी

पण असा इशारा देणारे लोक सरकारला अत्यंत अप्रिय होऊन जात. १८९२ सालीं राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी श्री. ह्यूम यांनी दोन सर्क्युलरें प्रसिद्ध केलीं आणि "हल्ली शेतकऱ्यांची जी स्थिति आहे ती तशीच कायम राहिल्यास लवकरच ते बंड करण्यास उद्युक्त होतील, व एकदा असे दंगेधोपे होऊं लागले म्हणजे त्यांत सरकार, जमीनदार, शिकलेले लोक वगैरे कांहीएक भेदाभेद न होता, सर्वजण सारखेच बळी पडतील", असा इशारा दिला; पण याचा इंग्रज अधिकाऱ्यांना इतका संताप आला की, ह्यूमसाहेब लोकांना बंड करण्यास प्रवृत्त करीत आहेत, असा त्यांच्यावर आरोप करून त्यांना गोळी घालून मारावें, असा ओरडा त्यांनी सुरू केला. आणि हाच विषय घेऊन टिळकांनी, 'हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावें

लागेल काय ?' या नांवाचे दोन लेख केसरींत लिहिले. ( केसरी, ६ व १३ डिसेंबर १८९२) आणि त्यांत " शेतकरी लोक जोंपर्यंत अज्ञान आहेत तोंपर्यंत भीति नाही; पण दारिद्रय व ज्ञान हीं एकत्र झालीं की, ठिणगी पडल्यावांचून राहणार नाही." असें एका इंग्रज पंडिताचें मत उद्धृत करून, तें अगदी यथार्थ आहे, असें स्पष्टपणें लिहून टाकलें, आणि शेवटीं लेखांचा समारोप करतांना, प्रत्येक देशहितचिंतकानें सरकारी अधिकाऱ्यांची किंवा अन्य कोणाची भीडमुरवत न धरतां शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे उपाय वेळीच अवश्यमेव केले पाहिजेत, असें सुशिक्षित हिंदी जनांना बजावलें. ते म्हणतात, "इंग्रजी राज्यावर पुढे केव्हा संकट येणार असेल तर तें उत्तरेकडून किंवा वायव्येकडून येणार नाही; पण सर्व देशांतील प्रजाच अन्नास महाग होऊन दंगा करण्यास प्रवृत्त झाली म्हणजे मात्र वेळ कठीण येणार आहे."

टिळक कोणत्या आगींत उडी घेत होते तें यावरून कळून येईल. जो इशारा दिल्याबद्दल ह्यूमसाहेबास गोळी घालावी, असें इंग्रज अधिकाऱ्यांना वाटलें तोच इशारा टिळक देत होते; व हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांना अप्रत्यक्षपणें बंडास प्रवृत्त करीत होते; आणि सुशिक्षितांनी हेंच कार्य केलें पाहिजे असें त्यांना पढवीत होते.

### सारावंदी

सारावाढीच्या जुलमाविषयी टिळक लेख लिहून थांबले, पण दुष्काळांत होणाऱ्या जुलमाच्या प्रतिकारासाठी त्यांनी प्रत्यक्ष मोहीमच उघडली. दुष्काळ ही हिंदुस्थानांतील नित्याचीच गोष्ट आहे. तेव्हा अशा प्रसंगीं त्याच्या निवारणार्थ कोणती उपाययोजना करावयाची त्यासंबंधी सरकारने कांही नियम घालून दिले, व 'फॅमिन कोड' म्हणून ते प्रसिद्धहि केले. या फॅमिन रिलीफ कोडांत साऱ्याची सूट केव्हा, किती द्यावयाची, तो केव्हा, किती तहकूब ठेवावयाचा, जंगलें केव्हा खुलीं करावयाचीं, दुष्काळी कामावर मजुरी किती द्यावयाचीं, इत्यादि सर्व गोष्टींविषयी नियम बांधून दिलेले होते; पण प्रत्यक्षांत सरकारी अधिकारी दर वेळीं ते नियम वाऱ्यावर उधळून मन मानेल तसा कारभार करीत होते. म्हणून लोकांना जागृत करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक सभेतर्फे चळवळ सुरू केली. प्रथम त्यांनी फॅमिन रिलीफ कोडाचें मराठींत भाषांतर करून त्याच्या हजारो प्रती खेड्यापाड्यांत वांटण्याची व्यवस्था केली; आणि मग अनेक सुशिक्षित तरुणांना दुष्काळी भागांत धाडून शेतकऱ्यांच्या सभा घेऊन सरकार त्यांच्यावर कसा जुलूम करीत आहे, तें समजावून देण्यास प्रारंभ केला. ते तरुण शेतकऱ्यांना जाहीर सभेंत सांगत की, "तुमचीं पिकें बुडालीं आहेत तर तुम्ही सारा देऊं नका. सरकारचा नियमच तसा आहे." अशा सभेला कडेकोट पोलिसबंदोबस्त असे; पण तरीहि निर्भयपणें टिळकांचे कार्यकर्ते मुकत्यार अशीं भाषणें करीत. १३ डिसेंबर १८९६ रोजी उंबरगाव पेट्यांत खत्तलवाड येथे कोळी, वारली, पांढरपेशे अशा लोकांची मोठी जंगी सभा झाली; त्या सभेस महालकरी, पोलिस-फौजदार, असि. कलेक्टर श्री. दुबोले हे सर्व हजर होते. सभेभोवतीं पोलिसांनी बंदुका भरून गराडा दिला होता. तरीहि सार्वजनिक

सभेच्या दुष्काळ कमिटीचे सेक्रेटरी प्रो. साठे यांनी "तुमचीं पिकें बुडालीं असलीं तर तुम्ही सरकारास सारा देऊं नये", असें त्रिवार समजावून सांगितलें. 'पोलिसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यांत भरलेली रयतेची जंगी सभा' असा मथळा देऊन टिळकांनी या प्रतिकाराच्या चळवळीचें वर्णन केलें आहे.

कायदेभंग, करबंदी, बहिष्कार, निःशस्त्र प्रतिकार या पुढच्या सर्व चळवळींची ही खत्तलवाडची सभा म्हणजे नांदीच होती.

हिंदुस्थानचा व्यापार व येथले उद्योगधंदे ठार करणें आणि शेतकऱ्याचा द्रव्यशोष करणें हे हिंदुस्थानचा रक्तशोष करण्याचे इंग्रज सरकारचे दोन मुख्य उपाय होत; पण याशिवाय अनेक मार्गांनी तें परकी सरकार जळवांप्रमाणे हिंदी जनतेचें शोषण करीत होतें. त्या अनेक मार्गांपैकी हुंडणावळीचा दर वाढविणें हा तर राजमार्गच होता. हिंदुस्थानांत नाणें रुप्याचें होतें; पण इंग्लंडला धाडावयाचा पैसा हा सोन्याच्या नाण्यांत धाडावा लागे. तेव्हा पौंडाचा भाव वाढवून इंग्रज सरकार कोटचवधि रुपयांची लूट करीत असे. साम्राज्यविस्तार करण्यासाठी ब्रह्मदेश, अफगाणिस्तान अशा देशांवर इंग्रज सरकार नेहमी स्वाऱ्या करीत असे. त्या स्वाऱ्यांचा सर्व खर्च हिंदुस्थानवर लादणें हा लूटमारीचा आणखी एक मार्ग होय. साम्राज्य ब्रिटिशांचें, खर्च हिंदी जनतेचा ! होमचार्जेस ही तर उघड उघड लूट आहे, असें दादाभाई कंठरवाने अनेक वर्षे सांगत होते. दरसाल वीस-पंचवीस कोटि रुपयांची अशी लूट होत असे. मागे उल्लेखिलेले गुरु गोविंद यांनी अशीच टीका त्या वेळीं केली होती. टिळकांनी त्यांचाच उतारा देऊन हा विषय विशद करून, केसरीच्या दुसऱ्या वर्षीं पुन्हा मांडला आहे.

**शहाणे करोनि . . .**

पारतंत्र्यामुळे अशा या ज्या भयानक आपत्ति येतात त्यांवर उपाय काय ? 'शहाणे करोनि सोडावें सकळ जन !' 'हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे' या लेखांत टिळक म्हणतात, "एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्रावरचा अंमल निघण्यास जिकलेल्या राष्ट्राचें शहाणपण कारण होतें. शहाणपणाच्या मागे सर्व गोष्टी येतात. लोक शहाणे होऊं लागले व त्यांना आपलें हिताहित कळूं लागलें म्हणजे त्यांना धैर्य येतें, कल्पना येते, संपत्ति मिळूं लागते व अखेरीस स्वातंत्र्यहि मिळतें. सर्व मोठेपणाचा पाया शहाणपण होय. जोंपर्यंत जिकलेल्या लोकांस शहाणपण येऊं लागलें नाही तोंपर्यंत त्यांच्या हातून कांही एक व्हावयाचें नाही."

केसरीच्या पहिल्या वर्षीं सांगितलेला हाच विचार 'शेतकरी लोकांस बंड करावें लागेल काय ?' या लेखांत टिळकांनी बारा वर्षांनी पुन्हा सांगितला आहे. त्याचा निर्देश वर आलाच आहे. दारिद्र्य व ज्ञान एकत्र झालीं की, ठिणगी पडते !

यावरून, प्रारंभापासूनच लो. टिळकांचा स्वराज्यप्राप्तीचा मार्ग निश्चित झाला होता, हें दिसून येईल. लोकांना शहाणे करावयाचें, त्यांना आपलें हिताहित सम-

जून द्यावयाचें, त्यांचें शौर्य-धैर्यादि सुप्त गुण जागे करावयाचे आणि मग ठिणगी पाडावयाची. वन्हि तो चेतवावा रे !

### दिव्य दृष्टि

हा मार्ग टिळकांनी आखला यांतच त्यांचें अलौकिकत्व आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत जर्मनी, इटली, जपान, चीन या देशांत तेथील नेत्यांनी राष्ट्रसंघटना केली, स्वातंत्र्याचे लढे केले; पण ते सर्व जमीनदार, सरंजामदार, लष्करी सरदार यांच्या बळावर. लोकशक्तीला आवाहन त्यांनी केलेंच नाही. ती एक महाशक्ति आहे हें त्यांना आकळलेंच नाही. भारतासारख्या मागासलेल्या देशांत, लोकशाहीची पूर्व-परंपरा मुळीच नसलेल्या देशांत, टिळकांनी ही शक्ति जाणली व तिला जागृत करून स्वातंत्र्याचा पाया घातला हेंच त्यांचें असामान्यत्व होय. ते क्रांतदर्शी होते, द्रष्टे होते असा त्यांचा गौरव आज सर्व जगभर होत आहे. त्याची यथार्थता यावरून कळून येईल.

### जगाचें भाग्य

भारत आज लोकायत्त देश झाला आहे; त्याने येथे प्रजासत्ताक शासन स्थापिलें आहे, हें खरोखर जगाचें मोठें भाग्य आहे. सोव्हिएट रशिया व चीन या देशांत गेल्या पन्नास वर्षांत दंडसत्ता स्थापन झाल्या. हिंदुस्थान हा त्यांच्यासारखाच जगांतला तिसरा मोठा देश. तोहि कम्युनिस्ट होऊन दंडायत्त झाला असता, तर जगांतील लोकशाहीचें भवितव्य निश्चित धोक्यांत आलें असतें. तें तसें आलें नाही, लोकशाहीला अजूनहि जगांत प्रतिष्ठा राहिली आहे, याचें श्रेय लो. बाळ गंगाधर टिळक यांना आहे. हिंदुस्थानांत लोकशक्ति जागृत करावयाची आणि येथे लोक-सत्ताक शासन स्थापन करावयाचें हा निर्धार या महापुरुषाने प्रारंभापासून केला होता आणि सतत चाळीस वर्षें तन-मन झिजवून भारतीयांच्या मनांत लोकशास-नाच्या आकांक्षा दृढमूल केल्या. आज जगांत नव्याने प्रस्थापित झालेल्या लोकसत्ता सर्वत्र धडाधड कोसळत असतांना भारतीय लोकसत्ता पंचवीस वर्षें अबाधित टिकून आहे याचें हेंच कारण आहे. हिंदी जनता लोकवादी झाली आहे.

### सार्वलौकिक मत

केसरीच्या दुसऱ्या वर्षाच्या मे महिन्याच्या अंकांतच 'मुत्सद्दी व योद्धा' या लेखांत लोकमान्यांनी भारतांतल्या खऱ्या शक्तीचा निर्देश केला आहे. ते म्हणतात, "इतक्या दिवसांच्या गाढ निद्रेंतून अंमळ डोळे उघडून पाहण्याची मनीषा आम्हांला होऊं लागली आहे; परंतु सार्वलौकिक मत म्हणून जो एक नियामक अद्‌भुत उपाय आहे – ज्याला जुलमी राजे व अहंपणाचा तोरा बाळगणारे मंत्रीहि भितात – तशा प्रकारचें मत आपल्यामध्ये अजून उत्पन्न होऊं लागलें नाही. या गोष्टीला चांगले मुत्सद्दीच देशांत असले पाहिजेत", आणि जुलमी राजांनी भ्यावें असें लोक-मत सिद्ध करण्याच्या प्रयत्नास टिळकांनी तेव्हापासूनच प्रारंभ केला. १९०१ सालीं

शेतकऱ्यांचा जमिनीवरचा हक्क नष्ट करण्याचा प्रस्ताव सरकारने संमत करून घेतला. त्या वेळीं ना. मेथा, सर भालचंद्र, गोखले, खरे इत्यादि कौन्सिलच्या सभासदांनी त्याला कसून विरोध केला होता, व सभात्यागहि केला होता; पण सरकारने त्याची पर्वा केली नाही. त्या वेळीं 'दुराग्रही सरकार व निर्बल लोकमत', 'आमचीं कायदेकौन्सिलें थट्टा आहे काय ?' असे लेख लिहून, आमचें लोकमत निर्बल असल्यामुळेच हें घडूं शकतें, तेव्हा लोकमत प्रभावी केलें पाहिजे, असाच उपदेश टिळकांनी केला. त्या वेळीं त्यांनी सैन्याला, सरदारवर्गाला किंवा दहशतवादी क्रांतिकारकांना चिथावणी दिली नाही. त्या शक्तींना आवाहन केलें नाही. जनशक्ति जागृत नसतांना सैन्य हें सामर्थ्य आहे, असें टिळकांच्या स्वप्नांत सुद्धा आलें नाही. आमचें लोकमत दुर्बल आहे, सरकारवर पगडा बसविण्याचें सामर्थ्य त्याच्यांत नाही, तेव्हा तें लोकमत जागृत केलें पाहिजे हा टिळकांचा महामंत्र होता. त्यानंतरच्या काळांतहि सरकार ज्या ज्या वेळीं अत्यंत जुलमाचें व दडपशाहीचें कृत्य करी त्या त्या वेळीं टिळकांनीं याच शक्तीला आवाहन केलेलें आहे. बंगालच्या फाळणीच्या वेळीं त्यांनी याच शक्तीला उधाण आणून तिला संघटित करण्याचा प्रयत्न केला. "सरकार लाखो लोकांच्या मताला काडीइतकीहि किंमत देत नाही. या गोष्टीचा प्रतिकार करण्याचा कांही मार्ग आम्हीं काढला नाही, तर लोकांचा चळवळीवरचा विश्वास उडून जाईल. तेव्हा हें लोकमत जागृत करणें हें पुढाऱ्यांचें काम आहे. हल्लींचें लोकमत अळणी आहे. त्याचा अळणीपणा कसा घालवावयाचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे."

## नवें राजनीतिशास्त्र

त्या वेळीं राष्ट्रीय सभेंत दोन पक्ष होते. जहाल आणि मवाळ. यांपैकी टिळक हे जहाल पक्षाचे होते. त्या पक्षाचें तत्त्वज्ञान, धोरण व कार्यपद्धति हेंच वरील प्रश्नाला उत्तर होतें. लोकमताचा अळणीपणा कसा घालवावयाचा, या प्रश्नाला तें लोकमत जहाल करून अळणीपणा घालवावयाचा, हें उत्तर लो. टिळकांनी दिलें. आता लोकमत जहाल करावयाचें म्हणजे काय ?

नवें राजनीतिशास्त्र लोकांना शिकवावयाचें. हिंदुस्थानांत हजारो वर्षें अनियंत्रित अशी राजसत्ता होती. राजा हा परमेश्वर आहे, विष्णूचा अवतार आहे, अशी लोकांची श्रद्धा होती. लोक व त्यांचे शास्त्री-पंडितांसारखे नेते इतके नादान झाले होते की, औरंगजेबासारखा जुलमी, अत्याचारी मोगल बादशहाला सुद्धा ते विष्णूचा अवतार मानीत असत. प्राचीन काळीं राजा जुलमी निघाला, तर प्रजेनें त्याला पदच्युत करावें, इतकेंच नव्हे तर ठारहि मारावें, असें धर्मशास्त्र सांगे; पण तें शास्त्र पुढे लोपलें. आणि 'पावसाने झोडलें व राजाने मारलें तर कोठे जायचें ?' असा प्रश्न विचारण्याइतकी ती हीन-दीन व निर्जीव झाली. प्रजेने संघटित होऊन राजसत्तेला नियंत्रण घालावयाचें असतें ही कल्पनाच या देशांतून नाहीशी झाली, आणि लोक 'मुकी बिचारी कुणी हाका,' असे होऊन गेले.

अशा स्थितींत लोकांना नवी पाश्चात्त्य राजनीति शिकवून त्यांना जिवंत करणें, जुलमी राजसत्तेला प्रतिकार करण्याचें धैर्य त्यांच्या ठायीं निर्माण करणें, आणि वाटेल त्या यातना सोसून त्या सत्तेशीं लढा करण्याची त्यांच्या मनाची तयारी करणें हें अवश्य होतें. यालाच पुण्याच्या विठ्ठल मंदिरांतील एका व्याख्यानांत टिळकांनी 'खरें राजकीय नीतिशास्त्र' म्हटलें आहे. ज्या शास्त्राचें पर्यवसान स्वराज्यांत होतें तें खरें राजकीय नीतिशास्त्र होय. ( व्याख्यानें, पृ. २८६ ).

स्वराज्याचें हें राजनीतिशास्त्र लोकमान्यांच्या व्याख्यानांवरूनच आता आपल्याला पाहवयाचें आहे.

## प्रजाहि देवच

राजसत्तेविषयी प्रजेच्या मनांत असणारा पूज्यभाव, आणि त्यांतूनच निर्माण होणारी भीति आणि धसका हा नष्ट करण्यासाठी "राजा देव असेल तर प्रजाहि देवच आहे,' असें टिळकांनी या व्याख्यानांत वारंवार सांगितलें आहे. ते म्हणतात, "राजा देव आहे. हो आहे, नाही कोण म्हणतो ? पण प्रजा कोण ? देवच ! अर्थात् प्रजा-देवाने राज-देवतेचा जुलूम सोसलाच पाहिजे, असें अनुमान यापासून निघत नाही. मनूने राजाला देवता म्हटलें आहे, पण त्यानेच त्याच्या पाठीमागे राजधर्म लावून देऊन, ते धर्म त्याने पाळले नाहीत तर तो नरकांत जाईल, असें स्पष्ट म्हटलें आहे. सारांश, राजा देव आहे असें म्हटलें तरी तेवढ्याने जुलमाचें आणि अन्यायाचें समर्थन होत नाही." (लो. टिळकांचीं व्याख्यानें, पृ. ६, ७). सोलापूरच्या व्याख्यानांत त्यांनी असाच विचार सांगितला आहे. "राजा कांही आकाशांतून पृथ्वीवर पडलेला नाही. तो परस्परांच्या संमतीनेच निर्माण झाला पाहिजे. जो राजा आपल्या प्रजेच्या कल्याणाकरिता झटत नाही तो राजाच नव्हे व जी प्रजा आपलें कर्तव्य बजावीत नाही ती प्रजाहि नव्हे. प्रजेने राजास कर्तव्य करावयास लावावें हीहि पूर्वापारची वहिवाट आहे."

पूर्वीच्या शास्त्रांत राजाचे धर्म सांगितले आहेत, आणि ते न पाळले तर राजा पापी ठरतो, असेंहि म्हटलें आहे. पण 'प्रजाद्रोह' असा शब्द त्या शास्त्राने वापरलेला नाही. टिळकांनी तो शब्द वारंवार वापरला आहे. अकोला येथील व्याख्यानांत ते म्हणतात, "सध्याच्या पीनल-कोडांत प्रजाद्रोहाला शिक्षा सांगितलेली नाही. तरी सर्व राजांचा राजा जो परमेश्वर त्याच्या कोडांत प्रजाद्रोहाबद्दल शिक्षा सांगितलेली असलीच पाहिजे. हा प्रजाद्रोहाचा गुन्हा राजांकडून होत असला म्हणजे प्रजेच्या मनोवृत्ति प्रज्वलित होऊन राजेलोक त्यांत पतंगाप्रमाणे नाश पावतात." (व्याख्यानें, पृ. २५६).

## प्रतिकार

राजा ही देवता असेल; पण ती भ्रष्ट झाली व तिने जर प्रजाद्रोह केला, तर तिचा प्रतिकार करण्याचा प्रजेला हक्क आहे; नव्हे तें तिचें कर्तव्यत्व आहे. तेव्हा

जुलमी राजसत्तेचा प्रतिकार हें नव्या राजनीतीचें दुसरें तत्त्व होय. इंग्रज सरकारनें सभाबंदीचा कायदा केला तेव्हा टिळक म्हणाले, " हा कायदा जुलमी आहे. असा कायदा करण्याचा सरकारला हक्क नाही. मनगटाच्या जोरावर असेल, पण नीतीनें नाही. ईश्वरदत्त वाणीचा हक्क काढून घेण्यास सरकारास हक्क नाही. मी तुम्हांला स्पष्ट सांगतो की, आज वाणीने तर उद्या कृतीने याचा तुम्हांला निषेध करावा लागेल. जो कायदा आपल्याला जुलमी वाटतो तो न मानणें हें प्रजेचें काम आहे." (व्याख्यानें, पृ. ५९), प्रतिकाराची ही राजनीति टिळकांनी जवळ जवळ प्रत्येक व्याख्यानांत सांगितली आहे. सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्यावर तेथेच त्यांचें नंतर व्याख्यान झालें. त्यांत ते म्हणाले, " कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत झालेल्या ठरावाअन्वये आता पुढे काय केलें पाहिजे याचा विचार करण्याकरिता आपण जमलों आहों. सरकार रागावलें तरी आम्ही मागे जाणार नाही. सरकारी अधिकाऱ्यांना खूष करण्याच्या बुद्धीपेक्षा प्रतिकाराची बुद्धि दाखविण्याची, माझ्या मतें, ही वेळ आहे. आपल्याला जो थोडा अग्नि रक्षण करतां येण्यासारखा आहे त्या अग्नीची ज्वाला भडकेपर्यंत तो जळता ठेवण्यासाठी, जिवंत राखण्यासाठी, आपण कांही करूं शकणार नाही काय ? "

## ज्वाला

ठिणगी, अग्नि, ज्वाला ! टिळकांच्या मनांत अखंड एक राजनीतितत्त्व होतें. शेतकरी, कारागीर दरिद्री आहेत, अज्ञ आहेत. त्यांच्या दारिद्र्यांत ठिणगी टाकावयाची, आणि मग ज्या ज्वाला भडकतील त्यांत आमचा रक्तशोष करून दिवाळी साजरी करणाऱ्या इंग्रजी राज्याची होळी करावयाची !

वर निर्देशिलेली अग्नीची ज्वाला सतत जिवंत ठेवण्याचें साधन कोणतें ? 'स्वदेशी आणि बहिष्कार'.

## स्वदेशीचा अर्थ

स्वदेशी म्हणजे स्वदेशांत, हिंदुस्थानांत होणारा कापड, साखर, कागद इत्यादि माल वापरावयाचा आणि बहिष्कार म्हणजे सर्व प्रकारच्या ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावयाचा; पण हे शब्दांचे मूळ अर्थ झाले. टिळकांच्या चळवळींत त्या दोन्ही शब्दांना फार व्यापक अर्थ आले होते. टिळकांच्या मतें हीं दोन्ही राजकीय शस्त्रें होतीं; आणि त्यांचा स्वराज्याशीं अविभाज्य संबंध होता. हिंदी जनतेंत ब्रिटिश राज्याविषयी तीव्र असंतोष चेतवून तिला त्या साम्राज्यसत्तेशीं झुंज घेण्यासाठी सिद्ध करणें हा त्या चळवळीचा हेतु होता. तेव्हा तें एक राजकीय शस्त्र होतें हें उघडच आहे.

अकोला येथील व्याख्यानांत टिळकांनी हा विचार विशद केला आहे. ते म्हणतात, " स्वराज्याच्या साधनत्रयीपैकीच स्वदेशी व बहिष्कार हीं दोन साधनें आहेत. ( तिसरें साधन म्हणजे राष्ट्रीय शिक्षण ), स्वदेशी उद्योगधंद्यांना सरकार उत्तेजन

देत नाही, हें मनुष्यस्वभावास धरूनच आहे. त्यांचें वैभव कमी होईल असा उद्योग ते आम्हांस शिकवितील हें दुर्घट आहे; पण आमच्या हितासाठी आम्हीं उद्योग केला पाहिजे. त्यासाठी स्वदेशी हा मार्ग आहे. स्वदेशी हें ढोंग नव्हे. ज्या देशांतील अन्नाने आमचा पिंड बनला तो देश काय ढोंग आहे ? आर्यभूमि वाट पाहत आहे. तिला मातापिता म्हणून केव्हा ओळखाल याची ती वाट पाहत आहे. "

गुर्लहोसूर येथील व्याख्यानांत त्यांनी सांगितलें की, " स्वदेशी व स्वराज्य कांही भिन्न नाहीत. स्वदेशीचें अंतिम स्वरूप स्वराज्य हें आहे. " यावरून स्वदेशाची चिंता वाहणें त्यासाठी वाटेल त्या त्यागाची सिद्धता करणें हा 'स्वदेशी'चा टिळकांचा अभिप्रेत अर्थ होता हें स्पष्ट होईल. वरील अकोल्याच्या व्याख्यानांत त्यांनी पुढे हेंच स्पष्ट केलें आहे. " आर्यभूमीला माता म्हणून ओळखणें हीच स्वदेशी चळवळ होय. "

## प्रभावी शस्त्र

यानंतर याच व्याख्यानांत त्यांनी 'बहिष्कार' याचा अर्थ स्पष्ट केला आहे. " बहिष्कार हें सामान्य शस्त्र नाही. त्याचा उपयोग कसा करावयाचा हें आपणांस शिकावयाचें आहे. स्वदेशींतच त्याचा उगम होऊन त्यामुळे जें परकीय तें आपोआप बाहेर पडतें. राष्ट्रीय शिक्षणांतच स्वदेशी बहिष्काराचा अंतर्भाव होतो. तिन्हीहि आचरणीय असून स्वातंत्र्यपोषक आहेत. हे उपाय सर्वांस कळावे हा या नवीन चळवळीचा हेतु आहे. "

' जें जें परकीय तें बाहेर टाकणें ' असा बहिष्काराचा व्यापक अर्थ आहे. हिंदुस्थानांत सर्व परकीयच आहे. न्यायखातें, महसूलखातें, पोलिसखातें. . . सर्व खातीं परकीयांच्या सत्तेखाली आहेत. या सर्वांवर बहिष्कार, असा बहिष्काराचा व्यापक अर्थ घेतला तर मग तें केवढें राजकीय शस्त्र आहे हें उमगेल. जानेवारी १९०७ मध्ये ' टेनेट्स ऑफ दि न्यू पार्टी ' या विषयावर टिळकांचें कलकत्त्याला व्याख्यान झालें. त्यांत त्यांनी हा व्यापक अर्थ स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, " आपल्याजवळ शस्त्रें नाहीत, पण त्यांची कांहीच जरूर नाही. त्यापेक्षा फार प्रभावी शस्त्र आपल्याजवळ आहे, आणि तें म्हणजे बहिष्कार हें होय. हें राजकीय शस्त्र आहे. आपण सरकारला महसूल वसूल करण्यांत साह्य करावयाचें नाही. आपल्या सरहद्दीबाहेर लढण्याचें आपण नाकारूं. न्यायखातें चालविण्यास आम्ही साह्य करणार नाही. आम्ही आमचीं न्यायालयें स्थापूं. आणि पुढे वेळ आली की, आम्ही कर देण्याचें बंद करूं. आपल्या संघटित प्रयत्नांनी हें आपल्याला करतां येणार नाही काय ? हें शक्य झालें तर उद्याच्या उद्याच आपण स्वतंत्र होऊं." (रायटिंग्ज अँड स्पीचेस, गणेश अँड कं., मद्रास).

## तुमचेंच राज्य

धुळें, सोलापूर, पंढरपूर, पुणें येथील, ' आमची दुःस्थिति व त्यावर उपाय ', ' आपले शत्रु आपणच ', ' स्वदेशहित कसें साधावें ? ', 'श्रीशिवाजी-उत्सव' या विषयांवरील व्याख्यानांतून टिळकांनी हाच बहिष्कारयोग समजावून सांगितला आहे.

"गुरें फॉरेस्टांत गेलीं म्हणून त्यांना कोंडणारे आम्ही, पाटील आम्ही, कुळकर्णी आम्ही, मामलेदार व इतर अधिकारी आम्ही. आणि इंग्रजांसाठी लढतोहि आम्हीच. तुम्हीच राज्य चालवीत आहा. आपल्या हातांतच स्वराज्य आहे. हें कळावयाचें व तें हातांतल्या हातांत ठेवावयाचें, एवढेंच काय तें. ", " तुम्ही इंग्रज सरकारचें राज्य आपण होऊन चालवीत आहां. तुमच्या हातूनच जुलूम करण्याची हातोटी सरकारास साधली आहे. याकरिता ज्या वेळीं तुम्ही एकजुटीने प्रयत्न कराल त्या वेळीं हें राज्य तुमचेंच आहे. ", " कोणी विचारतील की, मग काय, आम्हीं बंड करावयाचें की काय ? बंडहि करायला नको व स्वस्थहि बसायला नको. हें माझें यास उत्तर आहे. पोलिस कोण आहेत ? मुनसफ कोण असतात ? मामलेदार कोण असतात ? सगळे तुमचेच लोक. असें जर आहे तर सरकारला आपल्या मनासारखें करायला कां लावतां येणार नाही ?"

बहिष्काराचा हा अर्थ आहे. महात्माजींनी पुढे जी चळवळ केली तिच्यांतील करबंदी, कायदेभंग, सत्याग्रह व असहकारिता हीं जीं तत्त्वें तीं सर्व या बहिष्कार-योगांत आलेलीं आहेत. १९०८ सालीं टिळकांना शिक्षा झाली नसती तर ती चळवळ तेव्हाच झाली असती.

### तुरुंग, हद्दपारी

हीं बहिष्कारयोगाचीं तत्त्वें झालीं; पण नुसत्या तत्त्वप्रसारांनी कार्य होत नसतें. नुसता युक्तिवाद उपयोगी पडत नाही. मवाळपक्षाचे लोक पंचवीस वर्षें तो करीतच होते; पण सरकारवर त्याचा कसलाहि परिणाम होत नव्हता. म्हणूनच टिळकांनी नवा पक्ष स्थापिला. ह्या तत्त्वांच्या मागे सामर्थ्य उभे केलें पाहिजे हें ते प्रत्येक व्याख्यानांत सांगत असत. तें सामर्थ्य कोणतें ? देशासाठी हालअपेष्टा सोस-ण्यास सिद्ध असलेली तरुण शक्ति. आत्मबलिदान करण्याचें धैर्य जिच्या ठायीं आहे अशी लोकशक्ति ! दडपशाहीच्या राजनीतीला या राजनीतीने उत्तर देणें अवश्य होतें. टिळक म्हणतात, " देशासाठी अनेक संकटें सोसण्यास आम्ही तयार असलें पाहिजे. रक्तपातशून्य क्रांति हे शब्द आहेत. रणांगणावरील रक्तपाताचा त्यांत समावेश नसला तरी तुरुंग किंवा हद्दपारीची शिक्षा त्यांत येत नाही, असें समजूं नका." ( व्याख्यानें, पृ. ५ ). " ज्या गोष्टी आहेत त्यांची नुसती तात्त्विक समज असून भागत नाही. इच्छेचे मज्जातंतु हातांच्या बोटांत उतरले पाहिजेत. घोटाळा माजला आहे तो काढून टाकण्याकरिता घस सोसावी लागेल. हद्दपार व्हावें लागेल, तुरुंगांत जावें लागेल, तरी तुम्हीं तयार असलें पाहिजे. संकटांनीच तुमचा कस लागणार आहे. तुमचा कस कांही भोजनाच्या ताटावर लागावयाचा नाही." ( व्याख्यानें, पृ. ४५ ). " सरकारने कांही केलें तरी स्वदेशी व बहिष्काराचें व्रत आम्ही पुढे चालविणार असा निश्चय पाहिजे. मला तुरुंगांत पाठविलें किंवा फाशी दिलें तरी बेहेत्तर, असें सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी नुकतेंच जाहीर केलें आहे. शेकडो लोक कैदेंत गेले आहेत,

जात आहेत, लोक हद्दपार झाले आहेत, याने जर तुमचें मन निग्रही बनत नसेल तर तुमची गणना पशूंत करावी लागेल." ( व्याख्यानें पृ. ५१ ).

लोकमान्यांनी प्रवर्तित केलेलें जें नवें राजनीतिशास्त्र त्याचें स्वरूप असें आहे. ज्या शास्त्राचें पर्यवसान स्वराज्यांत होतें ते राजनीतिशास्त्र अशी त्यांनीच त्याची व्याख्या केली आहे. त्याला नवें असें म्हणण्याचें कारण हें की, अशा तऱ्हेचें राजनीति-शास्त्र भारताच्या इतिहासांत कधीहि, कोणींहि सांगितलेलें नव्हतें. सर्व देशासाठी आपण कांही करावयाचें आहे, ती आपली जाबाबदारी आहे, हा विचारच भारताला नवा होता. अखिल देशाच्या उत्कर्षापकर्षाचें चिंतन कोणी करीत नसल्यामुळे औद्योगिक पारतंत्र्य, परदेशीं जाणारा पैसा, सरकारने केलेली लूट याचा कोणीं अभ्यासच कधी केला नव्हता. आणि जुलमाचा, अन्यायाचा प्रतिकार सामान्य-जनांनी संघटित होऊन करावयाचा असतो हें तर कोणाच्या स्वप्नांतहि नव्हतें. आगरकर, टिळक बर्वे-प्रकरणांत तुरुंगांत गेले तेव्हा, हा लष्करच्या भाकरी भाजण्याचा उद्योग यांना कोणीं सांगितला होता ? असा लोकांना प्रश्न पडला होता. विष्णुशास्त्री यांनी त्यावर कडक टीका केल्याचें मागे सांगितलेंच आहे. त्यानंतर पंधरा-सोळा वर्षांनी टिळकांना राजद्रोहाची शिक्षा झाली तेव्हाहि त्यांच्या निकट-वर्तीयांना तसाच प्रश्न पडला होता. हा नसता उद्योग कशासाठी ? राष्ट्रकार्य हा अजूनहि नसता उद्योग वाटावा अशी या देशाची स्थिति होती. तेव्हा बहिष्कार, कायदेभंग, करबंदी, निःशस्त्र प्रतिकार ह्या कल्पना लोकांना किती अपरिचित होत्या हें कळून येईल; आणि असा हा नसता उद्योग हद्दपारी, फाशी पत्करूनहि केला पाहिजे असें राजनीतिशास्त्र टिळकांना सांगावयाचें होतें. या देशांत त्यांना केवढी मानसिक क्रांति घडवावयाची होती हें यावरून ध्यानीं येईल.

या क्रांतीचें जें तत्त्वज्ञान त्यांनी सांगितलें त्याचें विवेचन येथवर केलें. आता संघशक्ति निर्माण करून त्यांनी ती प्रत्यक्षांत कशी घडविली याचा विचार करावयाचा आहे.

- ६ -

# संघशक्तीची उपासना

## संघटित सामर्थ्य

लो. टिळकांना भारतांत लोकसत्ता स्थापावयाची होती; आणि म्हणूनच त्यांना स्वराज्य मिळवावयाचें होतें तें लोकशक्तीच्या बळावर, व त्या शक्तीच्या साह्याने मिळवावयाचें होतें. असें उद्दिष्ट सतत डोळ्यापुढे असल्यामुळेच त्यांनी प्रारंभापासून ही लोकशक्ति जागृत करण्याचे प्रयत्न चालविले होते; पण लोकशक्ति जागृत करणें जितकें अवश्य तितकेंच ती संघटित करणें हेंहि अवश्य असतें, त्यावांचून सर्व प्रयत्न फोल ठरतात, हें लोकसत्तेचें तत्त्वहि त्यांनी जाणलें होतें. आणि म्हणून प्रारंभापासून त्यांनी संघशक्तीची उपासनाहि तितक्याच निष्ठेने चालविली होती.

## मर्मस्थान

प्राचीन काळीं ग्रीसमध्ये अथेन्स या नगरींत लोकसत्ता स्थापन झाली होती. तिचा इतिहास अतिशय गौरवशाली आहे; पण ती लोकसत्ता दीर्घकाल टिकली नाही. कारण अथीनियन लोकांना अभंग असें ऐक्य टिकवितां आलें नाही. लोकसत्तेचें हेंच मर्मस्थान आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य द्यावयाचें आणि तरीहि एकजूट कायम राखावयाची, हें कार्य फार अवघड आहे. जवळ जवळ अशक्य आहे. रोमनांनीहि लोकसत्तेशीं कांही काळ चाळा केला; पण त्यांनाहि लवकरच अनियंत्रित सम्राटांचाच आश्रय करावा लागला. आजपर्यंत दीर्घकालपर्यंत, व्यक्तिस्वातंत्र्य देऊनहि, अभंग ऐक्य टिकविण्यांत जगांत फक्त इंग्लंडला यश आलेलें आहे. त्याच्या खालोखाल अमेरिकेला. बाक़ी पश्चिम युरोपांतील इटली, जर्मनी, फ्रान्स, स्पेन ह्या देशांतील लोकशाहीची कथा ही रडकथाच आहे. त्याचें कारण एकच. ह्या देशांतील

लोकांना व्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकसत्ता यांचा समन्वय साधण्याची कला अवगत झालेली नाही.

## जागृति व संघशक्ति

हा सर्व इतिहास टिळकांच्या डोळ्यासमोर होता. म्हणून ही समन्वय-विद्या हिंदी जनतेला पढविण्याचे त्यांनी यावत्‌शक्य प्रयत्न केले. 'जागृति आणि संघटना, जागृति आणि संघटना' हाच त्यांचा मंत्र होता. १९०२ च्या जानेवारींत केसरीचा एकविसावा वाढदिवस होता. त्या वेळीं एका लेखांत टिळकांनी म्हटलें आहे की, "लोकांत जागृति, व संघशक्ति उत्पन्न करणें हेंच वर्तमानपत्रकार या दृष्टीने आमचें मुख्य कर्तव्य आम्ही समजतों." सतत चाळीस वर्षें हेंच कार्य करीत राहिल्या-मुळे टिळकांना हिंदुस्थानांत लोकशाहीचा पाया घालतां आला. ते भारतांतील लोक-सत्तेचे आद्य प्रणेते ठरतात तें त्यांच्या या असामान्य कार्यामुळेच.

## जुटीच्या अभावीं

केसरीच्या दुसऱ्या वर्षींच टिळकांनी 'जूट' या विषयावर चार लेख लिहून संघशक्तीचें महत्त्व विशद केलें आहे. "आम्हांवर पारतंत्र्यासारखी विपत्ति आली, व इतर अनेक अरिष्टें कोसळलीं त्याचें कारण जुटीचा व स्वाभिमानाचा अभाव हें होय; आणि यापुढे आम्हांत खरी जूट झाली तरच आपल्याला स्वतंत्रता-मंडित देशाचें जूं खांद्यावर घेतां येईल, आणि हिंदु म्हणजे तृण भक्षण न करणारे दोन पायांचे पशु, अशी जी कित्येक पाश्चात्त्यांची समजूत झाली आहे ती दूर होऊन हे भारत-वर्षीय आपल्या बरोबरीचे, किंबहुना काडीभर जास्तच आहेत अशी त्यांची पक्की खात्री होईल." असे विचार पहिल्या दोन लेखांत त्यांनी मांडले आहेत; आणि पुढे जॉन राजापासून इंग्लंडच्या इतिहासाचा मागोवा घेऊन इंग्लिशांना जें असामान्य वैभव प्राप्त झालें तें जुटीमुळेच होय, असें सांगितलें आहे. ते म्हणतात, "त्यांच्यांत तंटे असतात, भांडणें असतात, पण राज्य-प्रकरणीं ते सर्व आपसांतील तंटे गिळून टाकून जुटीने काम चालवितात. देशाच्या व सार्वजनिक कामांत सर्व एक. पण आमच्या इकडे नजर टाकली तर सर्व त्याच्या उलट प्रकार!"

एकजूट, संघटना, राष्ट्रीय एकात्मता यांचें असें अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळेच टिळकांनी काँग्रेस स्थापन झाल्यापासून, एखाद्या पित्याने आपल्या कन्येचें लालनपालन, भरण-पोषण करावें तसें, पस्तीस वर्षें, काँग्रेसचें, राष्ट्रीय सभेचें भरण-पोषण केलें. राष्ट्रीय सभेवांचून हिंदुस्थानला अन्यगति नाही हाच विचार ते लोकांना अखेरपर्यंत सांगत राहिले होते.

## राष्ट्र-मण्यांची माला

१८८५ सालीं पहिली काँग्रेस पुण्याला भरावयाची होती. तेव्हा या कल्पनेचें स्वागत करतांना टिळकांनी म्हटलें की, "पुण्यास लवकरच एक जंगी कॉन्फरन्स म्हणजे सभा होणार आहे. तिचा हेतु असा आहे की, सरकारपासून जे हक्क घ्यावयाचे

त्यांचें संपादन होण्यासाठी जे उपाय योजावयाचे त्यासाठी सर्व हिंदुस्थानभर एक-मेकांच्या साह्याने, एकदिलाने व एकोप्याने परिश्रम चालावे. हा हेतु तडीस गेल्यास ब्रिटिश सरकारच्या अमलाखाली आतापर्यंत संकीर्ण असलेले जे महाराष्ट्र, कानडा, बंगाल, सिंध, मध्यप्रांत, वायव्यप्रांत इत्यादि राष्ट्र-मणि ते अन्योन्यसाधारण अशा कार्यसरांत गुंफिले जाऊन राष्ट्रीय संबंधांत त्यांची एक माला होईल; व असें झाल्यास 'कलौ संघे शक्तिः' या वाक्याची पूर्तता होऊन आमच्या सुधारणेचें पाऊल थोडें जलदीने पडूं लागेल."

## एकराष्ट्रीयत्व

हें पहिल्या कॉंग्रेसविषयी झालें. येथून पुढे राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक अधिवेश-नाच्या वेळीं लोकजागृति व एकराष्ट्रीयत्वाच्या पायावर या जागृत लोकशक्तीची संघटना, हाच मंत्र टिळक देत असत; आणि यासाठी खेड्यापाड्यापर्यंत कॉंग्रेसची चळवळ पसरली पाहिजे, असें आग्रहाने सांगत असत. १८, १०, १८९२ च्या केसरींत त्यांनी लिहिलें आहे की, "राष्ट्रीय सभेंत ऐकमत्य होण्यापूर्वी प्रत्येक प्रांतांत, त्या-पूर्वी प्रत्येक जिल्ह्यांत व त्यापूर्वी प्रत्येक खेड्यांत तें झालें पाहिजे. अशा नैसर्गिक क्रमाने ज्या दिवशीं आमचे प्रयत्न चालू लागतील तेव्हाच आम्ही राजकीय हक्क भोगण्यास पात्र होऊं व सरकारहि आमचें म्हणणें ऐकेल, हें प्रत्येक देशहितचिंतकाने लक्षांत बाळगलें पाहिजे." याच लेखांत ते पुढे म्हणतात, "सामाजिक, औद्योगिक वगैरे कोणतीहि सुधारणा असो, दर वेळीं आपलें राजकीय पारतंत्र्य आड येतें, हा अनुभव सर्वांस आहेच. यासाठीच वेळोवेळीं जाहीर सभा करून, व्याख्यानें देऊन आणि वर्तमानपत्रांतून व पुस्तकरूपाने लेख लिहून लोकमत जागृत केलें पाहिजे."

## मजबूत पाया

अकरावी राष्ट्रीय सभा या लेखांत (केसरी, ६–८–९५) लोकमान्यांनी एक-राष्ट्रीयत्वाचा असाच विचार मांडला आहे. ते म्हणतात, "राष्ट्रीय सभेच्या विस्तीर्ण मंडपांत, बंगाली, मद्रासी, सिंधी, पारशी, मुसलमान आदि करून सर्व जातींचे लोक एकदिलाने व एकचित्ताने राजकीय व राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करतांना ज्यांनी पाहिले असतील त्यांची हिंदुस्थानच्या भावी उदयाचा व ऐक्यतेचा राष्ट्रीय सभा हा एक मजबूत पायाच होय, अशी खात्री होऊन, त्यांचीं मनें आनंदाने भरून गेलीं असतील. आमच्या हिंदुस्थानांत पूर्वी छप्पन्न देश होते असा इतिहास आहे, पण इंग्रज सरकारच्या सार्वभौमत्वाखाली हे छप्पन्न देश मोडून त्यांचा एकजीव अथवा एकराष्ट्र होण्याचा समय आला आहे हें राष्ट्रीय सभेवरून जितकें पूर्णपणें व्यक्त होतें तितकें दुसरें कशावरूनहि व्यक्त होत नाही."

## सर्वांचा एकजीव

राष्ट्रीय सभेच्या कार्याचें महत्त्व विशद करतांना पुढे त्यांनी म्हटलें आहे की; "इंग्रजांच्या राज्यांत सर्व देशभर एकभाषा, सर्वत्र एक कायदा, एक राज्यपद्धति,

दळणवळणाचीं रेल्वेसारखीं साधनें, अशी एकराष्ट्रीयत्वाची पूर्वतयारी सगळी झाली हें खरें; पण सर्वांचा एकजीव होण्यास लोकांचीं मनें एक झालीं पाहिजेत; ही उणीव भरून काढणें हा राष्ट्रीय सभेचा मूळ हेतु आहे. हा साध्य होण्यासाठी हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या, धर्मांच्या व सर्व प्रांतांतल्या लोकांस एकदिलाचें व एकविचाराचें करणें हें राष्ट्रीय सभेचें मुख्य कर्तव्य होय; आणि आज दहा वर्षें जो क्रम चालत आहे तो तसाच आणखी कांही वर्षें चालू राहिल्यास हा हेतु बऱ्याच अंशाने तडीस जाईल अशी राष्ट्रसभेच्या पुरस्कर्त्यांची उमेद आहे."

## रयतेला येऊं द्या

राष्ट्रीय एकतेची जशी टिळकांना चिंता होती तशीच जनतेच्या जागृतीचीहि होती. त्यामुळे शेतकरी, कारागीर हे लोक आता राष्ट्रीय सभेंत आले पाहिजेत, असें प्रतिपादन आठव्या-नवव्या अधिवेशनापासून ते जास्त आग्रहाने करूं लागले. सातारा, कराची अशा ठिकाणीं जेव्हा राष्ट्रीय सभेचीं प्रांतिक अधिवेशनें भरत तेव्हा त्यांचें महत्त्व सांगतांना ते हा विचार मुद्दाम सांगत. लोकजागृतीच्या दृष्टीने प्रांतिक सभेचें महत्त्व त्यांना जास्त वाटे. सातारकरांना मार्गदर्शन करतांना त्यांनी म्हटलें आहे की, "त्यांनी पुढील सालीं कांही तरी विशेष गोष्ट करावी; आणि ती कोणती म्हणाल तर शेतकरी वगैरे लोकांत प्रांतिक सभेबद्दल जागृति उत्पन्न करणें ही होय.... जमिनीचा धारा, जंगल, मीठ, अबकारी वगैरे बाबतींत गरीब रयतेचे हक्क काय आहेत ते त्या रयतेस समजून देण्याच्या उद्योगास आम्ही लागलें पाहिजे...रयतेचीं दुःखें रयतेनेच येऊन सभेंत सांगितलीं पाहिजेत. निदान ज्यांच्या दुःखाबद्दल सरकार-पाशी आम्ही दाद मागतों ते लोक असल्या सभेस हजर तरी असले पाहिजेत." (केसरी, १२ मे १८९६).

## जहाल-मवाळ भेद

लोकजागृतीचा – शेतकरी, कारागीर, तेली, तांबोळी, कोष्टी, साळी, माळी, चांभार, महार ह्यांना आपले हक्क समजावून देऊन त्यांच्यांत प्रतिकारशक्ति निर्माण करण्याचा – टिळकांचा हा जो आग्रह त्यामुळेच मवाळ व जहाल हे दोन पक्ष निर्माण झाले. कारण वर्षांतून चार दिवस एकत्र जमावें, भाषणें करावीं, कायदे-कौन्सिलाचें सभासदत्व, सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा यांविषयी कांही मागण्या कराव्या आणि वर्षभर नंतर आराम करावा, अशीच मवाळांची राष्ट्रीय सभेची कल्पना होती. तन-मन-धन अर्पण करून लोकजागृति करावयाची आहे, हें कोणाच्या स्वप्नांतहि नव्हतें. अलाहाबादच्या 'इंडियन ओपिनियन' पत्राने हें स्पष्टपणें म्हटलें आहे की, हिंदु-स्थानांत राजकीय चळवळीला यश न येण्याचें कारण हेंच की, पुढारी अंग मोडून मेहनत करीत नाहीत. सर्व वेळ कॉंग्रेसला देण्यास कोणीच तयार नव्हतें. उलट जे आरंभीं स्वतंत्र होते त्यांनी – तेलंग, चंदावरकर, तय्यबजी, सुब्रह्मण्य अय्यर, शंकरन् नायर यांनी – सरकारी नोकऱ्या पतकरल्या. उलट दुष्काळांतील साराबंदी, स्वदेशी

आणि बहिष्कार या जहाल मार्गाने टिळक राष्ट्रीय सभेला नेऊं लागले. तेव्हा जहाल व मवाळ हे दोन तट पडणें अपरिहार्य झालें.

## वंगभंगाच्या वेळीं

वंगभंगाच्या चळवळींतून या दोन पक्षांच्या वृत्ति, कार्यपद्धति व राष्ट्रीय चळवळीविषयीचीं धोरणें स्पष्ट झालीं. बंगालच्या फाळणीविरुद्ध लोकमत जागृत करण्यासाठीच स्वदेशी व बहिष्कार ही चळवळ सुरू झाली. यांत एक लक्षणीय गोष्ट अशी की, प्रारंभी ना. गोखले, सुरेंद्रनाथ हे नेमस्त म्हणजे मवाळ पुढारी या चळवळीला अनुकूल होते. सुरेंद्रनाथांनी तर तिचें नेतृत्वच केलें. बनारसच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून गोखले यांनी या चळवळीचें उत्तम समर्थन केलें. "ही चळवळ राष्ट्राच्या इतिहासाला वेगळेंच स्वरूप देणारी अशी गोष्ट होय. या चळवळीने देशांतील वाद हटून पूर्वी कधी झाली नव्हती इतकी एकी पुढाऱ्यांत झाली आहे." असे उद्‌गार त्यांनी काढले. "बंगाली लोकांच्या मागे आम्ही उभे आहोंत, बहिष्कार हें शस्त्र योग्य असून स्वदेशीकरिता लोकांनी झीज सोसली पाहिजे, हिंदुस्थानाला वसाहतीचें स्वराज्य मिळालें पाहिजे.' असेंहि त्यांनी भाषणांत सांगितलें. यांचा अर्थ असा की, गोखले जहाल झाले !" टाइम्स ऑफ इंडिया 'ने दुसऱ्या दिवशीं तशी टीका केलीच. "नेमस्तपणा गोखले यांनी सोडला ही त्यांनी चूक केली" असें तो म्हणाला. दुर्दैव असें की, सर्व नेमस्ताग्रणींना ही चूक झाली असेंच वाटलें; आणि ती दुरुस्त करण्याच्या प्रयत्नास त्यांनी लगेच प्रारंभ केला.

## जीव गुदमरला

वास्तविक वंगभंगामुळे सर्व देशांत व विशेषत: बंगालमध्ये जो सरकारविरुद्ध प्रचंड प्रक्षोभ निर्माण झाला होता त्याच्या लाटेंत सर्व प्रांतांच्या, पंथांच्या, धर्मांच्या लोकांना एकत्र स्नान घडवून सर्वांना राष्ट्रीयत्वाचा मंत्र देण्याचा व अशा रीतीने सर्व भेद नष्ट करून दृढ एकात्मता घडविण्याचा टिळकांचा उद्देश होता. स्वदेशी व बहिष्काराची चळवळ त्यांनी नव्या जोमाने प्रचलित केली ती याच हेतूने. आरंभीं तो हेतु साध्य होत आला होता. ना. गोखले यांनी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून चळवळीला पाठिंबा दिला. सुरेंद्रनाथांनी तिचें प्रत्यक्ष नेतृत्वच केलें; पण त्या महासागरांतील प्रचंड लाटांचें खारें पाणी नाकातोंडांत जातांच नेमस्तांचा जीव गुदमरला आणि ते भराभर बाहेर पडूं लागले. राष्ट्रीय सभेलाहि या लाटेंतून मागे खेचण्याचा त्यांनी निश्चय केला होता. त्यासाठी टिळक व लजपतराय यांना पुढच्या सालच्या कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष न करतां, त्यांनी दादाभाईंना पाचारण केलें; पण दादाभाईंनीच त्यांना दगा दिला. त्यांनी स्वदेशी-बहिष्काराचें समर्थन तर केलेंच, पण शिवाय स्वराज्य-मंत्राची दीक्षा दिली. यामुळे राष्ट्रीय सभा एकदम 'केसरी'च्या म्हणजे 'जहालां'च्या हातीं गेली. कलकत्त्याच्या इंग्लिशमन पत्राने म्हणून टाकलें, "यंदाची राष्ट्रीय सभा सर्वतोपरी जहाल पक्षाच्या हातीं गेली

स्वराज्याचा प्रश्न लोकांपुढे प्राधान्याने मांडून दादाभाईंनी राष्ट्रीय सभेस जहाल करून सोडलें."

स्वदेशी-बहिष्कारराच्या चळवळीच्या लाटेंतून राष्ट्रीय सभेला बाहेर काढण्यांत कलकत्त्याला नेमस्तांना यश आलें नाही. तरी त्यांनी आपले प्रयत्न सोडले नाहीत; आणि रासबिहारींना अध्यक्ष करून तोच डाव पुन्हा सुरतेला त्यांनी टाकला; आणि त्यामुळेच तेथे राष्ट्रीय सभेचें ऐक्य भंगलें. तिच्यांत दोन फळचा झाल्या.

## मी तडजोडवादी

या वेळीं मवाळांशीं समेट करावा, राष्ट्रीय सभा भंगूं नये म्हणून टिळकांनी फार प्रयत्न केले. सभेच्या अधिवेशनाच्या आधी दोन दिवस स्वत: टिळक, लजपतराय, खापर्डे हे सुरेंद्रनाथ, मालवीय इत्यादि नेमस्ताग्रणींकडे हेलपाटे घालीत होते; पण त्यांनी या नेत्यांशीं अपमानास्पद वर्तन केलें. त्यामुळे टिळकांनी असला अपमान सोसून पुन्हा मवाळांच्याकडे खेटे घालूं नयेत, असें त्यांच्या जहाल पक्षाच्या अनुयायांना वाटत होतें. त्यांच्यापैकी 'महाराष्ट्रा'चे संपादक श्री. ओगले हा विचार टिळकांना सांगण्यासाठी त्यांच्याकडे गेलेहि, पण टिळकांनी त्यांना सांगितलें की, "समेट होत असेल तर हजार वेळा अपमान सोसण्यास मी तयार आहें. मी कांही स्वत:साठी समेटाची याचना करीत नाही. देशाचें काम आहे, आणि आपलें खरें भांडण सरकारशीं आहे, मवाळांशीं नाही. त्यांच्याशीं भांडतांना शक्य तितकें ताणूं, पण तुटेपर्यंत ताणण्यांत अर्थ नाही. मी तडजोडवादी आहें हें लक्षांत ठेवा." (आठवणी, खंड २, पृ. ३२४).

## ऐक्यासाठी मानहानि

पण टिळकांनी कलकत्त्याला नव्या राष्ट्रीय पक्षाची स्थापना करून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य हीं जीं पक्षाचीं चार मुख्य तत्त्वें म्हणून सांगितलीं होतीं त्यांतलें एकहि मवाळांना मान्य करणें शक्य नव्हतें. म्हणून तडजोड होऊं शकली नाही. पुढे कॉंग्रेसच्या अधिवेशनांत दुफळी झाल्यानंतरहि मोतिलाल घोष यांनी पुन्हा समेटाचा प्रयत्न केला. ती वेळ तर टिळकांच्या कसोटीची होती. मोतिलाल म्हणत होते, "तुम्हीं कॉंग्रेस मोडली, ऐक्यभंगाला तुम्ही कारण झाला, असें मवाळ म्हणत आहेत, तें तुम्हीं मान्य केलेंत, तसें लिहून सही करून दिलीत, तर समेटाला मवाळ तयार आहेत. मला माहीत आहे की, त्यांचें म्हणणें खरें नाही, पण ऐक्य टिकविण्यासाठी तुम्हीं हें करावें, असा माझा आग्रह आहे." या वेळीं राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनी या सूचनेला तीव्र विरोध केला; पण टिळकांनी मोतिलालांचा आग्रह मानला व तसें लेखी लिहून दिलें. मोतिलाल म्हणतात, "या त्यागाला, या मनोधैर्याला तोड नाही. देशासाठी केवढी मानहानि त्या पुरुषाने पत्करली ! ही उदात्तता असामान्य आहे." (ए स्टेप इन दि स्टीमर, प्रस्तावना, पृ. ९).

## मवाळांचा अस्त

पण या उदात्ततेचा कांही उपयोग झाला नाही. कारण ब्रिटिश सरकारला विरोध करणें, त्याच्या विरुद्ध प्रतिकाराची मोहीम उघडणें हें मवाळांना स्वप्नांतहि मान्य होण्याजोगें नव्हतें. त्या वेळीं नव्हतें आणि पुढेहि केव्हा मान्य झालें नसतें. लो. टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्यांनी राष्ट्रीय पक्षाचें वर्चस्व तेथे प्रस्थापित केलें. त्या वेळीं त्यांनी होमरूलची चळवळहि सुरू केली होती. त्या वेळीं श्रीनिवास शास्त्री, सुब्रह्मण्य अय्यर अशा कांही नेमस्तांनी तिला कांही काळ पाठिंबा दिला. पण लढा, संघर्ष, प्रतिकार, त्याग, आत्मार्पण, हा विचार त्यांना झेपण्याजोगा नव्हता. आणि टिळकांच्या चळवळीचा तोच आत्मा होता. त्यामुळे १९१७ नंतर नेमस्त-नेते लवकरच काँग्रेसमधून बाहेर पडले व अस्त पावले.

यांत सर्वांत दुःखद कथा सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांची आहे. वास्तविक कायदेभंगाच्या चळवळीस त्यांनीच प्रारंभ केला होता; पण १९२५ सालीं लिहिलेल्या आत्मचरित्रांत, "आम्ही सनदशीर मार्ग सोडून रेसभरहि कधी गेलों नाही", असें म्हणून त्यांनी बहिष्कारयोगाचा निषेध केला. आणि "ब्रिटिशांचें मन आता उदार झालें आहे, तेव्हा सनदशीर मार्ग सोडून रेखामात्रहि तुम्ही जाऊं नका", असा आपल्या देशबांधवांना त्यांनी अखेरचा संदेश दिला.

## काँग्रेस अभंग

मवाळांशीं तडजोड होऊन १९०७ सालीं काँग्रेस अभंग राहिली असती तरी, हळूहळू टिळकांनी राष्ट्रीय पक्षाचा प्रभाव तेथे प्रस्थापित करून बहुमताच्या जोरावर राष्ट्रीय सभेला ( काँग्रेसला ) बहिष्कारयोगाच्या मार्गावर निश्चितच आणली असती. आणि तेंच त्यांनी १९१६ सालीं केलें. त्या वेळीं प्रथम काँग्रेसच्या मवाळांनी ठरविलेल्या प्रतिज्ञापत्रकावर सही करून त्यांनी आंत प्रवेश केला, आणि मग आपलें बहुमत करून काँग्रेसलाच होमरूलच्या चळवळींत ओढलें. हा खटाटोप यासाठीच होता की, काँग्रेस फुटूं नये. सर्व देशाची ही एकमेवाद्वितीय संस्था होती. ती अभंग राखली पाहिजे अशी टिळकांची प्रतिज्ञा होती. कारण लोकमत कितीहि जागृत झालें तरी तें जोंपर्यंत संघटित होत नाही तोंपर्यंत तें सरकारला विरोध करण्याइतकें समर्थ होऊं शकत नाही हें त्यांना दिसतच होतें. त्यामुळे १९०७ सालीं व पुन्हा १९१५ सालीं आपली निराळी काँग्रेस काढावी असा राष्ट्रीय पक्षांतील त्यांच्या अनुयायांचा आग्रह असूनहि तो त्यांनी मानला नाही व काँग्रसचें अद्वितीयत्व कायम राखलें.

कारण काँग्रेस ही इंग्लिश पार्लमेंटसारखी आहे, असें त्यांचें मत होतें, त्या पार्लमेंटांत अनेक पक्ष असतात. कधी या पक्षाचें बहुमत होतें कधी त्या पक्षांचें; पण त्यामुळे पार्लमेंट कोणी सोडून देत नाही. तीच दृष्टि काँग्रेसविषयी ठेवून आपण ती संस्था रक्षिली पाहिजे, असें त्यांचें ठाम धोरण होतें, आणि तें शेवटपर्यंत संभाळून त्यांनी काँग्रेसचा संभाळ केला. आज भारताला जें वैभव प्राप्त झालें आहे, जगांतल्या

सर्व नवोदित लोकसत्ता धडाधड कोसळून पडत असतांना भारतीय लोकसत्ता अजूनहि एक प्रबळ पक्ष टिकवूं शकत आहे, याचें सर्व श्रेय टिळकांनी वाणीने, आचरणाने व त्याग-बुद्धीने भारतीयांच्या मनावर जे संस्कार केले त्याला आहे.

## आम्ही होमरूलर

१९०५ ते १९०८ या तीन वर्षांत स्वदेशी व बहिष्कार ही चळवळ टिळकांनी जशी जागृति व संघशक्ति या तत्त्वांवर चालविली होती तशीच १९१६ ते १९२० ह्या चार वर्षांत होमरूलचीहि चळवळ जागृति व संघशक्ति याच तत्त्वांवर चालविली होती. २८ एप्रिल १९१६ या दिवशीं बेळगावला होमरूललीगची रीतसर स्थापना झाली. ॲनी बेझंट यांनी मद्रासला आधीच स्वतंत्रपणें होमरूल लीगची स्थापना केलीच होती. त्यामुळे आता फिरून जोमाने लोकशिक्षणाच्या व जागृतीच्या कार्यास प्रारंभ झाला. त्याचे परिणामहि लगेच दिसूं लागले. बेझंटबाईंच्या 'न्यू इंडिया' पत्राकडून सरकारने जामीन घेतला व तीन महिन्यांच्या आंत ती रक्कम जप्तहि केली; शिवाय त्यांच्यावर मुंबई प्रांतांत येण्याची बंदी घालण्यांत आली. लो. टिळकांवरहि राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. त्यांचीं बेळगाव व अहमदनगर येथील भाषणें सरकारला फार आक्षेपार्ह वाटलीं. सरकारविषयी त्यामुळे अप्रीति व द्वेष निर्माण होतो, व हा राजद्रोह आहे, असा आरोप त्यांच्यावर होता; पण हायकोर्टाने टिळकांना ह्या सर्व आरोपांतून मुक्त केलें.

या सर्वांमुळे लोक अधिकाधिक निर्भय होत चालले. पुढे बेझंटबाईंना अटक झाल्यावर चळवळीला अधिक जोम चढून तिला सत्याग्रहाचें रूप आलें. स्वराज्याची मागणी बेकायदेशीर असेल तर आम्ही ती करीत आहों व होईल ती शिक्षा भोगण्यास तयार आहों, असें लोक जाहीर सभा भरवून सांगूं लागले व जिल्ह्याजिल्ह्यांतून तशीं पत्रकें स्वराज्य संघाकडे धाडूं लागले. आश्चर्याची गोष्ट अशी की, सर सुब्रह्मण्य अय्यर, सुरेंद्रनाथ, बॅ. जीना, यांसारखे मवाळहि आपण स्वराज्यावादी असल्याचें जाहीर करून पत्रकावर सह्या करूं लागले. अलाहाबादचे सी. वाय्. चिंतामणि हे तर स्वराज्य संघाचे स्वतः सभासद झाले व कॉंग्रेस-भक्तांनाहि त्यांनी तशी विनंती केली; आणि अशांतच १९१६ सालच्या डिसेंबरमध्ये लखनौला कॉंग्रेसचें अधिवेशन झालें आणि सर्व राष्ट्र एकमुखाने स्वराज्याची मागणी करीत आहे, असें अद्भुत दृश्य तेथे दिसून आलें.

## लखनौ

कॉंग्रेस सर्व धर्मांची, सर्व पक्षांची, सर्व जातींची—सर्वांची—आहे असें टिळक प्रथमपासून सांगत होते. लखनौला त्यांचें हें म्हणणें साकार झालें. मुस्लिम लीगनेहि स्वराज्याच्या मागणीला पाठिंबा दिला. बहुतेक सर्व मवाळ पुढाऱ्यांनी ती मागणी उचलून धरली. ब्राह्मणेतरहि बहुसंख्येने सामील झाले, आणि सर्वांनुमते मंजूर झालेली

योजना सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी सभेंत मांडली. अशा रीतीने टिळकांनी केलेल्या परिश्रमांचें जीज होऊन लोकशक्ति जागृत झाली व संघटितहि झाली.

## मुकुटधारण-विधि

यामुळे कृतार्थता वाटून लो. टिळकांनी केसरींत पुढच्या आठवड्यांत लेख लिहिला. ते म्हणतात, "शुक्रवार, २९ डिसेंबर १९१६ हा दिवस हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत निदान – ब्रिटिश रियासतीच्या इतिहासांत – सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा उगवला याविषयी शंका नाही. कारण त्या दिवशीं हिंदी स्वराज्याचें निशाण लखनौ येथे गोमती नदीच्या तीरावर रोवलें गेलें. . . शुक्रवारचा ठराव म्हणजे हिंदुस्थानच्या राष्ट्रीय आकांक्षेने केलेला मुकुटधारण-विधीच होय ! या समारंभाला तिची सर्व प्रजा आपापला नजराणा घेऊन हजर होती. हिंदुस्थानांतील असा एकहि वर्ग नसेल की, ज्याचे प्रतिनिधि या समारंभास आले नव्हते. जातिभेद, मतवैचित्र्य, व्यक्तिद्वेष वगैरे राष्ट्रीय-कार्योच्छेदक पिशाचांनीहि गोमतीच्या प्रवाहांत गति घेतली व नवीन शुभदेह धारण करून समारंभास मंगल आशीर्वादच दिला... आपलें राजकीय हृद्‌गत हुडकून काढण्याला या राष्ट्राला पांच-पन्नास वर्षें लागलीं खरीं, पण तें हृद्‌गत त्याचें त्याला आता कळून आलें. आणि गेल्या शुक्रवारीं सर्व राष्ट्राने एकमुखाने त्याचा एवढा मोठा उच्चार केला की, त्याचा आवाज जगभर पसरला. आता त्याला त्याचा विसर पडणें शक्यच नाही; आणि त्याच्या हातून पुढे जो उद्योग होणार तो हें हृद्‌गत सफल होण्याकरिताच होईल यांत शंका नाही."

तीस वर्षांनी, मध्यंतरीं अनेक व्याघात आले तरी, टिळकांची ही भविष्यवाणी खरी ठरली.

पण त्यानंतरच्या पंचवीस वर्षांत राष्ट्रीय दृष्टीचा लोप होत चालला आहे. जातिभेद, मतवैचित्र्य, व्यक्तिद्वेष, इत्यादि राष्ट्रीय-कार्योच्छेदक पिशाचें पुन्हा जोर करून उठलीं आहेत. या वेळीं एवढेंच म्हणावेंसें वाटतें की –

'लोकमान्यांचें आठवावें रूप'

नाही तर प्राचीन ग्रीस, रोम या लोकसत्ता ज्या मार्गाने गेल्या, सध्याच्या नवोदित लोकसत्ता ज्या मार्गाने चालल्या आहेत, त्याच विनाशाच्या मार्गाने भारतीय लोकसत्तेला जावें लागेल. त्यामुळे त्या लोकसत्तेच्या आद्य प्रणेत्याच्या अंतरात्म्याला फार क्लेश होतील.

- ७ -

# टिळकांचें राष्ट्रीय अर्थशास्त्र

लो. टिळकांच्या आर्थिक धोरणाचा व तत्त्वांचा आता विचार करावयाचा आहे. त्यांतील एका सिद्धान्ताचा मागल्या एका प्रकरणांत आपण विचार केला. इंग्रज सरकार या देशाचा रक्तशोष करीत आहे, लूट करीत आहे, येथला व्यापार व उद्योग नष्ट करून त्याला आपला व्यापार व उद्योग वाढवावयाचा आहे, आणि म्हणून नाना प्रकारचे जुलमी कायदे करून तें सरकार आमचे सर्व उद्योगधंदे ठार मारीत आहे, हा टिळकांचा पहिला सिद्धान्त होता; आणि या औद्योगिक पारतंत्र्यांतून आपण स्वराज्य प्राप्त झाल्यावांचून मुक्त होणार नाही, असा निष्कर्ष त्यांनी काढला होता. त्यांच्या सर्व राजनीति-शास्त्राचा हा पाया होता.

## दुहेरी मार्ग

या नीतिशास्त्राचें प्रतिपादन करतांनाच एका बाजूला आपल्या उद्योगधंद्यांचा, कारागिरीचा, व्यापाराचा व शेतीचा विकास झाला पाहिजे, असें ते सांगत; आणि या विकसित होणाऱ्या उद्योगधंद्यांच्या संरक्षणासाठी आपण स्वदेशी बहिष्काराचा अवलंब केला पाहिजे, असें दुसऱ्या बाजूने सांगत. औद्योगिक पारतंत्र्य नष्ट करावयाचें; आणि स्वराज्यप्राप्ति करून घ्यावयाची यासाठी हा दुहेरी मार्ग त्यांनी दाखवून दिला होता. किंवा या एकाच मार्गाच्या दोन बाजू होत्या, असेंहि म्हटलें तरी चालेल.

## आक्षेप

या मार्गाचें स्वरूप वर्णितांना त्यांनी हिंदी भांडवलदारांचा पक्ष घेऊन, ब्रिटिश भांडवलदारांवर, मँचेस्टरच्या गिरणीवाल्यांवर अनेक वेळा टीका केली. मँचेस्टरवाले त्यांच्या मालावरची जकात हिंदुस्थान सरकारकडून कमी करून घेत, येथल्या

कामगारांच्या कामाचे तास कमी झाले पाहिजेत, असा आग्रह धरीत; आणि हें सर्व हिंदी जनतेला माल स्वस्त मिळावा व कामगारांचे हाल वांचावे म्हणून आम्ही करीत आहों, असें सांगत. टिळकांनी याच संदर्भात त्यांच्यावर मार्जार-साधु, बक-ध्यानी अशी टीका केली, हें मागे सांगितलेंच आहे; पण यामुळेच ते भांडवलदारांचे पक्षपाती आहेत, कामगारांच्या हिताची त्यांना चिंता नाही, असा त्यांच्यावर आक्षेप आला होता. सावकार, खोत, जमीनदार यांच्या बाबतींतहि असेंच झालें. सावकार हे शेतकऱ्यांना नागवितात, लुबाडतात, त्यामुळे शेतकरी दरिद्री झाला आहे असा प्रचार ब्रिटिश सरकार अखंड करीत राहिलें होतें. त्यावरहि टिळकांनी वेळोवेळीं कडक टीका केली. त्यामुळे ते सावकार, जमीनदार यांचा शेतकऱ्यांविरुद्ध पक्ष घेतात असाहि त्यांच्यावर आक्षेप येत असे. अजूनहि येतो. यासाठीच टिळकांच्या अर्थ-शास्त्रीय तत्त्वांचा परिचय करून घेऊन वरील प्रकारच्या आक्षेपांत कितपत तथ्य आहे, हें पाहणें अवश्य आहे

'दत्तकाची आवश्यकता' या विषयावर केसरीच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षा-च्या अंकांमिळून एकंदर आठ लेख टिळकांनी लिहिले आहेत. (केसरींतील निवडक निबंध, पहिलें पुस्तक, पृ. ४८–७४). त्यांत अत्यंत मूलगामी असे अर्थशास्त्रीय विचार त्यांनी सांगितलेले आहेत.

### दत्तक अनावश्यक

टिळकांच्या मतें दत्तक घेण्याची आवश्यकता मुळीच नाही. त्या रूढीमुळे समा-जाचें फार नुकसान होत आहे. आज रूढ असलेलें दत्तकपुत्राचें सर्व शास्त्र स्मृतींनी सांगितलें आहे. वेदकाळीं तसें शास्त्र नव्हतें. मेल्यानंतर स्वर्गप्राप्ति व्हावी व आपल्या-मागे आपलें नांव चालावें ह्या दोन हेतूंनी मनुष्य दत्तक घेतो. जुन्या धर्मशास्त्रानेहि याच हेतूंनी दत्तकाची आवश्यकता सांगितली आहे; पण त्याच धर्मशास्त्राचें सवि-स्तर विवेचन करून टिळकांनी असें दाखवून दिलें आहे की, हे दोन्ही हेतु साध्य होण्यासाठी त्या जुन्या धर्मशास्त्रानेच इतर अनेक मार्ग सांगितले आहेत. तेव्हा दत्तक घेण्याची आजच्या समाजांत तर मुळीच जरूर नाही.

हा धर्मशास्त्रीय विचार प्रथम सांगून मग अर्थशास्त्राच्या दृष्टीने दत्तकाची रूढि कशी अनिष्ट व समाजाला अहितकारक आहे तें सांगितलें आहे. तें सांगतांना आजचे सर्व समाजवादी विचार टिळकांनी त्या लेखांत मांडलेले आहेत; आणि पुढे व्यवहारदृष्ट्याहि त्यांची युक्तायुक्तता तपासली आहे. टिळकांचें प्रतिपादन असें आहे :–

अगदी प्राथमिक अवस्थेंत समाज भटक्या स्थितींत असतो. शेतीची त्याला माहिती नसते. कंदमुळांवर तो निर्वाह करीत असतो. अशा स्थितींत कोणत्याहि प्रकारचा धनसंचय करणें त्याला शक्य नसतें. पुढे शेती, पशुपालन, कारागिरी यांची माहिती झाल्यावर समाज स्थिर होतो, कुटुंबसंस्था दृढमूल होते; आणि मग त्या

वेळीं मनुष्य धनसंचय करूं शकतो. या वेळीं समाज राजसत्ता स्थापून, अनेक कायदे करून, आणि सैन्य व पोलिस-दलें उभारून समाजाचें, त्यांतील कुटुंबांचें, त्यांतील मनुष्यांचें, त्यांच्या घरादारांचें, जमिनीचें, पशुधनाचें एकंदर जीवित-वित्ताचें रक्षण करतो; आणि मनुष्याला धनसंचय करून त्याचें रक्षण करणें हें समाजाने केलेल्या या व्यवस्थेमुळेच शक्य होतें.

### धनावरील हक्क ?

आता धनाचें अर्जन आणि संचित धनाचें रक्षण हें जर समाजामुळे शक्य होतें तर त्या संचित धनावर समाजाचा कांही प्रमाणांत तरी हक्क असला पाहिजे हें उघड आहे. द्रव्यसंचय होतो, तो समाजाच्या मदतीने होतो. तेव्हा त्या द्रव्याचा: व्यय योग्य रीतीने कसा करावा हें समाजाने सांगावें व लोकांनी तें पाळावें हें न्यायता प्राप्त होतें; आणि हा न्याय मान्य केला तर अर्थशास्त्रदृष्टचा प्रत्येक मनुष्याचा आपल्या स्वकष्टार्जित द्रव्यावरहि फारच कमी हक्क आहे असें दिसेल. 'वसुधैव कुटुंबकम्' या उदार दृष्टीने पाहतां समाजाची अति उत्कर्षावस्था म्हटली म्हणजे व्यक्तिमात्रास सारखें काम व सारखें सुख असावें, ही होय. व असें होण्यास सुख-प्राप्तीचें साधन जें द्रव्य तें समाजांत एकतर सारखें वांटून गेलें पाहिजे किंवा एकत्र असल्यास समाजाच्या सामायिक ताब्यांत असलें पाहिजे. एरव्ही सर्वांस सारखें सुख कधी प्राप्त होणार नाही. (केसरींतील निवडक निबंध, पुस्तक १ लें, पृ. ६३, ६४).

पण ही अति उत्कर्षावस्था म्हणजे आदर्श ध्येयवादी अवस्था झाली. सर्व-समाजहितांतच आपलें हित आहे, ही वृत्ति प्रत्येक मनुष्याची होईल तेव्हा ती शक्य आहे; पण मनुष्यस्वभाव असा नसतो. मी व माझें यापलीकडे तो पाहत नाही. म्हणूनच प्रत्येक मनुष्याने स्वकष्टाने मिळविलेल्या धनावर त्याचें संपूर्ण स्वामित्व समाजाने मान्य केलें आहे. तसें केल्यावांचून मनुष्याला उद्योगाला, कष्टाला प्रेरणाच मिळणार नाही. याच कारणामुळे मनुष्याने स्वकष्टार्जित सर्व धन आपल्या पुत्रांना, आप्तांना द्यावें हा त्याचा हक्कहि समाजाने मान्य केला आहे. पुत्र-कन्या यांच्या प्रेमामुळेच मनुष्य कष्ट करण्यास प्रवृत्त होतो व मिळविलेल्या द्रव्याचा संचय करण्याची त्यास बुद्धि होते.

### समाजाला वांटा द्या

पण मनुष्याचा स्वार्जित धनावर असा पूर्ण हक्क मान्य केल्यामुळेच समाजांत विषमता निर्माण होते. कांही लोक अति श्रीमंत होतात व कांहींना दिवसभर कष्ट करूनहि पोटास मिळत नाही. ही स्थिति समाजाच्या दृष्टीने श्रेयस्कर नाही. म्हणून स्वार्जित धनाचा वांटा समाजाला मिळवून देण्याचे अनेक मार्ग आपण अवलंबिले पाहिजेत.

दत्तकाची रूढि नष्ट करणें हा तसाच एक मार्ग आहे. पुत्रांना मनुष्याने धन ठेवणें हें युक्त आहे. पण पुत्र नसतांना कोणा तरी सोम्यागोम्याला दत्तक घेऊन,

त्याला तें संचित धन विनाकष्ट प्राप्त करून देणें, हा समाजावर अन्याय आहे. दत्तकाचा प्रघात पडल्याने आज लाखो रुपये लोकोपयोगाकडे न लागतां, श्रम केल्या वांचून कांही लोक त्यांचा यथेच्छ उपभोग घेत आहेत. यांत समाजाचें फार नुकसान आहे. सारांश, अर्थशास्त्रदृष्टया पाहिलें, तर स्वार्जित धनावर मनुष्याला पूर्ण हक्क दिल्यामुळे समाजांत जी आर्थिक विषमता निर्माण होते, ती मोडून टाकण्याची संधि या दत्तकाच्या रूढीमुळे नाहीशी होते. ( पृ. ६६, ७० ).

## समाजवादी अर्थशास्त्र

दत्तकाविषयी यापुढे आणखी कांही विवेचन टिळकांनी केलें आहे. पण आपल्या विषयाच्या दृष्टीने तें अप्रस्तुत आहे. आपल्याला लक्षणीय आहेत तीं त्यांचीं संपत्तीच्या विभजनासंबंधीचीं मतें. मनुष्य धनसंचय करूं शकतो, तो समाजाच्या मदतीमुळे. म्हणून त्याच्या संचयावर समाजाचा बराच हक्क असतो. आता त्याची उद्योगप्रेरणा नष्ट होऊं नये म्हणून त्याचें स्वामित्व समाज मान्य करतो व अर्जित धन पुत्रांना ठेवण्याचा त्याचा हक्कहि युक्त मानतो; पण या मर्यादा संपल्यावर त्या धनाचा वाटेल तो उपयोग करण्याचें स्वातंत्र्य त्याला आहे, असें मात्र नाही. हें व्यावहारिक अर्थशास्त्र झालें; पण आदर्श व्यवस्था कोणती म्हणून विचार करतां, व्यक्तिमात्रास सारखें काम व सारखें सुख असलें पाहिजे; आणि यासाठी सर्वांना सारखें धन वांटून दिलें पाहिजे – ही उत्कृष्टावस्था होय, असें लो. टिळकांचें उत्तर आहे.

केसरीच्या दुसऱ्या-तिसऱ्या वर्षांत, 'समाइकीने उभारलेल्या भांडवलाचे कारखाने' या विषयावर दोन लेख आले आहेत. त्यांत गिरण्या-कारखान्यांच्या भांडवलांत कामगारांचेहि भाग असावे, त्याचे पैसे त्यांच्याकडून सवलतीने घ्यावे, त्यांना शक्य नसेल तर प्रथम त्यांच्या भागाचे पैसे उत्पादकांनी घालावे व मग ते हळूहळू वसूल करून घ्यावे, असें सांगितलें आहे. यांत हेतु असा की, "कामगारांचा कारखान्याच्या नफ्यांत वांटा असला पाहिजे." या रीतीने मेहनतीबद्दल रोजमुरा मिळून नफ्यापैकी कांही भाग सालअखेरीस मिळण्याची खात्री झाल्यामुळे कारखान्याचा नफा करण्याकडे सर्व लोकांचा एकदिल लागतो. आणि या व्यवस्थेने कष्टकरी जनतेची स्थिति सुधारते. आणि या समाजाची स्थिति सुधारल्याखेरीज देशस्थिति सुधारली असें कधीहि म्हणतां येणार नाही. (पुस्तक २ रें, पृ. ४६ ते ४९).

लो. टिळकांचे अर्थशास्त्रीय सिद्धान्त काय होते हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. त्यांच्या राजनीतीचा किंवा अर्थकारणाचा विचार करतांना हे त्यांचे सिद्धान्त कधीहि दृष्टीआड होऊं देता कामा नये. येथे जें विवेचन आता करावयाचें आहे तें त्यांचीं हीं तत्त्वें मनांत वागवूनच करावयाचें आहे.

## कारखानदारीची वाढ

या देशाचें दारिद्र्य नष्ट व्हावयाचें तर येथे भांडवली पद्धतीची कारखानदारी अत्यंत वेगाने प्रगत झाली पाहिजे, येथला व्यापार वाढला पाहिजे; आणि येथली

शेती शास्त्रीय पद्धतीने झाली पाहिजे, हें टिळकांचें मत मागे एक-दोनदा सांगितलेंच आहे. इंग्रजांनी येथली कारागिरी बुडविली, व्यापार बुडविला, त्यामुळे शेतीवर सर्व लोकांचा भार पडून तिलाहि निकृष्टावस्था प्राप्त झाली आणि असें असूनहि पाटबंधारे, खतें, शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार यांची कांहीहि व्यवस्था न करतां इंग्रज सरकार सारावाढ मात्र सारखें करीत राहिलें. यामुळे हा देश अन्नालाहि महाग होऊन बसला. अशा स्थितींत नवी कारागिरी – म्हणजे भांडवली कारखानदारी, आणि व्यापार यांची वाढ हा एकच उपाय होय, हें जें टिळकांचें आर्थिक तत्त्व त्याचा ऊहापोह मागे केलाच आहे.

या तत्त्वाचें प्रतिपादन करतांना टिळकांनी भांडवलदार, कारखानदार, व्यापारी यांचा सतत पुरस्कार केला आहे यांत शंकाच नाही. प्रश्न आहे तो हा की, असें करतांना कामगार, मजूर आणि एकंदर कष्टकरी जनता यांच्या हिताविषयी ते उदासीन राहिले होते की काय ? त्यांच्या अर्थशास्त्रीय प्रतिपादनाविषयी आक्षेप घेतांना त्यांच्यावर आक्षेपक तसा आरोप करतात. म्हणून त्याचा परामर्शहि केला पाहिजे.

## सोव्हिएट पंडित

येथे आता जें विवेचन करावयाचें आहे तें बरेचसें ' टिळक अँड दि स्ट्रगल फॉर इंडियन फ्रीडम ' या ग्रंथाच्या आधारें करावयाचें आहे. हा ग्रंथ रशियन मार्क्स-वादी पंडितांनी १९६६ मध्ये प्रकाशित केला आहे. रेसनर व गोल्डबर्ग हे त्याचे संपादक असून लेव्हकॉव्हस्की, चिचेरोव्ह इत्यादि आणखी पांच-सहा लेखकांनी त्यांत लेख लिहिलेले आहेत. टिळकांच्यावर आक्षेप येतात ते बहुधा स्वदेशी मार्क्सवादी पंडितांकडून येतात. तेव्हा त्यांचा परामर्श घेतांना त्यांना गुरुस्थानी असलेल्या रशियन मार्क्सवादी पंडितांचा आधार घेणें सयुक्तिक होईल असें वाटतें.

## कामगारहिताचे कायदे ?

१८८० च्या सुमारास मँचेस्टरच्या कारखानदारांच्या आग्रहामुळे इंग्रज सरकारने हिंदुस्थानांतील गिरण्या-कारखान्यांतील कामगारांसंबंधी दोन कायदे केले. एका कायद्याने सात वर्षांच्या आंतील मुलांना गिरण्यांत कामावर घेण्यास मनाई केली, सात ते बारा वर्षांच्या मुलांचे कामाचे तास नऊ असावे असें ठरविलें; आणि एकंदर कारखान्यांतील कामावर देखरेख करण्यासाठी इन्स्पेक्टर नेमण्याचा ठराव केला. दुसऱ्या कायद्याचा मागे उल्लेख आलाच आहे. हिंदुस्थानांत येणाऱ्या ब्रिटिश मालावरची जकात मँचेस्टरवाल्यांनी सरकारला कमी करावयास लावली. आणि गरीब रयतेला तो माल स्वस्त मिळावा हा यांत हेतु आहे, असें सांगितलें.

लो. टिळकांनी या दोन्ही कायद्यांवर अतिशय कडक टीका केली; आणि यामुळे हिंदी भांडवलदारांचे कारखाने डबघाईस येतील, असें सांगून याच वेळीं

आपण मँचेस्टरच्या मालावर बहिष्कार घालून, आपल्या उद्योगधंद्यांचें संरक्षण केलें पाहिजे, असें स्वजनांना सांगितलें. (मराठा, १७–३–८१).

सकृद्दर्शनी टिळकांचें हें प्रतिपादन फार भयंकर दिसतें. गरीब कामगार, त्यांचीं मुलें व एकंदर जनता यांचे ते शत्रूच आहेत व त्यांची पिळवणूक होणें हेंच त्यांना इष्ट वाटतें, असा त्याचा अर्थ होतो; पण थोडा अर्थशास्त्रीय विचार केला व इतिहास पाहिला तर या आरोपांतील फोलपणा ध्यानांत येतो.

## चिचेरोव्हचें मत

आपण हें ध्यानांत ठेविलें पाहिजे की, कामगारांना सुस्थिति प्राप्त होते ती भांडवलशाहीच्या प्रगतीमुळे होते. भांडवलदारीची वेगाने प्रगति झाली की उत्पादन वाढतें, नफ्याचें प्रमाण वाढतें आणि मग कामगारांना वेतनवाढ देणें शक्य होतें. याच दृष्टीने चिचेरोव्ह या रशियन पंडिताने म्हटलें आहे की, "हिंदी कामगारांचे अति हाल होत, ते भांडवलदारीमुळे नसून, भांडवलदारीची योग्य व व्यवस्थित वाढ न झाल्यामुळे होत, आणि याला कारण म्हणजे ब्रिटिशांचें साम्राज्य." (उक्त ग्रंथ, पृ. ५४९). याविषयी कोणाला शंका असेल तर त्याने रशियाचा क्रांतीनंतरचा पंचवीस वर्षांचा इतिहास पाहवा. कामगारांची सत्ता, त्यांच्या हितासाठी स्थापलेली सत्ता असा तिचा गौरव केला जातो; पण तेथे अजूनहि कामगारांना पुरेसें अन्नहि मिळत नाही. एखादा दिवस कामगार गैरहजर राहिला तर त्याला बडतर्फ केलें जातें; आणि त्याची राहण्याची जागाहि जाते, आणि मग त्याला सैबेरियांत पाठविलें जातें. याचें कारण एकच. तेथे भांडवलदारीची प्रगति अवश्य तितकी झालेली नाही. सर्वांना पुरेसें उत्पादनच तेथे होत नाही. मग विभजन कशाचें करणार ?

## लॉर्ड रे यांचा सल्ला

आणि ज्या वेळीं मँचेस्टरवाले व इंग्रज सरकार हिंदी कामगारांची काळजी दाखवीत होते त्या वेळीं म्हणजे १८७५–८० च्या सुमारास इंग्लंडमध्ये कामगारांची काय स्थिति होती ? अनेक इंग्रज ग्रंथकारांनीच त्यांचीं वर्णनें केलेलीं आहेत तीं पाहा. म्हणजे हिंदी कारखाने बुडविणें, त्यांच्यामुळे होणारी स्पर्धा नष्ट करणें एवढा एकच हेतु इंग्रज सरकारचा होता हें सहज ध्यानांत येईल. किंवा त्या ग्रंथकारांचीहि गरज नाही. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी वेळोवेळीं स्वतःच आपला हेतु जाहीर केला आहे. लॉड रे या अधिकाऱ्याने स्वबांधवांना सल्ला दिला की, "त्यांनी हिंदुस्थानांत भांडवल न्यावें, कारण तेथे मजुरी स्वस्त असून, कामगार संघटना मुळीच नाहीत. याचाच अर्थ असा की, तेथे कामगारांचा रक्तशोष किती करावा याला मर्यादा नाही." (लेव्हकॉस्की – उक्त ग्रंथ, पृ. ३१९). व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यानेहि जाहीरपणें सांगितलें होतें की, हिंदुस्थानांत ब्रिटिश कारखानदारीची वाढ करूं देणें हेंच सरकारचें मुख्य उद्दिष्ट आहे. याच वेळीं हुंडणावळीच्या दरांत सरकारने असा बदल केला की, त्यामुळे हिंदी निर्यात मालावर तीस टक्के जकात बसूं लागली. इत्यर्थ

असा की, इंग्रजी राज्ययंत्र हेंच मुख्यतः हिंदी कष्टकरी जनतेच्या गुलामगिरीला व रक्तशोषाला कारण होतें. (पृ. ३२०). न्या. मू. रानडे, ना. गोखले, रमेशचंद्र दत्त यांनी अशाच प्रकारची टीका त्या वेळीं केली होती

१९०५ सालीं हिंदुस्थानांत ब्रिटिश कंपन्यांचे १६५ कारखाने होते व त्यांचें वसूल भांडवलच शंभर कोटि रुपये होतें. ब्रिटिश भांडवलदारांनी हिंदुस्थान कसा ग्रासला होता, हें यावरून कळून येईल. आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या कारखान्यांत, विशेषतः कलकत्त्याच्या जूट गिरण्यांतच मजुरांची सर्वांत जास्त पिळणूक होत असे. तेव्हा निरनिराळे कामगार-कायदे करण्यांत, हिंदी भांडवलदारी बुडवून आपण हिंदी कामगारांचा रक्तशोष करावा एवढाच इंग्रजांचा हेतु होता, हें स्पष्ट आहे. ( पृ. ३१८, ३३२ ).

## इंग्लंडमधील कामगार

मँचेस्टरच्या मालावरची जकात हिंदुस्थान सरकारने माफ केली यावर टिळकांनी टीका केली हें ठीक. पण लहान मुलांच्या संरक्षणासाठी त्याने कायदे केले त्यालाहि टिळकांनी विरोध करावा हें अनेक स्वदेशी मार्क्सवादी पंडितांना फार खटकतें; पण त्यालाहि कांही अर्थ नाही. येथल्या भांडवलदारांना बुडवून, त्यांच्या जागीं आपण येऊन, येथल्या कामगार बायकामुलांचा दसपट रक्तशोष करावा, असाच ब्रिटिश भांडवलदारांचा व ब्रिटिश सरकारचा हेतु होता. याला निश्चित, संशयातीत पुरावा हा की, स्वतःच्या देशांत — इंग्लंडमध्ये — स्त्री व बाल-कामगारांचा ते असाच अमानुष छळ करीत होते. तेथील कारखान्यांत चार ते सहा वर्षांच्या मुलांना सुद्धा कामाला लावीत. त्यांच्या कामाच्या खोलींत १२०° ते १४८° असें तपमान असें. स्ट्रॉ-प्लेटिंगच्या कारखान्यांत तीन वर्षांच्या मुलांनाहि कामाला जुंपीत; आणि अनेक वेळा पैशाच्या लोभाने स्वतः आई-बापच मुलांना जास्त राबविण्यास सांगत. १८६७ सालीं याच्या नियमनासाठी कायदे झाले, पण कायदे करणाऱ्यांनीच प्रत्येक कलमाला इतके अपवाद करून ठेवले होते की, कामगार कल्याणाचा निम्मा हेतु विफल व्हावा. शिवाय सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या खास परवानगीने बायका-मुलांनाहि चौदा ते पंधरा तास राबविण्याची सोय होती ती निराळीच. (ए हिस्टरी ऑफ फॅक्टरी लेजिस्लेशन — हचिसन अँड हॅरिसन, प्रकरण ८ वें) सिडने वेब या विख्यात समाजवादी ग्रंथकाराने वरील ग्रंथाला प्रस्तावना लिहिली आहे. तींत ते म्हणतात, "लंडन येथील स्वेटेड इंडस्ट्रीजमध्ये कामगारांना गुरासारखें राबवितात. अन्न-वस्त्र पुरेसें न मिळाल्यामुळे लवकरच हे कामगार व त्यांचीं बायका-मुलें निकामी होतात, व त्यांना ' पुअर लॉ 'च्या आश्रयाने जगावें लागतें. हाऊस ऑफ लॉर्डस् कमिटीने हें सर्व आपल्या अहवालांत १८९० सालींच नमूद करून ठेविलें आहे. त्याला आता बारा वर्षें झालीं. पण तिकडे कोणी लक्ष देत नाही." वेबसाहेब पुढे म्हणतात, " १८०२ सालीं कापडगिरण्यांतील कामगारांची जी स्थिति होती

तशीच आज ( १९०२ सालीं ) या स्वेटेड इंडस्ट्रीजमध्ये ( स्लॉपक्थॉथ्, लो ग्रेड फर्निचर इत्यादि ) आहे." खाणींमध्ये स्त्रियांच्या कमरेला हातगाड्यांचे दोर बांधून त्यांना दोन हात टेकून चक्क बैलांप्रमाणे त्या गाड्या ओढायला लावीत. 'सोशल हिस्टरी ऑफ इंग्लंड' या ग्रंथांत याचीं चित्रेंच दिलीं आहेत.

स्वतःच्या देशांतील व स्वतःच्या रक्ताच्या गोऱ्या कामगारांचा असा अमानुष छळ करणारे ब्रिटिश सत्ताधीश हिंदी कामगारांसाठी कायदे करण्यास दयाबुद्धीने प्रेरित झाले होते असें म्हणणें सैतानालाच फक्त शक्य आहे. ब्रिटनमध्ये कामगार संघटनांमुळे पूर्वीप्रमाणे कामगारांचा रक्तशोष करतां येईना. तेव्हा हिंदुस्थानांत भांडवल गुंतवून तेथल्या कामगारांचें रक्त प्यावें हाच ब्रिटिश भांडवलदारांचा हेतु होता. आसामच्या चहाच्या मळ्यांत व चंपारण्यांतील निळीच्या मळ्यांत ते हा रक्तशोष करीतच होते. तेव्हा येथे कारखाने काढून येथल्या कामगारांचा त्यांनी हिंदी कारखानदारांपेक्षा दसपट रक्तशोष केला असता यांत शंकाच नाही.

तेव्हा ब्रिटिशांच्या या आर्थिक आक्रमणास स्वदेशी-बहिष्कारादि चळवळींनी विरोध करणें, व हिंदी उद्योगधंदे बुडविण्यासाठी त्यांनी केलेले कायदे हाणून पाडणें, हें कोणाहि हिंदी देशभक्ताचें कर्तव्यच होतें. टिळकांनी तेंच केलें; पण तसें करतांना कामगारांच्या हिताकडे त्यांनी दुर्लक्ष केलें होतें, त्यांचें दारिद्र्य अपरिहार्य आहे, असें ते म्हणत होते, असें मात्र नाही. प्रारंभापासूनच सर्व कष्टकरी जनतेच्या हिताची चिंता ते करीत होते आणि त्या लोकशक्तीला जागृत व संघटित करून तिच्या करवीच तिचा व भारताचा मोक्ष साधावयाचा, हें त्यांचें धोरण होतें. वर निर्देशिलेल्या रशियन पंडितांच्या आधारेच त्याचें स्वरूप पाहूं.

काँग्रेसचें पहिलें अधिवेशन झालें त्या वेळीं मराठा पत्रांत तिच्या संयोजकांचें अभिनंदन करून टिळकांनी लिहिलें की, "कोटयवधि जनतेच्या वतीने आम्ही या संयोजकांचे आभार मानतों. कारण त्या जनतेला संघटित करण्याची खरी आवश्यकता आहे.' ( हा प्रारंभ आहे. पुढे-मागे जनतेपर्यंत काँग्रेस पोचेल ही अपेक्षा ). यावरून हें स्पष्ट आहे की, कोटयवधि जनतेची काँग्रेस प्रतिनिधि व्हावी ही प्रारंभापासूनच टिळकांची अपेक्षा होती. भारताच्या इतर कोणत्याहि नेत्याच्या दृष्टीचा पल्ला इतका दूरवर गेला नव्हता; आणि 'मराठा'खेरीज कोणत्याहि वृत्तपत्राने अशा आकांक्षा व्यक्त केल्या नव्हत्या." ( टिळक अँड दि स्ट्रगल फॉर इंडियन फ्रीडम, पृ. ४४ ).

लो. टिळकांनी शेतकऱ्यांत जागृति करण्यासाठी कोणत्या चळवळी केल्या त्याचें मागे वर्णन केलेंच आहे. त्यांनी मजूरवर्गांत कशी जागृति केली त्या विषयी चिचेरोव्ह याने पुढील माहिती दिली आहे. टिळकांचे अनेक कार्यकर्ते गिरणी-कामगारांमध्ये जाऊन मजूर म्हणून राहत असत. हे बहुतेक सर्व ब्राह्मण असत. त्यामुळे कामगारांना हे वरिष्ठ जातीचे लोक आपल्यांत राहतात याचा फार अभिमान

वाटे व ते त्यांचा आदर करीत. या कार्यकर्त्यांचा मुख्य हेतु कामगारांना स्वराज्याच्या चळवळींत सामील करून घ्यावें हा होता; पण असें करतांना आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीची व विशेषत: रशियांतील १९०५–७ या वर्षांतील क्रांतीची ते कामगारांना माहिती देत व तिचीं तत्त्वेंहि सांगत. टिळकांना १९०८ सालीं शिक्षा झाल्यावर खाडिलकरांनी केसरींत 'मुंबई ही आमची आघाडीची सेना आहे' या मथळ्याखाली पांच लेख लिहून कामगार-संघटनेचीं सर्व तत्त्वें त्यांत सांगितलीं होतींच.

त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनी टिळकांना झालेल्या शिक्षेचें समर्थन करतांना आपल्या गुप्त अहवालांत म्हटलें आहे की, " टिळकांचें कामगारांवर वर्चस्व इतकें होतें की, त्यापासून साम्राज्याला धोका निश्चित झाला असता. त्यांना शिक्षा झाली नसती तर त्यांनी सार्वत्रिक संप (जनरल स्ट्राइक) निश्चित घडवून आणला असता. " त्या वेळच्या पोलिस-अहवालांतहि म्हटलें आहे की, टिळकांना लोक परमेश्वरच मानीत, आणि ते आपल्या कल्याणासाठी झटतात म्हणूनच सरकारने त्यांना तुरुंगांत टाकलें आहे असें कामगारांना वाटे. (उक्त ग्रंथ, पृ. ५८८–९१ ).

या रशियन पंडितांनी अनेक ठिकाणीं मुक्तकंठाने लो. टिळकांचा गौरव केला आहे, आणि बहुतेक जागीं त्यांच्या कार्याचें योग्य असें मूल्यमापन केलें आहे; पण मधूनच केव्हा तरी त्यांच्या मनांतला मार्क्सवाद जागा होतो, आणि टिळकांचा दृष्टिकोन वर्गीय होता, मध्यमवर्गीय बुद्धिवादी दृष्टीमुळे त्याला मर्यादा पडत, कामगारांच्या स्वतंत्र चळवळीचें व कामगार-नेतृत्वाचें महत्त्व त्यांनी जाणलें नाही, बुद्धिजीवी वर्गाकडेच त्यांनी अखेरपर्यंत नेतृत्व ठेविलें, अशा तऱ्हेचे आक्षेप ते घेतात. त्यांचें सविस्तर विवेचन येथे करावयाचें नाही; पण आपण एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे की, मार्क्सचीं हीं तत्त्वें आता अगदी हास्यास्पद ठरलीं आहेत. राष्ट्रीय पातळीवरचे लढे जगांत केव्हाहि वर्गविग्रहाच्या तत्त्वावर आणि कामगारांच्या नेतृत्वाने झाले नाहीत. खुद्द रशियांत व चीनमध्येहि नाहीत; आणि वरील आक्षेप घ्यावयाचेच ठरले तर ते सोव्हिएट व चिनी नेत्यांवर जसेच्या तसे घेतां येतील.

तेव्हा टिळकांचें धोरणच बरोबर होतें. वर्गविग्रह हा भारताला घातक होईल असें त्यांचें निश्चित मत होतें. इंग्लंडमध्ये असतांना डेप्युटेशनचे एक सभासद डॉ. वेलकर यांच्याशीं बोलतांना ते म्हणाले " भांडवलदार व कामगार असा लढा हिंदुस्थानांत होणें मला इष्ट वाटत नाही. कामगारांच्या संघटना मी निश्चित उभारणार आहे; पण त्या सोशल वेल्फेअरच्या पायावर. विमा-योजना, इस्पितळें, सहकारी पतपेढ्या, क्रीडा-केंद्रें अशा तऱ्हेच्या सुखसोयी कामगारांना मिळवून देणें हें त्यांचें उद्दिष्ट राहील. मुंबई ही मजुरांची आहे. त्यांच्या श्रमावर मुंबईची श्रीमंती अवलंबून आहे; पण नुकत्याच जन्मास आलेल्या आपल्या देशांतील कारखान्यांना व गिरण्यांना परदेशी गिरण्या-कारखान्यांशीं स्पर्धा करावयाची आहे. अशा स्थितींत मजुरीचे दर कृत्रिम रीतीने वाढवून कसें चालेल ? " ( आठवणी खंड २, पृ. ८१ ).

टिळकांची अशी व्यावहारिक दृष्टि होती; आणि त्या दृष्टीने कष्टकरी जनतेसाठी, तिच्या सुखासाठी ते सतत दक्ष असत. १८९६ सालीं दुष्काळाच्या वेळीं त्यांनी शेतकऱ्यांसाठी कशी चळवळ केली तें मागे सांगितलेंच आहे. त्या वेळीं कोष्टी; विणकर यांनाहि सरकार खडी फोडण्याचेंच काम देत असे. वास्तविक कायदा असा होता की, कसबी कारागिरांना त्यांच्या तऱ्हेचें काम दुष्काळांत दिलें पाहिजे. सोलापूरच्या साळी, कोष्टी यांच्यामार्फत टिळकांनी सरकारकडे तसा अर्जहि केला, पण उपयोग होईना. तेव्हा टिळक स्वतः सोलापूरला गेले व धनिक व्यापारी व गिरणीवाले यांच्या साह्याने त्यांनी कोष्टी लोकांस सूत पुरवून त्यांनी केलेला माल व्यापाऱ्यांनी घ्यावा अशी व्यवस्था केली, व यासाठी 'वीव्हर्स गिल्ड' अशी एक कमिटी स्थापन केली. ती अद्यापहि कार्यक्षम आहे. या व्यवस्थेमुळे साळी-कोष्टी यांना त्या वेळीं काम भरपूर मिळालें. इतकेंच नव्हे तर १९०० सालचा दुष्काळहि त्यांना जाणवला नाही. हल्ली ते लोक आपापला स्वतंत्र धंदा करून संपन्न स्थितींत आहेत. लोकमान्यांचें नांव यामुळे तेथे सर्वतोमुखीं झालें आहे. ( आठवणी खंड २ रा, पृ. ४०६, मल्लिकार्जुनप्पा पाटील यांच्या आठवणी ). टिळकांना वर्गविग्रह नको होता. वर्गसमन्वय हवा होता. तो कसा तें यावरून दिसून येईल.

त्यांचें सावकारांविषयी जें धोरण त्याच्या विषयी मागे विवेचन केलेंच आहे. सरकार शेतकऱ्यांना स्वस्त व्याजाने कर्ज मिळवून देण्याची सोय जोंपर्यंत करीत नाही, तोंपर्यंत सावकारांविरुद्ध हाकाटी करण्यांत कांही अर्थ नाही. तेव्हाहि नव्हता व आज स्वातंत्र्यानंतरहि नाही. कारण मोठमोठे कायदे झाले असूनहि आजहि ग्रामीण भागांत लोकांना ऐंशी टक्के कर्जपुरवठा सावकारींतूनच होतो. कारण सहकारी संस्था पुऱ्या पडूं शकत नाहीत. धनंजयराव गाडगीळांनी सुद्धा म्हटलें आहे की, "कांही म्हटलें तरी सावकार हा शेती-धंद्याच्या दृष्टीने उपयुक्त कार्य करीत होता, हें मान्य केलेंच पाहिजे." तेव्हा त्या सावकारांवर नियंत्रण घालणें एवढाच एक उपाय शेतकऱ्यांची पिळवणूक थांबविण्यासाठी करण्याजोगा होता. आणि टिळकांनी तोच सुचविला होता. "शेतकऱ्यांच्या परस्पर साहाय्यकारी पेढ्या' या लेखांत, 'हलक्या व्याजावर शेतकऱ्यांस पैसे मिळतील अशा प्रकारच्या साव-कारांच्या पेढ्या काढण्यास सरकारने मदत व उत्तेजन दिलें असतें तर चांगलें झालें असतें," असें त्यांनी म्हटलें आहे. (लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड २ रा, पृ. ४७७).

खोतीविषयी याच दृष्टीने आपण विचार केला पाहिजे. तो करतांना एक गोष्ट सतत ध्यानांत ठेवली पाहिजे की, इंग्रज सरकारला येथले कामगार, शेतकरी, कारागीर यांचें म्हणजे कष्टकरी दलित जनतेचें कसलेंहि हित करावयाचें नव्हतें. भांडवलदार, सावकार, खोत हे या जनतेला नागवितात त्याऐवजी आपण तिला नागवावयाचें, तिचा रक्तशोष करावयाचा हाच सर्व कायदे करण्यांत ब्रिटिशांचा

एकमेव हेतु होता. भांडवलदार, सावकार, जमीनदार, खोत हे त्याच्या आड येत म्हणून त्यांना बाजूला सारणें हीच सर्वत्र त्यांची दृष्टि होती.

खोतीचेंच उदाहरण घ्या. रत्नागिरी जिल्ह्यांतील खोत हे मुसलमानी काळापासून जमिनीचे मालक होते. तो मुलुख वसतिक्षम व तेथली जमीन उत्पादनक्षम त्यांनीच केली होती. त्यांनी सरकारधारा दिला की कुळाकडून जमिनीची कशीहि वहिवाट करण्याचा त्यांना अधिकार होता. कुळांना जमिनी करण्यास देऊन चांगल्या जमिनीच्या पिकांतून ते अर्धेल (अर्धें उत्पन्न) व वरकस जमिनीच्या पिकांतून तिर्धेल (एक-तृतीयांश उत्पन्न) घेत. कुळांना जमीन देणें न देणें हें त्यांच्या मर्जीवर होतें; यामुळे कुळावर अनेक वेळा अन्याय, जुलूम होई हें खरें. त्यासाठी १८८० सालीं सरकारने कायदा करून खोतांना बांधून टाकलें व कुळांचेहि हक्क ठरवून दिले. हा कायदा उभयपक्षीं मान्य झाला होता. याने कुळांचें कल्याण झालें, असें सरकारनेहि बोलून दाखविलें; आणि टिळकांनीहि तें मान्य केलें आहे. पण त्यानंतर सरकारचे दात दिसूं लागले. कांही वर्षांनी सरकारला खोतांनी द्यावयाचा धारा सरकारने वाढवून मागितला आणि त्यांना मात्र कुळाकडून हिस्सा वाढवून घेण्यास मनाई केली. यांत सरकारने कुळांची बाजू घेतली असें कोणास वाटेल. पण खरें काय तें लवकरच दिसून आलें. जास्त धारा भरण्यास खोतांनी नकार देतांच सरकारने त्यांच्या जमिनी जप्त केल्या आणि मग मात्र कुळाकडून पूर्वीपेक्षा उत्पन्नाचा जास्त हिस्सा सक्तीने वसूल करण्यास सुरुवात केली. म्हणजे जें करण्यास सरकारने खोतांना मनाई केली तेंच, कुळांच्या जमिनी ताब्यात येतांच स्वतः सरकार करूं लागलें. तेव्हा लूट करावयाची ती खोतांना न करूं देतां साक्षात् आपण करावयाची हाच खोती बिल करण्यांत सरकारचा हेतु होता हें स्पष्ट झालें. टिळकांनी त्यावर टीका केली ती याचसाठी. खोती किंवा जमीनदारी नष्ट झाल्यावर शेतकरी जेव्हा सरकारच्या ताब्यांत जाई तेव्हा त्याची दसपट नागवणूक होते हें ते डोळ्यांनी पाहत होते. सर रिचर्ड टेंपल या मुंबईच्या गव्हर्नराने (१८–७७–८०) शेतकऱ्यांच्या हितासाठी नवें लँड रेव्हिन्यू कोड केलें. तें फार भयंकर होतें. तलाठ्याने सारा ठरविला की त्याविरुद्ध वर अर्ज करण्याचा शेतकऱ्याला हक्क नव्हता. एक हप्ता चुकला की त्याचें घरदार जप्त करण्याचा मामलेदाराला अधिकार होता; आणि थकबाकीचें वाटेल तें व्याज घेण्याचा त्याला अधिकार देऊन ठेवला होता. शेतांतलीं उभीं पिकें या कायद्याच्या आधारें तो जप्त करूं शकत असे. याहिपेक्षा एक अमानुष प्रकार होता. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये सेमूर के यांनी सांगितल्याप्रमाणे एका शेतकऱ्याचा सारा चुकला तर त्याच्या गावांतील इतर शेतकऱ्यांना जबाबदार धरून त्यांची स्थावर-जंगम मिळकत जप्त करण्याचा अधिकारहि मामलेदाराला या कोडाने दिला होता. ( टिळक अँण्ड दि स्ट्रगल फॉर इंडियन फ्रीडम, पृ. २० ). खोती नष्ट करून तेथील कुळांना आपल्या ताब्यांत सरकारला यासाठी घ्यावयाचे होतें.

तेव्हा हिंदी भांडवलदार, सावकार व खोत यांच्यापासून कामगार किंवा शेतकरी यांना आपल्या ताब्यांत घेऊन सरकारला काय करावयाचें होतें तें स्पष्ट आहे. त्यांना त्यांचें दसपट शोषण करावयाचें होतें. टिळक सरकारने केलेल्या काय-द्यांवर टीका करीत होते तें यामुळेच होय. आता हे भांडवलदार, सावकार किंवा खोत कामगारांना किंवा कुळांना छळीत नसत, नागवीत नसत असें मुळीच नाही. पण त्यांतून त्यांना मुक्त करण्याचा टिळकांचा उपाय म्हणजे त्या समाजांना जागृत करून त्यांना संघटित करणें हा होता; आणि प्रारंभापासून त्याचाच त्यांनी अवलंब केला होता. या लोकशक्तीला जागृत करून ब्रिटिश साम्राज्यसत्तेशीं झुंज देण्यास तिला प्रवृत्त करावयाचें हें तर त्यांचें ध्येय होतें. अशा रीतीने ती शक्ति जागृत झाल्यावर तिला येथल्या हिंदी भांडवलदार-जमीनदारांशीं सहज मुकाबला करतां आला असता. आणि तो लढा इंग्लंडमधल्या भांडवलदार-कामगारांच्या लढ्यासारखा झाला असता. तेथे रक्तपात, क्रान्ति कधीच झाली नाही. कारण तेथले भांडवलदार 'अर्धं त्यजति पंडितः' इतके शहाणे होते. हेंच वर्गसमन्वयाचें धोरण टिळकांचें होतें. त्यामुळेच हळूहळू आर्थिक विषमता नष्ट होते. टिळकांचें अंतिम उद्दिष्ट तेंच होतें. दत्तकाविषयी त्यांनी केलेल्या विवेचनांत याची सविस्तर चर्चा केली आहे. सर्वांना सारखें सुख व त्यासाठी सारखें धन ही त्यांच्या मतें आदर्श व्यवस्था होय; पण ती प्रत्यक्षांत कधी येत नाही. म्हणून अनेक उपाय करून विषमता शक्य तितकी कमी करणें हें धोरण अवलंबावें लागतें. किसान-कामगार जागृति हा त्यांतला सर्वांत प्रभावी उपाय होय. टिळक त्याचाच अवलंब करीत होते. स्वातंत्र्यानंतर ते असते तर त्यांनी ती शक्ति संघटित करून व भांडवलदार-जमीनदारांना विवेक शिकवून इंग्लंडप्रमाणे वर्गसमन्वयाच्या मार्गाने, रक्तहीन क्रांति येथे निश्चित घडविली असती. त्यांच्या राष्ट्रीय अर्थशास्त्राचा हाच आशय होता.

- ८ -

# लो. टिळक व सामाजिक सुधारणा

## लोकसमूहांतून राष्ट्र

हिंदुस्थानांतील लोकसमूह हा धर्मभेद, पंथभेद, वर्णभेद, जातिभेद, स्पृश्यास्पृश्यभेद, प्रांतभेद, वंशभेद अशा अनेक भेदांनी ग्रस्त झालेला होता. धर्मबंधनें, जातिबंधनें, कर्मबंधनें, रूढिबंधनें यांनी येथल्या सर्व थरांतील व्यक्तींचें व्यक्तित्व पार नष्ट झालें होतें. दीर्घकालीन पारतंत्र्यामुळे या समाजाचें स्वत्व सर्वस्वीं लोपलें होतें. स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांचा अभिमान त्याच्या ठायीं नाममात्रहि उरला नव्हता. अज्ञानांधकारांत अनेक शतकें तो मूढपणें काल कंठीत राहिल्यामुळे जगांतील अन्य देशांची, त्यांच्या इतिहासाची, भूगोलाची, व्यापाराची, उद्योगधंद्यांची, राज्यपद्धतीची, समाजरचनेची, भौतिक शास्त्रांतील प्रगतीची पुसट सुद्धा कल्पना या लोकसमूहाला नव्हती. इतकेंच नव्हे तर स्वतःच्या देशाचा इतिहास, येथली प्राचीन परंपरा, येथल्या पूर्वसूरींचे पराक्रम, त्यांचें कर्तृत्व, त्यांची गुणसंपदा यांचें सुद्धा त्याला ज्ञान नव्हतें. अशा या लोकसमूहांतून एक संघटित हिंदी राष्ट्र निर्माण करावयाचें आणि ब्रिटिश साम्राज्यसत्तेशीं लढा देण्यास त्याला समर्थ करून या देशाला स्वातंत्र्याचा लाभ करून द्यावयाचा हें लोकमान्य टिळकांचें उद्दिष्ट होतें, हें वर अनेक वेळा सांगितलें आहे; आणि याच दृष्टीने त्यांनी धार्मिक, राजकीय, आर्थिक या जीवनाच्या भिन्न क्षेत्रांत कोणतें उद्योग आरंभिले होते, काय प्रयत्न चालविले होते याचा विचार येथवर आपण केला व त्यांच्या प्रयत्नांची तात्त्विक चिकित्सा करून त्यांतील यशापयशाचें रूपहि पाहिलें. आता त्याच दृष्टीने समाजसुधारणेच्या क्षेत्रांतील त्यांचें तत्त्वज्ञान, त्यांचे उद्योग, व त्यांचें यशापयश यांचा परामर्श करावयाचा आहे.

## नागरिक आणि प्रजा

जुन्या काळच्या राजांच्या अमलाखाली नांदणारी प्रजा आणि राष्ट्ररूपाने संघटित झालेले लोक यांच्यांतील एक महत्त्वाचा फरक हा की, राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला सर्व समाजाच्या उत्कर्षापकर्षाची जबाबदारी आपल्या शिरावर आहे, याची जाणीव असते. जुन्या प्रजांच्या ठायीं या जाणिवेचा संपूर्ण अभाव असतो. राजसत्तेखालच्या व्यक्ति या वैयक्तिक जीवन जगत असतात; सामूहिक, सार्वजनिक जीवनाची त्यांना कल्पनाच नसते. उलट, सामूहिक राष्ट्रीय जीवन हेंच राष्ट्रसंघटनेचें मुख्य लक्षण. यावरून हें उघड होईल की, ज्याला आपला समाज राष्ट्ररूपाने संघटित करावयाचा आहे त्याने प्रथम त्यांतील व्यक्तींना उत्कर्षापकर्षाच्या जबाबदारीची जाणीव करून दिली पाहिजे; आणि ती जबाबदारी पार पाडण्याचें सामर्थ्य तिच्या ठायी येईल अशाच तऱ्हेचें समाजसुधारणेचें तत्त्वज्ञान अंगीकारिलें पाहिजे. त्याचप्रमाणे सामूहिक जीवन जगण्याची विद्या तिला शिकवून त्या जीवनाच्या आड येणाऱ्या सर्व रूढि, परंपरा, धर्मतत्त्वें, यांचा निरास केला पाहिजे.

गेल्या शतकांतील राम मोहन रॉय, रानडे, स्वामी दयानंद, विवेकानंद, दादाभाई, आगरकर यांसारख्या थोर नेत्यांनी सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रांत याच धोरणाने प्रयत्न चालविले होते. लोकमान्य टिळकांनी या क्षेत्रांत कोणतें कार्य केलें तें आता पाहवयाचें आहे.

लो. टिळकांनी कॉंग्रेस, सार्वजनिक सभा, कायदेकौन्सिलें, यांसारख्या सामूहिक जीवनाचें शिक्षण देणाऱ्या सार्वजनिक संस्थांत प्रवेश करून अनेकविध कार्य केलें; साराबंदी, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, होमरूल यांसारख्या राष्ट्रीय चळवळी केल्या; आणि गणेशोत्सव, शिवाजी-उत्सव यांसारखे उत्सव सुरू केले. यांपैकी प्रत्येक संस्थेंत व चळवळींत त्यांनी राष्ट्रसंघटनेचीं वर सांगितलेलीं तत्त्वें अखंड डोळ्यापुढे ठेवूनच कार्य केलें. धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद, स्पृश्यास्पृश्यभेद अशा कसल्याहि भेदांना त्यांनी मनांत कधीहि अणुमात्र थारा दिला नाही. हा ब्राह्मणांचा अधिकार आहे, हें क्षत्रियांचें कार्य आहे, वैश्यांना हें विहित नाही, येथे शूद्रांना प्रवेश नाही, तेथे अस्पृश्य येता कामा नयेत, असा कसलाहि विषमतेचा विचार चुकून सुद्धा त्यांनी कधी सांगितला नाही. राष्ट्रामध्ये प्रत्येक व्यक्तीचा प्रत्येक क्षेत्रांत सम अधिकार असलाच पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यावांचून सामूहिक जीवन याला कांही अर्थच राहणार नाही आणि राष्ट्रीय प्रपंचाची धुरा पेलण्यास त्याचे नागरिक समर्थ होणार नाहीत. अशी त्यांची निश्चिति होती.

## स्वातंत्र्याची ओळख

राष्ट्रीय शिक्षण या विषयावरील लो. टिळकांचीं व्याख्यानें आणि लेख पाहिले तर सामाजिक सुधारणेचा सर्व आशय त्यांत आलेला आहे असें आपल्याला दिसून

येईल. राष्ट्रीय शिक्षणाची त्यांनी अनेक ठिकाणीं व्याख्या दिली आहे व स्वरूप वर्णिलें आहे. प्रत्येक व्यक्तीस राष्ट्राची जबाबदारी आपल्यावर आहे व सर्व व्यक्तींनी संघटित होऊन ती पार पाडली पाहिजे, ही शिकवण देतें तें, टिळकांच्या मतें, राष्ट्रीय शिक्षण होय. सोलापूरच्या एका व्याख्यानांत ते म्हणतात, "आपण कोण, आपली स्थिति काय, देशाची कामगिरी काय याची ओळख करून देणारें तें राष्ट्रीय शिक्षण होय." ( व्याख्यानें, पृ. १५६ ). अनेक व्याख्यानांतून ही कल्पना त्यांनी विशद केली आहे. "राष्ट्रीय गुणांचें शिक्षण देणारें तें राष्ट्रीय शिक्षण.", "लोकांत राष्ट्रीयत्वाची कल्पना आणा. ती आणील तें राष्ट्रीय शिक्षण.", "हिंदुस्थानचा भाग्योदय कशाने होईल, सध्या तो का होत नाही, याची विद्यार्थ्यांना कल्पना दिली पाहिजे.", "आपला धर्म कळावा, देश कळावा, नीतीचें आचरण घडावें, देश खाली जात चाललेला वर उचलण्याची ताकद व धैर्य यावें, जोम यावा यांकरिता राष्ट्रीय शाळा पाहिजे आहेत.", "प्रत्येक मनुष्यास आपली स्थिति किती वाईट झाली आहे हें ज्या शाळेंत समजाविलें जाईल ती राष्ट्रीय शाळा.", "आम्हांस राष्ट्रीय शिक्षण कशाला हवें ? फिरोजशहा मेथा, रानडे यांच्यासारखे लोक सतत व जास्त निपजत राहवे यासाठी.", "राष्ट्राकरिता मी वेळ आल्यास मरेन देखील, अशी बुद्धि उत्पन्न होईल असें शिक्षण राष्ट्रीय शाळेंत दिलें पाहिजे.", "देशाकरिता मरावयास तयार झाला तोच खरा देशभक्त.", "ज्याला इंग्रजींत कॅरॅक्टर म्हणतात तें चारित्र्य, – दानत – राष्ट्रांतील लोकांत असली पाहिजे. त्यांच्यांत करारीपणा असला पाहिजे, आणि मी राष्ट्राकरिता मरण्यास देखील तयार आहें अशी बुद्धि राष्ट्रांतील तरुणांत उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्या शिक्षणाने होईल तें राष्ट्रीय शिक्षण.", "राष्ट्रीय शिक्षण द्यावयाचें तें एवढ्याचकरिता की, मुलांच्या मनांत राष्ट्राशिवाय प्रथम दुसरी कोणतीहि गोष्ट येऊं नये.", "राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी-बहिष्कारापेक्षाहि जास्त योग्यतेचें आहे. राष्ट्राचें मन बदलणें, राष्ट्रांतील लोकांत भावना उत्पन्न करणें, हें राष्ट्रीय शिक्षणाचें काम आहे.", "ज्या स्वातंत्र्यासाठी आमचे प्रयत्न चालू आहेत त्या स्वातंत्र्याची ओळख काय सरकारी शिक्षण करून देणार ? राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता ही ओळख पटवून देण्यासाठी आहे.", "राष्ट्राला धक्का बसला असतां आपल्याला धक्का बसल्यासारखें वाटणें, आपलीं लहानसान कामें बाजूला ठेवून राष्ट्राच्या कामाला जाणें, राष्ट्राचा खेद स्वतःच्या खेदास कारण होणें किंवा राष्ट्राचा त्वेष आपल्या अंगीं उत्पन्न होणें हें (सध्या आपल्यांत) कमी आहे व तें (राष्ट्रीय शिक्षणाने) आलें पाहिजे." (सर्व अवतरणें – कै. लोकमान्य टिळक यांचीं व्याख्यानें, प्रकाशक, केसरी-मराठा संस्था, पुणें).

## जातिवर्णनिरपेक्ष

प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रकार्याची शिकवण देणारें व तें कार्य करण्यास तिला समर्थ करणारें असें हें राष्ट्रीय शिक्षण वर्ण, जाति, धर्म, पंथ यांचा कसलाहि विचार

न करतां सर्वांना सारखें द्यावें, असें टिळकांनी अगदी स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. 'राष्ट्रीय शिक्षण' या विषयावरील व्याख्यानांत ते म्हणतात, "राष्ट्रीय शिक्षण हा विषय विशिष्ट जातीकरिता नाही. तो सर्व जातींचा सार्वजनिक विषय आहे. सर्वांना हा एकसारखाच परिचित असला पाहिजे. . .ही शाळा कोणत्याहि एका धर्माच्या लोकांकरिता नाही. एकट्या ब्राह्मणांकरिता नाही, किंवा एकट्या जैनांकरिता नाही. प्रत्येकाच्या धर्माप्रमाणे निरनिराळें शिक्षण दिलें जाईल, आणि बाकीचें शिक्षण एकसारखें दिलें जाईल. निरनिराळ्या पंथांतील द्वैतभाव काढून देशाकरिता काम करतां यावें असें शिक्षण दिलें जाईल." (लो. टिळकांचीं व्याख्यानें, पृ. १६१, १६३). "सध्या केवळ अक्षरज्ञानासाठी कित्येक जाति आपापल्या जातीपुरत्या शाळा काढूं लागल्या आहेत; पण राष्ट्रीय शिक्षणाच्या दृष्टीने जातिजातींच्या शाळा योग्य नव्हेत. सर्व जातींनी एकाच शाळेंत बसून, राष्ट्रोद्धाराचें शिक्षण घेणें अत्यंत इष्ट व आवश्यक आहे." ( व्याख्यानें, पृ. ९६ ). "सर्व जातींनी एक होऊन सार्वजनिक कामें एकजुटीने करावींत असा बोध सभांमध्ये होत असतो. राष्ट्रीय शाळांमध्येहि जातिजमातींनी एक होण्याची आवश्यकता इत्यादि गोष्टी विद्यार्थ्यांस शिकविल्या पाहिजेत." ( पृ. ९३ ).

## मनोविकासाची संधि

हें राष्ट्रीय शाळांमधून द्यावयाच्या शिक्षणाविषयी झालें. अन्यत्रहि राष्ट्रीय जीवनांत मनुष्याची जात, त्याचा वर्ण, धर्म हे कोठेहि आड येऊं नयेत, व्यक्तीचा मनोविकास व तिच्या सामर्थ्याचा विकास करण्याची संधि जाति-वर्ण-निरपेक्ष मिळाली पाहिजे, प्रत्येक क्षेत्रांत मिळाली पाहिजे, असें लोकमान्य कटाक्षाने सांगत असत. 'कामकरी लोक व दारूचें व्यसन' या विषयावर करी-रोड, मुंबई येथे कामगारांपुढे भाषण करतांना ते म्हणाले, "तुम्ही मजूरलोक हलके आहां, खालच्या जातीचे आहा, अशी बुद्धि ठेवूं नका. तुम्हा मजुरांत साधुसंत निर्माण झाले व त्यांच्या चरणीं आम्ही ब्राह्मण लीन झालों होतों. त्यांनी ब्राह्मणांना देखील धर्माची दिशा दाखवून दिली आहे." ( पृ. २७९ ). यावरून धर्मनिर्णय करण्याचा व धर्मप्रवचन करण्याचा कोणत्याहि जातीच्या मनुष्याला हक्क आहे, हें लोकमान्यांना मान्य होतें असें दिसतें. पुण्यास नाईकांच्या गणपतीपुढे झालेल्या व्याख्यानांत तसें त्यांनी स्पष्टच म्हटलें आहे. "सर्व जातींच्या शहाण्या लोकांनी धर्माचा विचार करून, सलोखा वाढविण्यासारखें, व धर्माची घडी बसेल असें कांही करण्याकरिता, एक कौन्सिल नेमलें पाहिजे व त्यांचें मत शंकराचार्यांनी घेतलें पाहिजे." ( पृ. ३० ), याच व्याख्यानांत गादीसंबंधी तंटे करणाऱ्या शंकराचार्यांवर कडक टीका करून त्यांनी लोकांना सांगितलें आहे की, "लोकांनी आपला हक्क गुरूस दाखविला पाहिजे, नाही तर गुरुत्व दुसऱ्यास दिलें पाहिजे."

## गुणकर्मनिष्ठ

लो. टिळकांना चातुर्वर्ण्याचा अभिमान होता, पण तें चातुर्वर्ण्य गुणकर्मनिष्ठ असें होतें. जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्य हें व्यक्तीच्या विकासाच्या आड निश्चितच येतें आणि तशा व्यवस्थेंत, प्रत्येक व्यक्तीला तुझ्या शिरावर राष्ट्रीय प्रपंचाची जबाबदारी आहे, असें सांगण्याला अर्थ नाही; पण टिळकांना तसलें चातुर्वर्ण्य मान्य नव्हतें. १९१६ सालीं कानपूरच्या व्याख्यानांत त्यांनी हें स्पष्ट केलें आहे. ते म्हणाले, "हिंदु समाजाला शास्त्रांतील चातुर्वर्ण्य मान्य आहे, पण तें आनुवंशिक नाही. गुण व कर्म यांच्या योगाने तें सिद्ध होतें; पण इंग्रजांमुळे हें चातुर्वर्ण्यहि नष्ट झालें. कारण राज्यकर्त्यांनी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांचीं कामें आपणाकडेच घेतलीं आहेत." वर उल्लेखिलेल्या करी-रोडच्या भाषणांत हा विचार त्यांनी आणखी स्पष्ट केला आहे. "आमच्या शास्त्रांत असें सांगितलें आहे की, ब्राह्मण असून तो वाईट कर्म करूं लागला तर तो शूद्र होतो, आणि शूद्र असून त्याने चांगले कर्म केलें तर शूद्राचा ब्राह्मण होतो." याच व्याख्यानांत त्यांनी कामगारांना सांगितलें की, "इंग्लंडमध्ये 'लेबर पार्टी' म्हणून मजुरांचा पक्ष आहे. आज ना उद्या तेथे मजुरांचें राज्य होणार आहे. आणि येथील कामगारांनी प्रयत्न केला तर हिंदुस्थानांत त्यांचेंहि राज्य होईल." लो. टिळकांच्या राष्ट्रसंघटनेचें स्वरूप यावरून ध्यानीं येईल. येथली प्रत्येक व्यक्ति नागरिक झाली पाहिजे आणि कोणत्याहि क्षेत्रांतील अत्युच्च पदाचा मार्ग तिला मोकळा असला पाहिजे हा विचार त्या संघटनेंत अत्यंत महत्त्वाचा होता. खरी सामाजिक सुधारणा ती हीच होय !

काँग्रेस, हिंदी स्वराज्य संघ यांसारख्या संस्थांत काम करतांना टिळकांनी अशीच वर्ण-जाति-धर्म-भेदातीत दृष्टि ठेवली होती. १९०८ सालीं धुळें येथे भरलेल्या प्रांतिक सभेंत भाषण करतांना ते म्हणाले, "जात, मत व धर्म यांतील भेदाभेद लक्षांत न आणतां, सर्व माणसें राष्ट्राच्या कार्याकरितां एक होतात, याचें नांव एकी. याचें नांव राष्ट्र. . . राष्ट्र म्हणजे एका धर्माचे एका जातीचे, एका मताचे लोक अशी व्याख्या नाही. आपलीं भिन्न भिन्न मतें सोडून विशिष्ट उच्च हेतूकरिता लोक एक होतात, तेव्हा त्यास राष्ट्र म्हणतात. . . हिंदुस्थानचें कल्याण करण्याचा मक्ता एका जातीला, एका धर्माला, किंवा एका मताला ( पक्षाला ) दिलेला नाही. हें सर्वांचें काम आहे. देश-कल्याण करण्याचा सर्वांना हक्क आहे. या बाबतींत कोणी दुसऱ्यास कमअस्सल म्हणणें मूर्खपणाचें आहे." (व्याख्यानें, पृ. २२०)

राष्ट्रीय जीवन हें समूहजीवन आहे, हें संघटित जीवन आहे, हा त्यांच्या मनांतील भाव यांतून स्पष्ट होईल. त्यांच्या अहमदनगरच्या होमरूलवरील भाषणांत हाच भाव अनेक वेळा दिसून येतो. "मी तुम्हांला निश्चित सांगतों की, सर्व धर्मांच्या व सर्व जातींच्या लोकांनी एक होऊन सरकारकडे निश्चयाने ही मागणी केली, संघटितपणें तिचा पाठपुरावा केला, आणि ही मागणी मान्य झाल्यावांचून आम्ही

स्वस्थ बसणार नाही, असें सरकारलाच नव्हे, तर सर्व जगाला जाहीरपणें दाखवून दिलें, तर त्याचें फळ पदरांत पडल्यावांचून राहणार नाही."

## सर्व जाति सर्व पंथ

होमरूलच्या प्रचारासाठी टिळकांचा देशभर दौरा चालू असतांना सर्व धर्मांचे, सर्व जातींचे, पंथांचे लोक संघाचे सभासद होत होते. होमरूल लीगच्या – हिंदी स्वराज्य संघाच्या – पहिल्या वार्षिक संमेलनाच्या सभेंत चिटणीसांनी अहवाल सांगितला. त्यांत नमूद केलेलें आहे की, एकंदर १४२१८ सभासद नोंदविले गेले. त्यांत शे. ४२ ब्राह्मण व शे. ४३ ब्राह्मणेतर असून ३०९ मुसलमान, ११ पारशी व ६७ स्त्रिया आहेत. २६ डिसेंबर १९१७ सालची राष्ट्रसभा कलकत्त्यास झाली. त्या वेळीं १२ लक्ष सह्यांचा अर्ज मॉंटेग्यूसाहेबांकडे पाठविण्यांत आला आहे असें सांगण्यांत आलें. त्याच वेळीं मद्रासच्या ब्राह्मणेतरांकडून व पंचम लोकांकडूनहि स्वराज्याच्या मागणीला अनुकूल असा संदेश आला होता. पुढील मार्चमध्ये मुंबईला सभा झाल्या. मारवाडी विद्यालयाची सभा झाली व त्या लोकांनी स्वराज्य संघाला १५००० रुपयांची थैली दिली. ता. २५ रोजीं एल्फिन्स्टनरोडवर सुमारे ४० गिरण्यांतील कामगारांची सभा झाली. सोळा हजार कामगारांनी एकेक आणा वर्गणी देऊन १००० रु. जमविले व ती थैली टिळकांना अर्पण केली.

सर्व प्रकारचें शिक्षण सर्वांना सारखें मिळालें पाहिजे, प्रत्येक सार्वजनिक संस्थेंत प्रत्येक व्यक्तीला जाति-वर्ण-धर्म-निरपेक्ष प्रवेश मिळाला पाहिजे या संबंधांत कसलीहि उच्चनीचता, कसलाहि भेदाभेद असतां कामा नये, असा टिळकांचा कटाक्ष होता. कॉंग्रेस, हिंदी स्वराज्य संघ यांविषयी उदाहरणें येथे सांगितलीं. गणेशोत्सव, शिवाजी-उत्सव, स्वदेशी, बहिष्कार, साराबंदी ह्या चळवळी यांसंबंधीचीं उदाहरणें मागल्या प्रकरणांतून आलींच आहेत. तेव्हा समता, बंधुता, स्वातंत्र्य याच तत्त्वांचा अवलंब टिळक प्रत्येक ठिकाणीं करीत असत, याविषयी संदेहास जागा नाही.

## प्रतिगामी ?

असें असतांना टिळक हे प्रतिगामी होते, सनातन धर्माचे अंध अभिमानी होते, सामाजिक सुधारणांना त्यांचा विरोध होता, ते सुधारणाद्वेष्टे होते, असे आरोप त्यांच्यावर येतात ते कां ? लोकांच्या मनांत टिळकांविषयी पराकाष्ठेचा आदर असला तरी, सनातन धर्माधिमानी, सुधारणाविरोधी अशीच त्यांची लोकमानसांत प्रतिमा आहे. असें कां असावें याचा गंभीरपणें विचार केला पाहिजे. कारण अशी प्रतिमा निर्माण झाल्यामुळे समाजाची मोठी हानि झाली आहे, असें मला वाटतें.

वरील सुधारणांखेरीज स्त्रीजीवनविषयक ज्या अनेक सुधारणा त्यांना आपण अनुकूल आहोंत; केसरीने त्यांना कधीच विरोध केलेला नाही, असें टिळकांनी वारंवार म्हटलें आहे. स्त्री-शिक्षण, प्रौढ-विवाह, पुनर्विवाह ह्या सुधारणांना आपला विरोध नाही; फक्त ह्या सुधारणा जनमत तयार करून सावकाशीने केल्या पाहिजेत,

सरकारकडून कायदा करून घिसाडघाईने करतां कामा नयेत, अशी त्यांची भूमिका असल्याचें त्यांनी अनेक वेळा सांगितलें आहे.

टिळकांनी पुनः पुन्हा विशद केलेली ही भूमिकाहि अंध किंवा सनातनी अशी नाही, पुरोगामीच आहे. असें असूनहि टिळक हे रूढिग्रस्त सनातन पक्षाचे नेते, असें मानलें गेलें त्याचें कारण काय ?

## असमर्थनीय

याचें मुख्य कारण असें की, अशी भूमिका असूनहि टिळकांनी फीमेल हायस्कूल-मधील स्त्री-शिक्षण, संमतिवयाचा कायदा, दादाजी विरुद्ध रखमाई, राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरविण्यासंबंधीचा वाद, ग्रामण्य प्रकरण, वेदोक्त प्रकरण असे वाद-प्रसंग जेव्हा निर्माण झाले तेव्हा प्रत्येक वेळीं कोणत्या ना कोणत्या कारणाने सनातन्यांचा पक्ष घेतला. एवढेंच नव्हे, तर त्या त्या वेळीं सुधारकांचा व सुधार-णांचाहि कमालीचा उपहास केला. टिळकांच्या या विरोधाचें व उपहासाचें समर्थन कोणत्याहि युक्तिवादाने करतां येत नाही.

प्राचीन धर्मशास्त्रांतील कांही वचनांवर नवें भाष्य करून, त्या शास्त्रकारांची स्त्रियांविषयीची दृष्टि उदार होती, असें न्या. रानडे यांनी दाखविण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाचें टिळकांनी वास्तविक अभिनंदन करावयास हवें होतें; पण तसें न करतां त्यांनी रानडे यांच्यावर अति कडक भाषेंत टीका केली. १८८६ सालीं मुंबईच्या माधवबागेंत, सरकारने आमच्या सामाजिक चालीरीतींत हात घालूं नये असा अर्ज करण्यासाठी सभा भरली होती. त्या वेळीं तेलंगांनी ठरावाला उपसूचना पाठविली की, " अर्जांत, बालविवाह व असंमत वैधव्य यांचे वाईट परिणाम आम्हांस ठाऊक आहेत, पण ते आमचे आम्हीच सुधारले पाहिजेत, सरकारने त्यांत हात घातल्यास नुकसानच होईल, असे शब्द घालावे. " टिळकांनी या सूचनेचा पुरस्कार करावयास हवा होता. कारण तीच टिळकांची तंतोतंत भूमिका होती; पण ज्या सनातन्यांनी ती सूचना फेटाळली त्यांचाच पक्ष टिळकांनी घेतला. राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद हा तर अगदी असमर्थनीय वाटतो. १८९५ सालापर्यंत काँग्रेसच्या मंडपांतच मागून सामाजिक परिषद् भरत असे. १८९५ सालीं पुण्यास काँग्रेसचें अधिवेशन होतें. त्या वेळीं, त्या मंडपांत मागून सुद्धा सामाजिक परिषद् भरतां कामा नये, असा पुण्याच्या सनातन पक्षाचा आग्रह पडला. प्रारंभीं टिळकांना तो मान्य नव्हता. पुढे अनेक घडा-मोडी होऊन टिळकांना सेक्रेटरीपदाचा राजीनामा द्यावा लागला आणि नंतर मात्र टिळकांनी सनातन्यांचा पक्ष आवेशाने घेतला.

## प्राचीन धर्मशास्त्र

अशा वादांत टिळक नेहमी प्राचीन धर्मशास्त्राची मर्यादा उल्लंघूं नये असें सांगत. त्या धर्मशास्त्राचा अभिमान प्रगट करीत. वस्तुस्थिति अशी आहे की, हिंदूंच्या प्राचीन धर्मशास्त्रांत पुरोगामी व प्रतिगामी दोन्ही पक्षांना वाटेल तेवढे आधार

सापडतात. सूत्रकाल व त्यानंतरचा स्मृतिकाल या काळांत हिंदुधर्मशास्त्र फार प्रतिगामी व अनुदार झालें. त्यांच्या अगोदरचा काळ म्हणजे वेदकाळ. ब्राह्मणें, उपनिषदें यांचा श्रुतींतच समावेश होतो; आणि स्वत: टिळकांनी, 'अस्पृश्यता वेदशास्त्रास संमत नाही ', ' सूत्रकालापूर्वी मुलींचे विवाह प्रौढ वयांत होत असत ', असें म्हटलें आहे. शिवाय गीतेवर भाष्य लिहितांना, स्वमतविरोधी अशीं वेदोपनिषदांचीं वचनेंहि त्याज्य ठरविलीं आहेत. असें असतांना, सुधारणा करतांना प्राचीन धर्मशास्त्राचा मान ठेवण्याचा प्रश्न उद्‌भवतच नव्हता. कारण वर्ण, जाति यांची समता, त्यांचे संकर-विवाह, व्यवसाय-स्वातंत्र्य, स्त्रीजीवनविषयक सर्व सुधारणा यांना प्राचीन शास्त्रांत वाटेल तेवढे आधार सापडतात. त्यामुळे लोकमान्यांनी सुधारकांना विरोध करतांना, प्राचीन धर्मशास्त्राचा आधार घ्यावा, आणि ग्रामण्य-प्रकरणीं व विलायतच्या प्रवासाहून परत आल्यानंतर, अत्यंत उपेक्षणीय अशा धर्मवचनांन्वये प्रायश्चित्त घ्यावें हें विपरीत वाटतें. परदेश-प्रवास-निषेधाला तर वेद, उपनिषदें, सूत्रें, स्मृति यांत मुळीच आधार नाही. दहाव्या-अकराव्या शतकांतील कलिवर्ज्यासारख्या एका क्षुद्र प्रकरणाने (टीका-ग्रंथाने) तो निषिद्ध मानला आहे. तो पुढच्या काळच्या लोकांनी तसा मानल्यामुळेच, भारताची अपरिमित हानि झाली आहे. लोकमान्यांनी परदेशगमन टाळलें नाही; पण तें पाप आहे हें प्रायश्चित्त घेऊन, मान्य केलें. ज्या युगंधर महापुरुषाने गीतारहस्य सांगतांना प्रत्यक्ष श्रुतिवचनांपुढे शरणागति पतकरली नाही, शंकराचार्यांचें गीताभाष्य व भागवतपुराण या श्रुतिसम प्रतिष्ठा पावलेल्या ग्रंथांपुढे शरणागति पतकरली नाही त्याने एका अत्यंत अविवेकी, मूढ धर्मशास्त्रकारापुढे शरणागति पतकरलेली पाहून मनाला फार क्लेश होतात.

### वेदोक्त

वेदोक्त प्रकरणांत तर लोकमान्यांनी, केवळ वहिवाट व रूढि यांच्याच आधारावर, कोल्हापूरचे महाराज आणि एकंदर मराठे यांच्या, वेदमंत्रोक्त धार्मिक विधि करण्याच्या मागणीला विरोध केला. वास्तविक त्रैवर्णिकांचे सर्व धर्मसंस्कार वेदमंत्राने व्हावे, असें प्राचीन धर्मशास्त्र होतें. एका काळीं तर शूद्रांचे संस्कारहि वेदमंत्राने व्हावेत, याला धर्मशास्त्राची मान्यता होती. असें असतांना, वेदांच्या ठायी प्रामाण्य-बुद्धि हें धर्माचें लक्षण ज्यांनी सांगितलें, त्यांनीच वेदोक्त संस्काराच्या मागणीला विरोध करावा, हें विपरीत वाटतें. कोल्हापूरच्या महाराजांनी त्यांचे उपाध्याय राजोपाध्ये यांनी वेदमंत्रांनी संस्कार करण्याचें नाकारल्यामुळे त्यांचें इनाम जप्त केलें. महाराजांचा हा निर्णय योग्यच होता. ज्यासाठी वतन दिलें तें कार्य तो वतनदार करीना, तर त्याचें वतन जप्त करणें हें न्याय्यच होतें; पण टिळकांनी त्यावरहि टीका केली. धर्म हा ऐक्यबंध रूढ करणारा एक चिवट धागा असतो. टिळकांना सर्व हिंदु-समाजांत जूट निर्माण करावयाची होती. अशा स्थितींत मराठ्यांनी वेदोक्त संस्कारांची मागणी केली ही फार मोठी सुसंधि होती. प्राचीन धर्मशास्त्र

याला अनुकूल होतें. तेव्हा सर्व ब्राह्मणांनी आनंदाने या मागणीचें स्वागत करावयास हवें होतें; पण सनातन पक्षाने तिला विरोध केला आणि टिळकांनी याहि वेळेस अंध सनातन्यांचाच पक्ष घेतला. ब्राह्मणेतरांच्या मनांत, यामुळे फार कडवटपणा निर्माण होऊन, सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने मोठीच हानि झाली.

## धार बोथटली

या सर्वांमुळे मनाला क्लेश होण्याचें मुख्य कारण हें की, टिळक ही जी एक क्रांतिशक्ति भारतांत निर्माण झाली होती तिला रूढिवादी, सनातनी, अंधपरंपरावादी असें रूप येऊन, सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने, तिची धार बोथट झाली, तिची प्रखरता लोपली. गणेशोत्सवांत हिंदु-धर्मांतील सर्व जाति, वर्ण, स्पृश्य, अस्पृश्य यांनी एकत्र यावें, असें सांगून व तसें घडलें याचें स्वागत करून, टिळकांनी शेकडो वर्षांची वहिवाट व रूढि मोडली, व यांमुळे विटाळ होतो, असें म्हणणाऱ्या सनातन्यांवर उपहासाने टीका केली. शूद्रांना विद्या द्यावयाची नाही अशी जुनी वहिवाट. तशी शेकडो वर्षें रूढि पडलेली होती व सूत्र-ग्रंथ व स्मृति यांनी तसेंच शास्त्र सांगितलें होतें; पण राष्ट्रीय शिक्षण सर्व जातींना, वर्णांना, धर्मांना सारखें दिलें पाहिजे, असें प्रतिपादन करून लेख, व्याख्यानें व उत्सव त्यांतून तसें प्रत्यक्ष करून, ती वहिवाट, ती घातक रूढि, व तें धर्मशास्त्र यांना टिळकांनी झुगारून दिलें व राष्ट्रैक्याचा पाया घातला. अस्पृश्यता ही वेदकालीन प्राचीन धर्मशास्त्राला मान्य नव्हती; पण स्मृतींनी ती आग्रहाने सांगितली होती व हजारो वर्षें तशी रूढि होती; पण ती रूढि टिळकांनी मानली नाही. मी अस्पृश्यता पाळीत नाही असें जाहीरपणें सांगितलें व तशी कृतीहि अनेक वेळा केली. महर्षि वि. रा. शिंदे यांच्या अस्पृश्यतानिषेधक जाहीर पत्रकावर त्यांनी सही केली नाही याचा आज मोठा गवगवा करण्यांत येतो, पण २ जुलै १९१८ या दिवशीं टिळकांनी शिंदे यांना लिहिलेल्या पत्रांत त्याचा खुलासा केला आहे. "तुमच्या मॅनिफेस्टोच्या शेवटीं, कांही कार्यक्रम शिरावर घेऊन तो प्रत्यक्ष अमलांत आणण्याची व्यक्तिशः जबाबदारी त्यांत टाकलेली असल्यामुळे. सध्याच्या माझ्या कार्यव्यापृततेमध्ये हें नवीन कार्य अंगावर घेतां येईल असें वाटत नाही. म्हणून तुमच्या जाहीर पत्रकावर मला सही देतां येत नाही याबद्दल माफ करा", असें त्यांनी म्हटलें आहे. याने टीकाकारांचें समाधान व्हावें असें वाटतें. असो. कोणत्या जातींनी कोणता उद्योगधंदा करावा याविषयी स्मृतिप्रणीत धर्मशास्त्राचे नियम फारच कडक होते; पण लोकमान्यांनी हें धर्मशास्त्र मुळीच न मानतां, प्रत्येकाने आपल्याला साधेल तो व्यवसाय करावा, मात्र तो उत्तम करावा, असें वारंवार सांगितलेलें आढळतें. पिढ्यान् पिढ्या तोच धंदा केल्याने त्यांतील नैपुण्य वाढतें, असें त्यांचें मत असल्याचें दिसतें; पण तेंहि बाजूस सारून व्यवसायबंदीचें शास्त्र त्यांनी त्याज्य मानलें. स्वतःच्या मुलांना सुद्धा, तुम्ही जोडे शिवण्याचा धंदा केलात तरी चालेल, मात्र ते जोडे सर्वोत्कृष्ट झाले पाहिजेत, असें त्यांनी सांगितलें होतें. कोणतीहि

सुधारणा करतांना ती सयुक्तिक, आवश्यक, व सुकर आहे कीं नाही एवढाच विचार करावयाचा असतो, असें त्यांनी स्वतःच म्हटलें आहे. हेंच धोरण त्यांनी स्त्री-शिक्षण वेदोक्त, परदेशगमन, सहभोजन, अनेक प्रायश्चित्तविधि या बाबतींत अवलंबिलें असतें, तर क्रांतीच्या या शक्तीचें तेज, सामाजिकदृष्टयाहि· मलिन झालें नसतें.

लोकमान्यांच्या बाबतींत आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय, हा वाद निर्माणच व्हावयास नको होता, असें मला वाटतें. कारण आधी सामाजिक व धार्मिक सुधारणा झाल्यावांचून राष्ट्रीय तत्त्वावर समाजाचें ऐक्य होणार नाही आणि तसें झालें नाही तर स्वराज्याच्या मागणीला जोर येणार नाही, असें त्यांनी स्वतःच अनेक वेळा सांगितलें आहे व तशी कृतीहि केली आहे. या लेखाच्या प्रारंभीं व आरंभीच्या दोन-तीन लेखांत यासंबंधीचीं त्यांचीं अनेक वचनें व त्यांनी प्रत्यक्ष कृति केल्याचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. त्यावरून यासंबंधी संदेहाला कोठे जागा आहे, असें वाटत नाही.

तरीहि संदेह निर्माण होतो व वाद माजतो याचें कारण हे की, स्वतः टिळकांनीच अनेक ठिकाणीं तसें प्रतिपादन केलें आहे. आधी राजकीय सुधारणा झाल्या पाहिजेत व सामाजिक सुधारणा त्यांच्या मागून सुईमागून दोरा येतो तशा येतील, असें त्यांनी अनेक वेळा म्हटल्याचें आढळतें. आणि हें नुसतें म्हटलें आहे असें नाही तर त्याची कारणमीमांसाहि त्यांनी केली आहे. धार्मिक व सामाजिक सुधारणांचा आग्रह धरला तर समाजांत दुफळी माजेल व स्वराज्याच्या कार्यासाठी, म्हणजे राजकीय सुधारणांसाठी अवश्य ती एकजूट राहणार नाही, असें त्यांचें मत होतें. तसें त्यांनी लिहिलेंहि आहे, आणि आज त्यांचे निकटवर्ती लोक, ही भीति, हें सामाजिक सुधारणांना विरोध करण्याचें मुख्य कारण होतें, तसें त्यांनी आपल्याजवळ म्हटलें होतें असें सांगतातहि. सामाजिक सुधारणा झाल्याखेरीज राजकीय सुधारणा होणार नाही असा आग्रह धरण्यांत कांही अर्थ नाही, असें दोन-तीन ठिकाणीं टिळकांनी म्हटलें आहे आणि सर्व सामाजिक सुधारणा ब्रह्मी लोकांत व हिंदुस्थानांतील नेटिव्ह ख्रिस्ती लोकांत झाल्या असूनहि ते समाज आमच्याप्रमाणेच अधोगतीस गेले आहेत, हें उदाहरण दिलें आहे. तेव्हा समाजसुधारणांना टिळकांनी या चर्चेच्या वेळीं तरी गौण स्थान दिलें होतें, हें मान्य केलेंच पाहिजे. कांही सुधारणांना अनेक वेळा त्यांनी प्रत्यक्ष विरोध केला होता हें वर दिलेंच आहे.

पण या सर्वांची संगति नीट लागत नाही. सुधारक पक्षाचे लोक इंग्रजांना आपले गुरु मानीत, त्यांचें राज्य म्हणजे ईश्वरी वरदान समजत, आणि सुधारणांचा प्रचार करतांना प्राचीन परंपरेचा जेवढा अभिमान धरावयास हवा तेवढा धरीत नसत, यामुळे टिळकांना त्यांचा फार तिरस्कार वाटत असे. आणि त्यामुळे सुधारकांबरोबर सुधारणांचाहि ते अधिक्षेप करीत एवढेंच स्पष्टीकरण फार तर देतां येईल.

## आधी सामाजिक

एरवी आतापर्यंत वर दिलेल्या प्रमाणांवरून सामाजिक सुधारणा झाल्यावांचून राजकीय सुधारणा होणार नाहीत, असेंच त्यांचें ठाम मत होतें, असें त्यांच्या अनेक वेळच्या कृतीवरून व वचनांवरून म्हणतां येतें. शिवाजीमहाराजांचा गौरव करतांना, " त्यांनी ब्राह्मण, परभू, शेणवी, मराठे, धनगर, मावळे ह्या सर्व जातींत स्वराज्याबद्दल सारखा अभिमान उत्पन्न करून त्यांस इष्ट हेतूच्या प्राप्त्यर्थ आपसांतील भेद विसरावयास लावण्याचें महत्कृत्य केलें ", असें टिळकांनी म्हटलें आहे; आणि " माधवरावांच्या नंतर पेशवाईअखेर हें तत्त्व अमलांत आणणारा कोणीहि पुरुष नसल्याने पेशवाईचा व मराठी राज्याचा शेवट झाला ", असा निष्कर्ष मांडला आहे. ( शिवाजी आणि ब्राह्मण, केसरी, २२ ऑगस्ट १८९९ ). सामाजिक सुधारणा झाल्यावांचून स्वराज्य साधणार नाही व त्या तत्त्वाचा राज्यकर्त्यांना विसर पडला तर राज्य टिकणार नाही, असाच याचा भावार्थ होतो. आणि टिळकांनी छत्रपतींच्या या तत्त्वांचा अवलंब करूनच स्वतः जातिभेद, अस्पृश्यता इत्यादि भेदाभेद तत्त्वज्ञानपूर्वक आणि कृतीने दृष्टीआड करून सर्व चळवळी केल्या. तेव्हा सामाजिक सुधारणांचें महत्त्व ते पूर्णपणें जाणीत होते यांत शंका नाही.

## व्यक्तित्व हा पाया

आणि यासंबंधांत एक अत्यंत निर्णायक गोष्ट सांगून हें विवेचन पुरें करतों. लो. टिळकांनी राजकीय चळवळ करतांना हिंदी समाजांतील सर्व जातींतील, सर्व वर्गांतील लोकांचें व्यक्तित्व जागृत करून त्यांना इंग्रजी सत्तेशीं लढा देण्यास प्रवृत्त केलें. शेतकरी, कामकरी, स्पृश्य, अस्पृश्य, शूद्र, ब्राह्मण, श्रीमंत, गरीब ह्या सर्वांना त्यांना राष्ट्राचे नागरिक करावयाचें होतें. त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या गुणविकासाला पूर्ण अवसर दिल्यावांचून हें कार्य साधणार नाही, हें जाणून व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांवरच त्यांनी सर्व चळवळी केल्या, याविषयी तर कोणाचा वाद नाही. हें जर खरें, तर आपण हें ध्यानांत घेतलें पाहिजे की, व्यक्तित्व-जागृति हा सर्व सुधारणांचा – धार्मिक, सामाजिक, आर्थिक राजकीय – या सर्व सुधारणांचा पाया आहे. कारण या जागृतीमुळे माणसाचीं सर्व सामर्थ्यें [illegible] व अन्यायाविरुद्ध लढा देण्याचें धैर्य त्याला येतें. तें आल्यावर कोणतीहि विषमता तो टिकूं देणार नाही. तेव्हा असें हें सर्व सुधारणांना पायाभूत असणारें जें व्यक्तित्व तें ज्याने जागृत केलें त्याने सर्व क्षेत्रांतील सुधारणांचा पाया घातला, असें निर्विवाद मान्य केलें पाहिजे. एक ब्रह्म जाणले की सर्व जाणलें असें होतें, असा उपनिषदांचा सिद्धान्त आहे. त्याच न्यायाने व्यक्तित्व-जागृति ही सुधारणा केल्याने सर्व सुधारणा केल्या असें होतें. ती जागृति टिळकांनी या देशांत घडवून आणली. तेव्हा त्यांचे कांही लेख, त्यांच्या कांही कृति या समाजसुधारणेशीं विसंगत असल्या तरी, त्या सुधारणांचा अवलंब करूनच त्यांनी राष्ट्रीयत्वाचा पाया घातला, हें आपण जाणलें पाहिजे.

-९-

# हिंदु-मुस्लिम वाद

लोकमान्यांच्या धार्मिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतील कार्याचें विवेचन येथवर केलें. आता हिंदु-मुस्लिमवादाविषयीच्या त्यांच्या तत्त्वज्ञानाचा परामर्श करावयाचा आहे.

भारतांतील हिंदु-मुसलमानांचा संघर्ष बाराशे वर्षांचा जुना आहे. महंमद कासीमने ७११ सालीं सिंधप्रांतांत पाऊल टाकलें तेव्हाच हा संघर्ष सुरू झाला; आणि आज विसावें शतक संपण्याच्या बेतांत आलें आहे तरी तो संपण्याचीं चिन्हें दिसत नाहीत. मुसलमान राष्ट्रीय वृत्तीचा स्वीकार करून या भूमीच्या हिताहिताशीं जोंपर्यंत एकरूप होत नाहीत आणि हिंदु समाज जोंपर्यंत आपसांतील जातिभेद वर्णभेद, पंथभेद, प्रांतभेद विसरून संघटित होऊन बलशाली होत नाही तोंपर्यंत हा संघर्ष मिटावयाचा नाही, असें आज अनेक पंडित सांगत आहेत. साधारण ऐंशी वर्षांपूर्वी लो. टिळकांनी हाच सिद्धान्त सांगितला होता.

## राष्ट्रीय वृत्ति

१८८५ सालीं राष्ट्रसभेची स्थापना झाली. त्या वेळेपासून राष्ट्र म्हणजे काय व तें कसें घडवावयाचें याची शिकवण टिळक देत होते. " ज्यांना राष्ट्राच्या सुधारणा कशा होतात हें इतिहासवाचनाने कळून आलें असेल त्यांना ही कान्फरन्स (काँग्रेस) भरविणारांस शाबासकी दिल्यावांचून राहवणार नाही ", असे उद्गार त्यांनी (८-१२-१८८५) केसरींत काढले आहेत व सर्व हिंदुस्थानभर एकमेकांच्या साह्याने एकदिलाने, एकोप्याने परिश्रम चालले पाहिजेत; आणि असें झाल्यास ' कलौ संघे शक्तिः ' या वाक्याची पूर्तता होऊन आमच्या सुधारणेचें पाऊल जलदीने पुढे

पडेल, असेंहि त्या लेखांत सांगितलें आहे. तेव्हापासून राष्ट्रसभा ही सर्वधर्मीयांची, सर्व जातींची, सर्व पंथांची, सर्व प्रांतांची, सर्व पक्षांची सभा आहे, ती कोणत्याहि विशिष्ट जातिजमातीची नाही, असा त्यांनी सारखा उद्घोष चालविला होता. " या सभेंत, पारशी, मुसलमान आदिकरून सर्व जातींचे लोक राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करतांना ज्यांनी पाहिले असतील त्यांची, हिंदुस्थानच्या भाग्योदयाचा राष्ट्रसभा म्हणजे पाया आहे, अशी खात्री होऊन त्यांचीं मनें आनंदाने भरून गेलीं असतील. " असें अकराव्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं त्यांनी म्हटलें असल्याचें मागे सांगितलेंच आहे. 'राष्ट्र' या शब्दाची त्यांची व्याख्या तशीच होती. " राष्ट्र म्हणजे एका धर्माचे, एका जातीचे, एका मताचे लोक, अशी व्याख्या नाही. आपलीं भिन्न भिन्न मतें सोडून विशिष्ट हेतूंकरिता लोक एक होतात तेव्हा त्यास राष्ट्र म्हणतात. "

तेव्हा प्रारंभापासून लो. टिळकांनी अगदी विशुद्ध राष्ट्रीय वृत्ति अवलंबिली होती; आणि राष्ट्रसभेला तेंच रूप देण्याचा त्यांचा प्रयत्न होता हें सहज दिसून येईल. राष्ट्रसभेला — काँग्रेसला — तसें रूप हळूहळू येऊंहि लागलें होतें; पण खेदाची गोष्ट अशी की, राष्ट्रसभेला असें रूप येऊं लागल्यामुळेच इंग्रज सरकारला ती सभा दुःसह होऊं लागली, ही संघशक्ति पुढेमागे आपल्याला जाचक होईल हें सरकारच्या ध्यानांत आलें, आणि फोडा व झोडा या राजनीतीचा अवलंब करण्याचें त्यांनी ठरविलें. गेल्या शतकांतील हिंदु-मुस्लिम संघर्षाचें मूळ कारण हें आहे.

## सरकारची भेदनीति

१८९३ सालीं प्रथम मुंबईला मुस्लिमांचा दंगा सुरू झाला. शेकडो-हजारो मुस्लिमांनी दीन-दीन करीत मशिदींतून, घरांतून, दर्ग्यांतून बाहेर पडावयाचें आणि हिंदूंचीं घरें-दारें, दुकानें लुटावयाचीं, मूर्ति, देवळें फोडावयाचीं व रक्तपात करावयाचा, असा दंगा याचा एकच अर्थ तेव्हापासून आजपर्यंत आहे. त्या सालीं सौराष्ट्रांतील जुनागड या मुस्लिम संस्थानांत प्रभासपट्टण या हिंदूंच्या पवित्र क्षेत्रांत मुसलमानांनी असा दंगा केला. तेव्हा तेथे ज्या शेकडो हिंदूंचें जीवन उद्ध्वस्त झालें त्यांना साह्य करण्यासाठी मुंबईला हिंदूंची सभा भरली. एवढें निमित्त मुस्लिमांना पुरलें आणि त्यांनी दंग्याला सुरुवात केली. त्यानंतर मग पुणें, येवलें, नाशिक, धुळें, येथे असेच दंगे वरचेवर होऊं लागले. मशिदीवरून जातांना हिंदूंनी वाद्यें वाजविलीं, गाय मारण्यास विरोध केला अशीं कारणें सांगण्यांत येत; पण हीं दाखविण्याचीं कारणें होतीं. सरकारची भेदनीति हें या सर्वांच्या मागे खरें कारण होतें. त्यामुळे दर वेळीं पोलिस मुस्लिमांचा पक्ष घेत, धरपकड फक्त हिंदूंची करीत, त्यांच्यावरच खटले भरीत आणि शिक्षा हिंदूंनाच देत. कारण हिंदुसमाज हा आपला खरा शत्रु असून, त्याला खच्ची करण्यासाठी मुस्लिमांना आपल्या बाजूला वळवून घेणें व त्यांच्यामार्फत हिंदूंचें जीवन उद्ध्वस्त करून टाकणें हें धोरण सरकारने अवलंबिलें होतें.

## प्रतिकार

आणि ही भयानक आपत्ति पाहूनच टिळकांनी तिला तोंड देण्यासाठी लेखणी उचलली. १८९३ आणि १८९४ ह्या दोन वर्षांत ते सारखे या विषयावर लेख लिहीत होते व सरकारी धोरणावर, अन्याय, पक्षपात, जुलूम यांवर टीका करीत होते. एका लेखांत तर, हा दंगा मुस्लिमांचा नसून पोलिसांचा आहे, असें स्पष्टपणें त्यांनी लिहिलें, आणि दर वेळीं अनेक पुरावे देऊन, कांही प्रामाणिक सरकारी अधिकाऱ्यांच्या भाषणांचे आधार देऊन, दंग्याला प्रारंभ मुस्लिमांनी केला, पोलिसांनी त्यांना साह्य केलें आणि वरिष्ठ अधिकारी साळसूदपणें हिंदूनाच उपदेश करीत आहेत, हें सिद्ध करून दिलें.

याबरोबरच दुसरी एक गोष्ट ते सारखी सांगत. ती ही की, आता हिंदूंनी आत्मसंरक्षणासाठी सिद्ध झालें पाहिजे. सरकार तुमचें रक्षण करणार नाही, तेव्हा तुम्हींच एकजूट करून प्रतिकार केला पाहिजे, त्यावांचून दुसरा तरणोपाय नाही, असें प्रतिपादन त्यांनी सतत चालू ठेवलें होतें. याचाच परिणाम होऊन मुंबईला व पुण्याला हिंदूंनी उत्तम प्रतिकार करून दंग्यांना आळा घातला. एका खटल्यांत सेशन्स जज्ज जेकब यांनी खरा न्याय दिला. हिंदूंच्यावरचे आरोप मुळीच सिद्ध होत नाहीत, असें सांगून त्यांना सोडून दिलें व पोलिसांवर टीका केली. धुळ्याला कलेक्टरच्या देखतच, सरकारी हुकूम न मानतां, मुस्लिमांनी अत्याचारास प्रारंभ केला. तेव्हा त्यानेहि हिंदूंचा पक्ष घेतला. टिळकांनी या दोघांनाहि धान्यवाद देऊन, त्यांच्या आधारें आपल्या प्रतिपादनाची सत्यता सिद्ध केली. सरकारच्या स्वार्थी भेदनीतीचें व मुस्लिम अत्याचारांचें स्वरूप उघड करून टिळकांनी प्रतिकाराचा संदेश दिला नसता, व प्रतिकार करणाऱ्या हिंदूंचें वेळोवेळीं समर्थन केलें नसतें, तर महाराष्ट्रांत हिंदूंना जगणेंहि कठीण झालें असतें.

## इतिहासाची जाणीव

हिंदूंना प्रतिकाराची प्रेरणा देतांना लो. टिळक आणखी एक विचार पुनः पुन्हा मांडीत असत. इंग्रज लोक मुस्लिमांस जवळ करतांना त्यांस नेहमी सांगत की, "आम्ही येण्यापूर्वी तुम्ही येथले राज्यकर्ते होता, हिंदूंना तुम्हीं जिंकलें होतें. तेव्हा तुम्ही हिंदूंपेक्षा जास्त पराक्रमी आहा." हें सांगण्याचा हेतु उघड आहे. तुम्ही हिंदूंचें सहज निर्दाळण करूं शकाल, अशी चिथावणी यांत आहे. मुस्लिमांचा हा भ्रम नाहीसा करण्यासाठी तीन-चार लेखांतून, मागला इतिहास सांगून टिळकांनी इंग्रजांना इशारा दिला की, ही चिथावणी शेवटीं तुमची तुम्हांलाच घातक होईल. आम्ही राज्य मुसलमानांपासून घेतलें, हा तुमचा दावा खोटा आहे. तुम्ही आला तेव्हा मराठ्यांनी मुस्लिम सत्ता जवळ जवळ नष्ट करीत आणली होती; आणि तुम्ही आला नसता तर, आज जीं काय एक-दोन मुस्लिम संस्थानें शिल्लक आहेत तींहि नाहीशीं झालीं असतीं. मुसलमानांनाहि टिळक सांगत की, मराठे, रजपूत, शीख

हे तुमच्यासारखेंच पराक्रमी आहेत, हें विसरूं नका. मराठ्यांनीच तुमची सत्ता नामशेष केली होती. दोन्ही जमातींनी एकमेकींच्या शौर्याची व पराक्रमाची जाणीव ठेवली की दंग्याचें पहिलें कारण नाहीसें होईल, व हिंदु आणि मुसलमान दोघेहि मिळून आपल्या शक्तीचा उपयोग दोघांच्या साधारण हितासाठी करतील. आज हिंदु-मुसलमानांनी एकत्र राहवयाचें तें कांही अंशीं अमेरिकेंत निरनिराळ्या जातींचे व धर्मांचे लोक जसे एकत्र राहतात तशा प्रकारेंच राहिलें पाहिजे. ( हिंदु-मुसलमानांचा समेट, केसरी, १०–१०–१८९३ ). हिंदु-मुसलमानांत सलोखा कसा होईल हें सांगतांना टिळकांनी अनेक ठिकाणीं सांगितलें आहे की, मुस्लिमांत विद्येचा प्रसार झाला पाहिजे, म्हणजे त्यांना राष्ट्रीय दृष्टि येईल. याशिवाय त्यांच्या ठायीं हिंदूंच्याप्रमाणे धर्मसहिष्णुता आली पाहिजे. ती आली तर आपला धर्म आपण पाळावा, दुसऱ्याचा त्यास पाळूं द्यावा, अशी त्यांची वृत्ति होईल; आणि तिसरी गोष्ट म्हणजे वर सांगितलेल्या इतिहासाची जाणीव मुस्लिमांनी ठेवली पाहिजे. आपण एकदा राज्यकर्ते होतों या विचाराने आजहि मुसलमान उन्मत्तपणें वागूं पाहतात. ही वृत्तीहि त्यांनी सोडून दिली पाहिजे. इतकें झाल्यावर इंग्रज सरकार आपल्याला ज्या गोष्टी सांगतें त्या आपमतलबीपणाच्या आहेत, हें मुसलमानांच्या ध्यानांत येईल. आणि ह्या दोन्ही जमाती या देशांत सलोख्याने नांदूं लागतील.

टिळकांचा हा उपदेश कांही सुबुद्ध मुसलमानांना तरी त्या वेळीं पटला होता. बॅ. जिना हे यामुळेच टिळकांचे अनुयायी झाले होते, आणि आरंभीं नव्हे, पण पुढे पुढे अल्लीबंधूहि, टिळकच आमचे खरे राजकीय गुरु, असें म्हणत असत. ( केळकर–टिळक-चरित्र, खंड १ ला, पृ. ३६५ ). पुढे काँग्रेसने ब्रिटिशांचेंच धोरण स्वीकारलें त्यामुळे सर्वच बिघडलें तो भाग निराळा.

## पुरोगामी कोण ?

हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत लो. टिळकांनी हिंदूंचा पक्ष घेतला, त्यांना प्रतिकाराची प्रेरणा दिली, मागल्या इतिहासाची त्यांना व मुसलमानांनाहि जाणीव दिली; त्यामुळे त्यांना मुस्लिम तर आपले शत्रु मानीतच, पण सुधारक पक्षाचे रानडे, फिरोजशहा मेथा यांसारखे नेतेहि त्यांना पुराणवादी व प्रतिगामी मानीत. त्या वेळेपासून आजपर्यंत भारतांत हें ठरून गेलें आहे. हिंदूंना जो संघटित होण्याचा उपदेश करील, मुस्लिम आक्रमणाचा प्रतिकार करण्यास सांगेल, तो प्रतिगामी, तो पुराणवादी. जो त्यांच्यापुढे लाचार होईल, त्यांचा अनुनय करील, वंदे मातरम् या राष्ट्रगीताचाहि अवमान त्यासाठी सहन करील, तो खरा उदारमतवादी व पुरोगामी.

केवळ संघटित होऊन प्रतिकार करण्याचा उपदेश हिंदूंना केला एवढ्यावरूनच टिळक पुराणवादी ठरले. मग त्यांनी गणेशोत्सव व शिवाजी-उत्सव सुरू केल्यावर त्यांच्या आक्षेपकांना जोर चढला असेल यांत काय नवल ? पण ह्या दोन्ही उत्सवांत टिळकांची विशुद्ध राष्ट्रीय भूमिका रेसभरहि कधी ढळली नव्हती. शिवाजी हा

राष्ट्रपुरुष आहे, तो अवतारी पुरुष म्हणून धर्म-बुद्धीने आम्ही त्याचा उत्सव करीत नसून, एक राष्ट्रीय नेता म्हणून त्याला वंद्य मानतों, हें त्यांनी अनेक ठिकाणीं स्पष्ट केलें आहे. शिवाजी-उत्सवांतील एका व्याख्यानांत त्यांनी सांगितलें की, शिवाजी-उत्सव मुस्लिमांविरुद्ध नाही, शिवाजी महाराष्ट्रांत जन्मला हा केवळ योगायोग आहे, अन्यत्र आम्ही अकबराचाहि उत्सव केला असता. मोगल आक्रमक होते म्हणून त्याने त्यांचा प्रतिकार केला. मुस्लिम म्हणून नव्हे. पुढील राष्ट्रपुरुष कदाचित् मुसलमानांत जन्म घेईल. आम्ही त्याला असेंच मानूं. (रायटिंग्ज् अॅण्ड स्पीचेस्, पृ. ३२, गणेश अँड कंपनी, मद्रास). २० ऑगस्ट १९०१ व १६ मे १९०५ या केसरींतील लेखांत त्यांनी हाच विचार अशाच शब्दांत मांडला आहे. ते म्हणतात, "मुसलमान किंवा ख्रिश्चन हे आमचे शत्रु नव्हेत. 'विनाशाय च दुष्कृताम्' असा शिवाजीचा उद्योग होता; मुस्लिम धर्मीयांविरुद्ध नव्हे. त्याच्या जागीं कोणी मुसलमान असतां, तरी त्याचाहि आम्हीं, उत्सव केला असता. या देशांतले थोर पुरुष, मग ते ब्राह्मण असोत, मराठा असोत, मुसलमान असोत, त्यांचें गुणगान करून राष्ट्रीयत्व जागृत ठेवणें हें आमचें कर्तव्य आहे. जातीकडे किंवा धर्माकडे न बघतां राष्ट्रकार्य करण्यास आपण त्यांच्यापासून शिकावें." अकोला येथील 'आमची दुःस्थिति व आमचें प्राप्तव्य' या व्याख्यानांतहि हाच आशय त्यांनी व्यक्त केला आहे. "आम्हांला गुणांची अपेक्षा आहे, जातीची नाही." म्हणून मुस्लिमांनीहि शिवाजी-उत्सवांत सामील व्हावें, असें तें सांगत.

मुसलमानांना शिवाजी-उत्सवांत सामील होण्यास सांगणें यांत खरोखर विपरीत असें कांही नाही. आज इजिप्त, तुर्कस्थान, इराण इत्यादि देशांतील मुसलमान तेथील मुस्लिमेतर ऐतिहासिक राष्ट्रपुरुषांचा आत्मीयतेने अभिमान बाळगीत आहेत. बांगला देशांतील शेख मुजिबुर रहमान हे रवींद्रनाथांना राष्ट्रपुरुष मानतात. त्यांचें गीत बांगला मुस्लिमांनी राष्ट्रगीत मानलें आहे. मुजिबुर रहमान हे दुर्गा, कालीमाता यांच्या उत्सवांत आनंदाने सामील होतात. हीच राष्ट्रीय दृष्टि टिळक मुसलमानांना शिकवीत होते. गणेशोत्सवामागेहि त्यांची हीच राष्ट्रीय दृष्टि होती. गणेशोत्सव सुरू करण्यांत हिंदूंना एकधर्मीयत्वाच्या बंधनांनी संघटित करावें हा हेतु निश्चित होता; पण त्यांत मुस्लिमांविरुद्ध असें कांही नव्हतें. कारण त्यांतहि मुस्लिमांनी सामील व्हावें असें त्यांनी आवाहन केलें होतें; आणि प्रारंभीं अनेक मुस्लिमांनी तें मानलेंहि होतें. नाशिक, सोलापूर येथे व इतर अनेक शहरांत मुसलमान गणेशोत्सवांत सामील झाले होते. नाशिकला तर गणोशोत्सवाचें नेतृत्वच मुसलमानांनी केलें होतें. ही माहिती देऊन, टिळक हे हिंदु-मुस्लिम ऐक्याचे अत्यंत मोठे पुरस्कर्ते होते, असें डॉ. राम गोपाळ यांनी आपल्या 'इंडियन मुस्लिम' या ग्रंथांत म्हटलें आहे. (पृ. ८७–९५). गणेशोत्सव हा मुस्लिमांविरुद्ध नव्हता, असें रौलट रिपोर्टांतहि मान्य केलेलें आहे. तरी टिळक हे मुस्लिमांचे शत्रु होते, प्रतिगामी होते, असा आरोप

अजूनहि त्यांच्यावर केला जातो, याचें कारण एकच. ते हिंदु धर्माचे अभिमानी होते, मराठ्यांनी मुस्लिमसत्तेचें निर्दाळण केलें हें ऐतिहासिक सत्य ते मान्य करीत होते, अफजुलखानाला शिवछत्रपतींनी ठार केलें, हें योग्यच केलें, असें म्हणत होते, आणि स्वधर्म व प्राचीन परंपरा यांचा अभिमान जागृत करून हिंदूंना संघटित होऊन प्रतिकार करण्यास सांगत होते.

टिळकांनी मुसलमानांवर टीका केली, त्यांच्या अत्याचारांना विरोध केला तो मुस्लिम अराष्ट्रीय वृत्तीची जोपासना करीत होते म्हणून. ते विधर्मीय म्हणून नव्हे; पण इंग्रज अधिकारी व सुधारक मात्र त्यांच्यावर तसा आक्षेप घेत असत; पण वर केलेल्या विवेचनावरून हें ध्यानांत येईल की, मुस्लिम हे ब्रिटिशांचे हस्तक होऊन राष्ट्रसभेला विरोध करीत होते, आपण राज्यकर्ते आहोंत अशा वृत्तीने ते हिंदूंशीं चढेलपणें वागत होते व या देशाच्या हिताशीं एकरूप होत नव्हते म्हणून टिळक त्यांच्यावर टीका करीत होते; पण अशी टीका करीत असतांनाहि त्यांना राष्ट्रीय वृत्तीची शिकवण देऊन कॉंग्रेसमध्ये आणण्याचा व स्वराज्याच्या लढ्यांत सामील करून घेण्याचा त्यांनी आपला प्रयत्न मात्र कधीहि सोडला नव्हता.

## हिंदी मुसलमान

या त्यांच्या प्रयत्नाला थोडें थोडें यशहि येत होतें. शिवाजी-उत्सवांत मुस्लिमांनी सहभागी व्हावें असा उपदेश ते करीत; आणि अनेक ठिकाणीं मुस्लिम लोक तसे सहभागी झालेहि होते. पुढे वंगभंगामुळे प्रक्षोभ होऊन स्वदेशी-बहिष्काराची चळवळ सुरू झाली. तींतहि मुस्लिमांनी येऊन मिळावें असें आवाहन टिळकांनी केलें व प्रारंभीं त्याला प्रतिसादहि बरा मिळाला. बारिसालची परिषद् ही वंगभंगाच्या प्रतिकारासाठीच भरली होती. वंदे मातरम् हें राष्ट्रगीत म्हणण्याचा हक्क लोकांना सिद्ध करावयाचा होता; आणि अशा या परिषदेचे अध्यक्ष होते. बॅ. रसूल व एक पुढारी होते लियाकत हुसेन.

पुढे १९०६ सालीं मुस्लिम लीगची स्थापना झाली. राष्ट्रीय सभेच्या द्वेषांतूनच तिचा जन्म झाला होता हें उघड आहे. तरीहि त्या वेळीं पुष्कळ मुसलमानांना ती पसंत नव्हती. कलकत्त्याच्या राष्ट्रसभेपुढे बंगालच्या फाळणीच्या निषेधाचा ठराव, लीगचे संस्थापक जे डाक्याचे नबाब त्यांच्या बंधूंनीच मांडला होता. सभेला पन्नास-साठ मुस्लिम प्रतिनिधीहि होते. स्वदेशीच्या ठरावाला टिळकांनी उपसूचना मांडली तिला बॅ. रसूल, अलिगडचे फाजल हुसेन व काझी सयफ उद्दिन यांनी अनुमोदन दिलें. त्यानंतरच्या एका सभेंत बडोद्याचे हायकोर्ट जज्ज शमसुद्दीन तय्यबजी यांचें व्याख्यान झालें. त्यांनी " मुसलमानांनीहि राष्ट्रीयत्वाचीं बंधनें पाळलीं पाहिजेत ", असें सांगितलें. डाक्याच्या नबाबांनी लीगची स्थापना करून आरंभिलेल्या भेदनीतीचा सभेंत निषेध करण्यांत आला. आणि सभेंत शेवटीं ' हिंदी मुसलमान संघ ' स्थापण्यांत येऊन नबाब सय्यद महंमद बहादूर हे तिचे अध्यक्ष व हैदर रेझा हे

सेक्रेटरी, अशी निवड करण्यांत आली. वंगभंग, वंदे मातरम्, स्वदेशी आणि बहिष्कार या चळवळीमुळे हिंदु-मुस्लिम ऐक्याला थोडें बरें रूप येत होतें हें यावरून दिसून येईल. अर्थात् हें ऐक्य अल्पजीवी ठरलें. मोर्ले-मिंटो सुधारणा लवकरच आल्या आणि मिंटोसाहेबांना राष्ट्रसभा व मुस्लिम समाज यांत पाचर मारण्यांत मोठेंच यश आलें.

यानंतर टिळक लवकरच तुरुंगांत गेले. त्याआधी त्यांनी राष्ट्रीय पक्षाची स्थापना केली होती व 'बहिष्कार' याचा सरकारच्या सर्व कारभारावर – लष्करावर, मुलकी खात्यावर, पोलिसखात्यावर, न्यायखात्यावर बहिष्कार – असा व्यापक अर्थ सांगून, त्याच्या सांगाती करबंदीची चळवळ करण्याची घोषणाहि केली होती. ती सुरू झाली असती तर कदाचित् वंगभंगाप्रमाणेच मुस्लिमांत पुन्हा स्वराज्याच्या मागणींत सहभागी होण्याची वृत्ति निर्माण झाली असती. पण ती चळवळ झालीच नाही; आणि टिळक सुटून येऊन होमरूलची चळवळ सुरू करीपर्यंत मुस्लिम समाजांत अराष्ट्रीयत्वाचीं, ब्रिटिश-धार्जिणेपणाचीं, विभक्ततेचीं विष-बीजें फार खोलवर रुजलीं होतीं.

## भेद वितळले

पण १९१२ सालीं ब्रिटिशांनी तुर्कस्थानच्या सुलतानाविरुद्ध भूमिका घेतल्यामुळे पुन्हा हिंदी मुस्लिमांत ब्रिटिशविरोधाची लाट आली. त्या सालीं ग्रीस, बल्गेरिया, इत्यादि तुर्की साम्राज्यांतील चार देशांनी उठावणी करून सुलतानाचा पराभव केला. त्याआधी इजिप्त, त्रिपोली, मोरोक्को ह्या प्रकरणांवरून, ब्रिटिश हे इस्लामचे शत्रु, अशी हिंदी मुस्लिमांची भावना झालीच होती; आणि या वेळींहि त्यांनी तुर्की सुलतानाविरुद्ध पक्ष घेतला. त्यामुळे अलिगडचे मुस्लिमहि संतप्त झाले, व हिंदी मुस्लिमांची इंग्रजी राज्याविरुद्ध एक फळी तयार होऊन तिने काँग्रेसशीं सहकार्य करण्याचें ठरविलें. त्या वेळीं काँग्रेसच्या धुरीणांनी या वृत्तीचें आनंदाने स्वागत केलें; आणि १९१३ सालीं काँग्रेसचें अध्यक्षपद नबाब सय्यद महमूद यांना दिलें.

## सर्व नॅशनॅलिस्ट

मुस्लिमांची ही ब्रिटिश-शत्रुत्वाची वृत्ति हळूहळू वाढत गेली. पहिल्या महायुद्धांत तुर्की सुलतान इंग्रजांच्या विरुद्ध पक्षाला म्हणजे जर्मनीला मिळाला होता. त्यामुळे ती जास्त तीव्र झाली. मुस्लिमांच्या या ब्रिटिश-शत्रुत्वाच्या मागे प्राधान्याने पॅन् इस्लामिझमची भावना होती हें खरें. तरी त्या शत्रुत्वांतून थोड्या प्रमाणांत राष्ट्रीयत्वाची भावनाहि निर्माण होत होती. वंगभंग, स्वदेशी, बहिष्कार या चळवळींच्या वेळीं तशी ती कांही प्रमाणांत झाली होती हें टिळकांनी पाहिलें होतें. म्हणूनच त्यांनी होमरूलच्या चळवळींत त्यांना सामील करून घेऊन तिचा परिपोष करण्याचा प्रयत्न केला. लखनौचा करार त्यांतूनच निर्माण झाला. १९१६ सालीं लखनौला काँग्रेसच्या अधिवेशनांत झालेल्या कराराअन्वये, मुस्लिमांना पंजाब व बंगाल सोडून इतर प्रांतांत त्यांच्या लोकसंख्येपेक्षा फार जास्त प्रमाणांत जागा मिळाल्या. पंजाब

व बंगालमध्ये त्यांची बहुसंख्या होती. तेथे प्रमाणापेक्षा कमी जागा मिळाल्या. पण अन्यत्र जास्त जागा दिल्यामुळे, डॉ. मुंजे, पं. मालवीय आणि बहुसंख्य हिंदुसभावादी लोक यांचा कराराला विरोध होता. तरीहि टिळकांनी तो घडवून आणला, याचें कारण एकच. मुस्लिमांत राष्ट्रीय वृत्तीची वाढ होण्याची शक्यता त्यांना त्या वेळीं वाटली. ऑक्टोबरमध्ये अहमदाबादच्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष बॅ. जीना होते. " आपण सर्व आता नॅशनॅलिस्ट झालों ", असें त्या वेळीं ते म्हणाले. लखनौ-करार करण्यांत टिळकांचें हेंच सूत्र होतें. मागे निर्देशिलेल्या २९–१२–१९१६ च्या केसरी-च्या लेखांत त्यांनी पुनः पुन्हा तें सांगितलें आहे. " मवाळ-जहाल, हिंदु-मुसलमान हे पक्षभेद उगवत्या राष्ट्रीय बुद्धीच्या तेजामुळे वितळून गेले. शेवटच्या मुसलमान नबाबाच्या राजधानींत (लखनौला) एकाच सभापीठावर बसून मुसलमान व हिंदु विद्वानांनी प्रत्यक्ष स्वराज्याची मागणी केली, त्या अर्थी ब्युरॉक्रसीची सद्दी आता संपली ", असें त्यांनीं म्हटलें आहे. हिंदुस्थानांत हिंदु बहुसंख्य आहेत. त्यामुळे, ब्रिटिश गेले तर त्यांचीच सत्ता स्थापन होईल, अशी भीति मुस्लिमांना वाटत होती, म्हणून स्वराज्याला त्यांचा विरोध होता, तो आता गेला; म्हणून टिळकांनीं म्हटलें की, " हिंदी लोकांपैकी कोणत्याहि वर्गाच्या हातीं सत्ता आल्यास ती एका दृष्टीने आपल्याच हातीं आल्यासारखी आहे, अशी बुद्धि मुस्लिमांत उदित झाली नसती, तर कायदेकौन्सिलांतील प्रतिनिधींच्या प्रमाणासंबंधी करारमदार करून का होईना, पण स्वराज्याचे मागणींत ते हिंदी लोकांना कधीहि मिलाफी झाले नसते. " लो. टिळकांचें करारामागचें सूत्र या शेवटच्या वाक्यावरून स्पष्ट होईल. आपण सर्व हिंदी एक ही भावना मुस्लिमांची असली पाहिजे, म्हणजे ते राष्ट्रीय झाले पाहिजेत, म्हणजेच त्यांनी राष्ट्रीयत्वाचीं सर्व बंधनें पाळलीं पाहिजेत; याचाहि अर्थ टिळकांनी अनेक वेळा स्पष्ट केला आहे. शिवाजीला त्यांनी राष्ट्रपुरुष मानावें, गणेशोत्सवांत सामील व्हावें व स्वदेशी-बहिष्कारासारख्या राष्ट्रीय चळवळींत सहभागी व्हावें, हा तो अर्थ होय. मुस्लिमांना प्रमाणाबाहेर प्रतिनिधित्व देतांना व पुढे, अधिकाराच्या जागा वाटेल तर हिंदूंना द्या वाटेल तर मुसलमानांना द्या, पण आमच्यापैकी कोणाला तरी द्या, असें म्हणतांना त्यांची हीच भूमिका होती. " राष्ट्रीय भावनेचें खरें बीज यांतच आहे, व हें बीज हिंदुस्थानच्या भूमींत आता रुजलें गेलें याविषयी सरकारासहि फारशी शंका उरेल, असें आम्हांस वाटत नाही. " असें त्या लेखाच्या समारोपांत त्यांनी म्हटलें आहे. लखनौच्या आधिवेशनानंतर ३० डिसेंबरला तेथेच स्वराज्य संघ परिषद् भरली होती. त्या वेळींहि टिळकांनी करार करतांना आपल्या अपेक्षा काय होत्या तें स्पष्ट केलें. " स्वराज्याच्या मागणींत मुसलमान बंधु सामील व्हावे म्हणूनच त्यांना या विशेष सवलती दिल्या आहेत. तशा दिल्यामुळे आता त्यांची स्वराज्य-सिद्धीची जबाबदारी वाढेल. इंग्रजांच्या हातून सत्ता हिसकावून घ्यावयाची तर रस्सीखेचीच्या खेळांत आमच्याबरोबर मुसलमानांनीहि हातभार

लावला पाहिजे. प्रत्येकाने खणखणीत आवाजाने आपल्या तोंडाने स्वराज्याची मागणी करणें हा या प्रयत्नाचा प्रारंभ होय." एका शिक्षकांशीं बोलतांना याविषयी टिळकांनी आणखी स्पष्ट खुलासा केला आहे. ते म्हणतात, "या करारासंबंधी लोकांनी इतका बाऊ कां करावा तें समजत नाही. आज आम्हांस परकीय सरकारास तोंड द्यावयाचें आहे. त्या वेळीं कमीअधिक प्रमाणांत मुसलमानबंधूंस मतदानाचे हक्क अधिक देण्यास काय हरकत आहे ? स्वराज्य मिळाल्यानंतर हें प्रमाण केव्हाहि बदलतां येईल." ( आठवणी, पृ. १ २, ११२ ).

सी. एस्. रंगा अय्यर यांनी आपल्या आठवणींत टिळकांची भूमिका अतिशय स्पष्ट शब्दांत विशद केली आहे. ते म्हणतात, " लोकमान्यांनी लखनौ-करार मोठ्या खुषीने केला होता असें नाही; पण त्यामुळे मुसलमानांचें समाधान होत असेल, ते काँग्रेसमध्ये त्यामुळे येत असतील, आणि मुख्य म्हणजे देशबाह्यनिष्ठा सोडून हिंदी राष्ट्रवादाला मान्यता देणार असतील तर करार करण्याजोगा आहे ", अशी त्यांची विचारसरणी होती. ( आठवणी. पृ, २, ५६५ ).

## विकृत धाष्टर्य

लखनौ-करारासंबंधी टिळकांची भूमिका काय होती याविषयी संदेहास यत्किंचितहि जागा नाही, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. मुसलमानांचा स्वराज्यालाच विरोध होता. इंग्रजांचें राज्य त्यांना कायम हवें होतें. ही भूमिका सोडून ते स्वराज्याच्या मागणीला अनुकूल झाले, तींत सहभागी झाले. शिवाय राष्ट्रीयत्वाचीं बंधनें पाळण्यासहि ते तयार झाले; आणि याच वृत्तीने ते प्रथम स्वदेशी-बहिष्कार या चळवळींत आणि नंतर होमरूलच्या चळवळींत सामील झाले. इतका पालट त्यांच्यांत झाला म्हणूनच त्यांना थोडें झुकतें माप देण्यास टिळक तयार झाले. असें असतांना आज लखनौ-करार हाच खरा पाकिस्तानचा पाया होय, आणि तो टिळकांनीच घातला, असा आरोप कांही जाणते लोक करीत आहेत, याचा मोठा विस्मय वाटतो. असा आरोप एक-दोघा पंडितांनी केला आहे असें नसून, तो एक संप्रदायच आहे, असें दिसतें. या संप्रदायाच्या मनांत महात्माजी, पं. नेहरू व त्यांची काँग्रेस यांना या घोर कृत्याच्या अपश्रेयांतून मुक्त करावयाचें आहे; आणि त्यासाठी ते टिळकांवर हा आरोप करीत आहेत, हें त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट दिसून येतें. अन्यथा हें विकृत धाष्टर्य त्यांच्या हातून झालें नसतें.

वास्तविक मुस्लिमांच्या बाबतींत टिळकांचा मार्ग पुढीलांनी अनुसरला असता तर, पाकिस्तानची आपत्ति टळली असती. मुस्लिमांच्या पाशवी अत्याचारांचा संघटित प्रतिकार करणें, 'ये यथा मां प्रपद्यन्ते' या धोरणाने त्यांच्याशीं वागून हिंदूंच्या सामर्थ्याची त्यांना जाणीव करून देणें, आणि त्याचबरोबर त्यांच्यांत राष्ट्रीय वृत्तीचें बीज रुजवून त्याचा परिपोष करणें, हा टिळकांचा मार्ग होता. १८९३-९४ सालीं पुण्या-मुंबईस संघटित प्रतिकार झाल्यामुळे पुढे अनेक वर्षे महाराष्ट्रांत मुस्लिम अत्या-

चार करूं धजले नाहीत. आणि राष्ट्रीय वृत्तीला आवाहन केल्यामुळे कांही प्रमाणांत तरी ते स्वराज्याचा चळवळींत सामील झाले; आणि लखनौला स्वराज्याची मागणी काँग्रेसला एकमुखाने करतां आली. असें करतांना मुस्लिमांना कांही जादा सवलती द्याव्या लागल्या हा गौण पक्ष हें खरें. पण परराष्ट्रांशीं सुद्धा कांही प्रसंगीं, थोडा गौण पक्ष स्वीकारून, करार करावे लागतात. येथे तर जे स्वकीय होण्याच्या मार्गावर होते त्यांच्या बाबतींत ही गौणता स्वीकारली होती; पण त्यांनी अत्याचार केले तर त्यांचा प्रतिकार करावयाचा; आणि पुढेमागे ही गौणता काढून टाकावयाची, अशी सतत सावधगिरी त्यामागे बाळगलेली होती.

याउलट टिळकांच्या नंतरच्या काँग्रेसच्या नेत्यांनी मुस्लिमांच्या देशद्रोही वृत्तीलाच खतपाणी घालून त्यांचा सतत अनुनय करण्याचें धोरण अवलंबिलें. मुस्लि-मांनी भीषण अत्याचार केले तेव्हा ' शूर मोपले ', ' भाई रशीद ' म्हणून त्यांचें कौतुक केलें, त्यामुळे त्यांचें पाशवी आक्रमण वाढतच गेलें. पण यापेक्षाहि काँग्रेसचें अक्षम्य पाप म्हणजे भारतनिष्ठ मुस्लिमांना सतत दूर ठेवून तिने मुस्लिम लीगला जवळ केलें. आज बांगलामधील मुस्लिम बंगाली मातृभाषा मानतात, तिच्यासाठी प्राणार्पण करतात. रवींद्रांचें गीत राष्ट्रगीत म्हणून स्वीकारतात, पाकिस्तानला शत्रु लेखतात व भारतीय परंपरेचा आदर करतात. हेंच आज सिंधमध्ये चालू आहे, हें ' जिये सिंध ' चळवळीवरून दिसून येतें. सिंधी मुसलमानांना पाकिस्तानांतून बांगला-प्रमाणेच फुटावयाचें आहे, सिंधी भाषेला ऊर्जितावस्था आणावयाची आहे. दाहीरच्या परंपरेचा ते अभिमान धरतात, आणि महंमद कासीमला आक्रमक समजतात. याच राष्ट्रीय वृत्तीचे जे मुस्लिम त्या काळीं भारतांत होते — तसे ते निश्चित होते हें सरहद्द प्रांतांत त्याच वेळीं दिसत होतें — त्यांना आपले, स्वकीय मानून, त्यांचा पक्ष वृद्धिंगत करणें व त्यांच्या सहकार्यानें भारतनिष्ठेची मुस्लिमांत जोपासना करणें हा मार्ग महात्माजी-पंडितजींनी अनुसरला असता तर भारत निश्चित अखंड राहिला असता. लोकमान्यांनी प्रारंभापासून तोच मार्ग आखला व अनुसरला होता; पण वरील थोर नेत्यांनी सर्वस्वीं विपरीत व विनाशगामी मार्ग स्वीकारला; आणि त्यांच्याच शब्दांत म्हणावयाचें, तर मातृभूमीचे तुकडे केले.

बांगला, सिंध, वायव्यप्रांत येथे आज भारतीय प्राचीन परंपरेच्या भक्तीचें, मातृभूमीच्या निष्ठेचें जें उधाण आलें आहे व पाकिस्तानविषयी जो जहरी कडवा द्वेष तेथे उफाळत आहे त्यावरून टिळक-मार्ग अनुसरला असता तर पाकिस्तान निश्चित टळलें असतें यांत शंका नाही. डोळ्यासमोर घडलेल्या इतिहासाचा हा निष्कर्ष स्पष्ट दिसत असतांना पाकिस्तानचें अपश्रेय टिळकांना देणाऱ्यांची बुद्धि विकृत आहे, असेंच म्हटलें पाहिजे. अजूनहि शहाण्या माणसांनी सावध होऊन मुस्लिमांच्या बाबतींत लोकमान्यांच्या तत्त्वांचा पुन्हा अवलंब करावयाचें ठरविलें, तर यापुढच्या अनेक आपत्ति टळण्याचा संभव आहे.

- १० -

# महाभूतसमाधि

**तं वेधा विदधे नूनं महाभूतसमाधिना ।**
**तथा हि सर्वे तस्यासन् राष्ट्रार्थैक फलागुणाः ॥**

महापुरुषांना घडविण्यासाठी, पंचमहाभूतांचीं मूलकारणें, सृष्टीचीं मूलद्रव्यें ही जी सामग्री विधाता वापरतो तीच वापरून त्यानें या महापुरुषाला घडविलें असलें पाहिजे. त्यामुळेच राष्ट्राचा उत्कर्ष हें ज्यांचें एकमेव फल आहे, असेच त्याचे सर्व गुण होते.

रघुवंशांतील थोर राजा दिलीप याचें कालिदासाने या श्लोकांत वर्णन केलें आहे. त्यांत 'परार्थ' ऐवजी, 'राष्ट्रार्थ' असा बदल केला तर तें वर्णन लो. टिळकांच्या बाबतींतहि सार्थ होईल असें वाटतें. हिंदुस्थानचें एक राष्ट्र घडविणें यासाठीच त्यांचा अवतार होता. त्या एका हेतूच्या सिद्धीसाठीच त्यांचे सर्व गुण विधात्याने त्यांना दिले होते.

## गुणगौरव

"प्रखर बुद्धिमत्ता, अचल ध्येयवाद, व्यावहारिक दक्ष-वृत्ति, उदंड उत्साह, भेदक प्रज्ञा, गाढ पांडित्य, साधी राहणी, असामान्य कार्यैक-निष्ठा, अभंग आवेश पण बाह्यत: मात्र शांत वृत्ति, हे मराठा समाजाचे गुण लो. टिळकांच्या ठायी मूर्त झाले होते. त्यामुळे टिळक म्हणजे अतिशय धारदार, तिखट पण म्यान केलेलें खड्ग आहे, असें मला नेहमी वाटे," असें महायोगी अरविंद घोष यांनी टिळकांविषयी आपल्या आठवणींत म्हटलें आहे.

कवयित्री सरोजिनी नायडू म्हणतात, "टिळक हे आपल्या टणक, समृद्ध' दगडी महाराष्ट्रांतल्या एखाद्या पहाडासारखे होते. त्याच्या अंगावरून निर्झर

खळाळत असतात, वनराजींनी तो झाकलेला असतो, पण त्याच्या सुप्त सामर्थ्याची प्रतीति सारखी जाणवत असते."

सुप्रसिद्ध वार्ताहर नेव्हिनसन हे सुरतेच्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनास स्वत: उपस्थित होते. त्यांना टिळकांचें दर्शन कसें घडलें? – "आभाळांत काळे ढग येऊन वीज कडाडावी आणि वादळ व्हावें त्याप्रमाणे टिळक थेट समोरून येऊन अध्यक्षांच्या खुर्चीसमोर उभे राहिले. ते तक्रार करीत होते, निषेध करीत होते, हरकत सांगत होते; पण हें सर्व काम त्यांच्या शांत व निश्चयी स्वभावाप्रमाणे सुरू होतें. त्यांचा तो आवाज ऐकून वाटे की, हा मनुष्य भवितव्यतेलाहि तुच्छ मानीत आहे."

ब्रिटिश पार्लमेंटचे मजूरपक्षीय सभासद कर्नल वेजवुड म्हणतात, "टिळकांची भेट होऊन आता पांच वर्षें झालीं; पण माझ्या मनावरचा त्यांचा दरारा कायम आहे. इतर हिंदी जनांबरोबर मी बरोबरीच्या नात्याने बोलूं शकतों, त्यांच्या बरोबरीने हसतों, वाद घालतों, पण टिळकांच्या समोर हें धैर्य मला होत नसे. कारण टिळक म्हणजे पिढ्यान् पिढ्यांची दैवी स्थितप्रज्ञता, तपस्या व ज्ञानसाधना यांची साक्षात् पूर्तीच!"

सुरत काँग्रेसनंतर टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला भरण्यांत आला होता. त्या वेळीं डॉ. मुंजे व दादासाहेब खापर्डे त्यांना तुरुंगांत भेटावयास गेले होते. जेलरसाहेब एक मद्रासी हिंदु होते. त्यांनी तीन खुर्च्या मांडून टिळकांसकट सर्वांना बसावयास सांगितलें. आणि आपण अदबीने बाजूस उभे राहिले. थोड्याच वेळांत टेबलाच्या खणांतून पांढरी रोठा सुपारी व अडकित्ता काढून त्यांनी टिळकांसमोर ठेवला; आणि खाली वांकून ते म्हणाले, "मला माहीत आहे आपल्याला सुपारी खाण्याचा फार शोक आहे." त्यावर टिळक म्हणाले, "मी आता कैदी आहे हें आपण विसरलांत वाटतें?" जेलरसाहेबांनी नम्रपणें उत्तर केलें, "आपल्यासारख्यांवर असें संकट येणें ही दु:खाची गोष्ट तर खरीच, पण आम्हासारख्यांना दु:खांत सुख हेंच की, अशा विभूतींच्या आगमनाने हें पापालय पुनीत होतें."

पांडुरंग काशीनाथ पेंडसे यांनी एक आठवण दिली आहे. त्यांच्या घरीं एकदा लोकमान्य गेले होते. तेथे त्यांनी त्यांच्या आजीला नमस्कार केला. त्या वेळेस पेंडशांच्या आजी म्हणाल्या, "रामराजा वनवासाला गेला त्या वेळेस जितकें दु:ख प्रजेला झालें तितकेंच दु:ख आपण ब्रह्मदेशांत जाते वेळीं प्रजेला झालें." हें ऐकून लोकमान्यांच्या डोळ्याला पाणी आलें. तें पाहून पेंडशांना आश्चर्य वाटलें. दृढ अंत:-करणाचा व कठोर निश्चयाचा हा पुरुष! लोकांचें प्रेम पाहून त्याला द्रव फुटतो. तेव्हा "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि!" असेच लोकमान्य आहेत हेंच खरें.

संकेश्वराला गेले असतांना लोकमान्य तेथील श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य यांच्या मठांत गेले होते. त्या वेळीं स्वमींनी शाल देऊन त्यांचा सत्कार केला. तेव्हा लोकमान्य म्हणाले, "आम्ही आपले चरणीं कांही अर्पण करण्याचें सोडून आपले-

कडूनच घेणें हें बरोबर नाही." त्यावर स्वामी म्हणाले, "अहो, लोकमान्य, तुम्ही लोकमान्य नव्हे, जगन्मान्य आहांत. पुण्यामध्येच काय, पण सबंध हिंदुस्थानमध्ये देखील तुम्ही सांगाल त्याप्रमाणे लोक ऐकतात. आम्ही सध्या नामधारी जगद्गु आहोंत, तुम्हीच खरे जगद्गुरु आहांत."

स्वकीय-परकीय, लहान-थोर पुरुषांना लो. टिळक कसे दिसले तें त्यांनी आपापल्या शब्दांत व्यक्त केलें आहे. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचें त्यांतून स्पष्ट दर्शन घडतें. महाभूतसमाधि ती हीच. राष्ट्रार्थैकफल असे त्यांचे गुण ते हेच.

## कालपुरुषाची चेष्टा

भवितव्यतेला ते तुच्छ लेखीत असत हें तर प्रत्येक प्रसंगीं दिसून आलें आहे. १९१५ सालीं होमरूल लीगच्या स्थापनेसंबंधी बोलणीं चाललीं होतीं. बॅ. बॅप्टिस्टा यांनी एकदा १८९९ सालीं व एकदा १९०६ सालीं तशी सूचना केली होती; पण 'अजून वेळ आली नाही', असें दोन्ही वेळा टिळक म्हणाले होते. १९१५ सालीं त्यांनी ती सूचना पुन्हा मांडली तेव्हा टिळक म्हणाले, "होय. आता योग्य वेळ आली आहे. आता यामुळे माझा मंडालेकडे परत प्रवास सुरू होईल; पण तो धोका पत्करण्याजोगा आहे. तुम्ही अध्यक्षीय भाषणांत सूचना मांडा." सहा वर्षें मंडालेच्या एकान्तवासाचा अनुभव घेऊन आल्यावर पुन्हा वर्षाच्या आंतच, आणि तोहि साठाव्या वर्षी पुन्हा तिकडे जाण्याचा संभव दिसत असून, टिळकांनी होमरूल लीगच्या कार्यास प्रारंभ केला.

आपल्याभोवतीं घिरटचा घालणाऱ्या कालपुरुषाची टिळक नेहमीच अशी चेष्टा करीत असत. १९०८ सालीं खटला चालू असतांना वातावरण फारच गंभीर झालें होतें. तेव्हा टिळक हसत हसत भोवतालच्या मंडळींना सहज म्हणाले, "आज काळचा पाण्याचा रंग दिसतो आहे."

भीषण भवितव्यतेला असें तुच्छ लेखण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठायी नसतें तर हिंदी राष्ट्र घडविण्याचें कार्य त्यांच्या हातून झालेंच नसतें. हें राष्ट्र घडवावयाचें म्हणजे ब्रिटिशांच्या क्रूर, सैतानी, सत्तेला, प्रत्यक्ष यमदंडालाच आव्हान देणें प्राप्त होतें. चाळीस वर्षें केसरीच्या प्रत्येक लेखांत, आणि प्रत्येक भाषणांत टिळक हें आव्हान देत होते.

## स्थितप्रज्ञता

त्यांना हें धैर्य, हें बळ कोठून प्राप्त झालें ? गीता, भगवद्गीता ! भगवद्गीता-रहस्य ! स्थितप्रज्ञता हें गीतेचें रहस्य आहे. तीच त्यांनी साध्य करून घेतली होती. हरिदास मुरूडकरबुवा यांनी टिळकांना हाच प्रश्न विचारला होता. "आपण हें सर्व सहन कसें केलें ? आपण गीतेच्या परिशीलनामुळे प्रज्ञाप्रतिष्ठित झालां आहां, जीवन्मुक्त कोटींतील आहां. त्याच भूमिकेवरून आपण कारागृहांतहि कारागृहातीत असला पाहिजे !" यावर टिळकांनी विनयाने सांगितलें की, "त्या कोटींतील मी

नव्हे, आपण म्हणतां तसा ब्रह्मनिष्ठ मी नाही; पण लहानपणापासून मनांत जेणेंकरून धैर्य उत्पन्न होईल, अशा गोष्टींचा वारंवार विचार करण्याची, मला सवय होती. मंडालेला असतांना मीं जी गीता लिहिली तिच्यामुळे मन धैर्यपूरित व उदार झालें. कांही काळ तें सुखदुःखादि द्वंद्व सोडून निश्चल होई. अशा रीतीने मीं आपल्या मनाला हें द्वंद्व सहन करण्याचें सामर्थ्य आणलें." स्वदेशी-बहिष्काराच्या चळवळीपासून, तुरुंगवास, हद्दपारी, फाशी झाली तरी सरकारी अन्यायाचा प्रतिकार केलाच पाहिजे, असें टिळक सांगूं लागले. त्या वेळींच त्यांच्या मनाने निश्चल होण्याचा अभ्यास पूर्ण केला असला पाहिजे. कारण १९०८ सालीं सहा वर्षांची काळेपाण्याची शिक्षा झाली तरी, तुरुंगांत जातांच त्यांना शांतपणें झोप आली. हीच स्थितप्रज्ञता मंडालेस पूर्णत्व पावली. १९१४ नंतरच्या सहा वर्षांत जे जे लोक टिळकांच्या सहवासांत आले त्यांना त्यांना पदोपदीं त्यांच्या या द्वंद्वातीत निश्चलतेचा प्रत्यय आलेला आहे.

### वेदान्ती व्यक्तिमत्त्व

ही निश्चलताच नव्हे, तर टिळकांचें सर्व व्यक्तिमत्त्वच गीतेंतल्या वेदान्ताने घडविलेलें होतें. ते पराकाष्ठेचे लोकवादी (डेमोक्रॅट) झाले ते वेदान्तामुळेच. वास्तविक समता, बंधुता, स्वातंत्र्य हीं लोकशाहीचीं तत्त्वें आपण पाश्चात्त्यांकडून घेतलीं आहेत. टिळकांना हें अमान्य आहे असें नाही; पण त्यांच्या मतें या तत्त्वांना जास्त आधार वेदान्तांत आहे. दासनवमीनिमित्त झालेल्या व्याख्यानांत ते म्हणाले, "सर्व माणसें जन्माने सारखीं आहेत हें इंग्रजी तत्त्व आहे. पण वेदान्ताचें तत्त्व यापेक्षा उदात्त आहे. त्यांत सर्व माणसांचा आत्मा सारखा आहे, असेंच केवळ नाही, तर सर्व माणसें व प्राणी यांचा आत्मा सारखा आहे असें सांगितलें आहे. जगांतील अत्यंत उदात्त विचारांची एखादी शाळा असेल तर ती वेदान्ताची होय." याच व्याख्यानांत ते पुढे म्हणतात, "धर्म तरी काय सांगतो ? तूं स्वतंत्र आहेस, मायेचें पटल आलें आहे तें सोडून दे. संसारांतील लोभाची, क्रोधाची, स्वार्थाची बुद्धि टाकून द्यावी. परमेश्वर होण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे, हें धर्माने कळून येईल." सोलापूरच्या व्याख्यानांत असाच विचार त्यांनी मांडला आहे. "मनुष्याचा परमेश्वर होऊं शकतो. आज जमलेल्या हजारो लोकांचा व माझा आत्मा भिन्न नाही. सगळ्या मनुष्यांचा आत्मा एक आहे. तो मीच आहें, मी तो आहें. हें नातें ओळखणारा अधिक तत्त्वज्ञ व देशाचा अधिक हितकर्ता, असें म्हणण्यास हरकत नाही !"

### श्रेष्ठगौरव

प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र महत्त्व आहे, तिच्या व्यक्तिमत्त्वाला मान दिला पाहिजे हा राष्ट्रीयत्वाचा व लोकशाहीचा विचार असा वेदान्तांतून स्फुरलेला आहे. रवीन्द्रनाथ ठाकुरजी यांनी एका आठवणींत टिळकांच्या या वृत्तीचा गौरव केला आहे. ते युरोपला निघाले होते. टिळकांनी पन्नास हजार रुपये त्यांना देऊं केले. कशा-

साठी ? युरोपांत त्यांनी स्वदेशाचें कार्य करावें म्हणून; पण कार्य कोणतें ? टिळकांचा निरोप होता की, " तुमच्या मताने जें आपल्या मातृभूमीच्या हिताचें असेल तें करा. माझ्या मार्गाने या, असें मी म्हणत नाही. तसें तुम्ही केल्यास मला वाईटच वाटेल. तुम्ही स्वतःच्या मतांशीं प्रामाणिक राहून योग्य दिसेल तें करा. तुमचा मार्ग तुम्ही ठरवा." रवीन्द्रनाथ म्हणतात, " माझ्या देशबांधवांनी माझ्या केलेल्या गौरवांत हा सर्वश्रेष्ठ गौरव होता. टिळकांच्या या व्यक्तित्वगुणाने मी फार प्रभावित झालों. टिळकांनी हें जाणलें होतें, की देशोद्धाराचे मार्ग अनेक असूं शकतात, आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या गुणांचा विकास करण्यास पूर्ण अवसर मिळाला तरच ती स्वतंत्र-पणें मार्ग आखून अनेक प्रकारे राष्ट्रोद्धाराचें कार्य साधूं शकेल." ( आठवणी, खंड २ रा, पृ. ६०८ ).

**व्यक्तित्वाचें महत्त्व**

१९२० सालच्या कॉंग्रेसचे अध्यक्ष सी. विजय राघवाचारियर यांनी टिळ-कांच्या लोकवादी वृत्तीचा असाच गौरव केला आहे. ते म्हणतात, " महापुरुष हे निकटच्या लोकांना महापुरुष वाटत नाहीत, अशी एक म्हण आहे, पण टिळक तिला अपवाद होते. जों जों मी त्यांच्या निकट आलों तों तों माझा त्यांच्याविषयीचा आदर वाढत गेला. याचें कारण हें की, दुसऱ्याच्या मतांविषयी त्यांनी कधीहि असहिष्णुता दाखविली नाही. ज्यांनी त्यांना फार दुखविलें त्यांच्याबद्दलहि त्यांची वृत्ति अनुदार नव्हती. गोखल्यांच्या मृत्युसमयीचें त्यांचें भाषण याची साक्ष देईल." (आठवणी, खंड २ रा, पृ. ६४३). न्या. रानडे, आगरकर यांच्याविषयी टिळकांनी जे मृत्युलेख लिहिले त्यांचें हेंच वैशिष्टय आहे. त्यांच्या जीवनाचें रहस्य टिळकांनी जसें उलगडून दाखविलें तसें त्यांच्या अनुयायांनी सुद्धा दाखविलें नव्हतें. न्या. रानडे यांची वृत्ति अशीच होती. स्वतःकडे कमीपणा घेऊन त्यांनी अनेक वेळा टिळकांचा मुक्तमनाने गौरव केला, हें प्रसिद्धच आहे. हे दोघेहि महापुरुष खरे लोकवादी होते. आणि व्यक्तीच्या व्यक्तित्वाचें महत्त्व ते जाणीत होते, असा याचा अर्थ आहे. दोन तेजस्वी पुरुषांचें सख्य होणें अशक्य आहे, असें महाभारतांत एक वचन आहे; पण राष्ट्रकार्यासाठी असें सख्य होणें अवश्य आहे हें जाणून टिळकांनी तें अनेक वेळा घडवूनहि आणलें होतें. यासाठी या महत्कार्यासाठी, संपूर्ण आत्मलोप करण्याचीहि त्यांची सिद्धता होती. महात्माजींचा उदय होत होता, तेव्हा त्यांनी यापुढचे तुमचे तेच खरे नेते होत, असें अनेकांना पूर्ण स्थितप्रज्ञ-वृत्तीने सांगितलें. ते म्हणाले, " असह-कारितेवांचून गत्यंतर नाही, हें तत्त्व मला पूर्ण मान्य आहे; परंतु लोकांची तयारी नाही म्हणून मी स्वस्थ आहें. महात्मा गांधींना तशी तयारी दिसत असेल किंवा तितकी तयारी करवून घेण्यास ते समर्थ असतील, तर लोकांनी सर्वस्व अर्पण करून त्यांना साह्य करावें. आफ्रिकेंतील महात्माजींची चळवळ सर्वांस ठाऊकच आहे व ह्या देशांत देखील ही चळवळ यशस्वीपणें चालवून दाखविण्यास इतका योग्य मनुष्य दुसरा

कोणी नाही, हे निर्विवाद आहे. " (आठवणी खंड २ रा, पृ. २३३). ही वेदान्ती-वृत्तीची परिसीमा आहे. पंचवीस वर्षें अनभिषिक्त सम्राटाचा अनन्यअधिकार गाजविल्यानंतर शांतपणें हा नेता दुसऱ्या उदयोन्मुख नेत्यासाठी सिंहासन रिकामें करतो. या मनाच्या औदार्याला जगांत तोड नाही. राष्ट्रहितबुद्धीची, निर्ममत्वाची ही पराकाष्ठा आहे. हिच्यांतूनच टिळकांची लोकवादी वृत्ति उगम पावली व परिपक्व झाली.

## व्यावहारिक मर्यादा

लो. टिळक वेदान्ती असले तरी त्यांचा वेदान्त व्यवहारी वेदान्त होता. आणि सर्व उदात्त तत्त्वांच्या बाबतींत असें असावेंच लागतें. मानवता, लोकशाही, समाजवाद, समता, बंधुता, स्वातंत्र्य, हीं अतिशय उदात्त तत्त्वें आहेत; पण प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांना पदोपदीं मुरड घालावी लागते. नाही तर स्वार्थी मानव त्यांना विकृत रूप देऊन त्यांचा हेतु विफल व आचार अशक्य करून टाकतो. लोकशाही आणि समाजवाद यांच्या नांवाखाली आज सर्वत्र हेंच चालू आहे. लोकमान्यांना याची पूर्ण जाणीव असल्यामुळे उदात्त तत्त्वांच्या व्यावहारिक मर्यादा कोणत्या तें सांगण्यास ते कधी विसरत नसत. सर्वभूतात्मैक्य, आत्मौपम्य, अद्वैत, चराचराशीं तादात्म्य हीं वेदान्ताचीं प्रधान तत्त्वें होत. त्याविषयी विवेचन करतांना 'सिद्धावस्था आणि व्यवहार' या गीतारहस्यांतील प्रकरणांत ते म्हणतात, "सर्व मानवजातीचें किंबहुना प्राणिमात्राचें ज्याने हित होईल तोच धर्म हा जरी अखेरचा सिद्धान्त आहे, तरी परमावधीची ही स्थिति प्राप्त होण्यास कुलाभिमान, धर्माभिमान, देशाभिमान या चढत्या पायऱ्या असल्यामुळे त्यांची आवश्यकता केव्हाहि नाहीशी होत नाही... आत्मोन्नतीची परमावधीची स्थिति प्राप्त होईपर्यंत इतर राष्ट्रें व समाज यांची स्थिति ध्यानांत घेऊन साधुपुरुषांनी आपआपल्या समाजास तत्तत्कालीं श्रेयस्कर होईल असा देशाभिमानी धर्मच त्यास उपदेशिला पाहिजे. समाजसुधारणेच्या दृष्टीने पाहिलें तर कुलाभिमान जें विशिष्ट कार्य करतो तें केवळ देशाभिमानाने होत नाही, आणि देशाभिमानाचें कार्य निव्वळ सर्वभूतात्मैक्य-दृष्टीने सिद्ध होत नाही." (पृ. ३९७).

## खोटा वेदान्त

नागपूरचे धुंडिराजपंत ठेंगडी यांनी टिळकांची एक आठवण दिली आहे. ते मानवतावादी होते. त्यामुळे 'स्वदेशी'ला त्यांचा विरोध होता. ते टिळकांना म्हणाले, "या चळवळीने आपण मानवजातीच्या उत्कर्षास विघ्न आणीत आहां. खुल्या व्यापाराचें तत्त्व आपणांस मान्य असूं नये हा चमत्कार आहे!" त्यावर टिळक शांतपणें म्हणाले, "होय. तुमचें म्हणणें बरोबर आहे. सर्व मानवजातीच्या दृष्टीने जेव्हा विचार कराल तेव्हा तुमचेंच म्हणणें खरें आहे; पण आज प्रथम आपणांस आपल्या देशापुरताच विचार करावयाचा आहे ना? शरीराच्या एकाच अवयवांतून रक्तस्राव होत असल्यास, बाकीच्या सर्व अवयवांकडे दुर्लक्ष करून प्रथम त्याच्याकडे लक्ष द्यावें लागतें. त्याचप्रमाणे सरकारने धुळीस मिळविलेल्या आपल्या उद्योगधंद्यांचें

प्रथम संरक्षण करून नंतर त्यांची भरभराट झाल्यावर मग तुम्ही म्हणतां त्या तत्त्वज्ञानास प्रारंभ होतो. एरवी हा वेदान्त खोटा आहे व म्हणूनच स्वदेशी चळवळ केल्याखेरीज गत्यंतर नाही." ठेंगडी म्हणतात, "या उपदेशामुळे माझी समजूत पटली व तेव्हापासून मी पूर्ण स्वदेशी बनलों." (आठवणी खंड २ रा, पृ. ४५३).

## पाय जमिनीवर

जागतिक शांतता, सहजीवन, जगांतील कामगारांचें ऐक्य, सत्य, अहिंसा, अलिप्तता, विश्वराष्ट्रवाद, या उदात्त तत्त्वांची जगांत कोणती विटंबना आज होत आहे, हें सर्वांना दिसतच आहे. जे धूर्त आहेत ते मुखाने हीं तत्त्वें सतत उच्चारतात; पण राष्ट्रीय स्वार्थ साधण्याच्या हेतूनेच त्यांचा ते उपयोग करतात. जे अव्यवहारी, स्वप्नमग्न, एकांतिक असतात ते या तत्त्वांमुळे फक्त स्वदेशाचा घात करून घेतात. असें होऊं नये म्हणून टिळक अखंड सावधगिरी बाळगीत. प्रतियोगी सहकारितेच्या वादांत, कलकत्त्याचे बॅ. लाहिरी टिळकांशीं चर्चा करीत होते. त्यांना प्रतियोगी सहकारिता मान्य नव्हती. तेव्हा टिळक त्यांना म्हणाले, "लाहिरी, राजकारणांतहि तुम्ही व्यवहारी असलें पाहिजे. आपली वास्तव परिस्थिति तुम्ही कधी विसरूं नका. उत्साह, भावना या शक्ति नेहमी आपल्या स्वाधीन असल्या पाहिजेत. त्यांच्या आहारीं आपण गेलों की घात झालाच. मान सदैव ताठ असावी हें खरें; पण पाय नेहमी जमिनीवरच असले पाहिजेत." लाहिरी म्हणतात, "तेव्हापासून हा उपदेश म्हणजे माझी गीता झाली; आणि सर्व सुशिक्षित व विचारी भारतीयांचीहि तीच गीता होत आहे, असें वाटतें." ( आठवणी खंड २ रा , पृ. ६२४ ).

दुर्दैवाने लाहिरी यांची ही अपेक्षा खरी ठरली नाही. परराष्ट्रीय राजकारण, हिंदु-मुस्लिम संघर्ष, कम्युनिझम, समाजवाद, राष्ट्रीयीकरण या प्रत्येक बाबतींत आपण अधांतरी चालून आत्मघात करून घेत आहों.

## शांत तेज

देशबंधु दास म्हणतात, "लोकमान्य जन्माने क्रांतिकारक होते काय ? मुळीच नाही. उड्डाण, भरारी हें त्यांच्या स्वभावांतच नव्हतें. दृढ, संथ पावलें टाकणें, जें अल्प मिळेल तें खिशांत टाकून पुढच्यासाठी लढत राहणें, ध्येयावरची दृष्टि अचल राखून सतत तडजोडीला, समेटाला तयार असणें ही त्यांची वृत्ति होती. तुटत्या ताऱ्याची झगझग, किंवा विजेचा क्षणभरचा लखलखाट हें त्यांच्या चरित्रांत नाही. स्वयंप्रभ ताऱ्याप्रमाणे त्यांचें तेज शांत होतें. ते जनतेंतून वर आले होते; आणि अखेरपर्यंत जनतेच्या बरोबर राहून तिच्या चालीनेच ते चालत राहिले. त्यामुळे त्यांचें पाऊल पडे तें निर्भयपणें व दृढनिश्चयाने पडे; आणि मग तें पाऊल ते प्राणांतींहि मागे घेत नसत. गीतारहस्याचा हा कर्ता कर्मयोगी होता व अखंड, अविरत कर्म हें त्याचें ब्रीदवाक्य होतें." ( चित्तरंजन दास – आठवण, (सारार्थ), खंड २ रा, पृ. ६२२ ).

## अलौकिक मुत्सद्देगिरी

लो. टिळकांची वृत्ति अशी शांत, धीरगंभीर, दृढ व संथ असल्यामुळे, उत्साह, भावना यांच्या ते कधी आहारीं जात नसल्यामुळेच ते फार मोठे राजकीय मुत्सद्दी होऊं शकले. मुत्सद्दी कधीहि भावनावश होत नाही. ध्येयावर त्याची दृष्टि अविचल असली तरी त्याचे पाय कायम जमिनीवर असतात. विष्णुशास्त्री यांची निबंधमाला वाचूनच त्यांचे सहकारी होण्याचें टिळकांनी ठरविलें. त्यामुळे प्रारंभापासूनच इंग्रजी राज्याविषयी कडवा द्वेष त्यांच्या चित्तांत असला पाहिजे, हें उघड आहे; पण आरंभीं वीस-पंचवीस वर्षें त्यांनी त्याची वाच्यता केली नाही. इंग्रजी राज्यापासून आमचे खूप फायदे आहेत, तें येथे दीर्घकाल टिकलें पाहिजे, त्याविरुद्ध बंड करणें योग्य नव्हे, आम्ही अत्यंत राजनिष्ठ आहों, असेंच ते म्हणत, सांगत, लिहीत राहिले. मुद्दाम होऊन ते राजनिष्ठा प्रगट करीत असत; पण वंगभंगाच्या चळवळीपासून त्यांची भाषा बदलली. त्या वेळीं ते सरकारवर कडक, प्रखर टीका करूं लागले. पण त्या वेळीं त्यांनी इंग्रजी बादशहा व नोकरशाही म्हणजे स्टेट सेक्रेटरीपासून साध्या सार्जंटापर्यंतचे अधिकारी हा जो भेद केला त्यांत त्यांची अलौकिक मुत्सद्दिगिरी दिसून आली. यामुळे त्यांना सरकारवर वाटेल ती टीका करूनहि, हा राजद्रोह नव्हे, ही साधी कारभारी बदलण्याची मागणी आहे, असें म्हणतां आलें. होमरूल लीगच्या स्थापनेनंतर त्यांचीं बेळगाव व नगर येथे जीं व्याख्यानें झालीं तीं या दृष्टीने वाचण्याजोगीं आहेत.

ते म्हणाले, " इंग्रजी राष्ट्राच्या मदतीने, सहानुभूतीने, त्यांच्या देखरेखी-खाली आम्हांस आमचें कल्याण करून घ्यावयाचें आहे ही गोष्ट खरी; पण ज्याच्या साहाय्याने ही गोष्ट घडावयाची तें सरकार अव्यक्तच आहे. परब्रह्माहून माया जशी वेगळी तसेंच अव्यक्त सरकारापासून व्यक्त सरकार हें वेगळें असतें. हें व्यक्त सरकार वेळोवेळीं पालटतें. अव्यक्त सरकार आम्ही बदलूं इच्छित नाही. पण व्यक्त सरकार बदलावें असें आमचें म्हणणें आहे. " अव्यक्त सरकार म्हणजे बादशहा व व्यक्त सरकार म्हणजे नोकरशाही हा भेद पुढे व्याख्यानांत त्यांनी अनेक वेळा स्पष्ट केला आहे. " पुन्हा सांगतों की, आमची तक्रार राजा, बादशहा यांच्याबद्दल नाही. मधल्या देवतांविषयी आमची तक्रार आहे. . .प्रधानाने राजीनामा द्यावा, असें म्हणण्यांत राजद्रोह नाही. होमरूल दिलें म्हणजे इंग्रजांचें राज्य बुडेल असें नाही. ज्या दारांतून आम्ही बाहेर जाऊं म्हणतों तेथे ब्युरॉक्रसी उभी आहे. तिला – त्या नोकरशाहीला – धक्का देऊन आम्हांला बाहेर जाणें आहे. " " आम्हांला धनी चालतों, पण मधले कोठावळे ( व्हाइसरॉय, गव्हर्नर, कलेक्टर इत्यादि ) चालत नाहीत. ते गेले पाहि-जेत व त्यांचे अधिकार लोकांना मिळाले पाहिजेत. स्वराज्य मिळविणें म्हणजे इंग्रजी सत्ता किंवा बादशाही काढून टाकणें नव्हे. " १९१६ सालीं टिळकांच्यावर तिसऱ्याने खटला झाला; पण त्यांतून ते निर्दोष म्हणून सुटले त्याचें कारण हेंच. हा भेद

हायकोर्टाच्या दोन्ही न्यायाधीशांनी मान्य केला, आणि नोकरशाहीविषयी, अप्रीति म्हणजे राजद्रोह होत नाही, असा निकाल दिला. हा सारा टिळकांच्या मुत्सद्देगिरीचा विजय होय.

## स्वातंत्र्य अंतिम साध्य

पण बादशहा व नोकरशाही या भेदापेक्षा आणखी एक निराळा सूक्ष्म भेद त्यांनी १९०७–८ सालीं मांडावयास प्रारंभ केला होता. त्यांत त्यांची खरी प्रज्ञा दिसून येते. त्यांना केवळ साम्राज्यांतील स्वराज्याचाच नव्हे, तर पूर्ण स्वातंत्र्याचा संदेश लोकांना द्यावयाचा होता. तो तर उघड राजद्रोह झाला असता; पण तोहि राजद्रोह नव्हे, हें टिळकांनी स्टेट सेक्रेटरी मोर्ले यांच्या आधारानेच दाखवून दिलें. त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ असा की, स्वातंत्र्य हें आमचें अंतिम साध्य आहे. ती आमची अंतिम आकांक्षा आहे; आणि अशी अंतिम वासना कोणती तें सांगणें यांत राजद्रोह नाही. ' फेथ अँड ॲस्पिरेशन्स ' हीं पीनल कोडाच्या मर्यादेंत येत नाहीत, असें खुद्द मोर्लेसाहेबांनीच सांगितलें आहे. अंतिम हेतु साध्य करण्याचीं जीं साधनें तीं पीनल कोडाच्या मर्यादेंत येतात; पण अंतिम हेतु किंवा उच्च असें अखेरचें प्राप्तव्य लोकांना समजावून देण्याचा प्रयत्न हा कायद्यांत येणार नाही. हा महत्त्वाचा भेद आपण लक्षांत ठेवला पाहिजे. सुरत, धुळें व अकोला येथील व्याख्यानांत स्वातंत्र्य, पूर्ण स्वातंत्र्य असे शब्द वापरून त्यांनी पुनः पुन्हा हा भेद स्पष्ट केला आहे. ( व्याख्यानें, पृ. ११७, २२३, २४३ ). अकोल्याच्या व्याख्यानांत तर, " ज्याला स्वातंत्र्य हें नैसर्गिक वाटत नाही तो पशु समजावा ", असें त्यांनी स्वच्छ म्हटलें आहे.

बादशहा व नोकरशाही हा भेद आणि अंतिम प्राप्तव्य व तें साध्य करण्याचे मार्ग हा भेद – असे भेद केल्यामुळे टिळकांना अनेक वर्षे राजद्रोहाच्या पकडींत न सापडतां जनजागृति करतां आली, लोकांच्यांत निर्भयता व धैर्य जोपासतां आलें व इंग्रज सरकारशीं लढा करण्याची सिद्धता करतां आली. १९०८ सालीं त्यांना शिक्षा झाली त्या वेळीं पूर्ण स्वातंत्र्यासंबंधीचीं सर्व व्याख्यानें सरकारपुढे होतीं; पण खटल्यांत तीं गोविलीं गेलीं नव्हतीं. टिळक अत्याचाराला उत्तेजन देतात यावर सरकारचा सर्व भर होता; आणि ते लेख टिळकांनी लिहिलेले नव्हते. तेव्हा स्वराज्य आणि पूर्ण स्वातंत्र्य यांची प्रेरणा देऊनहि टिळकांनी ती अशा पद्धतीने दिली की, ती राजद्रोहाच्या कक्षेंत येऊं नये. त्यांची राजकीय मुत्सद्देगिरी ती हीच.

## कायदा आणि नीति

ह्या दोन भेदांप्रमाणेच कायदा व नीति ह्यांत भेद करून टिळकांनी इंग्रजी राज्यामागची सर्व पुण्याईच काढून घेतली. ते म्हणाले की, जें कायदेशीर असतें तें नीतियुक्त असतेंच असें नाही. सरकारला आपल्या लहरीप्रमाणे कायदे करतां येतात. औरंगजेब तसेच करीत असे; पण तेवढ्यामुळे त्याचे कायदे जुलमी नव्हते किंवा न्याय्य होते असें ठरत नाही. तसेंच सध्याच्या सरकारचें आहे. त्यांचीं कृत्यें कायदे-

शीर असलीं तरी तीं जुलमी आहेत. त्यांना नीतीचा आधार नाही- म्हणूनच स्वतःचा बळी देऊनहि त्यांचा प्रतिकार करण्याचा प्रजेला हक्क आहे.

लो. टिळक केवढे महाप्रज्ञावंत मुत्सद्दी होते हें यावरून दिसून येईल. काव्हूर, बिस्मार्क, क्लेमेंको, फ्रँकलिन रूझवेल्ट यांचीं नांवें थोर मुत्सद्दी म्हणून आज जगांत प्रसिद्ध आहेत. चाणक्य, नाना फडणीस हीं आपल्याकडचीं नांवें अशींच प्रसिद्ध आहेत. पण ह्या थोर पुरुषांच्या पुढे जें कार्य होतें त्याच्यापेक्षा टिळकांचें कार्य फार मोठें, आणि त्यांचें कार्यक्षेत्रहि अतिशय मोठें असें होतें. एका सबंध लोकसमूहाला शेकडो वर्षांच्या निद्रेंतून जागे करून त्यांना अर्वाचीन राष्ट्राचे नागरिक बनविणें हें टिळकांचें कार्य होतें आणि काव्हूर, बिस्मार्क यांच्यापेक्षा त्यांचा देश दसपटींनी मोठा होता. असें असूनहि तीस-चाळीस वर्षांच्या अवधींत त्यांनी त्या समूहांत फार मोठें मानसिक परिवर्तन घडवून आणलें आणि राष्ट्रासाठी वाटेल त्या त्यागास सिद्ध होण्याइतकी जागृति येथे घडवून आणली. तें करतांना त्यांनी जी भाषा वापरली, जे युक्तिवाद मांडले, जें राजकीय तत्त्वज्ञान सांगितलें आणि तें ज्या पद्धतीने सांगितलें त्या सर्वांवरून त्यांची असामान्य राजकीय प्रज्ञा स्पष्ट प्रत्ययास येते. अशी ही असामान्य प्रज्ञा राष्ट्रकार्यासाठी सर्वस्वीं अर्पण करणारा हा महापुरुष भारताला लाभला हें त्याचें थोर भाग्य होय.

## एकमेव उद्दिष्ट

लोकमान्यांचा वेदान्त जसा राष्ट्रार्थैकफल होता, तशीच त्यांची विद्वता, त्यांचें ज्ञान, त्यांचा व्यासंग राष्ट्रार्थैकफलच होता. त्यांच्या व्यासंगाला तोडच नव्हती, त्यांचें ज्ञानभांडार अगाध होतें, त्यांची विद्वत्ता अतुल होती; पण स्वतःच्या राष्ट्राचा उत्कर्ष हेंच त्या सर्वांचें उद्दिष्ट होतें. 'मृगशीर्ष', 'आर्यांचें मूलस्थान' हे ग्रंथ त्यांनी कशासाठी लिहिले ? हिंदूंची प्राचीन संस्कृति जगांतल्या इतर कोणत्याहि संस्कृती-पेक्षा जास्त पुरातन आहे, हें सिद्ध करून या समाजाचा मरगळलेला, लुप्त झालेला, आत्मप्रत्यय जागृत करण्यासाठी ! गीतारहस्य त्यांनी कशासाठी लिहिलें ? निवृत्ति, कर्मसंन्यास ही या राष्ट्राला जडलेली व्याधी नष्ट करण्यासाठी. प्रवृत्तिमार्गाकडे समाजाला नेल्यावांचून राष्ट्राच्या अभ्युदयास अवश्य असलेला उद्योग त्याच्या हातून होणें शक्यच नव्हतें. इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, ज्योतिष, भूगोल, खगोल, गणित, पुरातत्त्व, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, सर्व सर्व शास्त्रांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. जगतांतील पंडितांच्या अग्रमालिकेंत त्यांना त्यामुळे स्थानहि मिळालेलें आहे. पण भारतांत लोकशाहीचीं तत्त्वें प्रस्थापित करावीं, येथल्या उद्योग-धंद्यांचा, शेतीचा उत्कर्ष साधावा, येथल्या धर्माचें पुनरुज्जीवन करून 'धारणाद्धर्म' ही व्याख्या सार्थ करावी, या समाजाला विज्ञान-दृष्टि द्यावी, त्याचा स्वाभिमान जागृत करावा आणि राष्ट्रतत्त्वावर त्याला संघटित करून स्वातंत्र्य हें उद्दिष्ट गाठावें हेंच त्या सर्व पांडित्यामागे एकमेव उद्दिष्ट होतें.

## कला कशासाठी?

ललितकलांकडे पाहण्याचा लोकमान्यांचा दृष्टिकोण आपण ध्यानांत घेतला, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें हें रहस्य आपल्याला सहज कळून येईल. त्यांना ललित-कलांची अभिरुचि फारशी नव्हती. एका गायनाच्या मैफलींत, त्यांचें गाण्याकडे मुळीच लक्ष नाही, हें पाहून त्यांना एका गृहस्थाने विचारलें, " महाराज, आपल्याला गाण्याची विशेष अभिरुचि फारशी दिसत नाही. एवढीच कला आपल्या हातून हस्त-गत व्हावयाची कशी राहिली ?" लोकमान्य म्हणाले, "भगवंताच्या मुखाने गाइलेलें गाणें ( भगवद्गीता ) ऐकल्यामुळे मानवगीत मला रुचेनासें झालें. " पण मानवगीत व एकंदर मानवी कला त्यांना आवडत नसल्या तरी, राष्ट्रीय जीवनांतील त्यांचें महत्त्व त्यांनी जाणलें होतें. एकदा गायकवाडवाड्यांत, गणपत्युत्सवांत भास्करबुवा बखले यांचें गायन होतें. बैठक संपल्यावर लोकमान्य त्यांना म्हणाले, " भास्कर-बोवा, मला जरी गाण्याची विशेष आवड व शोक नाही तरी, एके काळीं आपल्या भारतवर्षांत उत्कर्षाच्या शिखरास पोचलेल्या या पंचम वेदाबद्दल मला फार आदर आहे. आणि या गहन व ईश्वरदत्त कलेमध्ये आपण परिश्रमपूर्वक यश मिळविल्या-बद्दल मला फार आनंद होतो व अभिमान वाटतो. मला गायनशास्त्राकडे लक्ष देण्यास मुळी कधी फुरसतच झाली नाही; पण आपलें गाणें ऐकल्यानंतर या विद्येची अपूर्वता मला कांहींशी कळली. "

मास्टर कृष्णराव यांच्या या आठवणीप्रमाणेच नारायणरावांचीहि आठवण उद्बोधक आहे. एकदा विद्याहरण हें नाटक पाहण्यासाठी त्यांनी लोकमान्यांना बोला-विलें होतें. नाटक पाहून झाल्यावर बालगंधर्वांना टिळक म्हणाले, "आमच्या कृष्णाजी-पंतांनी अशींच आणखी नाटकें लिहिलीं, तर हल्लीच्या परिस्थितीला त्यांचा विशेष उपयोग होणार आहे. जर्मनीमध्ये तर एका विशिष्ट हेतूनेच हल्ली नाटकें लिहिलीं जातात व करमणुकीबरोबर राष्ट्रास योग्य असें शिक्षण देण्याकडे त्यांचा कटाक्ष असतो. आमच्या व्याख्यानास जसे ठराविक लोक येतात तसाच तुमच्या नाटकांचाहि ठराविक प्रेक्षकवर्ग आहे. म्हणून ज्ञान देण्याच्या बाबतींत त्याचीहि उपेक्षा होतां कामा नये. "

## आत्माविष्कार

लो. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर वर्णिलेले सर्व गुणविशेष त्यांच्या बहुविध ग्रंथ-निबंध-रचनेंत आणि व्याख्यानांत स्पष्टपणें दिसून येतात. वाङ्मयांत आत्मा-विष्कार होतो, असें साहित्यशास्त्रज्ञ म्हणतात. " यादृशः पुरुषस्यात्मा तादृशं संप्र-भाषते ", असें महाभारतांतहि म्हटलें आहे. लो. टिळकांच्या बाबतींत तें अगदी यथार्थ आहे, असें दिसून येतें. त्यांचा अगाध व्यासंग, त्यांची लालित्याची नावड, त्यांची स्थितप्रज्ञ निश्चल वृत्ति, त्यांचा संस्कृत विद्येचा व प्राचीन परंपरेचा अभिमान ह्या सर्व विशेषांचें प्रतिबिंब त्यांच्या सर्व लेखनांत स्वच्छपणें पडलेलें आहे.

## ज्ञाननिष्ठा

टिळकांचा व्यासंग फार मोठा होता, अगाध होता, असें म्हणणें म्हणजे सूर्याच्या ठायीं तेज आहे, प्रकाश आहे, असें सांगण्यासारखेंच आहे; पण तरीहि सूर्याचें स्तोत्र आपण गातों, तसेंच टिळकांच्या व्यासंगाचें थोडें वर्णन करण्यास हरकत नाही. वेद, उपनिषदें, महाभारत, रामायण, स्मृति, कालिदास, भवभूति – ही संस्कृत सरस्वती तर त्यांच्या जिव्हेवर अखंड नाचत होतीच; पण आपलें प्रतिपादन अर्वाचीन पद्धतीने, बुद्धीला पटवून देण्याच्या हेतूने, त्यांना करावयाचें असल्यामुळे पाश्चात्त्य विद्येंतील तत्त्वज्ञान व भौतिकशास्त्रें त्यांनी आत्मसात् करून टाकलीं होतीं. गीतारहस्य लिहितांना सर्व भारतीय तत्त्ववेत्ते व संत यांच्याबरोबरच प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्यापासून कांट, शोपेनहार, बेंथाम, मिल्ल, ग्रीन हे सर्व तत्त्ववेत्ते व डाल्टन, डार्विन, हेकेल, हे शास्त्रज्ञ यांच्या ग्रंथांचा सखोल अभ्यास त्यांनी केला व त्या पायावर गीतारहस्यांतील सिद्धान्तांची उभारणी केली. 'मृगशीर्ष' व 'आर्यांचें मूलस्थान' या ग्रंथांसाठी त्यांना भूगोल, खगोल, पुरातत्त्व, पदार्थविज्ञान, गणित हीं सर्व शास्त्रें सूक्ष्मपणें अभ्यासावीं लागलीं. हें त्यांच्या जगविख्यात ग्रंथांविषयी झालें. त्यांचे केसरींतील लेख हें त्या मानाने स्फुट-लेखन होतें. तें प्रासंगिक वृत्तपत्रीय लेखन होतें, पण तेंहि लेखन ज्ञानपरिपूरित असेंच आहे. त्यांना राजकीय विषयांवर लिहावयाचें होतें, इंग्रज सरकारविरुद्ध लिहावयाचें होतें; पण त्यांना प्रचारकी लेखन करावयाचें नव्हतें. तर नवें राजकीय तत्त्वज्ञान या देशाला सांगून राष्ट्रीयत्व व लोकशाही यांचा पाया घालावयाचा होता. त्यामुळे हे लेखहि त्यांनी शास्त्रीय पद्धतीने व्यासंग करूनच लिहिले. बहिष्कार हा विषय येतांच इटली, चीन, अमेरिका यांनी परकी मालावर बहिष्कार घालून आक्रमकांना कसें नमविलें हा सर्व इतिहास ते सांगतात. उद्योगधंदे, कारखाने, कापड, सूत यांच्या गिरण्या हा विषय मांडतांना वेदकाळापासून भारतांत उद्योगधंद्याची काय स्थिति होती, पाश्चात्त्य देशांत काय होती, त्यांच्या मागचे अर्थशास्त्रीय सिद्धान्त वारंवार कसे बदलत गेले, हें सांगून इंग्रजी राज्यामुळे या देशाला दारिद्रच व अवकळा आलेली आहे, हा आपला सिद्धान्त ते मांडतात. स्थानिक स्वराज्य, ज्यूरीची पद्धति, प्लेगचे इनॉक्युलेशन – कोणताहि विषय असू द्या. त्या त्या विषयाच्या शास्त्रज्ञांना नसेल इतकी माहिती टिळक जमा करीत; आणि बिनतोड युक्तिवाद करून प्रतिपक्षाला नामोहरम करीत. टिळकांच्या नंतर भारतीय राजकारणांत व्यासंगाची, ज्ञानष्ठिची ही परंपरा लुप्त झाली हें दुर्दैव होय.

## खंडन-मंडन

अगाध व्यासंगाप्रमाणेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या लेखनांत आविष्कृत होणारा दुसरा गुणविशेष म्हणजे त्यांचें खंडन-मंडन-कौशल्य आणि युक्तिवाद-नैपुण्य. 'मिल्ल आणि मोर्ले' 'अध्यक्षांचे अधिकार', 'हिंदी स्वराज्य संघ' यांसारख्या लेखांत हें नैपुण्य अगदी टिपेस गेलेलें दिसतें. मोर्ले हे त्या वेळचे स्टेट सेक्रेटरी. त्यांनी 'हिंदु-

स्थानावर परकी राज्य असणेंच हितावह आहे " असें सांगून त्यासाठी ' प्रतिनिधि-सत्ताक पद्धति ' या मिल्लच्या ग्रंथाचा आधार दिला आहे. त्यावर टीका करतांना मूळ ग्रंथांतील अवतरणें घेऊन टिळकांनी प्रथम हें दाखवून दिलें की, मोर्ले यांनी मिल्लचीं वाक्यें मागचा-पुढचा संदर्भ सोडून घेतलीं असून तीं अपुरीं व तुटकीं आहेत. आणि मग मिल्लच्या सर्व प्रतिपादनाचा मथितार्थ देऊन म्हटलें आहे की, " मोर्लेसाहेबांनी आपली दिवटी मिल्लसाहेबांच्या मशालीपासून पेटवून घेतली असेल, पण त्यांचे थोर गुण त्यांच्या अंगीं नसल्यामुळे, त्या दिवटींतून उजेडापेक्षा धूरच अधिक निघाला आहे. " सुरतेच्या काँग्रेसच्या अधिवेशनांत टिळकांनी अध्यक्षांचा उपमर्द केला असा मवाळांनी त्यांच्यावर आरोप केला. त्याला ' अध्यक्षांचे अधिकार ' या लेखत्रयींत टिळकांनी उत्तर दिलें आहे. त्यांतला पहिला मुद्दा हा की, पिता काय, गुरु काय किंवा अध्यक्ष काय, ते कल्याण-बुद्धीने वागतात तोंपर्यंतच त्यांची प्रतिष्ठा असते. ते जर आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून मुलाचा, शिष्याचा वा सभाजनांचा घात करूं लागले तर त्यांची अवज्ञा वा उपमर्द करूनच त्यांचा मान राखला पाहिजे. हा मुद्दा मांडून मग टिळकांनी अर्सकिन, मे, पालग्रेव्ह, ल्यूसी, डॉ. स्मिथ इत्यादि अनेक पाश्चात्त्य पंडितांच्या आधारे सर्व सभाशास्त्राचें तत्त्वज्ञानच सांगितलें आहे व आपल्यावरच्या आरोपाचें खंडन केलें आहे. ' हिंदी स्वराज्य संघ ' या लेखमालेंत राज्यशास्त्रांतील अनेक तत्त्वें, हिंदुस्थानचा प्राचीन राज्यकारभार, ब्रिटिश पार्लमेंटांतील रीतिरिवाज, या विषयांचा ऊहापोह करून हिंदुस्थानच्या स्वराज्याची घटना काय स्वरूपाची असावी हें सांगितलें आहे. आणि जातां जातां होमरूलच्या मागणीवर येणाऱ्या आक्षेपांचें साधार, सप्रमाण खंडन केलें आहे. ' हिंदुस्थानांतल्या प्रजेची अस्वस्थता ', ' शिवाजी आणि ब्राह्मण ', ' राष्ट्रीय शिक्षण ' या लेखांत धीरनपाल, मॉरिसन, हिस्टॉरिकस या आक्षेपकांचा टिळकांनी जो परामर्श घेतला आहे त्यांत त्यांच्या बिनतोड युक्तिवादाचीं अशींच आणखी अनेक उदाहरणें सापडतील.

## साधी सरळ टीका

प्रतिपक्षाच्या आक्षेपांचें, आरोपांचें, त्यांच्या सिद्धान्तांचें खंडन करतांना टिळक, विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणे व्याजोक्ति-वक्रोक्तीचा आश्रय करीत नाहीत किंवा भावनावेगहि प्रकट करीत नाहीत. त्यांच्या लेखणींत हे गुण नाहीत असें नाही, पण ते अपवादात्मक. आधार-प्रमाणें व मुद्दे सांगतांना ते प्रतिपक्षावर साधी सरळ टीका करतात. हें म्हणणें एकतर्फी व चुकीचें आहे, हें मत निर्मूल निराधार आहे, अशास्त्रीय आहे, वेडगळ आहे, हें प्रतिपादन असमंजसपणाचें, मानभावी आहे. हें बालिश आहे, पोरकट आहे. अशी त्यांची टीका बहुधा असते. लॉर्ड सँडर्स्ट हे गव्हर्नर-पदाला अयोग्य आहेत, नालायक आहेत, असें ते म्हणतात. ते फार रागावले तर ' मुंबईच्या टाइम्सचा हा बेशरमपणा ' आहे, लुब्रेपणा आहे, त्याने सर्व आयुष्य श्वान-वृत्तींत घातलें आहे ' अशी तीव्र टीका ते करतात. लोकांच्या मनांत इंग्रज सरकार-

विषयी संताप यावा, चीड यावी, द्वेष निपजावा हाच त्यांचा हेतु असतो; पण लेख लिहितांना ते स्वत: या भावनांच्या अधीन न होतां, त्यांना सांगतात की, या अन्यायाचा प्रतिकार माथेफिरूपणाने केला तरी चालेल, याच्याविषयी आम्हांला त्वेष आला पाहिजे, फाशी, हद्दपारी सोसण्याचीहि आपण तयारी ठेविली पाहिजे ! या प्रतिपादनांतील भाव अत्यंत जळजळीत व जहरी असा आहे, पण त्यांची भाषा तार्किक प्रतिपादनासारखी आहे. टिळकांच्या गद्य-शैलीचा व वक्तृत्वशैलीचा हा फ़ार मोठा विशेष आहे.

## गद्य-दृष्टान्त

लालित्य, सौंदर्य, यांची टिळकांना स्वभावत:च फारशी अभिरुचि नव्हती, हें मागें, गायन, नाटय या कलांविषयीचे त्यांचे उद्‌गार दिले आहेत, त्यांवरून ध्यानांत येईल. भाषेच्या शृंगाराविषयी त्यांची अशीच दृष्टि होती. उपमा-दृष्टान्त ते देत, पण ते विचार समजावून देण्यापुरते. त्यांतून कांही सौंदर्य निर्माण करावें अशी त्यांची वृत्तीच नव्हती. लोकांच्या बुद्धीला आवाहन करावें, त्यांच्या बुद्धीला पटवून द्यावें एवढेंच उद्दिष्ट त्यांच्यासमोर असे. त्यामुळे पुष्कळ वेळा अध्यात्म, ज्योतिष, वैद्यक या शास्त्रांतले दृष्टान्त ते देत. बादशहा व नोकरशाही यांच्यांत भेद करतांना त्यांनी परब्रह्म आणि माया यांचा दृष्टान्त दिला आहे, हें मागें आलेंच आहे. राष्ट्रीयत्वाच्या उदयास प्रारंभ कोठून होतो ? राष्ट्रीय अहंकारांतून. सांख्य-मताने सर्व सृष्टीचीच निर्मिति अशी होते. मूलप्रकृतीपासून बुद्धि निर्माण झाली की तींतून पहिलें तत्त्व निर्माण होतें तें म्हणजे अहंकार ! राष्ट्राचें असेंच आहे. लॉर्ड कर्झन हे व्हाइसरॉय कसे आहेत ? लोकांचा सर्वनाश करण्यासाठी आलेल्या धूमकेतूसारखे. सूर्यमालेंत कांही ग्रह, उपग्रह व कांही धूमकेतूहि असतात. त्याचप्रमाणे बादशहांच्या भोवतीं फिरणाऱ्या मुत्सद्दी मंडळांतहि कांही धूमकेतु असतात. लॉर्ड कर्झन हे अशांपैकीच एक ! श्रीशिवजयंतीसारखे राष्ट्रीय उत्सव हे कांही विशिष्ट हक्क किंवा सद्य:फल मिळविण्यासाठी नसतात. राष्ट्राचें जीवित्व कायम राखण्यासाठी ते करावयाचे असतात. वैद्यकशास्त्रांतील दृष्टान्त घ्यावयाचा झाल्यास असल्या उत्सवांची गणना ताप, खोकला, दमा यांवरील औषधांत न करितां सामान्य आयुर्वर्धक किंवा शक्तिवर्धक उपायांत (टॉनिकांत) करावी लागेल. स्वराज्याची कल्पना आम्ही कांही काळ विसरलों होतों हें खरें, पण अग्नीवर राख जमलेली असली तरी आंत विस्तव असतो त्याप्रमाणे स्वराज्याचें आम्हांला सतत मनांत स्मरण असतें. मोर्लेसाहेबांनी देऊं केलेल्या सुधारणा कशा आहेत ? टोणग्याच्या आचळासारख्या ! सर भालचंद्र चंदावरकर हे सरकारपुढे लाचार होतात याबद्दल त्यांना दोष देण्यांत अर्थ नाही. तो त्यांचा जन्मस्वभाव आहे. कोल्ह्याच्या अंगीं धैर्य नाही म्हणून त्याला आपण नांवें ठेवूं काय ?

## पिण्डेष्वनास्था

लोकमान्यांचे उपमा-दृष्टान्त असे प्राय: अगदी प्राकृत, गद्य व व्यवहारी असतात. बाह्योपचारांच्या बाबतींत ते स्वत: अगदी रूक्ष व कठोर असत. डोक्याला त्यांनी कधी कोणाकडून तेलहि लावून घेतलें नाही. पत्नीकडून सुद्धा. आपलें सर्व जीवन जणू त्यांनी अग्निज्वाळेवर कायम धरलेलें होतें. " एकान्तविध्वंसिषु मद्विधानां पिण्डेष्वनास्था खलु भौतिकेषु " (नाशवंत अशा या जड देहावर माझ्यासारख्यांची मुळीच आसक्ति नसते) अशी दिलीप राजाप्रमाणेच त्यांची वृत्ति होती. हीच त्यांची वृत्ति आपल्या तात्त्विक सिद्धान्ताचा देह म्हणजे जी भाषा तिच्याविषयी होती असें दिसतें. महाभारत हा या बाबतींत त्यांचा आदर्श असावा. महाभारतांत साहित्यसौंदर्य निर्माण करण्याचा प्रयत्न दिसत नाही. कालिदास-भवभूति या अभिजातपंथीय कवींच्याप्रमाणे तर नाहीच, पण रामायणासारखा सुद्धा नाही. मानवी जीवनाचा आशय सांगावा, त्यावर भाष्य करावें, त्याचें तत्त्वज्ञान सांगावें, आणि अज्ञानतिमिराने अंध होऊन चाचपडत चालणाऱ्या लोकांच्या डोळ्यांना ज्ञानांजनाने दृष्टि द्यावी, त्यांच्या नेत्रांचें उन्मीलन करावें, हें आपलें उद्दिष्ट असल्याचें वेद व्यासांनी सांगितलें आहे. लो. टिळकांचे तेंच उद्दिष्ट होतें. म्हणून भाषेच्या शृंगाराचा हव्यास त्यांनी धरला नाही.

## गंगौघ

लो. टिळकांनी अनेक अर्वाचीन पाश्चात्त्य विद्यांचा अभ्यास केला. शेकडो युरोपीय पंडितांचे ग्रंथ चाळले, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर वा लेखनावर त्यांचा प्रभाव पडला नाही. विष्णुशास्त्री यांच्या लेखणीवरचा मेकॉले, जॉन्सन यांचा व ग्रीक-रोमन इतिहासाचा प्रभाव स्पष्टपणें दिसून येतो. आगरकरांचे मिल्ल, स्पेन्सर, कोंट हे आदर्श पंडित होते; पण टिळकांच्या मनावर प्रभाव होता तो वेद, उपनिषदें, महाभारत, रामायण, कालिदास, भवभूति, भर्तृहरि यांचा. सर्व पाश्चात्त्य विद्या त्यांना करतलामलकवत् होत्या. त्यांनी त्या पूर्ण आत्मसात् केल्या होत्या. त्यांचें सर्व राजकीय व आर्थिक तत्त्वज्ञान त्यांवरच उभें होतें. पण त्यांच्या मनांत त्यांचें रसायन झाल्यावर त्याचा जो आविष्कार होत असे, तो गंगोत्रींतून झाल्यासारखा दिसे; आणि तो सर्व ओघ गंगौघासारखा वाटे.

## पूर्वसूरींची वाणी

लोकांना त्यांना जो उपदेश करावयाचा होता तो सर्व ते या पूर्वसूरींच्या वाणींतून, वचनांतून करीत. आपण जर एकजूट केली, संघशक्ति निर्माण केली, तर इंग्रजसरकारला आपल्याला वटणीवर आणतां येईल हें सांगतांना " तृणैरावेष्टयते रज्जु: यथा नागोपि बध्यते । " हें वचन त्यांनी दिलें आहे. तृणाची जूट होऊन दोरी झाली की त्याच तृणांनी हत्ती देखील बांधला जातो. स्वदेशी-बहिष्काराच्या चळवळीला

त्यांनी 'बहिष्कारयोग' असें नांव दिलें होतें. म्हणजे हा एक धर्म आहे, असें त्यांना सांगावयाचें होतें. आणि कर्मयोगाचें अल्प आचरण जरी केलें तरी त्याचें जसें मोठें फल मिळतें तसेंच या धर्माचें आहे, हा भावार्थ " स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् । " या गीतावचनाने त्यांनी सांगितला आहे. सरकाशीं लढा करतांना फाशी, हद्दपारीहि सोसावी लागली तरी सोसावी हा विचार ते व्यास-मुखांतून सांगतात. यदि समरमपास्य नास्ति मृत्योः भयमिति युक्तमितोन्यतः प्रयातुम् । अथ मरण-मवश्यमेव जंतोः किमिति वृथा मलिनं यशः कुरुध्व । युद्ध टाळून मृत्यु चुकत असेल तर पळून जाणें युक्त ठरेल, पण मृत्यु कधी टळत नाही. मग उगीच नांवाला कलंक का लावून घेतां ? भिक्षा मागणें, रडणें किंवा इतरांच्या धर्म-बुद्धीवर अवलंबून राहणें, याने राजकीय कामें होत नसतात; तर तीं ज्याने त्याने आपल्या तेजानेच साध्य केलीं पाहिजेत, ही नीति राष्ट्रीय सभेस सांगण्याची आता वेळ आली आहे, असें म्हणून ' राष्ट्रीय सभेच्या कामाची दिशा ' या लेखांत टिळकांनी वनपर्वांतील भीमाच्या तोंडचें "न चार्यो भैक्ष्यचर्येण . . . यतस्व पुरुषर्षभ " हे दोन श्लोक उद्धृत केले आहेत. डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल सेल्बी यांनी, विद्यार्थ्यांनी स्वदेशीच्या चळवळींत पडूं नये, असा उपदेश चालविला होता. त्या वेळीं ' हे आमचे गुरूच नव्हत ' असा प्रहार टिळकांनी केला होता, हें प्रसिद्धच आहे. " गर्वाने फुगून गेलेला, कार्याकार्य न जाणणारा, आणि दुर्मार्गाने जाणारा असा गुरु असेल तर त्याचा त्याग करणेंच योग्य. " या व्यास-वचनाचा आधार त्यांनी त्या वेळीं घेतला होता. होमरूलची चळवळ दडपून टाकण्या-साठी सरकारने बेझंटबाईंना अटक केली; पण त्यामुळे चळवळ उलट जास्तच फोफावली. सरकारने विष म्हणून दिलें, पण त्याचें अमृत झालें. " विषमप्यमृतं क्वचिद् भवेद् अमृतं वा विषमीश्वरेच्छया ", असें कालिदासाने म्हटलेंच आहे. शिवरामपंत परांजपे यांच्या 'काळ' पत्रांत फार राजद्रोही लेख येतात, अशी चहाडी मुंबईच्या 'टाइम्स'ने सरकारकडे केली. तेव्हा शिवरामपंतांची बाजू घेऊन टिळकांनी ' मराठी काळ व इंग्रजी काळ ' हा प्रसिद्ध लेख लिहिला. त्यांत टाइम्स व त्यासारखे चहाडखोर लोक यांवर भर्तृहरीच्या श्लोकांच्या आधारें टिळकांनी कडक टीका केली आणि असले ' नृपांगणगतः खल ' न्यायाच्या केरसुणीने अंगणांतून झाडून काढून अंगण साफ करावें, अशी सरकारला विनंती केली. ही गोष्ट १९०६ सालची. तेव्हा टिळकांनी 'विनंती' हा शब्द वापरला. पुढे १९१७ सालीं गव्हर्नर विलिंग्डन यांनी लष्करभरतीसाठी सभा बोलावली. त्या सभेंत टिळकांनी सांगितलें की, " स्वराज्य व स्वदेश-संरक्षण यांची साखळी आम्हांला तोडतां येणार नाही " हें वाक्य उच्चारतांच गव्हर्नर-साहेबांनी त्यांच्या भाषणास बंदी केली. तेव्हा " अशा परिस्थितींत परिषद् सोडून जाण्याखेरीज कोणाहि स्वाभिमानी माणसास दुसरा मार्ग नाही " असें म्हणून टिळक सभा सोडून निघून गेले; आणि दुसऱ्या दिवशीं केसरीमध्ये ' मय्यप्यास्था न चेत् त्वयि मम सुतराम्, एष राजन् गतोऽस्मि' (' हे राजा तुला माझी परवा नसेल तर

मला तुझी त्याहूनहि नाही, हा मी चाललों.' ) या भर्तृहरीच्या वचनाने गव्हर्नर-साहेबांना सडेतोड उत्तर दिलें.

## दिव्य मूलद्रव्यें

लो. टिळकांची मूर्ति घडवितांना विधात्याने जी महाभूतसमाधि, जीं दिव्य मूलद्रव्यें निवडलीं तीं हीं अशीं होतीं. अचल ध्येयवाद, कार्यैकनिष्ठा, असामान्य धैर्य, स्वयमेव मृगेंद्रता, स्थितप्रज्ञता, विद्वत्ता, व्यासंग, लोकवादी निष्ठा, निःस्सीम राष्ट्र-भक्ति, पराकाष्ठेचें निर्ममत्व, पूर्ण निरंहकारी वृत्ति हीं गुणरत्नें घेऊनच त्याने त्यांचें व्यक्तिमत्त्व घडविलें होतें. त्यामुळेच तीस-चाळीस वर्षांच्या अवधींत धर्माचें पुनरुज्जीवन, स्वराज्याच्या राजनीतिशास्त्राचें प्रवर्तन, राष्ट्रीय अर्थशास्त्राची प्रस्थापना आणि सर्व सामाजिक सुधारणांची पायाभरणी करून अखिल भारतीय समाज ते जागृत व राष्ट्रतत्त्वावर संघटित करूं शकले. या अल्पावधींत त्यांनी या मरगळलेल्या समाजाला संजीवनी दिली आणि त्याला रणयज्ञाची दीक्षा देऊन भारतांत नवी सृष्टि निर्माण करण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त करून दिलें; आणि या लोकांतून जातांना " स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम् " (जो जन्मल्याने सर्व वंश महत्पदास जातो तोच पुरुष खरा जन्मास आला ) हें भर्तृहरीचें वचन ते सार्थ करून गेले. लोकमान्यांच्या जन्मामुळे केवळ टिळकवंशच समुन्नतीला गेला असें नव्हे, तर सारा मानववंशच समुन्नत झाला हें सत्य भावी इतिहास भक्तीने सांगेल.

- ११ -

# सिंहावलोकन

## एक ध्येय

विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर आणि टिळक यांच्या तत्त्वज्ञानाचें व कार्याचें येथवर विवेचन केलें. त्यावरून हें ध्यानांत येईल की या त्रिमूर्तीचें तत्त्वज्ञान हें स्वातंत्र्याचें व राष्ट्रनिर्मितीचें तत्त्वज्ञान होतें. त्या तिघांत इतर अनेक बाबतींत कितीहि मतभेद असले तरी याविषयी त्यांच्यांत मुळीच मतभेद नव्हते. तेव्हा स्वतंत्र राष्ट्राची निर्मिति हें सर्वांचेंच अंतिम उद्दिष्ट असल्यामुळे त्यासाठी प्रथम या देशांत नागरिक निर्माण करणें हा उद्योग त्यांनी आरंभिला. तोपर्यंत या देशांत राजाचे प्रजाजन होते. त्यांचा राज्यकारभाराच्या धोरणाशीं, समाजाच्या उन्नतिअवनतीशीं, कसलाहि संबंध नव्हता. राष्ट्रोत्कर्षाची जबाबदारी माझ्या शिरावर आहे, ही जाणीव त्या प्रजाजनांना मुळीच नव्हती. ही जाणीव असणें हें राष्ट्राच्या नागरिकाचें पहिलें लक्षण होय. ही जाणीव निर्माण होण्यासाठी भौतिक विद्येचें ज्ञान, विचारशक्ति, विचारस्वातंत्र्य, समता, बुद्धिप्रामाण्य, कार्यकारणभावाचें ज्ञान, इहवादीवृत्ति, प्रवृत्तिपरता इत्यादि गुणांची आवश्यकता असते. हें जाणूनच या तीन थोर पुरुषांनी प्रारंभापासून त्या गुणांची येथल्या प्रजाजनांत जोपासना करण्याचे यावत्‌शक्य प्रयत्न केले.

वर सांगितलेले जे व्यक्तिस्वातंत्र्य, समता, प्रवृत्तिपरता इत्यादि नागरिकत्वास अवश्य असणारे गुण त्यांचें प्रतिपादन या त्रिमूर्तीच्या आधी, राममोहन रॉय, दादाभाई, दादोबा पांडुरंग, म. फुले, लोकहितवादी, रानडे, दयानंद इ. जे थोर पुरुष भारतांत होऊन गेले यांनी केलेंच होतें. मग या त्रिमूर्तीचें वैशिष्टच काय ? प्रारंभीं विषयप्रवेश करतांना, त्या थोर नेत्यांनी वैचारिक क्रान्तीची पायाभरणी कशी केली होती,

हें स्पष्ट केलें आहे. त्यावरून नागरित्वास अवश्य त्या गुणांची जोपासना ते करीत होते, यांत शंकाच नाही. मग त्यांचेंच कार्य या त्रिमूर्तीने पुढे चालविलें का स्वतःची कांही निराळी भर त्यांत घातली, निराळा पंथ, निराळी परंपरा, निर्माण केली, असा प्रश्न येतो. येथवर केलेलें विवेचन ध्यानीं घेतलें तर या त्रिमूर्तीने स्वतःची निराळी परंपरा निर्माण करून कालप्रवाह बदलून टाकला हें सहज लक्षांत येईल.

## स्वावलंबन

स्वावलंबन हा या निराळ्या परंपरेचा पहिला विशेष होय. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक इत्यादि सर्व क्षेत्रांत आपल्या उत्कर्षाचे प्रयत्न आपणच केले पाहिजेत, इंग्रज सरकार, इंग्रज अधिकारी, इंग्रज पंडित, येथे आलेले पाश्चात्त्य मिशनरी यांचें या बाबतींत कसलेंहि साह्य होणार नाहीं, असा त्यांचा निश्चित सिद्धान्त होता. आधीच्या थोर नेत्यांची धारणा बरोबर याच्या उलट होती. ते इंग्रजांना गुरु मानीत असत. त्यांचें राज्य हें ईश्वरी वरदान आहे, असें त्यांना वाटे; आणि सर्व क्षेत्रांत ते आपल्या या अजाण देशाला हातीं धरून चालवितील, अशी त्यांची श्रद्धा होती. येथे जुलूम होतो, अन्याय होतो हें त्यांना दिसत होतें. तसें ते बोलूनहि दाखवीत; पण इंग्लंडमध्ये जाऊन, तेथे राहणारे भारताचे जे खरे राज्यकर्ते त्यांना गाऱ्हाणीं सांगितलीं, येथल्या परिस्थितीची कल्पना दिली, की ते या सर्व गैर प्रकाराला आळा घालतील, असें त्यांना वाटे. या त्रिमूर्तीची मात्र अशी निश्चिति होती की इंग्रज लोक हे पूर्ण स्वार्थी आहेत, या देशाची लूट करणें यापलीकडे त्यांचा दुसरा कोणताहि हेतु नाही आणि या देशाच्या हिताची जी जी गोष्ट असेल तिच्यावर बिब्बा घातल्याखेरीज ते मुळीच राहणार नाहीत. म्हणूनच विष्णुशास्त्री यांनी जाहिरपणें लोकांना सांगून टाकलें की, "इंग्रज येथे आले नसते तर, इतकेंच नव्हे तर इंग्रज जगांतच नसते तरी, आमचें कांही अहित झालें असतें असें नाही!"

अर्थात् स्वावलंबनाखेरीज तरणोपाय नाही हें ओघानेच आलें. काँग्रेसचे मूळ प्रवर्तक जे ह्यूमसाहेब ते स्वदेशीं परत जावयास निघाले तेव्हा येथल्या नेत्यांची काय अवस्था झाली हें मागे वर्णिलेंच आहे. यापुढे काँग्रेस इंग्लंडमध्ये भरवावी असा त्यांनी चक्क ठराव केला! यावरून ते किती परावलंबी, किती आत्मप्रत्ययशून्य होते हें ध्यानांत येईल. अशा वृत्तींतून नागरिक कसे निर्माण होणार? राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणारी जी संस्था तिची जबाबदारी अंगावर घेण्यास जो कचरतो तो नागरिक कसला? तो सर्व उत्कर्षापकर्षाची जबाबदारी कशी घेणार? या परावलंबी वृत्तीचा आगरकर-टिळकांना संताप आला आणि त्यांनी तिचा कडक शब्दांत निषेध केला, यांतच त्यांचें वैशिष्टय दिसून येतें.

असली परावलंबी, आत्मप्रत्ययशून्य वृत्ति नष्ट व्हावी, आणि प्रत्येक बाबतींत येथला समाज स्वावलंबी व्हावा यासाठीच या त्रिमूर्तीने राष्ट्रीय शिक्षणाचा अट्टाहास

चालविला होता. सरकारी नोकरी सोडून देऊन विष्णुशास्त्री यांनी पहिला उद्योग हातीं घेतला तो हाच. 'राष्ट्रीय शिक्षण!' आणि राष्ट्रनिर्मितीसाठी त्याची किती आवश्यकता आहे हें पूर्णपणें जाणल्यामुळेच टिळक व आगरकर त्यांना तत्काळ येऊन मिळाले. इंग्रज सरकारने शाळा स्थापिल्या होत्या. विद्यापीठांचीहि स्थापना केली होती. शिक्षणाचा प्रसारहि चालविला होता; पण शिक्षणक्षेत्रांतलें हें परावलंबन त्रिमूर्तीला मुळीच मान्य नव्हतें. कारण त्या शाळांतून सरकारी शिक्षक स्वत्वशून्य शिक्षणच देणार. म्हणून याहि क्षेत्रांत आपण पूर्ण स्वावलंबी झालें पाहिजे, अशा निर्धाराने त्यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल' या पूर्ण राष्ट्रीय व स्वतंत्र शाळेची स्थापना केली. लो. टिळकांनी अखेरपर्यंत राष्ट्रीय शिक्षणाचा आग्रह का धरला होता, स्वदेशी-बहिष्काराइतकेंच राष्ट्रीय शिक्षण महत्त्वाचें आहे, स्वराज्याचा तो पायाच आहे, असें तें का म्हणत , हें यावरून ध्यानांत येईल.

आर्थिक क्षेत्रांतील स्वावलंबनाचा तर प्रश्नच नव्हता. इंग्रज सरकार या देशाचा, येथल्या कष्टकरी जनतेचा रक्तशोष करीत आहे हा सिद्धान्त तर दादाभाईंनीच मांडला होता. संरक्षित व्यापाराचा सिद्धान्त न्यायमूर्ति रानडे यांनी मांडला होता. पण असें असूनहि स्वदेशी-बहिष्काराला त्यांनी कधी पाठिंबा दिला नाही. १८७५ सालापासून सार्वजनिक काका स्वदेशीचा पुरस्कार व आचार करीत होते. बहिष्काराचा मार्ग टिळक, केसरी-मराठ्याच्या प्रारंभापासून, सांगत होते, पण न्यायमूर्तींना तो कधी पटला नाही. उलट परदेशी भांडवलाचे ते गोडवे गात. तें भांडवल येथून लुटून नेलेल्या पैशांतूनच येत असें. पण ती लूट आहे, हेंच न्यायमूर्तींना मान्य नव्हतें. त्या भांडवलासाठी आपण ब्रिटिश भांडवलदारांचें ऋणी असलें पाहिजे असें ते म्हणत. उलट समाईक भांडवल उभारून आपले कारखाने आपण काढले पाहिजेत, आपला व्यापार आपण हातीं घेतला पाहिजे, असें टिळक-आगरकर प्रारंभापासून प्रतिपादित होतें. त्रिमूर्तीची स्वावलंबी वृत्ति ती हीच होय. ब्रिटिश हे या देशाचे शत्रु आहेत, आपल्या मालाची बाजारपेठ म्हणून तें हिंदुस्थानकडे पाहतात, ते एकवेळ राज्य सोडतील पण व्यापार सोडणार नाहीत, हें त्यांनी पक्के-पणीं जाणलें असल्यामुळेच त्यांनी तिचा अवलंब व पुरस्कार चालविला होता.

राजकीय क्षेत्रांतील स्वावलंबन हा तर त्रिमूर्तीच्या कार्याचा प्राणच होता. विष्णुशास्त्री लवकर कालवश झाले म्हणून त्यांना आपलें तत्त्वज्ञान सविस्तर मांडतां आलें नाही. पण त्यांच्या सर्व लिखाणाचा आत्मा तोच होता. अमेरिकेंत क्रान्ति झाली तशी येथे होईल, असें जॉनसनच्या चरित्रांत त्यांनी सूचित केलेंच होतें. आगर-करांचे राजकीय विचार हळूहळू याच वळणावर येत होते. टिळकांच्या स्वराज्या-च्या राजनीति-शास्त्राची सविस्तर चर्चा आपण केलीच आहे. स्वदेशी, बहिष्कार, साराबंदी, करबंदी हे स्वावलंबनाचे सर्व मार्ग नवा पक्ष स्थापितांना त्यांनी विवरून सांगितले होते.

## सर्वस्वत्याग

अशा तऱ्हेच्या स्वावलंबनामागोमाग ध्येयासाठी सर्वस्वत्याग हा ओघानेच येतो. तो अपरिहार्यच असतो. असा त्याग करण्याची अगदी नवी परंपरा या देशांत केसरीच्या त्रिमूर्तीनेच निर्माण केली. त्या आधीचे नेते थोर होते, ज्ञाते होते; पण त्यांची देशसेवा फावल्या वेळांतली होती. आपापली नोकरी-व्यवसाय संभाळून ते देशसेवा करीत. तेंहि कार्य फार मोठें होतें यांत शंका नाही. पण स्वराज्य-स्वातंत्र्य हें ध्येय तेवढ्याने साधणें कधीच शक्य नव्हतें. एवढेंच नव्हे तर सरकारशीं विरोध येताच ती देशसेवाहि संपुष्टांत येत असे. काँग्रेसची सेवा की सरकारची सेवा-म्हणजे नोकरी – असा प्रश्न उभा राहताच त्या पुरुषांनी सरकारची सेवा ठेवली व काँग्रेस सोडून दिली; आणि विष्णुशास्त्री यांनी नोकरी सोडून राष्ट्रसेवेचें व्रत घेतलें. आधीचे नेते व त्रिमूर्ति यांच्यांत हा फार मोठा फरक होता.

राजकारणासाठी तुरुंगवास पत्करावयाचा ही वृत्तीच या देशांत पूर्वी नव्हती. कोल्हापूरच्या बर्व्यांचें प्रकरण उद्भवलें आणि आगरकर-टिळक यांच्यावर खटला झाला. तेव्हा, हा घरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजण्याचा उद्योग या लोकांना कोणीं सांगितला होता, असेंच लोक म्हणूं लागले. १९८७ सालीं टिळकांच्यावर राजद्रोहाचा पहिला खटला झाला त्या वेळीं त्यांना लोक असाच सल्ला देऊं लागले. हा नसता उद्योग कशाला? राष्ट्राचें कार्य हें आपलें कार्य ही भावना येथे अभावानेच कशी होती हें त्यावरून दिसून येईल. येथे सर्व प्रजाजन होते, लोक अजून नागरिक झाले नव्हते हाच याचा अर्थ आहे. स्वराज्याची चळवळ हा त्यांना नसता उद्योग वाटत होता. अशा या समाजांतून त्रिमूर्तीला राष्ट्र निर्माण करावयाचें होतें. म्हणूनच राष्ट्रासाठी सर्वस्वत्याग, अंतीं प्राणत्यागहि, केला पाहिजे ही वृत्ति यांनी स्वतःच्या उदाहरणानेच निर्माण केली. विष्णुशास्त्री एक पाय तुरुंगांत ठेवूनच नेहमी लिहीत असत. आगरकर त्याच वृत्तीचे होते. त्यांना अकालीं मृत्यु आला यामुळे त्यांच्यावर तुरुंगवासाचा प्रसंग आला नाही. नाही तर टिळकांच्या प्रमाणेच त्यांच्यावरहि राजद्रोहाचे खटले झाले असते यांत शंका नाही. त्यांच्या राजकीय व आर्थिक विषयांवरच्या लेखांचें स्वरूप तसेंच होतें. टिळकांनी सर्वस्व त्याग कसा केला याचें सविस्तर वर्णन करण्याची गरजच नाही. मागे सांगितल्याप्रमाणे कालपुरुषाची चेष्टा करीतच ते आपलें राजकारण चालवीत होते. पुढे सत्याग्रहाच्या व असहकारितेच्या चळवळींत हजारो, लाखो लोक तुरुंगांत गेले त्यांना ही नागरिकत्वाची प्रेरणा या त्रिमूर्तीच्या त्यागाच्या परंपरेंतूनच मिळाली होती.

## राष्ट्रीय अहंकार

राष्ट्रीय अहंकाराचा परिपोष हें त्रिमूर्तीच्या कार्याचें तिसरें वैशिष्ट्य होय. प्राचीन परंपरेचा तीव्र अभिमान जागृत करून या अहंकाराचा परिपोष त्यांनी केला. त्रिमूर्तीच्या आधीच्या नेत्यांना भारताच्या प्राचीन परंपरेचा अभिमान नव्हता असें

नाही. पण सर्वस्वार्पणास सिद्ध होण्याची प्रेरणा देण्याइतका तो प्रखर नव्हता, आणि असणें शक्यहि नव्हतें. इंग्रजांना ते गुरु मानीत, त्यांचें राज्य म्हणजे परमेश्वरी योजना अशी श्रद्धा ते जोपाशीत. तेव्हा त्यांचा ह्या अभिमान कांही झालें तरी राष्ट्रीय अहंकाराच्या परिपोषाला अवश्य तितका तेजस्वी असणें शक्यच नव्हतें. विष्णुशास्त्री यांनी नवयुग निर्माण केलें तें त्या अभिमानाचा निखारा फुलवून केलें. साधी स्वभाषेची गोष्ट पाहा. त्यांच्या आधीच्या थोर नेत्यांनी आपलें सर्व वक्तृत्व व लेखन इंग्रजींत केलें. मराठी भाषेचा विकास आणि राष्ट्रीयत्वाचा विकास यांत अद्वैतसंबंध आहे, हें त्यांनी मानलें नाही. त्यांतल्या कांहींनी मराठींत लेखनहि केलें. नाही असें नाही; पण मराठींत वाग्वैभव निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्नहि केला नाही. तीच गोष्ट स्वधर्माची. त्यांनाहि धर्माभिमान होता; पण मिशनऱ्यांना वैरी मानावें, त्यांना शत्रु लेखावें व त्यांचा पाडावा करावा हें धोरण त्यांनी अंगीकारलें नाही. उलट त्यांनाहि ते गुरुस्थानीं मानीत. आणि आपल्या पूजा-प्रार्थना ख्रिस्ती वळणावर नेत. यामुळे जनतेच्या अस्मितेला तेज चढण्याऐवजी ती म्लानच होत असे. आमच्या धर्मांत दोष नाहीत, असें त्रिमूर्तीपैकी कोणीच म्हणत नसे. अनेक धार्मिक रूढींवर त्या सर्वांनी — विष्णुशास्त्री व टिळक यांनी सुद्धा — टीका केली आहे. पण दादोबा पांडुरंग, लोकहितवादी यांनी केलेली टीका व ही टीका यांत महदंतर होतें. त्रिमूर्तीच्या टीकेंत स्वत्व-जागृतीचें अवधान असें. आगरकरांनी हिंदु धर्मावर अति कडक टीका केली. पण ती सर्व आचारधर्मावर, तत्त्वज्ञानावर नव्हे. प्राचीन परंपरेच्या अभिमान्यांवरहि त्यांनी टीका केली; पण स्वतः कर्तृत्वशून्य राहून नुसती तशी वटवट करणाऱ्यांवर ती टीका होती. या दृष्टीने पाहिलें तर आगरकरांना विष्णुशास्त्री व टिळक यांच्या-इतकाच स्वत्वाभिमान होता असें दिसून येईल. फरक पडत असे तो आवेशांत आणि भर देण्यांत.

नागरिकत्वाच्या गुणांची जोपासना करूनहि सर्व नागरिकांच्या ठायीं राष्ट्रीय अहंकाराचा पोष झाला नसता तर ते गुण निर्माल्यवत् झाले असते. राष्ट्रीय अस्मितेचें हें महत्त्व त्रिमूर्तीने बरोबर जाणलें होतें म्हणूनच त्या ध्रुवताऱ्यावरून त्यांनी आपलें लक्ष केव्हाहि विचलित होऊं दिलें नाही.

## मूळ गाभा एकच

राष्ट्रनिर्मितीसाठी ह्या तीन थोर पुरुषांनी जें तत्त्वज्ञान सिद्ध केलें होतें. त्या विषयी त्यांच्यांत फारसे मतभेद नव्हतें. त्यांच्यांत भेद होते ते अग्रक्रमाविषयी होते, कमीजास्त भर कशावर द्यावयाचा याविषयी होते; आणि प्रत्येकाचा आपापले प्रतिपादन करण्याचा आवेश भिन्न होता; पण राष्ट्रनिर्मितीचे जे मूलसिद्धान्त, त्यांचा जो गाभा त्याविषयी त्यांच्यांत मतभेद नव्हते.

निवृत्तीमुळे या देशाचा अधःपात झाला असून प्रवृत्तिवाचून त्याचा उत्कर्ष साधणार नाही याविषयी त्रिमर्तीपैकी कोणालाच शंका नव्हती. संपत्ति, षड्रिपु

याविषयी विष्णुशास्त्री यांचीं मतें पूर्णपणें इहवादी, प्रवृत्तिवादी होती, हें मागें आपण पाहिलेंच आहे. आपला व्यापार वाढला पाहिजे, कारखानदारी वाढली पाहिजे, त्यासाठी भौतिक शास्त्रांची उपासना आपण केली पाहिजे हा तर टिळक-आगरकरांच्या राजकारणाचा कणाच होता. युरोपांत चौदाव्या शतकांत ग्रीक विद्येचें पुनरुज्जीवन झालें. त्याआधी व्यापार, सावकारी यांविषयी कॅथालिक धर्मीयांत तुच्छ बुद्धि होती. लूथर, काल्व्हिन यांनी ती नष्ट करून या व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. तेंच कार्य हिंदुस्थानांत त्रिमूर्तीने केलेलें आहे. वैराग्य, विषयसुखाची निंदा या धार्मिक वृत्तीवर आगरकरांनी किती प्रखर टीका केली आहे तें आपण पाहिलें आहे. टिळक याविषयी अशा आवेशाने लिहीत नाहीत; पण हजारो वर्षें प्रतिष्ठा लाभलेल्या आचार्यांच्यावर, त्यांच्या निवृत्तिवादासाठी, संन्यासवादासाठी, टीका करून त्यांना त्यांनी भारतीय जनमानसांतून स्थानभ्रष्ट केलें हें प्रसिद्धच आहे.

मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन हा आगरकरांना खरा धर्म वाटे. टिळकांचें तेंच मत होतें. साखरेबुवा जेव्हा ज्ञानेश्वर-शंकराचार्य यांच्या अध्यात्माबरोबर स्वराज्याविषयी बोलण्याचें नाकारू लागले तेव्हा टिळक त्यांना म्हणाले, 'तुमच्या 'ब्रह्मसत्यं जगन् मिथ्या' या प्रवचनामुळे पारतंत्र्यांत, दारिद्र्यांत होरपळणाऱ्या गरीब प्रजेला थोडा तरी गारवा मिळणार आहे, काय ?' याचा भावार्थ हाच अर्थ आहे. ऐहिक सुखवर्धनाशिवाय सर्व अध्यात्मज्ञान व्यर्थ आहे. देव व देश अभिन्न आहेत, असें ते सांगत तें याच अर्थानें.

जातिभेद, वर्णभेद, अस्पृश्यता या रूढींविषयी सर्वांची वृत्ति अशीच सारखी होती. आगरकरांच्या भावना याविषयी अत्यंत तीव्र होत्या. वर्णसंकर हा धर्मोत्कर्ष होय, असें ते म्हणत. विष्णुशास्त्री किंवा टिळक या टोकाला कधीच गेले नाहीत; पण जातींची किंवा अस्पृश्यतेची विषमता त्यांना मुळीच मान्य नव्हती. अठरा पगड जातींची एक मूस झाली पाहिजे, असें विष्णुशास्त्री म्हणत. शिक्षण, व्यवसाय, राजकारण, अर्थकारण या प्रत्येक क्षेत्रांत सर्व जातींना समसंधि मिळाली पाहिजे, जातिभेदामुळेच आमचा नाश झाला आहे हें टिळकांचें नित्याचें प्रतिपादन असें. यापुढे जें कांही करावयाचें तें सर्व जातींसाठी, सर्व वर्णांसाठी, सर्व पंथीय, धर्मीय, प्रांतीय यांसाठी केलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता.

## सामुदायिक ध्येय

राजकीय व सामाजिक सुधारणांच्या अग्रक्रमाविषयी असाच प्रकार होता. मागे हें सांगितलेंच आहे की, टिळकांच्या राजकीय सुधारणांत म्हणजे स्वराज्याच्या चळवळींत सर्व सामाजिक सुधारणांचा अंतर्भाव होत होता. अनेक शतकें दारिद्र्य, अज्ञान, लाचारी, दैववाद, त्यांत बुडून राहिलेल्या भारतीय सामान्य माणसाला, अत्यंत बलाढ्य अशा परकीय राजसत्तेचा प्रतिकार करण्यास उद्युक्त करण्यासाठी त्याच्या मनांत केवढी क्रांति घडविणें अवश्य होतें याची जर आपल्याला कल्पना असेल तर

या राजकीय कार्यांत सर्व सामाजिक सुधारणांचा पाया घातला जातो, हें आपल्याला मान्य होईल. जातिभेद, अस्पृश्यता, विषमता, स्त्री-दास्य या रूढींचीं पाळेंमुळें समाजमनांत फार खोल जाऊन रूतून बसलेलीं होतीं. तीं खणून काढण्यासाठी नुसतें तार्किक प्रतिपादन पुरें पडणार नाही, असें टिळकांचें मत होतें. समाजापुढे कांही फार मोठें सामुदायिक ध्येय ठेवलें व त्या ध्येयाच्या आड या रूढि येत आहेत, हें समाजाला दाखविलें तर या रूढींचा त्याग करणें अवश्य आहे हें त्याला पटेल व मग सामाजिक सुधारणा करण्यास अवश्य तें मानसिक सामर्थ्य त्याला प्राप्त होईल, असा त्यांचा हिशेब होता. आणि यासाठीच स्वराज्य हें उदात्त ध्येय डोळ्यांपुढे ठेवून त्यासाठी चालू केलेल्या स्वदेशी-बहिष्कारादि चळवळींत समाजाला सामील करून घ्यावयाचें असें धोरण त्यांनी आखलें होतें. महाभारतांत म्हटलें आहे की, हत्तीच्या पावलांत सर्व इतर प्राण्यांच्या पावलांचा समावेश होतो त्याचप्रमाणें राजधर्मांत सर्व धर्मांचा समावेश होतो. टिळकांचें हेंच तत्त्व होतें. राजकीय सुधारणा करतां करतांच, त्यांतूनच, सामाजिक सुधारणेस अवश्य ती मानसिक शक्ति समाजाला लाभेल, अशी त्यांची निश्चिति होती.

## अगोदर जगणें

मौज अशी की, राजकीय सुधारणांचें महत्त्व जास्त आहे, त्यांनाच अग्रस्थान दिलें पाहिजे हा विचार टिळकांच्याइतक्याच आग्रहाने व निःसंदिग्धपणें आगारकरांनी 'फेरजमाबंदी व लष्करी खर्च' या 'सुधारकां'तील लेखांत मांडला आहे. ते म्हणतात, "जशा सामाजिक सुधारणा अवश्य आहेत तशा राजकीय सुधारणाहि अवश्य आहेत. किंबहुना सामाजिक सुधारणापेक्षाहि राजकीय सुधारणा विशेष आवश्यक आहेत, म्हणून राजकीय सुधारणा सामाजिक सुधारणांच्या आधी झाल्या पाहिजेत." या लेखांत एवढेंच सांगून आगरकर थांबले नाहीत. सरकार सामाजिक सुधारणांचें महत्त्व जास्त आहे, असें सांगून आमची फसवणूक करीत आहे, अशी टीकाहि त्यांनी केली आहे. यानंतर राजकीय सुधारणांचें महत्त्व पुन्हा विशद करतांना ते म्हणतात, "अगोदर जगणें आणि मग चांगल्या रीतीने जगणें. चैतन्य रक्षण झाल्यावांचून तें (जीवन) सुखाने घालवितां येणें अशक्य आहे. विशिष्ट प्रकारच्या राजकीय व्यवस्था समाजाच्या अस्तित्वाला आवश्यक आहेत. म्हणजे त्या नसल्या तर समाजाची वाताहात होते. सामाजिक सुधारणांची गोष्ट तशी नाही. त्या समाजास शोभा देतात, किंवा विशिष्ट प्रकारचा आनंद निर्माण करतात. तेव्हा त्या मागून झाल्या तरी चालतील. जातिभेद, बालविवाह, असंतम वैधव्य, केशवपन, वगैरे दुष्ट चालीपासून आम्हांस पुष्कळ त्रास होत आहे. पण मिठावरील कर, रेव्हिन्यू सर्व्हेचा फेरा, लष्करी खातें, यांपासून जो त्रास होत आहे त्यापुढे वरील त्रास कांहीच नाही म्हटलें तरी चालेल. आजच्या व पुढच्या विधवांचें वैधव्य-दुःख एकत्र केलें तरी साठ लक्ष मनुष्यें अन्नान्न

करून मेलीं त्यांच्या दुःखाबरोबर तें येणार नाही, अशी आमची खातरी आहे."
(निबंधसंग्रह, भाग ३ रा, पृ. ११५–१६; उतारा : 'आधुनिक भारत' – आचार्य जावडेकर, पृ. १५१).

## अद्वैत

लो. टिळक तरी यापेक्षा निराळें काय म्हणत होते ? तेव्हा सामाजिक व राजकीय सुधारणांच्या आवश्यकतेविषयी, इतकेंच नव्हे तर त्यांच्या अग्रक्रमाविषयीहि टिळक-आगकरांत मूलतः मतभेद नव्हतें, हें आपण ध्यानांत घेतलें पाहिजे. तत्कालीन परिस्थिति, कांही स्वभाव-गुण, त्या सुधारणांचे मार्ग, त्यांच्या मर्यादा यांमुळे त्या काळीं संघर्ष झाला. तो सर्व विसरून त्रिमूर्ति ही एकजीव त्रिमूर्ति होती, हें ध्यानीं घेऊन त्यांच्या प्रकृति निराळ्या असल्या तरी, त्रिगुणातीत होऊन आपण त्यांचें अद्वैतच लक्षांत घेतलें पाहिजे.

विष्णुशास्त्री यांनी भारतांत राष्ट्रीय अहंकार, राष्ट्रीय अस्मिता, जागृत केली. या जाणिवेवांचून कोणतीहि नवी सष्टि निर्माण होत नाही. एकंदर, विश्वरचनेंतहि प्रथम अहंकार – म्हणजे मी पृथक् आहे, स्वतंत्र आहे, श्रेष्ठ आहे, अनन्यसामान्य आहे ही जाणीव स्फुरावी लागते. जें एकंदर विश्वरचनेंत आहे तेंच मानवी सृष्टींत आहे. कोणताहि समाज, कोणतेंहि राष्ट्र, कोणतीहि संस्था यांच्या निर्मितीसाठी, ही पृथक्त्वाची जाणीव अवश्य असते. म्हणूनच ही जाणीव, हा अहंकार भारतीयांच्या ठायीं जागृत करण्यास विष्णुशास्त्री यांनी प्रारंभ केला.

## व्यक्तित्व आणि संघटना

हा अहंकार हा राष्ट्ररचनेचा पाया होय. त्यावर मंदिर उभारण्यापूर्वीच विष्णुशास्त्री निघून गेले; आणि टिळक-आगरकर यांच्या शिरावर ती जबाबदारी आली. त्यांनी तें कार्य कसें केलें ? या अहंकारामुळे समाजांत, प्रत्येक व्यक्तीच्या ठायीं प्रथम व्यक्तितत्व जागृत व्हावें लागतें. तें जागृत झालें तर व्यक्ति निर्माण झाली असें होतें; आणि अशा व्यक्तित्वसंपन्न लोकांना संघटित केलें, त्यांच्या भिन्न अहंकारांची राष्ट्रीय अहंकारांत परिणति झाली की राष्ट्र निर्माण होतें. तेव्हा अस्मिता जागृत झाल्यावर प्रथम व्यक्ति निर्माण करणें आणि मग या व्यक्तींना संघटित करणें हीं दोन कार्यें राष्ट्रनिर्मितीसाठी करणें अवश्य असतें.

यांपैकी व्यक्तिनिर्मितीवर आगरकरांनी भर दिला; आणि संघशक्तिनिर्मितीवर टिळकांनी भर दिला.

ह्या दोन कार्यांमध्ये विरोध आहे काय ? मुळीच नाही. त्या दोघांच्याहि मनांत तसें नव्हतें. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करतांना, समाजाचें, कुशल राहील इतकीं बंधनें ठेवलीं पाहिजेत असें आगरकर नेहमी म्हणत; आणि संघशक्तीचें महत्त्व प्रतिपादीत असतांना, जेथे व्यक्तिस्वातंत्र्य नाही तो समाज पशूंचा होय, असें टिळक सांगत असत. तेव्हा स्वातंत्र्य व संघटना ह्या दोन्ही बाबतींत तात्त्विक दृष्टीने मुळांतच

या दोन थोर पुरुषांचा मतभेद होता असें नाही; पण असें असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत या तत्त्वांचा आचार करतांना, परस्परांच्या मर्यादांचा प्रश्न उद्‌भवला आणि त्यांतूनच संघर्ष निर्माण झाला.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाचें तें लोकशक्तीच्या साह्याने घ्यावयाचें असा टिळकांचा निश्चय होता. लोकशाहीला व्यक्तिस्वातंत्र्य अपरिहार्यच असतें; पण व्यक्तींना असें स्वातंत्र्य प्राप्त झालें की त्यांची संघटना दुष्कर होऊन बसते. टिळकांना ही सतत चिंता होती. त्यांच्या डोळ्यांदेखत नवीनच स्वतंत्र झालेले लॅटिन अमेरिकेंतील मेक्सिको, अर्जेंटिना, ब्राझील, हे जे देश त्यांच्या लोकशाहीची परवड होत होती. उलट जपान, जर्मनी यांनी मर्यादित लोकशाहीच्या आश्रयाने स्वतःचीं राष्ट्रें बलसंपन्न केलीं हें त्यांना दिसत होतें. त्यामुळे जुनीं बंधने तोडतांना आधी नव्या बंधनाची व्यवस्था केली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. सामाजिक सुधारणा करतांनाहि हजार-पांचशे लोकांनी मंडळी किंवा सभा स्थापून, नवीं बंधनें स्वीकारून ती करावी, असें ते म्हणत. असे केलें नाही तर समाज विघटित होईल अशी भीति त्यांना वाटे. म्हणून एकट्या व्यक्तीने उठून कांही एकांतिक प्रतिपादन व आचार करूं नये, असें ते सांगत.

आगरकरांची रीत याहून निराळी होती. रूढ लोकमताहून भिन्न असे कोणतेहि विचार, अत्यंत क्रान्तिकारक, अगदी ध्रुवभिन्न विचारहि प्रतिपादण्यास अर्थ आहे, त्याचाहि उपयोग आहे, असें त्यांना वाटे. त्याचप्रमाणे आचाराच्या बाबतींतहि व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे, असें त्यांचें मत होतें. आणि तसें ते आवेशाने मांडीतहि.

माझ्या मतें या दोन्ही वृत्ति, या दोन्ही रीति समाजसुधारणेला अवश्य असतात. अनेक शतकें अंधधर्माचें व रूढींचें वर्चस्व असलेला समाज इतका हेकट, दुराग्रही व बधिर झालेला असतो, त्याची कातडी इतकी जाड झालेली असते की, अत्यंत तीक्ष्ण, धारदार आणि भेदक भाल्यांच्या प्रहारांवांचून त्याच्या अंतरंगापर्यंत पोचण्यास दुसरा मार्गच नसतो. म्हणूनच आगरकरांनी तसे प्रहार केले; पण अशाने सर्वच बंधनें तुटून समाज स्वैर होऊ नये म्हणून लोकसेवा करून, लोकांना सौम्य उपदेश करून, त्यांच्या कलाने घेऊन, त्यांच्यापासून फार दूर न जातां, एकदोन पावलेंच पुढे टाकून लोकमतांत हळूहळू परिवर्तन करणारा नेता हाहि अवश्य असतो. टिळकांनी हा दुसरा मार्ग स्वीकारला.

## दोनच पावलें

पण या दोन्ही रीति समाजसुधारणेस अवश्य आहेत, असें टिळकांचेंहि मत असावें असें वाटतें. महात्मा गांधींचा उदय झाला व त्यांनी सत्याग्रहाची व कायदेभंगाची मोहीम सुरू केली. वास्तविक हा मार्ग टिळकांनीच १९०७ सालीं आखलेला होता. पण या वेळी ते महात्माजींच्या चळवळींत सामील झाले नाहीत. कां?

अखिल भारतीय काँग्रेसने तसा ठराव केल्यावाचून त्या चळवळींत पडावयाचें नाही, असें त्यांनी ठरविलें होतें. कारण लोकांच्यापुढें दोनच पावलें जावयाचें असें त्यांचें धोरण होतें. पण तरीहि महात्मा गांधींनी त्या मार्गानें अवश्य जावें, असेंहि त्यांनी सांगितलें होतें. ते म्हणाले होते, "तुम्हांला या कार्यांत यश येवो. जर तुम्हांला लोकांना आपल्याकडे वळवितां आलें, तर मी तुम्हांला उत्साहाने पाठिंबा देईन."

यावरून आगरकरांच्या रीतीला, स्वतः ती स्वीकारावयाची नाही, असें निश्चित्त ठरलें असूनहि, टिळकांचा मनोमन पाठिंबा असावा असें वाटतें. तेव्हा एकाच अहंकाराची भिन्न रूपें घेऊन प्रगट झालेली ही केसरीची त्रिमूर्ति होती यांत शंका नाही.

## सिंहनाद

या ग्रंथाच्या अगदी आरंभीं केसरीच्या त्रिमूर्तीच्या आधीचे जे नेते त्यांच्या कार्याचें स्वरूप आपण पाहिलें. नंतर ग्रंथामध्ये त्रिमूर्तीच्या कार्याचें विवेचन केलें. आणि आता शेवटीं त्यांच्या कार्याचें वैशिष्टय काय याचा विचार केला. त्यावरून असें दिसून येईल की, पहिल्या पिढीच्या नेत्यांनी नवें तत्त्वज्ञान सांगून येथे ज्या नव्या प्रेरणा दिल्या होत्या त्यांमुळे भारतीय जीवनांत नवीं स्पंदनें, नव्या अस्फुट नादलहरी उत्पन्न होऊ लागल्या होत्या; पण गिरिशिखरें हादरून टाकील, ब्रह्मकटाह भेदून गगनाला जाऊन भिडेल असा सिंहनाद त्यांतून निर्माण होत नव्हता. तो त्रिमूर्तीच्या केसरीने भारतांत निर्माण केला. या नादाच्या प्रचंड लहरींनी पृथ्वी आणि आकाश गर्द भरून गेलें. त्या तुमुल घोषाने आंग्ल राष्ट्राच्या हृदयाचें विदारण केलें आणि भारतीय जनतेच्या मनांत नवे कंप निर्माण केले. त्या कंपांमुळे तिला नवी चित्कळा लाभली; आणि तिच्या सामर्थ्याने राष्ट्रपदवीवर आरूढ होऊन तिने स्वातंत्र्याचा लाभ करून घेतला.

"आज भारतांत तसाच सिंहनाद आपण निर्माण करावा," अशी केसरीच्या त्रिमूर्तीची मी मनोभावें प्रार्थना करतों.

■ ■ ■

## सूची


अध्यक्षाचे अधिकार ३२७
अंधश्रद्धा ५८
अरविंदबाबू २४५
अलिगडचे मुस्लिम ३११
अल्फिष्टन ३५
अवनतीची मीमांसा ५८
अशबरनर व वुड्लर्ड २००
अशोक ५७
अस्पृश्यता ४९, ५०
(शिवाय पाहा — आगरकर व टिळक)
अस्मिता १२, जाणीव २०, अहंकार १११, अहंप्रत्यय १११, अहंप्रबोधन ८, अहंवृत्ति ११६, ११७, अहंस्फुरण २०
अळणी लोकमत २६७
ॲनी बेझंट १७८, ३३०
ॲरिस्टॉटल ६८
आकिलीस ९९

**आगरकर गोपाळ गणेश —**

आगरकर व टिळक २०१—२०५. अनियंत्रित राजसत्ता, १५५ अस्पृश्यता १३६, १३७, १७७, १८०. असंमत वैधव्य १७४. आर्थिक विषमता १८१. अज्ञेयवाद १८३. इतिहास चिकित्सा १५०. इहवाद १८३. उतावळे सुधारक १७५. ऐहिक उत्कर्ष व धर्म १८६. कर्मकांड १३१, १८५, १८६. कामगारवर्ग १८१. कायद्याचें साह्य १६५. १६७. कुटुंबसंस्था १५७. केशवपन १६७, १७२. खरा धर्म १३२, १५४. गृहस्थिति १३६, १६२, १७०, १७५. जगाचीं स्थित्यंतरें १५१. जातिभेद १३६, १६९, १७७, १८०. तरुण पिढी १३३. धर्मशास्त्र १४१, १४६. पाश्चात्य सुधारणा १४५, १५८. पाश्चात्य विद्या १४३, १४५, १४७, १५०; १६४, १८०. प्राचीन ऋषि — मनु-पाराशर १४६, १४७. प्रेतसंस्कार १३१. पतिपत्नीसंबंध १५७. बलात्कार तत्त्व १४९. बालविवाह १३५, १३६, १४० १४६, १६७, १७१—१७३. बुद्धिवाद १३१, २०२. भांडवलदार १८१. भारतीय कला १९७. भास्कराचार्य १४१, १४५. मूलप्रेरणा २०१. लेखनशैली २०६. लोकशिक्षण १६६. लोकापवादाचें भय १४१. वर्णव्यवस्था, वर्णसंकर १७९ व विष्णुशास्त्री १४२, १४३. विचारकलह ४२, १४७. विधवा स्त्री १३४. विश्वाविरुद्ध झुंज २०५. विषमता १३६, १७७, १८०. विषयसुखाचें महत्त्व १८५. वेदान्त विचार १८७. वैधव्य १७४. वैराग्याची शिकवण १९५. व्यक्तिस्वातंत्र्य १४५, १४८, १६८, १८०. व्याजोक्ति २०७. सतीची चाल १६६. संमतितत्त्व १५०. सनातन धर्ममार्तंड १३३. स्त्रीजीवन १७०—१७५. स्त्रीशिक्षण १७५—१७७. समानता १८०. स्वधर्माभिमान १९६. हिंदुस्थानचें दारिद्र्य १८८—१९४. हदु धर्म १३३. (शिवाय पाहा — १६, १९, २८, २९, ३०, ४३, ४९, ७१, ९३)

आचारस्वातंत्र्य ४७
आत्मप्रत्यय १२, १९, २४०, २४१
आत्म्याचें अमरत्व २५४
आपटे हरिभाऊ ७, ८४
आंबेकर वि. बा. ७
आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले २५९
‘आमचें काय होणार’ — लेख आगरकर १८३

'आमचे दोष आम्हांला केव्हा दिसूं लागतील. ?' – लेख
आगरकर १२९, १३७
'आमच्या देशाची स्थिति' – लेख
विष्णुशास्त्री ३४, ३७, ४१, ९७, १०४, ११६, ११७
आरबांचें ज्ञान ३७
आर्यभट्ट २२६
आर्यसमाज ४८
आर्यांचें मूलस्थान ३२४
आस्तिक्य बुद्धि ७९
आळतेकर डॉ. ५८

इंग्रज त्राते १८
इंग्रज मिशनरी ८, १०, ११, २६, ९२, १०९, ११२
इंग्रज पंडित २३, २६, ३८, ७२, १०९, ११२, ११८
इंग्रज राज्यकर्ते ८, ११, ३४, ३५, ६२, ११५, १९०–१९३
इंग्रजांचें काळें अंतरंग १९१
इंग्रजांचें गुणगान ९२
गुरुत्व ३५, ३९, १५९, १६०
'इंग्रजी भाषा' – निबंध-
विष्णुशास्त्री ११३
इंग्रजी विद्या ५१, ६१
(पाश्चात्त्य विद्या पाहा)
'इंग्रजी विद्येचें वज्र' – निबंध
विष्णुशास्त्री ४०, ४४, ६९, ७४
इंग्लंडमधील बालकामगार २८८
इंग्लिश भाषा २२, ४६, ६०
'इतिहास' – निबंध
विष्णुशास्त्री ६९, ८१, ९७, ११६
इतिहास ९८, १०५, १२७
इतिहासरचना (हिंदुस्थानांतील) ९, ६७, ८१, ११५
इतिहासविचार ९
इतिहासाची विटंबना ९७
इतिहासाची जाणीव ३०, ७८, ३०८

'इंडियन ओपिनियन' ५४, २७६
'इंडियन मुस्लिम' – ग्रंथ ३०९
'इष्ट असेल तें बोलणार' – निबंध
आगरकर १४७
इहवादाचा सिद्धान्त १८४
इहवादी दृष्टिकोन ६९, ७१, ७२
इहविमुखता ७०
ईश्वरी वरदान १६, १७, ३२
ईस्ट इंडिया कंपनी १२, १३, १८५

एडमंड बर्क ३५
एलिफास २७, १०८, ११६
ऐतिहासिक दृष्टि ८८

ओक्ले २६, ३७, १००
ओरायन २४२
औद्योगिक पारतंत्र्य २६२, २८२

कणाद – परमाणुवाद २४३
कपिल – विकासवाद २४३
करबंदीची चळवळ ३११
कर्झन लॉर्ड २८७, ३२८
कर्नल वेजवुड ३१६
कर्मकांडात्मक धर्म १८२
कलियुगाचें तत्त्वज्ञान १८४
कलौ संघे शक्तिः। २७५
'कविता' – निबंध – विष्णुशास्त्री ८३
कंपनी सरकार व इंग्रज सरकार २५९
कॅथॉलिक धर्मपंथ ७२
कांट २४४
कामगारांसंबंधी कायदे २८६
कामगारांची सत्ता २८७
कायदा व नीति ३२३
कायद्याचें राज्य ४७
कार्यकारण भाव ७३, १०१, १२८, १५० कार्यकारणरूप संबंध ७०, कार्यकारण संबंध ७७, कार्यकारणाचे नियम ७६
कालपुरुषाची चेष्टा ३१७
कालिदास ७९–८२, ८४, ८६, ३३०

कॉल्व्हिन ७२
काव्यनिर्मिति ८४
काव्यसमीक्षा ७८
काव्येतिहास संग्रह ६, ११८
काँग्रेस (राष्ट्रसभा पाहा) २९, ३२, १६१, २७९
कॉंझर्वेटिव्ह पक्ष १९३
किसान-कामगार जागृति २९३
कुर्तकोटी डॉ. २४९
कुळकर्णी वि. ह. ६
केप्लर ५९, ७४, ७५
केशवचंद्र सेन २४
केसर-इ-हिंद १४
केसरी ७६, २७४, २८१, ३०५
केसरी-मराठा ११८
कोर्टिझ ३३
कोलब्रुक २६
कोलंबस ७३, ७४
क्लाइव्ह १७, ३४

खरी सामाजिक सुधारणा २९८
'खाल्डियन वेद व अथर्व वेद' – प्रबंध टिळक २३६
खोती २९२
ख्रिश्चन मिशनरी ११, २५, १००, १०८ (इंग्रज मिशनरी, मिशनरी – पाहा)
ख्रिस्ती धर्म २४, ३५, ३६, ९७

गंगाधरराव देशपांडे २२१
गझनीचा महंमद १५
गटे ७९, ८६, १००
गणेशोत्सव २१६, २३८, ३०९ (टिळक पाहा)
गद्य-ग्रंथरचना ९८, १०२, ११३
गर्गादि ग्रंथकार २२६
गर्व – निबंध – विष्णुशास्त्री ३७, ४१ ७०, ७१, ७२, १००
गॅलिलिओ ५९, ७३, ७४
गाडगीळ धनंजयराव २९१
गांधी – लोकशाही ४९, मिश्रविवाह ५०, चातुर्वर्ण्य ५०, टिळक २७१
गीता व जॉनचें शुभ वर्तमान ९, २४३, २४४
गीतारहस्य (टिळक पाहा) २४३, ३२४
गीतेचें बहिरंगपरीक्षण २४४
गुरुगोविंद पंडित २५८
गोखले नामदार, २८, २६७, २८८
गोब्राह्मण ६४
ग्रंथलेखन ९३
'ग्रंथावर टीका' – निबंध विष्णुशास्त्री ५१, ६७, ७८, ७९, ८१
ग्रीस ६३, ९७, ९८
व रोमन लोकसत्ता २८१
ग्लॅडस्टन १९३

चंद्रगुप्त ५७
चरित्रलेखन ६५, ८८, ९१
चरित्राची अभिरुचि ८६
चॅटफील्ड साहेब २८
चॅथॅम ९८
चातुर्वर्ण्य १८, ५०, २०३
चारित्र्याची आवश्यकता २९६
चिचेरोव्ह २८६, २८७, २८९
चित्रावशास्त्री २३५
चिपळूणकर कृष्णशास्त्री २३

**चिपळूणकर विष्णुशास्त्री –**

अहंप्रत्यय १११. अहंप्रबोधन आत्मप्रत्यय १९. आधीचे नेते १४, २८, ३०. आमच्या देशाची स्थिति – ४१, ४५, ४८, ४९, ५५, ९४, ९७, १०४, १०६. इंग्रजांचें गुरुत्व २५, ३९. इंग्रजांचे ऋण ४१. इंग्रजी विद्येचें वज्र ४४, ७४ (शिवाय पहा इंग्रज पंडित, इंग्रज मिशनरी, इंग्रज राज्यकर्ते, इंग्रजांचें गुणगान). 'इतिहास' निबंध ६९, ९७, १०५, ११६. इतिहास महत्त्व ९९. एलिफास (पाहा)

'कविता' ८३, 'काव्येतिहास संग्रह' ७. गद्याचे जनक १०९. गर्व ७०, ७१, १००. ग्रंथावर टीका ५१, ६७. ग्रीक विद्येचें पुनरुज्जीवन ४६. चक्रनेमिक्रम ५९. चित्कळेचा स्पर्श २९. जग अपूर्ण ४२. जातिभेद ६४, ११५. जॉनसन चरित्र ६६, ६७, ८८, ८९, ९०, ९६. जुने शास्त्री-पंडित ५१, ६५, ८१. टीकावाङ्मय ६८. टीकापद्धति — (पाश्चात्त्य) ७८, ७९, ८३. तुकाराम ७१, १०५. थोर वक्ते (जगांतले) ९८. देशाभिमान ६३, ८९ (पहा.) देशोन्नति (निबंध) ६३. धर्मसुधारणा २४. धर्माभिमान २४. धार्मिक व सामाजिक क्रांति ४९. नवापंथ २८. नवी पीठिका ३१. नवी ग्रंथपद्धति ९४. नवे विद्वान ७७, निबंधमाला ५—८, २५, ४१, ४२, ४५, ५०, ६२, १००, १०२, १०४, १११, ११३, ११४, ११७, ११८ निबंधलेखन ९४. निवृत्तिवाद ६९, ११५. नीरक्षीर विवेक ५२. प्रजासत्ताक राज्य ४३. प्रबोधन ८८, ९३, ११२, ११३. प्रवास ७७. प्रार्थनासमाज व आर्यसमाज ४८. फुले महात्मा ५३. बर्वे प्रकरण ६३. बीकन्स फील्ड १४, ३५. बेलसरे ५४. भारताची प्राचीन परंपरा ८, २५. मराठीचा गौरव २२, २३. मल्लीनाथ ६८, ७८. महाजनी वि. मो. ११५. महादजी शिंदे २१. महीपति चरित्रें ८९. मॅक्स ओरलला उत्तर ३२. मुद्रणस्वातंत्र्य ४३. मेकॉले ७२, १०५, १०८. मोठे शोधक ७३—७५. मोरोपंत ८२, ८३. मोल्सवर्थ व कँडी ४४, १००, १०४. युरोपीय लोक ३९. युरोपीय वृत्तपत्रें ४३. राजद्रोह २७. राष्ट्र व देशभाषा ८५. राष्ट्रीय अहंकार १११. रूसो-व्हाल्टेअर २८, ४३. रानडे न्या. मू. ५३. लेखनशैली १०२. लोकभ्रम ५९, ७३, १०१. लोकमत ४३. लोकहितवादी ५१, ५२. लोहपरिस-न्याय ६४. 'वक्तृत्व' (निबंध) ९८. वास्तवाची अभिरुचि ६७. वॉशिंग्टन ६३. 'विद्वत्त्व आणि कवित्व' (निबंध) ८४, ९९. शुभवर्तमान ३४, ११७. षड्रिपु ७१, ७५, १००, १०७. सत्तावनचा संग्राम ६३, ६४. सत्यदीपिकाकार ११७. 'संस्कृत कविता' ६५, ६६. 'संस्कृत कविपंचक' (प्रबंध) ७९, ८१, ८३ ८५, ८६. संस्कृत वचनें १०४. स्फूर्तिस्थान ७. स्वत्वजागृति ८, २९, ८७, ११८. हिंदुधर्म व सुधारणा ४८

| | |
|---|---|
| जगन्नाथ पंडित | १००, १०५, १०६ |
| जगांतील दण्डसत्ता | ३१७ |
| जगांतील मुत्सद्दी व टिळक | २६६ |
| जज्ज जेकब | ३०७ |
| जागतिक धर्मपरिषद् | २४१ |
| जागृति व संघशक्ति | २७३ |
| जातिभेद | ५२, ९५, ६०, ६४, ११५, १७८ |
| (शिवाय आगरकर, टिळक पाहा) | |
| जांभेकर बाळशास्त्री | ९६ |
| जावडेकर आचार्य | २१, २८, १६५, २५८ |
| जॉर्ज क्लार्क | २९० |
| जॉर्ज बर्डवुड | १९८ |
| जॉर्ज वॉशिंग्टन | २३७ |
| जॉनसन डॉ. | ४६, ६५, ६७, ८८, ९२, ९९, ११६ |
| जॉन विल्सन | ११ |
| जिज्ञासा जागृति | ९७ |
| जिनसीवाले प्रो. | २३५ |
| जिना बॅ. | २३५ |
| जुने शास्त्री-पंडित | ५१, ६५, ८१, ८३, १२८, १२९, २२५, २६७ |
| 'जूट' निबंध — टिळक | २७४ |

जेम्स मिल १०
जोशी आनंदीबाई डॉ. २३५
ज्योतिर्गणितपद्धति २४२
ज्योतिबा फुले – महात्मा १४, १७, १८, १९, ५२, ५३, ११५

**टिळक बाळ गंगाधर –**

अनाग्रह २२६. अस्पृश्यता २३०, २३४, २३६, व आगरकर २०३, २०४, २०५. इंग्रजराज्यकर्ते २५६, ५९, २८९, २९१–९३. एकवाक्यता शास्त्रवचनांची २५०. एकराष्ट्रीयत्व २३७, २५२, २५३, २७५, २७६. व ॲनी बेझंट २४९. कर्मयोग २४३, २४७. कष्टकरी जनता २१५, २१६. कामगारवर्ग २२० २८६, २८७. कायमधारा पद्धति २६३, केसरी २१६, २६३, २७४, २७७, २८१, ३०५. खेड्यापाड्यांत जागृति २१६, २१७, २५५. खोती २९१. गणेशोत्सव २१६, २२४, २३८, २३९, २५१, २९९, ३०९. गुणगौरव ३१५. गोळे म. शि. २१६. चातुर्वर्ण्य २९८. चित्राव सिद्धेश्वर शास्त्री २३५. चिंतामणराव वैद्य २४२. जगदीश चंद्र बोस २५४. जनताजागृति २७६. जातिभेद व जातिमत्सर २१६, २१७, २२०, २२२. २२९, २३१, २३४ २३६, २४६ २५१, २९५, २९७, २९८, २९९. जिना बॅ. २२२. जुने पंडित (पहा), टिळक अँड दि स्ट्रगल फॉर इंडियन फ्रीडम २८६. टिळकांवरील आक्षेप २३४. टेनेट्स् ऑफ दि न्यू पार्टी २७०. दत्तकाची अनावश्यकता २८३. दादाभाई नौरोजी २५८ (पहा). धनसंचय २८३. धर्मशिक्षण २४६ धर्माचें पुनरुज्जीवन २४९. धर्माची व्याख्या २५४. नवा पक्ष २७१, २७८. पलुसकर पं. २२०. परकी सरकार २५७. परंपराभिमान २३७, २३९. पाश्चात्त्य पद्धति २४९. पाश्चात्त्य शास्त्रे २२३, २२५, २२७. पाश्चात्त्य विद्या २२४, २२६, २२८, २३१. २३४. पूर्णस्वातंत्र्य ३२३. प्राचीन परंपरा २३३, २३६, २३७, २४०, २४१. प्रांतिक सभा २७९. बॅप्टिस्टा बॅ. २२२, ३१७. बौद्ध धर्म २२१. भगवंताचें अधिष्ठान २४६, २४७. भारतधर्ममहामंडळ २५४. भारतीय दर्शनकार २४३. भारतीय परंपरा २२५. महाभारत २४२, २४८. मजूरवर्गांत जागृति २८९. मॅक्स मुल्लर २२७, २२८. मार्क्सवाद्यांची टीका २९०. मृगशीर्ष २४२. मोर्ले २२४. राजकारणाचा पाया २५७. राजद्रोहाचा खटला ६३, २८०. राजनीतिशास्त्र २५६, रामदास २४७. रामदासी संप्रदाय २१७, २२४. राष्ट्रीय अर्थशास्त्र २८२. राष्ट्रीय सभा (काँग्रेस पाहा) २७४. राष्ट्रीय शिक्षण २२३–२५. ललितकला ३२५. लोकमत २५६, २६७. लोकशक्ति २६६, २७१, २७३, २७४. लोकसत्तेचे आद्यप्रणेते २७४. लेखनशैली ३२५. वर्गसमन्वय २२०, २९३. विवेकानंद २४१, २४९. वेदांचे अपौरुषेयत्व २३५, २३६. वेदोक्त प्रकरण ३०१. शब्दप्रामाण्यपद्धति २५०. शिवाजीउत्सव २३८, २३९, २५२. २९९, ३०८, ३०९, ३१०, ३१२. शेतकरी २१५, २१८, २२०, २६२, २६३. श्रीमद्भगवद्गीतारहस्य २४३, २४४, २४७, २४९, २५०, ३२४. संघशक्ति २३१, २७३. सभास्थापनपद्धति २२९. समाजवादी अर्थशास्त्र २८५. साखरेबुवा २४८. सामाजिक सुधारणा २९४, २९६, २९९–३००,

३०२, ३०३ ३०४. साराबंदी ३०३. स्थितप्रज्ञता ३१७, ३२०. स्वचा-व्याप २१७, २२१. स्वदेशीबहिष्कार २३८, २४१, २६१, २६२, २६९–७२, २७६–८०, २८२, २८९, २९६, ३१८. स्वधर्म व स्वराष्ट्र २३८. स्वराज्याची राजनीति २५८, २६२. हर्बर्ट स्पेन्सर २२८, २४०. हिंदी भांडवलदार २८२–२८५. हिंदी राष्ट्र २५२, २५३, २५६. हिंदुत्व आणि सुधारणा २३५. हिंदु मुसलमान २५२, २५३. होमरूल २१७, २७९, २९९, ३११, ३१३, ३१७, ३२२, ३३०. ज्ञाननिष्ठा ३२६

डलहौसी १३, ३४
डायरेक्टर मॅंगल्स १२
डार्विनचा विकासवाद २४३
डाल्टनचा परमाणुवाद २४३
डिग्बी – 'प्रास्परस इंडिया' २५८
डेमॉस्थेनीस ९८

तळवलकर गोपिनाथ ७
तिसरा पुरुषार्थ ७१
'तीन अर्थशास्त्रें' – निबंध १९१
तुकाराम २२, २४, २५, ६१, ७१, १००, १०४, १०५
तुकस्थानचा सुलतान ३११
तेजोभंग २९
तेलंग न्या. मू. १६, २९, ३०, १३९, १६४

दंडी ८०, ८२
दयानंद सरस्वती ११५, २९५
दादाभाई नवरोजी १४, १५, १८, १९, २८, १८८, २२१, २५८, २७८, २९५
दादोबा पांडुरंग ९६
दिलीप, रघुवंशीय राजा ३१५
देवकल्पना १५२
देशबंधु दास ३२१
देशबाह्य निष्ठा ८५, ९४
देशाभिमान ६०, ६३, ६४, ७८, ८८, ११५
देशोन्नति निबंध – विष्णुशास्त्री ६३

धर्म-धर्मांतर २४. धर्मसुधारणा २४, ५२. धर्मसत्ता ४७. धर्मपद्धतीचें फळ (आगरकर) १३९. धर्मकल्पनेचा उगम १५२. सामाजिक सुधारणा १६२, व राजकारण यांचें अद्वैत २४७
धुंडिराजपंत ठेंगडी ३२०

नबाब सय्यद महंमूद ३११
नवें अध्यात्म (महात्माजी) ७
नवें लॅंडरेव्हिन्यू कोड २९२
नागरिकाचें लक्षण ४७
नागरिक व लोकसभा ४९
निबंधमाला (चिपळूणकर पहा)
निवृत्तिवाद ५८, ६९, ७५, ११५ १८६
नेमस्तांची माघार २७७
नेव्हिन्सन व टिळक ३१६
नोकरशाहीचा कारभार १९०
न्यूटन ५९, ७३, ७५

पंडितजी व कम्युनिस्ट ५०
पंडित मालवीय ३१२
पंडित-विष्णुशास्त्री. १७४, १७५
पंडिता रमाबाई १४०
परदेशगमन २४, ५२
परमार्थप्रवणता ६१
पाऊण आणा रोज २५९
पाकिस्तानची आपत्ति ३३३
पाटिल बुवा १०९
पायथागोरस २४४
पाश्चात्त्य पंडित ८, ९, १०, २४, २५, ३७, ३९, ५२, ६५, १९७
पाश्चात्त्यविद्या ४१, ४४, ७७, ७८, १४५, १४७, १५०, १५५, १६४, १६९
पाश्चात्त्य व भारतीय विवाहपद्धति १५७

पाश्चात्य संस्कृति ४१, ४४, ७७, ७८, २२७, २२९, २३१, २३२, २३४
पुनर्विवाह — कायदा १८६
पुनर्विवाहबंदी १७४
पेगन ग्रंथलेखक ३६
पेट्रार्क ९९
पोतदार द. वा. ६
प्रतियोगी सहकारिता ३२१
प्रबोधन १७, ८१, ९३, ११२, ११३, ११८
प्रबोधनयुग ७३, ८८, ९३
प्रभासपट्टण ३०६
प्रवृत्तिधर्म ६०
प्राचीन परंपरा ८, २१, २५, ३३, ३५, ९७, १९६
प्रार्थनासमाज २४, ४८
प्रॉटेस्टंट पंथ ७२
प्लुटार्क ६५, ९९

फलज्योतिष ७५, १०५
फॅक्टरी अॅक्ट २८८
फॉक्स ९८
फेर जमाबंदी व लष्करी खर्च १६५
फेरपाहणीचा जुलूम २६३

बकल ३६, ४४, १००, ११४
बनहट्टी प्रा. ६
बर्वे प्रकरण ६३, २७२
बहिष्कारयोग ३३०
बांगला देश २१
बांगला मुस्लिम ३१४
बाणभट्ट ८१, ८३
बायरन १००
बारीसाल परिषद् ३१०
बालगंधर्व — आठवण ३२५
बाळाजीपंत पेशवे १०९
बॉस्वेल ९०
बुद्धिप्रामाण्य ५८
बॅटिक ३५
बौद्ध धर्म व वैदिक धर्म २२१

ब्रह्मगुप्त २२६
ब्राह्मण आणि त्यांची विद्या २१६
ब्राह्मसमाज २४, ४८
ब्रिटिश गिरणीमालक १९४
भांडवलदार १६, २८९. राजनीति ३४. सत्ताधीश २८९

भर्तृहरि १००, १०५, ३३१
भवभूति ७९, ८०, ८२, ८६, १००, ३२९
भागवतधर्मीय संत व कर्मयोग २४७
भांडारकर डॉ. ११२, १८८
भारताचें ख्रिश्चनीकरण ११
भारतीय कला व पाश्चात्य पंडित १९७
भारतीय कारागिरी २६०
भारतीय संस्कृति २१, १९७, १९९
भारवी १००

मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन १८२
मनुष्य सुधारणेचें मूलतत्त्व १४९, १५०
मराठा समाजाचे गुण ३१५
'मराठा' पत्रांतील लेख २६१
मराठी गद्यवाङमय ८
मराठी कादंबरी ६
मराठी गद्याचे जनक १०९
मराठी भाषा २२
मरे १००
मलबारी शेठ व हिंदु समाजसुधारणा १६१
मल्लीनाथ ६८, ७८
मवाळ पक्ष २७१
मवाळ व जहाल २७६
मवाळांचा अस्त २७९
महंमद पैगंबर १३
महंमद कासीम ३०५
महात्माजींचा उदय व टिळक ३१९
महादजी शिंदे २१, २५, ३७
महाराणा फ्रेडरिक १००
महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र १४८
मॅकिंटॉश २६
मॅक्स मुल्लर १०, २४२

मँचेस्टरचें कापड १०, २४२
मँचेस्टर कापडावर बहिष्कार २८७
माओ व शेतकरी २१९
माधवराव पेशवे ३०४
मानवाची अपूर्णता ५०, १५१
मानवेंद्र राय २१८
मानसिक क्रांति ७४
मानसिक स्वातंत्र्य ४१
मारियस ९८
मॉरिस १००, १०८
मार्क्स ११४, २१९
मालकम जॉन २६
मिराशी म. म. ५८
मिल्टन ७९, ८४
मिल्ल १००, १०५, १६७
मिशनरी २४, २७, ३४, ३५, ४६, १०८, ११८
मिसर देश ५९
मुकुटधारणविधि – लखनौ २८१
मुजुमदार डॉ. ५८
मुद्रणस्वातंत्र्य ४१, ४३, ४७
मुनशी डॉ. कन्हय्यालाल ५८
मुनशी प्रेमचंद ८४
मुंजे डॉ. ३१२
मुंबईचें टाइम्स पत्र ३३०
मुरुडकरबुवा – आठवण ३१७
मुस्लिम ३०६, ३१०, ३१४
मृगशीर्ष २४२, ३२४
मेकॉले १०, १३, २३, ७२, ८३, १००, १०५, १०८, ११७
मोर्ले-मिंटो सुधारणा ३११

युरोपीय लोकसत्ताक राज्यें २७३
येशू महाराजांचे भक्त ३४
येशूचा दयामय धर्म १०४

रंगा अय्यर ३१३
रजपूत ५८, ६०
रमेशचंद्र दत्त २८८
रवींद्रनाथ ८४, ३१८
रशियन क्रांति २८७
राजारामशास्त्री भागवत २५
राजोपाध्ये–कोल्हापूर ३०१
रानडे न्यायमूर्ति १४, १६, १९, २८–३० ३९, ५२, ११२, १३९, १५९, १६४, १८४, १८८, २८८, २९५, २९६ ३१९, व मानवत्वाची प्रतिष्ठा ५३ व इंग्रजी विद्या ५६, व प्राचीन संस्कृति ५३ व सामाजिक सुधारणा १६१. सामाजिक विचार ५६
रामदास २२, २४, २५, २९, ६१, ८९ १०४, व कर्मयोग २४८, धर्म व व्यवहार २४६
राष्ट्र व देशभाषा ८५
राष्ट्रसभा २८–३०, १६४, २७६, ३०६ (कॉंग्रेस पाहा)
राष्ट्रीय अस्मिता २९, ४२, अहंकार १११, भावना १२
रामवनवास व टिळकवनवास ३१६
रामायण ९
रे लॉर्ड – उपदेश २८७
रेसनर व गोल्डनबर्ग २८६
रोम ६३
रोमन ५९

लखनौ करार २८१, ३११, ३१२
लखनौ कॉंग्रेस २८०
लाला लजपतराय ३१
लाहिरी बॅ. ३२१
लॉरिन्सर डॉ. ९, २९
लिटन ३४, ४५, १०८
लिबरल पक्ष १९३
लेकी (ग्रंथकार) ७३
लेव्हकाव्हेस्की २८६
लोकहितवादी १४, १६, १७, ३९, ५१ ५२, ५५, ५६, ५८, ९६, ११५, १३९, १५९, १८८. त्यांचीं शतपत्रें ५०

लोकसत्ता व व्यक्तिस्वातंत्र्य —
समन्वय २७४
ल्यूथर ७२

'वक्तृत्व'—निबंध—विष्णुशास्त्री ४४, ९८
वंगभंग २७७, ३११
वन्ही तो चेतवावारे २६६
वर्गसमन्वय २९१
'वाचन'—निबंध—विष्णुशास्त्री ६५, ९९
वामनपंडित १०६
वाल्मीकि २४, २५, ८४
वॉरन् हेस्टिंग्ज १७, ३४
विचारकलह ४१, १४७
विचारस्वातंत्र्य ४१, ४२, ४७, ५८, ६० (व्यक्तिस्वातंत्र्य, मानसिक स्वातंत्र्य पाहा)
विजयनगर ५८
'विद्वत्त्व आणि कवित्व' — निबंध विष्णुशास्त्री ६५, ८३, ८४, ९९
विद्याभिरुचि ६०, ६५, ६६, ७७, ११५
विद्येचें पुनरुज्जीवन ४५, ४६, ७३, ९३
विधवाविवाह १७, ४९
विधवा स्त्रीची प्रतिष्ठा ७४
विल् ड्युरँट २३८
विलिंग्डन लॉर्ड, गव्हर्नर ३३०
विल्यम जोन्स ७९, ८६
विल्यम पिट ९८
विल्सन प्रो. ९, १०८
विवेकानंद २४१, २९५
विषयसुखाची निंदा १८५
विष्णुबुवा ब्रह्मचारी २३
वीव्हर्स गिल्ड (टिळक) २९१
वेडरबर्न २८
वेदव्यास ८४
वेबर डॉ. ९, २९
वेरुळचीं लेणीं — जेम्समिल्ल ९
वेलकर डॉ. २३०, २९०
वैद्य चिंतामणराव ५८
व्यक्तिस्वातंत्र्य ४८, १४५, १४८, १४९–५९ १६८, १८०, १८१, २३१, २३४, ३०३ (विचारस्वातंत्र्य पाहा)
व्यापार १६, १९०–१९१, २५९, २६०
व्हाल्टेअर २८, ३६, ४३, १००, १०८
व्हिक्टर ह्यूगो ८४

शंकराचार्य ९७, २४९, ३०१, ३१६
शब्दप्रामाण्य ५८, ६१, ७६
शरच्चंद्र ८४
शाकुंतल ८४
शालापत्रक ७७, ९३
शाहीर ८३
शिंदे वि. रा. १९, ३०२
शिवाजी २५, ३७, १०९, ३०४, चरित्राचें रहस्य २३७. एकराष्ट्रीयत्वाचे प्रतीक २३७. राष्ट्रपुरुष ३०८
शीख ५८
शुभ वर्तमान ५८
शूद्र — अस्पृश्य १९, ४९
शूद्राचा ब्राह्मण २९८
शेक्सपीयर ७९, ८४, ९०, ९९, १००
शेख मुजिबुर रहमान ३०९
शेतकरी बटाटयाचें पोतें (मार्क्स) २१८, महाशक्ति २१८, म्हणजे जनता २१५, व कामकरी २१६
'शेतकऱ्यांचा कायदा' — निबंध टिळक २६२
शेतकऱ्यांचा रक्तशोष २६२

षड्रिपु, षड्विकार ७१, ७५, ७७, ७८, १००, १०१

संगीताचा दृष्टान्त (टिळक) २२२
संघटित हिंदी राष्ट्र २५६
सतीचा कायदा १६८
सत्यदीपिकाकार ११७
सत्यशोधक समाज १९
सनातनी कर्मकांड १३१

सन्यत् सेन डॉ. २१८
समाजसुधारणेचा कायदा १६८
समाज स्थित्यंतरें १८२
समान धनवांटप २८५
समानहितत्व (टिळक) २५३
समाजाची शिलावस्था (आगरकर) १८४
संपत्तीचा उपयोग ५२
'संपत्तीचा उपभोग' निबंध – विष्णुशास्त्री ७०, ७२, ९६, १०१
संवाद भास्कर ३३
सरकारची भेदनीति ३०७
– दुटप्पी धोरण १९२
सरदार गं. बा. ७
सर्वांगीण परिवर्तन ५८
सहगमन १७७
सहा सोनेरी पानें १३८
सॅलिसबरीचे उद्गार २६३
सांख्यदर्शन ३०,
साठे प्रो. २६५
सामाजिक क्रांति ४९
सामाजिक सुधारणा व कायदा १६८, १७१
सार्वजनिक सभा २६१, २६४, २९५
सार्वत्रिक संप २९०
सावकारांचा जुलूम २६२
सावरकर स्वा. २२७
साहित्य समीक्षा ८८
सॉक्रेटिस ३६, ७३, ९७
सिडने वेब २८८
सिडने स्मिथ ३५, १००
सिंधी मुसलमान व दाहीर ३१४
सिंबेलाइन तारा ८२
सी. विजयराघवाचारियर ३२०
सिसेरो ३६
सिव्हिल सर्व्हिस परीक्षा १९७
सीझर ९८
सीतेचा वर ३३
सुखपरायण वर्ग (आगरकर) १८१
'सुधारक' वृत्तपत्र १२७
'सुधारक काढण्याचा हेतु' – निबंध आगरकर) १४४
सुबंधु ८२
सुरतेची राष्ट्रीय सभा २६९, ३२७
सुरेंद्रनाथ बॅनर्जी २८, २७९
सेंट झेवियर ११
सेमूर के. २९२
सोलन १००
सोलापूरचे कोष्टी २९१
सोशल वेलफेअर पद्धति २९०
स्टेट्समन पत्र २६३
स्पेन्सर हर्बर्ट १५३, १६७ २०३, २०४
स्त्रियांची परवशता ५०
स्त्रियांचें सान्निध्य १७७
स्त्री व हिंदु धर्मशास्त्र १३४
स्त्रीजीवन १७०, १७५
स्त्रीशिक्षण ४९, १७५, १७६, २९९, ३००
स्व – म्हणजे सर्व जातिवर्ण २२२
स्वत्व – अभिमान ६२. अर्थ २३. उच्छेद १४. ओळख २०. जागृति ८, २३, ३३, ८७, ११८. रक्षण ७७. लोप १०
स्वदेशी व बहिष्कार २६१, २६९
स्वदेशी मार्क्सवादी पंडित २८८
स्वदेशी व स्वराज्य २७०
स्वधर्म २३, २९
स्वभाषाभिमान २२
स्वराज्याची चळवळ ३१४
'स्वयंवर पद्धति' – निबंध आगरकर १७२–१७४, १२९, १४०
'स्वातंत्र्यसमर' (१८५७) १३, २३, ६३, ६४

हंबोल्ट ८६
हर्क्यूलस ९९
हॅन्स कोहन ७५
हॅमडन ६३
हिंदी अस्मिता ९, ११, १४
हिंदी भांडवलदार, जमीनदार २९२

हिंदी स्वराज्य संघ – निबंध
टिळक ३२७
हिंदूंचा तेजोभंग ११
हिंदु धर्म ११, १२, ४८, ५०, १०१
हिंदु धर्म निंदा १२, २४
हिंदु धर्मशास्त्र १८
हिंदु धर्मांतील दोष ६२
हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन २४५
हिंदु परंपरा १११
हिंदु-मुसलमानांचा समेट – लेख ३०८
टिळक २५३
हिंदु मुस्लिमवाद ३०५
हिंदु व इतिहासलेखन १२९
हिंदुसंस्कृति ११
हिंदुस्थानांतील उद्योगधंदे १९०
– गिरणीवाले १९४
हिंदु स्त्रीचें चारित्र्य १९९
हिरोडोटस् ९९
हीनगंड ३४
हेगेल १४४
हेत्वाभास ६२
होमर ९, ७९, ९९
होमरूल २९९
होळकर ३७
ह्यूम २८–३१, २५८, २६३

ज्ञानप्रकाश २५
ज्ञानेश्वर ८९

■ ■ ■